महाराष्ट्र

हिंदुसभेच्या कार्याचा इतिहास



लेखक

शंकर रामचंद्र दाते

आवृत्ति १ ली, १९७५

मूल्य रु. २५-००

लेखक, मुद्रक व प्रकाशक : शंकर रामचंद्र दाते,
काळ मुद्रणालय, १८३५ सदाशिव, पुणे ३०.

हा कागद महाराष्ट्र राज्य शिक्षणखात्याने उपलब्ध केलेल्या सवलतीच्या दरातील आहे.

प्रास्ताविक

महाराष्ट्रातील हिंदुसभेच्या गेल्या पन्नास वर्षांतील कार्याचा इतिहास या ग्रंथात संकलित स्वरूपात देण्यात आला आहे. हिंदुसभेची घटना, तिच्या शाखा उपशाखा, कार्यकारी मंडळांचे सभासद व त्या त्या शाखांनी केलेली नित्य स्वरूपाची कामे यांचा तपशील यात दिलेला नाही. सिंहावलोकनाच्या स्वरूपात गेल्या पन्नास वर्षांतील कार्याचा ठोकळ आलेख व त्यामागील विचारसरणी येथे निवेदन केली आहे.

त्यावरून हे दिसून येईल की आरंभीच्या बारा वर्षांत (१९२४–३५) हिंदुसभेचे महाराष्ट्रातील कार्य हे प्रायः सामाजिक स्वरूपाचे, शुद्धीकरणाचे, सामाजिक परिवर्तनाचे व अस्पृश्यतानिवारणाचे होते. या काळात हिंदु समाजातील जुन्या पिढ्यांतील सनातनी कर्मठ लोकांचा परिवर्तनाच्या या कार्यास विरोध होता. तो दूर करणे, त्यांची समजूत पाडणे व नवा विचार त्यांच्या गळी उतरविणे हे काम महत्त्वाचे होते. त्यासाठी शास्त्रीपंडितांच्या सभा, परिषदा, चर्चामंडळे इत्यादींचा उपयोग करण्यात आला. काळही त्यास अनुकूल लाभला व या कार्याला आरंभी होणारा विरोधही पुढे नष्ट झाला. हे काम नित्य स्वरूपाचे असून ते शेवटास जाण्यासाठी पुढील एक-दोन पिढ्या तरी लागतील. पण ते कार्य सतत चालू राहणे अवश्य आहे.

याच काळात राजकारणालाही विशेष महत्त्व प्राप्त होऊ लागले व हिंदु-मुसलमान वादास मोठ्या प्रमाणावर तोंड पडले. हिंदुसभेचे नेते या काळात काँग्रेसमध्येच होते. त्यांनी गांधीवादी विचारसरणीस प्रसंगानुरूप विरोध केला व मुसलमानांचा अनुनय करण्यातील धोकाही स्पष्ट केला. तथापि काँग्रेस हीच त्यांची राजकारण करणारी संस्था होती. पण पुढे वाद व मतभेद विकोपास गेले व अखेर हिंदुसभावादी मंडळींना काँग्रेसमधून बाहेर पडण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही.

गांधींचे काँग्रेसवर जबरदस्त वजन होते. ते स्वतः वर्णाश्रम धर्मावर श्रद्धा असलेले पण सुधारक, त्यागी व कर्मठ होते. त्यांच्या अंगी कर्तृत्व मोठे व संघटना-कौशल्य तर अनुपम होते. देशासाठी त्यांनी फकिरी पत्करली होती. त्यामुळे हिंदु लोकमानसावर त्यांचा विलक्षण प्रभाव होता. पण मुसलमान समाजावर तो कधीच पडला नाही व जों जों ते मुसलमानांना वश करून घेण्याकरिता त्यांचा अनुनय करू लागले तों तों ते अधिकच दूर दूर जात चालले. मृगजळामागे धावण्याचा तो प्रयास ठरला.

सर्व लोकांनी किमान स्वार्थत्याग केला तर एका वर्षात स्वराज्य मिळवून देईन अशी त्यांची प्रतिज्ञा होती. त्यांच्या या घोषणेने सर्व देश भारला गेला होता. व्यक्तिशः इंग्रजांबद्दल त्यांना विशेष आदरभाव असे. आफ्रिकेत असताना त्यांनी बोअर युद्धात इंग्रजी सेनेची अहिंसात्मक मर्यादित सेवाही केली होती. त्यामुळे त्यांना केसर-इ-हिंद हा बहुमानही इंग्रजांनी दिला होता.

आफ्रिकेत असतानाच त्यांचे सत्याचे व अहिंसेचे प्रयोग झाले होते. त्यामुळे त्यांना महत्त्व प्राप्त झाले होते. त्याच सत्य अहिंसेचा प्रयोग भारतीय राजकारणात करून आपण स्वराज्य मिळवू अशी त्यांची कल्पना होती. मुसलमानांवर खिलाफत प्रकरणी अन्याय झाला आहे अशी त्यांची भावना होती. त्यांना राजकारणात नेतृत्व हवे होते व म्हणून त्यांनी खिलाफत चळवळीचे १९२० वर्षी नेतृत्व स्वीकारले होते. पण मुसलमानांचे अंतरंग गांधी कधीही ओळखू शकले नाहीत हे देशाचे दुर्दैव होय.

इंग्रज हे पक्के राजकारणी होते. या देशातील हिंदु मुसलमानांच्या दुहीवर आपली सत्ता येथे अबाधित राहू शकेल या विचाराने त्यांनी मुसलमानांना जवळ केले होते. मुसलमानांनाही आपण इंग्रज-पूर्व काळातील येथील सत्ताधारी असल्याने त्यांच्या सहकार्याने पुन्हा सत्ताधारी होऊ असे वाटत होते. त्यामुळे येथील राजकारणात वेगवेगळ्या प्रकारचे डावपेच खेळले जात होते.

गांधींच्या विचाराची सर्वसामान्य बैठक अशी होती :

१. स्वराज्य मिळविण्यासाठी आपल्याला अहिंसेशिवाय मार्ग नाही. (गृहीत कृत्य) इंग्रजांच्या लष्करी बळापुढे आपले काही चालण्याची शक्यता नाही, तथापि सत्य अहिंसेच्या मार्गाने आपण इंग्रजांचे मन वळवू शकू असे त्यांस वाटे.

२. अहिंसेने स्वराज्य मिळवावयाचे म्हणजे त्यांना प्रसन्न करूनच ते मिळविले पाहिजे. हिंदु-मुसलमानांची एकी झाल्याशिवाय इंग्रज स्वराज्य देत नाहीत म्हणून ही एकी काही करून घडविणे प्राप्त आहे असे गृहीत धरून त्यासाठी मुसलमान मागतील ती किंमत देण्यास गांधी तयार झाले. त्यांनी मुसलमानांचे पुढारी जिना यांना कोरा चेक देऊ केला.

३. मुसलमानांनी अखंड भारतात राहावे अशी गांधींची मनापासून इच्छा होती. पण मुसलमानांना तो विचार मान्य नव्हता. कारण इंग्रज गेले म्हणजे येथे लोकशाही शासन येणार व लोकशाही शासनपद्धतीत हिंदु बहुसंख्य असल्यामुळ मुसलमानांची स्वतंत्र सत्ता चालणे अशक्य ठरणार हे त्यांना उघड दिसत होते. इस्लामी साम्राज्य सत्ता या देशात निर्माण करणे, निदान मुसलमानांना हिंदूंच्या सत्तेखाली राहावे न लागावे अशी योजना करणे हे त्यांचे अपेक्षित होते. हिंदु-मुसलमान यांचे संयुक्त हिंदुस्थानी राष्ट्र बनविण्याचा विचार त्यांना मान्य नव्हता. म्हणून मुसलमानांनी देशाची फाळणीच मागितली. १९३१ च्या दुसऱ्या गोलमेज

परिषदेच्या वेळीच हिंदुस्थानात १०-११ इस्लामी स्थाने निर्माण करण्याची रहमतअल्ली यांची योजना विलायतेतच प्रथम प्रसिद्ध झाली होती. इंग्रजांचा त्यांस आतून पाठिंबा होता. पण ते तसे उघड मात्र बोलत नसत.

४. इंग्रजांवर दडपण आणण्याचा गांधींचा मार्ग अहिंसापूर्वक असहकारिता, सत्याग्रह व अखेर करबंदी व तुरुंगवास हा होता. तो अव्यवहार्य ठरला होता.

सावरकरांची विचारसरणी अशी होती :

१. स्वराज्य संपादन हे सर्वांचेच उद्दिष्ट आहे. पण त्यासाठी केवळ अहिंसेचाच मार्ग चोखाळला पाहिजे हे सावरकरांना मान्य नव्हते. विनंती करण्यापासून सशस्त्र बंड करण्यापर्यंत सर्व मार्ग सावरकरांना वैध होते. त्यासाठी वाटेल तेवढा त्याग करण्याची त्यांची तयारी होती. सर्व समाजाची त्यांस सहानुभूति हवी असे व ती आत्मबलिदानाने प्राप्त होते असा त्यांचा विश्वास होता.

२. इंग्रजांच्या अडचणींचा फायदा घेऊन राज्ययंत्रात जेथून व जितके शिरता येईल, तितके शिरावे व आतून पोखरून व बाहेरून आक्रमक धोरण स्वीकारून शत्रु नामोहरम करावा, सशस्त्र सैनिकी बंड हाच स्वातंत्र्य संपादनाचा अंतिम मार्ग आहे व त्यासाठी सर्व मार्गांनी प्रयत्न करीत रहावे व योग्य संधीची वाट पाहावी असे त्यांचे मत होते. राज्यशास्त्रातील या धोरणावर सावरकरांचा भर होता. त्यांना तशी अनुकूलता लाभली नाही; पण जर लाभली असती तर त्यांनी युद्धकाळात सर्वत्र आपल्या विचारांची मंत्रिमंडळे बनविण्यात पुढाकार घेतला असता. मुस्लिम लीगच्या बंगाल व सिंधमधील मंत्रिमंडळात याच धोरणाने हिंदुसभेचे पुढारी सामील झाले होते. याच्या उलट काँग्रेसने सत्तास्थानांवर बहिष्कार घालून आपलेच पाय खोड्यात अडकवून घेतले होते. त्यामुळे पाकिस्तानवाल्यांचे विशेष फावले व त्यांचा मार्ग खुला झाला. दुसरे महायुद्ध सुरू होताच सावरकरांनी मात्र सैनिक भरतीचा पाठपुरावा केला व हिंदूंच्या सैनिकीकरणावर भर दिला. त्याचा पुढे सुभाषबाबूंना किती फायदा झाला याची साक्ष इतिहासच देत आहे.

३. प्रतियोगी सहकारिता हे सावरकरांच्या राजनीतिशास्त्राचे सूत्र होते. मुसलमान व इतर अल्पसंख्य जमाती सहकार्यास आल्या तर त्यांसह; नाही तर त्यांच्याशिवाय आणि त्या इंग्रजांना मिळाल्या तर त्या सर्वांशी लढून हिंदूंनी आपल्या बळावर स्वातंत्र्याचा लढा लढला पाहिजे असे सावरकर प्रतिपादन करीत. या देशाच्या स्वातंत्र्याचा लढा लढण्याचे मुख्य दायित्व या देशातील मुख्य समाज जो हिंदुराष्ट्र त्यावरच आहे असे ते मानीत. मुसलमानांच्या किंवा इतरांच्या सहकार्यावर विसंबण्याची त्यांची तयारी नव्हती.

४. हा देश हिंदूंचा आहे, या देशातील लोकसमूहाला एकत्र बांधून ठेवणारे बंधन हिंदुराष्ट्रवादाशिवाय अन्य नाही, व मुसलमान जोपर्यंत या सूत्रात एकरूप होऊन बसत नाहीत तोपर्यंत संघर्ष अटळ आहे असे सावरकर मानीत.

आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव स व हिंदुरिति स्मृतः ।।

ही त्यांच्या हिंदुराष्ट्रवादाची पायाभूत धारणा होती. त्याच आधारावर आजचे हिंदुराष्ट्र उभे आहे ही वस्तुस्थिति आहे.

सावरकरांचे विचारसूत्र ' राजकारणाचे हिंदूकरण व हिंदूंचे सैनिकीकरण ' हे होते. त्यामागील त्यांचा उद्देश स्पष्ट होता. हिंदुस्थान अखंड राहावे व अखंड हिंदुस्थानातही स्वातंत्र्य संपादनानंतर हिंदूंचेच वर्चस्व राहिले पाहिजे हे त्यांना अपेक्षित होते व ते सैनिक बळाच्या साहाय्याने शक्य आहे हेही ते जाणून होते. म्हणून हिंदूंच्या सैनिकीकरणावर त्यांचा विशेष भर होता. इंग्रजही ते ओळखून होते. ' स्टेट्स्मन ' या कलकत्ता येथून प्रसिद्ध होणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यनिष्ठ वृत्तपत्राच्या संपादकांनी तर सावरकरांचा हा उद्देश आपल्या जानेवारी १९४३ मधील एका लेखात एका प्रसंगाने स्पष्टपणे मांडलाही होता. ते म्हणतात :

For the domination over the country he (Savarkar) is prepared to fight and loudly demands that in recruiting for armies in India the present rulers should elect a majority of Hindus so that he may have an instrument to enforce his will when the British rule is finally abandoned.

(अखंड भारतातही हिंदुराष्ट्रवादाचे वर्चस्व राहिले पाहिजे असे सावरकरांना अपेक्षित होते, व त्यासाठी लढण्याचीही त्यांची तयारी होती. म्हणून सध्याच्या (इंग्रज) राज्यकर्त्यांकडे ते जोरजोराने मागणी करीत आहेत की हिंदुस्थानात सैनिकभरती करताना राजकर्त्यांनी बहुसंख्य भरती हिंदूंचीच केली पाहिजे. हेतु हा की जेव्हा ब्रिटिश सत्ता येथून कायमची नष्ट होईल तेव्हा या सैनिक बळावर आपल्याला आपले अपेक्षित साध्य करता येईल असा सावरकरांना विश्वास होता.)

काँग्रेसने मात्र ही भूमिका कधीही मान्य केली नाही. त्यांनी केवळ प्रादेशिक राष्ट्रवादाचा स्वीकार केला; आणि तो प्रदेश भंग पावला तरी त्याही स्थितीत त्या भग्न मूर्तीलाच ते अद्यापही चिकटून आहेत ! त्यामुळे अल्पसंख्याकांचा अनुनय आणि अभावात्मक निधर्मीपणा हा आजही पूर्वीप्रमाणेच काँग्रेसवाद्यांचा स्थायी भाव आहे. अगदी अलीकडे मुंबई काँग्रेसने वन्देमातरम्‌ला विरोध करणारांचा पुरस्कार केला यावरून याचा प्रत्यय येतो.

मुस्लिम लीगची भूमिका अशी :

१. मुसलमान या देशात पूर्वी राज्यकर्ते होते. या देशाच्या राजकारणात त्यांना महत्त्वाचे व प्रतिष्ठेचे स्थान आहे. इंग्रज गेल्यानंतरही पुन्हा इस्लामी वर्चस्व

येथे प्रस्थापित झाले पाहिजे. त्यासाठी इंग्रज मदत देऊ म्हणतात ती तर घ्यावीच व अधिकासाठी झगडत बसावे.

२. हिंदुस्थानच्या ईशान्य भागात (बंगाल आसाम) व वायव्य भागात (पंजाब, सिंध, बलुचिस्तान व सीमा प्रांत येथे) मुसलमान बहुसंख्य असल्याने तेथे मुसलमानांचें स्वतंत्र सार्वभौम शासन चालले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी हिंदूंवर दडपण आणण्याकरिता त्यांनी अत्याचार केले. सर्व जगातील मुसलमान येथून तेथून एक असे ते मानतात. प्रादेशिक राष्ट्रीयता त्यांना मुळीच मान्य नाही. काँग्रेसवादी मात्र केवळ प्रादेशिक राष्ट्रीयतेवरच बोट ठेवून बसले होते. दोघांची उद्दिष्टे व ध्येयकल्पनाच परस्पर विरोधी होत्या. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला.

भारताला स्वातंत्र्य मिळाले ते अहिंसेने किंवा सत्याग्रहाने मिळाले नाही. ते दुसऱ्या महायुद्धाच्या काळात निर्माण झालेल्या परिस्थितीने प्राप्त करून दिले. त्यास काँग्रेसची चळवळ काही अंशी उपकारक झाली व लोकमानसात काँग्रेसला एकमेव स्थान मिळाल्यामुळे स्वातंत्र्यानंतर ती सत्ताधीश होऊ शकली. त्याचप्रमाणे सुभाषबाबूंचे सैनिकबंड हेही स्वातंत्र्यसंपादनाला कारणीभूत झाले. पण मुख्य परिणाम युद्धामुळे इंग्रज दुबळे झाले म्हणून स्वातंत्र्य प्राप्त झाले हे सत्य आहे. या काळात १९३७–४७ हिंदुसभेने आपल्या विचारसरणीचा राजकारणावर जेवढा प्रभाव पाडता आला तेवढा पाडला. त्यामुळे पंजाबची व बंगालचीही फाळणी होऊन अर्धा हिंदु पंजाब व अर्धा हिंदु बंगाल बचावला. सावरकरांच्या विचारानुसार काँग्रेस नेते वागते तर फाळणीचा प्रसंगच टळला असता; व त्यातून फाळणीचा प्रसंग ओढवलाच असता तर हिंदुमुसलमान लोकवस्तीची अदलाबदल सर्वत्र घडून येती. पण विधिलिखित तसे नव्हते.

स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या विविध प्रश्नांवरही हिंदुसभेने आपला स्वतंत्र दृष्टिकोन मांडला आहे व विविध स्वरूपाची संघटनात्मक व इतर कार्ये केली आहेत त्यांची या इतिहासात नोंद आहे. हिंदुसमाजाने हिंदुसभेला पुरेशा प्रमाणात पाठिंबा दिला असता तर याहून किती तरी अधिक भरीव विधायक कार्य होऊ शकले असते. पण स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणात स्वार्थावर पक्षांची उभारणी होत गेली, पक्षांचे पेवच फुटले. त्यामुळे संघटित विरोधी पक्ष निर्माण होऊ शकला नाही. आजच्या राजकारणाची तीच सर्वांत मोठी शोकांतिका आहे. या परिस्थितीतून केव्हा व कसा मार्ग निघेल यावर भारताच्या लोकशाहीचे भवितव्य अवलंबून राहील.

१९७४ वर्षी महाराष्ट्रातील हिंदुसभेच्या स्थापनेस ५० वर्षे झाली. या काळातील महाराष्ट्रातील हिंदुसभेच्या कार्याचा इतिहास ग्रंथरूपाने प्रसिद्ध करावा असे बार्शी येथे १९–२० ऑक्टोबर १९७४ ला भरलेल्या हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाच्या

सभेत ठरले व त्यासाठी श्री. शंकर रामचंद्र दाते, बाळाराव सावरकर व गोपाळ विनायक गोडसे यांची एक समिति नेमण्यात आली. समितीने हे काम सर्वस्वी मजवर सोपविले व मीही ते पत्करले. या कामी समितीच्या सभासदांनी मला संपूर्ण स्वातंत्र्य दिले त्यामुळे मला हे काम सहा महिन्यांत पुरे करता आले.

या ग्रंथात जे उतारे देण्यात आले आहेत ते साधार असून त्या त्या मूळ ग्रंथातून किंवा त्या वेळच्या वृत्तपत्रांतून घेतले आहेत. प्रसंगानुसार त्या त्या विषयांची मजजवळ काही टिपणेही केलेली होती. त्यांचाही या ग्रंथात मी उपयोग केला आहे. ते सर्व करताना " नामूलं लिख्यते किंचित् " हा विचार कटाक्षाने पाळला आहे. या ग्रंथात व्यक्त केलेले विचार व नमूद केलेली माहिती मला जशी प्राप्त झाली तशी ती एकत्रित दिली आहे. हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांना पूर्वी काय घडले हे समजण्यासाठी ' इति ह आस ' हे या ग्रंथावरू न आ ळून येईल. महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या जिल्हा हिंदुसभांनी केलेल्या कार्याचा काही संक्षिप्त वृत्तान्त व काही कार्यकर्त्यांचा अत्यल्प परिचय दिला आहे.

हिंदुसभेच्या ध्येय धोरणासंबंधाने सत्ताधारी पक्षाने व केवळ अर्थनिष्ठ विचाराच्या मंडळींनी विपर्यस्त समज सतत पसरविण्याचे काम चालू ठेवले आहे. तो विषारी प्रचार मोडून काढणे व हिंदुसभेच्या ध्येयधोरणाचे वास्तविक स्वरूप समाजापुढे वारंवार मांडून हिंदुराष्ट्रवाद व लोकशाही निषठा त्यांच्या गळी उतरविणे हे कार्य व्हावयास हवे आहे. ते करू इच्छिणारांना या ग्रंथात भरपूर साहित्य उपलब्ध होईल. हा ग्रंथ लिहिण्यामागील तोच उद्देश आहे. समाजाने हंसक्षीर-न्यायाने याचे रसग्रहण करावे एवढीच प्रार्थना आहे.


शंकर रामचंद्र दाते

अनुक्रमणिका

अर्पणपत्रिका

ज्यांनी हिंदुराष्ट्र विचाराच्या प्रस्थापनेसाठी
आपले तन-मन-धन अर्पिले,
त्यासाठी प्रसंगानुसार त्याग केला,
त्यासाठी बलिदानही केले,
त्यांच्या चिरंतन स्मृतीस अर्पण

लेखक




हिंदुमहासभेचे त्यावेळचे अध्यक्ष पं. व्रजनारायण व्रजेश यांच्यासह महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी (दि. ३१।७।१९७२) घेतलेले छायाचित्र

अ. भा. हिंदुमहासभा अधिवेशनांचे महाराष्ट्रीय अध्यक्ष



श्री शंकराचार्य डॉ. कूर्तकोटि
प्रयाग १९२४ व लाहोर १९३६



डॉ. बा. शि. मुंजे
पाटणा १९२७



श्री. न. चिं. केळकर
जबलपूर १९२८
दिल्ली १९३२



स्वा. वि. दा. सावरकर
अहमदाबाद १९३७, नागपूर
१९३८, कलकत्ता १९३९,
मदुरा १९४०, भागलपूर १९४१,
कानपूर १९४२.

अ. भा. हिंदुमहासभा अधिवेशनांचे महाराष्ट्रीय अध्यक्ष




श्री. ल. ब. भोपटकर
गोरखपूर १९४६ व महाराष्ट्र हिंदुसभा
अध्यक्ष १९३४–४२



डॉ. ना. भा. खरे
कलकत्ता १९४९, पुणे १९५०
जयपूर १९५१



म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
महाराष्ट्र हिंदुसभा १९२४ ते १९३३



श्री. ज. स. करंदीकर
१९४३

महाराष्ट्र हिंदुसभा अध्यक्ष



श्री. शि. ल. करंदीकर
१९४४



शेठ गुलाबचंद हिराचंद
१९४४–४५



श्री रामभाऊ मंडलीक
१९४६–५४




श्री. ग. म. नलावडे
१९५५ ते १९६२


महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष




श्री. वि. रा. पाटील, १९६२ ते ६८



श्रीं. मा. द. पाठक, १९६८–७१




श्री. शं. रा. दाते, १९७१ ते ७२




श्री. ह. भा. भिडे, १९७२–७३


महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष व पदाधिकारी




श्री. विक्रम ना. सावरकर
१९७३–७५



श्री. ग. दा. सावरकर
१९३९–४५




श्री. बाळाराव सावरकर
१९३७–१९७५




श्री. न. वि. गोडसे,
१९३८–१९४६

हिंदुसभेचे अध्यक्ष व पदाधिकारी



राजा नारायणलाल बन्सीलाल



डॉ. ना. दा. सावरकर



डॉ. एम.बी. उदगावकर, १९२६



श्री. श्री. शं. नवरे

महाराष्ट्र हिंदुसभेचे पदाधिकारी



श्री. रा. गो. भिडे, १९३२–१९४०



श्री. गं. वि. गोखले, १९२४–१९५०




श्री. वा. ब. गोगटे
१९४२–१९७०




श्री. कृ. गं. गांगुर्डे
१९३८–७०

हिंदुसभेचे अध्यक्ष व पदाधिकारी




श्री. पंडितराव दांडेकर
१९३७–१९७५



श्री. दा. मो. भट
१९३५–१९७५



श्री. शं. बा. जोशी
१९३८–१९४९



डॉ. वा. रा. जोशी
१९३७–१९७५



श्री. गो. रा गायकैवारी
१९३८–१९७५




श्री. वि. रा. करकरे
१९४०–१९४७




कैं. ना. द. आपटे
१९४०–१९४६



श्री. र. के. तांबोळी
१९६०–१९७५



श्री. यशवंतराव जोशी
१९३५-७५




श्री. केसकर
१९३५-७५




श्री. धो. कृ. साठे



श्री. केशव ना. जोग
१९४५-७५



पुणे (बसलेले) श्री. रा. स. भट, शं. रा. दाते, ग. म. नलावडे, दा. मो. गोडबोले, जयराम नारगोळकर (बसलेल्या) उषा खेर, असिलता गोडसे, सौ. सिंधु गोडसे, लक्ष्मीबाई महाजन, सौ. सुधा आफळे, सौ. पुष्पा खरे, (मागे उभे) श्रीराम गाडगोळ, होनराव, ठाकुर देसाई, नाना गोडसे, डॉ. चिं. ना. साठे, बजरंग चौधरी, आठल्ये.




नगर (बसलेल्या) सौ. महापुरुष, सौ. सुमन मेहेंदळे, श्रीमती परमार, सौ. उषा भागवत, (उभ्या) कु. विद्या गायकैवारी, कु. प्रतिभा परमार, कु. छाया शेवेकर.




मुम्बई १ (मागे उभे) भाऊराव थत्ते, बाळाराव जेरे, भरत साटेलकर. (मागे) सौ. इंदिरा ल. साटेलकर, ताई दिवेकर, सौ. विमल जोगळेकर, सौ. मंदाकिनी धमंडे, इंदिराबाई आठवले, सौ. साठे. (वसलेले) बाळाराव सावरकर, ल. र. साटेलकर, अ. स. भिडे गुरुजी, बापूराव घारपुरे, माधवराव पाठक



नगर–नौखाली भागातील अनाथ हिंदु भगिनींच्या साहाय्यासाठी दि. २६।१०।४६ ला झालेल्या भाऊबीजसमयी, सौ. शेंबेकर, सौ. भावे. सौ. गाडगीळ, सौ. हिवरगावकर, सौ. माई सप्तर्षि, सौ. सरस्वतीबाई करकरे व इतर भगिनी.



मुम्बई २ (मागे उभे) ग. शं. देवधर, य. अ. तेंडूलकर, ना. मो. दातार, वि. गं. देसाई, व. शं. घमंडे. (उभे) सं. तु. गिरकर, स. वा. जोशी, आनंदराव भेंडे, वि. साठे, आबा गर्दे, श्री. श्री. सप्रे. (बसलेले) रा. के. नगरकर, ल. ग. थत्ते, डॉ. ना. अ. देशमुख, गो. र. प्रधान, रा. तु. मसुरकर.




रत्नागिरी (उभे) भ. भा. जोशी, सु. अ. मलुष्टे, अ. शं. जोशी, डॉ. वि. म. शिंदे. (बसलेले) श्री. ज. वि. आठल्ये, मो. वि. दामले, का. ल परुळेकर, पु. ग. भिडे.




नगर २ (उभे) म. ना. शिरसाठे, पु का. मेहेंदळे, ल.मो. पवार, श्री. रं. ब्रह्मे.
(बसलेले) र. के. तांबोळी, वा. स. यंगल, गो. रा. गायकैवारी, रं. धों. ब्रह्मे.




नगर येथे हिंदुसभेच्या वतीने ललित लतामंडळाने केलेल्या उत्तरक्रिया नाट्यप्रयोग प्रसंगी




(मागे उभे) वसंतराव उदगावकर, शंकरराव करमरकर, प्रभाकर पटवर्धन, रामभाऊ खाडिलकर, महादेवराव क्षीरसागर, शेषाप्पा वोळाज, अप्पाराव दगडे पाटील, नरुभाऊ जोशी, शंकरराव अंबपकर, के. ना. जोग (बसलेले) भास्करराव पोंक्षे, तिप्पाण्णा पाटील, गणपतराव जाधव, पंडितराव दांडेकर, बाबूराव उदगावकर, बापूराव साठे, भा. ल. रानडे (खाली बसलेले) मुकुंद उदगावकर, लक्ष्मण लिमये, अरुण चाफेकर.



सातारा (मागे उभे) ना. ल. फणसळकर, द. स. हर्षे, मा. शि. मुळे, के. स. साठे, शहाणे, भिडे, मराठे. (बसलेले) सौ. फणसळकर, म. द. वाघ गुरुजी, डॉ. वा. रा. जोशी, द. रा. कुलकर्णी, कृ. म. आठल्ये, गोपाळराव शहाणे, सौ. आनंदीबाई का. कुलकर्णी. शहाणे बंधु.



सोलापूर हिंदुसभेचे कार्यकर्ते



खामगाव येथील हिंदुसभा कार्यकर्ते.

महाराष्ट्र हिंदुसभेच्या कार्याचा इतिहास

(१)

हिंदुमहासभेची स्थापना

महाराष्ट्रातील हिंदुमहासभेच्या कार्याचा इतिहास हा गेल्या पन्नास वर्षांचा आहे. हिंदुसभा ही काही स्वतंत्र संघटना नाही. ती अखिल भारत हिंदुमहासभेची एक शाखा आहे. ती १९२४ साली पुण्यास प्रथम स्थापन झाली. त्या वेळी ती हिंदुमहासभेची एक घटक शाखा या स्वरूपात जरी स्थापन झालेली नव्हती तरी त्यांच्यापुढील विषय व विचार समान होते; आणि योग्य वेळी महाराष्ट्रातील हिंदुसभा ही अखिल भारतीय हिंदुमहासभेची एक प्रमुख शाखा बनली. आजही ती तशीच आहे.

हिंदुसभा स्थापनेचे मूळ कारण

अखिल भारत हिंदुमहासभेचे मुख्य कार्यालय दिल्लीत असले तरी तिचा मूळ उगम पंजाबात झाला आहे. इंग्रजांच्या राजकीय धोरणाला प्रतिकाररूप म्हणून जी आंदोलने या देशात निर्माण झाली त्यात ते मूळ सापडते. इंग्रजांनी १८५७ च्या क्रांतियुद्ध काळापासूनच आपल्या सत्तेला हिंदुमुसलमानांच्या एकजुटीपासून धोका आहे हे ओळखले होते, व हिंदु व मुसलमान यांच्यात फूट घडवून आणण्याचे धोरण त्यांनी आखले होते. मुंबईचे पहिले गव्हर्नर लॉर्ड एलफिन्स्टन यांनी विलायत सरकारला दि. १४ मे १८५९ ला पाठविलेल्या पत्रातही त्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यांनी त्यात म्हटले होते की Divide et empera was the old Roman motto; and it should be ours. (विरोधकांत फाटाफूट घडवून आणणे हे पूर्वीच्या रोमन साम्राज्यवाद्यांचे धोरण असे. आपणही त्याचाच अवलंब केला पाहिजे.) या धोरणास अनुसरून त्यांनी प्रथम मुसलमान बहुसंख्य वस्तीचे प्रदेश हिंदु बहुसंख्य वस्तीच्या प्रदेशापासून अलग करण्याचे ठरविले.

शिखांचे राज्य समाप्त केल्यानंतर व सीमा प्रदेशात स्थिरस्थावर झाल्यानंतर त्यांनी वरील धोरणास अनुसरून पंजाबची फाळणी केली. या वेळी पंजाब प्रांत मोठा होता. वायव्य सीमा प्रांत हा पंजाबचाच एक भाग होता. तो त्यांनी प्रथम वेगळा करावयाचे ठरविले. दि. १५ नोव्हेंबर १९०१ या दिवशी वायव्य

सीमाप्रांत वेगळा झाला. त्या भागातील बहुतेक सर्व वस्ती मुसलमानांचीच होती. याच धोरणास अनुसरून त्यांनी १९०५ मध्ये बंगालची फाळणी करून मुसलमान बहुसंख्य वस्तीचा पूर्वबंगाल प्रांत वेगळा केला आणि पुढे १९३५ नंतर सिंध प्रांतही मुंबई राज्यापासून अलग करून त्याचा वेगळा प्रांत बनविला.

ब्रिटिश नोकरशाहीचे धोरण

उर्वरित पंजाब प्रांताची परिस्थिति जरा वेगळी होती. तेथे हिंदु व मुसलमान संख्येने जवळजवळ सारखेच होते. तथापि मुसलमान समाज मोगली काळापासूनच सत्ताधारी असल्यामुळे त्यात बडे जमिनदार, सरदार, श्रीमंत वर्ग यांचा भरणा मोठा असे. आर्थिक दृष्टया त्यांची परिस्थिति हिंदूंच्याशी तुलनेने पुष्कळच चांगली होती. हिंदूमध्ये जाठ समाज हा प्रायः गरीब शेतकरी होता. त्याची आर्थिक स्थिति विपन्न होती. वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या हिंदु जातीत लाला लोकांत व्यापारी व उद्योगधंदा करणारे, पंडित, नोकरपेशा करणारे यांचा विशेष भरणा असे.

आधीच वरचढ असलेल्या मुसलमानांना इंग्रजांनी पंजाबात आणखी वरचढ करण्याच्या उद्देशाने लँड एलिएनेशन ॲक्ट या नावाचा एक कायदा १९०१ वर्षी केला. या कायद्याने वरिष्ठ जातीच्या लोकांना खालच्या जातीतील लोकांच्या जमिनी खरेदी केरण्यास बंदी करण्यात आली. वरिष्ठ जातीत व्यापार धंदा करणाऱ्या हिंदु जातींचा समावेश करण्यात आला व खालच्या मागासलेल्या जातीत जाठ हिंदु व तत्सम इतर काही शेतकरी जातींचा व त्याचबरोबर सर्वच्या सर्व मुसलमानांचा समावेश करण्यात आला.

सरकारच्या या कायद्याचा परिणाम असा झाला की गरीब हिंदु शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीमुळे जमीन विकावी लागे तेव्हा त्यांना ती विकत घेऊ शकणाऱ्या वरिष्ठ जातीतील सधन हिंदूंना विकता येत नसे. ती त्यांना श्रीमंत मुसलमानांनाच विकावी लागे. कारण या कायद्यामुळे वरिष्ठ जातीतले समजल्या गेलेल्या हिंदूंना त्यांची जमीन खरेदी करण्यास बंदी केलेली होती. श्रीमंत मुसलमानही किंमती पाडून जमीन खरेदी करीत. सरकारच्या या धोरणाचा परिणाम दहा वर्षांत असा झाला की जेथे सत्तर ऐंशी टक्के शेतजमिनीचे मालक हिंदु होते तेथे त्यांची संख्या घटत गेली व मुसलमान जमिनीचे मालक बनत गेले. अशा रीतीने कायद्याच्या जोरावर इंग्रजांनी मुसलमानांना जमिनीची मोठ्या प्रमाणावर मालकी मिळवून दिली.

पुढे १९०९ वर्षी मोर्ले-मिंटो सुधारणा आल्या. त्यात मताचा अधिकार जमिनीच्या मालकीच्या प्रमाणावर आधारलेला होता. त्यामुळे पंजाबात मुसलमान बहुसंख्य नसताही मतदार संघात ते बहुसंख्य झाले व विधिमंडळात त्यांची अधिक संख्येने निवड होऊ शकली.

इंग्रजांनी टाकलेला हा धूर्त डाव चाणाक्ष व जाणकार हिंदूंच्या लक्षात आल्याशिवाय राहिला नाही. त्यांनी या विषम व अन्यायी धोरणाविरुद्ध ओरड केली, पण त्या काळात सर्वच सत्ता आमूलाग्र इंग्रजांच्या हाती असल्याने व त्यांचे हे धोरण विचारर्वपूक आखले गेले असल्याने त्यांनी हिंदूंच्या ओरडीस दाद दिली नाही.

काँग्रेस नेत्यांचे धोरण

हिंदूनी आपले हे गाऱ्हाणे काँग्रेस नेत्यांपुढे मांडले. पण मुसलमानांविरुद्ध काही बोलण्यास काँग्रेस नेत्यांचीही तयारी नव्हती. आधीच मुसलमान काँग्रेसमध्ये येत नसत; पण काँग्रेसमधील हिंदू नेत्यांना आपल्या चळवळीस मुसलमानांचाही पाठिंबा आहे हे दाखविण्याची फार इच्छा असे व त्यासाठी ते अनेकदा पदरचा खर्च करून मुसलमानांना काँग्रेस अधिवेशनास आणण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे चारदोन मुसलमान भिडेभाडेने येत; पण त्यात त्यांचे मन नव्हते.

इंग्रजांनी कायद्याच्या कपटाने हिंदूवर केलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासही हे काँग्रेस नेते तयार होईनात ! हिंदूवर अन्याय झाला आहे हे ते मान्य करीत; पण तसे उघड बोलण्याने मुसलमान बिचकतील व चुचकारून का होईना जे काँग्रेस-बद्दल सहानुभूति दाखवीत आहेत तेही विरुद्ध जातील अशी त्यांना भीति वाटे ! काँग्रेसने हिंदूवरील या अन्यायाला वाचा फोडण्यास नकार दिल्याने पंजाबच्या हिंदूंनी आत्मसंरक्षणार्थ संघटित व्हावयाचे ठरविले व त्यांनी १९०७ वर्षी पंजाब हिंदुसभा या नावाची संस्था स्थापन केली. त्या आधीच १९०६ मध्ये मुस्लिम लीग स्थापन झाली होती व इंग्रजांचे मुसलमानांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचे धोरणही स्पष्ट झाले होते.

हिंदूंचे हे न्याय्य गाऱ्हाणे ऐकून घेण्यास, त्यावर विचार करण्यास व त्या संबंधात काँग्रेसचा एखादा प्रस्ताव संमत करण्यास काँग्रेस नेते तयार झाले नाहीत. काँग्रेसचे मुसलमानधार्जिणे धोरण तेव्हापासूनचे आहे. मुसलमानांना देण्यात आलेल्या या अन्याय्य लाभाविरुद्ध बोलण्यास काँग्रेस नेत्यांनी नकार दिल्यामुळे पंजाबमधील जाणकार हिंदूंनी स्वतःच्या पायावर उभे राहावयाचे ठरविले. त्यांनी १९०९ वर्षी पंजाब हिंदु सभेचे पहिले अधिवेशन लाहोर येथे भरविले. त्यांचे नेते लाला लजपतराय, लाला हंसराज, इत्यादि नामवंत, विद्वान् व प्रातिनिधिक महत्त्व असलेले हिंदु नेते होते. हे अधिवेशन लाहोर येथे पंजाब हायकोर्टाचे नुकतेच सेवा-निवृत्त झालेले सरन्यायाधीश अतुलचंद्र चतर्जी यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९ ऑक्टोबर १९०९ ला भरले. अध्यक्ष चतर्जी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जमीनविषयक कायद्यामुळे जमीन धारण करण्याच्या बाबतीत हिंदुसमाजावर कसा अन्याय झाला व होत आहे व इंग्रजांचे यामागील राजकीय धोरण कसे पक्षपाती आहे यावर उत्तम प्रकाश पाडला आहे.

याच संबंधात पंजाब हायकोर्टाचे दुसरे एक सेवानिवृत्त न्यायाधीश लाला लालचंद यांनी हिंदु समाजाच्या कर्मसंन्यासी वृत्तीसंबंधाने 'पंजाबी' या नावाने लाहोरच्या वृत्तपत्रात एक लेख लिहिला. त्यात त्यांनी पुढील उद्‌गार काढले होते :

Self-abnegation in politics is संन्यास no doubt; but it is misplacd and untimed; and it is suicidal and ruinous when it implies the displacement of one community or other to the ruin of the nation practising self-abnegation. (आत्मनिवृत्ति म्हणजे संन्यास खरा; पण राजकारणात तो कालोचित नसतो व स्थलोचित वा प्रसंगोचितही नसतो. तो आत्मघातकी ठरतो. आणि जेव्हा या संन्यासप्रवृत्तीमुळे एखादी जमातच्या जमात देशोधडीस लागते व राष्ट्राचा घात होतो तेव्हा तर ही संन्यासप्रवृत्ति केवळ नाशकारकच ठरते.)

सर्वसामान्य हिंदूंच्या मनोवृत्तीवर व निराशावादावर ते अंजन होते. हे अधिवेशन झाल्यावर पंजाब हिंदुसभेने व्हाइसराय मिंटो यांच्याकडे एक शिष्टमंडळ नेण्याचे ठरविले व सरकारच्या लँड एलिएनेशन कायद्याने हिंदु समाज जमिनीच्या मालकीतून कसा उठविला गेला आहे व सरकारने या मार्गाने मुसलमान अल्पसंख्य असताही त्यांना कृत्रिम रीतीने मतदारांत कसे बहुसंख्य बनविले आहे. यासंबंधाने तक्रार करण्याचे योजिले. या वेळी योगायोगाने व्हाइसरॉय मिंटो लाहोरला यावयाचे होते. पण पंजाब हिंदुसभेने त्यांची भेट मागितली असता ती त्यांनी नाकारली व तिने त्यांजकडे जे निवेदन पाठवले होते त्यासही वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

मोर्ले मिंटो सुधारणातील पक्षपाती मतदारसंघ

मोर्ले मिंटो सुधारणा कायद्याखाली मतदारविषयक जे नियम करण्यात आले. त्यांत मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात येऊन शिवाय संयुक्त मतदार संघातही स्थान देण्यात आले होते. शिवाय कृत्रिम रीतीने मुसलमान मतदारांची संख्या वाढविण्यात आली होती. ती अशी :

(१) दहा हजार रुपये उत्पन्नावर प्राप्तिकर भरणाऱ्या मुसलमानाला मताचा अधिकार; पण हिंदूंच्या बाबतीत मात्र तीस हजारांवर प्राप्तिकर भरणाऱ्याला मताचा अधिकार.

(२) तीन वर्षे पदवीधर असणाऱ्या मुसलमानाचे नाव मतदार यादीत घालण्यात येई; हिंदूंच्या बाबतीत मात्र तो दहा वर्षे पदवीधर असलेला पाहिजे अशी अट होती.

(३) जमीन धारणेच्या बाबतीत मुसलमान मतदार वर नमूद केलेल्या पद्धतीने पंजाबात संख्येने अधिक बनविले गेलेच होते.

अशा रीतीने हिंदुस्थानात हिंदु ७५ टक्के व मुसलमान २० टक्के असताही स्वतंत्र व संयुक्त मतदार संघांतून मुसलमानांसाठी निवडणुकीची दुहेरी व्यवस्था निर्माण करण्यात आली. त्यामुळे ते संख्येने कमी असूनही हिंदूंपेक्षा अधिक संख्येने निवडूण येणे शक्य झाले.

हिंदूंचे हे गाऱ्हाणे ऐकून घेण्यासही व्हाइसरॉय तयार होईनात व जनतेची प्रतिनिधि म्हणविणारी कॉंग्रेसही हिंदूंवरील अन्याय उघड दिसत असताही मुसलमानांविरुद्ध बोलण्याने ते बिचकतील या भीतीने स्पष्ट बोलण्यास धजेनात ! कॉंग्रेसचा मुसलमानधार्जिणा पिंड जो पोसला गेला तो असा. मुसलमानांच्या स्वतंत्र व संयुक्त अशा दोन्ही प्रकारच्या मतदारसंघांना त्या वेळच्या नेमस्त पुढाऱ्यांनी पाठिंबा दिला होता. ना. गोखले यांनीही त्यांचे समर्थन केले होते.

अशा परिस्थितीत ब्रिटिश सरकार व मुसलमान यांच्या संयुक्त आक्रमणाविरुद्ध व कॉंग्रेसनेही हिंदूंना डावलल्यामुळे आत्मसंरक्षणार्थ हिंदुसमाज हिंदुसभेच्या रूपाने उभा राहिला. हिंदुसभेचा उगम या परिस्थितीत झाला आहे.

पंजाबात हिंदुसभेची स्थापना कां व कोणत्या परिस्थितीत झाली याची माहिती वर दिली आहे. इंग्रजांनी हिंदू समाजावर राजकीय दृष्टचा अन्याय केला व चालविला यावर लाहोरच्या १९०९ च्या पंजाब हिंदुसभेच्या अधिवेशनात खूप चर्चा झाली व त्याविषयी प्रस्तावही संमत झाले. पण तेवढ्याने हिंदुसमाजापुढील प्रश्न निकालात निघत नव्हते. सर्वसामान्य जनतेतून निर्माण झालेली व तिच्या हितासाठी दक्ष राहू इच्छिणारी कॉंग्रेसही हिंदुसमाजावरील या अन्यायाला वाचा फोडण्यासही तयार होईना, तेव्हा 'उद्धरेत् आत्मनात्मानम्' या न्यायाने पंजाबातील हिंदूंनीच हिंदूंवर हिंदु म्हणून होणारे अन्याय दूर करण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याचे ठरविले. ते क्रमप्राप्तच होते.

या संघटनेचा एक भाग राजकारण होता तसाच दुसरा भाग समाजकारण हाही होता. हिंदु समाज जोपर्यंत संघटित व समर्थ होणार नाही तोपर्यंत हिंदु समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत हे ठरून चुकले होते. म्हणून हिंदु समाजाचे संघटन घडवून आणण्याच्या उद्देशाने या अधिवेशनात सामाजिक परिवर्तनावरही भर देण्यात आला. बालविवाहाला विरोध, विधवाविवाहाला मान्यता, परधर्मीयांचे शुद्धीकरण, अस्पृश्यता निवारणावर भर व एकंदर हिंदु समाज सुसंघटित व प्रतिकारक्षम बनविणे यासंबंधाने या अधिवेशनात प्रस्ताव संमत करण्यात आले.

या अधिवेशनानंतर पंजाब हिंदुसभेची आणखी पांच अधिवेशने झाली. दुसरे अधिवेशन १९१० वर्षी मुलतान येथे शीख धर्मसंस्थापक नानक यांच्या वंशातले व शिखांचे धर्मगुरु बाबा गुरुबक्षसिंग वेदी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. तेथेही राजकीय व सामाजिक विषयांवर प्रस्ताव करण्यात आले. बंगालची स्थिति पंजाबसारखीच

होती. तेव्हा बंगालमध्येही तेथील हिंदूंनी बंगाल हिंदुसभा स्थापन करावी यासाठी प्रयत्न करण्यात आला; पण बंगालमधून त्याला योग्य व पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर तिसरे अधिवेशन १९११ वर्षी अमृतसर येथे लाला लालचन्द यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. चौथे अधिवेशन १९१२ वर्षी दिल्ली येथे सर शादीलाल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या वेळी पंजाब हिंदुसभेच्या नेत्यांनीच पुढाकार घेऊन अखिल भारत हिंदुमहासभा स्थापन करावी असे प्रतिपादन केले. पांचवे अधिवेशन १९१३ वर्षी अंबाला येथे व सहावे अधिवेशन १९१४ वर्षी फेरोजपूर येथे झाले. लाला मुरलीधर हे त्या वेळी अध्यक्ष होते. या वेळी अखिल भारतीय स्तरावर हिंदुसभा स्थापन करण्याचा विचार निश्चित झाला व पंजाब हिंदुसभा ही अखिल भारत हिंदु महासभेच्या पहिल्या अधिवेशनात विलीन झाली.

अखिल भारत हिंदुमहासभेची स्थापना

कुंभमेळ्याच्या वेळी १९१५ वर्षी हरिद्वार येथे कासिमबजारचे महाराज सर महींद्रचंद्र नंदी यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुमहासभेचे पहिले अधिवेशन झाले. त्या अधिवेशनाच्या विषयनियामक समितीत प. मदन मोहन मालवीय, लाला मुनशीराम (ते पुढे स्वामी श्रद्धानन्द म्हणून प्रसिद्ध झाले) मोतीलाल घोष, लाला हंसराज, सर तेजबहादूर सप्रू, म. गांधी प्रभृति नेत्यांची नावे आढळतात. या सुमारास श्री. नारायण मोरेश्वर पटवर्धन नावाचे एक महाराष्ट्रीय गृहस्थ यात्रेला गेलेले असावेत, ते या अधिवेशनास उपस्थित होते. विषयनियामक समितीच्या सदस्यांत त्यांचेही नांव आढळते.

या काळात काँग्रेसचे नेतृत्व नेमस्त पक्षाच्या हाती होते. पण त्याला धार नव्हती. ती आणण्याचा लो. टिळक प्रभृतींचा प्रयत्न होता. त्यामुळे नेमस्त पक्ष व जहाल पक्ष यांच्यात झगडा सुरू झाला होता. या झगड्याला १९०७ च्या डिसेंबरमध्ये सुरत येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात उधाण आले व अधिवेशन उधळले गेले. थोड्याच दिवसांनी सरकारने १९०८ वर्षी लो. टिळकांवर खटला भरला त्यात त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली व देशभर दडपशाही सुरू झाली.

अशा रीतीने देशात तेजस्वी वातावरण निर्माण होत असताना नेमस्त पक्षाच्या केवळ घटनात्मक चळवळीला बळ प्राप्त होण्याची शक्यता नव्हती. नेमस्त पक्षाचे एक प्रमुख नेते ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी आपल्या 'घटनात्मक' चळवळीची मर्यादा स्पष्ट करताना म्हटले होते की, Constitutional agitation is agitation by methods which we are entitled to adopt to bring about the changes we desire through the action of constitutional authorities. (घटनात्मक चळवळीचा अर्थ असा की घटनेनेही मान्य केलेल्या

मार्गाचा अवलंब करून घटनेनेच ज्यांना सत्ताधिष्ठित केले आहे त्यांच्याकरवी आपल्याला अपेक्षित असे बदल घडवून आणणे.)

ना. गोखले व त्यांचा नेमस्त पक्ष यांची कार्यमर्यादा अशी होती, तर लो. टिळक पक्षाला त्यांचे धोरण भीकमागेपणाचे वाटे. गोखले यांच्या या धोरणावर टिळक पक्षातून जी टीका केली जात होती तिचे विश्लेषण डिसूझा नावाच्या लेखकाने (ओपिनियन दि. २५।२।६९) मार्मिकपणे व सत्य स्वरूपात नमूद केले आहे. तो म्हणतो : Gokhale's method of seeking redress of grievances and acceptance of political demands by the British Government through petition and address, argument and representation was dubbed as political mendicancy by his opponents. The social and political creeds of Gokhale and Tilak were dimetrically opposed to each other. (गोखले यांचा मार्ग म्हणजे आपल्या तक्रारी दूर करून घेण्याकरिता व ब्रिटिश सरकारकडून आपल्या राजकीय मागण्या मान्य करून घेण्यासाठी अर्ज, विनंत्या, युक्तिवाद यांचाच केवळ आश्रय करणे हा होता तर या मार्गाचे वर्णन त्यांचे विरोधक 'राजकीय भीकमागेपणा ' असे करीत.)

गोखले व टिळक यांची सामाजिक व राजकीय उद्दिष्टेही अगदी भिन्न होती. या काळातील इंग्रजांचे धोरण केवळ साम्राज्यवादी होते. लॉर्ड कर्झन यांनी स्पष्टच सांगून टाकले होते की It will be well for England, better for India and best of all for the progressive civilization in general, if it is clearly understood from the outset that we in England, have not the slightest intention of abandoning our Indian possessions and that it is highly improbable that any such intention will be entertained by our posterity. (इंग्लंडला, हिंदुस्थानला व सर्व सामान्य सुधारलेल्या जगालाही या गोष्टीची स्वच्छ कल्पना असावयास पाहिजे की आम्ही इंग्रजांनी हिंदुस्थानात जी सत्ता संपादन केली आहे ती काही सोडून देण्याकरिता केलेली नाही आणि आमच्या भावी पिढ्याही ती सोडून देण्याचा कधी विचार करतील हेही संभवत नाही.) तात्पर्य इंग्रजांच्या या धोरणापुढे गोखले यांच्या 'घटनात्मक' चळवळीच्या मार्गाने हिंदुस्थानचे राजकीय प्रश्न सुटण्याची शक्यताच नव्हती. त्यामुळे संघर्ष अटळच होता.

लो. टिळकांची मंडालेच्या तुरुंगातून १९१४ वर्षी सुटका झाल्यावर त्यांनी प्रथम आपल्या पक्षाची घडी स्वतंत्रपणे बांधण्यास सुरुवात केली. याच वर्षी ऑगस्ट महिन्यात पहिले महायुद्ध सुरू झाले. तेव्हा त्याचा फायदा घेण्याचे लो. टिळकांनी ठरविले. स्वातंत्र्याची चळवळ सैनिकी सिद्धतेशिवाय शक्य व यशस्वी

होत नसते हा टिळकांचा ठाम सिद्धान्त होता, तर इंग्रज लोक देशभक्त मनोवृत्तीच्या लोकांना इंग्रजद्रोही समजून सैन्यापासून कटाक्षाने दूर ठेवीत होते. पण आता इंग्रजांनाच सैन्य मोठ्या प्रमाणावर वाढविण्याची गरज उत्पन्न झाली. तेव्हा लो. टिळकांनी युद्धाला आपला पाठिंवा व्यक्त करून सैन्यभरतीत भाग घेण्याची तयारी दर्शविली व हिंदुस्थानातील लोकांना सैन्यातील अधिकाऱ्यांच्या जागा देण्यात आल्यास हवे तेवढे सैनिक मिळवून देण्याची घोषणा केली.

त्याच्याच जोडीला लो. टिळकांनी होमरूल लीग म्हणजे स्वराज्यसंघ ही संस्था स्थापन केली व " स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच " अशी घोषणा केली. युद्धाचे पडवम वाजत होते. लोकशाहीच्या संरक्षणासाठी हे युद्ध आहे असे इंग्रज व त्यांचे सहकारी म्हणू लागले. आरंभीच्या काळात जर्मनांचा जोर विशेष होता. ॲंग्लो-फ्रेंच सैन्ये मागे हटत होती. अखेर युद्ध जिकण्यासाठी इंग्रजांना अमेरिकेला शरण जावे लागले. अमेरिकेने तरी युरोपमधील या युद्धात स्वतःस कां गुंतवून घ्यावे हा त्यांचेपुढे प्रश्नच होता. पण हे युद्ध म्हणजे लोकशाहीवरील साम्राज्यवाद्यांनी आणलेले संकट असे रूप त्यास देण्यात आले. तेव्हा अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष विल्सन यांनी अमेरिका या युद्धात लोकशाहीच्या रक्षणार्थ पडत आहे अशी घोषणा केली व अमेरिका त्या युद्धात सामील झाली.

इंग्रजांना जर्मन साम्राज्यवाद मान्य नव्हता; पण आपली साम्राज्यसत्ता मात्र त्याना टिकवावयाची होती. या दोन परस्परविरोधी भूमिका एकाच वेळी करणे त्यांनाही अवघड झाले. अमेरिका इंग्रजांना विचारू लागली की, हा लढा जर साम्राज्यवाद विरुद्ध लोकशाही असा आहे तर तुमच्या साम्राज्यवादाचे काय? त्यावर ब्रिटिश सरकारने आम्हीही साम्राज्यवाद सोडीत आहो व हिंदुस्थानातील लोकांना शहाणे करून व त्यांना क्रमाक्रमाने राज्यकारभाराच्या संघटनेत सामील करून घेऊन त्यांना स्वराज्य देणार आहो अशी घोषणा केली. त्या वेळचे ब्रिटिश सरकारचे हिंदुस्थानसाठीचे स्टेट सेक्रेटरी मॅंटेग्यू होते. त्यांच्या दि. २०-८-१९१७च्या घोषणेतील महत्त्वाचे शब्द पुढीलप्रमाणे होते : The goal of the British policy in India is of gradual development of self-governing institutions with a view to progressive realisation of responsible Government.

(ब्रिटिशांचे हिंदुस्थानविषयक धोरण असे आहे की स्वयंशासक संस्थांची तेथे हळुहळू वाढ करून जबाबदार शासनपद्धति क्रमाक्रमाने प्रत्यक्षात आणावयाची.)

तथापि या घोषणेच्या पूर्वीच सरकार स्वराज्याचे काही तरी हक्क हिन्दुस्थानला देणार असे दिसू लागले होते; तेव्हा ते मिळण्यापूर्वीच त्याच्या वाटपाच्या योजना सुरू झाल्या. हिंदुस्थानात आपली सत्ता टिकवावयाची तर हिंदुमुसलमानांत संघर्ष सतत जळता ठेवला पाहिजे, तरच आपला तरणोपाय आहे असे इंग्रज मानीत

होते. १८५७ नंतर इंग्रजांनी याच धोरणाने आपला राज्यकारभार चालविला होता. मुसलमानही इंग्रजांच्या आहारी पूर्णपणे गेले होते. १९०८ नंतर नेमस्त पक्ष नामशेष होण्याच्या मार्गाला लागला होता. ना. गोखले १९१५ वर्षी निधन पावले. इतरही मातबर नेमस्त पुढारी दिवंगत झाले होते. अशा परिस्थितीत लो. टिळकांनी परत काँग्रेसमध्ये यावे यासाठी काही नेमस्त पुढाऱ्यांनी खटपट केली. टिळक त्यास तयार झाले. त्यांनी स्वराज्य पक्षाच्या रूपाने महाराष्ट्रात आपली स्वतंत्र व प्रभावी संघटना आधीच निर्माण केली होती. त्यासह ते १९१६ च्या लखनौ काँग्रेसला उपस्थित राहिले.

या वेळी हिंदुमुसलमान नेत्यांत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. मुसलमान नेत्यांचे सल्लागार ब्रिटिश सत्ताधारीच होते. त्या वेळी उत्तर प्रदेशाच्या गव्हर्नरांच्या सल्ल्याने मुसलमान नेते चालत होते. कोणत्याही परिस्थितीत स्वतंत्र मतदार संघाचा हक्क सोडावयाचा नाही यावर विशेषतः उत्तर प्रदेशातील मुसलमानांचा विशेष कटाक्ष होता. यापूर्वी त्यांना १९१० च्या मोर्ले मिंटो योजनेनुसार स्वतंत्र मतदार संघ मिळालेलेच होते व शिवाय संयुक्त मतदार संघातूनही निवडणुकीत भाग घेण्याची सोय होती. त्या कायद्याखाली जरी प्रत्यक्ष सत्तेत भागीदारी अशी नव्हती तरी विधिमंडळातील त्यांचे स्वतंत्र महत्त्व प्रस्थापित झालेले होते.

लो. टिळक पक्षाला स्वतंत्र मतदारसंघ मान्य नव्हते. डॉ. मुंजे प्रभृतींनी त्यास आपला स्पष्ट विरोध व्यक्त केला होता. लो. टिळकांना तरी ते कोठे मान्य होते? पण प्राप्त परिस्थितीत तडजोड होत आहे या लोभाने लो. टिळकांनी त्यास अखेर मान्यता दिली. पण त्यासाठी त्यांनी दोन अटी घातल्या व मुसलमानांनीही तडजोड म्हणून त्या स्वीकारल्या. (१) पंजाब व बंगाल या दोन्ही ठिकाणी मुसलमान अधिक संख्येने असले तरी त्यांना प्रांतिक निवडणुकीत घटनात्मक बहुमत करता येऊ नये म्हणून त्यांच्या प्रतिनिधींचे प्रमाण ४० व ४५ टक्के ठेवण्यात आले व (२) त्याच्या मोबदल्यात हिंदु बहुसंख्य वस्तीच्या प्रांतांत त्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणापेक्षा थोडे अधिक प्रतिनिधित्व देण्यात आले.

लखनौची काँग्रेस झाल्यावर लो. टिळक वाराणशीला गेले असता तेथे हिंदुसभा नेत्यांनी लो. टिळकांना त्यांनी मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास मान्यता दिल्याबद्दल दोष दिला. तेव्हा लो. टिळकांनी म्हटले की प्राप्त परिस्थितीत अधिक काही करता येण्यासारखे नव्हते व हा करार फक्त दहा वर्षांपुरताच आहे. तेव्हा या काळात आपण तो दुरुस्त करून घेऊ. आजच तडजोडीचा पट उधळून दिला तर आपल्या हाती काहीच लागावयाचे नाही. काही न देण्याला इंग्रजांना ते एक चांगले निमित्त मात्र होईल.

लो. टिळकांना ही परिस्थिति बदलून घेण्याचा आत्मविश्वास होता. बॅ. जिना व मुंबईकडचे मुसलमान नेते त्यांच्या विचाराशी सहमत होते. पुढे १९१९ वर्षी एका

पार्लमेंटरी समितीपुढे साक्ष देताना जिनांनी असेही म्हटले की, मुसलमान स्वतःकरता काही मागण्या करण्याचे सोडून देतील तो मी सुदिन मानीन. त्यांनाही लोकशाही हवी होती. पण उत्तर भारतातील पूर्वीच्या मोगली सत्तेचे अवशेषरूप राहिलेल्या मुसलमानांच्या डोक्यात इस्लामी साम्राज्यवाद पुरेपूर भरलेला होता व त्यांना इंग्रजांची साथ होती. उत्तर प्रदेशचे गव्हर्नर सर जेम्स मेस्टन लखनौ काँग्रेसच्या अधिवेशनास जातीने उपस्थित राहिले होते. त्यावरून वारा कसा वाहत होता याची कल्पना येते.

गांधीजी व खिलाफत

लो. टिळक १९२० वर्षी दिवंगत झाले. ते आणखी काही वर्षे जगते व राजकारणाची सूत्रे त्यांच्या हाती रहाती तर मुसलमानांचा प्रश्न वेगळ्या रीतीने सुटण्याची शक्यता होती. परंतु तसे घडावयाचे नव्हते. अखिल भारत हिंदु-महासभेचे दुसरे अधिवेशन लखनौ येथेच सर सी. पी. माधवराव यांच्या अध्यक्षते-खाली झाले. त्यांनी आपल्या भाषणात लखनौ करारावद्दल नापसंती व्यक्त केली. ते म्हणाले की : Under presure from the Muslim League racial and religious differences are being accentuated and this is not conductive to the future well being of India. (मुस्लिम लीगच्या दडपणा-खाली वांशिक व धार्मिक वाद तीव्र करण्यात येत आहेत. भारताच्या भावी हिताच्या दृष्टीने ते उपकारक नाही.)

लो. टिळकांच्या निधनानंतर काँग्रेसची सूत्रे म. गांधींच्या हाती गेली व तेव्हापासून हिंदुस्थानच्या राजकारणाला वेगळेच जातीय व परधार्जिणे वळण लागले. गांधी हे एक अहंकारी, अतिरेकी व वादग्रस्त व्यक्तिजीवन होते. त्यांच्यामुळे या देशाचा फायदा झाला तसा तोटाही झाला आहे. देशाच्या फाळणीला त्यांचे धोरण उत्तरदायी ठरले.

*

(२)

गांधीजींची विचारसरणी

हिंदुस्थानच्या राजकारणात म. गांधींनी पदार्पण केल्यापासून हिंदु-मुसलमान वादाला देशात विशेष तीव्र स्वरूप प्राप्त झाले होते. गांधीजी १९१५ वर्षी आफ्रिकेतून भारतात कायमचे राहावयास आले. १८९४ पासून १९१४ पर्यंत त्यांनी बराच काळ आफ्रिकेतील हिन्दुस्थानी लोकांचे नेतृत्व केले. तेथील सरकारने भारतीय लोकांविरुद्ध जे कायदे केले होते ते बदलून घेण्यासाठी गांधींनी तेथे सत्याग्रहाची व कायदेभंगाची चळवळ हाती घेतली होती. रस्किन व टॉलस्टॉय यांच्या विचारांचा त्यांच्यावर बराच परिणाम झालेला होता. त्यांनी भगवद्‌गीता वाचली होती; पण हिंदु धर्मशास्त्रांचा त्यांचा अभ्यास नव्हता. तथापि परंपराप्राप्त हिंदु धर्मावर त्यांची श्रद्धा होती. काही काही विषयांवरील त्यांची मते मात्र लोकांना विचित्र वाटतील अशी होती.

उदा., त्यांनी लिहिलेले ' इंडियन होमरूल ' या नावाचे एक पुस्तक १९०८ वर्षी प्रसिद्ध झाले होते. त्याची दुसरी आवृत्तिही पुढे १९२१ वर्षी प्रसिद्ध झाली. या पुस्तकात गांधींचे अनेक विचार प्रसिद्ध झालेले आहेत. यावरून त्यांच्या विचारांची ठेवण लक्षात येते,

रेल्वे, वकील व डॉक्टर यांच्या संबंधात त्यांनी पुढील उद्‌गार काढलेले आहेत : Railways, lawyers and doctors have impoverished the country so much so that if we do not wake up in time we shall be ruined. (रेल्वे, वकील, डॉक्टर यांच्यामुळे देश दरिद्री बनला आहे. इतका की आपण वेळीच जागे झालो नाही तर आपला नाश होऊन जाईल.) The construction and use of railways for locomotion, not possible for man in his natural condition, is an abuse of God's gift. Why ? Because if he comes into contact with different natures, with different religions, he might try to serve others than his neighbour whom alone God intended him to serve. (रेल्वेची उभारणी व जाण्यायेण्यासाठी तिचा उपयोग माणसांच्या नैसर्गिक स्थितीला धरून नाही. तो ईश्वरी संकेताला सोडून आहे. जर त्यायोगे भिन्न निसर्गस्थितीशी किंवा भिन्नधर्मीयांशी माणसाचा संपर्क आला तर तो आपल्या शेजाऱ्याच्या ऐवजी दुसऱ्यांचीच सेवा करण्याचा प्रयत्न करीत राहील. त्याने तसे काही करावे अशी ईश्वरी योजनाच नाही.)

गांधींच्या पार्लमेंटविषयीच्या कल्पनाही अशाच गमतीदार होत्या. त्यांनी आपल्या पुस्तकात ब्रिटिश पार्लमेंटबद्दल पुढील उद्गार काढले आहेत : That which you consider to be mother of Parliaments is like a sterile woman and a prostitute. It has not yet, of its own accord, done a single good thing. Without outside pressure it does nothing. (पार्लमेंटरी पद्धतीची जननी म्हणून जिला तुम्ही म्हणता ती एखाद्या वांझोट्या स्त्रीप्रमाणे आणि वेश्येप्रमाणे आहे. आपण होऊन तिने एकही चांगली गोष्ट केलेली नाही. तिच्यावर बाह्य दडपण आणल्याशिवाय ती काही करीतच नाही.)

शिक्षणाच्या संबंधात गांधींनी पुढील उद्गार काढले आहेत : The ordinary meaning of education is a knowledge of letters. To teach boys reading, writing and arithmetic is called primary education. What do you propose to do by giving him a knowledge of letters? Will you add an inch to his happiness? Do you wish to make him discontented with his cottage or his lot? (शिक्षणाचा सर्वसामान्य अर्थ म्हणजे साक्षरता. मुलांना लिहिणे, वाचणे आणि गणित शिकविणे म्हणजे प्राथमिक शिक्षण; पण त्यांना साक्षरतेचे हे ज्ञान देऊन काय साधावयाचे आहे? त्यायोगे त्यांच्या सुखात इंचभर तरी भर पडेल काय? त्यायोगे त्याला आपल्या सध्याच्या परिस्थितींचा तिटकारा येऊ लागेल व त्याचे जीवन असमाधानी मात्र होईल.)

अर्धसत्यावर विचारांची उभारणी

गांधीजींच्या विचारांचे असे अनेक नमुने देता येण्यासारखे आहेत. त्यांत काही सत्य आहेही; पण ते फार मर्यादित आहे. त्यात असत्याचा भाग पुष्कळ आहे आणि अर्धवट सत्ये ही नेहमीच भयंकर असतात. गांधींना आपले हे विचारही पुढे टिकविता आले नाहीत किंवा त्यावर त्यांनी पुढील काळात भरही दिला नाही. पण त्यावरून अर्धसत्यांवर सतत भिस्त ठेवण्याची त्यांच्या स्वभावाची ठेवण व भारलेले होते असे त्यांचा जीवनपट पाहिल्यास दिसून येईल. किंबहुना गांधींचे जीवन बऱ्याच प्रमाणात अर्धसत्यांनी भरलेले

हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी एकदा भारतभर भ्रमण केले व आपले राजकीय कार्यक्षेत्र निश्चित केले. त्या वेळी हिंदुस्थानात राजकीय क्षितिजावर लो. टिळक, लाला लजपतराय, डॉ. ॲनी बेझंट, पं मालवीय, मोतीलाल घोष, न. चिं. केळकर इत्यादि मान्यवर नेते होते. त्यांशिवाय बॅ. जिना, बॅ. बॅप्टिस्टा, बॅ.

जयकर, बॅ. दास इत्यादि मंडळी होती. ही सर्व मंडळी लोकशाही विचाराच्या परंपरेत वाढलेली होती. गांधी ना. गोखल्यांना आपले गुरु मानीत. पण गोखले लौकर वारले; ते आणखी काही वर्षे जगते तर त्यांचे व गांधींचे जमले नसते. कारण दोघांच्या विचारांची बैठकच भिन्न होती. गांधीजींची सारी भिस्त आत्मिक बळ (सोल-फोर्स) व आतला आवाज यावर होती. त्यांचे संघटना-कौशल्य श्रेष्ठ दर्जाचे होते. त्यांचा अहंकार तीव्र होता, तरी पण तो संयमशील होता. ॲनी बेझंटबाईंची होमरूल लीगची एक शाखा मुंबईस होती. तिचे अध्यक्षपद गांधींनी स्वीकारावे म्हणून त्यांना विनंती करण्यात आली असता त्यांनी दिलेले उत्तर (दि. १८–३–१९२०) त्यांच्या स्वभावाचे निदर्शक होते. ते म्हणाले : I have told them that at my time of life and with the views firmly formed on several matters I could only join an organisation to affect its policy and not be affected by it.

(लोक मला काँग्रेसमध्येही या म्हणतात; पण मी त्यांना सांगितले की माझे वय, अनुभव आणि अनेक विषयांवर माझी दृढ झालेली मते यांचा विचार करता ज्या संस्थेला मी वळण लावू शकेन अशाच संस्थेत मला जाता येईल; जेथे माझ्यावर इतरांच्या तंत्राने वागण्याची पाळी येईल अशा संस्थेत मी जाऊ शकणार नाही).

या वेळी गांधीजींचे वय सुमारे ५० वर्षांचे होते. त्यांचे विचार जे काय होते ते तोपर्यंतच्या अनुभवाने परिपक्व झालेले होते. त्यात बदल होण्यासारखा नव्हता व दुसऱ्याच्या तंत्राने वागण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता.

अमृतसर काँग्रेसच्या वेळीच त्यांच्या स्वभावाचे हे वैशिष्टय विशेष रीतीने दिसून आले होते. त्या वेळी गांधीजी हे मॉंटफर्ड सुधारणांचे स्वागत करावे व सरकारशी संपूर्ण सहकार्य करावे असे म्हणत होते, तर टिळक त्या बाबतीत प्रतियोगी सहकारितेचा आग्रह धरीत होते. काँग्रेसने टिळकांचे मत स्वीकारले. तेव्हा गांधीजी बाजूस सरले. टिळकांच्या हयातीत आपल्याला काँग्रेसची सूत्रे हाती घेता येण्याची शक्यता नाही हे त्यांनी ओळखले; पण राजकारणाचे नेतृत्व करण्याचा त्यांच्या मनाचा ठाम निश्चय झालेला होता. त्या परिस्थितीत त्यांनी मुसलमानांच्या खिलाफत चळवळीचेच नेतृत्व करण्याचे ठरविले व त्यासाठी राजकारणात उडी घेतली. गांधीजींच्या हिंदुस्थानातील राजकीय जीवनातील ही पहिली मोठी चूक होती.

खिलाफत प्रकरण

येथे खिलाफत प्रकरणाची थोडी पार्श्वभूमि लक्षात घेतली पाहिजे. खिलाफत प्रकरण हे इस्लामी साम्राज्यवादातून उत्पन्न झालेले आहे. तुर्कस्थानचा जो राजा

तो त्या वेळी (१८७७ च्या पूर्वीपासून) बऱ्याच मुसलमानी प्रदेशांचा सम्राट व मुसलमानी लोकांचा धर्मगुरु (खलिफा) होता. त्याचे शासन म्हणजे खिलाफत. युरोप खंडात इस्लामी धर्मवाद्यांचे बंड बरेच दिवस होते व इस्लामी साम्राज्यसत्ता सर्वभर पसरविण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. १८७७ मध्ये रशिया व तुर्कस्थान यांच्यात लढाई झाली. १८९७ मध्ये ग्रीस व तुर्कस्थान यांच्यात युद्ध जुंपले. १९१२-१३ मध्ये बाल्कन प्रदेशात युद्धे झाली. त्यामागे हे इस्लामी साम्राज्यवादी राजकारणच होते. या युद्धाच्या अखेरीस तुर्कस्थानला युरोपातून बाहेर पडावे लागले व इस्लामी धर्म व सत्ताही युरोपातून नष्ट झाली. पुढे १९१४ वर्षी पहिले महायुद्ध सुरू होऊन तुर्कस्थान इंग्रजाविरुद्ध युद्धात पडला. १९१४ त सुरू झालेल्या या युद्धात हिंदुस्थानातील मुसलमानांनी इंग्रजांना मदत द्यावी यासाठी इंग्रज मुसलमानांची आर्जवे करीत होते. कारण त्या वेळी येथील हिंदुस्थानी सैन्यात मुसलमानांचा भरणा विशेष होता. त्यांनी प्राणपणाने इंग्रजांच्या बाजूने लढावे यासाठी इंग्रजांनी मुसलमानांना काही आश्वासने दिली. त्यात तुर्कस्तानच्या खलिफाच्या साम्राज्याला आपण धक्का लावणार नाही असे एक आश्वासन होते. त्यावर विश्वासून हिंदुस्थानातील इस्लामी साम्राज्यवादी मुसलमानांनी इंग्रजांना साथ दिली. १९१८ वर्षी युद्ध संपले, आणि इंग्रज-फरेंचांनी १९१९ वर्षी तुर्कस्तानच्या साम्राज्यातील प्रदेशाची चिरफाड सुरू केली. सिरिया फरेंचांनी घेतला. पॅलेस्टाईन प्रांत इंग्रजांच्या ताब्यात आला व तुर्कस्थानचा काही मांडलिक प्रदेश कमी अधिक स्वतंत्र झाला. इंग्रजांनी दिलेले आश्वासन मोडले म्हणून येथील मुसलमानांनी खिलाफत चळवळ सुरू केली, तिचे स्वरूप वास्तविक आंतरराष्ट्रीय होते. त्यामुळे बॅ. जिना प्रभृतींचा खिलाफतीला विरोध होता. हिन्दुस्थानच्या राजकारणात खिलाफतीचा प्रश्न घुसडू नये असे ते आग्रहाने प्रतिपादन करीत होते पण उत्तरेकडील इस्लामी साम्राज्यवाद्यांचा खिलाफत चळवळीला मोठा आधार होता. महंमद अल्ली, शौकतअल्ली हे इस्लामी साम्राज्यवादाचे कट्टे पुरस्कर्ते होते. पुढे खुद्द तुर्कस्तानातच क्रांति होऊन तुर्कांनीच खिलाफत बुडविली व केमालपाशाच्या नेतृत्वाखाली तुर्कस्तानात लोकशाही शासन निर्माण झाले हे वेगळे. तथापि ते होईपर्यंतच्या काळात इंग्रजांनी खिलाफती साम्राज्य मोडले, वचनभंग केला याबद्दल इंग्रजांविरुद्ध असंतोष फैलावण्यास येथील मुसलमानांनी सुरवात केली होती. गांधींना हे चांगले घबाड लाभले व त्यांनी खिलाफतीवरील अन्याय दूर करण्याकरिता १९२० मध्ये असहकारितेची चळवळ सुरू केली. मुसलमानांना त्यांच्या खिलाफतीकरिता हिंदुनेता मिळाला याचा आनंद झाला व मौ. महंमद अल्ली व शौकतअल्ली यांनी गांधींचे नेतृत्व तात्पुरते स्वीकारून खिलापत चळवळीला सर्वत्र उधाण आणले.

खिलाफतवाल्यांनी तर अफगणिस्तानच्या अमिरालाही त्या निमित्ताने हिन्दु-

स्थानवर स्वारी करण्यास पाचारण केले व गांधींनीही त्यास आपली मान्यता दर्शविली! इंग्रजांच्या सावधगिरीमुळे ती स्वारी होऊ शकली नाही हे वेगळे.

गांधींच्या चळवळीची दिशा

गांधींच्या असहकारितेच्या चळवळीची दिशा ते आफ्रिकेत असतानाच ठरून गेली होती. हरताळ, निदर्शने, असहकार, विधि मंडळावर बहिष्कार, नोकऱ्या सोडणे, शाळा सोडणे, करबंदीची चळवळ, सैन्यातून सैनिकांनी बाहेर पडणे इत्यादि बाबींवर त्यांचा भर होता. वस्तुतः खिलाफती साम्राज्याची चिरफाड केली अँग्लो-फ्रेंचांनी· पहिल्या महायुद्धात ते जेते होते. हिंदुस्थान सकारचा त्यात तसा भाग नव्हता पण हिंदुस्थान हे ब्रिटिश साम्राज्यसत्तेचेच अंग असल्याने येथील मुसलमानांनी चळवळ उभारली व त्यांना गांधींचे नेतृत्व मिळाल्याने चळवळीला उधाण आले.

गांधींच्या प्रचाराचा भर सत्य व अहिंसा यावर असे, तर मुसलमानांना या दोन्हींचेही सोयर सुतक काहीच नव्हते. गांधींची खिलाफतीसाठी असहकारितेची चळवळ दि. १ ऑगस्ट १९२० ला सुरू झाली आणि योगायोग असा की दि. १ ऑगस्ट १९२० लाच लो. टिळकांचे निधन झाले· त्यामुळे टिळकपक्षीय राजकारणात काहीशी पोकळी निर्माण झाली व त्याचा फायदा गांधींना मिळाला. त्यामुळे काँग्रेसचे नेतृत्वही आयतेच गांधींच्या हाती आले.

टिळकांच्या निधनानंतर गांधींच्या असहकारितेच्या आंदोलनासंबंधाने धोरण ठरविण्याकरिता ऑक्टोबर १९२० मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्या वेळी काँग्रेसला बांधीव संघटनेचे स्वरूप नव्हते. जो कोणी तीन रुपये देईल तो सभासद होऊ शकत असे. काँग्रेसचेही नेतृत्व गांधींना लाभावे व काँग्रेस व खिलाफत यांनी संयुक्तपणे ब्रिटिश सत्तेविरुद्ध आंदोलन उभारावे यासाठी काही गांधीवाद्यांनी व मुसलमानांनी कलकत्ता येथील टांगेवाल्यांपासून मोलमजुरी करणारांपर्यंत सुमारे तीन हजार मुसलमानांना आयत्या वेळी काँग्रेसचे सभासद बनविले व काँग्रेसचे नेतृत्व गांधींच्या हाती अलगत पडले. तेव्हापासून देशाच्या राजकारणात गांधीजींचे नेतृत्व अव्याहत राहिले. खिलाफत प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या आंदोलनाच्या मुख्य उद्देशाला आता गांधींनी स्वराज्य संपादनाचाही दुसरा उद्देश जोडला व असहकारितेच्या चळवळीने सर्व वातावरण भारून टाकले.

माझ्या म्हणण्याप्रमाणे वागाल तर स्वराज्य, स्वराज्य काय, ते एका वर्षात, बारा महिन्यांत स्वराज्य देतो अशी गांधींनी घोषणा केली व देशभर चळवळीचे लोण पसरले. काही लोकांचा तर या बारा महिन्यांच्या मुदतीवर विश्वासही बसावा इतका त्याचा प्रसार झाला होता.

मलबारात खिलाफती राज्य

गांधींची खिलाफतीसाठी असहकारितेची चळवळ १ ऑगस्ट १९२० ला सुरू झाली. ते वर्ष १९२१ च्या दि. १ ऑगस्टला संपले. त्याबरोबर इंग्रजी राज्यही संपले व खिलाफती राज्य आले म्हणजे मुसलमानी राज्य आता प्रस्थापित होण्याचा काळ आला असे समजून मलबारातील मुसलमानांनी. तेथे ते काही भागात बहुसंख्य असल्याने, खिलाफती राज्य स्थापन झाल्याची घोषणा केली. इस्लामी राज्यात हिंदूंना स्थान नाही हे त्यांच्या खिलाफती राज्याचे धोरण होते. त्यास अनुसरून त्यांनी हिंदूंच्या सरसहा कत्तली सुरू केल्या. जो मुसलमान होणार नाही त्याला मृत्युदंडाची शिक्षा करून सुमारे वीस हजार हिंदु स्त्री-पुरुषांची या मोपल्यांनी धर्माच्या नावावर कत्तल केली व ठार मारलेल्या माणसांच्या मुंडक्यांनी विहिरी भरल्या! ज्यांनी मरणाच्या भीतीने मुसलमान होण्याची तयारी दर्शविली त्यांना भराभर मुसलमान केले. त्यांची नावे बदलली, पोशाख बदलले, व सर्वत्र नादिरशाही सुरू केली. मुसलमानांचे हे बंड मोडण्यासाठी इंग्रजांनी सुमारे एक डिव्हिजन सैन्य पाठवले. त्याने सहा महिने परिश्रम करून मुसलमान गुंडांना पकडून शांतता प्रस्थापित केली. पुढे गुंडांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. आता त्याच लोकांना स्वातंत्र्य सैनिक म्हणून केरळमधील कम्युनिस्ट, मुस्लिम लीग व काँग्रेस याचे संयुक्त शासन स्वातंत्र्यसैनिक म्हणून पेन्शने देत आहे!

मुसलमानांच्या या अत्याचारांनी हिंदु अधिकच जागृत झाले व हिन्दुसभेने संघटनात्मक कार्य सुरू केले. डॉ. मुंजे, श्री. गोपाळराव देवधर, स्वामी श्रद्धानंद, यांनी मलबारास भेटी दिल्या. शुद्धीकरणाची प्रचंड मोहीम हाती घेतली व बाटविलेल्या सर्वांना परत हिंदुधर्मात घेण्यात आले. ब्रिटिश शासनकाळातील शुद्धीकरणाचे पहिले आंदोलन ते हे होय. सुमारे तीन हजारांवर लोकांना या वेळी परत हिंदुधर्मात घेण्यात आले.

पण गांधीजींना मात्र या अत्याचारांचे विशेष काही वाटले नाही! मुसलमानांना दुखविण्यास ते तयार नव्हते. हजारो निरपराध हिंदूंच्या, ते केवळ हिंदू म्हणून, मुसलमानांनी कत्तली केल्या, तरी मुसलमानांनी हिंदूंच्या कत्तली केल्या हे मान्य करण्यासही गांधी तयार होईनात! त्यायोगे मुसलमान बिघडतील, त्यांची साथ राहणार नाही याची गांधींना भीति वाटत होती. पुढे १९२१ च्या अहमदाबाद काँग्रेसच्या वेळी बलात्काराने फार तर दोन चार धर्मान्तरे झाल्याचे गांधी म्हणाले! पण मुसलमानांच्या खिलाफतीची कास सोडण्यास ते तयार होईनात! त्यांच्या नेतृत्वाला खिलाफत चळवळीचा आधार हवा होता. काँग्रेसमधील हिंदु स्वराज्याकरिता असहकाराची चळवळ करण्यास तयार होते तर मुसलमान खिलाफतीसाठी असहकारिता करण्यास सिद्ध होते. दोघांचे उद्देश भिन्न भिन्न होते, पण मार्ग एकच

होता. खिलाफत व नंतर काँग्रेस या दोन्ही संघटनांचे नेतृत्व गांधीजींच्या हाती एकत्रित झाले होते.

पुन्हा इंग्रज मुसलमान दोस्ती

तुर्कांनीच परस्पर खिलाफत बुडवून टाकल्यामुळे खिलाफत चळवळीचा जीव लौकर गेला व मुसलमान काँग्रेसपासून फटकून दूर झाले. पुन्हा इंग्रज व मुसलमान यांची युति जमली. त्या वेळचे व्हाइसरॉय लार्ड रीडिंग यांनी उद्‌गार काढले की, Our bad days are over, Hindu-Muslim unity is no more. (ब्रिटिश साम्राज्य-सत्तेवरील गंडांतर टळले. हिंदु-मुसलमान एकी मोडली.) त्यानंतरही हिंदु मुसल-मानांत ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न अनेक वेळा झाले. पण इंग्रज त्यास आडवे येत. उत्तर हिंदुस्थानातील इस्लामी साम्राज्यवादी व इंग्रज एक होऊन तडजोड होऊ देत नसत. कलकत्ता येथे ऐक्य परिषद भरली असता ब्रिटिश नोकरशाहीचें मुखपत्र पायोनियर याने म्हटले की ही ऐक्याची उठाठेव कशाकरिता ? सरकार विरुद्ध चळवळ करण्याशिवाय तिचा दुसरा काय हेतु आहे ? (Why do these people want to unite these two communities if it is not to unite against the Government ?

तरीही काँग्रेसची म्हणून असहकारितेची चळवळ काही काळ चालू होती. त्यात पुढे करबंदीच्या चळवळीचा प्रमुख भाग होता. बारडोली येथील शेतकऱ्यांनी करबंदी केली तेव्हा त्यांची गुरेढोरे व जमिनी जप्त करण्यात आल्या. थोड्याच दिवसांत ती चळवळ ओसरली. चळवळीची वाफ निघून गेल्यामुळे गांधींनी एकदम आपला पवित्रा बदलला व उत्तर प्रदेशात चौरीचुरा या गावी काही हिंसात्मक कृत्ये घडली या सबबीवर त्यांनी आपली देशभरची चळवळ माघारी घेतली. आतल्या आवाजाची ही खूण होती ! गांधींचे हे धोरण त्यांच्या अनेक काँग्रेसवादी नेत्यांनाही आवडले नाही. त्यांनी टीकाही केली; पण गांधींना डावलून स्वतंत्रपणे चळवळ पुढे चालविण्याचे त्यांच्यात सामर्थ्य नव्हते; ती चळवळ पुढे चाललीही नसती. मुळातच तिची उभारणी चुकीच्या पायावर झाली होती.

गांधी व क्रांतिवादी यांच्या धोरणात एक महत्त्वाचा फरक नेहमी दिसून येतो. तो हा की गांधींच्या असहकारी चळवळीचे क्षेत्र व्यापक पण सामान्य लोकांच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीने फारसा धोका नसलेले किंवा कमीत कमी धोक्याचे असे; तर क्रांतिकारकांच्या चळवळीचे क्षेत्र छोटे पण तळहातावर शिर घेऊन लढण्याचे असे. त्यांच्या त्यागाला सीमा नव्हती. त्यामुळे गांधींच्या चळवळीला सर्वसामान्य जन-तेचा उघड पाठिंबा लाभला तर क्रांतिकारकांच्या चळवळीबद्दल लोकांच्या मनात आदर असूनही आत्यंतिक त्यागाची समाजाची तयारी नसल्याने तिला समाजाचा

उघड पाठिंबा कधी लाभू शकला नाही. तथापि काही थोड्या क्रांतिकारकांनी इंग्रजी साम्राज्यसत्तेला जो ॲटम बाँबचा दणका दिला त्याने स्वराज्यसाधनेचे काम पुष्कळ सोपे झाले यात शंका नाही.

गांधी पद्धतीची चळवळ व क्रांतिकारकांच्या पद्धतीची चळवळ यांच्यात परस्परपूरकत्व घडविणे हे टिळक पक्षाचे धोरण होते. त्यामुळे ते गांधींच्या चळवळीत काही मर्यादेपर्यंत समरस राहिले तर क्रांतिकारकांच्या चळवळीला त्यांचा सतत गुप्त पाठिंबा असे. त्यामुळे त्यांचे गांधींशी नीटसे कधी जमू शकले नाही.

खिलाफत चळवळ बंद पडल्यानंतरही गांधींनी मुसलमानांना आपल्या बाजूला वळविण्यासाठी खूप खटपट केली. पण इंग्रजांच्या चिथावणीने मुसलमानांनी हिंदूंच्याविरुद्ध सर्वत्र आक्रमक धोरण स्वीकारले व जागोजाग दंगे झाले. त्या वेळी शांतता प्रस्थापनेसाठी गांधींनी अनेक मुदतबंदीचे उपवास केले, पण त्यांचा मुसलमानांवर काही परिणाम झाला नाही. हिंदुमुसलमानांत तेढ वाढतच गेली. इंग्रजांच्या आश्रयानेच आपण आपले इस्लामी साम्राज्यवादाचे उद्दिष्ट गाठू शकू असे मुसलमानांनी जाणले व त्यांनी काँग्रेसशी वैर आरंभिले. पुढे जिना व गांधी यांच्यात कमालीचे वितुष्ट निर्माण होऊन मुसलमानांनी पाकिस्तानची मागणी केली व देशाच्या फाळणीचा पायाही काँग्रेसच्या ठरावाच्या रूपाने घातला गेला. गांधींनी देशभर जी विलक्षण जागृति घडवून आणली तिचा फायदा काँग्रेसला मिळाला व इंग्रज जाणार असे दिसू लागताच सत्तेची सूत्रे काँग्रेसच्या हाती गेली. १९२० पासूनचा काळ म्हणजे या देशातील हिंदु मुसलमान झगड्याचा काळ समजला जातो. तो अजूनही संपलेला नाही. काँग्रेस व हिन्दुसभा यांच्यातील वादाचा पाया काँग्रेसच्या मुसलमानविषयक दृष्टिकोनामुळे निर्माण झाला व गांधींच्या धोरणामुळे दिवसेंदिवस त्यांच्यातील दरी वाढतच राहिली. काँग्रेसच्या धोरणामुळे अजूनही ती वाढतच आहे !

❋

(३)

धर्मपरंपरेतून सुधारणा

मलबारातील मोपल्यांच्या अत्याचारांमुळे हिन्दु समाज खडबडून जागा झाला. या आधीच शंकराचार्य डॉ. कूर्तकोटि यांचे विशेष मोलाचे कार्य सुरू झाले होते. लो. टिळकांच्या सल्ल्याने त्यांनी संन्यास घेऊन करवीरपीठाचे शंकराचार्यपद स्वीकारले होते. पुढे कोल्हापुरात ब्राह्मणेतर वाद सुरू झाला. वस्तुतः कोल्हापूरचे छत्रपति शाहू महाराज हे पिंडाने अशा वादात पडणारे नव्हते. हिंदुधर्मावर त्यांची श्रद्धाही होती. पण त्यांच्याकडे संकल्प सांगण्यासाठी जाणाऱ्या एका भटजीच्या मूर्खपणामुळे वेदोक्ताच्या नावाखाली या वादाला तोंड लागले व छत्रपतींच्या नोकरांनी या वादाची आग सर्वभर पसरविली.

महाराजांनी काही ब्राह्मणांच्या जहागिरी जप्त केल्या व वतने नष्ट केली. कोल्हापूरचे संस्थान राजसत्ताप्रधान होते. मन मानेसा कारभार करण्याची छत्रपतींची प्रवृत्ति होती. या जप्तीत कोल्हापूरमधील करवीर पीठाच्या जमिनीशी संबंधित अशा काही वतनदारांची वतनेही नष्ट करण्यात आली. शंकराचार्यांनी त्याविरुद्ध टीका केली व महाराजांचे कृत्य गैर आहे असे म्हटले. तेव्हा सर्वसत्ताधीश असलेले कोल्हापूरचे शाहू महाराज भडकले व शंकराचार्यांना दूर करण्यात येणार अशी वार्ता पसरली.

आपल्याला कोल्हापुरात राहून धर्मप्रचार करता येणे कठीण आहे असे लक्षात येताच शंकराचार्य डॉ. कूर्तकोटि कोल्हापुराबाहेर पडले. त्याबरोबर त्याचा गवगवा खूपच झाला. शंकराचार्य कोल्हापूर संस्थानातून बाहेर पडल्यावर त्यांनी महाराष्ट्रात दौरा सुरू केला व अखेर नाशिक पंचवटी येथे त्यांनी आपले निवासस्थान कायम केले.

शंकराचार्यांचे कार्य

शंकराचार्यांनी हिंदुधर्माच्या आचारपद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचा मोठा प्रयत्न केला. सनातन धर्माच्या मूलभूत बैठकीला धक्का न लावता धर्माच्या आचारपद्धतीत व व्यवहारात जे दोष शिरले आहेत ते काढून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्या उद्देशाने त्यांनी १९२० मध्ये नाशिक येथे हिंदुधर्म परिषद भरविली. त्या वेळी परिषदेला पूर्वास्पृष्ट समाजातील लोकांनाही निमंत्रण केले होते व ते आलेही होते. धर्मविषयक बाबतीत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत या संबंधाने तेथे चर्चा झाली. त्याचा वृत्तान्त पुढे ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाला आहे.

त्यानंतर १९२१ वर्षी या परिषदेचे दुसरे अधिवेशन नागपूर येथे झाले. त्यात डॉ. मुंजे यांचा मोठा भाग होता. हिंदुधर्माच्या व्यवहारपद्धतीत सुधारणा घडून आली पाहिजे यासाठी तेही प्रयत्नशील होते. चालू काळाला योग्य असा नवा स्मृतिग्रंथ तयार करण्यात यावा यासाठी त्यांनी बरीच खटपटही केली होती. अनेक विद्वानांच्या त्यांनी भेटी घेतल्या, पत्रव्यवहार केला, कोणत्या कोणत्या प्रश्नांच्या बाबतीत नवा विचार आवश्यक आहे यासंबंधाने त्यांनी आपले मतही मांडले आहे. या नव्या स्मृतिग्रंथात कोणते विषय यावेत याची त्यांनी एक जंत्रीच तयार केली होती. बाळशास्त्री हरदास यांनी डॉ. मुंजे यांचे जे चरित्र लिहिले आहे त्या ग्रंथात या विषयांची यादी प्रसिद्ध झालेली आहे. डॉ. कूर्तकोटि शंकराचार्यांचे व डॉ. मुंजे यांचे विचार काही बाबतीत समान होते व म्हणून नागपूरच्या हिंदुधर्म परिषदेत डॉ. मुंजे यांनी मोठा भाग घेतला. या परिषदेचा वृत्तान्तही डॉ. मुंजे यांनी संस्कृत भाषेत लिहून प्रसिद्ध केला आहे.

डॉ. मुंजे यांचा मोपला बंडाचा वृत्तान्त

हिंदुधर्म परिषदेच्या निमित्ताने डॉ. मुंजे शंकराचार्यांच्या अधिक जवळ आले. त्यापूर्वी १९२१ मध्ये मोपल्यांचे बंड होऊन गेले होते. तेव्हा त्याविषयीची माहिती गोळा करण्याकरिता शंकराचार्यांनी डॉ. मुंजे यांना मलबारात जाऊन पाहणी करण्याची सूचना केली. तीस अनुसरून डॉ. मुंजे मलबारात गेले व त्यांनी आपल्या निरीक्षणाचा वृत्तान्त शंकराचार्यांना दि. ४ ऑगस्ट १९२३ ला सादर केला.

त्यांच्या निरीक्षणाचे विषय तीन होते. (१) ज्यांना सक्तीने बाटविण्यात आले त्यांची सध्या परिस्थिति काय आहे व जेथे मंदिरे भ्रष्ट वा नष्ट करण्यात आली आहेत त्यांची अवस्था काय आहे? (२) या बाटवाबाटवीमागील उद्देश कोणता होता? (३) मोपल्यांच्या या अत्याचारांचा प्रतिकार करण्यास हिंदु तयार झाले नाहीत का व कां झाले नाहीत?

या तीन प्रश्नांच्या संबंधात डॉ. मुंजे यांनी शंकराचार्यांना आपले निवेदन सादर केले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, ज्यांना सक्तीने बाटविण्यात आले अशांची नक्की संख्या सांगणे कठीण आहे. पण ती सुमारे तीन हजार तरी असावी. आर्यसमाजाच्या कालिकत शाखेच्या दप्तरात दोन हजार नावांची प्रत्यक्ष नोंदच आहे. तथापि इतरत्रही झालेल्या सक्तीच्या धर्मान्तरितांची संख्या बरीच असावी. सर्वसामान्य लोकांच्या माहितीनुसार ती चार हजार तरी असावी; पण ती निदान तीन हजारांपेक्षा कमी खासच नाही.

या सक्तीच्या धर्मान्तराच्या वार्ता प्रथम अँग्लोइंडियन वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या. याविषयी बराच गवगवा झाला तेव्हा मुसलमान पुढाऱ्यांनी असे उठविले

की, हे लोक आपखुषीने मुसलमान झालेले आहेत. तेथे सक्तीचा भाग नाही. गांधीचा त्यांच्यावर विश्वास बसला व फार तर तीन लोकांना सक्तीने बाटविले गेले असावे असे ते म्हणू लागले ! अर्थात् त्यांच्या या म्हणण्यावर कोणाचाच विश्वास बसण्यासारखा नव्हता. गांधींच्या सूचनेवरून श्री. सी. एफ. अँड्रूज हे पुढे मलबारात जाऊन आले. त्यांनी सक्तीच्या धर्मान्तराची संख्या हजारावर असावी असे म्हटले. डॉ. मुंजे यांनी आपल्या वृत्तान्तात हा आकडा निदान तीन हजार तरी असावा असे म्हटले आहे.

भीषण अत्याचार

मोपल्यांच्या अत्याचारासंबंधाने सर शंकरन् नायर यांनी एक पुस्तिकाच प्रसिद्ध केली आहे. ते पूर्वी भारत सरकारच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते. डॉ. ॲनी बेझंट यांनीही आपले वार्ताहर मलबारमध्ये पाठवून तेथील वृत्त आपल्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले होते. सर शंकरन् नायर यांच्या पुस्तिकेतील तेथील अत्याचारांचे वर्णन आजही अंगावर शहारे आणणारे आहे. त्यांनी त्यात केलेली विधाने अतिशय तोलून व जबाबदारीने केलेली आहेत. या अत्याचारांनी भयभीत झालेल्या मलबारमधील काही प्रतिष्ठित स्त्रियांनी त्या वेळच्या व्हॉइसरॉयकडे एक निवेदन पाठविले व अत्याचारांमुळे निर्माण झालेली परिस्थिति त्यांस निवेदन केली. तेव्हा हिंदुस्थान सरकारने हे बंड मोडण्यासाठी एक डिव्हिजन सैन्य पाठविले. त्यास चार तालुक्यातील हे बंड मोडण्यास सहा महिने लागले. तेव्हा सर्व स्थिरस्थावर झाले.

मलबारातील ज्या चार तालुक्यांत या बंडाचा विशेष उठाव झाला होता तेथील त्या वेळच्या लोकसंख्येचे प्रमाण पुढे दिले आहे :

तालुका	हिंदु	मुसलमान	खिरश्चन	एकूण
अरनाड	१,६३,३२८	२,३७,४०२	३७१	४,०१,१०१
वालुनाड	२,५९,९७९	१,३३,९१९	६१९	३,९४,५१७
पेनानी	२,८१,१५५	२,२९,०१६	२३,०८१	५,३३,२५२
कालिकत	१,९६,४३५	८८,३९३	५,७६३	२,९०,५९१

या बंडाच्या संबंधात अन्यत्र जो माहिती प्रसिद्ध झाली आहे त्यावरून असे दिसते की ऑगस्ट १९२१ मध्ये हे बंड सुरू झाले. त्यात त्यांनी २०८०० हिंदूंच्या कत्तली केल्या. प्राणभयाने जे धर्मान्तरास तयार झाले त्यांची संख्या चार हजाराहून अधिक होती. सरकारने बंड मोडण्यासाठी जे लष्कर पाठविले त्याच्या बरोबर या बंडवाल्यांच्या काही चकमकीही झाल्या. बंडवाल्यांजवळ धनुष्ये, तरवारी व बंदुकाही होत्या. रानावनात लपूनछपून त्यांनी लष्करावरही हल्ले केले. तथापि लष्कराने त्यांचा पाठलाग केला. गोळीबारात २३३९ मोपले ठार व १६५२ जखमी झाले.

एकूण ३९,३३८ बंडखोरांना अटक करून त्यांजवर खटले भरण्यात आले व २४,१६७ लोकांना कमीअधिक मुदतीच्या शिक्षा झाल्या. यावरून या बंडाची व्याप्ति केवढी मोठी होती व तेथे किती भीषण प्रकार झाले याची कल्पना येते.

मोपले लोक हे अडाणी व क्रूर होते. पूर्वी मलबार भागाशी अरबांचा व्यापार चाले. हिंदु लोक या सागरी व्यापारात भाग घेत नसत. समुद्रबंदीच्या विचाराचा त्यांच्यावर एवढा प्रभाव होता की समुद्र प्रवास करणे म्हणजे धर्मभ्रष्ट होणे होय असे मानले जात असे ! पूर्वी हिंदु लोक समुद्रावरील सफरी करीत. पुढे केव्हा तरी परकीयांनी त्यांच्या कत्तली केल्या असाव्यात व परदेशी जाणे नको या विचाराने समाजाच्या मनाची तेव्हापासून पकड घेतली असावी. पुढे त्याला धर्माचाराचे रूप आले. इतके की व्यापारासाठी अरबांना मलबारात जणू मक्तेदारीच लाभली ! पुढे त्यांना अधिक माणसांची गरज वाटू लागली; तेव्हा हिंदूचा मुसलमान झाला की परदेशी जाण्याला तो मोकळा ठरे ! बावळटपणाची ही कमाल होती. झामोरीन राजाने तर मुसलमान होण्यासही उत्तेजन दिले ! सरासरी घरटी एकाने मुसलमान व्हावे, समुद्रयानाने परदेशी जावे व व्यापार वाढवावा असा पायंडा पडला. मुसलमान होणें म्हणजे काय याची त्या काळी या लोकांना नीट कल्पनाच आलेली नसली पाहिजे. त्यामुळे हजारो हिंदु बाटून मुसलमान झाले व त्यांनी परदेशी जा-ये करून संपत्ति मिळविली.

हेच मुसलमान पुढे कडवे इस्लामवादी बनले व गांधींच्या प्रेरणेने खिलाफत चळवळ सुरू झाली तेव्हा वर्षात स्वराज्य या गांधींच्या घोषणेनुसार ऑगस्ट १९२१ मध्ये इंग्रजी राज्य संपले व इस्लामी खिलाफत राज्य सुरू झाले असे ते धरून चालले ! त्यांच्या या विचारास हिंदूंनी पाठिंबा दिला नाही. तेव्हा त्यांच्या कत्तली सुरू झाल्या. मोपल्यांनी कसाईखानाच सुरू केला. त्यांनी हिंदूंच्या मुंडक्यांनी विहिरी भरल्या ! कित्येक लोक या उठावाच्या वार्ता येताच पळून गेले; पण जे बंडखोरांच्या तावडीत सापडले व मुसलमान होईनात त्यांना ठार मारून त्यांची चीजवस्तु लुटण्यात आली व जे शेवटी मरणाच्या भीतीने मुसलमान झाले त्यांचेही अमानुष हालहाल झाले.

या संबंधाची वर्णने त्या वेळच्या वृत्तपत्रांतून आली आहेत. सावरकरांनीही " मोपल्यांचे बंड, मला काय त्याचे " या आपल्या लेखांतून त्या वेळच्या प्रसंगाचे विदारक चित्र उभे केले आहे.

शुद्धिकार्य सुरू झाले

या बंडाची दखल आर्यसमाजाने ताबडतोब घेतली. त्यांनी स्थानिक लोकांना भेटून या धर्मान्तरितांना ताबडतोब परत हिंदुधर्मात व त्यांच्या त्यांच्या जातीत

घेण्यात यावे यासाठी प्रयत्न केला. कालिकत येथील झामोरिन राजाने मलबार-मधील वैदिकांची एक सभा बोलावली. त्या सभेनेही अल्पसे प्रायश्चित्त देऊन या सर्व धर्मान्तरितांना परत हिंदुधर्मात व स्वजातीत घ्यावे असा निर्णय दिला व थोड्याच दिवसांत सर्व धर्मान्तरित परत हिंदु झाले व आपापल्या जातीत समाविष्ट झाले. या प्रकरणाने हिंदु समाजात सर्वत्र जागृति झाली. वाइटातून काही काही वेळा चांगले निघते ते असे!

डॉ. मुंजे यांनी आपल्या निवेदनात असेही म्हटले आहे की, हिंदुमहासभेने मलबारात आपले एक खास अधिवेशन भरवावे. मलबारातील पीडित हिंदूंच्या साहाय्यासाठी त्यांनी एक निधीही सुरू केला होता. तथापि मलबारात हिंदुमहासभेचे अधिवेशन पुढे झालेले दिसत नाही. महाराष्ट्रात मात्र हिंदुसभा स्थापन करण्यास याने नवी प्रेरणा मिळाली व १९२३ मध्येच हिंदुसभेचे कार्य सुरू झाले. त्यात शुद्धीला प्रामुख्य होते. पतितपावन सभेच्या वतीने १९२३ मध्ये सुमारे ७५ लोकांचे शुद्धीकरण झाले. मांगगारुडी या समाजातील लोकांना मुसलमानांनी फसवून बाटविले होते. शंकराचार्य कूर्तकोटि यांच्या आज्ञेनुसार त्यांना लगेच परत हिंदु करण्यात आले. शिवाय ब्राह्मण समाजातील कोकणातील पु. रा. वैद्य नावाचे गृहस्थ खिश्चन झाले होते. त्यांसही शुद्ध करून परत स्वजातीत घेण्यात आले.

मोपल्यांच्या बंडामुळे हिंदु समाजात सुधारणेच्या कार्यालाही नवी चालना मिळाली. पूर्वी या सुधारणेला खिस्ती वळण होते; पण आता ते धार्मिक परंपरेवर आधारले गेले. पुण्यास श्री. गो. रा. हिंगणेकर यांनी हिंदुसमाज सभा या नावाची संस्था काढली. ते तिचे कार्यवाह होते. या संस्थेची पहिली सभा पुण्यास फेब्रुवारी १९२३ मध्ये श्री. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. तीत अस्पृश्यता निवारण, सार्वजनिक स्थळे, शाळा, धर्मशाळा, बाजार इत्यादि ठिकाणी सर्वांना समान प्रवेश असावा यांसंबंधाने प्रस्ताव झाले. या सभेला महार, मांग, मराठे, ब्राह्मण इत्यादि जातींचे लोक उपस्थित होते. अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांच्या करिता दै. प्रभातचे संपादक श्री. वालचंद रामचंद कोठारी यांनीही बावी (जि. सोलापूर) येथे एक वसतिगृह सुरू केले. पुण्यास श्री. बापूसाहेब माटे यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी रात्रीच्या शाळा स्वखर्चाने सुरू केल्या. अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीने या वेळेपर्यंत मूळ धरले होते. हिंदु समाजसभेची आणखी एक सभा डॉ. नवले यांच्या अध्यक्षतेखाली किबे वाड्यात भरली होती. तीत शुद्धिकार्याला पाठिंबा देण्यात आला व मलबारात झालेल्या शुद्धिकार्याचे अभिनंदन करण्यात आले. अशा रीतीने धर्मपरंपरेतून हिंदुसमाजाच्या अंतर्गत सुधारणेचा पाया भरला गेला.

पतितपरावर्तन

सन १९२१ मध्ये मोपल्यांचे बंड झाले व त्यात हिंदूंच्या क्रूर कत्तली झाल्या आणि हजारो लोकांना सक्तीने बाटविण्यात आले त्याचा परिणाम सनातनी प्रवृत्तीच्या हिंदु समाजावरही बराच घडून आला. त्यांचे डोळे उघडले. पतित परावर्तनाला या वेळपर्यंत सनातनी धर्मपंडितांचा जो विशेष विरोध होता तो मावळला व ते शुद्धिकार्याला तयार झाले. तरीही काही परंपरागत शास्त्रीपंडितांचा थोडाफार विरोध होताच. सहा महिन्यांपूर्वी धर्मांतरित झालेल्यांना प्रायश्चित्तपूर्वक स्वधर्मात व स्वजातीत घेण्यास हरकत नाही; पण त्याहून अधिक काळ परधर्मात गेला असेल तर त्यास स्वधर्मात घेणे धर्मशास्त्रास धरून नाही असे ते प्रतिपादन करीत. त्यामुळे परिवर्तनवाद्यांना या परंपरागत शास्त्रीपंडितांशी फार वाद घालावा लागे. या कामात म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, श्रीधरशास्त्री पाठक, नारायणशास्त्री मराठे, प्रज्ञानेश्वरस्वामी प्रभृतींचे फार साहाय्य झाले.

शंकराचार्य डॉ. कूर्तकोटि यांना देखील या प्रकरणी काही काळ वाट पहावी लागली. तथापि मुंबईचे गजानन भास्कर वैद्य यांनी सनातनी धर्मशास्त्री मंडळीची वाट न पहाता १९१७ च्या सुमारास हिंदु-मिशनरी सोसायटी काढून शुद्धीकरणाचे काम चालू केले. १९१७ पासून १९२४ पर्यंतच्या सात आठ वर्षांत त्यांनी १२१ शुद्धीकरणे केली. त्यांनी पहिले शुद्धीकरण केले तेव्हा लोकमान्य टिळक मुम्बईस होते. ते पुण्यास परत यावयास निघाले होते. तेव्हा वैद्यांनी स्टेशनवर जाऊन लो. टिळकांची भेट घेतली व शुद्धीकरणाची वार्ता त्यांच्या कानावर घातली. टिळकांनी त्यांचे अभिनंदन केले व शुद्धीकरणाचा संस्कार केलात का म्हणूनही विचारले. संस्कार अवश्य आहे असे त्यांचे मत होते. वैद्यांनी हो म्हणून सांगितले. तेव्हापासून मुंबईस शुद्धीकरणाचे कार्य चालू झाले होते. स्वा. सावरकरांनी अंदमान तुरुंगातच बाटवाबाटवीवर शुद्धीकरणाचा उपाय कसा सुरू केला याचे वर्णन त्यांच्या 'माझी जन्मठेप' या ग्रन्थात आलेले आहे.

तथापि श्री. गजानन भास्कर वैद्यांना जे सहज शक्य झाले ते कूर्तकोटींना, ते पीठस्थ शंकराचार्य असल्यामुळे, लगेच शक्य झाले नाही. श्री. पु. रा. वैद्य हे फसवून खिरश्चन केले गेले होते. आपली फसवणूक झाली हे लक्षात येताच त्यांनी शंकराचार्य कूर्तकोटि यांच्याकडे शुद्धीकरणासाठी अर्ज केला होता. पण त्या वेळी त्यांना सनातनधर्मीय शास्त्रीपंडितांची अनुकूलता आढळली नाही. म्हणून वातावरण नीट तयार होईपर्यंत थांबण्यास त्यांनी वैद्यांना सांगितले व पुढे १९२३ वर्षी शंकराचार्यांनी त्यांचे शुद्धीकरण व जातिप्रवेश घडविला. वैद्यांचे हे शुद्धीकरण पुण्यास शिवाजी मंदिरात पतितपावन संस्थेच्या वतीने शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखालीच दि. २७।६।१९२३ ला झाले. त्या कामी भास्कर बळवंत उपाख्य भाऊसाहेब

भोपटकरांनी पुढाकार घेतला होता. ताम्हनकरांनी त्या वेळी पौरोहित्य केले. शंकराचार्यांनीही आपल्याला वातावरण बदलण्यासाठी काही काळ वाट पहावी लागली असे स्वतः शुद्धिप्रसंगी केलेल्या भाषणात म्हटले होते.

पतितपरावर्तनाचा विचार आता सर्वमान्य झाला असून मोपला अत्याचारांनी व भ्रष्टीकरणाने त्याला चालना दिली. आता तो विचार समाजात मान्यता पावला आहे. आता शुद्धीकरणाला विरोधक असे कोणी फारसे राहिले नाहीत. पण हे विचारपरिवर्तन घडून येण्यासाठी सात आठ वर्षे बरेच परिश्रम करावे लागले.

या काळातील सामाजिक प्रश्नांत पुढील प्रश्न विशेष महत्त्वाचे, वादग्रस्त व चर्चेचे होते :

(१) कलियुगात क्षत्रिय व वैश्य आहेत काय ? असल्यास त्यांना वेदोक्ताचा अधिकार आहे काय ?

(२) पतितपरावर्तन व हिंदूकरण शास्त्रसंमत आहे काय ? असल्यास परावर्तित व्यक्ति व जातिव्यवस्था यांचा परस्पर संबंध कसा राहील ?

(३) अस्पृश्यता निवारण म्हणजे काय ? त्याच्या मर्यादा कोणत्या ?

या तीन विषयांवरच सामाजिक विचारांचे चर्वितचर्वण व आंदोलन या काळात चालू होते. याशिवाय राजकारणात ब्राह्मणेतर वाद, मुसलमान वाद व अहिंसावाद या बाबतीत मतमतान्तरांचा गोंधळ होता तो वेगळा.

वर्णसंस्कार

संस्कारहीनत्वामुळे क्षत्रिय व वैश्य वर्ण लुप्तप्राय झाले; अशा स्थितीत संस्कारांचे पुनरुज्जीवन करून त्यांस क्षत्रिय वा वैश्य वर्ण प्राप्त करून द्यावयास पाहिजे होते; छत्रपति शिवाजी महाराजांच्या बाबतीत तसे झाले व त्यांनी आपले क्षत्रियत्व सिद्ध केले. पण त्यांची परंपरा नंतरच्या काळात राहिली नाही व पुढच्या छत्रपतींनीही वर्णसंस्कार केले नाहीत. त्यामुळे संस्कारहीनत्वामुळे त्यांस वर्णहीनत्व आले असे समजण्यात येऊ लागले. ही स्थिति असली तरी क्षत्रिय म्हणवून घेऊ इच्छिणारेही वर्णसंस्कार करण्यास फारसे तयार झाले नाहीत. त्याशिवायच आपणांस वेदोक्ताचा अधिकार पाहिजे असा त्यांचा आग्रह होता, तर तो अनेक पुरोहितांना अमान्य होता. नंतरच्या काळात मराठा समाजातील काहींनी आपल्या मुलांच्या वैदिक संस्कारांनी मुंजी केल्याची उदाहरणे घडली आहेत; पण ती विरळा.

परंपरेनुसार वेदोक्ताचा म्हणजे वैदिक सस्वर मंत्रांनी धर्मविधि करण्याचा अधिकार ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य वर्णाच्या फक्त पुरुषांना तेवढा असे. कोणत्याच वर्णाच्या वा जातीच्या स्त्रियांना तो नसे. जातीचा आणि या वेदोक्त संस्कारांचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता हे यावरूनही स्पष्ट होते. तथापि त्यास वादाचे स्वरूप

प्राप्त झाले. वेदोक्त प्रकरणी लो. टिळकांनी जे प्रतिपादन केले ते त्या काळच्या सनातन पक्षाचे प्रातिनिधिक उत्तर समजता येईल. दि. २० मे १९०२ च्या केसरीत लो. टिळकांनी पुढीलप्रमाणे म्हटले आहे:

" वेदोक्ताच्या प्रकरणात आमचा असा अभिप्राय आहे की कोणत्याही मनुष्याला आपल्या घरची कृत्ये वेदोक्त रीतीने करण्याचा या राज्यात अनियंत्रित अधिकार आहेच. परंतु जे ब्राह्मण अशा रीतीने हव्या त्याच्या घरी वेदोक्त कर्मे करतील त्यांस इतर ब्रह्मवृन्दाने आपल्या समाजात घेतलेच पाहिजे असा आग्रह कोणासही धरता येणार नाही.

" पूर्वीचे उपाध्ये जर आपल्या (छत्रपतींच्या) घरी वेदोक्त कर्मे करीत नाहीत तर दुसरे नेमा. कोल्हापूर येथील राजोपाध्ये यांनी छत्रपति शाहू महाराजांचे घरी वेदोक्त कर्मे करण्याचे नाकारल्यामुळे त्यांस जे धर्मादाय इनाम होते ते खालसा करण्याचा व त्यांजकडून मुलकी, दिवाणी, मॅजिस्ट्रेटी अधिकार काढून घेण्याचा हुकूम दिला आहे असे समजते. ही गोष्ट जर खरी असली तर महाराजांचे हातून ही मोठी चूक झाली असे म्हणण्यास हरकत नाही. राजोपाध्ये यांजकडे चालू असलेली गावे वतनी असून धर्मादाय इनामे आहेत. ते जोपर्यंत मामूली वहिवाटीप्रमाणे उपाध्येपण करण्यास तयार आहेत तोपर्यंत ही गावे त्यांच्याकडे चाललीच पाहिजेत. मॅजिस्ट्रेटी अधिकार मात्र छत्रपति केव्हाही ठेवू किंवा काढून घेऊ शकतात. ती बाब त्यांच्या अधिकारातील आहे."

छत्रपतींकडे वेदोक्त धर्मकार्ये करणाऱ्या काही भटजींना कोल्हापूरच्या काही भिक्षुकांनी प्रथम वाळीत टाकले होते. त्या संदर्भात हे विधान असावे. पुढे शंकराचार्यांनी छत्रपतींच्या घरी प्रायश्चित्तपूर्वक वेदोक्त धर्मविधि करण्यास मान्यता दर्शविली व हे प्रकरण संपले.

क्षत्रिय व वैश्य वादासंबंधात तंजावर वारसा प्रकरणी वरदाचारी या शाहू महाराजांच्या वकिलाने महाराजांच्या वतीने केलेल्या भाषणाचा सारांश इंडियन लॉ रिपोर्टर १९२५ मद्रास पृष्ठ १ (१९७ व्हॉ. ४९।८) वर आलेला आहे. त्यात म्हटले आहे की : " It was denied that the members of the Kolhapur Raj wanted to have Vedic rights performed on the footing that they were Kshatriyas and recourse had to be had to dismiss the priests and resume their jahagirs and otherwise coerce them into submission."

(आपण क्षत्रिय आहोत व या कारणास्तव आपल्या येथे वैदिक पद्धतीने संस्कार व धर्मविधि केले गेले पाहिजेत असा आग्रह कोल्हापूरच्या छत्रपतींनी धरला नाही. तसेच आपण क्षत्रिय असूनही आपले पुरोहित वैदिक पद्धतीने धर्मविधि

करण्यास तयार नाहीत म्हणून त्यांच्या जहागिरी जप्त करण्याचा आणि अशा रीतीने त्यांना शरण येण्यास भाग पाडण्याचा प्रकार केला गेला हेही अमान्य करण्यात आले.)

यावरून कोल्हापूरचे छत्रपति आपण क्षत्रिय आहोत असा पूर्वी आग्रह धरीत नव्हते, व आपल्या येथे धर्मविधि वेदोक्त पद्धतीने झाले पाहिजेत असा त्यांचा आग्रहही नसे हे स्पष्ट आहे. तथापि नंतरच्या काळात छत्रपतींची भूमिका बदलली व त्यातून वाद वाढत गेला.

ब्राह्मणेतर वाद

या वादाला थोड्याच काळात ब्राह्मणेतर वादाचे स्वरूप तीव्रतेने आले. सत्य-शोधक समाजाची नंतरची चळवळ या वादातूनच पोसली गेली आहे. त्यानंतर थोड्याच वर्षांनी वर्णव्यवस्थाही उखडून टाकली पाहिजे व जातिसंघटनाही मोडून टाकली पाहिजे असा प्रचार समाजवादी विचारधारेतून सुरू झाला. निदान प्रचारा-पुरते तरी त्यास आज बरेच तीव्र स्वरूप आहे.

वेदोक्ताचा वाद काही दिवस गाजला. कोल्हापूरला छत्रपति शाहू महाराजांनी क्षात्रजगद्गुरूंची स्थापना केली व क्षात्रपुरोहित वर्ग (रावभटजी) निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण त्यांस फारसे यश लाभले नाही. अलीकडच्या काळात त्या पीठालाही विशेष महत्त्व राहिले नाही. पूर्वी ब्राह्मण पुरोहित वर्गात वेदोक्ताच्या संबंधात विशेष मर्यादांचा आग्रह असे. तोही आता नष्ट झाला आहे. ब्राह्मण समाजातच वेदाध्ययन करणारा व व्यवसायी पुरोहित वर्ग व आधुनिक विद्या शिकणारा गृहस्थ वर्ग असे भेद सध्या पडले असून पुरोहित वर्गाला अवकळा प्राप्त झाली आहे व गरजेइतका तरी तो कसा राहील याची विवंचना निर्माण झाली आहे. धर्मविधि करणारांची संख्या झपाट्याने घटत चालली असून त्यांचे महत्त्व मानले जाईनासे झाले आहे. आर्थिक दृष्टया 'आश्रित' वर्गाचे त्यास स्वरूप प्राप्त झाले आहे. समाजातील विचारवंतांनी या परिस्थितीची गंभीर दखल घेण्याची आव-श्यकता आज निर्माण झाली आहे.

हिंदुसभेच्या कार्यास चालना

खिरश्चन व मुसलमान झालेल्यांना परत हिंदुधर्मात घेण्यास हिंदूंनी सुरवात करताच संख्येचे बळ लोकशाहीत विशेष महत्त्वाचे असते याची चाणाक्ष मुसल-मानांना बरोबर कल्पना आली, आणि त्यांनी बाटवाबाटवीचा उद्योग वाढत्या प्रमाणावर सुरू केला. आगाखानवाल्यांनी या चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी, मुल्लामौलवींनी, निजामच्या हस्तकांनी व संपन्न खोजा व इतर मुसलमानांनी फसवून, लालूच दाखवून, मुली पळवून व हरिजनांना व इतरांना विविध आमिषे दाखवून बाटविण्याची मोहीम हाती घेतली. खिरश्चन मिशनऱ्यांचे हे काम त्यांच्या

शाखांच्या वतीने सर्वत्र जाळे पसरून चिकाटीने व मुकाटयाने चालूच होते. पण या वेळपर्यंत हिंदु समाजात शुद्धीकरणाचा विचारच नव्हता; तो आता निर्माण झाल्याने हिंदु समाजात थोडीफार तरी आवक सुरू झाली व त्यामुळे पर्यायाने ख्रिश्चन व मुसलमान समाजातून थोडीफार तरी जावकही सुरू झाली. एवढ्यानेच ते समाज गडबडले.

राजकीय सत्तेचा आणखी एक हप्ता देण्याचा विचार १९१९ च्या घटनेच्या विचारातच अंतर्भूत होता. त्यामुळे नव्या सत्तेच्या संदर्भात मुसलमान आपले या देशातील महत्त्व व लोकसंख्या वाढविण्यासाठी शुद्धिचळवळीला विरोध करू लागले. अस्पृष्ट वर्गाच्या निमेनिम फाळणीचीही भाषा ते बोलू लागले आणि इंग्रज सत्ताधाऱ्यांच्या मदतीने आपले उपद्रवकारित्वाचे बळ वाढविण्यासाठी हिंदु समाजाविरुद्ध जागोजाग दंगे घडवून आणू लागले. १९२० ते १९४७ हा काळ या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहे.

परिस्थितीच्या या पार्श्वभूमीवर हिंदु संघटनाच्या कार्यास विशेष चालना मिळाली. हिंदु संघटन व शुद्धिकार्याला विशेष चालना दि. १९ ऑगस्ट १९२३ ला काशी येथे पं. मालवीय यांच्याच अध्यक्षतेखाली हिंदुमहासभेचे जे अधिवेशन भरले त्यात मिळाली. त्यात सर्व देशभर हिंदुसभांच्या शाखा स्थापन कराव्या असे ठरले. त्याप्रमाणे १९२३–२४ या वर्षात मुंबई, मद्रास, पंजाब, दिल्ली, उत्तरप्रदेश इत्यादि अनेक प्रांतांत प्रांतीय हिंदुसभा स्थापन झाल्या. मुंबईला हिंदुसभेच्या वतीने विशेषतः गुजरातमध्ये शुद्धीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली. आनंद तालुक्यातील खालकी गावातील ६१ ख्रिस्ती व खोजे यांना हिंदुधर्मात घेण्यात आले. (केसरी ११-१२-१९२३) त्याचप्रमाणे बडोदे भागातील बारा गावातील १५० पराया मुसलमान, २१ खोजे मुसलमान व १११ ख्रिस्ती यांना हिंदुधर्मात घेण्यात आले. (केसरी २५-१२-१९२३) अंकोळ (जि. बेळगाव) येथील हरि शंकर साठे हे ख्रिश्चन झाले होते अहमदनगर येथील आर्यसमाजाने त्यांना परत हिंदुधर्मात घेतले. (केसरी २३-१२-१९२३) माटुंगा येथे ११ डिसेंबर १९२३ ला हिंदुसभेची शाखा स्थापन झाली व शुद्धीकरणाच्या कार्यास विशेष चालना देण्यात आली.

महाराष्ट्रात रत्नागिरी येथे दे. गणेश दामोदर उपाख्य बाबाराव सावरकर यांच्या प्रेरणेने दि. २३ जानेवारी १९२४ ला हिंदुसभा स्थापन झाली. श्री. भास्कर रामचंद्र उपाख्य बाबासाहेब नानल हे तिचे अध्यक्ष व श्री. गजानन विश्वनाथ पटवर्धन, संपादक बलवंत हे तिचे कार्यवाह होते. स्वा. सावरकरांची येरवड्याच्या तुरुंगातून नुकतीच सुटका होऊन ते रत्नागिरीस येऊन दाखल झाले होते. जरी रत्नागिरीची हिंदुसभा १९२४ वर्षी जानेवारीत स्थापन झाली होती तरी वर्षभर तिचे विशेष असे कार्य झाले नाही. रत्नागिरी हिंदुसभेच्या वृत्तान्तात

असे म्हटले आहे की यदचपि सभा १९२४ च्या जानेवारीत स्थापन झाली तथापि दोन चार महिन्यांचे आतच प्लेग सुरू झाल्यामुळे आणि लोक बाहेर गावी निघून गेल्यामुळे प्लेग संपून नगर पुन्हा भरतो तिचे काम बंद ठेवावे लागले. ह्या कारणाने " सभेच्या खऱ्या कार्यास सन १९२५ च्या जून महिन्यात आरंभ झाला व म्हणून जून १९२५ ते मे १९२६ अखेरच्या वृत्तान्तात सभेचे प्रथम वार्षिक प्रतिवृत्त असे म्हटले आहे. "

रत्नागिरीच्या पाठोपाठच पुण्यास हिंदुसभा स्थापन झाली. सार्वजनिक सभेच्या सभागृहात प्रकट सभा भरविण्यात येऊन तीत दि. २ मार्च १९२४ ला हिंदुसभेची रीतसर स्थापना करण्यात आली. श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव अध्यक्ष व शंकर रामचंद्र दाते कार्यवाह व श्री. राघवेन्द्र शर्मा (हे मूळचे निजाम राज्यातील गृहस्थ हद्दपारीमुळे पुण्यास येऊन राहिले होते.) हे सहकार्यवाह अशी निवड झाली. तथापि यापूर्वी १९२३ वर्षीच पुण्यास हिंदु सभेच्या प्रत्यक्ष कार्यास सुरवात झाली होती. १९२४ पासून पुण्याच्या हिंदुसभेने शुद्धिकार्यावरच विशेष भर दिला. हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळात श्री. भास्कर बळवंत उपाख्य भाऊसाहेब भोपटकर, श्रीपाद महादेव उपाख्य बापूसाहेब माटे, श्री. जनार्दन सखाराम उपाख्य तात्यासाहेब करंदीकर, श्री. वामन मोरेश्वर उपाख्य बाबासाहेब पोतदार, श्री. गजाजन विश्वनाथ उपाख्य दादाराव केतकर, श्री. गंगाधर विश्वनाथ उपाख्य नानाराव गोखले, श्री. गो. रा. हिंगणेकर, के. के. सकट इत्यादि मंडळी प्रामुख्याने होती.

शुद्धीकरणाच्या चळवळीला मुसलमानांचा विरोध सुरू झाला तर त्याच कारणामुळे हिंदुसमाजात शुद्धिचळवळीला वाढत्या प्रमाणावर पाठिंबा मिळू लागला हे लक्षांत घेण्यासारखे आहे.

आगाखान हे हिंदूंचे कलंकी अवतार आहेत, अशी हूल काही खोजा मुसलमानांनी उठवली. तेव्हा पुणे हिंदु सभेचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते बापूसाहेब माटे यांनी खुद्द आगाखानांनाच एक अनावृत पत्र लिहिले. ते केसरीच्या दि. ११-३-१९२४ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यांनी आगाखानांना असे विचारले की असा काही अवताराचा संचार आपल्या अंगात झाला असल्याची आपणांस जाणीव झालेली आहे कीं काय ? कारण तुमचे अनुयायी तसा सर्वत्र प्रचार करीत असतात. आगाखानांनी त्यावर उत्तरच दिले नाही ! शुद्धीकरणाची ही लाट सर्वत्र पसरली व तिच्या राजकीय महत्त्वामुळे धार्मिक व संकुचित दृष्टीने विचार करणाऱ्या पुरोहित वर्गाचा आरंभी असलेला विरोधही हळुहळू विरघळून गेला.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे १९२४ वर्षी रत्नागिरीस स्थानबद्ध म्हणून राहू लागले. राजकारणात भाग न घेण्याचे त्यांजवर बंधन होते. पण हिंदुसंघटन हे सामाजिक व धार्मिक कार्य असल्यामुळे व हिंदुसभा ही समाजकार्य

करणारी संस्था सरकारलाही मान्य झालेली असल्यामुळे हिंदुसभेच्या कार्यात ते भाग घेऊ शकत. त्यांनी शुद्धिसंघटनाच्या कार्यास विशेष चालना दिली. त्यामुळे मुसलमानांचे पित्त खवळले होते. मौ. शौकत अल्लींनी सावरकरांची भेट घेऊन त्यांना शुद्धि चळवळीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करून पाहिला. त्या वेळी सावरकर व शौकत अल्ली यांच्यात झालेला संवाद विशेष महत्त्वाचा व मुसलमानांचा दृष्टिकोन स्पष्ट करणारा असल्याने त्यास विशेष महत्त्व होते. हा संवाद पुणे हिंदुसभेने पत्रकरूपाने छापून त्याच्या हजारो प्रती समाजात प्रसृत केल्या. त्याने शुद्धिसंघटनाच्या कार्यास विशेष चालना मिळाली. त्या पत्रकातील विचारसरणीचे आजही विशेष महत्त्व आहे. ते पत्रक असे :

सावरकर व शौकतअल्ली संवाद

शौकतअल्ली : आपल्याला माझा निरोप मिळालाच असेल.

स्वा. सावरकर : होय व आपल्या निरोपाप्रमाणेच मी हिंदु-मुसलमानांच्या राष्ट्रैक्यास आपणाला विघातक वाटणाऱ्या हिंदुसंघटनेच्या कार्यापासून अलग होण्याचा निश्चय केला आहे.

शौकत : अत्युत्तम. अहो हे पहा ! कसले हिंदु नि कसले मुसलमान घेऊन बसला आहा ! हिंदूंची व मुसलमानांची एकी महत्प्रयासांनी आम्ही साधली; परंतु या हिंदुसंघटनाच्या चळवळीने तिचा चुटकीसरशी नाश होण्याचे भय आहे. तुम्ही हिंदूंनी संघटन केले की मुसलमान आम्हांस तोंड काढू देत नाहीत. ते म्हणतात आम्ही पण संघटना करू. तेव्हा स्वराज्याच्या प्रीत्यर्थ व या दुर्भागी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी ज्याने पहिली झुंज घेतली त्याने या हिंदुसंघटनात फसावे हे मला मोठे वैषम्य वाटले. आपण रत्नागिरीस असता सिंधी हिंदूत हिंदुसंघटनाचे बीज पेरून तिकडे दुही वाढविलीत असे मी ऐकत होतो. आता आपण ते कार्य सोडण्याचे ठरविलेत हे फार उत्तम केलेत.

सावरकर : आपण म्हणता ते अगदी खरे; केवळ एका गोष्टीच्या स्पष्टीकरणाकरिता मी अजून माझ्या हिंदुसंघटन त्यागाच्या निश्चयाची प्रसिद्धि केली नाही, तेवढी गोष्ट आपण मला सांगताच मी प्रसिद्धपणे हिंदुसंघटनाचे कार्य सोडून देईन.

शौकतअल्ली : ती कोणती ?

सावरकर : आपण खिलाफत चळवळ व ऑल उलेमा सभेचे कार्य कधी सोडणार ? ते कळताच मी हिंदुसंघटन सोडणार आहे.

शौकत : (खवळून) काय करावे ! अहो देशामध्ये तिसरा परका शत्रु येऊन बसलेला. तो दोघांच्याही टाळूवरचे लोणी खात असलेला अशा वेळेला सर्वांनी एक होऊन त्याला तोंड द्यावयाचे ते सोडून तुम्ही हिंदूंनी संघटनाचे कार्य उभारले ही

केवढी दु:खाची गोष्ट ! अहो तुम्ही हिंदूंनो तुमच्या इतिहासात एकसारखा मुसलमानांचा मार खाल्लेला आहे. (त्या सद्गृहस्थाच्या सभ्य भाषेत बोलावयाचे म्हणजे 'जुती खायी है !') तुमची गोष्ट व मुसलमानांची गोष्ट फार भिन्न आहे. तुम्ही मुसलमानांशी मिळून रहाल तरच तुम्हांस पारतंत्र्यातून डोके वर काढता येईल.

सावरकर : (त्यांचे पुराण संपत नाहीसे पाहून मध्येच बळाने थांबवून) ऐका ! येथे मला तुमच्याशी राजकारणाची चर्चा करता येत नाही. पण इतकेच सांगतो की पारतंत्र्य, तिसरा शत्रु, स्वातंत्र्य, राष्ट्रैक्य इत्यादि गोष्टी आपणांस हिंदुस्थानच्या राजकारणात जेव्हा काहीही गम्य नव्हते व सरकारी नोकरीत घृतकुल्या करीत आपण पडला होता तेव्हा मी व माझे हिंदु सहचर शिकलो होतो, शिकवीत होतो, तेव्हा ते आम्हीच घालून दिलेले धडे आम्ही विसरलो आहो असे आपण गृहीत धरावयास नको आहे. या चर्चेत वेळ केवळ व्यर्थ जात आहे. दुसरे तुम्ही इतिहाससंबंधाने जे म्हणालात त्यात दोन चुका आहेत. एक तर आम्हा हिंदूंचा इतिहास गेल्या हजार वर्षांत सुरूच झालेला नाही. अरेबियाचा असेल व दुसरे की त्या एक हजार वर्षांत केव्हा केव्हा मार खाल्ला हे जरी दुर्दैवाने खरे असले तरी जितका मार खाल्ला तितका तरी उलट मुसलमानांस मार देऊन त्याची बाकी आम्ही सव्याज चुकती केली आहे हेही तितकेच खरे आहे. अटकेपासून रामेश्वरापर्यंत मराठ्यांनी तुम्हा मुसलमानांना भेटलात तिथे तिथे पिटलेले आहे व दिल्लीच्या मुसलमानी बादशहास मनात येताच हात धरून वर चढविले आहे व मनातून उतरताच दाढी धरून खाली खेचले आहे. म्हणून इतिहासाची गोष्ट सोडून द्या. मुख्य प्रश्न जो मी केला की, तुम्ही खिलाफत व उलेमा व तानझीम (मुसलमानी संघटन) या चळवळी केव्हा सोडणार त्याचे उत्तर अजून आपण दिले नाही ते प्रथम द्या.

शौकतअल्ली :– अहो पण खिलाफत चळवळीत आम्ही काही एक छपवून ठेवले नाही, हिंदूंना खिलाफतीची मुळीच भीति नाही. कारण सर्व खिलाफत चळवळ एका हिंदूच्या नेतृत्वाखाली चाललेली आहे.

सावरकर :– असेल ! खिलाफत चळवळ एका हिंदूच्या नेतृत्वाखाली चालली आहे म्हणून जर ती घातक होऊ शकत नाही, तर हिंदू संघटनही हिंदूच्याच नेतृत्वाखाली असल्याने तेही कां घातक असावे ? आपण असे म्हणाल की खिलाफतीला हिंदु नेता मिळाला म्हणून हिंदूंचा विश्वास बसला पण हिंदू संघटनास मुसलमान नेता मिळाला नाही म्हणून त्यावर मुसलमानांचा विश्वास बसणार नाही तर मी आपणांस विचारतो की, तुमच्या खिलाफत चळवळीच्या आपत्तीलाही एकीसाठी सोसून घेणारे हजारो हिंदु निघाले असता संघटनाचा त्याच एकीसाठी पुरस्कार करणारा एकही मुसलमान नेता अजून मिळाला नाही हे तुमच्या पक्षपाताचे केवढे प्रमाण ! वास्तविक हिंदूच्या खिलाफत विषयक सहानुभूतीची फेड करण्यासाठी

तरी तुम्ही हिंदू संघटनास सहानुभूति दाखवावयास पाहिजे होती, आणि खिलाफतीत काही छपविलेले नाही म्हणता तर हिंदु संघटनात तरी काय छपविलेले आहे ? संघटनासाठी अजून आम्ही गुप्त संस्था मुळीच स्थापलेल्या नाहीत. आगाखानी मिशन व हसन निजामी मिशन व इतर संस्थातच गुप्त व उघड असे कार्यभेद आहेत हे प्रसिद्ध आहे, परंतु त्यांना उपदेश करण्याच्या ऐवजी तुम्ही हिंदु संघटनेच्या पुरस्कर्त्यांना उपदेश देण्याची एवढी कृपा कां करता ? मलबार, गुलबर्गा, कोहट....

शौकतअल्ली :–(मध्येच) कोहटला काय झाले ? कोहटला काय झाले ? हिंदूंनी आगळीक केली. गांधींना विचारा.

सावरकर :– बस्स, गांधींचे नाव तुम्ही बाजूला करा. ते हिंदु आहेत, पण मीही हिंदुच आहे. हिंदुत्वाचे हिताहित व वृत्तान्ताचे सत्यासत्य त्यांच्याप्रमाणे मलाही थोडे बहुत समजते. तेव्हा व्यक्तींचा प्रश्न बाजूस ठेवून तात्त्विक चर्चाच शक्य तेवढी करणे बरे. गांधींचे काय, मलबारमध्ये एकच हिंदु बाटला असावा असे त्यांनी सुचविले म्हणून असल्या दुधखुळ्या विधानांची चर्चा करण्यात मी वेळ घालवावा की काय ? आता वेळ फार होत आहे. एका वाक्यात समन्वय होण्यासारखा आहे. आपण खिलाफत, उलेमा इत्यादि सभा व हिंदूंना बाटविण्याची मुसलमानी मिशने ही बंद करता आहा का ? जर राष्ट्रीय एकीसाठी व राजकारणविषयक चळवळीसाठी तुम्ही मुसलमानी धर्मविषयक संघटना व संस्था बंद करीत असाल तर आम्ही हिंदुसंघटन सोडतो. तरी सोडू नये, पण राजकीय एकीसाठी सोडतो.

शौकतअल्ली :– पण हिंदूंस मुसलमानी धर्माची दीक्षा देणे हा आमचा धर्मच आहे. आज सकाळी मजकडे एक हिंदु मुलगा आला व म्हणाला की मला काल स्वप्नात देव दिसला व म्हणाला की तू मुसलमान हो, मी त्यास म्हटले चल तर ती समोर मशीद आहे, जा व मुसलमान हो. आमच्या चळवळीत यापेक्षा जास्त बलात्कार मुळीच नाही.

सावरकर :– ठीक तर बलात्कार नाही असे गृहीत धरून मी म्हणतो की हिंदु संघटनातील शुद्धीत आम्ही हेच करतो. उद्या सकाळी जर एखादा मुसलमान मजकडे आला व म्हणाला की, मला स्वप्नात देवाने सांगितले की हिंदु हो तर मी म्हणेन चल ते देऊळ आहे, हो हिंदु. ही आमची शुद्धि मग तिनेच एकी कशी काय बिघडते ? मी स्वतः असे शेकडो लोक हिंदु करून घेतले आहेत.

शौकतअल्ली :–(खवळून) ठीक आहे. तुम्ही शुद्धि करा, आम्ही बाटवीत राहू. बघू कोण जिंकतो ! अहो आम्ही मुसलमान तितके एक आहोत. आमच्यात अस्पृश्यता नाही. आम्हांत प्रांतिक भेदही मुळीच नाहीत.

सावरकर :– प्रांतिक भाव नव्हता असे म्हणू नका. दुराणी मुसलमान व मोंगल मुसलमान, दक्खनी मुसलमान व उत्तरी मुसलमान, शेख मुसलमान व सय्यद मुसलमान यांच्या भांडणांचा लाभ घेऊनच मोंगल पातशाही मराठ्यांनी उलथून पाडली. शिया व सुनी यांचे दंगे वैष्णव व शैव यांच्या दंग्यांहून हजारपट जास्त भयंकर व वारंवार होत असतात. अहंमदी मुसलमानाला गेल्याच महिन्यात सुनींनी दगडफेकीने काबुलास ठार मारले. बहावी मुसलमान तर इतर सर्व मुसलमानांस या जगी फाशीस व परलोकी नरकासच योग्य समजतात. अस्पृश्यतेसंबंधाने विचाराल तर व्यवहारात भंगी मुसलमानास पाण्यास शिवू न देणारे व मशिदीत प्रार्थनेसही बरोबर न घेणारे मुसलमान मला माहीत आहेत. त्रावणकोरात स्पृश्य खिरश्चन व अस्पृश्य खिरश्चन यांच्यात शिवाशिवीबद्दल नुकताच मोठा दंगा झाला. मौलानासाहेब, घरोघर मातीच्याच चुली आहेत, मी थोडासा मुसलमानी वाङ्मय व धर्मग्रंथांशी परिचित आहे व मी म्हणतो हे खरे नाही काय ? अहो सात कोटि मुसलमान तुम्ही म्हणता इतके संघटित व सर्व एक असते, तर मुसलमानी बादशाही आम्ही हिंदूंनी कशी बुडविली असती ? आजही इंग्रज इथे राज्य कसे करते ?

शौकतअल्ली :– तुम्हा मराठ्यांत हाच प्रांतिक अभिमान फार असल्याने हिंदुस्थानचा राष्ट्रीय प्रश्न तुम्हांला समजावून देण्यात मला मोठीच अडचण पडते. हिंदुस्थान हे एक आपले राष्ट्र असे प्रेम तुम्हांस वाटतच नाही, म्हणून हिंदुस्थानच्या हितास्तव हिंदु संघटन सोडावें असे इतर प्रांतांप्रमाणे तुम्हांस वाटत नाही व आमचे बोलणे तुम्हांस पटत नाही. पण मी तुम्हांला पुन्हा सांगतो की, सध्या तरी मुसलमानी समाजात एकी झालेली आहे व आमच्या खिलाफती, उलेमा व तानझेमच्या चळवळी एकसूत्री असल्याने मी व माझे आणखी दोघे सहकारी हे तिघे सांगू ते मुसलमान करीत आले आहेत. तेव्हा मी तुम्हांस आश्वासन देतो की आम्ही खिलाफत, तानझेममध्ये हिंदूंस अपाय होण्यासारखे काही एक घुसू देणार नाही. आमच्यावर विश्वास ठेवून तुम्ही हिंदु संघटन कां सोडीत नाही ? त्याने मुसलमान चिडतात.

सावरकर:– प्रथमतः तुम्ही महाराष्ट्रीयांवर निष्कारण दोषारोप केलात. शिवाजीमहाराजांनी जे स्वातंत्र्ययुद्ध केले ते काही केवळ महाराष्ट्राच्या तीर्थक्षेत्रांस मुक्त करण्यासाठी नसून उभ्या भरतखंडातील क्षेत्रांस मुक्त करण्यासाठीच होते. हे पहा, आम्ही स्वतः वीस वर्षांपूर्वी जो ध्वज उभारला तो केवळ महाराष्ट्राचा नसून हिंदुस्थानचा होता हे काय तुम्हांस माहीत नाही ? रानडे, गोखले, लो. टिळक ह्यांनी कोणती केवळ महाराष्ट्रीय चळवळ केली ? कोणती राष्ट्रीय चळवळ केली नाही ? अहो, गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रात ज्या काही मोठ्या चळवळी झाल्या, त्यात एकही प्रांतीय नव्हती. गेल्या पन्नास वर्षात महाराष्ट्रावर असा कोणताही विशेष आघात झालेला नाही, हे तुम्हांस ठाऊक आहे. बंगालची

फाळणी झाली. महाराष्ट्र वंगालइतकाच तिच्याविरुद्ध लढला. जालियनवाला बाग झाली, आज ज्या समितीकरिता तुम्ही येथे आला, तो बंगालचा ऑर्डिनन्स झाला, इतर प्रांतांवर पडलेल्या प्रत्येक आघाताचा त्या प्रांताच्या खांद्याशी खांदा लावून प्रतिकार करण्यातच महाराष्ट्राची गेली वीस वर्षे खर्ची पडली आहेत. हे हिंदुसंघटन देखील महाराष्ट्रास पंजाब, सिंध, बंगाल इतके अवश्य नाही. महाराष्ट्रात हिंदूंची संघटना व शक्ति पूर्वीचीच अजून थोडीबहुत उरलेली आहे. महाराष्ट्राने हे इतर प्रांतांवर उपकार केलेले नाहीत. आम्ही दोन आहोत असे आम्हांस वाटतच नाही, त्यांचे दुःख आम्हांस आमचेच वाटते. पण तरीही हिंदुस्थानच्या एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा प्रभाव व संगोपन ज्या महाराष्ट्रात प्रामुख्याने झाले, त्याच महाराष्ट्रास राष्ट्रैक्याचा शत्रु म्हणणे व तेही आजपर्यंत राष्ट्रीयसभेसारख्या संस्थेचाही द्वेष करणाऱ्या व जातवार प्रतिनिधित्वासाठी अजूनही हपापलेल्या मुसलमानांनी म्हणणे केवळ कृतघ्नपणा होय. दुसरे तुम्ही म्हणालात की, तुम्ही सर्व मुसलमानांचे पुढारी आहा व तुमच्या शब्दाबाहेर ते कधीही गेले नाहीत, जात नाहीत; तर मग मला सांगा की मलबारचे बंड, गुलबर्ग्याचा दंगा, कोहटचा दंगा, खुद्द दिल्लीचा दंगा व हिंदूंच्या देवालयावर आणि स्त्रियांवर झालेले बलात्कार हे तुमच्या संमतीनेच झालेले होते काय ? असतील तर तुम्ही एकीची ही दाखविलेली कळकळ हिंदु संघटनास मारण्यासाठी आलेली एक पुतनाच म्हणावयाची ! जर हे दंगे तुमच्या आज्ञेने झालेले नसतील तर एवढाले अत्याचार हिंदूंवर जो समाज तुमच्या आज्ञेविना करतो तो समाज तुमच्या आज्ञेत आहे हे म्हणणे फोल ठरते व म्हणून त्या समाजाच्या वर्तनाविषयी तुमच्या शब्दांच्या हमीवर अवलंबून रहाणे शक्य नाही.

शौकतअल्ली :- अहो, पण तेव्हा आम्हांस तुरुंगात टाकल्याने मुसलमान समाज विस्कळीत झाला व अत्याचार सुरू झाला.

सावरकर :- तरी काय ! एक तर गुलबर्गा, कोहट व प्रत्यक्ष दिल्लीच्या वेळेस आपण तुरुंगात नव्हतेत व दुसरे असे की, असता तरीही जर तुम्हांस क्षणभर दूर सारताच हिंदूंवर असले भयंकर अत्याचार करणाऱ्या प्रवृत्ति ज्या मुसलमानी समाजातील लाखो जणांच्या मनात वावरत आहेत, त्या समाजाच्या मैत्रीवर तुमच्या व्यक्तीच्या हमीस घेऊन ती हमी प्रामाणिक असली तरी हिंदूंनी अवलंबून कसे रहावे ? उद्या तुम्ही किंवा मी मरून जाऊ; म्हणजे पुन्हा त्याच मुसलमानी समाजाशी याच हिंदु समाजाची गाठ पडणार ना ? छे छे, हा समाजाचा प्रश्न आहे व म्हणून हिंदूंच्या संरक्षणास व शक्तिवर्धनास उत्तम मार्ग म्हणजे कोणा व्यक्तीची हमी वा समाजाची दया ही नसून, त्याचे सामाजिक प्रचंड संघटन हे होय. हिंदु संघटन हे जोवर अन्याय्य आघातासाठी नाही, – तसे असेल तर ते एकीविरुद्ध म्हणता येईल – ते स्वसंरक्षणासाठी व आघाताच्या निवारणासाठीच आहे, तोवर

त्याची कोणत्याही समाजाच्या न्याय्य आकांक्षांस आडकाठी येणार नाही. जोवर हसन निजामी, आगाखानी, खिलाफती व मुसलमानांच्या इतर धार्मिक चळवळी चाललेल्या आहेत, त्यांचे आघातक कार्यक्रमही मुसलमान समाज बंद करू इच्छीत नाही, हजारो हिंदूंस प्रतिवर्षी प्रसिद्धपणे व गुप्तपणे बाटविण्यात येत आहे, कोटी कोटी हिंदूंस आम्ही दहापाच वर्षांत बाटवून सोडू म्हणून उर्दू पत्रांतून धडाधड प्रतिज्ञा केल्या जात आहेत, व बलात्काराने‌ही शेकडो हिंदूंस मुसलमानी धर्मात खेचले जात आहे, तोवर ती मुसलमानी संघटने बंद करण्याचा त्यांना उपदेश करण्याचे सोडून हिंदूंस मात्र प्रत्याघातापुरते देखील संघटन करू नका, त्याने राष्ट्रीय एकी बिघडेल म्हणून उपदेश देणे म्हणजे पक्षपाताची व दांभिकपणाची पराकाष्ठा होय, असे जर कोणा हिंदूस वाटले तर ते क्षम्य नव्हे काय ? म्हणून मुसलमानांची बाटविण्याची संघटने बंद करा म्हणजे हिंदूंची शुद्धीची संघटने आपोआप शिथिल होतील.

शौकतअल्ली– पण तुम्ही संघटनाच्या चळवळीने मुसलमानांची मने जास्त कलुषित करता. मुसलमान हिंदूंना पूर्वीपासूनच बाटवीत होते. पण तुम्ही शुद्धि नवीन कां सुरू केलीत ? तेव्हा ती मुसलमानांच्याच विरुद्ध आहे हे सिद्ध होत नाही काय ?

सावरकर :–अर्थात्. पण हा कोणाचा दोष ? आजपर्यंत आपण दुसऱ्या धर्मातील कोणत्याही मनुष्यास धर्मान्तरास प्रवृत्त करू नये, इतकेच नव्हे तर कोणी स्वधर्मीयांना आपणांतून बलात्काराने खेचून नेले, तरी तिकडेही कानाडोळा करावा इतकी सहनशील वृत्ति ज्या हिंदू समाजाने दाखविली त्यालाच आज ही शुद्धि हाती घ्यावी लागत आहे हा कोणाचा दोष? आजपर्यंत विश्वासाने आम्ही आमचे घर उघडे टाकीत आलो, पण इतर जणांनी जेव्हा त्या उदारपणाचा अनुदार लाभ घेऊन आमच्या घरात दिवसा ढवळ्या दरवडे घालण्याचा धुमाकूळ मांडिला, तेव्हा आज आम्ही आमच्या घरास कुलूप ठोकण्याचे ठरविले. आता ते चोरच येऊन म्हणतात, अहो चोरी तर आम्ही पूर्वीपासूनच करीत आहो, पण तुम्ही कुलूप कां नवीन घातलेत ? अर्थात् हे आमच्याच विरुद्ध आहे, याने एकी बिघडणार तर त्याला आम्ही हेच उत्तर देणार की, असली घातकी एकी सुखेनैव बिघडो. तुझे ते माझे व माझे ते माझे आहेच अशी एकी लवकर बिघडेल तितकी चांगलीच. दुसरे असे की, ख्रिश्चन, पार्शी, यहुदी व इतर अनेक धर्मीय लोक आहेत. तेही त्यांची संघटने करतात. परंतु त्यांपैकी कोणाच्याही डोळ्यांत हिंदु संघटन इतके मुळीच सलत नाही. मग ते मुसलमानांच्याच डोळ्यांत इतके कां सलावे ? अर्थात् मुसलमानांच्याच काही राजकीय धार्मिक दुराकांक्षांचा धंदा बुडतो, म्हणूनच त्यास ते बघवत नाही. म्हणूनच मी तुम्हांस अनेक वेळा विचारले की तुम्ही तुमची मुसलमानी

संघटने सोडता का ? पण त्या प्रश्नाचे उत्तर देण्याची तुम्ही एकसारखी टाळाटाळ करीत आहा.

शौकतअल्ली :- (खवळून) आम्ही मुसलमानी संघटन सोडणार नाही. त्यात हिंदूंच्या विरुद्ध काही नाही.

सावरकर :- तर मग आम्हीही हिंदु संघटन सोडणार नाही. त्यात मुसलमानांच्याच काय, पण ख्रिस्ती, पार्शी, यहुदी इत्यादि आमच्या कोणत्याही देशबंधूविरुद्ध काहीही हेतु नाही. मी आपणांस थोडक्यात सांगतो. हिंदु संघटन तुम्हांसही संघटन करण्याचा अधिकार आहे असे मानते. मात्र तुम्ही आघातक हेतु ठेवू नये. आम्हीही ठेवीत नाही. अस्पृश्यता काढून टाकणे, ख्रिस्ती, मुसलमान व जगातील इतर सर्व धर्म आपणांस सत्य वाटते त्याचा जसा प्रसार करतात, तसाच आपणांस सत्यधर्म वाटतो त्याचा आपणही प्रचार करणे, इतर धर्म वेळेवर लाठीच्या कोटिक्रमानेही तो प्रचार करतात, तरीही तसा आपण न करता केवळ उपदेशाने तो प्रचार करणे व स्वतःच्या केवळ संरक्षणाकरिता स्वयंसैनिक दले उत्पन्न करून आपल्या समाजाचे व राष्ट्राचे रक्षण व सेवा करणे आणि अशा रीतीने आपल्या हिंदु समाजाची सर्वांगीण उन्नति करून त्याच्या सर्व मानुषकांच्या उन्नतीस्तव झटणे हेच हिंदु संघटनाचे उद्दिष्ट आहे. धर्म-देश-राष्ट्र-निर्विशेष मनुष्यमात्राच्या हातात हात घालून एका परमेश्वराच्या एकाच देवालयात, एकाच भाषेत, एकच पवित्र प्रार्थना करून एकाच सत्याच्या जयासाठी अखिल मानुषकाने झटावे हेच हिंदु संघटनाचे अनन्य ध्येय आहे.

बरे आता वेळ फार झाला. आपण परस्पर विचारविनिमय शक्यतोवर केला. आता उठण्याची अनुज्ञा असावी. रामराम! सलाम! असे म्हणत आम्ही परस्परांचा निरोप घेतला."

हिंदुसभेविरुद्ध मुसलमान नेते कशी आग पाखडीत होते हे यावरून दिसून येईल. त्यामुळे हिंदुसभा सामजिक, धार्मिक व राजकीयही संस्था समजली जाऊ लागली. या वेळेपर्यंत हिंदुमहासभेची अनेक अधिवेशने काँग्रेसच्या अधिवेशनाबरोबर व काँग्रेसच्याच मंडपात होत; पण १९२५ पासून ही परिस्थिति बदलली. मुसलमानांच्या जातीय मतदार संघाच्या मागणीला हिंदुसभेचा विरोध वाढत गेला. १९३७ पर्यंत हिंदुसभेचे अनेक पुढारी काँग्रेसमध्ये नेतृत्व करीत होते; पण १९३७च्या निवडणुकीनंतर काँग्रेसने स्वतंत्रपणे निवडणुका लढविणाऱ्या इतर पक्षांना आपली दारे बंद केली व तेव्हापासून हिंदुसभेचा काँग्रेसशी संबंध संपला.

*

(४)

सामाजिक सुधारणेचे कार्य

सन १९२० नंतरची पंचवीस वर्षे हिंदुस्थानात अतिशय खळबळीची गेली. गांधींनी मुसलमानांना आपल्या बाजूला खेचण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले व कमालीची पड स्वीकारली. पण सत्तेचा भाग इंग्रजांच्या हाती होता. तिचे वाटप करण्याचे हुकमी पत्तेही त्यांच्याच हाती होते. त्यामुळे गांधींचे त्यांच्यापुढे काही चालले नाही. ब्रिटिश राजपुत्र हिंदुस्थानात १९२१ साली आले असता त्यांजवर काँग्रेसने बहिष्कार पुकारला होता. त्या वेळी लॉर्ड रीडिंग हे व्हाइसराय होते. ही बहिष्काराची चळवळ इंग्रजांना फार बोचली. काँग्रेसने राजपुत्रावर बहिष्कार घालू नये म्हणून त्यांनी बरेच प्रयत्न केले. तडजोडीची इच्छा व्यक्त केली. सर्व प्रकारची प्रांतिक स्वायत्तता देण्याची तयारीही ब्रिटिश प्रधानमंडळाने दाखविली. अनेक उभयान्वयी पुढारी मध्यस्थी घातले. मुंबईस सर्वपक्षीय सभाही बोलावण्यात आली. सर शंकरन् नायर हे तिचे अध्यक्ष होते. या वेळी मौ. महंमदअल्ली व शौकतअल्ली हे कराची येथील तुरुंगात राजद्रोहाच्या आरोपाखाली शिक्षा भोगीत होते. खिलाफत प्रकरणी व अफगाणच्या राजाला भारतावर स्वारी करण्यास बोलावले इत्यादी कारणांवरून त्यांना शिक्षा झालेली होती. त्यांची सुटका करण्यास ब्रिटिश सरकार तयार नव्हते व त्यांची सुटका झाल्याशिवाय व त्यांना वाटाघाटीत समाविष्ट केल्याशिवाय गांधी तडजोडीच्या वाटाघाटीस बसण्यासही तयार नव्हते! अखेर वाटाघाटीचा व्यूह फिसकटला.

बारडोलीच्या सत्याग्रहाचे सूप वाजल्यानंतर गांधींवर सरकारने राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरला, त्यात त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. इंग्रजांनी इतर मुस्लिम लीगवाल्या मुसलमान पुढाऱ्यांशी जुळते घेऊन इंग्रज व मुसलमान यांची पुन्हा गट्टी घडवून आणली. खिलाफत प्रकरणी झालेली काँग्रेस व मुसलमान यांची युति इंग्रजांनी फोडली. तिकडे तुर्कस्तानने‌ही खलिफाला पदच्युत करून नवा अध्यक्ष निवडल्याने खिलाफत प्रकरण मुळातच संपले होते.

मुसलमानी दंगे

इस्लामी सत्ता स्थापण्याकरिता मुसलमानांनी हिंदूंवर राजकीय दडपण आणण्यासाठी ठिकठिकाणी दंगे निर्माण केले. मोपल्यांचे बंड हे त्यातले सर्वांत मोठे होते. तथापि त्याशिवाय जबलपूर, प्रयाग, लखनौ, शहाजहानपूर, गुलबर्गा, मुंबई, दिल्ली कोहट, आकोला, नागपूर, इत्यादि अनेक ठिकाणी मुसलमानांनी दंगे केले. मशिदीवरून सवाद्य मिरवणुका नेण्याच्या हिंदूंच्या हक्कावर आक्रमण व गाई कापण्याचा

धडाका ही दंग्यांची सामान्य कारणे असत. हसन निजामी, मौ. अबदुल बारी, यांनी पत्रके व पुस्तिका यांच्या द्वारे व मशिदीमशिदीतून हिंदूविरुद्ध दंग्यांना चेतावणी व उठावणी दिली. हसन निजामीने लिहिलेल्या उर्दू पुस्तकाचा हिंदी अनुवाद 'खतरेका घंटा' या नावाने १९२३ वर्षी स्वामी श्रद्धानंदांनी प्रसिद्ध केला व मुसलमानांनी हिंदूविरुद्ध केवढे षड्यंत्र रचले आहे याची लोकांना कल्पना आणून दिली. त्या पुस्तकाचे मराठी भाषान्तरही त्या वेळी "भयसूचक घंटा" या नावाने प्रसिद्ध झाले. हिंदूंना मोठ्या प्रमाणावर बाटविण्यासाठी वेश्यांचाही उपयोग करणे, लालूच दाखविणे, पैसे पेरणे, कर्जे देणे, फसवणूक करणे, मुली पळवणे, इत्यादि अनैतिक मार्गांचाही मुसलमान नेते पुरस्कार करीत होते व धर्मप्रचारासाठी हे सर्व धर्म्य मानीत होते ! त्यांचे हिडीस प्रकार हिंदुसभांनी व हिंदुत्वनिष्ठांनी उघडकीस आणले व हिंदुसंघटन व शुद्धिकार्य आरंभिले. त्यामुळे हिंदुस्थानभर हिंदुमुसलमान वाद वाढीस लागला.

स्वामी श्रद्धानंद व पं. मालवीय हे दोघे हिंदु पुढारी मुसलमानांच्या डोळ्यांत फार खुपत होते. मालवीयांचा भर हिंदुसंघटनावर विशेष होता. हिंदु समाजात अंतर्गत सुधारणा घडवून आणण्यासाठी ते विशेष प्रयत्नशील होते तर स्वामी श्रद्धानंदानी शुद्धिकार्याला वाहून घेतले. त्यांनी मलकाना रजपूत जे पूर्वीच्या काळात मुसलमान झालेले होते त्या सुमारे वीस लाख लोकांच्या शुद्धीचे कार्य १९२३ वर्षी हाती घेतले. त्यामुळे मुसलमान मुल्ला मौलवी अगदी गडबडून गेले होते. पन्नास लाख हिंदूंना बाटविण्याच्या त्यांनी प्रतिज्ञा केल्या. (खतरेका घंटा पृ. ४) त्यासाठी सर्व प्रकारच्या अनैतिक मार्गांचाही अवलंब करण्यावर त्यांचा विशेष भर असे. तथापि त्यांच्या प्रयत्नांस विशेष यश आले नाही. स्वामीजींनी मलकाना रजपुतांचे सामुदायिक शुद्धीकरण हाती घेतले व तडाखेबंद शुद्धीकरणे होऊ लागली. त्यामुळे मुसलमान विलक्षण चिडले व त्यांच्यापैकी अबदुल रशीद नावाच्या मुसलमानाने दि. २३ डिसेंबर १९२६ ला स्वामीजींशी धर्मविषयी चर्चा करावयाची आहे असा बहाणा करून त्यांच्या घरात प्रवेश केला व स्वामीजींना गोळ्या घालून ठार केले. ह्या सर्व घटनांचा इतर ठिकाणांप्रमाणे महाराष्ट्रावरही विलक्षण परिणाम होत होता.

या दंग्यांचे स्वरूप दिसण्यात जातीय असले तरी ते मुळात राजकीय होते. मुसलमानांना संतुष्ट करण्याकरिता काँग्रेसने १९२७ मध्ये ऐक्य परिषदा भरविल्या. त्यांत तडजोडीसाठी प्रयत्न करण्यात आला. पण त्यांचा काही उपयोग झाला नाही. शेवटी काँग्रेसने शरणागति पत्करली व मुसलमानांच्या अनिर्बंध मागण्यांना वाट करून दिली. मुसलमानांच्या मागण्यांच्या संबंधात काँग्रेसने आपल्या ठरावात असे स्पष्टच केले की This Congress assures the Muslims and other minorities that no solution thereof in any future Constitution

will be acceptable to the Congress that does not give full satisfaction to the parties concerned. (मुसलमानांना व इतर अल्पसंख्याकांनाही काँग्रेस असे आश्वासन देते की, हिंदुस्थानच्या यापुढील कोणत्याही राज्यघटनेच्या संबंधात त्यांना पूर्ण समाधान होणार नाही असे काँग्रेस काही मान्य करणार नाही.)

काँग्रेसच्या या धोरणातच फाळणीचे बीज रुजले होते व आजही इंदिरा-गांधींनी शेख अबदुल्लाला घटनेच्या ३७० व्या कलमाला कायम स्वरूप देण्याचे आश्वासन देऊन काश्मीरच्या फाळणीचे बीज रुजू घातले आहे.

महाराष्ट्रात ब्राह्मणेतर वाद

महाराष्ट्रात हिंदुमुसलमान वादाच्या जोडीला ब्राह्मणेतर वाद या काळात कळसास पोहोचला होता. या वादाचे स्वरूप दुहेरी होते. विजयी मराठा पत्राचे संपादक श्री. श्रीपतराव शिंदे किंवा दीनबंधु पत्राचे डॉ. नवले यांनी मराठा समाजाला विधायक वळण लावण्याचे प्रयत्न केले. पण त्यांचा तरुण सत्यशोधकांवर प्रभाव पडला नाही. वैचारिक क्षेत्रात ते ज्योतिबा फुले यांचे स्वतःस अनुयायी म्हणवीत; पण प्रत्यक्ष व्यवहारात ब्राह्मणांवर बहिष्कार घालण्यापासून त्यांच्या विरुद्ध जे जे म्हणून हत्यार वापरता येईल ते ते वापरण्यास त्यांचा पुढाकार असे. खेडेगावात त्या काळी ब्राह्मणांची थोडीफार वस्ती असे. काही शेतीचा व्यवसाय, काही धंदा, व कोणी पेंशने घेऊन खेड्यात जाऊन राहात. त्यावर त्यांची गुजराण चाले. पण ब्राह्मणेतरांनी तमाशाचे फड उभारले व ब्राह्मणांविरुद्ध वातावरण पेटविण्यास सुरवात केली. ब्राह्मणांच्या शेतजमिनी पाडून ठेवल्या किंवा कोणी पिकविल्या तर उभी पिकेच कापून नेली जात. खेडेगावातून ब्राह्मण वस्ती चारदोन घरे एवढीच असे. त्यांना तेथे राहणे अशक्य झाल्याने ते परागंदा झाले व अन्य मोठ्या गावी वस्तीस गेले. शेतीचे उत्पन्न बुडाल्यासारखेच होते. ते पुढे कूळकायद्याखाली साफ झाले.

पुण्यात ब्राह्मणेतर चळवळीचा विशेष जोर होता. १९२४ साली गणेशोत्सवात ब्राह्मणेतरांचा 'छत्रपति मेळा' निघाला. त्याचे पालूपदच 'आला छत्रपति मेळा, पळा भटांनो पळा पळा' असे होते. जेधे व जवळकर हे या चळवळीचे मुख्य पुरस्कर्ते होते. त्यांनी "देशाचे दुष्मन" या नावाचे एक गलिच्छ पुस्तक १९२४ वर्षी प्रसिद्ध केले. त्यात विष्णुशास्त्री चिपळूणकर व लो. टिळक यांना अर्वाच्य शिव्यांची लाखोली वाहिली आहे. ब्राह्मणेतरांना ब्राह्मण आपल्यापेक्षा कमी समजतात या एका न्यूनगंडातून या चळवळीची निर्मिति व वाढ झाली होती. तथापि या सत्यशोधकी मंडळीचा तोल पुढे पुढे इतका गेला की त्यांनी देवाधर्माच्या बाबतीतही हवी तशी नालस्ती सुरू केली. विटाळशीच्या पोटचा विठोबा अशासारखी भाषाही प्रचारात आणली गेली! तेव्हा धर्मावर श्रद्धा असणारा मराठा समाजही खवळून उठला. श्री. नारायणराव

गुंजाळ, बाबूराव फुले, गणपतराव नलावडे, प्रभृति मंडळींनी त्याविरुद्ध आवाज उठविला. छत्रपति मेळ्याच्या तोडीस तोड 'तरुण मराठा मेळा' उभा राहिला व बोलावले नसताही, किंबहुना येऊ नका म्हणून कळविले असताही गणेशोत्सवात छत्रपति मेळा जेव्हा गायकवाड वाड्यात घुसला तेव्हा तेथे मारामारीच झाली. शाळेतून आपल्या घरी परत जाणाऱ्या एका ब्राह्मण मुलीला एका ब्राह्मणेतर बलदंडाने मागून येऊन सरळ उचलून आपल्या घरात चालविले असता ते पाहणाऱ्या एका तरुण ब्राह्मणाने त्याचा पाठलाग करून त्यास बडविले व मुलीची सुटका करून तिला आपल्या घरी सुरक्षित पोहोचविले.

गोष्टी इतक्या थरावर आल्या होत्या. या सर्व प्रकरणी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची ब्राह्मणांविरुद्ध चळवळ करण्याची खुमखुम व इंग्रजांची चिथावणी होती व गुंडगिरीला सर्रास उत्तेजन मिळत होते.

हिंदुसभेपुढील कार्यक्षेत्र

या पार्श्वभूमीवर हिंदुसभेला काम करावयाचे होते. म्हणून १९२४ नंतरच्या चार पाच वर्षांत हिंदुसभेने जी कामे हाती घेतली त्यांत (१) ब्राह्मणेतर वादाला विधायक वळण लावणे व समाजात विचारक्रांति घडवून आणणे, (२) ब्राह्मण समाजाच्या कालबाह्य झालेल्या विचारांत बदल घडवून आणणे, (३) शुद्धिकार्याला शास्त्रीपंडितांची संमति मिळविणे, शुद्धीकरणाला प्रोत्साहन देणे व त्या कामी येणाऱ्या अडचणींचा निरास करणे, (४) अस्पृश्यता निवारण करणे, त्यासाठी त्यांच्यात शिक्षणाचा प्रचार, स्वच्छतेची मोहीम, व वैचारिक जागृति घडवून आणणे ही कामे मुख्य होती.

१९२४ वर्षी हिंदुसभेने पुण्यास श्रीमंत लक्ष्मणराव राजे भोसले, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुधर्म परिषदेचे चौथे अधिवेशन भरविले. शंकराचार्य डॉ. कूर्तकोटि यांच्या नेतृत्वाखाली या परिषदांचे कार्य चालू होते. श्री. नारायणराव गुंजाळ हे या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. या अधिवेशनात पूर्वास्पृष्टासह सर्व हिंदु सरमिसळ बसले होते व या अधिवेशनात अस्पृश्यता मानू नये या संबंधाने प्रस्तावही संमत झाले. त्याला सनातनी पंडितांनीही आपला पाठिंबा दिला. १९२४ च्या डिसेंबरात बेळगाव येथे काँग्रेसचे अधिवेशन गांधीजींच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या वेळी तेथे मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुमहासभेचेही एक अधिवेशन झाले होते. त्यानंतर १९२५ मध्ये मुंबईस प्रांतिक हिंदुसभेचे एक अधिवेशन भरविण्यात आले. आणि श्री. वामनराव नाईक यांच्या पुरस्काराने हैद्राबाद येथे एक विद्वत् परिषद भरविण्यात आली. या सर्व परिषदांचा उद्देश समाजात विचारक्रांति घडवून आणणे हा होता. हैदराबाद येथे शास्त्री पंडितांच्या विद्वत् परिषदेत संमत

झालेले प्रस्ताव लक्षात घेतले म्हणजे त्या वेळचे वादग्रस्त प्रश्न कोणते होते व त्यांची उकल कशी केली जात होती हे लक्षात येईल. त्यापैकी कांही महत्त्वाचे प्रस्ताव असे होते :

(१) क्षत्रिय व वैश्य यांचे वर्तमानकाळीही अस्तित्व आहे हे शास्त्रसिद्ध आहे. ज्या क्षत्रिय व वैश्य घराण्यांत संस्कारलोप झाला असेल त्यांनी इच्छा व्यक्त केल्यास त्यांस संस्कारलोपाबद्दल प्रायश्चित्त देऊन त्यांच्या येथे ब्राह्मणांनी वेदोक्त पद्धतीने धर्मकृत्ये करण्यास हरकत नाही.

(२) फसगत, जुलूम जबरदस्ती, छद्म, अपकृत्य व तत्सदृश कारणांनी वस्तुतः धर्मान्तर होतच नाही असे शास्त्राचे मत आहे. ज्यांच्यावर अशी आपत्ति आली असेल त्यांना ती आपत्ति दूर होताच घडलेल्या संसर्गदोषाबद्दल यथाशास्त्र प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होता येते.

(३) ज्या धर्मभ्रष्ट लोकांना परत हिंदु होण्याची इच्छा असेल व ज्यांना त्यांच्या जातीच्या लोकांनी आपल्यात मिसळून न घेतल्यास ज्यांची स्वतंत्रपणे नांदण्याची कबुली असेल त्यांना प्रायश्चित्तपूर्वक शुद्ध करून घ्यावे.

(४) हिंदुधर्मशास्त्रात अस्पृश्यता विषयक वचने आढळत असली तरी त्याला अपवादात्मक वचनेही आढळतात. त्या अपवादात्मक वचनांचा हेतु लक्षात घेऊन तदनुसार आणि सद्यःकालीन देशकालस्थिति लक्षात घेऊन हिंदुधर्मातील अस्पृश्यता दूर करावी असे या परिषदेचे मत आहे. त्या दृष्टीने

(अ) ज्या ठिकाणी (सार्वजनिक) पाणवठ्यावर हिंद्वेतर लोकांस सुद्धा अप्रतिबंध रीत्या पाणी भरता येते अशा ठिकाणी आपल्यातीलच काही हिंदूंना पाणी भरण्यास प्रतिबंध असावा हे या परिषदेस मान्य नाही.

(आ) ही परिषद सर्व हिंदूंना अशी शिफारस करीत आहे की त्यांनी अस्पृश्य मानल्या गेलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी परधर्मीयांपेक्षा जवळच्या अशा या वर्गाशी अधिक आपलेपणाने वागावे व त्यांच्या शिक्षणाची व आरोग्याची सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा.

हे प्रस्ताव त्या काळात प्रदीर्घ चर्चेनंतर पण शेवटी सर्वसंमत झाले. यावरून त्या काळातील सामाजिक विचारांच्या अवस्थेचे स्वरूप लक्षात येते. अस्पृश्य म्हणजे स्पर्श करण्यास अयोग्य हा शब्द काही जातींना लावणे अयोग्य ठरवून प्रा. बापूसाहेब माटे यांनी त्यांच्या संबंधात 'अस्पृष्ट' जाती असा उल्लेख करण्याचा प्रघात पाडला. अस्पृश्य जाती म्हणजे पूर्वी ज्यांना शिवत नसत पण आता तशी स्थिति राहिलेली नाही म्हणून पूर्वास्पृश्य किंवा अस्पृष्ट समजल्या जाणाऱ्या जाती असा उल्लेख त्यांनी "अस्पृष्टांचा प्रश्न" या आपल्या पुस्तकात केला आहे. अलीकडे त्यांचा उल्लेख दलित वर्ग असाही केला जातो. महाराष्ट्रात महार, मांग, चांभार, ढोर, धेड व भंगी या जाती अस्पृष्ट समजल्या जात. त्याही एकमेकांस अस्पृष्ट

समजत असत ! त्यांचे मुख्य प्रश्न (१) शिक्षण (२) स्वच्छ राहणी (३) व्यवसायाची सोय (४) पाण्याचा प्रश्न व (५) मंदिर प्रवेश हे होते. यांपैकी पाण्याचा व मंदिर प्रवेशाचा प्रश्न हे सामाजिक स्वरूपाचे होते व त्या बाबतीत बरेच वाद व खटकेही झाले. तथापि त्या संबंधाने हिंदुसभेने बराच प्रचारही केला. या प्रचाराने समाजात वैचारिक क्रांति घडवून आणली तर प्रत्यक्षात मोठ्या शहरांत सामान्यतः रेल्वेने व विशेषतः मुंबईच्या लोकल गाड्यांनीं घडविली. आता अस्पृश्यता नष्ट करणे, जातिभेद मोडणे, चातुर्वर्ण्य न मानणे इत्यादि सर्व विषय वेगवेगळे असूनही काही लोक त्यांची गल्लत करतात. त्यामुळे काही वाद अकारण निर्माण होतात व त्यांतून गैरसमज पसरतात. तात्त्विक दृष्ट्या, कायद्याने व सर्वसामान्य सामाजिक जीवनातून आता अस्पृश्यतेचे उच्चाटन झालेच आहे.

दंग्यांसंबंधाने धोरण

एकीकडे शुद्धीकरण व्यक्तिगत व सामुदायिक स्वरूपात घडवून आणण्यासाठी हिंदुसभेचे प्रयत्न चालू असतानाच राजकारणात हिंदुमुसलमानांच्या दंग्यांना ऊत आला होता. गांधीची १९२४ वर्षी फेब्रुवारीस मुक्तता झाली होती व त्यांच्या डोळ्यांसमोर हे दंगे घडत होते. दंग्यांची आगळीक प्रत्येक वेळी मुसलमानांनी करावी, इंग्रजांनी त्यांना फूस व चिथावणी द्यावी व आक्रमकांचा प्रतिकार हिंदु करू लागतात न लागतात तोच सरकारने १४४ कलमाचा अंमल जारी करून हिंदूंना प्रतिकार करण्याची संधिच मिळू देऊ नये असे वारंवार होत असे. त्यामुळे हिंदु समाज दुबळा व नामर्द आहे व तो मुसलमानी गुंडगिरीचा प्रतिकार करण्यासच असमर्थ आहे असा या सर्व वस्तुस्थितीमुळे विपर्यास केला जाई व त्यामुळे हिंदु समाजातही विफलतेची भावना वाढीस लागे. त्यातूनही ते कोठे कोठे प्रतिकार करीत तर गांधीजी त्यांनाच शांततेचा व अहिंसेचा उपदेश करीत ! दिल्लीस दंगा झाला तेव्हा हिंदूंनी प्रतिकार करताच गांधींनी २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. गांधींची ही उपदेशकाची भूमिका हिंदुसभेला मान्य नव्हती. म्हणून पुणे हिंदुसभेने एक पत्रक काढून गांधीजींना प्रश्न विचारले व खुलासा करण्याची विनंती केली ते पत्रक सर्व वर्तमानपत्रांतून प्रसिद्धीस देण्यात आले व त्याच्या प्रती सर्वत्र वाटण्यात आल्या. ते पत्रक (केसरी दि. २३।९।१९२४) पुढीलप्रमाणे होते :

गांधीजींना प्रश्न

" १ अलीकडे मुसलमान लोक काही तरी खुसपट काढून हिंदूंवर अत्याचार करणे, हिंदु स्त्रिया भ्रष्ट करणे, देवळे फोडणे, असले प्रकार करीत आहेत. तेव्हा अशा प्रसंगी हिंदूंनी काय करावे असा आपण सल्ला देता !

" २ आत्मिक बळावर विसंबावे तर दंगे करणाऱ्या गुंडांना आत्मिक बळ ही काय चीज आहे हे कळत सुद्धा नाही. उलट दुसऱ्यास भ्याड समजून ते अधिकच पाठीमागे लागतात. अशा प्रसंगी त्यांना जरब बसवून त्यांचे लक्ष सामोपचारांकडे वळविणे जरूर असते. तरी अशा प्रसंगी अशा गुंडांचा प्रतिकार करणे योग्य व न्यायाचे आहे असे आपणांस वाटत नाही काय ?

" ३ हिंदु समाज जात्याच सहनशील असूनही जो तो त्यालाच सहनशीलतेचे धडे देत सुटतो ! पण ज्या मुसलमानांना सहनशीलतेचा गंधही नसतो त्यांना सहनशीलतेने वागण्याचा उपदेश करण्याची चळवळ आपण हाती घ्याल काय ?

" ४ मुसलमानांना राष्ट्रापेक्षा धर्म अधिक वाटतो. धर्माच्या नावाखाली ते देशहिताला डावलून हिंदूंवर हल्ला करण्याचा प्रसंग साधतात. हिंदु चालीरीतींना विरुद्ध अशा चाली तेवढ्या नेमक्या पाळण्याकडे मुसलमानांचे लक्ष अधिक असते असे आपणांस वाटत नाही काय ?

" ५ आपण व आपल्याबरोबर सर्व हिंदु समाजाने खिलाफतीला मनोभावे अशाकरिता साहाय्य केले की त्यांच्यात हिंदुस्थानविषयक राष्ट्रीय अभिमान उत्पन्न व्हावा. तो झाला आहे असे आपणांस वाटते काय ?

" ६ अस्पृश्यतेचा प्रश्न हा केवळ हिंदु समाजाचाच प्रश्न असूनही ज्या संस्थेत हिंद्वेतर समाज आहेत अशी काँग्रेस त्या प्रश्नासंबंधाने ठराव करते. हिंद्वेतर समाजास अशा रीतीने हिंदुसमाजात हात घालू देणे आपणांस इष्ट वाटते काय ? व जर काँग्रेस धार्मिक, सामाजिक प्रश्नांचाही विचार करणार असेल तर मुसलमान समाजातील अनेक घाणेरड्या पद्धति नाहीशा करण्याचा तिने प्रयत्न कां करू नये ?

" ७ येथील समाजात इतकी बेदिली माजण्याचे मूळ कारण जातवार प्रतिनिधित्व होय. ते मुळातच उखडून टाकण्याचा प्रयत्न आपण कां करीत नाही ? बेळगाव काँग्रेसमध्ये (गांधी काँग्रेसच्या १९२४ च्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते) आपण हा प्रयत्न कराल काय ?

" ८ दिल्लीच्या ख्वाजा हसन निजामीनी तुम्हांस मुसलमान होता काय म्हणून उपमर्दकारक प्रश्न विचारून तुम्हांस व सर्व हिंदु बांधवास दुखविले आहे. हसन निजामी यास निजामाकडून तनखा मिळत असून ना. आगाखान व अनेक मुसलमानी संस्था यांच्या बळावर व अनेक मुल्ला मौलवींच्या मदतीने तो हिंदूंस बाटविण्याचा संघटित प्रयत्न करीत आहे. अशा प्रसंगी मुसलमानांच्या या कृत्याचा आपण जाहीरपणे निषेध कां करीत नाही ? व हिंदु समाजाच्या संरक्षणार्थ हिंदुसंघटनेस मदत कां करीत नाही ? "

या पत्रकाला गांधीजी उत्तर देणार नाहीत हे अपेक्षितच होते. या संबंधात लोकमत जागृत करणें हाच त्यामागील उद्देश होता.

शुद्धीकरणाचे कार्य

पुण्यास १९२३ वर्षीच शुद्धीकरणाचे कार्य सुरू झाले होते. त्या वेळी मुसलमान केल्या गेलेल्या सुमारे ७५ मांग मंडळींना परत हिंदुधर्मात घेण्यात आले. काही खोजा लोकांनी त्यांना पैसे देऊन मशिदीत नेऊन बाटविले होते. पण त्यांचे लगेच शुद्धीकरण झाले. १९२३–२४ वर्षी आणखीही चार दोन व्यक्तिगत शुद्धीकरणे झाली. १९२५ सालच्या आरंभापासून पुण्यास शुद्धीकरणाचे कार्य हिंदुसभेच्या वतीने होऊ लागले ते आज मितीसही तसेच चालू आहे. १९२५ सालात पुण्यास वैयक्तिक शुद्धीकरणे अशी बारा झाली असल्याचे पुणे हिंदुसभेच्या वृत्तान्तात नमूद आहे. त्यात ब्राह्मण, लिंगायत, मराठा, हलवाई, गुरव इत्यादि मूळ जातीतील लोक होते. ते स्वतःच ख्रिश्चन किंवा मुसलमान झालेले होते. त्यांना परत हिंदुधर्मात व त्यांच्या त्यांच्या मूळ जातीत घेण्यात आले. मात्र त्यांच्या जातीत समाविष्ट होण्यासाठी बराच प्रयत्न करावा लागला.

जेथे गटच्या गट परधर्मात गेलेले होते तेथे त्यांचे गटाने हिंदूकरण व जातीकरण करणे शक्य झाले, जळगाव भागात काही कोळी गटाने मुसलमान झाले होते. त्यांचे गटानेच शुद्धीकरण झाले. मुंबईच्या भागात व विशेषतः महाराष्ट्रालगतच्या गुजराथेत मोठ्या प्रमाणावर शुद्धीकरणाच्या चळवळीने मूळ धरले होते. तेथे खोजा मुसलमानांनी बाटविण्याचीही चळवळ जोराने चालविली होती. तथापि त्याची प्रतिक्रियाही चांगली झाली. १९२६ च्या पुणे हिंदुसभेच्या वृत्तान्तात त्या संबंधाने असे म्हटले आहे की "जळगाव भागातील मुसलमान झालेले कोळी व मुंबईच्या आसपासचे खालच्या जातीतले लोक यांतील शुद्धीकृतांची संख्या सुमारे तीन हजार भरेल."

जे लोक स्वतःच बाटविले गेले होते त्यांच्या शुद्धीकरणास व जातगंगेत समाविष्ट होण्यास फारशा अडचणी आल्या नाहीत. त्यातही ब्राह्मण, मराठे व महार या जातींत जातीकरण घडवून आणणे अधिक सुलभ झाले. पण जेथे जातीजातींचे लहान लहान गट आहेत तेथे शुद्धीकृतांचे जातीकरण घडवून आणणे बरेच प्रयासाचे असे. मांडे नावाचा एक ब्राह्मण ख्रिस्चन झाला होता. त्याचे पुण्यास शुद्धीकरण झाले तेव्हा त्यास पंक्तिपावन करता यावे व जातीत समाविष्ट करून घेता यावे यासाठी १९२५ वर्षी वाईस ब्राह्मण परिषद भरली असता व तेथे नव्या जुन्या सर्व विचारांचे लोक जमलेले असताना अशा सर्व विचारांच्या लोकांच्या पंक्तीत मांडे यास ते शुद्धीकृत आहेत असे आधी जाहीर करून जेवावयास बसविण्यात आले व ते सर्वांनी स्वीकार्य मानले. तथापि गुरवांच्या बाबतीत जातीकरण सुलभ झाले नाही. त्यांची जात लहान व व्यवसायाने समाजावर अवलंबून असलेली; गावकऱ्यांच्या मदतीवर व सहानुभूतीवर जगणारी, त्यामुळे गावकरी बहिष्कार घालतील व

आपला वृत्तिच्छेद होईल या भीतीने गुरवाचे शुद्धीकरण केले असताही त्याचे लौकर जातीकरण होऊ शकले नाही. पुढे जेजुरी येथे गुरव ज्ञातीच्या लोकांची एक परिषद भरविण्यात आली व तेथे शुद्धीकृतांचे गुरव जातीत जातीकरण करण्यास समाजाची मान्यता मिळविण्यात आली. लिंगायत समाजाच्या बाबतीतही तसेच झाले. त्यासाठी लिंगायत समाजाचे एक पुढारी अमरावतीचे श्री. नारायणराव बामणगावकर यांच्या सहीवर केसरीतून प्रकट निवेदन प्रसिद्ध करण्यात आले. त्याचा बराच उपयोग झाला.

रत्नागिरीत शुद्धि व अस्पृश्यतानिवारण

पुण्याच्या हिंदुसभेप्रमाणेच रत्नागिरी हिंदुसभेनेही शुद्धीकरण व अस्पृश्यता-निवारण ही कामे हाती घेतली. जाधव नावाच्या एका बाटून खिश्चन झालेल्या महार जातीच्या इसमास सावरकरांच्या प्रेरणेने परत हिंदुधर्मात घेण्यात आले. त्याचप्रमाणे पंधरा वर्षांपूर्वी खिश्चन झालेल्या धाकरस नावाच्या एका ब्राह्मण कुटुंबाचेही रत्नागिरी येथे दि. २३ मे १९२५ ला मोठ्या समारंभपूर्वक हिंदूकरण करण्यात आले. त्यानंतर पुढच्याच वर्षी धाकरस यांच्या कन्येचा एका ब्राह्मण तरुणाबरोबर विवाहही झाला. याचा अर्थ शुद्धीकरण व जातीकरण पूर्ण पचले.

१९२६ वर्षी पुण्याच्या हिंदुसभेच्या वतीने २९ जणांना व्यक्तिशः परधर्मातून हिंदुधर्मात घेण्यात आले. त्यात मूळचे कोष्टी, मराठे, अहिर, रजपूत, मांग, ब्राह्मण, महार, वैश्य, गुरव इत्यादि जातींतील लोक होते. परधर्मात गेलेली ही मंडळी स्वतःच बाटलेली होती. त्यात पाच कुटुंबेही होती. त्या सर्वांचा त्यांच्या त्यांच्या जातींत स्वीकार झाला. गोडबोले नावाचे एक गृहस्थ अगदी बाल्यावस्थेत असताना खिश्चन केले गेले होते. ते पुढे मॅट्रिक होऊन ग्रँट मेडिकल कॉलेजात शिकत होते. त्यांचे पुण्यास शुद्धीकरण झाल्यावर त्यांचे उपनयनही दुसरे दिवशी करण्यात आले व त्यांना पुण्यातील प्रतिष्ठित मंडळींनी जातिभोजनास घेऊन स्वजातीत स्वीकृत केले. त्यांचा पुढे ब्राह्मण जातीय मुलीबरोबर विवाहही झाला. दाणी नावाचे ब्राह्मण गृहस्थ भोपाळ संस्थानातील एक जहागिरदार होते. ते मुसलमान झाले होते. त्यांचेही शुद्धीकरण करण्यात येऊन त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांस घरात घेतले. पिंटो नावाचे एक गृहस्थ तीन चार पिढ्यांपूर्वीचे खिस्ती झालेल्या कुटुंबातील होते. ते विलायतेसही जाऊन आलेले असून लखनौ येथील सरकारी कॉलेजात इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. ते मूळचे सारस्वत ब्राह्मण असून त्यांच्या गेल्या चार पिढ्यांत क्षेत्रबीजशुद्धि कायम राखण्यात आलेली होती. त्यांचेही मुंबईस शुद्धीकरण झाले व सारस्वत समाजाने त्यांना स्वजातीत स्वीकृत केले. अशा रीतीने जे स्वतःच परधर्मात गेले होते किंवा ज्यांची रक्तबीजशुद्धि जातीच्या दृष्टीने कायम राहिलेली

होती अशा परधर्मात गेलेल्या सर्व हिंदूंना परत हिंदुधर्मात व त्यांच्या स्वजातीत समाविष्ट होण्याचा मार्ग खुला झाला.

या संबंधात श्री. द. के. केळकर यांनी केसरीतून लेख लिहून शुद्धीकृतांच्या पुढील सांसारिक प्रश्नांची सविस्तर चर्चा केली व त्यावर वर्तमानपत्रांतून पुष्कळच चर्चाही झाली. त्या चर्चेचा निष्कर्ष असा होता की जे लोक स्वतःच परधर्मात गेलेले आहेत किंवा तेथे ज्यांची रक्तबीजशुद्धि कायम राहिली आहे त्यांचा त्यांच्या मूळ जातीत प्रवेश होण्यास आडकाठी येऊ नये. तथापि ज्यांच्या परधर्मात अनेक पिढ्या गेल्या व जातिशुद्धि राहिलेली नाही त्यांची शुद्धि करावयाची असल्यास ती गटाने करणे सोइस्कर व एकंदरीत फायदेशीर होय. कारण अशा एकट्या दुकट्याला अनेक सांसारिक अडचणींना तोंड द्यावे लागते.

ज्यांनी परधर्मात गेल्यानंतरही आपली वांशिक रक्तबीज शुद्धि कायम राखली होती अशा मंडळींना त्यांनी परत हिंदुधर्मात व स्वजातीत यावे या उद्देशाने प्रा. माटे यांनी एक पत्र तयार केले व श्री. लक्ष्मण बळवंत भोपटकर, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, स्वतः श्री. म. माटे व शं. रा. दाते या चौघांच्या सहीवर ते सुमारे शंभर ख्रिस्ती ब्राह्मण कुटुंबीयांकडे पाठविण्यात आले. ते पत्र पुढे ख्रिस्ती धर्मीयांचे मुखपत्र जे 'ज्ञानोदय' त्याचे संपादक व रे. नारायणराव टिळक याचे चिरंजीव देवदत्तराव टिळक यांनी ज्ञानोदय पत्रात सविस्तर छापून या विषयाच्या विचारास विशेष चालना दिली. श्री. देवदत्तराव टिळक यांनी त्या पत्रावर टीकाही केली; परंतु या पत्राचा सुपरिणाम घडून आला व अनेक ख्रिस्ती धर्मीय ब्राह्मण मंडळीत चर्चा सुरू झाली व विचारविनिमयास मोठी चालना मिळाली. ते पत्र त्या वेळेच्या सनातनी, सुधारक व प्रतिष्ठित ब्राह्मण समाजातील गृहस्थांच्या मतांचे निदर्शक असल्याने त्यास विशेष महत्त्व होते. आजही ते मार्गदर्शक असल्याने येथे देण्यात येत आहे. ते पत्र असे :

ब्राह्मण ख्रिस्ती बांधवास विनंती

" आम्ही आपली स्वतःची व खुद्द आपली जबाबदारी ओळखनच पुढील विषयाचा उल्लेख आपणांपुढे करण्याचे धाडस करीत आहो.

आपल्या नाजूक धर्मप्रवृत्ति आमच्या या लिहिण्याने जर यत्किंचितही दुखविल्या गेल्या तर आम्हांस अतिशय दुःख होईल. परंतु प्रस्तुत काली जो विषय सर्वत्र भरून राहिला आहे व ज्यांचा पुरस्कार करण्याचे काम आम्ही अंगीकारिले आहे त्यासंबंधाचेच खालील विचार असल्यामुळे निदान सार्वजनिक स्वरूपाचे म्हणून ते आपणांस खेदकारक होणार नाहीत असा विश्वास आहे.

प्रस्तुत कालच्या विचारभ्रमणांतून आपणापैकी कोणीच मुक्त नाही. एकमेकांस नव्या कल्पना सुचवाव्या, एकमेकांपासून त्या ग्रहण कराव्या, अथवा पसंत नसलेले

नाणे जसे निर्लेप बुद्धीने परत केले जातें, तशा त्या परत कराव्या इतकेच काय तें सुशिक्षित समाजास शक्य आहे.

आमच्या नावनिशीवरून आमचे लिहिणे कशासंबंधाने असणार हे अजमाविता येण्यासारखे आहे. आपण हिंदुधर्मातून गेल्यास किती वर्षांचा अवधि लोटला हे आम्हांस अवगत नाही. परंतु परस्परांची ओळख न बुजण्याइतपत मात्र तो अल्प आहे हे खास. आपले वाडवडील अव्वल इंग्रजीत ज्या अनेक चळवळी झाल्या त्या प्रसंगी मतान्तर करून निघून गेले. दोन भिन्न संस्कृतींचे घर्षण सुरू होताच जी त्यातल्या त्यात कमी कसदार भासली तिचा त्याग करणे हे युक्त आहे असे तेव्हाच्या विचार करणारांस वाटत असावे. फसगत, लोभ अथवा एतत्सदृश अन्य कारणे यांमुळे धर्मान्तरे झाली नाहीत असे नाही. परंतु आपल्यासारख्या सुसंस्कृत, विद्यासंपन्न व विचारशील अशा कुलांच्या धर्मान्तराला मताभिनिवेशाशिवाय अन्य कारण संभवतच नाही. जुन्या धर्मात मूर्तिपूजा, ज्ञातिसंस्था, बालविवाह, अशासारख्या त्या त्या काळी केवळ आपत्तिरूप वाटणाऱ्या गोष्टी सध्याहून अधिक विकृत रूपाने चालू होत्या. सुधारकांनी स्वधर्मातच राहून ज्याप्रमाणे त्यांचा निचरा करण्याचे काम चालू ठेवले त्याप्रमाणेच सर्वांनी केले असते तर सुधारकांना मिळाले यापेक्षा अधिक यश मिळाले असते.

रानडे यांनी सुधारकांचे चार वर्ग सांगितले आहेत. एक सवता सुभा करणारांचा म्हणजे ब्रह्मसमाज, प्रार्थना समाज इत्यादि. दुसरा नवीन गोष्टींस जुन्या धर्मग्रंथसंहितेत आधार शोधणारांचा, डॉ. भांडारकरादींचा. तिसरा सदसद्विवेक बुद्धिवाद्यांचा म्हणजे आगरकरांचा व चौथा पडून घर घेणाऱ्या सुधारकांचा. यांच्या जोडीला रानड्यांनी आणखी एक सुधारक मोजावयास हवे होते ते म्हणजे स्वधर्मातील काही काही उग्र गोष्टींस कंटाळून एकदम ज्यांनी परधर्माचा आश्रय केला ते होत. वर जे सवता सुभावाले सांगितले त्याहूनही हे कडक वृत्तीचे होत. त्यांची बुद्धि तरी एक प्रकारे निषेधप्रवणच होती.

पण आंता सर्वांच्याच ध्यानात येऊन चुकले असेल की, ज्या गोष्टीबद्दल नवीन भिन्न भिन्न संस्कृतींशी ओळख झालेल्या सुशिक्षित माणसाला वाईट वाटून क्वचित् किळसही येईल, ते सर्व प्रकार समाजातून हळुहळू गळून गेले आहेत व जात आहेत व ज्यास आपले म्हणावयास कोणासही लज्जा उत्पन्न होणार नाही असे सोज्वळ रूप धार्मिक व सामाजिक चालीरीतींस प्राप्त झाले आहे. प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज इत्यादि तुटून निघालेल्या स्वकीयांनासुद्धा आपण हिंदूच आहोत असे म्हणवून घेण्यात लाज वाटत नाही आणि ते कायमचे दुरावलेले नसल्यामुळे परत येऊन 'आम्ही तुमच्यातीलच' असे इतरांस वाटविणें त्यांस अवघड राहिले नाही. बाकीचे जे सुधारक ते तर दंगा करूनही समाजाच्या पोटीच राहिले होते.

अर्थात ते तेथेच आहेत. राहता राहिले पाचव्या प्रकारचे सुधारक. त्यांनी मात्र स्वकीयांवर इतका कडकडीत बहिष्कार टाकला की ते कायमचे दुसऱ्याचे झाले. त्यांनी आता मात्र विचार करावा अशी वेळ आली आहे. त्यांचा मतान्तररूप जो निषेध, त्याचा समाजावर इष्ट तो परिणाम होऊन चुकला आहे. त्यांनी दिलेली किंमत वाया गेली नाही; पण हे निषेधव्रत त्यांनी इतउत्तर कां चालू ठेवावे हा प्रश्न आहे. हिंदु समाजातून अथवा ज्या ब्राह्मण समाजातून, मागील पिढ्यांनी धर्मान्तर केले त्यांचे ते धर्मान्तर म्हणजे केवळ मतान्तर होय असे आम्ही समजतो. ते समाजान्तर होय असे आमच्याने निग्रहाने म्हणवत नाही. आपली वडील माणसे परमतांत गेली; ती ती परसमाजात गेली असे म्हणवत नाही. आमच्या म्हणण्याचा आम्ही जास्त खुलासा करतो.

वंशच्छेदास प्रतिकूल

जरी आपण दुरावला आहा. तरी आमच्या समाजाच्या शरीराचा एक खंड दूर सुटून गेला आहे. इतकाच त्यांचा अर्थ आम्ही समजत असतो. दुरून आम्हांस खिरस्ती समाजाचे जे काही अवलोकन करता येते. त्यावरून पहाता आपण इतर वर्णीय खिरस्त्यांशी एकरूप झाला आहा असे आम्हांला वाटत नाही. त्यातल्या त्यात विशिष्ट संस्कारांच्या पूर्वस्मृतींची अशी माणसे एकत्र जमत आहेत व त्यांचा स्वतंत्र खंड अथवा गट बनत आहे असे ऐकिवात आहे. असे असले तर आशेला फार मोठी जागा आहे. इतर धर्मान्तरितांपासून अशा प्रकारे आपले जीवित पृथक् पाडून घेण्याची प्रवृत्ति ही काय आहे म्हणून मूलतः शोध करता असे दिसेल की वंशच्छेदास आपण लोक कबूल नाही. मतांचा भिन्न भिन्न अभिनिवेश हा आत्म्याच्या पांघरुणासारखाच केवळ होय. पण त्याच्या जोडीला रक्ताची आनुवंशिकता ही युगानुयुग जखडून असल्याने कसल्याही मेळात वा स्थळात माणूस पडो. त्यात रक्ताच्या आत्मीयत्वाचा जिवंतपणा चुणूक दाखविल्याशिवाय रहात नाही. आम्हांस असे वाटते की सध्या अत्यंत संमिश्र अशा खिरस्ती समाजात एक मोठा वाद सुरू आहे व तो दिवसेदिवस वाढीस लागणार आहे.

धर्मान्तराची कारणे

हिंदु धर्मातील खालच्या लोकांतून ज्यांनी धर्मान्तर केले त्यांच्या धर्मान्तरास मताभिनिवेश कारण होता असे आम्हांस वाटत नाही. निदान एवढे म्हणता येईल की, परधर्मात जाणाऱ्यापैकी बहुतेकांस तुलनेने धर्मतत्त्वाचा श्रेष्ठ कनिष्ठ भाव प्रतीत झाला होता असे नाही. त्यांच्या धर्मान्तरास भोळेपणा, अज्ञान इत्यादीच कारणे झाली असावी, व काही जणांच्या बाबतीत माणसामाणसांतील समता की जो खिरस्ती धर्माने सदैव प्रतिपादिली आहे, तिने भुरळ घातली. असावी ह्या

उपरोक्त लोकांत असा भाव वळावत चालला आहे म्हणून ऐकतो की, जे कोणी खिस्ती असतील मग—ते खिस्ती धर्मात अवतरण्याच्या वेळी कोणत्याही दर्जाचे अथवा वंशाचे असोत—त्यांनी परस्परांशी शरीरसंबंध करावे. समाजात वर सर॰कण्याचा कनिष्ठ लोकांचा हा एक मुग्ध प्रयत्न असतो हे सर्व समाजज्ञांस ठाऊक आहेच. त्यांचे म्हणणे की, जर आता आपण एकाच परमेश्वराची लेकरे, तर मग एकमेकांशी शरीरसंबंध न करण्याचे श्रेष्ठकनिष्ठपण कां बाळगावे ? तथापि या त्यांच्या अभिसरणबुद्धीस अनुसरून होत असलेल्या प्रश्नास त्याच बुद्धीस अनुसरून वरिष्ठ प्रकारचे खिस्ती अनुकूल उत्तर देत नसावे असे आम्हांस वाटते. ज्यास आम्ही आता वरिष्ठ प्रकारचे खिस्ती म्हटले ते इतर खिस्त्यांशी समान असले किंवा एक असले तर ते फक्त परमार्थविचाराच्या बाबतीतच असावे. वंशदृष्टचा ते स्वतःस त्यांच्यापैकी मानावयास कबूल असतील असे वाटत नाही.

असे असल्यामुळे व ब्राह्मणांतून खिस्ती झालेल्यांची संख्या अत्यंत अल्प असल्यामुळे वधूवरपसंतीच्या बाबतीत अडचण भासत असावी असे आम्हांस दुरून वाटते. हे खरे असल्यास व त्याहीपेक्षा ज्या कारणामुळे आपले पूर्वज ब्राह्मण समाजातून दुरावले ती कारणे आता अस्तित्वात नाहीत हे लक्षात घेऊन आपण आपल्या घरी परत येण्याचा विचार अवश्य करावा असे आम्ही सुचविले तर ती आमची सूचना शांतपणे विचारात घेण्यास योग्य आहे. असे आपण मानाल असे आम्हांस वाटते. आचारविचारांत व आहारविहारात अर्थातच काहीसा फरक पडला असेल; पण परत येण्याचा हा विचार प्रबळ झाला तर आचारबदल करणे निदान कष्टसाध्य तरी राहील. कारण मूळ मतान्तर करताना मतान्तराला अनुकूल असा आचारबदल आपण केलेला आहे व म्हणून या मतांतराच्या प्रसंगीही करालृ.

आमचे वरचे सर्व लिहिणे जे वंशदृष्टचा म्हणजे शरीरसंबंधाने ब्राह्मणच राहिले आहेत, त्यांसच अनुलक्षून आहे व आपली बाब याच स्वरूपाची आहे असे समजल्यावरून हे पत्र आपणांस धाडिले आहे. आपणांस ही विनंती करण्याच्या कामी आम्ही फक्त चौघेच आहोत असे आपण मानण्याचे कारण नाही. यासंबंधाने व्यक्तिशः किंवा समुच्चयाने आपण आम्हांशी पत्रव्यवहार केला तर आम्हांस फार आनंद होईल.

❋

म. ४

(५)

विधायक कामे

ज्यांची जातिदृष्टीने क्षेत्रबीजशुद्धि कायम राहिलेली आहे अशा परधर्मात गेलेल्या लोकांची किंवा ज्यांच्या काही पिढयाही परधर्मात गेल्या त्यांचीही शुद्धि करून त्यांना त्यांच्या पूर्वजातीत समाविष्ट करून घेणे हे काम हिंदुसभेने चालू केले. त्याचप्रमाणे ज्यांच्या परधर्मात पिढया गेल्या व तेथे भिन्नजातीय शरीरसंबंध झाले अशाही लोकांचे गटाने शुद्धीकरण करण्यासाठी प्रचार मोहीम हाती घेण्याचे ठरले.

वसई भागाची पाहणी

उत्तरेत मलकाना रजपुतांची शुद्धि स्वामी श्रद्धानंद यांच्या नेतृत्वाखाली धडाक्याने सुरू झाली होती. महाराष्ट्रातही वसई भागात पोर्तुगीज सत्ताकाळात अनेक लोकांना बाटवून ख्रिस्ती करण्यात आले होते. त्यांना परत हिंदुधर्मात घेण्यात यावे या दृष्टीने त्या भागाची पाहणी करण्याकरिता श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव व शं. रा. दाते हे १९२५ वर्षी वसई भागात गेले. तेथे त्यांनी अनेक मंडळींच्या भेटी घेतल्या. त्यावरून प्रयत्न केला असता या भागात मोठया प्रमाणावर शुद्धीकरणाचे कार्य होण्यासारखे आहे असे दिसून आले. या भागात सन १९०० च्या पूर्वी एका साधूच्या प्रयत्नाने एक गावचे गाव ख्रिश्चनाचे हिंदु झाले होते. लोक असे सांगत की त्या भागात एकदा पटकीची साथ पसरली असता अनेक गावी लोक पटकीने मरण पावू लागले. पण ज्या गावात तो साधु राहात होता त्या गावात, ते सर्व गाव पूर्वी ख्रिश्चन झालेले होते तरी, तो हिंदुधर्माचा प्रचार करी व देवाचे तीर्थ व प्रसाद सर्वांना देई. लोकांचा त्या साधूवर विश्वास बसला. इतका की भोवतालच्या सर्व गावांत पटकीच्या साथीने माणसे मोठ्या प्रमाणावर निधन पावली असताही या गावात मात्र एकही माणूस पटकीने दगावला नाही. साधूच्या देवभक्तीने व देवाच्या कृपेने गाव वाचले अशी लोकांची भावना झाली व ते सर्व गावचे गाव जे पूर्वी ख्रिश्चन झालेले होते ते सर्व त्या साधूच्या प्रयत्नाने हिंदु झाले. त्या गावाची वस्ती सुमारे पाचशे होती. त्यामुळे त्या लोकांचे आपापसात शरीरसंबंध होण्यास अडचणी आल्या नाहीत. या गावातील लोकांना ‘ नवे मराठे ’ म्हणत. जुने मराठे म्हणजे परंपरेने हिंदु असलेले मराठे व हे नवे म्हणजे शुद्धीकृत नवागत हिंदु मराठे असे त्यांस म्हटले जाई. त्यांची एक स्वतंत्रच जात बनली होती. तात्पर्य गटाने शुद्धीकरण झाले तर कोणत्याही नव्या समस्या उत्पन्न न होता शुद्धीकरण घडवून आणणे सुलभ होते व जातींची संख्या वाढली तरी कोणत्याही सामाजिक अडचणी निर्माण होत नाहीत याचा या उदाहरणाने प्रत्यय आला.

मुंबई हिंदुसभेने या कामी प्रचारकार्य करण्याचे ठरविले व दरमहा दोनशे रुपये खर्चाची तयारीही दर्शविली. श्री. पां. वा. गाडगीळ, जे पुढे पत्रकार म्हणून प्रसिद्धि पावले आहेत त्यांची प्रचारक म्हणून योजनाही करण्यात आली. पण दुर्दैवाने ते त्या सुमारास बरेच आजारी पडल्याने ते हे काम करू शकले नाहीत. नंतर मुंबई हिंदुसभेने श्री. महाजन यांना तिकडे पाठविले. त्यांनीही वसई भागात हिंडून प्रचार केला. त्यांचाही अनुभव असाच होता की चारसहा वर्षे चिकाटीने प्रयत्न केल्यास या भागातील ख्रिश्चन झालेले लोक परत हिंदुधर्मात येतील. मात्र त्यासाठी चिकाटीचा प्रयत्न केला पाहिजे, व तो दीर्घकाळ केला पाहिजे.

मसुराश्रमाचे शुद्धिकार्य

पुढे मसुराश्रमाने धर्मप्रचाराबरोबरच शुद्धीचे काम मोठ्या प्रमाणावर केले. मसुराश्रमाचे विनायकमहाराज यांनी आपल्या ब्रह्मचारी स्वयंसेवक मंडळींच्या सहकार्याने गोमंतकात शुद्धिकार्याचा प्रचार सुरू केला. तेथील मुख्यतः गावडा समाजात त्यांनी मोठी जागृति केली. त्यांच्या प्रयत्नाने १९२६–२७ मध्ये गोमंतकात गुपचूपपणे म्हणजे तेथील सरकारच्या डोळ्यांवर न येऊ देता सुमारे सहासात हजार ख्रिश्चन धर्मीयांना हिंदुधर्मात घेण्यात आले. पहिला मोठा सामुदायिक शुद्धिसमारंभ चिंबळ येथे (पणजीपासून पाच सहा मैलांवर हे गाव आहे.) मोठ्या प्रमाणावर साजरा झाला, व तसेच जवळपासच्या आणखी १०–१२ गावीही या काळात मोठ्या प्रमाणावर सामुदायिक शुद्धिकार्य झाले. या कार्याची वार्ता गोवा सरकारला लागताच त्यांनी मसुराश्रमाचे विनायक महाराज व इतर कार्यकर्ते यांना अटक केली. तेव्हा तात्यासाहेब केळकर, डॉ. मुंजे प्रभृति मंडळींनी (ही मंडळी त्या वेळी केंद्रीय लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद होती.) भारत सरकारकडे तक्रार करून गोवा सरकारलाही जाब विचारला. तेव्हा त्यास या लोकांची सुटका करणे भाग पडले. गोवा सरकारने त्यानंतर बाहेरून गोमंतकात हिंदुधर्माचा प्रचार करण्यास येणाऱ्यास बंदी घातली व शुद्धीकरणाची चळवळ बंद पाडली. त्यामुळे तेथे शुद्धीकरण अधिक होण्याचे थांबले.

नामांतर नोंदण्यातील अडचणी

या शुद्धीकृत लोकांची ख्रिश्चन नावे होती, त्या जागी आता त्यांनी हिंदु नावे धारण केली होती. पण त्यांना राजमान्यता मिळण्यात अडचणी आल्या. गोव्यातील त्या वेळच्या कायद्यानुसार नामांतर नोंदावयाचे असेल तर त्यास जबर फी आकारण्यात येऊ लागली. ज्या समाजात शुद्धीकरणाच्या चळवळीचे मूळ रुजले होते तो मुख्यतः गावडा समाज हा अगदी गरीब होता. कुछ रोटी, कुछ लंगोटी अशी त्याची अवस्था होती व आजही जवळपास तशीच आहे. त्या समाजातील लोक आपले

नवे नांव सरकारी नोंदणी कचेरीत नोंदवून घेण्याकरिता जबर फी कशी देऊ शकणार? ते त्यांना शक्य नव्हते. परक्या ख्रिश्चन धर्मीय पोर्तुगीज सरकारचा शुद्धीकरणाला मुळात विरोध होता. त्यांनी दडपशाहीचे वातावरण सर्वत्र निर्माण केले. त्यामुळे पुढे आणखी शुद्धीकरण करण्याचे काम बंद पडले व शुद्धीकृतांची पूर्वीची रूढ ख्रिश्चन नावे तशीच कायम राहिली.

भाऊसाहेब बांदोडकरांची प्रेरणा

हे काम अगदी अलीकडेपर्यंत तसेच राहून गेले होते. तथापि भाऊसाहेब बांदोडकर पुणे येथे काही निमित्ताने एकदा आले असता त्यांनी एका चर्चेच्या प्रसंगी श्री. शंकर रामचंद्र दाते यांच्याजवळ ही वस्तुस्थिति बोलून दाखविली. तेव्हा दाते यांनी बांदोडकरांना हिंदुसभा हे काम करील असे आश्वासन दिले व त्याप्रमाणे ते व त्यांचे सहकारी यांनी १९७० मध्ये गोमंतकात जाऊन त्या त्या शुद्धीकृत मंडळींच्या नेत्यांची भेट घेतली, त्यांचे प्रश्न समजून घेतले, गोव्यातील कायद्याची परिस्थिति माहीत करून घेतली व त्यांनी या कामातील अडचणींचाही अभ्यास केला. बांदोडकरांचा राज्यकारभार सुरू झाल्यानंतर त्यांनी नामान्तर नोंदणीकरिता नोंदणी फी माणशी सुमारे दीड रुपया आकारली जाईल अशी व्यवस्था केली होती. (ही आकारणी नावातील अक्षरसंख्येनुसार कमी अधिक होते; पण ती सरासरीने दीड रुपयात बसते.) त्याप्रमाणे काही शिकलेल्या व घरंदाज मंडळींनी आपली ख्रिश्चन नावे बदलून नवी हिंदु नावे सरकारी नोंदणी कार्यालयात नोंदवून घेतलीही. पण सर्वसामान्य गरीब, अडाणी व आदिवासी गावडा समाजातील नव्या हिंदूंची नवी नावे नोंदण्याचे काम राहिलेच होते. गोमंतकात प्रत्येक माणसाचा जन्म, विवाह, नामान्तर, निधन, मिळकती, इत्यादींची नोंद करण्याचा कायदा पूर्वीपासून आहे. गोवा हे महाराष्ट्राच्या पोटात छोटे व स्वतंत्र परकीय शासन असल्यामुळे आपल्या प्रजेचे वेगळेपण टिकविण्याकरिता पोर्तुगीजांनी ही नोंद शक्यतो काटेकोरपणे ठेवली होती. मोठ्या शहरांतील लोकांच्या या नोंदी नीट केल्या जात. पण ग्रामीण व जंगली भागातील व विशेषत: मागासलेल्या, आदिवासी समाजातील लोकांच्या नोंदी होत नसत. त्यांची विशेष मिळकत नसे त्यामुळे तेही त्याबद्दल बेफिकीर असत. जेव्हा दाते व त्यांचे सहकारी धारपुरे व कडकडे, नाईक इत्यादिकांनी त्या त्या गावी जाऊन लोकांचे नामान्तर नोंदणीचे अर्ज भरून नोंदणी खात्यास सादर केले तेव्हा तेथे अडचण अशी आली की या लोकांच्यापैकी बहुतेक जणांच्या जन्माच्याही नोंदी झालेल्याच नव्हत्या. त्यामुळे जेथे जन्माची नोंद त्याच (खाते) पानावर इतर नोंदी करण्याची नोंदणीखात्याची व्यवस्था असल्याने या मंडळींच्या नव्या हिंदु नावांची नोंद कोठे करावयाची हा अवघड प्रश्न निर्माण झाला.

आपल्याकडे ज्याने त्याने आपल्या नव्या नावाची नोंद जाहीर प्रसिद्धि देऊन करण्याची पद्धति आहे. मुलींचे विवाह झाले म्हणजे त्यांच्या सासरच्या नावाची नोंद विद्यालये व विद्यापीठेही केवळ त्यांच्या सांगण्यावरून करून घेतात. अलीकडे आपण आपले पूर्वीचे नाव बदलून नवे नाव धारण केले आहे अशी वर्तमानपत्रांतून व सरकारी राजपत्रकामधूनही (गॅझेट) प्रसिद्धि देण्यात येते. बदललेल्या नावांना कायदेशीर अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी ही व्यवस्था आहे. पण गोव्यात केवळ नामान्तर नोंदण्याची तशी स्वतंत्र सोय नव्हती. तथापि भाऊसाहेब बांदोडकर यांच्यामुळे ती सोय होऊ शकली. गोव्यातील पूर्वीचा जन्म-मृत्यु नोंदणीचा कायदाही बदलला व दिल्ली सरकारचा केंद्रीय कायदा तेथे लागू झाला व बांदोडकरांनी हे काम आदिवासी समाजाचे आहे हे लक्षात घेऊन दाते यांनी दिलेल्या ३४२२ नामान्तरांच्या नोंदी सरकारी राजपत्रात विनामूल्य प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली. त्याप्रमाणे शाळांनाही परिपत्रके पाठविण्यात आली व ज्या मुलांची ख्रिश्चन नावे बदलून तेथे हिंदु नावे झाली आहेत तेथे त्यांच नवी नावे दाखल करून घेण्यात आली.

तुरुंगातील धर्मप्रचार

१९२४–२९ या काळात अनेकविध आघाड्यांवर प्रचारकार्य सुरू होते. तुरुंगांत ख्रिश्चन मिशनरी दर आठवड्यास धर्मप्रचारार्थ जातात. मुसलमान मुल्ला मौलवीही तेथे जातात. त्यांना तेथे धर्मप्रचार करण्यास सरकार संधि देते. गुन्हेगार जगतात लोकांना धर्मशिक्षणाच्या रूपाने नीतिशिक्षण मिळावे व त्यांची सुधारणा व्हावी हा त्यामागील मूळ उद्देश असतो. पुणे हिंदुसभेला याची माहिती मिळाली तेव्हा आम्हांलाही तेथे धर्मप्रचाराला संधि मिळावी म्हणून हिंदुसभेने सरकारकडे पत्रव्यवहार केला. आरंभी सरकारने त्याची दखलच घेतली नाही. तथापि पुन्हा पुन्हा स्मरणपत्रे पाठवल्यावर पत्र पोचल्याची पोच फक्त आली. तथापि हा प्रश्न धसास लावण्याचे हिंदुसभेने ठरविले. त्या वेळी श्री. लक्ष्मण बळवंत उपाख्य अण्णासाहेब भोपटकर हे मुम्बई विधिमंडळाचे सभासद होते. त्यांनी या संबंधात विधिमंडळात प्रश्न विचारून या प्रकरणास तोंड पाडले. मग सरकारकडून धर्मप्रचारार्थ जाऊ शकणाऱ्या तुमच्या लोकांची यादी पाठवा अशी हिंदु सभेकडे सूचना आली. त्यावर तिने आठदहा लोकांची नावे व त्यांची धर्मप्रचाराच्या दृष्टीने योग्यताही कळविली. अखेर त्यांच्यातून प्रा. सोनोपंत दांडेकर यांचे नाव सरकारने स्वीकारले व त्यांना परवानगी दिली. त्याप्रमाणे ते दर आठवड्यास व विशेषतः एकादशीसही येरवडा तुरुंगात धर्मप्रचारार्थ जाऊ लागले. जाताना बरोबर ते अभंगांची छोटी पुस्तके, पाट्या, पेन्सिली, भजनासाठी टाळ, तुळशीच्या माळा इ. बरोबर नेत. तुरुंगातील लोकांना त्यांनी चांगली गोडी लावली. ते याव-

याच्या वेळी कैदी मंडळी त्यांची अगदी वाट पाहात. त्यांच्या प्रचाराचा फार चांगला उपयोग झाला. तेव्हापासून येरवडा तुरुंगात साप्ताहिक धर्मप्रचारार्थ हिंदुधर्मप्रचारक जातात. सध्या हे काम श्री. शेंडेशास्त्री करीत असतात.

अस्पृष्टांत शिक्षण प्रचार

प्रा. बापूसाहेब माटे यांनी महार मांगांची सुधारणा घडवून आणण्यासाठी व त्यांना साक्षर करण्यासाठी पुण्यात फार प्रयत्न केले. त्यांनी दहाबारा ठिकाणी त्यांच्या त्यांच्या वस्तीत स्वखर्चाने रात्रीच्या शाळा सुरू केल्या. माटे हे नामांकित शिक्षक होते. विद्यार्थ्यांचा त्यांच्यावर विशेष लोभ असे. या विद्यार्थ्यांतून त्यांनी विनावेतन सेवाभावी शिक्षक निवडले. ते त्या त्या रात्रीच्या शाळेत रोज एक तास शिकवीत. दहा बारा वर्षे त्यांनी या शाळा चालविल्या. नंतर त्या नगरपालिकेने स्वत:कडे चालविण्यास घेतल्या. माटे यांच्या प्रेरणेने पुण्यास मांगांच्या दोन परिषदाही झाल्या. त्यांचा प्रश्न भाकरीचा व मुख्यत: पाण्याचा असे.

श्री. श्री. शं. नवरे यांना प्रचारात आलेले अनुभव

महाराष्ट्रात हिंदुसभेच्या कार्याचा प्रचार करण्याकरिता १९२६ वर्षी पुणे हिंदुसभेने श्री. श्रीपाद शंकर नवरे यांची नेमणूक केली. तेही पुढे नामांकित वृत्तपत्रकार म्हणून प्रसिद्धीस आले. त्या वेळी ते वाई येथील प्राज्ञपाठशाळेत शिक्षक होते. त्यांनी सहा महिने प्रचारकार्य केले. त्यात त्यांनी ठाणे, सातारा, नगर व सोलापूर जिल्ह्यांत प्रचार केला. हिंदुसभेच्या शाखा स्थापन करणे, सभासद नोंदविणे, अस्पृश्यता निवारण, शुद्धिकार्य यांविषयी लोकमत जागृत करणे व सर्वसामान्य सामाजिक परिस्थितीची माहिती मिळविणे इत्यादि कामे त्यांजकडे सोपविण्यात आली होती. त्यांना या प्रचारकार्यात आलेले अनुभव मोलाचे व मार्गदर्शक होते.

या काळात स्वातंत्र्याची चळवळ, गांधीवाद इत्यादींमुळे सार्वजनिक सभा मोठ्या प्रमाणावर होत. तथापि त्यांचे स्वरूप प्राय: चळवळीचे असे. स्थिर स्वरूपाचा विचार करणारे अशा सभांस फारसे जात नसत. हिंदुसभेच्या प्रचाराच्या दृष्टीने त्यांचा फारसा उपयोगही नव्हता. खाजगी बैठका, भेटीगाठी, सामुदायिक चर्चा यांचा उपयोग अधिक होत असे. समाजातील लोकांच्या विचारांचे अंतरंग समजण्यास अशा खाजगी बैठकाच विशेष उपयोगी असतात. त्यांचा श्री. नवरे यांनी विशेष उपयोग करून घेतला.

अस्पृश्यता निवारण हे हिंदुसभेच्या अनेक कार्यांपैकी एक महत्त्वाचे कार्य होते. नवरे यांनी महारमांग वाड्यांतूनही बैठका घेण्याचे योजिले. त्यामुळे तेथील लोक फार सुलभतेने एकत्र जमत व त्यांच्या प्रश्नांची चर्चा केल्याने त्यांची सहानुभूतीही लौकर मिळे.

महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचे व एकंदर हिंदुसमाजाचे तत्कालीन स्वरूप वर्णन करताना श्री. नवरे यांनी म्हटले आहे की " महाराष्ट्रात हिंदुमुसलमानांच्या प्रश्नापेक्षा ब्राह्मण ब्राह्मणेतर वादानेच विशेष उग्र स्वरूप धारण केले असल्यामुळे ब्राह्मणेतरांच्या मोठ्या समाजाचे लक्ष सध्या हिंदुसभेकडे लागणे शक्य दिसत नाही. ब्राह्मणांना खाली ओढणे यातच त्यांना इतिकर्तव्यता वाटत असल्यामुळे कित्येक वेळा ब्राह्मणांविरुद्ध मुसलमानांशी संगनमत करण्यास ते कमी करीत नाहीत. सुशिक्षित ब्राह्मण समाज पाहिला तर तोही सध्या सार्वजनिक कार्याविषयी उदासीन व निष्क्रिय झालेला दिसतो. राजकीय पक्षभेद, सामाजिक व धार्मिक तंटे, सर्वसामान्य बेकारी व गेल्या असहकारितेच्या प्रचंड धुमश्चक्रीनंतर आलेली ग्लानि किंवा पसरलेली निराशा ही या स्थितीची प्रमुख कारणे दिसतात. प्रत्येक चळवळीचा भार गावातील एकदोन विशिष्ट व्यक्तींवरच पडतो व त्यांनाच सर्वांच्या टीकेचा मारा सहन करावा लागतो. यामुळे ही माणसे लौकरच कंटाळतात. पक्षातीत कार्यकर्ता सापडत नाही. दुसऱ्या बाबतीतील मतभेद विसरून पटलेल्या बाबतीत सहकारिता करण्याची समाजाला सवय नाही. "

हिंदुसभेच्या प्रत्यक्ष शाखा अशा फारशा स्थापन झाल्या नाहीत तरी या प्रचारदौऱ्याचा उपयोग चांगला झाला. हिंदुसभेच्या कार्याची माहिती समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत पोचविता आली. नवरे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की " रोज वर्तमानपत्रे वाचणाऱ्या सुशिक्षितांत देखील या चळवळीची सुसंगत माहिती फारच थोड्यांना आहे असे आढळून आले. कित्येकांची मने पूर्वग्रहाने दूषित झालेली असतात. प्रश्नाच्या सर्व बाजू कानांवर न आल्याने पुष्कळांची मते एकांगी बनलेली असतात. एखाद्या प्रश्नाचा पूर्ण अभ्यास करून पूर्व-उत्तर पक्ष करण्याची तयारी तर क्वचितच दिसून आली. त्यामुळे अशा कार्यास वाहून घेतलेला प्रचारक आपण होऊन घरी चालून आल्यास अनेक आक्षेपांचा ऊहापोह होऊन चळवळीस अनुकूल भूमिका तयार होते. खालच्या समाजाच्या कानावर ही चळवळ मुळीच गेलेली नसते. ती समक्ष जाऊन त्यांच्या कानावर घातल्यास त्यांच्या विचारांना चालना मिळते. उपहासाच्या दृष्टीने का होईना तो प्रश्न त्यांच्या मनात अनेक दिवस तरंगत राहतो. "

शुद्धीकरणाच्या संबंधातील आपले अनुभव नमूद करताना श्री. नवरे यांनी आपल्या वृत्तान्तात म्हटले आहे की "हल्ली हिंदुस्थानात दिसणारे ख्रिस्ती व मुसलमान हे मूळचे हिंदूच होते. पण त्यांना जुलमाने किंवा फसवून बाटविण्यात आले ही माहिती सांगितल्यास लोक सावध होतात व आपल्या मूर्खपणाबद्दल त्यांना लाज वाटू लागते. पण प्रत्यक्ष शारीरिक शुद्धीकरण करण्याच्या बाबतीत पुन्हा परत जातीत घेण्याचा प्रश्न येतो. इतकी प्रगति करण्यास अद्याप हिंदु समाज तयार नसल्याने मुबलक क्षेत्र असताही या कामी यावे तसे यश येत नाही. "

"अस्पृश्यता निवारणाच्या बाबतीत काही मूठभर सुशिक्षित लोकांखेरीज चहूकडे तीव्र विरोध दिसून येतो. जेथे शिक्षणाचा फारसा प्रसार झालेला नाही व जेथे चळवळ्या लोकांनी मुद्दाम जाऊन हा प्रश्न उपस्थित केलेला नाही तेथे अस्पृश्य वर्गाकडूनच अस्पृश्यतानिवारणाची मागणी झालेली दिसत नाही. ठाणे जिल्ह्यातील काही गावे या वर्गात मोडतात. सातारा, नगर, सोलापूर या भागांतील अस्पृश्य वर्गांत बरीच जागृति झालेली आढळली. खुद्द ठाणे व मुंबईच्या आसपासचा प्रदेश येथील अस्पृश्य स्वोद्धाराचा मार्ग चालू लागले आहेत. मुंबईला त्यांची एक-दोन वर्तमानपत्रे चालू असून त्यांच्या परिषदा भरून तेथे ते एकत्र जमून विचार करू लागले आहेत. त्यांनी स्वतःचा शिक्षणफंड उभारून केवळ अस्पृश्यांकरिता बोर्डिंग व शाळा काढण्याचा उपक्रम ठिकठिकाणी सुरू केला आहे.

"सार्वजनिक देवळे व विहिरी यांमध्ये त्यांचा प्रवेश होण्याला मात्र अद्यापि बराच काळ लोटावा लागेल. ब्राह्मणांबरोबर समतेचे भांडण भांडणारा ब्राह्मणेतर समाज अस्पृश्यांना मात्र तेच तत्त्व लावण्यास तयार नाही. यामुळे ब्राह्मण, ब्राह्मणेतर स्पृश्य व अगदी खालचा अस्पृश्य असे तीन सामाजिक पक्ष पडत असलेले दिसून येतात.

मिशनऱ्यांची कार्यपद्धति

'ख्रिस्ती धर्मप्रसाराचे मिशनऱ्यांचे कार्य नगर जिल्ह्यात विशेष पसरलेले आहे. तेथे सात आठ मिशन्स काम करीत आहेत. त्यांनी प्राथमिक शाळा व हाय-स्कुले चालविली आहेत. बाटलेले अस्पृश्य बहुतेक ठिकाणी पूर्वीचाच धंदा करून पोट भरतात. जे थोडेफार शिकले आहेत त्यांना मिशनरी संस्थांतून शाळा मास्त-राची, धर्मोपदेशकाची किंवा वशिल्याने सरकारी नोकरी मिळते. नवीन शुद्धीच्या चळवळीची दहशत बसल्यामुळे बाटविण्याचे नवीन क्षेत्र वाढविण्याऐवजी आहे तेच जतन करण्याकडे त्यांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे शाळांपेक्षा वसतिगृहे काढण्या-कडे त्यांचे अधिक लक्ष आहे. कारण त्यायोगे मुले २४ तास त्यांच्या हातात राहतात व त्यांना मनाने पूर्ण ख्रिस्ती करण्यात येऊन ते परत स्वधर्मात जातील ही भीति रहात नाही.

"गुन्हेगार जातींना सुधारण्याकरिता मिशनरी लोकांच्या स्वाधीन करण्यात येते. सोलापुरात त्यांची अशी एक वसाहतच करण्यात आली असून तेथे ख्रिस्ती धर्मप्रचाराचे काम जोरात चालू आहे. रोजची हजेरी बंद करण्याइतका वशिला मिशनऱ्यांजवळ असल्याने गुन्हेगार साहजिकच त्यांच्याकडे ओढले जातात.

"मुसलमानांनीही नगर शहरात असेच एक बोर्डिंग स्कूल काढले असून हिंदूंची अनाथ सापडलेली किंवा परप्रांतांतून पळवून आणलेली मुले या बोर्डिंगात ठेवण्यात येतात.

अर्धवट हिंदु जाती

"धड ना हिंदु, धड ना मुसलमान अशा अर्धवट जाती महाराष्ट्रात पुष्कळ आहेत. या जातींतील लोक हिंदु व मुसलमान या दोन्ही धर्मांतील सणवार पाळतात किंवा देवतांना भजतात. बापाचे नाव अबदूल तर मुलाचे नाव गोपाळ अशी मिश्र नावे यांच्या कुटुंबात रूढ असून ते उर्दू व मराठी दोन्ही भाषा बोलतात. वाई सातान्याकडील भंगी याच वर्गात मोडतात. या लोकांना पूर्ण मुसलमान करण्याचे प्रयत्न काही मुसलमान चळवळ्यांनी केले पण त्यांना यश आले नाही. या अर्धवट लोकांना मुसलमानी धर्मापेक्षा हिंदुधर्म अधिक जवळचा वाटत असल्याने त्यांना पूर्ण हिंदु करण्याचे प्रयत्न हिंदु समाजाने करण्याची आवश्यकता आहे.

या जातींखेरीज भिल्ल, ठाकूर, कातकरी, दुबळे, फासेपारधी अशा अनेक वन्य जातींचे लोक आहेत. त्यांची शिरगणतीत 'ॲनिमिस्ट' या सदराखाली नोंद करण्यात येते. प्रचारदौऱ्यात असल्या पुष्कळ जातींच्या लोकांचा परिचय करून घेण्याची संधि मिळाली. या जातींना सध्या कोणताच धर्म नसल्याने त्यांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याचा ख्रिस्ती मिशनऱ्यांचा चिकाटीचा प्रयत्न चालू आहे. या समाजात मिशनरी पद्धतीने शिरून त्यांची सुधारणा केली पाहिजे. त्यांना माणुसकीच्या पायरीवर नेऊन हिंदुस्थान व हिंदुधर्म यांविषयी त्यांच्या मनात अभिमान जागृत केला नाही तर हिंदुसमाज त्यांना मुकेल असे भय आहे."

महाराष्ट्र हिंदु मिशन हवे

आपल्या अनुभवांचे सार सांगताना श्री. नवरे यांनी शेवटी म्हटले आहे की "संकट दारात येऊन ठेपल्याशिवाय त्याच्या निवारणाची तरतूद मनुष्य करीत नाही. उत्तर हिंदुस्थानातल्याप्रमाणे हिंदुमुसलमान भांडणाने महाराष्ट्रात भयानक स्वरूप धारण केले नसल्यामुळे हिंदुसभेच्या चळवळीला इकडे विशेष तोंड लागत नाही किंवा जनतेला तिचे स्वारस्य ग्रहण होत नाही. सध्या जातवार चळवळीचे युग उत्पन्न झाले आहे. ब्राह्मणांपासून महार-मांगापर्यंत प्रत्येक जात स्वतःपुरते संघटन करू पहात आहे. तथापि एकमेकांविषयी सकारण किंवा अकारण उत्पन्न झालेला संशय नाहीसा होऊन दृष्टि राष्ट्रीय व दूरदर्शी बनली तर पुढील दहा पंधरा वर्षांत या निरनिराळ्या जातवार संघटनांचे हिंदु संघटनात परिवर्तन झाल्यावाचून राहणार नाही. अस्पृश्य वर्ग आर्थिक अडचणीमुळे परधर्मीयांच्या जाळ्यात सापडतो. ब्राह्मणांपासून सर्वच वर्गांत बेकारी उत्पन्न झाली असून हा दारिद्र्याचा प्रश्न सोडविणे कठीण होऊन बसले आहे. तथापि स्पृश्य-अस्पृश्य सर्व हिंदु काही काही निमित्ताने वारंवार एकत्र जमू लागतील व परस्परांच्या अडचणींचा सहानुभूतीने विचार करू लागतील तर गैरसमज दूर होण्यास व आपलेपणा वाढण्यास चांगली

मदत होईल. ख्रिस्ती मिशनरी ज्या पद्धतीने समाजात कार्य करतात त्या पद्धतीने काम करणारी माणसे पुढे आली पाहिजेत. अशा माणसांनी सतत काम करणारे एखादे महाराष्ट्र हिंदु मिशन काढले तर हिंदुसभेची चळवळ महाराष्ट्रात चांगली यशस्वी होईल. आर्यसमाज किंवा रामकृष्ण मिशन यांनी उत्तर हिंदुस्थानात या दिशेने पुष्कळ कार्य चालविले असून महाराष्ट्रात त्यांचे अनुकरण होणे अवश्य आहे. मोफत दवाखाने व अनाथालये यांची सध्या फारच आवश्यकता आहे. धनिकांनी आपल्या दातृत्वाला देशकालाकडे नजर देऊन या बाजूचे वळण दिले पाहिजे. शास्त्री, पुराणिक, हरिदास या लोकांनी खालच्या समाजात निःस्वार्थ बुद्धीने मिसळून खऱ्या धर्मज्ञानाचा त्यांच्यात प्रसार केला तर समाजाला आलेली धर्मग्लानि दूर होईल व ब्राह्मणांना आपले खरे कर्तव्य केल्याचे श्रेय लाभेल."

श्री. नवरे यांनी नमूद केलेले अनुभवांचे सार व त्यांनी केलेले मार्गदर्शन आजही मार्गदर्शकच ठरणार आहे.

महाराष्ट्रातील या काळातील (१९२४–३०) हिंदुसभेचे कार्य प्रामुख्याने सामाजिक व धार्मिक स्वरूपाचे असे. हिंदुसंघटन, शुद्धीकरण, जातिविषयक प्रश्नांची गुंतागुत सोडविणे, अस्पृश्यतानिवारण, जुन्या शास्त्री पंडितांचा शुद्धीला व इतर सामाजिक सुधारणेच्या कार्याला पाठिंबा मिळविणे, त्यासाठी ठिकठिकाणी सभा बैठका, चर्चासत्रे भरविणे ही कामे मोठ्या प्रमाणावर झाली. हिंदु-मुसलमान वादातून निर्माण झालेल्या प्रश्नांचे स्वरूप नावाला धार्मिक, पण मुख्यतः राजकीय असे. त्यांचे दर्शनी स्वरूप फक्त धार्मिक दिसले तरी त्यांचा गाभा केवळ राजकीय होता. तीही कामे हिंदुसभा करीत असे. अशी कामे हिंदुसभेचे पुढारी हिंदुसभेच्या द्वारे व काँग्रेसच्याही द्वारे करीत. देशातील इतर प्रांतांतील काँग्रेसवर गांधीवादाची दाट छाया असली तरी महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेतृत्व या काळात केळकर, भोपटकर, जयकर, मुंजे, रामभाऊ मंडलीक, इत्यादि मंडळींच्या हाती होते व हीच मंडळी हिंदुसभेत प्रमुख असत व तेच नेतृत्व करीत. जबलपूर येथे हिंदुमहासभेचे अधिवेशन १९२८ वर्षी झाले त्याचे अध्यक्ष तात्यासाहेब केळकर होते. तथापि पुणे हिंदु सभेच्या नित्यनैमित्तिक कार्यात विद्यानिधि म. म. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव, शंकर रामचंद्र दाते, प्रा. श्रीपाद महादेव उपाख्य बापूसाहेब माटे, श्री. वा. कृ. दाणी, राघवेन्द्र शर्मा, गंगाधर विश्वनाथ उपाख्य नानासाहेब गोखले, ग. वि. केतकर, महादेवशास्त्री दिवेकर, विश्वासराव डावरे, विष्णु लक्ष्मण गोडबोले, शंकरराव दातार, बाबूराव जगताप, गणपतराव नलावडे, नारायणराव गुंजाळकर, वामन मोरेश्वर उपाख्य बाबासाहेब पोतदार, भास्कर बळवंत उपाख्य भाऊसाहेब भोपटकर, हरि मोरेश्वर जोशी, चिंतामणराव वैद्य, नानासाहेब पावगी,

अनगळ वकील, म. म. श्रीधरशास्त्री पाठक, प्रज्ञानेश्वर यति (घारपुरे) वाईचे नारायणशास्त्री मराठे, पं गयाप्रसाद, डॉ. भुतेकर, डॉ. गोरे, के. के. सकट, बाबूराव वायदंडे, पां. न. राजभोज इत्यादि मंडळींचे फार साहाय्य झाले. त्या सर्वांचा येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे अवश्य आहे.

अस्पृश्यता निवारण

महाराष्ट्रात सन १९२४–३० या काळात अस्पृष्ट समाजाचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे विशेषत्वाने होते. त्यांनी वृत्तपत्रद्वारेही प्रचार चालविला होता. त्यामुळे अस्पृष्टांचा प्रश्न निकडीचा होऊन बसला होता. अस्पृश्यता निवारणाला प्रकट विरोध फारसा होत नसे; पण अस्पृश्यता निवारण म्हणजे नेमके काय समजावयाचे या बाबतीत वेगवेगळ्या लोकांची वेगवेगळी मते असत. सनातनी परंपरेचे लोक अस्पृश्यता मानीत. आजही वर्णाश्रमवादी समजला जाणारा वर्ग अस्पृश्यता मानतो. रामराज्य परिषद ही सामान्यतः त्या विचाराच्या लोकांची प्रातिनिधिक आहे. पण त्यांचें ते मानणे आता व्यक्तिगत आहे, सामाजिक नाही. आगगाडीतून प्रवास करीत असताना त्यांच्या शेजारी अस्पृष्टजातीय माणसे येऊन बसली तर ते त्यांना उठा म्हणणार नाहीत. त्यांनी म्हटले तरी कोणी उठणार नाही हे वेगळे; पण शक्य असले तर ते स्वतः अन्यत्र जाऊन बसतील व घरी जाऊन सचैल स्नान करतील. त्यांच्या अस्पृश्यतापालनाचा अस्पृष्टांना उपद्रव नसतो, तर ते आपले पावित्र्य राखण्यासाठी स्वतः स्नानपूर्वक प्रायश्चित्त किंवा शुद्धि करून घेतात.

पूर्वी विशेषतः दक्षिणेकडे अस्पृष्ट वर्गावर सामाजिक बंधने लादली जात. उदा. त्यांनी अमुक रस्त्याने जाताही कामा नये अशी बंधने त्यांजवर लादण्यात येत. इंग्रजी राज्यात ही स्थिति पालटली होती. आता अस्पृश्यता पालन हे जेथे असते तेथे ते स्वतःचे व स्वतःपुरते असते. तथापि अस्पृश्यता पालनाची कल्पना सर्वसामान्य समाजातून याही काळात शिथिल होऊन गेली होती.

या काळात शेतकरी वर्गात अस्पृश्यता व्यवहारात फारशी पाळली जात नसे. बाजारात किंवा शेतावर सामुदायिक कामे करताना अस्पृष्ट त्यात असले, व ते नेहमी असत, म्हणजे वारंवार शिवाशीव होत असे. अशा वेळी काम संपले म्हणजे शेतकऱ्याची बायको अशा विटाळलेल्या माणसाच्या अंगावर पाण्याचा ‘शितुडा’ टाकी. म्हणजे स्नान करावे न लागता शुद्धि झाली असे समजण्यास येई! प्रस्तुत लेखकाच्या लहानपणची प्रत्यक्ष अनुभवाची ही गोष्ट आहे. याचा अर्थ असा होता की तात्त्विक दृष्टया अस्पृश्यता मान्य; पण ती टिकविणे व्यवहार्य नसल्याने काही तरी प्रायश्चित्ताचे नाटक केले जाई!

अस्पृश्यता निवारणाच्या विविध कल्पना

अस्पृश्यता न पाळणारा दुसरा वर्ग म्हणजे स्पर्श केला व त्याचा विटाळ मानला नाही म्हणजे अस्पृश्यता निवारण झाले असे समजणारांचा. भाऊसाहेब भोपटकर हे या वर्गाचे प्रतिनिधि होते. त्यांच्या मते अस्पृश्यता निवारण म्हणजे स्पर्शाने विटाळ होतो हा विचार न मानणे होय. ह्या वर्गात आजही फार मोठ्या समाजाचा समावेश आहे !

तिसरा वर्ग अस्पृष्ट समाजातील लोकांना स्पृश्य समाजातील लोकांच्या बरोबरीने, समानतेने वागविणे म्हणजे अस्पृश्यता निवारण होय असे मानणारांचा. इंग्रज सरकारने या विचारास पाठिंबा दिला होता. शाळाशाळांतून अस्पृष्टवर्गीय विद्यार्थ्यांना इतर स्पृश्यवर्गीय विद्यार्थ्यांबरोबर सरमिसळ बसवून शिक्षणाचा कारभार चालवावा असे धोरण सरकारने सक्तीने अमलात आणण्याचा प्रयत्न केला.

या धोरणाचा अमल मोठ्या शहरातून विना अडचण चालू असे; तथापि ग्रामीण भागात तो तसा झाला नाही. सरकारी आदेश असूनही तो पाळला जात नसे. त्यावरूनही तक्रारी होत.

अस्पृष्ट वर्गात जसजसा शिक्षणाचा प्रसार होत गेला, तसतसा त्यांचा स्वाभिमान जागृत होत गेला व स्पृश्य समाजाने चालविलेल्या असमान वागणुकीने तो दुखविला जाऊन सर्वत्र संघर्षाचे वातावरण निर्माण झाले. या संघर्षात अस्पृष्टांना विरोध करणाऱ्या स्पृश्य समाजाला माघार घ्यावी लागली व हळुहळू सरकारी आदेशाचे पालन होत गेले. आता तीही परिस्थिति पुष्कळच पालटून गेली आहे.

अस्पृश्यता निवारण्याची याच्या पुढची पायरी म्हणजे सार्वजनिक पाणवठे व सार्वजनिक हिंदु देवस्थाने अस्पृष्ट समाजाला इतरांप्रमाणेच खुली असली पाहिजेत ही होती. खेडेगावातून पुष्कळ ठिकाणी गावकीच्या विहिरी असतात व तेथे सर्व स्पृश्य हिंदु समाज, एवढेच नव्हे तर हिंद्वेतर समाजही पाणी भरतो. पण तेथे अस्पृश्य समाजाला मात्र बंदी असे. या बंदीविरुद्ध ठिकठिकाणी चळवळी झाल्या. स्पृश्य समाजातील लोक विहिरीतून पाणी स्वतः काढून ते अस्पृष्ट समाजातील लोकांना देत; पण त्यांना विहिरीतून पाणी काढून घेऊ देत नसत. समानतेच्या विचाराशी हे विरोधी व विसंगत होते. या बाबतीत सनातनी लोक सोय करण्यास तयार असत; पण समानतेची वागणूक देण्यास तयार नसत. यामुळे काही ठिकाणी तात्त्विक भूमिकेवरून मोठे संघर्ष झाले. १९२७ वर्षी डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाड येथील चौदार तळ्यावरील सत्याग्रह हा त्यातील मोठा संघर्ष होता.

महाडचा सत्याग्रह

मार्च १९२७ मध्ये महाड येथे अस्पृष्टांची एक परिषद डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भरली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर महारांची विलक्षण श्रद्धा होती. परिषदेसाठी तीन तीन दिवसांच्या भाकऱ्या बांधून आणून लांबून लांबूनचे महार जमले होते. परिषदेत पाण्यासंबंधाने प्रस्ताव झाला व सर्वांनी मिळून चौदार तळ्यावर जाऊन तेथे पाणी घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे महार मंडळी मोठ्या जमावाने चौदार तळ्यावर गेली. स्पृश्य समाजाचा त्यांना विरोध होता. शेवटी दंगल झाली व महार मंडळींनी तळ्यातील पाणी घेतले म्हणून स्पृश्य हिंदूंनी कित्येकांना मारहाण केली. ती करताना आपण त्यांना स्पर्श केला याचे त्यांना त्या वेळी भान राहिले नाही ! नंतर त्यांनी तळ्यातील काही पाणी उपसून तळ्याची शुद्धीही केली !

या तळ्याच्या काठी कै. बापूराव जोशी यांचे घर आहे. ते हिंदुसभेचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांनी स्पृश्य समाजाला तुम्ही चूक करीत आहा, महारांना तुम्ही तळ्यातून पाणी घेऊ दिले पाहिजे असे परोपरीने सांगून पाहिले. त्यांच्या सांगण्याचा काही थोड्या मंडळींवर परिणाम झाला; पण स्पृश्य हिंदूंचा मोठा जमाव महारांना तळ्यावर जाऊन स्वतः पाणी घेऊ देण्यास विरोधी होता. त्यामुळे उभयतांत मारामारी झाली. आता महार देवळातही घुसणार आहेत अशी आवईही या वेळी उठविण्यात आली. तेव्हा काही मंदिरांच्या मालकांनी मंदिरांची दारे बंद करून घेतली.

या प्रकरणाची माहिती घेण्याकरिता प्रा. बापूसाहेब माटे व श्री. शं. रा. दाते हे मुद्दाम महाडास गेले होते. त्यांच्या चौकशीत त्यांना असे आढळून आले की, या दंगलीत व पाणी भरण्याच्या कामात स्थानिक महारांच्या ऐवजी परिषदेसाठी बाहेरून आलेल्या महारांचा विशेष आग्रही भाग होता. महारांच्या या तथाकथित आक्रमक कृत्यामुळे चिडून गेलेल्या लोकांनी गावोगावच्या महारांशी असहकार सुरू केला व त्यांची भाकरी बंद केली. अस्पृष्ट वर्ग हा इतर गावकऱ्यांवर जीवनासाठी अवलंबून असल्याने त्यांचे हाल झाले. त्यामुळे अस्पृष्ट वर्गाच्या अडचणीत अधिकच भर पडली.

स्पृश्य समाजातील लोकांना प्रक्षुब्ध करून आपला प्रश्न सुटणार नसून त्यांच्यात विचारपरिवर्तनच घडवून आणण्याची आवश्यकता आहे याचा या प्रसंगाने अधिक प्रत्यय आला. विद्वत्ता, संख्येचे बळ किंवा आर्थिक सामर्थ्य सनातनी समाजाशी तुलनेने अस्पृष्टांचे फार कमी असल्याने त्यांना फार कष्ट सोसावे लागले.

या निमित्ताने डॉ. आंबेडकरांचा बापूराव जोशी यांच्याशी परिचय वाढला. बापूरावांचे महाडकरांनी त्या वेळी ऐकले नाही, एवढेच नव्हे तर काही काळ

बापूराव जोशांना 'महार बापूराव' समजून त्यांजवर काहींनी बहिष्कारही घातला होता. पुढे वातावरण निवळले. डॉ. आंबेडकरांनाही हिंदुसभेची त्यांना सहानुभूति असल्याचा प्रत्यय आला. पुढे जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाडला जात तेव्हा ते आवर्जून बापूराव जोशी यांच्या घरी भेटावयास जात व थोडा वेळ गप्पागोष्टी करीत. हिंदुसभावादी लोक सनातनी असले तरी सुधारक आहेत ही गोष्ट या प्रसंगाने स्पष्ट झाली, व वर्णाश्रम धर्मीयांचे व त्यांचे अनेक सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत जमेनासे झाले. कुंतीच्या हातचे चार घास खाल्ले म्हणजे भीमाला हत्तीचे बळ येत असे अशी कथा आहे. महाडच्या चौदार तळ्यातून स्वतः पाणी काढून ते पिण्याने आपल्याला हत्तीचे बळ प्राप्त झाले असे भीमराव आंबेडकरांनी एकदा उद्‌गार काढले, इतके ते या प्रसंगाला महत्त्व देत.

महाडच्या पाण्याच्या सत्याग्रहाने सर्वत्र या प्रश्नाचा खल सुरू झाला. ठिक-ठिकाणी सार्वजनिक विहिरी अस्पृष्टांनाही खुल्या करण्यात आल्या. तथापि हा प्रश्न ग्रामीण भागात अजूनही न सुटलेल्या अवस्थेत अनेक ठिकाणी आहे. पूर्वी खेडेगावा-तून चारदोन तरी ब्राह्मणांची घरे असत व त्यामुळे ब्राह्मणेतरांना या वादाचे खापर ब्राह्मणांवर फोडता येत असे. पण पुढे ब्राह्मणेतर चळवळीमुळे खेडेगावात राहणे ब्राह्मणांना अशक्य झाल्यामुळे ब्राह्मण समाज तेथून बाहेर पडला. त्यामुळे आता या वादाचे खापर मराठा समाजावरच फुटत आहे. जेथे अजून चार दोन ब्राह्मणांची घरे आहेत तेथे त्यांची अस्पृष्ट वर्गीयांना सहानुभूति व सहमति आहे.

१९७२ वर्षी या प्रश्नाला अधिक चालना देण्यासाठी हिंदुसभेचे नेते श्री. वि. रा. पाटील यांनी आपल्या खानापूर गावच्या गावकऱ्यांसह एक पाणीसमारंभ घडवून आणला. त्यांनी गावच्या सार्वजनिक विहिरीतून हरिजनांच्या हस्ते पाणी काढविले व त्यांच्यासह सर्वांनी त्याची गावभर मिरवणूक काढून व ते पिऊन पाण्याचा प्रश्न आता राहिलेला नाही याची जाहीर सभा भरवून घोषणा केली. या चळवळीत गावच्या सर्व स्पृश्य हिंदूंनीही भाग घेतला होता. सोलापूरहून आलेली अनेक हिंदु-सभावादी स्त्रीपुरुष मंडळीही या प्रसंगी उपस्थित होती व त्यात सामील होती.

पाण्याच्या प्रश्नाच्या बाबतीत आणखी एक अडचण होती. सार्वजनिक पाणवठे म्हणजे नदी, तलाव व सार्वजनिक विहिरी येथे अस्पृष्ट वर्गाला पाणी भरण्यास अनेक ठिकाणी मोकळीक झाली, तरी पुष्कळ ठिकाणी सार्वजनिक विहिरी नसत. बऱ्याच ठिकाणी विहिरी खाजगी मालकीच्या होत्या व तेथे कोणाला पाणी भरू द्यावे किंवा न द्यावे ही त्या मालकाच्या इच्छेची गोष्ट होती. त्याच्यावर सक्ती करता येत नसे. तो व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न समजला जात असे. अखेर सामोपचाराने व मतपरिवर्तनाच्या मार्गानेच हा प्रश्न सोडविणे अवश्य झाले.

मंदिर प्रवेशाचा प्रश्न

याच्या पाठोपाठच मंदिर प्रवेशाचाही प्रश्न निर्माण झाला. मंदिरे ही खाजगी मालकीची किंवा विश्वस्त स्वरूपाची प्रायः आहेत. त्यांनी मंदिरात कोणाला प्रवेश द्यावा किंवा देऊ नये हा त्या त्या मंदिरांच्या मालकांचा प्रश्न होता. तथापि मंदिर-प्रवेशाच्या बाबतीत वाद फार झाला. पुण्यास तुळशीबाग, वेलबाग, पर्वती येथे अस्पृश्य समाज सत्याग्रह करणार अशा जाहिराती लागल्या. पर्वती संस्थानच्या विश्वस्तांनी वाटाघाटीने हा प्रश्न सोडविण्याची तयारी दर्शविली होती; तथापि सत्याग्रहावरच भर देण्याच्या काहींच्या आग्रही वृत्तीमुळे वाटाघाटींना वाव राहिला नाही. तेव्हा विश्वस्तांनी प्रवेशद्वारावर पहारा ठेवला व सत्याग्रहींना विरोध करण्यास सनातनी स्पृश्य समाजाच्या सुसंघटित प्रयत्नांना सुरवात झाली. या वेळी कित्येक मंदिरांच्या मालकांनी आपले मंदिर खासगी आहे अशा पाट्या लावल्या तर काही मंदिरांच्या मालकांनी आपली मंदिरे अस्पृष्टांना खुली केल्याची जाहिरातही केली; पण अशा घटना विरळा. या चळवळीमुळे स्पृश्य हिंदूंना मंदिरात जाणेयेणे सुद्धा अवघड होऊ लागले. कारण बंधने वाढत गेली.

तात्यासाहेब केळकर यांनी नवा 'मध्यम' मार्ग सुचविला होता. त्यांनी असे सुचविले की मंदिराच्या गाभाऱ्यात पुजाऱ्याशिवाय इतर कोणीच जाऊ नये व गाभाऱ्याच्या दारापर्यंत स्पृश्य-अस्पृश्य सर्वांना समान प्रवेश असावा, हा विचार पुष्कळांना मान्य होता; परंतु त्याला विरोधकही पुष्कळ होते. पंढरीच्या पांडुरंगाच्या पायावर मस्तक ठेवून वंदन करण्याची रूढ परंपरा आहे. तेथे सर्व स्पृश्य हिंदूंना हा विशेष हक्क आहे. तो मर्यादित करून घेण्यास सनातन्यांचा विरोध होता. गाभाऱ्याच्या फक्त दरवाजातून 'दुरून' दर्शन घेणे त्यांना पसंत नव्हते. तर कित्येक अस्पृष्ट वर्गीय नेते हे सर्वच देवालयांतून सर्व मूर्तींना स्पर्श करून दर्शन घेण्याचा आग्रह धरीत होते. मंदिराचे पावित्र्य राहिले पाहिजे या परिभाषेत विरोधक बोलत पण केवळ अस्पृष्ट समाजातील लोकांच्या स्पर्शाने मंदिरांचे पावित्र्य कसे भ्रष्ट होते हे कोणी सांगू शकत नव्हते. हा भावनेचा प्रश्न होता व भावना ही मंदिराच्या पावित्र्याशी निगडित होती. पुढे जेव्हा सरकारने कायदा करून सार्वजनिक मंदिरे हरिजनांना खुली केली तेव्हा पंढरपूरच्या काही शास्त्री मंडळींनी पांडुरंगांचे तेज मंत्राने काढून घेऊन ते आपल्या तांब्यात सीलबंद करून ठेवले! हास्यास्पदतेचाही अतिरेक कोठवर होतो त्याचे हे उदाहरण होते!

दक्षिणेकडे बहुतेक मंदिरांतून फक्त पुजाऱ्यांनीच देवळात जाऊन पूजा करण्याचा प्रघात आहे. सर्वसामान्य लोक गाभाऱ्याच्या दरवाज्यांतून मूर्तीचे दर्शन घेतात. पुष्कळ ठिकाणी हीच रूढ पद्धति आहे. तथापि १९२४–४० काळात सनातनी वर्गाने अस्पृष्ट समाजाला मंदिर प्रवेशाच्या बाबतीत फार विरोध केला तर

अस्पृष्टवर्गीय नेत्यांनी गाभाऱ्यात जाऊन मूर्तीला स्पर्श करून दर्शन घेण्याचा आग्रह धरला. त्यामुळे वाद बराच काळ चालला.

जैन मंदिरे

जैन पुढाऱ्यांनी व मंदिर मालकांनी आपली मंदिरे ही जैनधर्मीय लोकांची आहेत, ती हिंदुधर्मीय लोकांची नाहीत व म्हणून तेथे अस्पृश्यांना प्रवेश देण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही; त्यांच्या बाबतीत हा प्रश्न केवळ अप्रस्तुत होय अशी भूमिका घेतली व त्यांना मंदिरे खुली राहणार नाहीत असे सांगून आपले हात या चळवळीपासून झटकून टाकले. जैन हिंदुधर्मीय नाहीत असे त्यांनी घोषित करून टाकले. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश न देण्यासाठी जैनांनी घेतलेल्या भूमिकेचा सरकारने गैरफायदा घेतला व त्यांना हिंदुसमाजातून अलग करून त्यांचा बिगरहिंदूत समावेश करण्याचे योजिले. देशातील सर्व कँटोनमेंट विभाग केंद्रशासित होते. १९२८ वर्षी पुण्याच्या कँटोनमेंट (लष्कर) विभागातील नगरपालिकांच्या निवडणुका व्हावयाच्या होत्या. केंद्रसरकारने सर्व ठिकाणच्या लष्कर विभागांना आदेश दिले की जैन हे हिंदु नसल्याने नगरपालिकांच्या मतदारांच्या यादीत त्यांचा हिंद्वेतरांत समावेश करावा व जैन मतदारांची नावे ते हिंदु नाहीत म्हणून हिंदूंच्या यादीतून काढून टाकून ती बिगर हिंदूंच्या यादीत दाखल करावीत.

हिंदुसंघटनाला ही घटना फारच विघातक होती. हिंदुसभेचे अनेक पुढारी जैनधर्मीय होते. पद्मराज जैन हे तर हिंदुमहासभेचे कोषाध्यक्ष होते. सरकारच्या या धोरणाविरुद्ध हिंदुसभेने आंदोलन केले. अनेक जैन पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. त्यांनाही हे सरकारी धोरण मान्य नव्हते. त्यामुळे चळवळ मोठी झाली. सभा भरल्या, स्वाक्षऱ्यांची मोहीम निघाली व पारमार्थिक जैन धर्म (किंवा पंथ) वेगळा असला तरी जैन हे सामाजिक दृष्ट्या हिंदूच आहेत आणि त्यांचे इतर हिंदूंबरोबर परंपरेनुसार अनेक ठिकाणी विवाहसंबंधही होतात हे त्यांनी सरकारला दाखवून दिले व म्हणून त्यांचा हिंदु मतदार यादीतच समावेश झाला पाहिजे, असे त्यांनी आग्रहपूर्वक मांडले. अखेर सरकारला हे मान्य करावे लागले व त्यांनी जैनांचा हिंदूंत समावेश करण्यास मान्यता दिली. या कामी हिंदुसभेचे पुढारी आ. नारायणराव गुंजाळ व सौराष्ट्र वर्तमानपत्राचे संचालक मुंबईचे श्री. अमृतलाल शेठ यांचे हिंदुसभेला विशेष साहाय्य झाले.

हिंदुसभेचे धोरण

अस्पृश्यता निवारण्याच्या संबंधात १९३२ वर्षी हिंदुसभेने महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेचे एक खास अधिवेशन पुण्यास बॅ. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली भरविले होते. त्यात प्रयाग येथे १९३१ वर्षी झालेल्या हिंदु मुसलमान

तडजोडीच्या संबंधात व महाराष्ट्रात अस्पृश्यांचा प्रश्न त्या काळी फार गाजला होता म्हणून त्याही संबंधात असे दोन महत्त्वाचे प्रस्ताव एकमताने संमत करण्यात आले. अस्पृष्टांच्या संबंधात करण्यात आलेला प्रस्ताव पुढीलप्रमाणे होता :

" (१) अस्पृश्यता निवारण्याच्या बाबतीत कळकळ वाटणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी भूतकालाची विचक्षणा करीत न बसता वर्तमानकाळी हा प्रश्न कसा सोडविता येईल याविषयी प्रयत्न करावा. विशेषतः हिंदु समाजापैकी कोणत्याही घटकः समाजाच्या मनोभावना दुखविल्या जातील अशा प्रकारे शक्य तो त्यांनी लिहू किंवा बोलू नये. सध्या प्रचलित असलेली अस्पृश्यता पालनाची पद्धति ही मानवी समतेच्या व सामाजिक न्यायाच्या विरुद्ध आहे म्हणून शक्य तितक्या लौकर अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यात यावे.

" (२) अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न मुख्यतः मानव्याचा व सामाजिक न्यायाचा असल्यामुळे तो सहभोजन, मिश्रविवाह वगैरे (अन्य) सामाजिक सुधारणांच्या बाबींपासून स्पष्टपणे अलग ठेवावा.

" (३) सभा, शिक्षणसंस्था वगैरे सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांचे समसमान हक्क असल्याबद्दल स्पृश्य वर्गामध्ये जी वाढती जागृति दिसत आहे तिजबद्दल या परिषदेस पूर्ण जाणीव आहे; व त्यांनी सार्वजनिक धर्मशाळा व पाणवठे वगैरे अस्पृश्य वर्गांना खुले करण्याच्या बाबतीतही अशीच जाणीव व्यक्त करावी अशी विनंती ही परिषद स्पृश्य वर्गांना करीत आहे.

" (४) (अ) अस्पृश्य वर्ग हा सनातन हिंदुधर्माचा अनुयायी असून तो हिंदुधर्मातील देवतांचाच उपासक आहे. म्हणून धर्मशास्त्र, उपासनाशास्त्र, आजचा व्यवहार व सामाजिक परिस्थिति यांचा विचार करता हिंदूंच्या सार्वजनिक देवालयांमध्ये अस्पृश्यांना दर्शनार्थ प्रवेश दिला जावा असे या परिषदेचे मत आहे.

" (ब) स्पृश्य हिंदूंच्या वैयक्तिक मालकीची आणि पंचायतींची जी देवालये असतील ती त्यांनी अस्पृश्य वर्गास दर्शनार्थ खुली करावीत व कीर्तन, पुराण, प्रवचन यांच्या श्रवणाचा लाभ त्यांना जेणेकरून घडेल अशी व्यवस्था करावी अशी सभेची आग्रहाची सूचना आहे.

" (क) अस्पृश्यांना मंदिरप्रवेश करू देण्यास असलेला विरोध दूर करण्यासाठी अस्पृश्यता निवारणाचे कार्य करणाऱ्या लोकांना ही परिषद अशी विनंती करते की, अस्पृश्यांनी मृतमांस व गोमांस भक्षण करू नये अशाविषयी अस्पृश्य वर्गामध्ये त्यांनी प्रचार करावा. "

पतितपावन मंदिर, रत्नागिरी

या प्रकरणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी वेगळाच मार्ग काढला. त्यांनी रत्नागिरी येथे भागोजी शेठ कीर यांच्या साहाय्याने व त्यांच्या हस्ते १९३० वर्षी पतितपावन मंदिर उभारले. तेथील लक्ष्मीनारायणाच्या मूर्तीची शंकराचार्य डॉ. कूर्तकोटि यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा झाली होती व भागोजी शेट कीर यांच्या हस्ते वेदमंत्रपूर्वक मूर्तीची स्थापना झाली होती. नंतर तेथे प्रत्यक्ष महार पतिपत्नींच्या हस्ते वेदोक्त पद्धतीने मूर्तीची पूजाही झाली त्यायोगे या प्रश्नाला चांगलीच गति मिळाली.

त्यानिमित्त तेथे सावरकरांनी मोठा उत्सव समारंभ घडविला. सहभोजने घडविली व लक्ष्मीनारायणाच्या मंदिरातच हरिजनांचे एक ' चहालय ' उघडून मंदिरात येणाऱ्या जाणाऱ्यांना हरिजनांच्या हातचा चहा मिळावा अशी व्यवस्था केली. १९२४ पासून सावरकर स्थानबद्धतेमुळे रत्नागिरीस असत. त्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कामी फार मोठा पुढाकार घेतला होता. महारमांगांच्या वस्तीत जाऊन तेथे स्पृश्य-अस्पृश्यांची संयुक्त भजनी मंडळे त्यांनी निर्माण केली होती. त्यांनी भंगी, महार, चांभार इत्यादी जातींच्या मुलांचे मेळे गणेशोत्सवात निर्माण केले. त्यांना हिंदुसंघटनेची पदे दिली व ती विठ्ठल मंदिरात जाऊन म्हणण्यास समाजाकडून मान्यता मिळवून दिली.

या सर्व चळवळीमुळे सनातनी पक्षाच्या विरोधाचे वाळूचे घड्याळ हळूहळू रिते होत चालले होते. सुशिक्षित समाज मंदिर प्रवेशास अनुकूल होत चालला होता; तरी पण संघटित सनातनी मंडळींची रूढ परंपरेत परिवर्तन घडविण्यास प्रतिकूलता कायम होती. ती कालानेच विरून गेली. सरकारने पुढे कायद्याने मंदिरे सर्व हिंदूंना खुली केली तेव्हा त्यास विरोध करण्यास कोणीही पुढे आले नाही.

रत्नागिरी जिल्हा हा कर्मठ सनातनी लोकांचा बालेकिल्ला समजला जात असे. सावरकरांच्या चळवळीमुळे अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात तो आघाडीवर आला. श्री. विठ्ठल रामजी शिंदे हे जेव्हा पतित पावन मंदिराच्या समारंभप्रसंगी रत्नागिरीस गेले, तेव्हा सावरकरांनी चालविलेले अस्पृश्योद्धाराचे कार्य पाहून त्यांनी गौरवाने उद्‌गार काढले की, देवाने आपले उर्वरित आयुष्य सावरकरांना द्यावे व त्यांच्या हातून अस्पृश्योद्धाराचे कार्य तडीस जावे !

१९३५ वर्षी पुण्यास पं. मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली अ. भा. हिंदुमहासभेचे अधिवेशन झाले, त्या वेळी हा विषय चर्चेस निघाला होता. मंदिरे ही खाजगी मालकीची वा विश्वस्त स्वरूपाची असल्याने त्यांच्या मालकी हक्कावर आक्रमण

करणे योग्य नाही या विचारावर तेथे सनातनी मंडळींकडून विशेष भर देण्यात आला. अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाने मंदिर भ्रष्ट होते व त्याचे पावित्र्य नष्ट होते हा विचार मागे पडून त्याला व्यक्तिगत स्वातंत्र्यावरील आक्रमणाचे स्वरूप देण्यात आले; पण हे केवळ मूळ विषयाला बगल देणे होते. त्यामुळे अस्पृश्यांसह सर्वांना ज्यांनी आपले मंदिर खुले केले त्यांच्या त्या धोरणास सनातनी वर्गास विरोध करता आला नाही. कारण तोही विचार त्या त्या मंदिरांच्या मालकांचा विचार होता. हिंदुसभेचे धोरण अस्पृष्टांना मंदिरे दर्शनार्थ खुली करावीत हे पूर्वीच स्पष्ट झाले हाते.

रामरथ प्रकरण

नाशिक येथे दरवर्षी रामनवमीनंतर काळाराम मंदिरातून रामाच्या रथाची मोठी मिरवणूक निघते. हा रथ लोकांनी ओढून नेण्याची प्रथा आहे. या रथाच्या मिरवणुकीत आपण भाग घेणार व रथ ओढणार असे महार पुढाऱ्यांनी जाहीर केले. या वेळच्या सत्याग्रहाचे हे स्वरूप होते. त्यालाही सनातन्यांनी विरोध केला होता. सरकारने १४४ कलमाखाली हुकूम काढून रथाच्या मिरवणुकीलाच बंदी केली. लोकांनी ती तोडण्याचे ठरविले. पुण्याचे श्री. विश्वासराव डावरे यांच्या नेतृत्वाखाली दि. २३।४।३४ ला रथाच्या मिरवणुकीची सिद्धता करण्यात आली. पंचवीस हजार लोक जमले. त्यात अनेक स्त्रियाही होत्या. त्या रथास दोर बांधू लागताच पोलीस आडवे आले. दंगल झाली. दगडफेकीत काही पोलीस घायाळ झाले, तेव्हा पोलिसांनी मिरवणुकीच्या दहाबारा स्थानिक पुढाऱ्यांना व विश्वासराव डावरे यांना अटक केली. त्यांना या प्रकरणी कैदेची व दंडाची शिक्षा झाली.

हिंदुसभेच्या वतीने दाते यांनी या रथमिरवणुकीच्या प्रश्नाची पूर्वापारची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी निरनिराळ्या विचारांचे स्थानिक पुढारी, मंदिराचे पुजारी, सरकारी अधिकारी व महार पुढारी या सर्वांच्या भेटी घेतल्या व त्यांच्याकडून माहिती मिळवून ती वृत्तपत्रातून प्रसिद्ध केली.

डॉ. आंबेडकर विटले

त्यावरून असे आढळून आले की पूर्वीही अस्पृष्टवर्गीय लोक या रथ मिरवणुकीत काही असत. फक्त त्याला जाहीर आव्हानाचे स्वरूप नसे. रथाची मिरवणूक रस्त्याने जाणारी व रस्ता सर्वांना वापरास खुला असल्याने तेथे रथाच्या चाकाला कोणी स्पर्श केला किंवा तो ओढण्यात भाग घेतला तरी ते सहज लक्षात येण्यासारखे नव्हते. विटाळ काय, मिरवणुकीतील एखाद्या माणसास एकाही महाराचा स्पर्श झाला व त्याचा दुसऱ्यांना तरी रथ विटाळणारच! कारण विटाळ होणार तो स्पर्शानेच! एकास विजेचा स्पर्श झाला व त्याचा दुसऱ्यास व त्याचा

इतरांस, तर विजेने सर्वच झपाटले जातात. त्याप्रमाणे अस्पृष्टाचा एकाला स्पर्श झाला व त्याचा इतरांना की सर्व विटाळलेच ! सारांश ही सारी कल्पनाच खुळ-चटपणाची होती. पण ती होती ही वस्तुस्थिति आहे. अखेर ठरल्या दिवशी सरकारच्या बंदीहुकमामुळे रथाची मिरवणूक निघू शकली नाही; पण तेव्हापासून सनातनी लोकांच्या वर्तनाचा उबग येऊन मंदिर प्रवेशाच्या प्रश्नाचा विषयच डॉ. आंबेडकरांनी सोडून दिला. ते सनातनी लोकांना विटले व धर्मान्तराचा विचार त्यांच्या मनात घोळू लागला.

गद्रे यांचा झुणका भाकर संघ

मंदिर प्रवेशाच्या चळवळीच्या पाठोपाठ सहपान व सहभोजन ही चळवळ सुरू झाली. अनेक ठिकाणी सहभोजने घडविण्यात आली. सत्यनारायणाची पूजा अस्पृष्ट समाजातील पति-पत्नींच्या हस्ते करवावी व त्यांनी सर्वांना तीर्थप्रसाद द्यावा असेही कार्यक्रम आखण्यात आले. सामान्यतः अस्पृश्यता निवारण मान्य असणारे व या चळवळीचा पुरस्कार करणारे अशा चळवळीत पुढाकार घेत. पुढे तर मुंबई हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. अनंत हरि गद्रे यांनी झुणका भाकर सहभोजनाचेच कार्यक्रम सुरू केले. ते अस्पृष्ट मंडळी बरोबर घेऊन गावोगाव जात व तेथे झुणका भाकर सत्यनारायण करून सहभोजनांचे कार्यक्रम करीत. त्यास सरकारचेही पुढे उत्तेजन मिळाले. आता या चळवळीतले नावीन्य संपले आहे. कोण कोठे, व कोणाबरोबर खातो पितो याला काही महत्त्व राहिले नाही. पण १९४० पूर्वी हे चळवळीचे विषय होते.

अस्पृश्यतानिवारण व जात्युच्छेद

अस्पृश्यता निवारणाची यापुढची पायरी म्हणजे स्पृश्य-अस्पृश्य समाजांत सहविवाह घडवून आणणे ही समजली जावी असे मानणारांचा एक वर्ग समाजात आहे. समाजवादी पक्षाच्या प्रचारकार्यातील तो एक भाग समजला जातो. असे विवाह कोणी केले तर सरकारही त्यांचे कौतुक करते व त्यास काही बक्षीसही देते. अस्पृश्यतानिवारण म्हणजे जात्युच्छेदाला मान्यता असे समीकरण पाहिजे अशी या लोकांची धारणा असते.

हिंदुसभेने हे धोरण स्वीकारलेले नाही, अस्पृश्यता निवारण हे वेगळे व जात्युच्छेद ही गोष्ट वेगळी आहे, त्यांची गल्लत करू नये असे हिंदुसभा मानते. अस्पृश्यतानिवारणाचा वास्तव अर्थ हिंदुसभा असा समजते की—

" स्पृश्य व अस्पृश्य समाजांत सर्व प्रकारची सामाजिक समता असावी; याचा खोलात जाऊन आणखी अर्थ असा की अस्पृष्ट समाजातीलही लोकांना त्यांच्या मनबुद्धीच्या विकसनास समान संधि मिळाली पाहिजे व त्याच्या विकसित झालेल्या मनबुद्धीच्या वापरासही समान संधि मिळाली पाहिजे. "

हिंदुसमाजातील स्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींच्या प्रमाणेच अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गांनाही हाच न्याय लागू असला पाहिजे. तो प्रत्यक्षात लागू करणे म्हणजे खऱ्या अर्थाने अस्पृश्यता निवारण होय. यासाठी अस्पृश्य समाजातील लोकांना समान शिक्षण, समान सामाजिक वागणूक, कोणत्याही व्यवसायाची व स्वतःचा उत्कर्ष घडवून आणण्याची समान संधि उपलब्ध करून देणे हे समाजाचे, त्याचप्रमाणे शासनाचेही कर्तव्य समजले गेले पाहिजे. अस्पृश्यता निवारणाची वास्तविक व्यवहारमर्यादा एवढी असावयास पाहिजे.

हिंदु समाजात जाती आहेत व नाहीत

अलीकडे स्पृश्य हिंदु समाजातील भिन्न भिन्न जातींच्या लोकांत समारंभपूर्वक विवाह होतात. अशा भिन्नजातीय विवाहांना हिंदुसभा विरोध करीत नाही. पण भिन्नजातीय विवाह म्हणजेच अस्पृश्यता निवारण असे मात्र ती मानीत नाही. हे दोन प्रश्न वेगवेगळे आहेत व त्यांच्या मर्यादाही वेगवेगळ्या आहेत असे हिंदु सभेचे मत आहे. हिंदुसभा शुद्धिकार्याचा पुरस्कार करते. जेथे जातिदृष्टीने रक्तबीजशुद्धि कायम राहिली आहे तेथे शुद्धीकृतांचा त्यांच्या त्यांच्या मूळ जातीत समावेश व्हावा असा तिने प्रयत्न केला. तसेच ज्यांचे परधर्मात असतानाच भिन्नजातीय शरीरसंबंध झालेले आहेत व म्हणून ज्यांची संतति जातिविशिष्ट राहिलेलीच नाही, त्यांना सर्वसामान्य हिंदु जातीत समाविष्ट करण्यात येते, किंवा अशांची संख्या मोठी असली तर त्यांचीच एखादी नवीन जाति बनते. अशा भिन्नजातीय विवाहांना हिंदुसभेने मान्यता दिली आहे.

अशाच एका भिन्नवंशीय, भिन्नजातीय, भिन्नधर्मीय युरोपियनाचे हिंदूकरण करण्याचा व त्याचा विवाह करण्याचा प्रश्न पुणे हिंदुसभेपुढे १९२७ वर्षी निर्माण झाला होता. ती एक मोठी कथाच आहे. ती अशी :

शॉर्ट या आडनावाचे एक इंग्रज गृहस्थ मुंबईस शॉ वॅलेस आणि कंपनीच्या नोकरीत होते. १९१४–१८ या पहिल्या महायुद्धाच्या काळात त्यांना युद्धावर सक्तीने जावे लागले. (त्या वेळी इंग्लंडमध्ये सक्तीची सैन्यभरती चालू झालेली होती.) त्यांचा आधी विवाह झालेला होता. युद्ध चालू असताना ते जर्मनांच्या हाती सापडले व युद्धकैदी झाले. इंग्रज सेनाधिकाऱ्यांना ते मृत झाल्याचे समजले होते. म्हणून मृतांच्या यादीत त्यांचे नाव प्रसिद्ध झाले. त्यांच्या विवाहित पत्नीला ते मृत झाल्याचे वृत्त कळविण्यात आले. तेव्हा ती स्वाभाविकच दुःखी झाली. वर्ष दोन वर्षे वाट पाहून व आपला पति निधन पावला हे निश्चित मानून तिने दुसरा विवाह केला. त्यासही वर्ष झाले.

पुढे १९१८ ला युद्ध संपल्यावर शॉर्ट यांची जर्मनांच्या युद्धकैद्यांच्या छावणीतून सुटका झाल्यावर ते इंग्लडला घरी गेले. तेव्हा आपल्या पत्नीने नवा विवाह

केल्याचे त्यांना समजले. याचे त्यांना फार वाईट वाटले. पण तिची तरी त्यात चूक काय होती ? दोघांनाही झाल्या गोष्टीबद्दल वाईट वाटले, तरी आता उपाय नव्हता. पुढे शॉर्ट पुन्हा शॉ वॅलेस कंपनीच्या नोकरीवर रुजू झाले व परत हिंदुस्थानात आले. मुंबईस ते पूर्वी राहात तेव्हा त्यांच्याकडे घरकामाकरिता एक महारीण होती. तीही फार चांगली बाई होती. तिची यावेळी २०–२५ वयाची मुलगी होती. आता तिच्याशीच विवाह करावा असे शॉर्ट यांच्या मनाने घेतले. हिंदुधर्माबद्दल त्यांना आस्था उत्पन्न झाली होती. परधर्मीयांच्या हिंदूकरणाची उदाहरणे त्यांजपुढे होतीच. शॉर्ट हे स्वभावाने सज्जन, पापभीरु व धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांच्या मित्रमंडळींत अनेक हिंदु होते. त्यांनी हिंदूंच्या काही तीर्थयात्राही केल्या. पुढे शॉर्ट यांची बदली कानपूरला झाली. तेथे एलजिन गिरणीत गोगटे नावाचे एक रंगकाम खात्यात तज्ज्ञ गृहस्थ होते. शॉ वॅलेस कंपनी रंगाचा पुरवठा करणारी व गोगटे हे रंगविण्याच्या कामातील तज्ज्ञ, त्यामुळे दोघांचा परिचय आला. शॉर्ट साहेबाला हिंदुधर्माची, व महाराष्ट्रीय जीवनपद्धतीची ओढ लागली. त्याने हिंदु होण्याचा व विवाहाचा विषय काढला. कानपूरच्या महाराष्ट्र समाजाने या विचारास पाठिंबा दिला व शॉर्ट यांच्या हिंदूकरणाबद्दल व विवाहाबद्दल व्यवस्था करण्यास पुण्यास हिंदुसभेकडे लिहिले.

पुणे हिंदुसभेला हे नवे आव्हानच होते. अखेर हे काम हिंदुसभेने जरूर करावे असे पुणे हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत एकमताने ठरले व त्यासाठी शंकर रामचंद्र दाते यांना पाठवावे असेही ठरले. अद्याप व्यावसायिक भिक्षुक वर्गातून यासाठी भिक्षुक मिळण्यासारखा नव्हता. शुद्धीकरणाचे कार्य दाते यापूर्वीही करीत. आता त्या जोडीला विवाह संस्कारही शिकून घेण्याचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे दाते यांनी तयारी केली व कानपूरला जाऊन त्यांनी शॉर्ट यांचे हिंदूकरण केले व त्यांचा सदर कुमारिकेशी विवाहही लावून दिला. या कामी कानपूरच्या महाराष्ट्र समाजाने फार साहाय्य केले. सदर श्री. शॉर्ट यांनी आपले नवे नाव विष्णुपंत आळेकर (कारण त्यांची ही पत्नी जुन्नर जवळील आळे येथील राहणारी होती.) हे नाव धारण केले, व पुणेरी पगडी, लांब कोट, धोतर नेसलेले आणि पायात पुणेरी जोडा असा एक फोटो काढवून व त्याखाली विष्णुपंत आळेकर असे आपले नाव देवनागरी लिपीत लिहून तो भेट म्हणून दिला.

१९३५-३६ च्या सुमारास ते पुण्यास सहकुटुंब आले असता त्यांचा दाते यांच्या घरीच चार दिवस मुक्काम होता.

मिलरबाईचे हिंदूकरण

याच काळात आणखी एक मोठे उदाहरण इंदूर येथे घडले. इंदूरचे माजी महाराज तुकोजीराव होळकर यांनी मिलर नावाच्या एका युरोपियन मुलीबरोबर

विवाह करण्याचे ठरविले. ही बाई ख्रिश्चनधर्मीय होती. तिचे हिंदूकरण करण्यात यावे व तिला हिंदु करून हिंदू विवाहपद्धतीनुसार तिच्याशी विवाह करावा अशी होळकरांची इच्छा होती. ते राजे असल्यामुळे राजघराण्याचा व नंतरच्या राज्याच्या वारसाचा प्रश्नही यात गुंतलेला होता. त्यामुळे या प्रश्नाची त्या काळात फार चर्चा झाली.

मिलरचे हिंदूकरण शंकराचार्य कूर्तकोटि यांच्या आशीर्वादाने व्हावे अशी होळकरांची इच्छा होती. मूळचा हिंदु बाटून ख्रिस्ती वा मुसलमान झाला तर त्याला शुद्ध करून घेण्यास जेथे जुन्या शास्त्रीपंडितांचा विरोध होता, तेथे एका मूळच्या परदेशीय, परवंशीय, परधर्मीय कुमारिकेला हिंदु करून घेण्यास व तेही पीठस्थ शंकराचार्यांच्या आशीर्वादासह व त्यांच्या सान्निध्यात करून घेण्यास शास्त्री मंडळींचा केवढा विरोध झाला असेल हे समजण्यासारखे आहे. पण शंकराचार्य कूर्तकोटि अविचल होते. पूर्वी अनेक मूळच्या मुसलमानांनाही हिंदुधर्मात घेतल्याची उदाहरणे त्यांना माहीत होती. धर्मपरंपरा त्याने बुडत नाही, उलट ती अधिक समर्थ होते असे ते मानीत. त्यामुळे त्यांनी मिलरचे १९२८ मध्ये नाशिकला हिंदूकरण करवून घेतले व पुढे इंदूरला तुकोजीराव होळकरांबरोबर तिचा विवाहही झाला. त्यानंतर शुद्धीला विरोध करणारांचे सारे अवसानच संपले.

जुन्या जाती व नव्या जाती

तात्पर्य हिंदुधर्मीयांतही भिन्न जातीय विवाह पूर्वी होत व आजही ते मोठ्या प्रमाणावर होतात. त्यामुळे पूर्वीच्या जातिपद्धतीला तडे जात आहेत. पण त्यातून नव्या काळात नव्या पायावर नव्या जातीही निर्माण होत आहेत हे दिसून येईल.

हिंदु समाजात आज ज्या हजारो जाती व पोटजाती निर्माण झाल्या आहेत त्या भिन्न वंशांच्या व वर्णांच्या संकरामुळे, तसेच स्थलभेद, भाषाभेद, व्यवसायभेद, धर्मभेद, आचारभेद, मतभेद, इत्यादि अनेक कारणांवरून झालेल्या आहेत व आजही त्या नव्याने होत आहेत. भिन्नजातीय विवाहांना आता कायद्यानेही मान्यता मिळालेली असल्याने त्यांची संख्याही अलीकडे मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. ज्या मानाने बदलत्या काळात बदलती समान संस्कृति, बदलती समान वैचरिक पातळी, समान शैक्षणिक दर्जा, समान आर्थिक परिस्थिति बदलत जाईल त्या प्रमाणावर जातिभेदाचे विद्यमान आटे सैल होत जातील व कालान्तराने हिंदु समाजात नवी जात्यन्तरे निर्माण होतील म्हणजे जातिभेदांचे आजचे प्रकार बदलले तरी पुन्हा नवीन पद्धतीने नवीन प्रकारची जातिसंस्था निर्माण होतच राहील. जगभर हे असेच व सतत चालूच आहे.

कारण समाज हा अनेक घटकांच्या समान पातळीवरील परस्पर समानत्वाने बनत असतो. तो सर्वत्र अगदी एकास एकसारखा असत नाही. तरीं त्यात मूलः

भूत स्वरूपाची एकात्मता निर्माण झालेली असते. एकात्मतेत अनेकता व अनेकत्वात एकात्मता ज्या समाजात स्थिर स्वरूपाने नांदते तोच खऱ्या अर्थाने जिवंत समाज असतो. सामाजिक विषमता नष्ट करण्यावर व अस्पृश्यता नष्ट करून सर्वांना सर्व प्रकारची समान संधि मिळवून देण्यावर हिंदुसभेने या कालात विशेष भर दिला हे हिंदुसभेचे वैशिष्टच होय.

पुणे हिंदुसभेचे महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेत परिवर्तन

१९२४ वर्षी पुण्यास हिंदुसभा स्थापन झाली व तिचे कार्य त्या वेळच्या काळात जरी महाराष्ट्रभर चालू होते तरी तिचे नाव व घटनात्मक स्वरूप 'पुणे हिंदुसभा' एवढेच होते. ते बदलून त्यास १९३१ वर्षी महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा असे नाव देण्यात आले व पुणे हिंदुसभा ही प्रांतिक हिंदुसभेची एक शाखा बनली. या संबंधात प्रांतिक हिंदुसभेच्या १९३१–३२ च्या वृतान्तात असे म्हटले आहे की

" आतापर्यंत हिंदुसभेचे कार्यक्षेत्र केवळ पुण्यापुरतेच होते. ते महाराष्ट्राइतके व्यापक करण्याचा चालकांचा फार दिवसांपासून मनोदय होता. अकोला येथे अ. भा. हिंदुमहासभेचे अधिवेशन दि. १० ऑगस्ट १९३१ ला झाले. तेव्हा या संधीचा फायदा घेण्यात आला. अखिल भारत हिंदुमहासभेच्या कमिटीवर सभासद निवडण्याबद्दल मुख्य कचेरीकडून पत्र आले तेव्हा कार्यकारी मंडळाने वाई, कऱ्हाड, सातारा, सांगली, वसई, सोलापूर, नाशिक, रत्नागिरी या सभांस लिहून प्रतिनिधि निवडले व त्या सभांनी त्यांस मान्यताही दिली."

जातीयवाद्

मोर्ले-मिंटो सुधारणांचा कायदा अमलात आल्यापासून हिंदुस्थानचे राजकारण अधिक गतिमान् झाले होते. १९१९ च्या या कायद्याने प्रांतीय क्षेत्रात लोकांना काही अधिकार प्राप्त झाले होते. त्यामुळे विधिमंडळांच्या निवडणुकींना जिवंतपणा प्राप्त झाला होता. खिलाफत बुडाल्यापासून मुसलमानांनी काँग्रेस व गांधी यांना सोडून दिले होते. आता त्यांची इंग्रजांबरोबर पुन्हा हातमिळवणी झाली होती. गांधी व काँग्रेस यांचे ध्येय हिंदुस्थानला स्वराज्य संपादन करून देण्याचे होते तर मुसलमान नेत्यांपुढे या देशात इस्लामी सत्ता प्रतिष्ठित करण्याचे ध्येय होते. दोघांनाही लोकशाही पद्धतीतून आपापले ध्येय साधावयाचे होते. मुसलमानांनी आरंभी आपण अल्पसंख्य असल्यामुळे मुसलमान समाजाला संरक्षणात्मक काही विशेष अधिकार हवेत ही भूमिका घेतली होती. इंग्रजांच्या कृपेने १९०९ व १९१९ च्या घटनेत त्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आल्यामुळे त्यांची फुटीर आकांक्षा वाढत गेली व आपण हिंदु समाजाहून वेगळे आहो व वेगळे राहण्यानेच आपल्या इस्लामवादी आकांक्षा सिद्ध होऊ शकतील हा विचार मुसलमान समाजात खोलवर रुजत गेला.

लोकशाही पद्धतीत लोकसंख्येला विशेष महत्त्व असते हे ओळखून आपले महत्त्व वाढविण्याकरिता मुसलमानांनी आपली संख्या वाढविण्यावर विशेष भर दिला. मलबारातील मोपल्यांच्या बंडात हिंदूंच्या कत्तली मोठ्या प्रमाणावर झाल्या. त्याचप्रमाणे हजारोंना त्यांनी सक्तीने बाटविले. त्यानंतरही लोकसंख्या वाढीसाठी मुसलमानांच्या देशभर अनेक चळवळी सुरू झाल्या. तेव्हा त्यावर हिंदु समाजानेही शुद्धीचा उपाय अमलात आणला. मलबारात बाटविलेल्या सर्वांना त्यांनी परत हिंदुधर्मात घेतले, एवढेच नव्हे तर पूर्वी मोंगल व पोर्तुगीज राजवटीच्या काळात ज्यांना सक्तीने बाटविण्यात आले होते त्यांचेही शुद्धीकरण सुरूच झाले. एवढेच काय पण जन्मजात ख्रिश्चन किंवा मुसलमान असलेल्यांना पूर्वी हिंदु धर्मात घेतले जात नसे; त्यासही आता हिंदूंत घेण्यास पुन्हा नव्याने सुरवात झाली.

वास्तविक या शुद्धीच्या आंदोलनाचे स्वरूप हे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक होते; पण जेव्हा बाटवाबाटवी व शुद्धीकरणे ही मोठ्या प्रमाणावर व सामुदायिक रीतीने होऊ लागली तेव्हां लोकशाहीत संख्येला महत्त्व असल्याने त्याला आपोआपच राजकीय स्वरूपही प्राप्त झाले. जोपर्यंत शुद्धीकरणे होत नव्हती तोपर्यंत एखाद्याला बाटविले की ख्रिश्चन-मुसलमानांचे काम कायमचे भागत असे; एकदा कोणी बाटला की कायमचा, त्यात बदल होत नसे. पण शुद्धीकरणाची

चळवळ सुरू होताच नुसते बाटविण्यापासून काही फारसा फायदा होत नाही हे मुसलमानांच्याही लक्षात आले व त्यांनी हिंदूंवर राजकीय दडपण आणण्यासाठी बाटविण्याच्या चळवळीपेक्षा दंगे निर्माण करण्याचा मार्ग अधिक परिणामकारक म्हणून स्वीकारला.

दंग्याची परंपरा

१९२० नंतर हिंदुस्थानात जागोजाग मुसलमानांनी शेकडो दंगे केले. त्यांची परंपरा अजूनही संपलेली नाही. इंग्रजांना आपली सत्ता टिकविण्यासाठी व काँग्रेस-विरुद्ध आपले बळ वाढविण्यासाठी मुसलमानांच्या सहकार्याची गरज होती, तर सत्ता इंग्रजांच्याच हातून मिळणारी असल्याने मुसलमानांनी इंग्रजांचे हस्तक बनावे हे समजण्यासारखे होते. अशा वेळी मुसलमानांच्या न्याय्य मागण्या तेवढ्या मान्य करून त्यापुढे रेसभरही जाण्यास काँग्रेसने विरोध करावयास हवा होता. पण गांधी-वाद त्यास आडवा आला. जे काही मिळवावयाचे ते अहिंसेच्याच मार्गाने मिळवा-वयाचे या विचारावर गांधींचा भर होता व काँग्रेसची सर्व सूत्रे त्यांच्या हाती होती. हिंदुमुसलमानांचे ऐक्य झाले तरच स्वराज्य मिळेल असे गांधींना वाटत होते. इंग्रजही तशी आशा त्यांना लावीत व बनवीत गेले व गांधी व काँग्रेस बनत गेली.

हिंदुसभेने मात्र या बाबतींत शुद्ध राष्ट्रवादी भूमिका घेतली व स्वा. सावरकरांनी हिंदुसभेच्या व्यासपीठावरून १९३७ वर्षी व नंतर सतत खणखणीतपणे ती मांडली. सध्याच्या परिस्थितीत हिंदु मुसलमान एकीवर भर देणे व्यर्थ आहे हे लक्षात घेऊन "याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्याशिवाय व विरोधाल तर तुम्हांसही विरोधून हिंदु आपल्या एकटयाच्या बळावर या देशाचे स्वातंत्र्य संपादन करतील" हा सिद्धान्त सावरकरांनी ठासून मांडला. व तोच खरा असल्याचे प्रत्यक्षात प्रत्ययासही आले. गांधीवाद हिंदु मुसलमानांच्या केवळ एकीच्या पायावर उभा होता, तर सावरकरवाद हिंदूंच्या स्वतंत्र स्वयंभू राष्ट्रीय सामर्थ्याच्या पायावर उभा होता. कांग्रेसने गांधीवाद स्वीकारलेला होता तर हिंदुमहासभा सावरकरवादावर उभी होती. त्यामुळे हे दोन विचारप्रवाह एकत्र येऊ शकले नाहीत. आजही मुसलमानांचा अनुनय करण्याचे काँग्रेसने सोडले नसल्यामुळे ते एकत्र येऊ शकत नाहीत.

पाकिस्तानचा विचार

पाकिस्तानचा विचार हा इंग्लंडमध्ये १९३० वर्षी भरलेल्या गोलमेज परिषदेच्या वेळीच इंग्लंडमध्ये बरकतअल्ली प्रभृति मुसलमान नेत्यांनी मांडला होता. त्यांच्या कल्पनेत हिंदुस्थानात अनेक पकिस्ताने निर्माण करण्याची योजना होती. जेथे जेथे मुस्लिम लोकसंख्या अधिक आहे किंवा जेथे जेथे मुस्लिम संस्था-निकांची सत्ता आहे अशा सुमारे दहाबारा ठिकाणी मुस्लिम पाकिस्ताने निर्माण

करण्याची व त्यासाठी लोकसंख्येचीही अदलाबदल करण्याची बरकत अल्ली यांची योजना होती व ती त्यांनी त्या वेळी विलायतेत छापून सर्वत्र प्रसिद्धही केली होती.

१९३० च्या पहिल्या गोलमेज परिषदेला गांधी गेले नाहीत. त्या वेळी ते व इतर अनेक कॉंग्रेसवादी मीठ व जंगल सत्याग्रहाच्या कारणावरून तुरुंगातच होते. पुढे त्यांची सुटका झाली. १९३१ च्या दुसऱ्या गोलमेज परिषदेला गांधी हजर राहिले. त्या वेळी हिंदुमुसलमानांच्यामध्ये सत्तेची वाटणी कशी करावी या संबंधाने वाद उपस्थित झाला होता. हिंदु मुसलमान वादात काही तरी तडजोड घडवून आणण्याचे पुष्कळ प्रयत्न झाले. १९२५ साली मुंबईस, व दिल्लीस, कलकत्ता प्रयाग येथे व अशा अनेक ठिकाणी व अनेक वेळा हिन्दुमुसलमान वाद मिटविण्यासाठी कमालीचे प्रयत्न झाले पण ते विफल झाले. त्यात अगदी शेवटचा प्रयत्न १९३१ मध्ये अलाहाबाद येथे ऐक्य परिषद भरवून करण्यात आला, पण तोही अखेर विफल झाला. त्या संबंधात महाराष्ट्र हिन्दुसभेने पुण्यास बॅ. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १९३२ मध्ये भरविलेल्या परिषदेत संमत केलेल्या प्रस्तावात स्पष्ट म्हटले आहे की –

(१) अलाहाबादचा निर्णय आहे या स्थितीत सदोष असून खालील शिफारशींच्या अनुरोधाने त्यात दुरुस्ती घडवून आणावी असे या परिषदेचे मत आहे.

(२) राष्ट्राच्या घटनेत कोणत्याही समाजास कायद्याने बहुमत देणे हे लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे. त्यामुळे राष्ट्रात राष्ट्रीय भावनेची अभिवृद्धि होणे शक्य नाही.

(३) मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार यांच्यामध्ये अधिकारांची वाटणी झाल्यानंतर अवशिष्ट राहिलेले अधिकार प्रांतिक सरकारास देण्याचे तत्त्व शेवटी निःसंशय आत्मघातकीपणाचे होईल.

(४) ब्रेन कमिटीचा निर्णय व सिंध प्रांतातील हिंदूंना वाटत असलेली भीति यांचा विचार करता सिंध प्रांत मुंबईपासून अलग करणे सध्या तरी इष्ट नाही.

(५) सर्व समाजांच्या हिताहितांचा विचार करता सर्व मतदारांचे संघ संयुक्त असावेत व अशा संघांमार्फत प्रतिनिधींची निवड करण्यात यावी.

(६) मंत्रिमंडळाची घटना जातिविशिष्ट पायावर करण्याची पद्धति अमलात आणणे अनिष्ट आहे.

अलाहाबाद ऐक्य परिषदेने मुसलमानांना केंद्रीय लोकसभेत स्वतंत्र मतदार संघातून ३२ टक्के प्रतिनिधित्व देऊ केले होते व त्यास ऐक्य परिषदेसाठी जमलेल्या हिंदु मुसलमानांनी मान्यताही दिली होती. त्या वेळी मुसलमानांची हिंदुस्थानातील एकंदर लोकसंख्या २५ टक्के होती. इतरही अनेक अनिष्ट गोष्टी केवळ ऐक्य साधावे म्हणून हिंदुमुसलमान पुढाऱ्यांनी एकत्र जमून स्वीकारल्या होत्या. पण हे

प्रस्ताव प्रसिद्ध होताच त्या वेळचे ब्रिटिश भारतमंत्री सर सॅम्युअल होअर यांनी जाहीर केले की ब्रिटिश सरकार केंद्रीय शासनात मुसलमानांना एक तृतीयांश प्रतिनिधित्व देईल. त्याबरोबर अलाहाबाद येथे मान्य झालेल्या प्रस्तावास चिकटून न राहता मुसलमानांनी त्यास हरताळ फासला व ब्रिटिश सरकारच्या धोरणास सर्वांनी एकजात पाठिंबा दिला!

पहिल्या व दुसऱ्या गोलमेज परिषदांना डॉ. मुंजे हिंदुसभेचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित होते. त्यांनी तेथे हिंदुसभेची भूमिका स्पष्टपणे मांडली. गांधीनाही मुसलमानांचे समाधान करणे जमले नाही, अखेर त्यांनी त्या वेळचे ब्रिटिश पंतप्रधान मॅक्डोनल्ड यांनी या बाबतीत लवाद निवाडा द्यावा या विचारास मान्यता दिली. त्यास हिंदुसभेने तीव्र विरोध केला. मॅक्डोनल्ड यांनी मुसलमानांना स्वतंत्र मतदार संघही दिले व तृतीयांश प्रतिनिधित्वही दिले. जातवारीचा निवाडा म्हणून तो प्रसिद्ध आहे. गांधींनी त्याविरुद्ध अक्षर काढले नाही. महाराष्ट्रातील हिंदुसभावादी मंडळींनी दि. २१ ऑक्टोबर १९३४ दिवशी पुण्यास श्री. रामभाऊ कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सर्वपक्षीय परिषद भरवून या निवाड्याचा तीव्र निषेध केला; पण काँग्रेसने त्यास उलट मान्यता दिली! एवढेच नव्हे तर हा विषय दिल्लीच्या लोकसभेपुढे आला तेव्हा काँग्रेसच्या प्रतिनिधींनी मौन स्वीकारून त्यास लोकसभेचीही मान्यता मिळवून दिली! हिंदुमहासभा व काँग्रेस यांच्यामधील वैचारिक संघर्षास तेव्हापासून अधिकच तीव्र स्वरूप प्राप्त झाले.

हिंदुमहासभेचे धोरण

हिंदुमहासभेच्या १९३५ च्या पुण्याच्या अधिवेशनाचे अध्यक्ष पं. मालवीय होते. त्या अधिवेशनात हिंदुमहासभेचे आधीचे अध्यक्ष तात्यासाहेब केळकर, डॉ. मुंजे, भाई परमानंद, भिक्षू उत्तम आदि सर्व माजी अध्यक्ष उपस्थित होते. रामरथाच्या चळवळीमुळे तेथे मंदिरप्रवेशाचा प्रश्न उपस्थित होणार होता. सनातनी मंडळींनी या अधिवेशनात मोठ्या प्रमाणावर भाग घेतला. अस्पृष्टांच्या मंदिर प्रवेशाने मंदिर विटाळते ह्या विचाराला बगल देऊन मंदिरे खाजगी आहेत व म्हणून व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कावर अतिक्रमण करण्याचा कोणास अधिकार नाही या नावाखाली मंदिरांच्या मालकांच्या इच्छेवर हा प्रश्न सोपवावा अशा आशयाचे धोरण व्यक्त करण्यात आले.

जातवार मतदारसंघांना विरोध

या अधिवेशनापुढील दुसरा महत्त्वाचा प्रश्न मुसलमानांना दिलेल्या स्वतंत्र मतदारसंघाचा होता. ब्रिटिश पंतप्रधान मॅकडोनल्ड यांनी दि. १६ ऑगस्ट १९३२ ला लवाद निवाडा दिला होता. त्यात दोन भाग होते. मुसलमानांना त्यांनी स्वतंत्र

मतदारसंघ व त्यांत एक तृतीयांश जागा दिल्या होत्या; त्याचप्रमाणे अस्पृष्ट वर्गीयांनाही त्यांनी स्वतंत्र मतदारसंघ दिले. हे गांधींना फारच बोचले व त्यासाठी येरवडा तुरुंगात असताना तेथे त्यांनी प्राणान्तिक उपोषण आरंभिले. त्याबरोबर सर्वत्र गडबड उडाली व गांधींचे प्राण वाचविण्यासाठी डॉ. आंबेडकर यांच्यावर जो तो दडपण आणू लागला. आंबेडकरांना स्वतंत्र मतदारसंघाची भूमिका तत्त्वत: मान्य नव्हतीच. पण गांधीच्या एकंदर वागण्याच्या पद्धतीने जिना जसे चिडून गेले होते तसेच आंबेडकरही उबगले होते. अखेर दि. २४ सप्टेंबर १९३२ ला गांधींनी संयुक्त मतदारसंघात अस्पृष्टांना दुप्पट जागा देण्यास मान्यता दिली. तेव्हा आंबेडकरांनी ती तडजोड स्वीकारली, व उभयपक्षी मान्य झालेली तडजोड सरकारने मान्य केली.

निवडणुकीच्या राजकारणास प्रारंभ

मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास व त्यांस तृतीयांश जागा देण्यास हिंदुमहासभेचा विरोध होता. तो या अधिवेशनात स्पष्टपणे मांडण्यात आला, व स्वतंत्र मतदारसंघाच्या तत्त्वाविरुद्ध देशभर आंदोलन करण्याचे ठरले. या आंदोलनाचा एक भाग म्हणजे १९३५ च्या नव्या घटनेनुसार होणाऱ्या निवडणुकीत भाग घ्यावयाचा व घटनात्मकरीत्या विरोध करावयाचा.

या वेळी हिंदुमहासभेने निवडणुका लढवाव्या की लढवू नयेत असा प्रश्न उपस्थित झाला. या वेळपर्यंत हिंदुसभेने स्वतंत्रपणे कोणत्याही निवडणुकीत भाग घेतला नव्हता. हिंदुसभेचे पुढारी काँग्रेसच्या अंतर्गत असलेले स्वराज्य पक्ष, व नंतर प्रतिसहकार पक्ष या पक्षांच्या वतीने निवडणुका लढवीत आले होते. महाराष्ट्रात या वेळी लोकशाही स्वराज्य पक्ष स्थापन झालेला होता व तोही काँग्रेसच्या अंतर्गतच पक्ष होता. त्याची वर्गणी त्या वेळी पाच आणे असे. पैकी चार आणे काँग्रेसच्या सभासदत्वाची व एक आणा लोकशाही पक्षाची अशी व्यवस्था होती.

यापूर्वी काँग्रेसने गांधींच्या नेतृत्वाखाली १९२० साली कौंसिल बहिष्कार पुकारला तेव्हा त्याला विरोध करण्याकरिता पुढे काँग्रेसमधीलच बंडखोरांनी स्वराज्य पक्ष निर्माण केला होता. पं मोतीलाल नेहरू, बॅ. दास, तात्यासाहेब केळकर, जयकर प्रभृति लोक या बंडखोर पक्षाचे पुढारी होते. त्यामुळे गांधींना व काँग्रेसला बहिष्कार उठवावा लागला होता. पुढे त्यांच्यातही फाटाफूट होऊन केळकर पक्षीयांनी प्रतिसहकार पक्ष नावाचा एक पोटपक्ष निर्माण करून त्याच्या वतीने निवडणुका लढविल्या होत्या व त्या जिंकल्याही होत्या.

वेगळा राजकीय पक्ष कां ?

पुढे १९३० च्या गांधींच्या मीठ व जंगल सत्याग्रहाच्या आंदोलन काळात काँग्रेसपुढारी तुरुंगात पडले व त्या काळात हे पक्ष विरून गेले. राजकीय जीवन

चैतन्यहीन झाले व अगदीच मरगळीस आले, तेव्हा त्यात नवे चैतन्य निर्माण करण्याकरिता टिळकपक्षीयांनी १९३४ मध्ये मुंबईस लोकशाही स्वराज्य पक्ष स्थापन केला. तोही काँग्रेसच्या अंतर्गतच होता. हिंदुमहासभेचे सर्व राजकारण त्या पक्षाच्या वतीने चालत असे. राजकारणात लोकशाही स्वराज्यपक्ष व समाजकारणात हिंदुसभा अशी जोड होती. पण लोकशाही स्वराज्पक्ष फक्त महाराष्ट्रातच होता. अन्य प्रांतांतून त्याचा प्रसार झालेला नव्हता. म्हणून भाई परमानंदांचे म्हणणे असे होते की हिंदुमहासभेने स्वतःच्याच नावाने निवडणुका लढवाव्यात. महाराष्ट्रातील लोकांचा लोकशाही पक्षावर अधिक भर होता. अखेर हिंदुमहासभेच्या अधिवेशनात भाईजींनी हिंदुसभेच्या नावावर व महाराष्ट्रात लोकशाही पक्षाने लोकशाही स्वराज्य पक्षाच्या नावावर निवडणुका लढविण्यास मान्यता देण्यात आली.

याला आणखी एक कारण होते. ते असे की महाराष्ट्रात कामगार वर्गाचे मतदारसंघ होते व ते संयुक्त होते. हिंदु, मुसलमान. पार्शी, ख्रिश्चन अशा सर्व जातीजमातींचे त्यात मतदार असल्यामुळे अशा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास केवळ हिंदुसभेपेक्षा लोकशाही स्वराज्य पक्षाची भूमिका अधिक सोयीची होती; तर उलट पंजाबात असा कामगार मतदारसंघच नसल्याने तेथे सर्वसाधारण म्हणजे फक्त हिंदूंचाच मतदारसंघ होता.

हिंदुमहासभेचे नेतृत्व करणारे व काँग्रेसमध्येही एक प्रमुख पुढारी म्हणून गाजलेले पं. मालवीय व त्यांच्या जोडीस बापूजी अणे यांनी स्वतंत्र मतदारसंघांना विरोध करण्याकरिता 'नॅशनॅलिस्ट' पार्टी या नावाने वेगळा पक्ष काढून त्या द्वारे निवडणूक लढविण्याचे ठरविले. पण ऐन निवडणुकीच्या वेळी हा पक्ष स्थापन झाल्यामुळे त्या पक्षाने बळ असे कधी धरलेच नाही.

काँग्रेसचा बहिष्कार

१९३६ मध्ये फैजपूर येथे डिसेंबरात काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्यात १९३५ च्या घटना कायद्यानुसार होणाऱ्या निवडणुकीत भाग घेण्याचे काँग्रेसने ठरविले व त्या मोठ्या प्रमाणावर जिंकल्याही. पण त्यांची भाषा घटना राबविण्याची नव्हती, मोडतोडीची होती. आपण निवडणुकीत भाग घेऊन निवडून आल्यावर ही घटना मोडून टाकू (Wreck or Combat) अशी काँग्रेसनेत्यांची जाहीर प्रतिज्ञा होती. वस्तुतः ती खरी नव्हती. काँग्रेसमध्ये या वेळी दोन गट होते. एक घटनात्मक कारभार राबवावा या मतांचा होता, तर दुसरा डावा समजला जाणारा गट आग्यावेताळी प्रवृत्तीचा होता. म. गांधींचा आणखी तिसराच पंथ होता. पण त्यांच्यात सर्वच काँग्रेसवाल्यांचे नियंत्रण करण्याचे सामर्थ्य होते व त्यांच्याशिवाय बाकीच्यांचे काही चालत नव्हते. काँग्रेसच्या वास्तविक धोरणाचा राजाजींनी मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड अर्स्किन यांच्याजवळ खासगी भेटीत परिस्फोट केला होता.

मोडतोडीची भाषा हे केवळ नाटक होते. राजाजींनी गव्हर्नरांना असे स्पष्ट सांगितले की The object of the Congress was not to wreck or combat the Government of India Act but to cooperate with the representatives of the British Government and the British Crown and that the declarations made by the Congress of combating or wrecking the Constitution was only a pose to placate the left wing forces in the Congress. (खरे दर्शन भाग १, पृ. ९३)

(काँग्रेसचा उद्देश १९३५ चा घटना कायदा मोडण्याचा नसून ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींशी सहकार्य करण्याचाच आहे. मोडतोडीच्या ज्या घोषणा आहेत त्या काँग्रेसमधील डाव्या गटाच्या लोकांना खूष करण्याकरिता म्हणून केलेल्या आहेत.)

तथापि १९३७ च्या निवडणुका जिंकल्यानंतर काँग्रेसला विरोधाचे नाटक करावे लागले व अति लोभाच्या आशेने त्यांनी हातचेही गमाविले.

१९३५ च्या कायद्याखाली १९३७ वर्षी निवडणुका झाल्या व त्यांत काँग्रेसने प्रथमच अधिकृत रीत्या भाग घेतला. लोकशाही पक्षानेही या निवडणुकीत भाग घेतला व त्यांत हिंदुसभेचे पुढारी रामभाऊ मंडलीक, शिवरामपंत करंदीकर गणपतराव फडके, बॅ. जमनादास मेहता, प्रभृति मंडळी निवडून आली. काँग्रेसने विधानसभेत बहुमत जिंकले होते व त्यांना मंत्रिमंडळ बनविण्याचा हक्क प्राप्त, झाला होता; पण गांधींचा बहिष्कारवाद पुन्हा उफाळून वर आला! त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने या वेळी निवडणुकीवर बहिष्कार घालण्याऐवजी मंत्रिमंडळे बनविण्यावर बहिष्कार घातला! त्यामुळे सरकारने महाराष्ट्रात धनजी शहा कूपर यांना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण केले. त्यांनीही ते अंगावर घेतले. त्यांना लोकशाही स्वराज्य पक्षाचा पाठिंबा हवा होता. त्यांनी बॅ. जमनादास मेहता यांना मंत्रिमंडळात भाग घेण्याची व अर्थमंत्रिपद स्वीकारण्याची विनंती केली.

सावरकरांची सुटका

जमनादास मेहता यांनीही चालून आलेली ही संधि घेतली; पण मंत्रिपद स्वीकारण्यापूर्वी त्यांनी केळकर-भोपटकर यांच्या संमतीने एक अट घातली. ती अशी की सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकर यांजवरील स्थानबद्धतेची अट रद्द करून त्यांस संपूर्णपणे मुक्त केले पाहिजे. सावरकरांना अंदमानाच्या तुरुंगातून १९२१ वर्षी भारतात आणण्यात आले होते. त्या वेळी त्यांना येरवडा व रत्नागिरी तुरुंगात ठेवण्यात आले होते. पुढे १९२४ वर्षी त्यांना तुरुंगातून मुक्त करून पांच वर्षांकरिता रत्नागिरी जिल्ह्यात स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. त्यांच्यावरील सर्व बंधने काढून टाकावीत व त्यांस संपूर्णपणे मुक्त करावे यासाठी हजारो लोकांच्या सह्यांचे अर्ज सरकारकडे पाठविण्यात आले होते. पण त्यांचा उपयोग

झाला नाही. या अर्जावर गांधींनी सही करण्यासही नकार दिला होता! पुढे १९२९ वर्षी स्थानबद्धतेची मुदत संपताच सरकारने ती पुन्हा वाढविली होती. या पार्श्वभूमीवरून पाहता बॅ. जमनादास मेहता त्यांच्या धोरणाची व त्यांनी घातलेल्या अटींची कसोटी महत्त्वाची होती. सरकारने अखेर ती मान्य केली व स्वा. सावरकरांना दि. १० मे १९३७ दिवशी संपूर्णपणे मुक्त करण्यात आले. विधिमंडळ क्षेत्रातील लोकशाही स्वराज्य पक्षाच्या म्हणजेच हिंदुसभेच्या कार्याची ही पहिली यशस्विता होती.

सरकारने १९३५ चा घटना कायदा केला असला तरी हिंदुमुसलमानात भांडणे लावण्याचे इंग्रजांचे राजकारण चालूच होते. मशिदीवरून वाद्ये वाजवीत जाणाऱ्या हिंदूंच्या मिरवणुकीला मुसलमान विरोध करू लागले व त्यांनी विरोध केला की सरकार १४४ कलमाचा वापर करून मिरवणुकींना बंदी करी. त्यामुळे हिंदुसमाजात अस्वस्थता निर्माण होई. हे प्रकार पूर्वीपासून चालत आले होते. पुण्याजवळील तळेगाव येथे दाभाडयांच्या गणपतीच्या मिरवणुकीस सरकारने १९२७ वर्षी अशीच बंदी घातली. त्याविरुद्ध हिंदुसभेच्या वतीने मोठी चळवळ झाली. तळेगाव येथे डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली एक परिषद भरविण्यात आली. लोकांनी मुसलमानांवर बहिष्कार घातला. त्यांचे जीवन जेव्हा कठीण झाले तेव्हा त्यांनी मशिदीवरुन वाद्ये वाजवीत जाण्यास केलेला विरोध मागे घेतला. आणि शेवटी सरकारनेही बंदी हुकूम मागे घेतला व अखेर मिरवणूक मशिदीवरून वाजतगाजत गेली. पण सरकारला असा वाद वाढविण्याची खुमखूम होती.

१९३०–३१ च्या सुमारास पुण्यास लक्ष्मीरोडची नवी आखणी झाली व त्यात रस्त्यात येणाऱ्या सोन्या मारुती मंदिरास शेजारी जागा देण्यात आली व तेथे छोटेसे मारुती मंदिरही उभे झाले. हे मंदिर त्याच्या पूर्वेस जरा बाजूस असलेल्या एका मशिदीपासून सुमारे शंभर फूट अंतरावर आहे, सरकारला व मुसलमानांना हे निमित्त पुरले व या मंदिरात पूजेची घंटा वाजविण्यास मुसलमानांनी विरोध केला व सरकारने तो उचलून धरला! हा वाद बरेच दिवस धुमसत होता. अखेर त्याविरुद्ध हिंदु समाजानेही आंदोलन केले.

१९३७ वर्षीच ते आंदोलन सुरू झाले. सरकारने घंटा वाजविण्यासही बंदीचा हुकूम काढला. तेव्हा सरकारी बंदीहुकूम मोडून हजारावर लोकांनी आंदोलनात भाग घेतला. त्यात कित्येकांना तुरुंगाची शिक्षा झाली तर कित्येकांना जबर दंड ठोठावण्यात आले. ही चळवळ एका बाजूला चालू असतानाच त्याच वेळेला धनजीशहा कूपर हे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले होते व बॅ. जमनादास मेहता हे त्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होते. लोक सत्याग्रह करीत होते, अशा एका दिवशी बॅ. जमनादास मेहता व सत्याग्रहाच्या आंदोलनात भाग घेणारे व तुरुंगात

जाऊनही आलेले हिंदुसभेचे पुण्यातील अनेक कार्यकर्ते यांची श्री अण्णासाहेब भोपटकर यांच्या घरी मोठी बैठक झाली. त्या बैठकीत काहींनी बॅ. जमनादास मेहता यांनी मंत्रिपदाचे त्यागपत्र द्यावे असे सुचविले. मेहता यांनी आपण या बाबतीत काय काय केले ते सांगितले व ते म्हणाले की या परिस्थितीत मंत्रिपदाचे त्यागपत्र देण्यास आपण केव्हाही तयारच आहोत. त्यागपत्र देण्याची त्यांनी तयारी दर्शविली पण त्यास केळकर भोपटकरांचा विरोध होता, त्यांचे म्हणणे असे की तुम्ही त्यागपत्र देऊन बाहेर पडण्याने काही साधणार नाही. उलट तुम्ही आतून सरकारी धोरण बदलण्याचा प्रयत्न करा व आम्ही बाहेरून हुकुमतोडीचे आंदोलन चालवितो. असे आतून-बाहेरून दडपण आणल्यानेच सरकारला आपले धोरण बदलावे लागेल, आणि तसेच झाले. अखेर सरकारने बंदी हुकम मागे घेतला व सोन्यामारुति सत्याग्रह यशस्वी झाला.

हिंदुमहासभेचे ‘ दर्शनकार ’ स्वा. सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची मे १९३७ मध्ये स्थानबद्धतेतून मुक्तता झाल्यावर त्यांनी १८ जून १९३७ ला रत्नागिरीहून प्रयाण केले व ते कोल्हापूरमार्गे पुण्यास येऊन मुंबईस गेले. वाटेत जागोजाग त्यांचे सत्कारही झाले. रत्नागिरीस असताना राजकारणात भाग न घेण्याचे त्यांजवर बंधन होते; त्यामुळे त्यांनी सामाजिक कार्यात भाग घेतला व शुद्धीकरणाची व अस्पृश्यता निवारणाची प्रचंड मोहीम हाती घेतली.

या काळात समाजात मतपरिवर्तन घडवून आणण्याची फार आवश्यकता होती. सावरकरांनी लेख लिहून, भाषणे करून, पंडितांशी वादविवाद करून व प्रत्यक्षात कृति करून समाजात मतपरिवर्तन घडवून आणले. त्यांनी गणेशोत्सवात महार चांभारांचे मेळे काढले व मंदिरांतून त्यांचे कार्यक्रम करविले. भंगी मुलाला गायत्री मंत्र शिकविला व त्याच्याकडून वेदोक्त बंदी तोडली. भागोजी कीर यांच्या साहाय्याने त्यांनी पतितपावन मंदिर उभारले व तेथे महार कुटुंबाकडून वेदोक्त रीतीने लक्ष्मीनारायणाची पूजा घडविली. सहभोजनाचा उपक्रम केला व वेदबंदी, समुद्र बंदी, स्पर्शबंदी, पाणीबंदी, मंदिरबंदी, धर्मबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी अशा सामाजिक बेड्या तोडल्या व हिंदु समाजात परिवर्तन घडवून आणले. रत्नागिरीस असतानाच त्यांचा हिंदुत्व हा विचारप्रवर्तक निबंध सर्वमान्य झाला होता. त्यांचे लेख वृत्तपत्रांतून शक्य तेथे नावाने व नैर्बंधिक अडचणी होत्या तेथे टोपण नावाने प्रसिद्ध झाले. ते स्थानबद्धतेतून मुक्त होताच त्याचवर्षी १९३७ च्या डिसेंबरात कर्णावती (अहमदाबाद) येथे भरणाऱ्या हिंदुमहासभेचे नेतृत्व त्यांनी स्वीकारले. तेव्हापासून किंबहुना त्या पूर्वीपासूनच ते हिंदुमहासभेला मार्गदर्शन करीत आले. हिंदुमहासभेला

' दार्शनिक सिद्धान्त ' सावरकरांपासून लाभले आहेत. लो. टिळक-केळकरांनी जे राजकारण प्रत्यक्षात केले त्या राजकारणामागील तत्त्वांना ' दार्शनिक सिद्धान्तां'चे स्वरूप सावरकरांनी दिले आहे. हिंदुमहासभेच्या विचारसरणीची उभारणी त्यांनी घालून दिलेल्या पायावर झालेली आहे.

अनाथ हिंदु महिलाश्रम

हिंदुसभेच्या कार्यात चळवळीचा जसा भाग होता त्याचप्रमाणे स्थिर स्वरूपाचे विधायक कार्यही महत्त्वाचे होते. आरंभीच्या काळात हिंदुसभेने शुद्धिकार्य व अस्पृश्यतानिवारण ही विधायक कार्ये हाती घेतली होती. स्वामी श्रद्धानंद यांच्या हत्येनंतर त्यांच्या स्मरणार्थ पुणे हिंदुसभेने ' श्रद्धानंद शुद्धिनिधि ' या नावाचा एक निधि सुरू केला होता. तो कायम स्वरूपाचा असावा व त्याच्या व्याजातून शुद्धिकार्याला सतत मदत होत रहावी अशी कल्पना होती. म्हणून त्याचा हिशोबही वेगळा ठेवण्यात येत असे. नंतरच्या काळात आणखी एक नवे विधायक कार्य हिंदुसभेने हाती घेतले. १९३५ वर्षी तिने पुण्यास अनाथ हिंदु महिलाश्रम स्थापन करण्याच्या कामी पुढाकार घेतला. मुंबईस यापूर्वीच श्रद्धानंद हिंदु महिलाश्रम स्थापन झाला होता. १९२७ मध्ये मुंबई प्रांतिक हिंदुसभेचे अध्यक्ष बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून तीत हा आश्रम काढण्याचे ठरले व दि. २२ डिसेंबर १९२७ ला तो सरकारी नोंदणीखात्यात नोंदण्यातही आला. या कामात बॅ. जयकर, श्री. नारायणलाल बन्सीलाल व डॉ. कल्याणदास देसाई यांचा विशेष पुढाकार होता. प्रत्यक्ष महिलाश्रमाचे कार्य डॉ. उदगावकर व श्री. श्रीपाद शंकर नवरे यांनी दीर्घकाल केले. डॉ. उदगावकरांच्या निधनानंतर श्री. नवरे यांनी अगदी अलीकडेपर्यंत या आश्रमाची धुरा सांभाळली. ते दहा वर्षे मुंबई हिंदुसभेचे कार्यवाह होते. पुढे प्रभातचे संपादकीय कार्य त्याजवर विशेष पडल्यावर त्यांनी हिंदुसभेचे कार्यवाहपद सोडले तरी श्रद्धानंद महिलाश्रमाचे त्यांचे कार्य चालूच होते. अलीकडेच वयानुसार निवृत्ति स्वीकारताना त्यांनी एप्रिल १९६९ पासून ते सोडले आहे.

श्री. नरसिंह चिंतामण उपाख्य तात्यासाहेब केळकर, श्री. लक्ष्मण बळवंत उपाख्य अण्णासाहेब भोपटकर व श्री. जनार्दन सखाराम उपाख्य तात्यासाहेब करंदीकर हे केसरीचे संपादक व विश्वस्त आणि हिंदुसभेचे अध्यक्ष यांनी या कार्यास विशेष चालना दिली. त्यांच्या साहाय्याने व मार्गदर्शनाखाली केसरीचे त्या वेळचे एक उपसंपादक व हिंदुसभेचे कार्यवाह श्री. रामकृष्ण गोपाळ उपाख्य बाबूराव भिडे व पुण्यातील एक व्यापारी श्री. नारायण विष्णु उपाख्य राजाभाऊ गोडबोले यांनी अनाथ हिंदु महिलाश्रम या संस्थेच्या उभारणीच्या कामी व पुढे प्रत्यक्ष कार्यातही परिश्रम केले व ही संस्था नावारूपास आणली. दि. १९ मार्च १९३५ ला पुण्याच्या महिलाश्रमाची स्थापना झाली व लगेच तिची घटना तयार करण्यात येऊन

सरकारी संस्था नोंदणी खात्यात ती ११ एप्रिल १९३५ ला नोंदण्यातही आली. पुढे सुमारे दीड वर्षानंतर तिला सरकारी मान्यताही मिळाली, व प्रतिवर्षी अनुदानही मिळू लागले. पुणे हिंदु सभेने या अनाथ हिंदु महिलाश्रमास श्रद्धानंद शुद्धिनिधीतून पाचशे रुपये दिले व संस्थेच्या आश्रयदाता वर्गात ती समाविष्ट झाली. त्याचप्रमाणे श्रद्धानंद शुद्धिनिधीची शिल्लकही ठेवरूपाने या संस्थेत ठेवण्यात आली.

पुढे १९४७–४८ वर्षी रझाकारांचा उपद्रव निजाम राज्यात फार वाढला तेव्हा तेथील लोकांना निकडीच्या साहाय्याची गरज होती, म्हणून ही ठेव काढून घेण्यात आली व अनाथ हिंदु महिलाश्रमास आणखी पाचशे रुपये देणगी देऊन बाकीची रक्कम मराठवाड्यातील लोकांच्या साहाय्यासाठी खर्च करण्यात आली. पुढे श्रद्धानंद शुद्धिनिधीचे बँकेत जे खाते होते त्यातीलही शिल्लक काढून घेऊन ते बंद करण्यात आले व उरलेली सर्व रक्कम महाराष्ट्र हिंदुसभेस (पावती क्र. ३४१३ दिनांक ३०।७।१९५९) देऊन हा निधि संपविण्यात आला.

तत्कालीन सामाजिक परिस्थिति

त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीसंबंधाने पुण्याच्या संस्थेच्या प्रथम वार्षिक वृत्तान्तात (सन १९३५-३६) म्हटले आहे :

" समाजात स्त्रियांवर होणारे अन्याय विविध प्रकारचे असतात. केवळ दारिद्र्य आहे म्हणून स्त्रियांचा त्याग करणारे विरळ. आपणास चतकोत भाकरी मिळाली तर ती दोघे मिळून खाऊ ही वृत्ति बहुधा असते; परंतु काही ठिकाणी अत्यंत उलट अनुभव येतो. घरची संपन्न स्थिति असताही बाहेरख्यालीपणाने स्वस्त्रीचा छळ करून अगर तिचा त्याग करून तिला घराबाहेर घालवून देणारेही अनेक लोक असतात. अनाथ विधवा स्त्रियांच्या दुर्बल स्थितीचा फायदा घ्यावयाचा व त्यांना पतित करून मग कानावर हात ठेवावयाचे अशाही वृत्तीने लोक समाजात वावरतात. द्वितीय विवाह केल्यावर पहिल्या पत्नीचा व अपत्यांचा छळ करून त्यांना नको हे जिणे अशा स्थितीत सोडणारे, अगर घरात एकटेच पतिपत्नी राहात असतील तर त्या स्थितीचा गैरफायदा घेऊन स्त्रीला वाईट मार्गाला लावणारे अधमही समाजात काही कमी नाहीत. आश्रमात आश्रयार्थ आलेल्या स्त्रियांत वरील सर्व प्रकार होते."

तेथे पहिल्या वर्षी (१९३५–३६) आश्रमात दाखल करण्यात आलेल्या स्त्रियांत ब्राह्मण १०, मराठा १, सुतार २, प्रभु ३, शिंपी २, नायडू २, एकूण २० स्त्रिया व मुलांत ब्राह्मण ७, मराठा ५, सुतार १, प्रभु ३, शिंपी १, नायडू २, कोमटी १, व सोनार १ एकूण २१ अशी एकूण ४१ संख्या होती. ही संख्या दरसाल वाढत गेली. १९५२–५३ च्या वृत्तान्तात ही संख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे : ब्राह्मण ५५, मराठा ३१, शिंपी ३, गवळी १, कोळी १, सोनार ३, मद्रासी १,

सिंधी १, महार १०, लिंगायत २, तेलगू १, मांग ७, सुतार २, माळी १, चांभार ४, सारस्वत २, मलबारी १, गुरव १, शेटी १, शीख, १, कानडी १, वंजारी १, बंगाली १, इतर १, एकूण १३३. सामान्यतः दरवर्षी सुमारे दीडशे स्त्रिया व मुले यांना ही संस्था आश्रय देत आली आहे. आता या मुलामुलींच्या शिक्षणासाठी संस्थेने शाळाही चालविली आहे.

मुंबईच्या श्रद्धानंद हिंदु महिलाश्रमाने गेल्या १९२८-७३ या ४५ वर्षांच्या काळात ४१८१ स्त्रियांना व ३७०९ मुलांना आश्रय दिला असून त्यांच्या जीवनाला योग्य वळण लावण्याचे श्रेय संपादन केले आहे. त्यांत ८२३ विधवा, १४३३ कुमारिका, १९२५ विवाहित पण परित्यक्त स्त्रिया असल्याचे १९७३–७४ च्या वृत्तांतात नमूद केले आहे. याही संस्थेने मुलांच्या शिक्षणासाठी शाळा चालविली असून उद्योगव्यवसायांच्या शिक्षणाचीही सोय केली आहे. याशिवाय या संस्थेने स्त्रियांसाठी वृद्धाश्रमही सुरू केला आहे.

जामिनक्यांच्या हिसक्यांचे पर्व

श्री. दाते हे आपले देवनागरी लिपीच्या संशोधनाचे व मोनोटाईप यंत्रावर ती बसविण्याचे काम संपवून १९३२ मध्ये हिंदुस्थानात परत आल्यावर ते हिंदुसभेच्या कामात पुन्हा लक्ष घालू लागले. नाशिक येथील रामरथाच्या प्रकरणाची माहिती त्यांनी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली होती. तिचा उल्लेख मागे आलाच आहे.

या काळात लोकसंग्रह छापखान्याच्या आधाराने शिवरामपंत करंदीकरांचे त्रिकाळ दैनिक वर्तमानपत्र सुरू झाले होते. दाते हे लोकसंग्रह छापखान्याचे व्यवस्थापक व मुद्रक असल्याने 'त्रिकाळ' पत्राच्या कारभारात त्यांचे करंदीकरांना कमी अधिक साहाय्य असे. या वृत्तपत्रातून जातीय निर्णय, काँग्रेसची मुसलमानधार्जिणी वृत्ति व ब्रिटिश सरकारचे हिंदुविरोधी धोरण यांविरुद्ध टीका असे, व हिंदुसभेच्या कार्याचा पुरस्कार असे. त्यामुळे ते सरकारच्या डोळ्यांवर आले होते. सरकारला हिंदुसभावादी नकोसे व डोईजड वाटू लागले होते व त्यांची खच्ची करण्याचे सर्व प्रकारचे सरकारी प्रयत्न सुरू होते. त्यांत हिंदुसभावादी वृत्तपत्रांकडून व हिंदुत्वाचा प्रचार करणाऱ्या पुस्तकांच्या मुद्रकांकडून जामिनक्या मागण्याचे व अन्य मार्गाने त्यांना दहशत बसविण्याचे धोरण सरकारने अवलंबिले. याचाच एक भाग म्हणजे लोकसंग्रह छापखाना व त्याचे मुद्रक श्री. दाते यांजविरुद्ध सरकारने प्रेस ॲक्टाचा बडगा उगारला.

या हत्याराचा वापर सरकारने सतत केला आहे. हिंदुसभेच्या प्रत्यक्ष कारभारातील तो भाग नसला तरी हिंदुमहासभेच्या चळवळीवर प्रहार करण्याच्या व हिंदुसभेची खच्ची करण्याच्या सरकारच्या धोरणातीलच तो भाग होता व म्हणून

त्याचा उल्लेख हिंदुसभेच्या इतिहासात समाविष्ट करणे योग्य होईल. ते एक स्वतंत्रच प्रकरण आहे व म्हणून ते येथे थोड्या सारांशाने देण्यात येत आहे.

जामिनकीचा पहिला तडाखा

लोकसंग्रह छापखान्यात १९३४ साली स्वदेशी मेळा पद्यावली या नावाची गणेशोत्सवातील मेळ्याच्या पदांची एक छोटी पुस्तिका छापण्यात आली होती. ती प्रसिद्ध झाल्यावर सुमारे सहा महिन्यांनी मुंबई सरकारने प्रेस ॲक्टाखाली लोकसंग्रह छापखान्याचे कीपर (मुद्रक) म्हणून दाते यांजकडून एक हजार रुपयांची जामिनकी दि. २७ फेब्रुवारी १९३५ ला मागितली. दहा दिवसांत ती भरावी लागली. त्या शिवाय छापखाना चालविता येत नव्हता.

या काळात गणेशोत्सवातील मेळ्यांच्या पद्यावल्या प्रथम सरकारकडून मंजूर करून घ्याव्या लागत. त्याशिवाय पदे म्हणतां येत नसत. पूर्वी अशा पद्यावल्यांतून काही प्रक्षोभक व वाद वाढविणारी पदे छापली जात व त्यातून अनेक वाद वाढत. म्हणून सरकारने १९२५ नंतरच्या काळात पदे तपासून व मान्य करून देण्याची पद्धति स्वीकारली होती. ती १९३४ साली चालूच होती. त्याप्रमाणे ही पद्यावलीही नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तपासून व मंजूर करून दिलेली होती. अशी मंजूर झालेली पद्यावली छापल्याबद्दलही मुंबई सरकारने जामिनकी मागितली याचा सर्वांनाच अचंबा वाटला !

नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्याने मंजूर केलेली सही शिक्क्याची प्रत व जामिनकीची नोटीस घेऊन दाते यांनी मुंबई सरकारच्या गृहखात्याच्या सेक्रेटरीचीभेट-घेतली. तेव्हा तर ते अवाकच झाले ! त्यांना या मान्यतेची काहीच कल्पना नव्हती. आपली चूक त्यांना उमगली व अखेर त्यांनी दि. २५ मार्च १९३५ ला जामिनकीची रक्कम परत केली. पण तेव्हापासून सरकारने डूक धरला व ते दाते यांच्यामागे हात धुऊन लागले !

साने गुरुजींची पत्री

१९३५ मध्ये साने गुरुजी यांचा 'पत्री' हा काव्यसंग्रह लोकसंग्रह छापखान्यात छापला जात होता. तो जून १९३५ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याबरोबर मुंबई सरकारने प्रेस ॲक्टखाली दि. १५ ऑगस्ट १९३५ ला दाते यांजवर नोटीस बजावून दोन हजार रुपयांची जामिनकी मागितली. या सुमारे चारशे पानी पुस्तकातील चार सहा कवितांतील मिळून फक्त दहाबारा ओळी सरकारी दृष्टीला अत्याचाराला उत्तेजन देण्याची प्रवृत्ति असलेल्या व सरकारविरुद्ध द्वेष पसरविणाऱ्या आहेत असे दिसले व त्याबद्दल सरकारने सर्व पुस्तकच आक्षेपार्ह ठरविले !

दाते यांनी या संबंधात गृहखात्याच्या सेक्रेटरीला लिहून कळविले की या आक्षिप्त समजल्या गेलेल्या कवितांत नमूद केलेले विचार व त्यांची भाषा अशाच-

सारख्या कविता याच सरकारने मंजूर केलेल्या पाठ्यपुस्तकांतूनही आहेत व त्या आज सर्वत्र चालूही आहेत. दाते यांनी आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ काही उदाहरणे व उतारेही दिले. तसेच पत्री या पुस्तकातील कवितांच्या संबंधात अनेक विद्वान् लेखक व प्राध्यापक यांचे अभिप्रायही कळविले व प्रत्यक्ष भेटून चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली. आक्षेपार्ह कोणते व आक्षेपार्ह नाही कोणते हे ठरविण्याचा सरकारी निकष समजून द्या अशी त्यांच्याकडे दाते यांनी मागणीही केली. पण कशाचाच उपयोग झाला नाही. "मुलाखत देण्यापासून काही उपयोग होईल असे वाटत नाही" असे सरकारचे उत्तर आले !

यानंतर लोकसंग्रह छापखान्यात त्या वेळी छापल्या जात असलेल्या एका पुस्तकातील काही मजकूर गृहखात्याकडे अभिप्रायार्थ पाठविला व हा मजकूर सरकारच्या दृष्टीने आक्षेपार्ह आहे काय, कारण तो छापण्यासाठी आला आहे तेव्हा तो आम्ही छापावा काय अशीही पृच्छा केली. त्यावर सरकारकडून उत्तर आले की "सरकार काही लोकांसाठी कायद्याचे सल्लागार नाही. तुम्ही योग्य त्या कायदेपंडितांचा हवा तर सल्ला घ्या व काय करावयाचे ते करा."

चर्चेतून सरकारी धोरण अधिक स्पष्ट होईल ही अपेक्षा चुकीची ठरली. सरकारने तडाखे मारण्याचेच ठरविले होते. पण या सर्व पत्रव्यवहारात दोन महिने गेले. सरकारी नोटिशीविरुद्ध वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्यास दोन महिन्यांची मुदत असे ती निघून गेली होती. गणेशोत्सवातील 'पद्यावली'च्या संबंधांत काढलेल्या जामिनकीची नोटीस परत घ्यावी लागल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना थप्पड बसली होती, व सरकारच्या पदरात नामुष्की पडली होती. त्यामुळे आता ते विशेष ताठर व सूड बुद्धीने प्रेरित झाले होते. काही करून तडाखेच हाणावयाचे असा त्यांचा दृष्टिकोन ठरून गेला होता !

त्रिकाळमधील लेख

शिवरामपंत करंदीकर यांचे 'त्रिकाळ' हे दैनिक वृत्तपत्र लोकसंग्रह छापखान्यात छापले जात होते. त्यात रावसाहेब पटवर्धन या एका समाजवादी नेत्याच्या सोलापूरमधील एका भाषणाचा वृत्तान्त प्रसिद्ध झाला होता. तो सरकारच्या दृष्टीने आक्षेपार्ह होता. तेथील दंगलीबद्दल जे चौघे इसम फाशी गेले त्यांचा त्या भाषणात गौरव होता. सरकारने तो वृत्तान्त आक्षेपार्ह ठरवून लोकसंग्रह छापखान्याकडून 'पत्री' हे पुस्तक छापल्याबद्दल पूर्वी घेतलेली दोन हजार रुपयांची जामिनकी जप्त केली व नवी तीन हजारांची मागितली ! रावसाहेब पटवर्धन यांनी सरकारला आव्हान दिले की माझ्या भाषणाबद्दल दुसऱ्यांना कां शिक्षा करता ? तुमच्यात प्रामाणिकपणा असेल तर माझ्यावर खटला भरा ना ! परंतु सरकारने ते आव्हान

स्वीकारले नाही. छापखान्याचे मात्र दोन हजार रुपये बुडाले व नवीन तीन हजार भरावे लागले !

हिंदुसमाजदर्शन

या गोष्टीला पुरे सहा महिने झाले नाहीत तोच दाते यांनी 'हिंदुसमाज दर्शन' हे पुस्तक छापल्याबद्दल पूर्वी भरलेली तीन हजार रुपयांची जामिनकी सरकारने जप्त केली व दाते यांजकडून पाच हजार रुपयांची नवी जामिनकी मागितली. हिंदुमहासभेचे अधिवेशन पुण्यास १९३५ च्या डिसेंबरात भरले होते व त्यानिमित्त हिंदुसभेने काढलेले 'हिंदुसमाजदर्शन' हे पुस्तक दाते यांनी लोकसंग्रह छापखान्यात छापले होते. या पुस्तकात हिंदु समाजावर कसकसे आक्रमण होत आहे, दंगे कुठे व कसे होत आहेत या संबंधाने वृत्तपत्रांतून आलेली माहिती एकत्रित करून दिलेली होती. हा ग्रंथ पुणे हिंदुसभेचे एक श्रेष्ठ कार्यकर्ते प्रा. श्रीपाद महादेव उपाख्य बापूसाहेब माटे यांनी तयार केला होता व त्यास त्यांनी एक छोटीशी प्रस्तावना लिहिली होती. या मोठ्या आकाराच्या दीडशे पानी पुस्तकातील फक्त प्रस्तावनेतील दोन छोटे परिच्छेद सरकारने आक्षेपार्ह ठरविले व त्याबद्दल दि. २८ मे १९३६ ला सबंध पुस्तकच जप्त केले.

सरकारने केवळ दडपशाही चालविल्याचे हे उघड उघड निदर्शक होते. या काळात मुसलमानांना हिंदूंविरुद्ध चिथावणी देणाऱ्या व राष्ट्रभक्तांचा छळ करणाऱ्या सरकारी धोरणाबद्दल त्रिकाळ दैनिकात पुष्कळ टीका येत असे. त्या काळात काँग्रेसने जातीय मतदारसंघांना मान्यता दिल्यामुळे ती जनतेत फार अप्रिय झाली होती. हिंदुसभा ही एकच संस्था या काळात ब्रिटिश सरकारला विरोध करणारी एकमेव राष्ट्रवादी संस्था होती. त्यामुळे तिच्याविरुद्ध व तिचा पुरस्कार करणाऱ्यांविरुद्ध सरकारने प्रेस ॲक्टचा बडगा उगारला होता. त्याला तोंड देणे कठीण होते. कारण पैशाचे सोंग आणता येत नाही. अखेर लोकसंग्रह छापखाना बंद करण्यात आला व सरकारी नोटिशीविरुद्ध वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्यात आले. यामुळे लोकसंग्रह 'छापखान्या'चे पुढे लोकसंग्रह 'कारखान्या'त रूपांतर करण्यात आले व मुद्रणशाळेच्या नावाने छापखाना सुरू करण्यात आला.

श्री. काशीनाथ नारायण उपाख्य बाबासाहेब धारप यांनी हिंदुसमाजदर्शन या पुस्तकाचे अपील दाखल केले व बॅ. जयकर यांनी ते चालविले. हायकोर्टाने ते स्वीकारले व सरकारी नोटीस रद्द केली. सदर पुस्तकात जे दोन परिच्छेद आक्षेपार्ह समजण्यात आले आहेत ते तसे आहेत असे धरूनही दोनशे पानी पुस्तक त्यामुळे आक्षेपार्ह ठरविणे योग्य नाही असे मत हायकोर्टाच्या फुलबेंचने व्यक्त केले. त्यामुळे जामिनकीच्या आपत्तीतून 'हिंदुसमाजदर्शन' हे पुस्तक सुटले व जप्त झालेली तीन हजार रुपयांची जामिनकीची रक्कम परत मिळाली. हाच न्याय 'पत्रो' पुस्तकाच्या

जामिनकी प्रकरणी लागू होता, तेथेही तीनशे पानांच्या पुस्तकातील दहाबारा ओळीच सरकारी दृष्टीने आक्षेपार्ह होत्या. तथापि त्या वेळी संबंधित कायद्याच्या अज्ञानामुळे योग्य मुदतीत अपील दाखल केले गेले नाही व म्हणून त्याचा भूर्दंड भोगावा लागला.

१९३७ साली कांग्रेसची मंत्रिमंडळे स्थापन झाल्यानंतरही सरकारी धोरणात विशेष फरक पडला नव्हता. याच काळात मुनशी गृहमंत्री असताना सरकारने १९३८ वर्षी त्रिकाळमधील एका लेखाबद्दल करंदीकरांकडून तीन हजारांची जामिनकी मागितली. तेव्हा दाते यांनी एक पत्रक काढून लोकांनी ही रक्कम उभी करावी व काँग्रेस सरकारही कसा अन्याय करीत आहे हे दाखवावे असे आवाहन केले. दहा दिवसांत ३५०० वर रक्कम जमली, तेव्हा गरज भागली आता आणखी देणग्या नकोत असे दाते यांनी पुन्हा पत्रक काढले व मुनशी यांना भेटून लोकमताचा हा अहेर त्यांस सादर केला ! पण मुनशींनी जामिनकीची नोटीस मागे घेतली नाही. तो त्यांच्याही प्रतिष्ठेचा प्रश्न बनला होता. पुढे १९३९ मध्ये त्रिकाळमधील एका बातमीबद्दल सरकारने आक्षेप घेऊन आधी घेतलेली जामिनकी रद्द केली व नवीन तीन हजारांची मागणी केली. तेव्हा करंदीकरांनीही त्रिकाळ बंद केला.

ओतुरकरांचा हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास

पुणे अनाथ विद्यार्थिगृहाने प्रा. ओतुरकर यांचा हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास हे पुस्तक प्रकाशनार्थ घेतलेले होते. पाठ्यपुस्तक म्हणून सरकारने ते मान्यही केले होते व त्याच्या चारपाच आवृत्याही यापूर्वी प्रसिद्ध झाल्या होत्या. या वेळी नियमानुसार नवे पुनर्मुद्रण सरकारी मान्यतेसाठी पाठवले होते. पण या वेळी सरकारची दृष्टि बदलली होती. अफझलखानाने शिवाजीवर स्वारी करताना हिंदु देवतांवर केलेल्या अत्याचारांचा त्या पुस्तकात उल्लेख होता. शिक्षणखात्याने प्रकाशकांना १९३८ वर्षी कळविले की ती ती आक्षिप्त वाक्ये काढून टाकावीत. त्याशिवाय पुस्तकास मान्यता राहणार नाही.

पुस्तकात आलेले सर्व संबंधित उल्लेख हे सर्व सरकारमान्य इतिहासग्रंथांतून घेतलेले होते. तरी पण पाठ्यपुस्तकातील त्यांच्या उल्लेखामुळे मुसलमान समाजाविरुद्ध अप्रीति वाढीस लागेल असे आता सरकारचे धोरण ठरले होते व म्हणून त्यांनी खरा इतिहास बदलण्यास प्रकाशकांना भाग पाडण्याचे धोरण स्वीकारले होते.

सरकारचे हे पत्र आल्यावर ओतुरकर व दाते दोघेही शिक्षणखात्यातील संबंधित अधिकाऱ्याला भेटण्यास गेले व त्यांनी इतिहास पुस्तकात नमूद केलेले उल्लेख हे ' इति ह आस ' म्हणजे प्रत्यक्ष घडलेली घटना आहेत तेव्हा इतिहासाशी प्रतारणा करणे बरोबर होणार नाही, इत्यादि विचार त्यांजपुढे मांडले. पण त्यांचे एकच पालुपद होते. आम्ही सुचविले आहेत ते बदल केल्याशिवाय पुस्तकास

आता मंजुरी मिळणार नाही ! मान्यता देण्याचा अधिकार असलेले सरकारी अधिकारी काहीच ऐकण्यास तयार होईनात तेव्हा त्यांच्या वरिष्ठाकडे हा प्रश्न नेण्याचे दाते व ओतुरकर यांनी ठरविले. या वेळी काँग्रेसचे मंत्रिमंडळ सत्तेवर आलेले होते व बाळासाहेब खेर हे शिक्षणमंत्री होते. त्यांजपुढे दाते व ओतुरकर यांनी हा विषय मांडला. तेव्हा खेरांनी शिक्षणखात्याच्या सेक्रेटरीकडे हे प्रकरण धाडले. त्यांनी नंतर मुसलमानांचे पुढारी, व दाते व ओतुरकर यांना भेटीस बोलावले व प्रत्येक आक्षिप्त विधानावर चर्चा झाली. ती ती सर्व विधाने साधार होती हे ओतुरकरांनी सरकारमान्य इतिहासग्रंथांतून आधार दाखवून पटवून दिले. अखेर शिक्षण खात्याचे सेक्रेटरी श्री. पंजाबी यांनी ते सर्व स्वीकार्य ठरविले. त्यामुळे कोणतेही विधान बदलावे न लागता सदर पुस्तकास पाठ्यपुस्तक म्हणून पुन्हा मान्यता मिळाली. हे प्रकरण दीड दोन वर्षे चालू होते. पण सतत झगडल्यामुळे त्यात यश आले.

हा काळ हिंदुसभेच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा व चळवळीचा होता. दुसरे महायुद्ध सुरू झालेले होते. हिंदुसभेचा दृष्टिकोन समाजापुढे मांडण्याची गरज वाढली होती. म्हणून त्रिकाळ बंद पडल्यामुळे दाते यांनी १९४० वर्षी 'काळ' या नावाने दैनिक वृत्तपत्र सुरू केले. त्यांनी यशवंत छापखाना या नावाने वेगळा छापखाना सुरू केला व त्यात काळ वर्तमानपत्र छापण्याचे ठरविले. पण त्रिकाळ व काळ या दोहोंची जात एकच आहे असे समजून सरकारने काळ वृत्तपत्र सुरू होण्यापूर्वीच यशवंत छापखान्याकडून व काळ वर्तमानपत्राकडून एक एक हजारांची जामिनकी मागितली ! तीन महिनेपर्यंत जर काही आक्षेपार्ह छापले गेले नाही तर अशा जामिनकीची रक्कम परत केली पाहिजे अशी कायद्यात तरतूद होती. त्याप्रमाणे आकसाने मागितलेली ही रक्कम तीन महिन्यांनंतर परत आली. पण दि. २५ मे १९४१ ला काळमध्ये प्रसिद्ध झालेला 'पुन्हा दंगे' हा लेख सरकारने आक्षेपार्ह ठरविला व त्याबद्दल यशवंत छापखान्याचे कीपर म्हणून व काळचे प्रकाशक म्हणून दाते यांजकडून सरकारने एक एक हजाराची अशी एकूण दोन हजारांची नवीन जामिनकी मागितली. हिंदुसभेविरुद्ध आघात करण्याचे सरकारचे धोरण यात स्पष्ट होते. म्हणून 'काळ' पत्राकडून जामिनकी कां मागितली ? याच मथळ्याखाली दाते यांनी संपादकीय लेख लिहिला. तो काळच्या दि. २५ जून १९४१ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. त्यात सरकारने पूर्वी दिलेली आश्वासने कशी पायदळी तुडविली आहेत व मुंबई हायकोर्टाच्या फुलबेंचचा पूर्वीचा निर्णयही कसा डावलला आहे व सरकार कसे खुनशीपणाने वागत आहे व हिंदुसभेच्या धोरणाला सरकारचे हे कसे आव्हान आहे याचा तपशील दिला आहे. त्यात त्यांनी शेवटी असे म्हटले आहे की

"माझ्या मते सरकारचे हिंदुसभेला हे एक प्रकारचे आव्हान आहे. कारण

हिंदुसभेची जी विचारसरणी आहे तीच या लेखात प्रतिपादन केलेली असून सरकारने तीच आक्षेपार्ह ठरविली आहे. याचा सर्व हिंदुसभावाद्यांनी विचार करावा.

"काळ पत्र जरी मी व्यक्तिशः जबाबदारीवर चालवीत असलो तरी ते हिंदुसभेच्या कार्याच्या प्रचारासाठीच चालवीत आहे."

या जामिनकीविरुद्ध वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्यात आले व तेथे ते बाबासाहेब धारप यांनी चालविले व ते मान्य होऊन जामिनकीची सरकारची नोटीस रद्द करण्यात आली. त्यामुळे ते पैसे परत आले.

त्यानंतरही सरकारी वृत्तपत्रसल्लागार समितीपुढे काळमधील लेखांची वारंवार चर्चा होई. कधी दाते यांचे स्पष्टीकरण मान्य केले जाई तर कधी ताकीद दिली जाई. दाते हेही या समितीचें पुढे सभासद झाले. त्यामुळे सरकारी दृष्टिकोणातील वळणे त्यांच्या अधिकाधिक लक्षात आली. तरीही पुढे दि. ३० ऑक्टोबर व २८ नोव्हेंबर १९४६ या अंकातील लेखांबद्दल सरकारने दाते यांजकडून तीन तीन हजारांची जामिनकी मागितलीच. तेव्हा केसरीने ती रक्कम आपण होऊन एकमुखी देऊन काळची सोय केली. पुढे १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरकारने ती रक्कम परत केली. तेव्हा दाते यांनी केसरीने दिलेली सर्व रक्कम व्याजासह परत केली. पुढे १९४९ मध्ये पं. नथूराम गोडसे यांना फाशी झाल्यानंतर काळमध्ये एक कविता प्रसिद्ध झाली तीबद्दल सरकारने पुन्हा तीन हजार रुपयांची जामिनकी मागितली. त्यावर वरिष्ठ न्यायालयात केलेले अपीलही फेटाळले गेले. पण पुढें तीही रक्कम सरकारने आपण होऊन परत केली. या बाबतीत काळवर अन्याय झाला होता, हे त्या वेळचे गृहसचिव देहेजिया यांनी नंतर एका प्रसंगी खाजगी बोलताना मान्यही केले.

सरकारने दातें यांजकडून लोकसंग्रह छापखान्याचे कीपर व यशवंत छापखान्याचे कीपर व काळ वृत्तपत्राचे प्रकाशक या नात्याने वेळोवेळी मिळून एकूण सव्वीस हजार रुपये जामिनकीच्या रूपाने मागितले. त्या पैकी 'पत्रीसाठी' मागितलेली दोन हजारांची रक्कम त्रिकाळमधील रावसाहेब पटवर्धन यांच्या भाषणाच्या वृत्तान्ताबद्दल जप्त झाली. ती सोडून बाकीची चोवीस हजारांची रक्कम कधी सरकारने आपण होऊन परत केली, तर कधी न्यायासनाने सरकारकडून परत करविली. याशिवाय सरकारने लोकसंग्रह छापखान्याने शिवरामपंत करंदीकरांनी लिहिलेले सावरकरांचे चरित्र छापले त्याबद्दल तीन हजार रुपयांची जामिनकी मागितली; पण त्याबद्दलचेही अपील हायकोर्टाने स्वीकारले व तीही रक्कम परत आली. रामभाऊ मंडलीक यांनी नंदुरबार येथील अत्याचाराच्या माहितीचे पुस्तक लोकसंग्रह छापखान्यात छापले होते, त्यात त्यांजवर न्यायासनाच्या बदनामीचा खटला भरण्यात आला, व त्यांना दंडही झाला. त्याचप्रमाणे १९६७ वर्षी सोलापूर, नगर व मालेगाव येथे झालेल्या दंग्यांचे वृत्त दाते यांनी लिहिले ते केसरीने प्रसिद्ध केले.

त्यात नगरच्या वृत्ताबद्दल सरकारने दाते व टिळक यांजवर कोर्टाची बदनामी झाल्याबद्दल खटला भरला. त्यात न्यायाधीशांनी दंडाची शिक्षा केली. तेव्हा न्यायाधीशांचा निर्णयही कसा चुकीच्या आधाराधर दिला गेला यासंबंधाने दाते यांनी काळमध्ये लेख लिहून स्पष्ट केले. हा सारा जामिनकीचा व खटल्यांचा इतिहास हिंदुसभेच्या कार्याच्या निमित्ताने झालेल्या प्रयत्नांतून निर्माण झालेला आहे. सरकारी धोरणाविरुद्ध झगड्याचा तो एक भाग असल्याने हिंदुसभेच्या इतिहासात तो समाविष्ट करणे योग्य ठरेल.

काळ प्रमाणेच सरकारने इतरही अनेक हिंदुत्वनिष्ठ वृत्तपत्रांकडून जामिनक्या मागितल्या. त्यात केसरी, मराठा, मुंबईचा हिंदु, हिंदुराष्ट्र, इत्यादि अनेक वृत्तपत्रांना झळ लागली. महाराष्ट्रातील मुद्रण व वृत्तपत्रीय क्षेत्रातील या काळातील जामिनक्यांचा इतिहास लिहिणारांना दाते, लोकसंग्रह, त्रिकाळ, काळ, केसरी, मराठा, हिंदु, हिंदुराष्ट्र इत्यादिकांकडून मागितलेल्या जामिनक्यांच्या इतिहासाला महत्त्वाचे स्थान द्यावे लागेल.

(७)

निजाम राज्यातील हिंदूंची परिस्थिति

निजाम राज्यातील हिंदूंची परिस्थिति १९२० पासूनच बिघडत चालली होती. हैद्राबाद हे केवळ इस्लामी राज्य आहे अशी निजाम सरकारने भूमिका घेतलेली होती व त्या दृष्टीने तेथे हिंदूंची गळचेपी करण्याचे धोरण चालूच होते. त्यास १९३० च्या गोलमेज परिषदेनंतर अधिकच गति मिळाली. १९३५ चा सुधारणा कायदा ब्रिटिश हिंदुस्थानला लागू करण्यात आला तेव्हा केंद्रीय फेडरेशनमध्ये आपल्याला सामील व्हावे लागणार हे निजामी शासकांनाही दिसू लागले होते व ते कसे टाळता येईल यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. निजाम राज्यातील हिंदु जनतेतही जागृति होत होती, पण निजामी शासनाखाली हिंदूविरोधी कायदे व प्रत्यक्ष कारभारात हिंदूंची गळचेपी करण्याचे प्रमाण फार वाढत चालले होते. ही परिस्थिति अधिकच बिघडली तेव्हा १९३८ वर्षी महाराष्ट्र हिंदुसभेचे नेते श्री. अण्णासाहेब भोपटकर यांनी श्री. शंकर रामचंद्र दाते व श्री. शिवराम विष्णु मोडक यांना निजाम राज्यात जाऊन प्रत्यक्ष परिस्थिति पाहून निवेदन करण्यास सांगितले. त्यांनी सादर केलेला वृत्तान्त पुढील घटनांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने तो येथे देण्यात येत आहे.

प्रत्यक्ष पाहणी

श्री. दाते आपल्या निवेदनात म्हणतात : आम्ही निजाम राज्यातील परांडा, तडवळे, तुळजापूर, उस्मानाबाद, लातूर, उदगीर, कळंब, अंबेजोगाई ऊर्फ मोमिनाबाद, परळी वैजनाथ, औरंगाबाद, बीड, गेवराई, गुलबर्गा, हैद्राबाद, इत्यादि सुमारे पंचवीस तीस ठिकाणी प्रत्यक्ष गेलो होतो. याशिवाय खुद्द बार्शी व लातूर येथे व प्रवासात आणखी काही ठिकाणची निजामी हद्दीतील प्रमुख मंडळी भेटली. त्यांच्याकडूनही आम्ही माहिती मिळविली. आमच्या या प्रवासात बार्शी येथील हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. गोविंद रघुनाथ उपाख्य बाबाराव काळे हेही होते. आम्ही ज्यांच्या मुलाखती घेतल्या त्यांत, निजाम राज्यातील काही प्रमुख सरकारी अधिकारी, प्रतिष्ठित वजनदार वकील मंडळी, मोठमोठे व्यापारी, आर्यसमाजाचे प्रमुख कार्यकर्ते, स्थानिक स्वयंसेवक संघांचे चालक, शिक्षणसंस्थांचे चालक, शिक्षक आणि देवस्थानांचे पुजारी इ. लोक होते. या मंडळींच्या कडून आम्हांस जी माहिती मिळाली ती सामान्यतः सर्वत्र एकसारख्या स्वरूपाची होती. काही ठिकाणी स्थलवैशिष्ट्यामुळे तीत जरी थोडाफार फरक पडला तरी हिंदु समाजाच्या तेथील एकंदर परिस्थितीची खरी कल्पना या माहितीवरून कोणासही सहज येण्यासारखी आहे. या

चौकशीच्या कामी आम्ही जे मुद्दे काढून घेतले होते ते व त्यांच्यासंबंधाने आम्हांस मिळालेली माहिती पुढे दिली आहे.

१. लोकसंख्येचे प्रमाण

हिंदुमुसलमानांच्या लोकसंख्येचे दहा वर्षांपूर्वीचे व आजचे प्रमाण काय आहे? त्यात फरक पडला असल्यास तो कां ?

या संबंधात असे समजले की निजाम राज्यात आपल्या इकडच्यापेक्षा लोकसंख्येचे एकंदरच प्रमाण कमी आहे. त्या भागात रहदारीचे मार्ग कमी असल्यामुळे इकडच्या पेक्षा व्यापारही कमी व त्यामुळे शहरांची संख्याही थोडी व जी आहेत त्या शहरांची वस्तीही प्रमाणतः कमीच आहे. उदा. पंढरपूर आणि तुळजापूर ही दोन्ही गावे यात्रेच्या दृष्टीने वास्तविक सारखी असावीत, परंतु रहदारीचे मार्ग अधिक असल्यामुळे पंढरपूरची यात्रा दिवसेंदिवस वाढत आहे. तसे तुळजापूरचे होत नाही. पाण्याचा अभाव, व्यवस्थेचा अभाव, वाहतुकीच्या गैरसोई इ. अनेक कारणांमुळे आपल्या इकडच्या प्रांतांपेक्षा तो प्रांत मागासलेला आहे.

हे झाले सामान्य लोकसंख्येसंबंधाने. परंतु हिंदुमुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार करता गेल्या दहा वर्षांत मोठा फरक झालेला दृष्टीस पडतो. कित्येक जबाबदार मंडळींनी आम्हांस असेही सांगितले की मुसलमानांची कागदोपत्री जी लोकसंख्या दाखविली जाते तिच्यापेक्षा वास्तविक ती बरीच कमी आहे. मुसलमानांची लोकसंख्या मोठी असणे हे राजकीय दृष्ट्या फायदेशीर वाटत असल्यामुळे वास्तविक लोकसंख्येपेक्षा ती मुद्दाम फुगवून दाखविली जाते असे लोकांना वाटते. तथापि असे असले तरी मुसलमानांची लोकसंख्या दिवसेदिवस वाढत आहे यात शंका नाही. खेडेगावातून मुसलमानांची लोकसंख्या फारच कमी म्हणजे ८–१० टक्के आहे. मोठ्या गावांतून व शहरातून मात्र मुसलमानांची संख्या सुमारे २० ते ३० टक्के पर्यंत असून काही ठिकाणी तर ती ५० टक्केही आहे. हिंदूंपेक्षा मुसलमानांचीच संख्या जेथे जास्त आहे अशी गावे मात्र क्वचितच आढळतील. निजाम राज्यातील मराठवाडा मुलुखात मुसलमान शेतकरी फारच थोडे आहेत. त्यापेक्षा तेलंगणात त्यांची संख्या अलीकडे पुष्कळच वाढली आहे. एका उस्मानाबाद शहरात गेल्या ६–७ वर्षांत मुसलमानांची लोकसंख्या सुमारे हजारबाराशेने वाढली आहे असे समजले.

लोकसंख्येत वरीलप्रमाणे फरक होण्याचे कारण पुष्कळ हिंदुलोक बाटून मुसलमान झाले, एवढे एकच आहे असे नाही. येथील जीवनाला कंटाळून पुष्कळसे हिंदु लोक मोगलाई सोडून ब्रिटिश मुलुखात येऊन राहू लागले आहेत. विशेषतः धनिक हिंदु व्यापारी लोकांनी निजाम राज्यात व्यापारधंद्यात पैसा गुंतविण्यापेक्षा ब्रिटिश मुलखात गुंतविलेला अधिक बरा असे मानून तिकडे तो मोठ्या प्रमाणावर

गुंतविला आहे. उदा. उस्मानाबाद या एका गावातील व्यापाऱ्यांचे सुमारे दहा लक्ष रुपयांचे भांडवल सोलापूर, पुणे, बार्शी, मुंबई इ. ब्रिटिश मुलखातील अनेक ठिकाणी गुंतविले गेले आहे. याच्या उलट ब्रिटिश हद्दीतील मुसलमान लोक व्यापारधंद्यासाठी निजामीत जाऊन राहू लागले आहेत. अशा प्रकारची व्यावसायिक वाढघट आणि मुसलमानीकरण इ. कारणांमुळे मोगलाईत मुसलमानांचे प्रमाण हे गेल्या १० वर्षांत सुमारे ५ ते ८ टक्क्यांनी वाढले असावे.

२. हिंदु मुसलमानांचे धंदे

मोगलाईतील हिंदूंचे व मुसलमानांचे धंदे ब्रिटिश हद्दीतील त्यांच्या धंद्यांहून विशेष वेगळे नाहीत. हिंदूंचे धंदे म्हणजे सामान्यतः शेती, व्यापार, सावकारी इ. होत तर मुसलमानांचे धंदे म्हणजे नोकरी, बागायती, कासारी, पिंजारकी, खाटकी इ., होत. परंतु गेल्या १० वर्षांत हिंदूंची सर्व धंद्यांतून पिछेहाट होत असून मुसलमानांनी जवळ जवळ सर्व धंदे काबीज केल्यासारखे झाले आहेत. १० वर्षांपूर्वी जेथे मुसलमानांचे एकही दुकान नव्हते तेथे आज त्यांची सर्व प्रकारची दुकाने झालेली आहेत. कोर्ट कचेऱ्या, वकिली, मास्तरकी, सरकारी नोकरी, सावकारी, दुकानदारी इ. सर्व प्रकारचे धंदे मुसलमानांत अलीकडे सुरू झाले असून त्यांचे प्रमाणही एकसारखे वाढत आहे.

मुसलमानांनी मुसलमानांपासूनच माल घ्यावा असा जोराचा व परिणामकारक प्रचार उघडपणे सुरू असून हिंदु मात्र प्रतिक्रिया या नात्याने हिंदूंनीही हिंदूपासूनच माल घ्यावा या वृत्तीचा अंगीकार करीत नाहीत. त्यामुळे कित्येक मुसलमानांची दुकाने जवळपासच्या केवळ हिंदु गिऱ्हाईकांवर चालतात व हिंदु दुकानदारांस परमुलुखाचा रस्ता धरावा लागतो. हिंदु समाज दिवसे दिवस दरिद्री होत चालला असून मुसलमानांचे आर्थिक बळ वाढत आहे व सरकारी कृपेची पाखर वारंवार सर्वस्वी त्यांच्यावरच होत असल्यामुळे हिंदूंना आपला त्राता कोणी नाही असा स्वतःबद्दलचा अविश्वास वाटू लागला आहे.

३. देवस्थाने

निजामच्या राज्यात हिंदूंची पुरातन व प्रसिद्ध अशी देवस्थाने पुष्कळच आहेत. परंतु या देवस्थानांसंबंधाचें सरकारी धोरण मात्र हिंदूंना अत्यंत अन्यायकारक व त्यांच्या स्वाभिमानाची खच्ची करणारे असे आहे. नवीन देवालय बांधण्यास हिंदूंना परवानगी मिळत नाही, पण मशिदींना मात्र ती केव्हाही सहज मिळू शकते. एकट्या उस्मानाबाद शहरात मुसलमानांची संख्या सुमारे चार हजार असता मशिदींची संख्या १० आहे तर तेथे हिंदूंची संख्या आठ हजार असता हिंदूंची देवालये मात्र अवघी चारच आहेत. कोणी धनिकाने मंदिर बांधण्यास परवानगी

मागितली तर तीन तीन चारचार वर्षे ते प्रकरण घोळत राहून अखेर मुसलमानांच्या धार्मिक भावना दुखवल्या जातील अशा प्रकारची सबब पुढे करून ती नाकारण्यात येतें!

हे झाले नवीन देवळांसंबंधाने, जुन्या देवळांसंबंधाने तर याहूनही अधिक वाईट गोष्ट आहे. जुन्या देवस्थानांची केवळ दुरुस्ती करण्यासही परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी तालुक्याच्या अधिकाऱ्याकडे मागावयाची असते. ती मागितली म्हणजे ती तो जिल्ह्याच्या अधिकाऱ्याकडे पाठवितो व येथून ते प्रकरण उमुर मझहबी म्हणजे धर्म खात्याकडे पाठविले जाते, इतक्या काळात कोणी तरी एखाद्या फाटक्या मुसलमानानेही त्या परवानगीस हरकत करण्याबद्दल अर्ज पाठविला म्हणजे तेंवढी सबब पुरेशी होऊन देवळाच्या दुरुस्तीसही परवानगी नाकारण्यात येते. आणि विशेष हे की ज्या देवस्थानांना पूर्वी दुरुस्तीसाठी सरकारी वतने मिळालेली आहेत ती वतने देवळाची दुरुस्ती झाली नाही म्हणून खालसा करण्यात येतात! देवळांच्या दुरुस्तीस आधी परवानगीची अट ठेवावयाची, ती मागितली म्हणजे द्यावयाची नाही, बिगर परवाना काहीच करण्याची सोय नाही व दुरुस्ती झाली नाही म्हणजे दुरुस्ती झाली नाही या सबबीवर सरकारनेच देवस्थानांना दिलेली उत्पन्ने पुन्हा खालसा करावयाची अशी ही निजामी न्यायाची रीत आहे! या बाबतीत बीड येथील परिस्थिति तर विशेष लक्षणीय आहे. बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असून तेथील वस्ती फार जुनी आहे. महाराष्ट्रात दीड दोन हजार वर्षांपूर्वी पासूनची अशी जी काही फारच थोडी गावे असतील त्यात त्या गावाची गणना होईल. या गावात कंकालेश्वराचे एक महादेवाचे देवालय आहे. ते फार जुने, हेमाडपंती बांधणीच्याही पूर्वीचे असून तेथे मुसलमानांनी अलीकडेच मशिदीचा वाद सुरू केला आहे.

या मंदिराच्या भोवती प्रशस्त आवार असून मंदिरास तटबंदी व भोवती खंदक पाणी अशी व्यवस्था आहे. आजही या देवालयाच्या पूजेअर्चेसाठी निजाम सरकारातून पुजाऱ्यास दरमहा दहा रुपये वेतन मिळते. असे असता या देवळाच्या आवारातच एका मुसलमानाने आपले ठाणे रोवले व आता तो तेथे घर बांधून राहिला आहे. देवळाच्या भोवती आता प्रार्थनेच्या जागा बांधण्यात आल्या असून कोठे एक दोन मढीही पुरली आहेत. या देवळाच्या वरच्या बाजूस पूर्वीपासूनच मशीद आहे अशी ओरड सुरू झाली आहे.

मुसलमानांच्या या आक्रमणापूर्वी तेथे देवळात सर्व व्यवस्था असे. देवाची पूजा अर्चा होत असे. धूपदीप दाखविला जाई व लोकही दर्शनास बरेच जात येत असत. या भागात हे देवालय फार प्राचीन म्हणून प्रसिद्ध आहे, पण आता तेथे मुसलमानांचे आक्रमण होताच हिंदूंचे येथले सर्व उत्सव समारंभ बंद पडले आहेत. आता तेथे कोणी फारसे जात नाही, एकटा दुकटा कोणी गेला तर मुसलमान

त्यास जाऊ देत नाहीत. प्रसंगी मारपीटही करतात. बायांना तर देवदर्शन अशक्यच झाले आहे. देवालयाचा पुजारी ब्राह्मण आहे. निजाम सरकारकडून त्यास मासिक दहा रुपये पूजेसाठी म्हणून आजही मिळतात. ते तो घेतो पण तो तेथे प्रत्यक्ष जाऊन पूजा करण्यास धजत नाही.

त्यामुळे देवालयात बरीच पडझड झाली आहे. देवालयाचें दरवाजेही अलीकडे पाडलेले आहेत. गेल्या वर्षासहा महिन्यात तेथे कोणी फिरकला असेल असे वाटत नाही. आपले देवालय होते व तेथे आपली पूजाअर्चा चालू होती याचा कायदेशीर पुरावा राहावा एवढ्याच करिता जणू पुजारी वर्षासनाचे मासिक दहा रुपये सरकारी कचेरीत जाऊन घेऊन येत असतो. मध्यंतरी महाराजा सर किसन प्रसाद हे येथे येऊन देवालय पाहून गेले. परंतु त्याच्या परिस्थितीत काही सुधारणा नाही.

अलीकडे प्रत्येक गावातील मंदिरे व मशिदी यांची मोजदाद चालू असून मंदिरांची संख्या कमी दाखविण्याची व मशिदींचा आकडा फुगवून दाखविण्याची कारवाई चालू आहे. हेतु हा की, मंदिरे जुनी होऊन दुरुस्तीच्या अभावी त्यांची पडझड सुरू होताच त्यांचे झटकन मशिदीत रूपांतर करता यावे. अशी मशीद ही नवी नसून जुनीच आहे हे शाबीद करण्यास या फुगलेल्या आकड्यांचा उपयोग व्हावा व पूर्वी ती मशीदच होती असेही म्हणता यावे !

देवस्थानांची परिस्थिति अशा प्रकारची असता दुसरीकडे नव्या मशिदी बांधण्याचा सपाटा चालू आहे. त्यांना नवीन उत्पन्ने दिली जात आहेत, प्रसंगविशेषी मशिदींना देणग्यांचीही खैरात मोठ्या प्रमाणावर केली जाते. उदाहरणार्थ, गेल्या पैगंबर जयंतीच्या दिवशी उस्मानाबाद येथील १० मशिदींना प्रत्येकी २०० रुपये प्रमाणे मदत देण्यात आली. इतर ठिकाणी असेच प्रकार चालू आहेत.

४. मिरवणुकी व वाद्ये

कोणत्याही मिरवणुकीस कोणत्याही मशिदीच्या आसपास ६० हातांपर्यंत वाद्ये वाजविण्यास सर्वकाळ मनाई आहे. इतर ठिकाणी लग्नमुंजीच्या वाजंत्रीस परवानगी मिळते. परंतु जेव्हा हिंदू-मुसलमानांचे सण एकाच वेळी येतात त्या वेळी मात्र हिंदूंना सर्वत्र वाद्यबंदीचा हुकूम होतो. १५ वर्षांपूर्वी मोहरम व दसरा हे एकाच वेळी आले असता मोहरमाच्या काळात हिंदूंनी घराबाहेर शिलंगण किंवा अन्य कोणत्याही निमित्ताने वाद्ये वाजविता कामा नयेत, एवढेच नव्हे तर हिंदूंनी आपल्या घरातही वाद्ये वाजविता कामा नयेत असे फर्मान निघाले होते. फार काय मोहरमच्या काळात एकदा एका हिंदूच्या घरी लग्न समारंभ निघाला असता मोहरमच्या काळात तू आपल्या येथे लग्न कां घडवून आणलेस याबद्दल त्यास जबाब विचारण्यात आला होता ! अशा रीतीने वाद्यबंदीच्या बाबतीत सरकारचे धोरण हिंदूंची खच्ची करणारे आहे.

मिरवणुकीच्या संबंधाने कवायत तकारीब ए मझहबी या नावाचा कायदा अमलात असून त्याअन्वये नवीन किंवा जुन्या वहिवाटीची कोणतीही मिरवणूक काढण्यास एक महिना आगाऊ परवानगी मागावी लागते. नवीन मिरवणूक सहसा काढूच देत नाहीत व यदाकदाचित् दिलीच तर तीवर इतकी नियंत्रणे घालण्यात येतात की, ती काढणारांना मिरवणूक काढण्यापेक्षा न काढलेलीच बरी असे वाटू लागते. पूर्वापार वहिवाटीप्रमाणे जरी एखादी मिरवणूक काढावयाची असली तरी तिच्यासाठी एक महिना आगाऊ परवानगी मागावीच लागते. या मिरवणुकीविरुद्ध जर कोणाची तक्रार आली तर ते प्रकरण निजाम सरकारच्या कार्यकारी मंत्र्या-पर्यंत जाते व कोणत्या नि कोणत्या सबबीखाली तिला नकारच मिळतो. जर त्या मिरवणुकीविरुद्ध कोणीच तक्रार केली नाही तर मात्र सुमारे शेकडा २५ प्रमाणात परवानगी मिळू शकते. पण हिंदूंना खच्ची करण्याबाबत मुसलमान लोक इतके दक्ष असतात की, हिंदूंनी मिरवणुकीची परवानगी मागितली व त्यांना ती सुखाने मिळाली असा प्रसंग क्वचितच येतो. मुसलमानांच्या मात्र मिरवणुकी नेहमी निघतात. त्यांच्या मिरवणुकींना हिंदू लोक बहुधा कधीच विरोध करीत नाहीत व क्वचित् कोणी केलाच तरी त्याची तक्रार जुमानली जात नाही. मुसलमानांच्या मिरवणुकी निघतात त्या नुसत्या सवाद्यच असतात असे नव्हे तर त्या सशस्त्रही असतात. अलीकडे निजाम राज्यात खाकसार पार्टी या नावाची जी नवीन मंडळी आक्रमक चळवळ करीत आहेत त्यांच्या सशस्त्र मिरवणुकी गावोगाव निघत असून हिंदूंना आपल्या दहशतीखाली दाबून टाकण्याचा त्यांचा विशेष प्रयत्न चालू आहे. अलीकडे तर हिंदूंनी वाद्ये न वाजविता केवळ जयघोष करीत मिरवणूक काढली तरी सुद्धा तिला हरकत करण्यात येते. या उलट मुसलमानांच्या मिरवणुकी विविध नावाखाली निघत असून त्यांस सरकारी अधिकाऱ्यांचा पाठपुरावा होत असतो.

५. गोहत्या

निजामी राज्यात गोहत्येला बंदी आहे असा कोठे कोठे प्रवाद चालू आहे. पण तो सर्वस्वी खोटा आहे. मोगलाईत गोहत्या सर्रास होते व ती खाण्याच्या निमित्ताने होते. हिंदूंना चिडविण्याकरिता म्हणून धार्मिक चळवळीच्या नावाखाली गोहत्या होत नाही असे वाटते. तथापि काही काही ठिकाणी हिंदूंना चिडविण्याचे प्रकारही चालू आहेत. कळंबजवळील अंदूर नावाच्या गावी एका मुसलमान खाट-काने गाय मारून तिचे मांस विकण्याकरिता तो बाजारात जाऊन बसला. तेव्हा तेथील हिंदूंनी त्यास हरकत केली व आपल्या घरात बसून वाटेल तर गोमांस विकीत बैस, परंतु भर रस्त्यात गोमांसाची विक्री करू नको असे तेथील गाव-कऱ्यांनी त्यास बजाविले. तेव्हा तो जरा गांगरू लागला. त्या गावचा पाटील

मुसलमानच असल्यामुळे हिंदूंनी मुसलमान खाटकास असे खडसावावे हे त्यास सहन न होऊन त्याने फौजदाराकडे तक्रार केली. तोही मुसलमानच होता. तो स्वतः अंदूर गावी गेला व त्या मुसलमानाला गोमांस विकण्याकरिता त्याने गावातील मारुतीच्या देवळाच्या सरळ कट्टयावर नेऊन बसविले. त्यामुळे हिंदू लोक फारच चिडले व दंगा होण्याची भीति दिसू लागली. तेव्हा फौजदाराने त्या खाटकास खाली देवळाच्या समोर आणून बसविले. या प्रकाराची पुनरावृत्ति झाली नाही हे जरी खरे असले तरी मुसलमानांची वृत्ति यावरून दिसून येते.

६ मुसलमानांचे संघटन व हिंदूंचे धर्मान्तर

गेल्या १०।१५ वर्षांत मुसलमानांचे हिंदूंना बाटविण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर व शिस्तशीर चालू आहेत. या बाबतीत मुसलमानांना सरकारचे साहाय्य व प्रोत्साहन असून तीनशे मौलवी या कामावर पगारी नेमलेले आहेत असे म्हणतात. मुसलमानांच्या या चळवळीला तबलीघ व तंजीम चळवळी असे म्हणतात. मुसलमानांच्या संघटनेसाठी मशिदीतून नेहमी प्रचार करण्यात येतो. हिंदूंना बाटविण्याचे प्रकारही सर्रास घडून येतात. त्यांच्या मदतीस खाकसार पार्टी या नावाची एक मंडळी पुष्कळ ठिकाणी सरकारी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली काम करीत असते. याशिवाय नवमुस्लिम संघ नावाचा एक संघ निघाला असून त्याच्यातर्फे हिंदूंच्यावर अत्याचार केले जातात. सोबत कमिटी म्हणजे शांततासमिति या नावाच्या समित्याही जागोजाग स्थापन झाल्या असून हिंदु मुसलमान समाजांत शांतता (?) राखण्याचे काम त्यांजकडे असते. अशा रीतीने या संस्था संगनमत करून केव्हा एक तर केव्हा दुसऱ्या मंडळीच्या नावाखाली हिंदूंवर आक्रमण करीत असतात. मौलवी महारवाड्यांतून नेहमी हिंडून येथील अस्पृश्य लोकांना सनातनी हिंदूंविरुद्ध चिथवून देतात. महारापेक्षाही मांग समाजातील स्त्रियांशी त्यांचा संबंध अधिक असतो असे समजते. मौलवींच्या चिथावणीने मुसलमान गुंड हिंदू लोकांची विनाकारण कुरापत काढून दंगे उत्पन्न करतात व सरकारी अधिकारी त्यांचाच पाठपुरावा करतात. स्त्रियांच्या अंगावर खडे मारणे, त्यांना पळवून नेणे, लहान मुलांना पळवून नेणे, हिंदूंच्या अंगावर थुंकणे, रस्त्याने शिव्या देत जाणे, इ. मार्गांनी हिंदूंचा छळ करण्यात येतो व त्याविरुद्ध सरकारी अधिकाऱ्याकडे दाद मागितली असता ती केव्हाही मिळत नाही.

७. आखाडे व स्वयंसेवक संघ

हिंदूंना तालमीचे नवीन आखाडे काढण्यास कायद्याप्रमाणे आधी परवानगी घ्यावी लागते व परवानगी मागितली असता ती तेथील पद्धतीप्रमाणे कधीही मिळत नाही. त्यामुळे नवीन तालिमखाने फारसे कोठे निघाले नाहीत. जुने आखाडे

पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे चालू आहेत व कित्येक ठिकाणी हिंदूंनी त्यांचेच पुनरुज्जीवन केले असून ते चालविले आहेत. एखादी गोष्ट दडपून करणारा कोणी निघाल्यास सरकारी अधिकारी त्यास दबून वागतात. पण निजाम राज्यात हिंदु कायद्याला भिऊन वागणारा असल्यामुळे त्याची मात्र सर्व बाजूंनी मुस्कटदाबी केली जाते. निजामाचे राज्यात आपल्या इकडच्या सारखा हत्यारांचा कायदा अद्याप झालेला नाही. लोक तरवारी, बंदुका, भाले, बरच्या, पिस्तुले इ. सरसहा वापरू शकतात. त्यांचे शिक्षण घेणाऱ्या हिंदूंचे प्रमाण अलीकडे थोडे वाढलेही आहे. मुसलमानांना मात्र हे शिक्षण उघड रीतीने दिले जात असता त्यास सरकारी अधिकारी हरकत करीत नाहीत, पण हिंदूंना मात्र हरकत करतात. त्यामुळे हिंदु लोक जास्त चिंताग्रस्त झालेले दिसतात. अलीकडे निजाम सरकारने हत्यारांची नोंद करण्याचे काम सुरू केले असून या निमित्ताने हिंदूंच्या हातातील हत्यारे काढून घेण्याचा हा सरकारचा डाव आहे असे लोकांचे मत झाले आहे. हिंदूंना दारूगोळाही अलीकडे मिळेनासा झाला आहे. बंदुकीच्या दारूचे मक्तेदार बहुतेक सर्वच मुसलमान लोक असल्याने हिंदु गिऱ्हाइकांना अतिशय थोडी मोजकी दारू विकत मिळू शकते, तर मुसलमानांना ती वाटेल तितकी खरेदी करता येते. हिंदूंना दारू विकू नये अशी गुप्त सर्क्युलरे निघाली आहेत. अशा रीतीने हिंदूंच्या बलसंवर्धनाला सर्व बाजूंनी अडथळे उत्पन्न करण्यात येत आहेत.

८. सरकारी अधिकारी

सरकारी अधिकाऱ्यांत १० वर्षांपूर्वीपर्यंत हिंदु व मुसलमान यांचे जवळ जवळ निमेनीम प्रमाण होते. शिक्षणखाते, मेडिकलखाते व पी. डब्ल्यू. डी. या खात्यांतून बहुतेक सर्व अधिकारी हिंदूच असत. परंतु गेल्या १० वर्षांत निजामच्या राज्यकारभाराचे सर्वस्वी मुसलमानीकरण होत असून क्वचित् कोठे एखादा नाममात्र हिंदु घेतलेला दृष्टीस पडतो.

निजाम सरकारचे कार्यकारी मंडळ ६ माणसांचे असून त्यात फक्त एक हिंदु आहे. हायकोर्टाच्या नऊ न्यायाधीशांपैकी अवघे दोघेच हिंदु आहेत व हिंदू-विरुद्ध मुसलमान अशा राजकीय जातीय खटल्यातही हिंदूविरुद्ध हिंदूंकडूनच निकाल दिला जावा अशी कारवाई केली जाते असा अनुभव लोक सांगतात. सेशन्स जज्ज सर्व मुसलमान आहेत. १५ डि. मॅजिस्ट्रेटांपैकी फक्त एक हिंदु अद्याप शिल्लक राहिलेला आहे. अॅडि. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट सर्व मुसलमान आहेत. तालुक्यांच्या १०० मुन्सफांपैकी फक्त १० हिंदु आहेत. फार काय, कारकून, शिपाई प्यादे वगैरेसुद्धा सर्व मुसलमान आहेत. नवीन नेमणुका होतात त्याही मुसलमानांच्याच होतात.

पोलिसखात्यात इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस तेवढा युरोपियन आहे. डे. डिरेक्टर जनरल ऑफ पोलिस या दोन जागा असून एकावर हिंदु अधिकारी अजून आहे. मोहतमीम (डि. सुप. ऑफ पोलिस) च्या सतरा जागांपैकी चार जागा हिंदूंकडे आहेत. त्यांच्या १७ मदतनिसांपैकी ५ हिंदू व पारशी मिळून आहेत. सर्कल इन्स्पेक्टर ऑफ पोलिस ५० आहेत. त्यांत हिन्दू अवघे १० आहेत. तालुक्याचे अमीन (पोलिस इन्स्पेक्टर) ३०० आहेत. त्यांत हिन्दू अवघे २० आहेत आणि शिपाई, कान्स्टेबल लोकांत ९५ टक्के मुसलमान असून हजामतीचे काम करणारा क्वचित् एखादा दुसरा हिन्दु असलेला सापडतो. हाच प्रकार बहुतेक सर्व खात्यांतून दृष्टीस पडतो.

अशा रीतीने सर्व सरकारी अधिकारी मुसलमान असल्याने हिन्दूना कोठेही डोके वर काढू द्यावयाचें नाही असे सरकारचे व मुसलमानांतील चळवळ्या लोकांचे धोरण आहे. हिन्दूंना या अधिकाऱ्यांकडून नेहमी त्रास पोचतो व न्याय मिळण्याची आशा वाटत नाही.

९. हिंदू लोकांची परिस्थिति

हिंदु लोकांत नवीन सुधारणेच्या काळाचे वारे अद्याप खेळू लागले नसून जुनाट व पडीक गावाप्रमाणे त्यांचा स्वतःवरील आत्मविश्वास नाहीसा झाला आहे. व स्वतःची स्थिति सुधारण्याकरिता आपण काय करावे हेही त्यांस समजेनासे झाले आहे. परंपरागत चालू रूढीला चिकटून राहणे यातच त्यांना धर्म वाटतो. पण त्या धर्मावर जर कोणी आक्रमण करू लागला तर त्या आक्रमणाचा आपण प्रतिकार करावा हा विचारही त्यांच्या मनास शिवून जात नाही. शेकडो वर्षांच्या एकसारख्या आक्रमणाखाली त्यांच्यातील तेजस्विता इतकी निष्प्रभ व निर्जीव झालेली आहे की आपण कधी संघटित होऊ व त्यांचा प्रतिकार करू ही कल्पनाच त्यांना करता येत नाही. भित्रेपणा त्यांच्यात खोलवर शिरला असून कोणीही दटावून बोलू लागला की, घाबरून पळ काढणे एवढा एकच मार्ग त्यास दिसतो. उस्मानाबाद जिल्ह्यात मोह या नावाच्या गावी एका प्रसिद्ध कथेकऱ्याचे कीर्तन करण्याचे गावकऱ्यांनी ठरविले व दोन दिवस खपून त्यांनी कीर्तनास चांगला रंग आणला. कीर्तनासाठी हजार दीड हजार माणूस जमले होते. कीर्तन चालू झाले. इतक्यात चार चावट व गुंड मुसलमानांनी हिंदूचा तमाशा करण्याचे मनात आणून ते त्या ठिकाणी गेले व तेथील हिंदूंना शिव्या देऊन येथून निघून जाता कीं नाही असे दरडावू लागले. तेव्हा १५०० हिंदूचा समाज पण चार मुसलमानांच्या शाब्दिक दरडावण्याला डरून जाऊन कीर्तन सोडून पळून जाऊ लागला व अशा रीतीने कथा उधळली गेली. असे प्रकार तेथे वारंवार झालेले ऐकू येतात. वैयक्तिक स्वार्थ, दुसऱ्याचा मत्सर, अंगातील भीरुता व पाया

पुरते पाहण्याची वृत्ति इ. अवगुणांमुळे हिंदु समाज शेकडा ८५ असूनही १०–१५ टक्के मुसलमानांपुढे दीन व हतबल झाला आहे.

जे लोक हिंदु समाजातून बाटून परधर्मात जातात त्यांना हिंदु लोक परत आपल्या धर्मात घेत नाहीत. जर एखाद्याने रूढ धर्माचाराविरुद्ध वर्तन केले तर त्या व्यक्तीस त्याचे नातलग लोकही दूर ढकलून देतात ! त्यामुळे निरुपाय होऊन ते लोकही मुसलमानी धर्माचा स्वीकार करतात. तथापि अलीकडे मात्र आपल्या परिस्थितीची थोडीफार जाणीव हिंदु समाजाला होऊ लागली आहे असे दिसते.

१०. अस्पृश्यसमाज

अस्पृश्य वर्ग इकडच्यासारखाच अडाणी व दरिद्री असून त्यांच्यात मुसलमानी धर्माचा प्रचार फार मोठ्या प्रमाणावर केला जातो. मौलवी लोक, खाकसार पार्टीचे लोक हे सरकारी स्थानिक अधिकाऱ्यांच्या पुरस्काराखाली अस्पृश्य समाजाच्या वस्तीतून व्याख्याने झोडतात व हिंदु समाजाविरुद्ध त्यांची मने कलुषित करून हिंदूंविरुद्ध अत्याचार करण्यासही त्यांस प्रवृत्त करतात. अस्पृश्य लोकांना गटागटाने मुसलमान करणे हे कार्य तेलंगणात मुसलमानांना फार सोपे गेले. मराठवाड्यात ते तितके सोपे जात नाही. या बाबतीत गेल्या वर्ष दोन वर्षांत बहादूर यारजंग यांनी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करून मोठी धामधूम माजविली आहे. त्यांच्या प्रयत्नाने बीड जिल्ह्यातील धोंडराई व गेवराई येथील चारपाचशे अस्पृष्ट हिंदू मुसलमान झाले असून इतरही काही ठिकाणी ही चळवळ जोरात चालू आहे. परंतु असे असले तरी सर्वसामान्य अस्पृश्य समाज अजूनही हिंदूंच्या कह्याबाहेर गेला आहे असे वाटत नाही व त्यामुळे त्यांच्या इस्लामीकरणाची चळवळ कितपत यशस्वी होईल याबद्दल शंकाच आहे.

११. आर्यसमाज

उभ्या निजाम राज्यात हिंदु समाजाचा त्राता व मुसलमानांच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी उभा राहिलेला असा जर कोणी असेल तर तो फक्त आर्यसमाजच आहे हे म्हणणे वस्तुस्थितिनिदर्शक आहे. बाहेरील मंडळींची प्रथम अशी कल्पना होते की, कोणी उत्तर हिंदुस्थानातून आलेले हे लोक असावेत. परंतु वस्तुस्थिति तशी नाही. निजामच्या राज्यात राहणारे महाराष्ट्रीय लोक हेच आज आर्यसमाजी झालेले असून त्या नावाखाली ते चळवळ करीत आहेत. निजाम सरकारचा आर्यसमाजावर अतिशय दात असून त्यांना चिरडून टाकण्याची ते प्रत्येक संधि साधीत असतात. आर्यसमाजाने हिंदूंचे संघटन सुरू केले, त्यांच्यात प्रतिकारशक्ति निर्माण करून ती वाढीस लावली, बाटून मुसलमान झालेल्या लोकांचेच केवळ शुद्धीकरण नव्हे तर जन्मजात मुसलमानांचेही त्यांनी हिंदूकरण करण्यास सुरवात केली. अस्पृश्य समाजाला आर्यसमाजी बनवून त्याची अस्पृश्यता

घालविली, व हिंदु धर्माचा जागता अभिमान उभा केला. हे आर्यसमाजाच्या गेल्या १८ वर्षांच्या चळवळीचे फळ आहे.

१९२० साली आर्यसमाजाची तेथे स्थापना झाली. आज निजाम राज्यात त्याच्या सुमारे २०० शाखा असून त्याचे कार्य अतिशय पद्धतशीर रीतीने चालू आहे. हैद्राबादचे बॅ. विनायकराव कोरटकर हे आर्यसमाजाचे अध्यक्ष असून श्री. बन्सीलाल हे त्याचे मुख्य मंत्री आहेत. समाजाचे मुख्य कार्यालय उदगीर येथे असून वैदिक संदेश या नांवाचे त्यांचे एक मुखपत्र सोलापूर येथून प्रसिद्ध होत असते.

कोणाही आर्यसमाजी इसमाला सरकारी नोकरीत घेऊ नये व सरकारी नोकरीतील कोणी इसम आर्यसमाजी झाला तर त्यास तावडतोब काढून टाकण्यात यावे असे अधिकाऱ्यांना हुकूम आलेले आहेत. एका गावी एक कुलकर्णी सरकारी वसूल भरणा करण्याकरिता कचेरीत गेला असता तेथे त्यास त्याचा एक परिचित आर्यसमाजी इसम भेटला व त्याच्याशी तो थोडा वेळ बोलला. चारच दिवसांनी नोकरीवरून त्यास कमी केल्याचा हुकूम त्याच्या हाती देण्यात आला! अलीकडे आर्यसमाजी कोणकोण आहेत, त्यांच्या शाखा कोठे कोठे आहेत, शाळेत जाणाऱ्या कोणकोण मुलांचा किंवा त्यांच्या पालकांचा आर्यसमाजाशी संबंध आहे याची माहिती गोळा करण्यात येत आहे. आर्यसमाजाशी संबंध असणाऱ्या मुलांना शाळेत बंदी करण्याचा सरकारचा विचार आहे असेही अनुमान कित्येक जण काढीत आहेत. आर्यसमाजी इसमाला कोणत्याही शाळेत नोकरी मिळू नये याबद्दल सर्क्युलरे (डेमी ऑफिशियल) निघाली आहेत. हवनकुंड बांधता कामा नये अशीही फर्माने निघाली आहेत. पूर्वी आर्यसमाजाच्या जागेला आर्यसमाजमंदिर असे म्हणत असत. परंतु नवीन मंदिरे परवानगीशिवाय बांधावयाची नाहीत असा नवा कायदा झाल्यामुळे व आर्यसमाजाच्या मंदिरांना परवानगी मिळणे अशक्य असल्यामुळे त्यांनी आर्य-समाज कार्यालय किंवा नुसतेच आर्यसमाज अशी नावे घेतली आहेत. खाजगी घरांतून जशी देवघरे असतात तशी आर्यसमाज मंदिरांत हवनकुंडे; ही सार्वजनिक देवालये नव्हेत असे प्रतिपादन करून त्यांना परवानगी मागण्याची जरुरी नाही असे त्यांनी ठरविले आहे. प्रत्येक आर्यसमाजात हवनकुंड असते. तेथे दर शुक्रवारी होमहवन, प्रार्थना व व्याख्यानांच्या स्वरूपाचा धर्मोपदेश केला जातो. शुद्धीकरण वा हिंदूकरणही तेथेच होते. मुसलमानांनाही या प्रसंगी हजर रहाता येते. आर्य-समाजाने शुद्धीची चळवळ जोरात चालविल्यामुळे मुसलमान चळवळे चिडले असून ते त्यांचा अतिशय द्वेष करतात. एकटादुकटा आर्यसमाजी सापडला की, त्यास मारपीट करावी एवढेच नव्हे तर ठारही मारावे असे मुसलमान गुंडांचे सतत प्रयत्न चालू आहेत व त्याप्रमाणे त्यांनी आतापर्यंत कित्येक आर्यसमाजी लोकांना बडविले वा ठारही केले आहे. हुतात्मा वेदप्रकाश याल मुसलमानांनी

नुकतेच चिरले. त्यामुळे आर्यसमाजात भयंकर खळबळ झाली असून ते जिवावर उदार होऊन आपले कार्यक्रम पार पाडीत आहेत. अशा प्रकारचे अत्याचार मुसलमानांकडून एकसारखे होत असताना देखील ते भीतीने डगमगले नाहीत, एवढेच नव्हे तर त्यांच्या अंगी धर्मभावनेचे बळ संचारल्यामुळे उभ्या हिंदू समाजाला आर्यसमाज हा आपला त्राता आहे असे वाटत असून त्यांच्याबद्दल सहानुभूतीही वाटत आहे. हिंदु समाज भित्रा आहे, तर मुसलमान समाज दुष्ट आहे, व भित्र्या लोकांना आपल्या पायावर उभे कसे करावे व दुष्टांचे दंडन कसे करावे हा आमच्यापुढे प्रश्न आहे असे एक प्रमुख अधिकारी आर्यसमाजी पुढारी यांनी आमच्याजवळ उद्गार काढले. आर्यसमाजाने आपल्या कार्याने मुसलमान समाजावर इतका वचक बसविला आहे की, आर्य समाजाचे नाव काढताच मुसलमान लोक भितात व 'ये आर्या कहांसे आये " असे मोठ्या आश्चर्याने उद्गारतात ! मुसलमानांच्या चळवळीप्रमाणेच आर्यसमाजानेही आपल्या चळवळी व्यापक प्रमाणावर चालविल्या असून त्यांनी तोडीस तोड केली आहे. शेकडोंनी नव्हे, हजारो बाटून मुसलमान झालेल्या हिंदूंना त्यांनी आर्यसमाजी बनविले आहे. एवढेच नव्हे तर ३०० जन्मजात मुसलमानांनाही त्यांनी आर्यधर्माची दीक्षा दिली आहे. त्यातही विशेष हे की त्यांपैकी कित्येक प्रतिष्ठित व सरकारी अधिकारी असलेल्या मुसलमानांच्या सुशिक्षित मुलीही त्यात आहेत. आर्यसमाजाने त्यांना आपल्या समाजात दाखल करून घेऊन व हिंदुसमाजाच्या चालीरीतींचे त्यांस शिक्षण देऊन त्यांची लग्नकार्येही घडवून आणली आहेत. हिंदु मनुष्य मुसलमान व्हावा हे येथील परिस्थितीत स्वाभाविक आहे. कारण त्याची जातगोत, सामाजिक बहिष्कार घालण्याची प्रवृत्ति स्पृश्यास्पृश्यता इत्यादि अडचणी त्याजपुढे असतात. शिवाय लाचलुचपत, नोकरीचे, बायकांचे व पैशांचे आमिष इ प्रलोभनेही त्यांच्यापुढे असतात. परंतु जेथे इस्लामी सरकार प्रतिष्ठित आहे व वैभवाची व सुखसोयींची जेथे समृद्धि आहे अशा स्थितीतून झगडा करीत राहणाऱ्या आर्यसमाजात प्रतिष्ठित मुसलमानांच्या सुशिक्षित मुली कशा दाखल होतात, याच्या कारणपरंपरेची चौकशी करता असे आढळून आले की हिंदूंना मुसलमान करण्याची मुसलमानांची जी वाढती प्रवृत्ति आहे व त्यासाठी ते जे सूक्तासूक्त उपाय अमलात आणीत आहेत ते सुशिक्षित झालेल्या मुसलमान मुलींना पसंत पडत नाहीत. दारुड्या व बदफैली मुसलमान नवऱ्याबरोबर बाह्यतः वैभवशाली संसार करण्यापेक्षा धर्मनिष्ठ व त्यापेक्षा म्हणजे एकपत्नीव्रताने वागणाऱ्या आर्यसमाजाबद्दल त्यांना अधिक सहानुभूति वाटते व पतीच्या एकनिष्ठपणाची आर्यसमाजात खात्री वाटत असल्यामुळे त्या तिकडे जाण्यास प्रवृत्त होतात.

आज आर्यसमाजाच्या शाखा भराभर वाढत आहेत. आर्यसमाजाचे मुळचे जे तत्त्वज्ञान त्याचा आज तेथे प्रकट प्रसार होत आहे असे नाही. जेथे कोठे कणखर वृत्ति आहे ते आर्यसमाजाचे लक्षण होय असे मानले जाते. आरंभी आरंभी आर्य-

समाजाने आपल्या मूळच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे चळवळ करण्यास सुरुवात केली असावी. मूर्तिपूजानिषेध, जाति मोडणे, अस्पृष्टांना वैदिक संस्कार इ. गोष्टींमुळे येथेही हिंदु समाजाच्या मनात इतर ठिकाणांप्रमाणे आर्यसमाजाबद्दल अढी बसलेली असावी; परंतु थोड्याच काळात आर्यसमाजालाही आपल्या कार्यपद्धतीला मुरड घालावी लागली व मुसलमानांच्या छळणुकीमुळे व आक्रमणामुळे आर्यसमाजातील प्रतिकार-गुणांचा हिंदु समाजावर पगडा बसून आर्यसमाजाबद्दल त्यांच्या मनात आदर व सहानुभूति वाटू लागली आहे. विशेषत: अस्पृश्यता निवारण्याच्या दृष्टीने आर्यसमाज हा हिंदु समाजाला नि:संशय उपकारक वाटत आहे. जर एखादा महार मुसलमान झाला तर तो हिंदूंच्या विहिरीवर मोठ्या तोऱ्याने पाणी भरू शकतो तर तोच महार आर्यसमाजी झाल्यानेही ते कां भरू शकणार नाही ? असा पेच पडून आर्य-समाजात एकदा कोणाही अस्पृश्याचा प्रवेश झाला की त्याची अस्पृश्यता गेली असा समज रूढ होऊ लागला आहे. वास्तविक आर्यसमाज मूर्तिपूजा मानीत नाही. परंतु अशा आर्यसमाजनिष्ठ पूर्वास्पृशाला मंदिरप्रवेश मोकळा आहे, व जर असा कोणी आला तर त्यास आपण अवश्य देवदर्शन घडवून देऊ असें परळीवैजनाथाच्या पुजाऱ्याने आम्हांस सांगितले. अगदी कठोर सनातनी लोक देखील आता असे उघड उघड म्हणू लागले आहेत की, जर मुसलमान लोकांना मंदिरे व पाणवठे यांच्या बाबतीत सवलती आहेत व जर कोणीही अस्पृश्याला मुसलमान होऊन त्या सवल-तींचा उपभोग घेता येतो तर अस्पृश्याला तो अस्पृश्य असताना देखील निदान तितक्या तरी सवलती मिळाल्या पाहिजेत व जर तो आर्यसमाजी झाला तर हिंदूंचे असे जे सर्वसामान्य हक्क व अधिकार आहेत ते सर्व त्यास मिळाले पाहिजेत. हिंदु समाजात ही जागृति होण्यास आर्यसमाज कारण झाला आहे.

असे असले तरी काही ठिकाणी सनातनी हिंदु मुसलमानांशी संगनमत करून आर्यसमाजी लोकांचा छळ करीत असलेले देखील आढळतात. निलंगा येथे शेषराव वकील या आर्यसमाजी इसमाला सनातनी हिंदूंनी त्याच्या अस्पृश्यता निवारण-विषयक मताबद्दल विषप्रयोग केला. पण त्यांचा तो डाव फसला. एका ठिकाणी तुळजापुराजवळ एक तेली आजारी पडला. त्याची कोणी वास्तपुस्त घेईना. त्यास जवळचे असे कोणी नव्हते. त्याच्या तोंडात पुढे आळ्या पडल्या तेव्हा गावच्या महारांनी त्याला महारवाड्यात नेले व तेथे त्याला सांभाळले. पुढे मुसलमान प्रचा-रक तेथे गेले असता त्यांनी त्याला मुसलमान होण्याबद्दल गळ घातली. त्याला सनातनी हिंदु अस्पृश्य समजू लागले व त्याप्रमाणे त्याच्याशी वागू लागले. अखेर तो मुसलमान झाला. पुढे आर्यसमाजाने त्याला आपल्यात दाखल करून घेतले. अशीही अनेक उदाहरणे आहेत. एकंदरीने पाहता आर्यसमाजाबद्दल हिंदु समाजात आदर, प्रेम व सहानुभूति वाढत आहे यात शंका नाही.

१२. मुसलमान गुंडांचे अत्याचार

मुसलमान गुंडांनी हिंदूविरुद्ध जे अत्याचार चालविले आहेत त्यांची संपूर्ण नोंद करणे फारच कठीण आहे. तथापि काही येथे उदाहरणादाखल दिलेले आहेत. यावरून या अत्याचारांचे हिडीस स्वरूप लक्षात येईल.

कळंब गावी हिंदूंचे पाणी पिण्याचे स्वतंत्र मालकीचे असे झरे आहेत. त्या झऱ्यांवर मुसलमानांचा काही हक्क नाही. तथापि ते झरे हिंदूंनाही निरुपयोगी व्हावे म्हणून काही गुंडांनी त्यात विष्ठा नेऊन टाकली !

येरमाळा येथे मोठी यात्रा भरत असते. यात्रेतील लोकांना पाणी पिण्यास मिळावे म्हणून एक मोठा हौद बांधलेला असून त्यास तोटया आहेत. तथापि पाण्याची नासधूस होऊ नये एवढयाकरिता हौदातून भांडयाने यात्रेतील लोकांना पिण्याचे पाणी घालण्यासाठी मुद्दाम माणसे वर बसविली होती. यंदा ती सर्व मुसलमान माणसे ठेवण्यात आली होती.

हुमणाबादजवळून एक पतिपत्नीचे जोडपे जात होते. कस्टमच्या नाक्यावर तेथील नाकेवाल्याने त्यास अडविले. ही कोण बाई घेऊन चाललास असे त्याने तिच्या नवऱ्यास हटकले. तेव्हा ती माझी बायको आहे असे त्याने सांगितले. पण ती तुझी बायको कशावरून ते सांग असे नाकेदार म्हणाला व तो त्या बाईस अडवून ठेवू लागला. साक्षीदार घेऊन येईतोपर्यंत या बाईस नाक्यावर ठेवून घेणार असे त्यास सांगून त्याने बाईस ओढले व नवऱ्यास त्याने व त्याच्या मदतगाराने मारहाण करण्यास सुरुवात केली. शेजारच्या गावात माझी ओळख आहे असे तो म्हणाला. तेव्हा तेथून साक्षीदार आणून ती बाई आपलीच बायको आहे असे पटवून देण्यासाठी नाकेदार त्यास पिटाळून लावण्यास गेला. इकडे नाक्यावर बाई एकटी होती. ती नाक्यावरील खोलीत शिरली व आत कोणी नाही असे पाहून तिने लगेच खोलीस आतून कडी घालून घेतली. इतक्या अवधीत नाकेदार परत आला व पाहतो तो बाईने खोलीस आतून कडी घातलेली, तेव्हा त्याचा राग अनावर होऊन तो तिला धाकदपटशा देऊ लागला व त्याचा उपयोग होत नाही असे पाहून खिडकीतून किंवा अन्य कोठूनसे खोलीत शिरण्याकरिता त्याने आत मान घातली. नाकेदाराची हत्यारे त्याच खोलीत होती. नाकेदार खोलीत शिरतोसे पाहताच बाईने तेथील तलवार हातात घेऊन नाकेदाराची मान कापून टाकली. नाकेदाराचा वध होताच त्याचा सोबती पळाला व बाई थोडया वेळाने बाहेर आली. इतक्या वेळात तिचा नवराही गावकऱ्यांना घेऊन आला. पुढे बाईवर खटला झाला त्यात ती पुढे निर्दोषी म्हणून सुटली.

लातूर येथे एक जोडपे गेले असता पोलिस ठाण्यावर त्यास वारंवार बोलावून सतावण्यात येत असे. लोकांनी त्याला आर्यसमाजाकडे जाण्यास सांगितले व ते

आर्यसमाजी झाले. दुसरे दिवशी तुम्हांस ठाण्यावर बोलाविले आहे असे सांगण्याकरिता शिपाई येताच बाईने त्यास परस्पर उत्तर दिले की आम्ही आता आर्यसमाजी झालो आहो. आम्ही आता ठाण्यावर येणार नाही. त्यानंतर पोलिसांचा त्यांच्या मागील ससेमिरा सुटला.

तुळजापूर येथे एका अरबाने रस्त्याने जाणाऱ्या बाईस अगदी उगाच मारले. साबळे या नावाचा एक मुलगा शौचास जात असता त्यासही मुसलमानांनी दगड मारिले. हे गावातील आर्यसमाजी लोकांना कळताच ते धावून आले व थोडासा दंगा झाला. एकदा प्रकरण असे इतके हातघाईवर आले म्हणजे जे लोक जमतात ते हातात नंग्या तलवारी घेऊनच बाहेर पडतात. तथापि पोलिस लौकरच आल्यामुळे दंगा वाढला नाही. तथापि दंगा मुसलमान लोकांनी केला असताही अधिकाऱ्यांनी २४ आर्यसमाजी हिंदु लोकांपासून जामीन घेतले आहेत. या गावातील संडासाकडे जाण्याचा रस्ता मुसलमान वस्तीतून आहे. स्त्रिया तिकडे जाऊ लागल्या म्हणजे त्यांच्या अंगावर खडे मारणे एवढेच नव्हे तर बायकांच्या संडासात लपून बसणे व तेथे त्यांची इज्जत घेण्याचा प्रयत्न करणे नेहमी सुरू असते. येथे आर्यसमाजी लोकांनी आपल्या आर्यसमाज मंदिरावर एक मोठी घंटा टांगली असून कोठेही दंगा झाला किंवा आपत्ति आली की लगेच ते ती घंटा वाजवितात व घंटा वाजली की हिन्दुसमाजावर काहीतरी संकट आहे असे समजून त्याच्या रक्षणार्थ सर्व जवान लोक धावून येतात. पुष्कळ ठिकाणी आर्य समाज मंदिरांतून अशा घंटा टांगलेल्या आहेत.

गुलबर्गा येथे नुकताच झालेला अत्याचार फारच भयंकर आहे. येथील हायस्कुलात धारवाडकर या नावाचे पन्नाशी उलटलेले एक पोक्त गृहस्थ संस्कृतचे शिक्षक असून ते लोकप्रियही आहेत. त्यांच्या वेशावरून ते आर्यसमाजी दिसतात. एके दिवशी सायंकाळी ते आपल्या घराच्या गच्चीवर काही मित्रांबरोबर गप्पा मारीत बसले असता त्यांच्या शेजारी असलेल्या एका मुसलमान सब इन्स्पेक्टरच्या घरातून गच्चीवर दगड आले. ५।१० वेळा असे दगड आल्यामुळे त्यास मुसलमानांचा अतिशय राग आला व सब इन्स्पेक्टरला 'तुझ्या घरातील मुले दगड मारतात याचा अर्थ काय?' असे विचारण्यासाठी ते हातात दिवा घेऊन खाली येऊ लागले. इतक्यात पोलिस सबइन्स्पेक्टरने आपल्या शिपायास त्यांजकडे धाडून त्यास पकडून आणले व त्यांनाच उलट तुम्ही आम्हांस दगड मारता काय असे म्हणण्यास सुरवात केली!

लगेच दोन मुसलमान साक्षीदार आणून मास्तरांच्या गच्चीवरील १०–१२ दगडांचा व पोलीस सब इन्स्पेक्टराच्या घरातील १०-१२ दगडांचा पंचनामा करून मास्तरांना पकडून पोलीस ठाण्यावर नेले. तेथे रात्रभर त्यांस मारहाण करून व त्यांच्या अंगावर थुंकून सकाळी त्यांस सोडून दिले. बाहेर येताच मास्तरांनी पोलीस सुपरिटेंडेंटकडे फिर्याद दाखल केली व रात्रीची सर्व हकीकत त्यांस सांगितली.

पोलीस सुपरिंटेंडेंटने मास्तरांच्या म्हणण्यात तथ्य आहे हे कबूल केले, परंतु हिंदु मुसलमानांचा वाद वाढू नये एवढ्याकरता मास्तरांनी तक्रार देऊ नये व प्रकरण मिटवून टाकावे असे सुचविले, व गावातील चार लोकांकडून त्यास तोच सल्ला देवविला. अखेर मास्तरांचा नाइलाज होऊन इतरांच्या केवळ भिडेखातर त्यांनी तक्रार नोंदविण्याचे रहित केले. पोलिस सबइन्स्पेक्टरची आपण बदली करू असेही पोलिस सुपरिंटेंडेंटने त्यांस आश्वासन दिले. परंतु तक्रार करण्याची कायदेशीर मुदत संपताच पोलीस सबइन्स्पेक्टरची बदली तर झाली नाहीच; पण मास्तरानेच त्यांच्या घरावर दगड मारले या आरोपावर पोलिसांनी मास्तरांवर खटला भरला. दुर्दैवाची गोष्ट ही की, हा खटला चालविण्यास मास्तरांस लायक वकीलही मिळू शकत नाही!

उस्मानाबाद येथे एक राममंदिर होते. परवानगीच्या अभावी त्याची दुरुस्ती झाली नाही. दुरुस्ती न झाल्यामुळे मंदिराची पडझड झाली. आता त्या ठिकाणी मुसलमानांनी मशीद बांधली असून त्यास ७०० रु ची सरकारी मदत मिळाली आहे.

वाशी येथील एका आर्यसमाजी पुढाऱ्यावर त्याने एका बाईचे लुगडे चोरल्याचा केवळ खोटाच आरोप घालून त्याच्या हातात बेडया ठोकून त्याची गावातील रस्त्यावरून धिंड काढली व नंतर त्यास सोडून दिले.

धोंडराई येथे बहादूर यार जंग याच्या खटपटीने ५०० अस्पृश्य मुसलमान झाले. त्यांपैकी काही बाया तर ६०।६० ७५।७५ वर्षांच्या होत्या. 'आम्हांस उगाच कां बाटवितां' ? असा त्यांनी आक्रोश केला. परंतु त्यांस बळजबरीने बाटविण्यात आले. जे अस्पृश्य मुसलमान झाले ते आता महार राहिले नाहीत म्हणून महारांना जे बलुते द्यावयाचे असते ते त्यांस हिंदूंनी दिले नाही. तेव्हा मुसलमानांनी हिंदूंची खळी लुटण्यास चिथावणी दिली. या नव्या मुसलमानांनीही खळी लुटली म्हणून हिंदूंनी त्यांजविरुद्ध चोरीची फिर्याद दाखल केली. परंतु तेथील फौजदाराने हा केवळ बलुत्याचा वाद आहे; यांत चोरीबिरी काही नाही असा रिपोर्ट केला. तेव्हा हिंदु पुढाऱ्यांनी अगदी वर निजाम सरकारपर्यंत दाद मागितली. तेव्हा या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता एक अधिकारी नेमण्यात आला. तोही मुसलमानच होता. तथापि त्याने सर्व साक्षी पुरावा गोळा करून नवमुस्लिमांनी हिंदूंची खळी खरीच लूटली असा पुराव्यानिशी रिपोर्ट पाठविला. तेव्हा त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याचा रिपोर्ट रद्द करून पुन्हा खालच्या फौजदारासच रिपोर्ट करण्यास सांगितले. त्याने आपला पहिलाच रिपोर्ट बरोबर असल्याचे कळविले. व इतके झाल्यावर फिर्याद काढून टाकण्यात आली. आता हिंदूंनी त्यांजवर दिवाणी दावे केले आहेत.

मुसलमान एवढेच करून थांबले नाहीत. ज्या वेळी गावातील चारपाचशे लोक मुसलमान झाले व गावातील सार्वजनिक विहिरीवर पाणी भरू लागले तेव्हा

अस्पृश्य समाजातील लोकांना मुसलमान होण्याचा मोह अधिक होऊ नये म्हणून गावातील प्रमुख हिंदू पुढाऱ्यांनी आपण होऊन सभा बोलावली व सर्व विहिरी अस्पृश्यांना खुल्या केल्या. अर्थात् ही इष्ट सुधारणा होतीच व त्यामुळे आणखी अस्पृश्य मुसलमान होण्याचे थांबले. पण मुसलमानांनी एका मोची जातीच्या हिंदु इसमाच्या नाकात काड्या घालून त्याच्या मार्फतीने हिंदूंवर फिर्याद लाविली आहे! हिंदूंनी अस्पृश्यांना स्पृश्यांच्या विहिरीवर पाणी भरण्यास परवानगी दिल्याने ते तेथे पाणी भरू लागले व त्यामुळे आपल्या धार्मिक भावना दुखविल्या गेल्या अशी ती फिर्याद असून आरोपींत गावातील प्रतिष्ठित वकील, सावकार वगैरे मंडळी आहेत. धोंडराई येथील मॅजिस्ट्रेटपुढे आपणांस न्याय मिळणार नाही अशी त्यांची खात्री असल्यामुळे खटला वर्ग करण्याबद्दल त्यांनी विनंती अर्ज केल्यावरून तो खटला आता मोमिनाबाद येथे चालू झाला आहे.

धारूर येथे शिमग्याच्या सणाची होळी पेटविण्यास येथील मुसलमानांनी सन १९३६ साली हरकत केली. जसजशी होळीची वेळ जवळ येत चालली तसतसे मुसलमान जमावाने जमून विरोधास उभे राहिले व आता ते हिंदूंवर हल्ला करणार असे दिसताच होळी न पेटवण्यास पोलीस अधिकाऱ्यांनी हिंदूंना हुकूम दिला. पण आम्ही आमच्या आळीत होळी करणार असा हिंदूंनी आग्रह धरला. धारूर येथे कटघरपुरा म्हणून कनोजी ब्राह्मणांची व रजपुतांची आळी असून तेथे त्यांची बरीच घरे आहेत. मुसलमान आपल्यावर चालून येत आहेत असे पाहताच काही जवानांनी त्याजवर गोळी चालविली व दोन खून पडले. तेव्हा सशस्त्र मुसलमानही पळून गेले. पुढे २४ लोकांवर खटले होऊन त्यांपैकी ६ जणांना ४-५ वर्षांच्या शिक्षा झाल्या.

तावसी, ता. लोहारा पायगा, जि. उस्मानाबाद येथे रामा मांग या नावाच्या एका मांगाने आर्यसमाजाचा स्वीकार केला होता. या गावी हिंदूंचे एक देवालय होते. ते पाडून तेथे मुसलमानांनी मशीद बांधण्यास सुरुवात केली. तेव्हा तेथील हिंदूंनी मशिदीचा ओटा पाडून टाकला. यामुळे मुसलमान चिडले व त्यांनी दोन मोटारी भरून सशस्त्र पठाण व अरब लोकांना आणले. त्यांनी गावात हिंदु लोकांना जरब बसविण्याचा प्रयत्न केला व आम्ही येथे मशीद बांधणार, कोण हिन्दु मायेचा पूत आम्हांस विरोध करण्यास पुढे येण्याची छाती दाखवीत असेल त्याने यावे अशी गर्जना केली. मुसलमान हत्यारी अरब पठाणांच्या या हल्ल्यापुढे हिंदू लोक नमले व पुढे होण्याची कोणाची छाती होईना. तथापि मुसलमानांपुढे नमण्याचे रामा मांगाच्या मनात येईना. अखेर तो एकटा पुढे झाला. 'हा मी विरोध करण्यास उभा आहे' असे म्हणून तो देवळाच्या कट्ट्याकडे जाऊन उभा राहिला. रामा मांग बळकट, पण निःशस्त्र होता. त्याला पाहून पठाण फिदी फिदी हसले व एकाने त्याच्या अंगावर गोळी झाडली. ती त्याच्या ओटीपोटात घुसली

मुसलमानांनी हल्ला करताच रामा मांग त्यांच्या अंगावर धावून गेला व त्याने पहिल्या झटक्यासरशी चार पठाण व अरब लोकांना लोळविले. हे पाहताच बाकीचे सर्व जण पळून गेले. एका पठाणाच्या हातात तमंचा (एक प्रकारचे पिस्तूल) होता. तोही त्याने काढून घेतला. रामा मांगाचा पराक्रम दिसताच पठाण मार खाऊन पळाले तेव्हा काही वेळाने गावातील पोलिस रामा मांगाकडे गेला व हत्यार मागू लागला. पण तो देईना. पुढे त्यास ओटीपोटात शिरलेल्या गोळीमुळे वेदना होऊ लागल्या. तेव्हा तो निर्बल झाला व त्याला अखेर तुळजापूर येथे व तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यावरून उस्मानाबाद येथे आणण्यात आले. पण तेथे येताच इस्पितळात तो मरण पावला. आता स्थानिक मुसलमानांनी रामा मांगाच्या मुलावर त्याने व त्याच्या बापाने मुसलमान लोकांचा खून करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून फिर्याद दाखल केली आहे. वास्तविक या सर्व प्रकरणात रामा मांगाच्या मुलाचा कोठेही काडीभरही संबंध नव्हता. पण एवढ्या पराक्रमी बापाच्या पोटची जातिवंत संतति तशीच असावयाची तेव्हा तिचा नायनाट केला म्हणजे आपण निर्वेध झालो अशी त्यांची समजूत दिसते.

असो. अशा प्रकारची कित्येक उदाहरणे देता येतील. ती नित्य नवी घडत आहेत. मुसलमान लोकांची हीन मनोवृत्ति किती नीचतेला गेली आहे, हे यावरून चांगलेच दिसून येते.

१३. हिंदूंविरुद्ध कायदे

हिंदु समाजाविरुद्ध असे प्रत्यक्ष कायदे फारसे नाहीत. जे काही आहेत ते सर्व समाजाला लागू असणारे असे आहेत. पण त्यांच्या अंमलबजावणीत मात्र हिंदूंच्या विरुद्ध कहर केला जातो. मुसलमानांनी काहीही आगळीक केली तरी ते अखेर शिरसलामत सुटून जातात व हिंदूंनी आगळीक केली नसताही त्यांच्यावर खटले भरले जातात. त्याचप्रमाणे कायदे करताना ते हिंदूंच्या हिताला मारक व मुसलमानांना पोषक कसे होतील या दृष्टीने कारवाई करण्यात येते. जमिनीबाबतच्या कायद्याचे हे एक मोठेच उदाहरण आहे. आजपर्यंत सावकारकी हा धंदा गुजराथी, मारवाडी, ब्राह्मण इ. प्रमुख हिंदु लोक करीत असत. नवीन झालेल्या कायद्याने मराठा, मुसलमान, इ. काही ठराविक जातींच्या लोकांच्या जमिनी वरच्या जातींच्या लोकांना खरेदी घेताच येत नाहीत. याचे वरवरचे स्वरूप समाजवादी दिसते; पण अंतःस्थ हेतु असा आहे की, या जातीतील लोकांच्या जमिनी शेट सावकारांना कायद्याने घेता येणार नाहीत व त्या घेण्याचे सामर्थ्य फक्त मुसलमानांतील लोकांनाच राहणार आहे. लोकांना कर्जपाण्याची जरुरी लागणारच व त्यासाठी जर त्यांना आपले शेत विकावयाचे असले तर ते मुसलमानांशिवाय दुसरा कोणीच घेण्यासारखा नाही, अशी परिस्थिति कायद्याने निर्माण केली आहे व

त्याचा परिणाम मुसलमान जमिनीचे मालक होण्यात होत आहे. (पंजाबमध्ये इंग्रजांनी १९०१ वर्षी जमिनीची मालकी अशाच स्वरूपाचा कायदा करून मुसलमानांना मिळवून दिली होती. त्याचेच निजाम सरकारने अनुकरण केले.) जातीची अट न घालता, उत्पन्नाची अट घाला अशी लोकांनी पुष्कळ विनंती करून पाहिली म्हणजे ज्याचे उत्पन्न अमुक इतके किंवा अधिक असेल त्यास कोणत्याही जातीतील इसमाची जमीन विकत घेता येऊ नये असे करावे असे सुचविले. परंतु निजाम सरकार तसे काही करण्यास तयार नाही. अशा रीतीने वर्गकलह व धर्मकलह आर्थिक स्वरूपात आणून सोडण्याचेही कार्य जोरात चालू आहे. हिन्दु सावकार आपला पैसा मोगलाईत न गुंतविता बाहेर ब्रिटिश हद्दीत अधिकाधिक गुंतवू लागले आहेत याचे एक कारण सरकारी धोरणाबद्दल हिंदु समाजात अविश्वास उत्पन्न झाला आहे हे होय.

१४. हिंदूंच्या मागण्या

१. राज्यकारभारातील सर्व खात्यातून हल्ली बहुतेक सर्व मुसलमान अधिकारी आहेत. त्या ठिकाणी निमेनीम तरी हिंदु अधिकारी असले पाहिजेत. तरच परस्परांचा परस्परांवर दाब पडेल व लोकांना न्याय मिळण्याची आशा वाटू लागेल. नोकऱ्यांतही सर्वत्र हेच प्रमाण असावे. पोलिस शिपायांपासून सर्व खात्यांतील नोकऱ्यांतून निम्मी संख्या तरी हिंदूंची असली पाहिजे.

२. हिंदूंच्या हिताला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष विरोधी होतील असे कायदे रद्द झाले पाहिजेत. सध्या जमिनीच्या खरेदीबाबत हिंदूविरोधी असे कायदे असून त्याचा परिणाम हिंदूंच्या जमिनींची मालकी मुसलमानांकडे जाण्यात होत आहे.

३. निजामच्या राज्यात भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य आणि तसेच धर्मस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य नाही. ही स्वातंत्र्ये मिळाली पाहिजेत. आज कोणतीही सभा सरकारी अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय भरविता येत नाही. ती भरविता आली पाहिजे. त्याचप्रमाणे लेखनस्वातंत्र्यही आज येथे नाही ते मिळाले पाहिजे. धर्माचरणाचे व संघटन करण्याचे बाबतीत सरकारी अधिकारी पक्षपात करून हिंदूची नेहमी खच्ची करतात तो प्रकार बंद पडला पाहिजे.

४. आज मराठी भाषेचे शिक्षण दुय्यम स्वरूपाचे झाले आहे. त्यात मातृभाषेला प्राधान्य मिळाले पाहिजे व खासगी शाळा काढण्यास व चालविण्यास हरकत होता कामा नये.

या चार प्रकारच्या हिंदूंच्या मूलभूत हक्काच्या मागण्या आहेत व त्या हिन्दूना अवश्य प्राप्त झाल्या पाहिजेत.

१५. हिंदूंची तयारी

आपल्या मागण्या मान्य करून घेण्याकरिता स्थानिक हिंदु लोक तयारी करू लागले आहेत. हिंदूंचे आतून आतून संघटन करण्याचे प्रयत्न सुरू असून त्यांना निर्बल करण्याचे मुसलमानांचेही प्रयत्न सुरू आहेत. त्यांनी तिकडे ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा वादही आता माजविण्यास सुरुवात केली असून ब्राह्मण व आर्यसमाजी एवढे दोघेच त्यांस प्रबळ शत्रू वाटतात, परंतु या सर्व आक्रमणाला तोंड देण्यास सत्याग्रह साम वा शुद्ध करण्याची ठिकठिकाणची हिंदु पुढारी मंडळी तयारी करण्याच्या उद्योगात आहेत. परंतु मुसलमानांची संघटना व त्यांच्या मागे असलेले राजसत्तेचे बळ लक्षात घेता त्यांना पुरे पडण्याइतके बळ आज हिंदु समाजात खास नाही. सरकार जर खरोखर तटस्थ राहील तर मुसलमान समाजाला वास्तविक पाहता हिंदू समाज सहज टक्कर देऊ शकेल. परंतु तेथे सर्व सरकारी सत्ता हिंदुविरोधी असल्याकारणाने कोणतीही गोष्ट करणे धोक्याचे होऊन बसले आहे.

१६. बाहेरील हिंदूंची मदत

या आक्रमणाला तोंड देण्यासाठी तेथील हिंदु समाजाला ब्रिटिश हद्दीतील हिंदु समाजाच्या मदतीची अतिशय गरज आहे. या मदतीशिवाय आपण निजाम सरकार व मुसलमान समाज या उभयतांच्या संयुक्त आक्रमणास तोंड देऊ शकणार नाही असे येथील लोकांचे मत आहे. बाहेरून जी मदत पाहिजे ती पैशाच्या स्वरूपाची नव्हे. स्थानिक सधन लोक पैसा पुरवू शकतील. परंतु हिंदूंची संघटना घडवून आणण्यास व त्यांच्यात चळवळीची तयारी करून देण्यास पुढारी, कार्यकर्ते व प्रचारक लोक त्यांस हवे आहेत. बाहेरील पुढाऱ्यांच्या साह्याने निजाम सरकारला जरा दाब बसेल. कार्यकर्त्यांच्या मदतीने लोकांचा आत्मविश्वास वाढेल व लोक स्थानिक मुसलमान गुंडांना शह देऊ शकतील असे त्यांचे मत आहे. हा विचार हिंदुपुढाऱ्यांमध्ये विशेषतः दृष्टीस पडतो. आर्यसमाजातील पुढाऱ्यांना स्वतःच्या कर्तृत्वाचा आत्मविश्वास असल्याने त्यांना बाहेरील पुढाऱ्यांची फारशी आवश्यकता वाटत नाही. अर्थात् कोणी आले तर त्यांना हवेच आहेत. पण त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसण्याची त्यांना जरुरी वाटत नाही. आर्यसमाजाला कार्यकर्त्या प्रचारक लोकांची मात्र जरुरी आहे. निजाम सरकारचे ३०० मौलवी इस्लामी धर्माचा प्रचार सतत करीत असता आर्यसमाजाचे २५ प्रचारक त्यांना यशस्वी रीतीने तोंड देऊ शकले. यावरून पगारी प्रचारक व कळकळीचे प्रचारक यांच्यातील फरक दिसून येतो.

हिंदु समाजाला शारीरिक कवायती शिक्षणाचीही फार आवश्यकता आहे. व्यायामसंस्था चालविण्यास इकडच्या भागातून माणसे मिळू शकली तर तेथे संघ-

शक्ति उत्पन्न होईल. आज तेथे हिंदु लोकही हत्यारबंद असल्यामुळे ते मुसलमान गुंडांना शह देऊ शकतील. या दृष्टीने व्यायामशिक्षकांची तिकडे फार जरुरी आहे.

याशिवाय प्रसिद्धिखात्याची फार आवश्यकता आहे. निजाम राज्यात होणाऱ्या जुलुमांना वाचा फुटत नाही. ती जर फोडता आली व त्यांचा डांगोरा पिटता आला तर हिन्दुस्थान सरकारच्या द्वारा निजाम सरकारवर दाब उत्पन्न करता येईल. आज प्रसिद्धीकरणाचे काम अगदीच बेवारशी पडले आहे. महात्मा गांधींच्या चळवळींना प्रसिद्धीकरणाचा केवढा उपयोग झाला याची ज्यांना कल्पना आहे त्यांना प्रसिद्धीच्या चळवळीची आवश्यकता पटेल. ब्रिटिश हद्दीतील वर्तमानपत्रे व मासिके यांच्या प्रतिनिधींनी निजाम हद्दीत ठिकठिकाणी हिंडून जर तेथील अत्याचारांना वाचा फोडण्याचे काम केले तर मुसलमानांच्या अत्याचारांना व अन्यायांना पुष्कळच पायबंद बसेल असे वाटते.

१७. समारोप

आम्हांस तेथे जाऊन खासगी मुलाखतीच्या रूपाने जी माहिती मिळविता आली, ती सारांशरूपाने वर दिली आहे. अनेक ठिकाणी अनेकांकडून एकाच प्रकारची माहिती मिळाल्याने तिच्या सत्यतेविषयी किंवा तीवरून काढलेल्या अनुमानांविषयी शंका वाटण्याचे कारण नाही. निजाम सरकारचे पाठबळ नसते तर हिंदु समाजाला मुसलमान चळवळयांची व गुंडांची काहीच भीति बाळगण्याचे कारण नव्हते. परंतु मुसलमान गुण्डांच्या पाठीमागे निजाम सरकारचे सारे सामर्थ्य, बिनहिशेबी हवा तेवढा पैसा व चळवळ चालविण्यास लागणारी बुद्धि यांची जोड मिळाल्यामुळे संस्थानातील हिंदू दीन झाले आहेत व या परिस्थितीस तोंड देण्याकरिता आपणास ब्रिटिश हद्दीतील हिंदु समाजाकडून मदत मिळाली पाहिजे अशी त्यांची न्याय्य अपेक्षा आहे. अजूनही निजाम हद्दीतील सधन हिंदु वर्ग थोडका नाही. परंतु प्रतिकार करण्यासाठी उठाव करण्यास लागणारे सामर्थ्य आज त्यांच्यात नाही व अनेक शतके मुसलमानी सत्तेखाली राहिल्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वासही ढळला आहे. म्हणून जर ब्रिटिश हद्दीतील लोकांनी त्यांना लायक कार्यकर्त्यांचा पुरवठा केला तर तेथील हिंदु आजही मुसलमानी आक्रमणास तोंड देण्यास तयार होतील. आमच्या मते पुढील फार थोड्या काळात या लढ्याला तीव्र स्वरूप येईल. कारण मुसलमानांची सर्व बाजूंनी तयारी चालू असून आळी-आळींच्या संघटना करणे, शस्त्रसामग्रीचा पुरवठा करून ठेवणे आणि सर्व निजाम राज्यभर एकदम चढाईचा कार्यक्रम करून ठिकठिकाणच्या हिंदु लोकांना चिरडून साफ करणे या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालू आहेत. परंतु अजूनही त्या प्रांतांतील हिंदूंची वस्ती शेकडा ८५–९० असल्यामुळे त्यांच्या या प्रकारच्या आक्रमणास हिंदूंनी थोडाही संघटित विरोध केला तरी तो पुरण्यासारखा आहे.

या चळवळीचे पुढारीपण आर्यसमाजाकडे जावे व जाणार हे उघड दिसते. कारण त्यांच्या इतकी संघटित अशी दुसरी कोणतीच हिंदु संस्था तेथे नाही. तेव्हा जे काही करावयाचे ते आर्यसमाजाच्या नेतृत्वाखाली किंवा सहकार्याने एकसूत्रीपणाने करावे. जी माणसे प्रचाराकरिता पाठवावयाची ती आर्यसमाजाची शिस्त पाळतील याचीही काळजी घ्यावी. चळवळीला जर एकसूत्रीपणा राहिला नाही तर ती यशस्वी होणार नाही. ब्रिटिश हद्दीतील हिंदु पुढारी व कार्यकर्ते अधूनमधून वेगवेगळ्या निमित्ताने मोगलाईतून नुसते हिंडत राहिले व तेथील कार्यकर्त्या हिंदूंशी व आर्यसमाजाच्या पुढाऱ्यांशी आपलेपणाचा संबंध जोडीत गेले तरी सुद्धा स्थानिक हिंदूंचा आत्मविश्वास वाढेल व मुसलमानांवरही त्यांचा दाब उत्पन्न होईल.

१८. सारांश

१. हिंदु पुढाऱ्यांनी यात्रेच्या वा अन्य निमित्ताने त्या प्रांतात वारंवार जाणे येणे ठेवावे.

२. ब्रिटिश हद्दीतील वर्तमानपत्रांनी निजाम हद्दीतील अन्यायांना वाचा फोडण्यासाठी आपले प्रतिनिधि तिकडे नेहमी पाठवावे.

३. तिकडून इकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यायामाचे शिक्षण द्यावे व विशेष प्रसंगी इकडूनही क़वायतीचे शिक्षण देणारी माणसे तिकडे पाठवावी.

४. सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली म्हणजे एकदम केंद्राकेंद्रांच्या ठिकाणी भाषणस्वातंत्र्यासाठी ब्रिटिश हद्दीतील कार्यकर्त्यांनी व पुढाऱ्यांनी सत्याग्रहासाठी एकदम धावून जावे.

५. त्याचप्रमाणे जर स्वयंसेवकांची लहान लहान पथके त्या प्रांतात दंगलीच्या वेळी पाठविता आली तर त्यांचाही निःसंशय उपयोग होईल.

आर्यसमाजी लोकांवर सरकारचे नियंत्रण सुरू झाले असून पुढील वर्ष सहा महिन्यांतही कदाचित् चळवळीस तोंड लागेल. ब्रिटिश प्रांतात ज्याप्रमाणे लोकनियुक्त कायदेमंडळे आहेत त्याचप्रमाणे सर्व संस्थानांतूनही अर्थात् निजाम संस्थानातही ती लौकरच सुरू करावी लागतील याची स्वप्ने निजाम सरकारला पडली असून मध्यवर्ती हिंदुस्थान सरकारात लोकसंख्येच्या प्रमाणात असेंब्लीत प्रतिनिधि पाठवावे लागतील, व असे झाले तर एवढ्या मोठ्या निजाम राज्यातून बहुतेक हिंदूच प्रतिनिधि जातील व निजाम राज्याचे इस्लामीपण नामशेष होईल अशी त्यांना भीति वाटते. सध्याचे निजामी राज्य हे इस्लामी राज्य आहे अशी सरकारी घोषणाच आहे. याकरिता मुसलमानांची संख्या वाढविण्याकरिता या चारदोन वर्षांत इस्लामी सत्तेच्या साह्याने जे काय आटोकाट प्रयत्न करून यश मिळविता येईल तेवढे पदरात पाडून घ्यावे असे त्यांचे धोरण आहे व हिंदुसमाजातील भिन्नेपणाचा

त्यास पुष्कळ फायदाही होतो. या सर्व गोष्टीस विरोध करणारा एक आर्यसमाज व काही ब्राह्मण लोक आहेत अशी निजामी अधिकाऱ्यांची समजूत आहे व म्हणून त्यांना चिरडून टाकले म्हणजे काम झाले असे त्यांस वाटते. परंतु आर्यसमाजातील कार्यकर्ते थोडे असले तरी चिरडले जाण्याच्या पलीकडे ते गेले आहेत व सत्याग्रहास त्यांची तयारी आहे. अशा वेळी ब्रिटिश मुलुखातील व येथील हिंदु पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकदम उचल केल्यास फार थोड्या आयासाने हा लढा यशस्वी रीतीने लढता येण्यासारखा आहे.

या वृत्तान्ताचा परिणाम

निजाम राज्यातील हिंदु समाजाच्या परिस्थितीचा आपल्या समितीच्या पाहणीचा वृत्तान्त दाते यांनी जून १९३८ मध्ये हिंदुसभेस सादर केला व तो पुढे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला. पुढील एक दोन महिन्यांत त्यावर बराच विचारविनिमयही झाला. त्या संबंधात केसरी पत्राने दि. ८ जुलै १९३८ च्या अंकात आपल्या संपादकीयात म्हटले आहे की "हैदराबाद येथे नुकत्याच होऊन गेलेल्या दंग्याचा अंगावर शहारे आणणारा वृत्तान्त ऐकून येथील हिंदु सभेच्या चालकांनी निजामच्या मराठवाड्यातली परिस्थिति प्रत्यक्ष पाहून येण्याला आपले प्रतिनिधि पाठवून द्यावे असे ठरविले आणि त्याप्रमाणे चतुर, हिकमतगार धीट व साक्षेपी असे प्रतिनिधी त्यांनी मुद्दाम पाठवून देऊन त्यांना परत येऊन यथातथ्य रिपोर्ट देण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे त्या प्रतिनिधींनी निजाम राज्यातील अनेक गांवी हिंडून, परिस्थिति समक्ष पाहून आणि अनेकांनी सांगितलेल्या हकीकतीचा पडताळा पाहून आपला रिपोर्ट तयार केला व तो हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांस निवेदन केला. त्याबद्दल अखिल हिंदुसमाज त्यांचा ऋणी आहे. त्या अहवालातील एकेक जुलमाचे प्रकार आणि तोंड दाबून सोसावा लागणारा मार याची कहाणी ऐकून सर्वजण चकित झाले आणि ही सर्व कच्ची हकीकत वृत्तपत्रातून प्रसिद्ध करावी असे ठरले. त्याप्रमाणे गेल्या चार अंकांत हा 'चक्षैर्वै सत्यं' रिपोर्ट केसरीतून आणि त्रिकाळ, प्रभात इ. वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला. त्या वृत्तांतावरून हिंदु धर्मीयांनी या बाबतीत काय करणे जरूर आहे व शक्य आहे याचा विचार केला पाहिजे. या रिपोर्टावरून निज़ाम राज्यात राहणाऱ्या हिंदु धर्माच्या अनुयायांची तेथे मोठी कुचंबणा चालली आहे आणि तिचा लौकरच प्रतिकार न झाल्यास हिंदुधर्मावर मोठे संकट कोसळणार आहे याची जाणीव हिंदु महासभेस आणि हिंदु समाजास झाली पाहिजे. हा विशिष्ट व्यक्तींचा किंवा विशिष्ट स्थळांचा किंवा विशिष्ट प्रसंगांचा प्रश्न नाही. हैदराबाद येथे किंवा गुलबर्ग्यात अथवा लातूर गावी दंगा झाला व त्यात काही व्यक्तींची प्राणहानि वा धनहानि झाली म्हणून त्यांच्या संरक्षणाची आणि नुकसान भरपाईची तजवीज काय करावी एवढ्यापुरता हा प्रश्न संकुचित नाही. परंतु त्यावरून निजा-

मच्या राज्यात एकंदरीत हिंदु धर्मविरुद्ध कोणत्या कारवाया चालल्या आहेत व त्यास कसे तोंड द्यावयाचे असा हा व्यापक प्रश्न आहे. हैदराबाद येथील दंगा हे तेथील हिंदुविरोधी कारवायांचे एक प्रासंगिक चिन्ह आहे हे ओळखून केवळ त्या दंग्यातील आरोपीच्या बचावाचा आणि संकटग्रस्तांच्या आर्थिक साहाय्यापुरता विचार करून हा प्रश्न संपवू नये. त्या संकटाच्या मुळाशी जाऊन असे प्रसंग पुनश्च कसे न उद्‌भवतील या तजविजीस हिंदु समाजाने लागले पाहिजे.

महाराष्ट्रात या वृत्तान्ताचा बराच खोलवर परिणाम झाला व त्यातूनच भागानगर निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ निर्माण झाली. स्वा. सावरकर यांच्या नेतृत्वाखाली ती सुरू झाली, चालली व यशस्वीही झाली.

(८)

निःशस्त्र प्रतिकाराचे आंदोलन

निजाम राज्यातील हिंदु समाजाच्या पाहणीचा दाते यांचा वृत्तान्त जून १९३८ अखेर प्रसिद्ध झाला. त्यावर पुढील एक दोन महिने बरीच चर्चाही झाली. या संबंधात हिंदुसभेने काय करावे यावर विचारविनिमयही बराच झाला. स्वा. सावरकर हे १९३७ मध्ये अहमदाबादमध्ये भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते व १९३८ वर्षी डिसेंबरात नागपूर येथे भरणाऱ्या हिंदुमहासभेच्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपदही त्यांनाच देण्यात येणार हेही स्पष्ट दिसत होते. त्यांनी निजाम राज्यातील हिंदूंचा प्रश्न हाती घेण्याचे ठरविले व त्या दिशेने यंत्रणा सुरू झाली.

संस्थानी प्रजेची चळवळ

याच काळात हैदराबाद येथे निजाम राज्यातील हिंदु लोकही जागृत झाले होते. त्यांनी १९१९ च्या सुधारणा कायद्याच्या धर्तीवर निजाम राज्यातीलही लोकांना सुधारणा कायदा लागू करावा यासाठी प्रयत्न चालविला होता. पं. नेहरूंच्या पुढाकाराखाली निरनिराळ्या संस्थानांतून लोकशाही पद्धतीचे अधिकार त्या त्या संस्थानांतील प्रजेला प्राप्त व्हावे यासाठी काँग्रेसच्या मार्गदर्शनाखाली चळवळ चालू होती. पण इतर संस्थानांपेक्षा निजाम राज्यातील परिस्थिति वेगळी होती. तेथील शासन स्वतःला "हैदराबाद हे इस्लामी शासन आहे" असे उघडपणे प्रतिपादन करीत होते. तेथे मुसलमानांना सर्व प्रकारचे नागरिक स्वातंत्र्य होते. एवढेच नव्हे, तर राजसत्तेत तेच मुख्य होते. पण निजाम राज्यातील ८५ टक्के प्रजा हिंदु असताना त्यांना मात्र तेथे साधे नागरिक स्वातंत्र्यही नव्हते. त्यामुळे निजाम राज्यातील चळवळीला 'राजा विरुद्ध प्रजा' असे स्वरूप न येता ते 'राजा व राज्यकर्ता मुस्लिम समाज' विरुद्ध 'हिंदु समाज' अशा प्रकारचे स्वरूप प्राप्त झाले होते. पण ही वस्तुस्थिति मान्य करण्यास किंवा त्याविरुद्ध आवाज काढण्यास गांधी किंवा त्यांची काँग्रेस तयार नव्हती.

महाराष्ट्र परिषदेचा पुढाकार

या परिस्थितीला वाचा फोडण्याचे काम निजाम राज्यातील महाराष्ट्रीय समाजाने प्रथम केले. त्यांनी १९३७ वर्षी परतूड येथे एक महाराष्ट्र परिषद भरविली. ती भरविण्यासही परवानगी आवश्यक असल्याने ती मिळावी यासाठीही त्यांना दीर्घकाळ उद्योग करावा लागला. निजाम सरकारचे नवे दिवाण सर अकबर

हैदरी यांनी नुकतीच राज्यकारभाची सूत्रे हाती घेतली होती. अखेर बऱ्याच अटी घालून त्यांनी ही परिषद भरविण्यास परवानगी दिली. या परिषदेत जनतेची काही गाऱ्हाणी मांडण्यात आली होती व घटनात्मक कारभाराला निजाम राज्यात प्रारंभ व्हावा अशी मागणीही करण्यात आली होती.

पुढे महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन लातूर येथे दि. २ जून १९३८ ला भरले. मागील परिषदेप्रमाणे याही परिषदेवर निजाम सरकारने अनेक बंधने घातली होती. परिषदेत पास करावयाच्या प्रस्तावांचा मसुदा आधी जिल्हाधिकाऱ्यास दाखवून व त्याची मान्यता घेऊन नंतर तो खुल्या अधिवेशनात मांडला जावा असे एक बंधन त्यात होते. दाते हे या परिषदेस उपस्थित होते. परिषदेच्या अध्यक्षांच्या भाषणात निजाम सरकारच्या धोरणावर टीका होती व ब्रिटिश हिंदुस्थानातल्याप्रमाणे निजाम राज्यातही सुधारणा कायदा लागू करावा अशीही त्यात एक सूचना होती. या विषयावर विषयनियामक समितीत पुष्कळ चर्चा होऊन प्रस्तावाचा मसुदा तयार झाला व लोकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या संबंधात चौकशी समिति नेमण्याचाही प्रस्ताव तयार करण्यात आला. तसेच लोकांना नागरिक स्वातंत्र्याचे हक्क व राज्यकारभारात भाग घेण्याची संधि मिळाली पाहिजे या संबंधानेही एक प्रस्ताव तयार करण्यात आला होता. या प्रस्तावांचे मसुदे परिषदेवरील बंधनानुसार जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात आले तेव्हा त्यांनी त्यांस हरकत घेतली. त्यामुळे परिषदेचे वातावरण खूपच खवळले. पुन्हा विषयनियामक समिति भरून तीत पुष्कळ चर्चा झाली व जिल्हाधिकाऱ्याच्या धोरणाच्या निषेधार्थ खुले अधिवेशनच रहित करण्यात आले. यातूनच संघर्षाचे बीज रोवले गेले.

स्टेट काँग्रेसला विरोध

लोकांत प्रक्षोभाचे वातावरण निर्माण होत चाललेले पाहून निजामी शासनाने लोकांच्या तक्रारी समजून घेण्याकरिता म्हणून आयंगार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली. दि. ६ एप्रिल १९३८ ला खुद्द हैदराबाद येथेच मोठा दंगा झाला होता व त्याचे पडसाद सर्वत्र उमटत होते. हे दंगे घडवून आणण्यात सरकारी अधिकाऱ्यांचेच अंग आहे असा लोकांचा उघड उघड आरोप होता, व आयंगार समिति हा आरोप चुकीचा आहे हे दाखविण्याचा व घडलेल्या प्रकारावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करीत होती. सरकारचे लपंडाव लक्षात घेऊन व याच काळात ब्रिटिश हिंदुस्थानात १९३५ च्या कायद्यानुसार मंत्रिमंडळे स्थापन झालेली पाहून निजामी राज्यातही लोकांना तसे अधिकार मिळाले पाहिजेत यासाठी लोकांनी इतर संस्थानांत जशा स्टेट काँग्रेस संस्था स्थापन झाल्या होत्या त्याप्रमाणे निजाम राज्यातही स्टेट काँग्रेस स्थापन करण्याचे ठरविले. हिंदुस्थानातील अनेक संस्थानांतून काँग्रेस नेत्यांच्या पाठिंब्यावरच अशा संघटना यापूर्वी स्थापन झाल्या होत्या.

निजाम राज्यातही स्टेट काँग्रेस स्थापन करून सरकारकडे लोकशाही पद्धतीचे शासन निर्माण करण्याच्या संबंधात काही मागण्या करण्याचे लोकांनी ठरविले. त्या मागण्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते :

(१) हिंदुस्थान सरकारच्या १९१९ च्या सुधारणा कायद्यास अनुसरून निजामांनी तत्काळ सुधारणा घोषित कराव्या, व दहा वर्षांत पूर्ण जबाबदारीची शासनपद्धति लागू करावी.

(२) जनतेच्या मूलभूत हक्कांना मान्यता देणारा जाहीरनामा प्रसिद्ध करावा.

(३) संस्थानातील प्रजेची संस्कृति, धर्म व भाषा यांच्या संरक्षणाची हमी मिळावी.

(४) कायदेमंडळात एकूण मुस्लिम सभासदांची संख्या एक तृतीयांशापेक्षा अधिक असू नये.

(५) निवडणुका संयुक्त मतदार संघाकडून व्हाव्यात.

(६) नोकऱ्यांत मुसलमानांचे प्रमाण शेकडा ५० पेक्षा अधिक असू नये.

(७) शिक्षणाचे माध्यम प्रांतिक भाषा असावी. एखाद्या भाषेचे दहा टक्के किंवा अधिक विद्यार्थी असले तर त्यांना त्यांच्या भाषेतून शिक्षण मिळण्याची सोय असावी.

(८) कोर्ट कचेरीमधूनही प्रांतिक भाषेतून कामकाज चालावे. मध्यवर्ती कचेऱ्यांची भाषा हिंदुस्थानी असावी.

(९) हिंदू धर्मादाय व मंदिरे यांची व्यवस्था अधिकारी व बिनअधिकारी अशा हिंदू पंचांकडे असावी. तशीच मुसलमानी पवित्र स्थानांची व्यवस्था मुस्लिम पंचाकडे असावी.

निजाम सरकारने या मागण्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केले. एवढेच नव्हे तर दि. ७ सप्टेंबर १९३८ ला खास हुकूम काढून स्टेट काँग्रेस स्थापन करण्यासच बंदी केली. त्यामुळे त्याविरुद्ध लढचाला सिद्ध होण्याशिवाय स्टेट काँग्रेसच्या पुढाऱ्यांना गत्यंतरच उरले नाही.

डॉ. हेडगेवारांचा पाठिंबा

या लढ्याच्या संबंधात दाते यांचा स्टेट काँग्रेसचे काही नेते, तसेच हिंदुसभेचे व आर्य समाजाचे पुढारी यांच्याबरोबर बराच विचारविनिमय झाला होता. श्री. दाते व भाऊसाहेब मोडक यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांचा पुण्यास मुक्काम असताना १९३८ च्या मे मध्ये त्यांची भेट घेतली, व हैदराबाद राज्यातील परिस्थिति त्यांच्या कानावर घातली. हैदराबाद राज्यातील हिंदु लोक उठाव करण्याच्या तयारीत असून त्यांना बाहेरील

म्हणजे ब्रिटिश हद्दीतील हिंदूंचे सहकार्य हवे अशी त्यांची मागणी होती. स्टेट काँग्रेसच्या व हिंदुसभावादी नेत्यांनी दाते यांच्याजवळ अशी अपेक्षा व्यक्त केली होती की बाहेरच्या भागांतून निदान पाचशे तरी स्वयंसेवक सत्याग्रहासाठी यावेत, व निजाम राज्यातील या आंदोलनाच्या प्रसिद्धीचे सर्व काम महाराष्ट्राने करावे. कारण निजामी शासन तेथून कोणत्याही प्रकारची प्रसिद्धि बंद पाडण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही हे स्पष्ट दिसतच होते. हेडगेवार यांनीही या लढ्यास आपला पाठिंबा व्यक्त केला व तुम्ही हैदराबादमधील लोकांना तसे आश्वासन द्या असे सांगितले.

हिंदुसभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

त्या काळात हिंदुसभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांत दुजाभाव मुळीच नव्हता. बहुतेक सर्व ठिकाणचे स्थानिक संघचालक हे हिंदुसभेचे त्या त्या ठिकाणचे कार्यकर्ते होते. लोकशाही स्वराज्य पक्ष हा निवडणुकीच्या राजकीय क्षेत्रात काम करणारा पक्ष, हिंदुसभा विविध सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात काम करणारी संस्था व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटित बलसंवर्धनाच्या क्षेत्रात काम करणारी संघटना; पण या सर्व स्वतंत्र असल्या तरी त्या एकमेकांस पूरक असे त्यांचे आंतर संबंध होते. १९३८ च्या नागपूर येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष स्वा. सावरकर हे होते तर त्या अधिवेशनाच्या स्वयंसेवक पथकाचे नेतृत्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्याकडे होते. याच अधिवेशनात भागानगर निःशस्त्र प्रतिकाराच्या लढ्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. या लढ्यात महाराष्ट्रातून पाचशे प्रतिकारकांची अपेक्षा असताना प्रत्यक्षात चार हजारांवर लोकांनी त्यात भाग घेतला व आर्यसमाजाने तर हजारो लोक सत्याग्रहाच्या चळवळीस पुरविले. आर्य समाजाची पंजाबातूनच काय, पण पेशावरपासून कित्येक पथके आली होती. काही पथके तर एक एक हजार प्रतिकारकांची होती.

सेनापति बापटांनी रणशिंग फुंकले

स्वा. सावरकरांचे स्नेही व सहकारी सेनापति बापट यांनी हा लढा सुरू करण्यात पुढाकार घेतला. या आंदोलनासंबंधात एक घोषणापत्रक प्रसिद्ध करून ते दि. २३ सप्टेंबर १९३८ ला हैदराबादला जाण्यास निघाले, पण तेथे काही करणार त्यापूर्वीच पोलिसांनी त्यांना अटक करून पुण्यास परत पाठविले. पुण्यास आल्यावर त्यांनी प्रचार सुरू केला व दि. १ नोव्हेंबरला पुन्हा हैदराबादला बरोबर सत्याग्रही पथक घेऊन जाण्याचे ठरविले. तथापि त्यांनी दि. २३ सप्टेंबर १९३८ ला जे रणकुंड पेटविले ते प्रथम हैदराबाद राज्यातच पेटले व धगधगू लागले.

हैदराबाद येथील हिंदुसभावादी मंडळींनी त्यात प्रथम उडी घेतली. त्यासाठी ते काही योजनाबद्ध आंदोलन सुरू करण्याच्या विचारात असता दुसऱ्याच एका निमित्ताने त्यांच्या लढ्याला आधीच तोंडही लागले. हैदराबाद येथील नामवंत हिंदु पुढारी श्री. वामनराव नाईक यांच्या श्राद्धदिनाच्या दिवशी हैदराबाद येथील हिंदु सभावादी पुढारी वीर यशवंतराव जोशी व त्यांचे सहकारी यांनी एक मिरवणूक व सभा आयोजित केली होती. त्यासाठी तेथील नियमास अनुसरून त्यांनी परवानगीही मागितली. पण ती पोलीस खात्याने दिली नाही. आधीच्या वर्षीही त्या पुण्यतिथीनिमित्त या मंडळींनी अशीच परवानगी मागितली होती. त्या वेळी फक्त सभेला परवानगी देण्यात आली पण मिरवणुकीला परवानगी नाकारण्यात आली. तेव्हा सरकारी धोरणाच्या निषेधार्थ जोशी प्रभृतींनी त्या वेळी सभा भरविण्याचे स्थगित केले. या वर्षीही तसाच प्रसंग निर्माण झाला. पोलिसांनी परवानगी नाकारली तेव्हा परवानगीशिवायच मिरवणूक काढण्याचे कार्यकर्त्यांनी ठरविले व त्याप्रमाणे मिरवणूक काढली. तेव्हा पोलिसांनी वीर यशवंतराव जोशी, दत्तात्रयराव जुक्कलकर, सदाशिवराव दुसंगे, नरहरि सत्यनारायण प्रभृतींना अटक केली व त्यांजवर खटले भरून त्यांस तुरुंगात पाठविण्यात आले. अशा रीतीने या स्वातंत्र्यसंग्रामास अचानकपणेच तोंड लागले. तेव्हा त्यांच्या पाठोपाठ इतर तुकड्यांनीही सत्याग्रह सुरू केला.

स्टेट काँग्रेसचा लढा

स्टेट काँग्रेसनेही चळवळ सुरू करण्याचे ठरविले होतेच. निजाम सरकारने स्टेट काँग्रेस अधिकृतरीत्या स्थापन होण्यापूर्वीच ती दि. ७ सप्टेंबर १९३८ ला बेकायदेशीर संघटना ठरविली. त्यामुळे तिच्या नेत्यांना चळवळ सुरू करणे प्राप्तच झाले. दि. २४ ऑक्टोबर १९३८ ला त्यांनी प्रारंभ करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे तिचे पुढारी श्री. गोविंदराव नानल, रामकृष्ण धूत, जनार्दनपंत देसाई, नारायणराव रेड्डी, प्रभृतींनी स्टेट काँग्रेस स्थापन केल्याची घोषणा करताच त्यांना अटक करण्यात आली. तेव्हा त्यांच्या मागोमाग थोड्याच दिवसांत एकामागून एक अशा सुमारे चारशे लोकांनी क्रमाक्रमाने सत्याग्रह केला. त्या सर्वांना अटक झाली. स्टेट काँग्रेसचे शेवटचे सर्वाधिकारी (डिक्टेटर) काशीनाथराव वैद्य होते. त्यांनी चळवळीची सर्व सूत्रे उत्तम रीतीने सांभाळली होती.

पण स्टेट काँग्रेसने निजामाविरुद्ध सत्याग्रहाची चळवळ सुरू करावी हे गांधींना मुळीच आवडले नाही. त्यांचा निजामाविरुद्ध चळवळ करण्यास विरोध होता. अखेर त्यांनी स्टेट काँग्रेसच्या तुरुंगाबाहेर असलेल्या पुढाऱ्यांना वर्ध्यास बोलावून घेतले व त्यांची कानउघाडणी केली. त्यांनी काशीनाथराव वैद्यांना चळवळ तावडतोब स्थगित करण्याचा आदेश दिला. एकदा सुरू केलेली चळवळ काहीच साध्य

झालेले नसताना बंद करणे वैद्यांच्याही जिवावर आले. पण काँग्रेसच्या पाठिंब्यावर ते अवलंबून होते. त्यामुळे त्यांना गांधींचा आदेश मानणे भाग पडले. गांधींनी त्यांना निमित्तही पुरविले. आता निजामाविरुद्ध हिंदुसभा आंदोलन करू लागल्यामुळे त्या चळवळीला जातीय स्वरूपाचे गालबोट लागले असल्याने अशा परिस्थितीत अ-जातीय संघटनेने बाजूस सरणेच योग्य असा गांधींनी पोक्त विचार सांगितला, व स्टेट काँग्रेसचे अंतिम सर्वाधिकारी काशीनाथराव वैद्य यांनी स्वतः कायद्याचा भंग करून आपले कर्तव्य पार पाडले व त्याचबरोबर चळवळ स्थगित केल्याचीही घोषणा केली. स्टेट काँग्रेसचे आंदोलन अशा रीतीने विफल अवस्थेत बंद झाले.

तथापि तेवढ्याने आंदोलन थांबले नाही. लढ्याला प्रारंभ होताच आर्यसमाजानेही त्यात भाग घेण्याचे ठरविले. आर्य समाजानेही त्या निमित्ताने प्रथम आपल्या मागण्या घोषित केल्या, त्या अशा :

(१) हरएक प्रकारचे धर्मोत्सव व विधि करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे.

(२) धर्मस्वातंत्र्य, संकीर्तन स्वातंत्र्य, सभा स्वातंत्र्य, अनिर्बंध नगर संकीर्तन, मंदिरे बांधण्याचे पूर्ण स्वातंत्र्य, यज्ञशाळा, हवनकुंडे, ओंकारयुक्त ध्वज उभारणे, व आर्यसमाजाच्या नव्या शाखा काढण्याचे व सांस्कृतिक व धार्मिक वाङमय प्रसिद्ध करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.

(३) संस्थानाने मुस्लिम संघटनेत भाग घेता कामा नये. जे कोणी अधिकारी त्यात भाग घेत असतील त्यांना बंदी करावी. तुरुंगात व शाळांत मुलांचे इस्लामीकरण करण्यात येता कामा नये. अनाथ हिंदु मुले हिंदूंच्या स्वाधीन करावीत.

(४) धर्मखाते रद्द करावे, निदान आर्यमंदिरे व हिंदु देवस्थाने यांवर त्याचे नियंत्रण नसावे.

(५) वृत्तपत्रांमध्ये मुस्लिम व हिंदू-आर्य असा भेदभाव करण्यात येऊ नये.

(६) आर्य प्रचारकांवर बंदी नसावी.

(७) संस्थानी पोलिसखाते, हे हिंदू व आर्य यांना पक्षपाताने वागविते; असा पक्षपात होता कामा नये.

(८) हिंदु विद्यार्थ्यांना निदान प्राथमिक शिक्षण तरी मातृभाषेतून मिळावे.

(९) हिंदु व आर्य यांना व्यायामशाळा, खाजगी शिक्षणसंस्था, व वाचनालये काढण्यास व चालविण्यास प्रतिबंध नसावा.

हे घोषणापत्रक नव्या लढ्याची नांदीच होते.

हिन्दु नागरिक स्वातंत्र्यसंघाच्या मागण्या

त्याचप्रमाणे निजाम राज्यातील हिंदुसमाजानेही 'भागानगर हिंदु नागरिक स्वातंत्र्यसंघ' स्थापन करून त्याच्या वतीने आपले घोषणापत्रक प्रसिद्ध केले. ते असे :

(१) हिंदूंवर मुसलमानांनी आक्रमण केले असता त्या संबंधात पकडण्यात आलेल्या व सत्याग्रहात पकडल्या गेलेल्या सर्व हिंदूंना मुक्त करण्यात यावे.

(२) राज्यात मुसलमान गुंडांकडून झालेल्या अत्याचारांची निःपक्षपाती चौकशी करण्यात यावी.

(३) ब्रिटिश हिंदुस्थानला लागू होणारे फेडरेशन (१९३५ च्या घटना कायद्यातील केंद्रीय व्यवस्थेचा भाग) काही एक सेफगार्डस न ठेवता हैदराबाद संस्थानला लागू करावे.

(४) धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व भाषिक स्वातंत्र्य, मुद्रण-भाषण स्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य, संस्थास्वातंत्र्य इत्यादि सर्व प्रकारचे नागरिक स्वातंत्र्य प्रजेला देण्यात आले पाहिजे.

(५) मुसलमान अल्पसंख्य असूनही त्यांची भाषा, धर्म व संस्कृति हिंदु प्रजेवर लादली जात आहे. हे प्रकार बंद झाले पाहिजेत.

(६) हिंदूंचे उत्सव, मिरवणुकी यांवरील बंधने काढून टाकण्यात यावीत. तसेच सभास्वातंत्र्य व वृत्तपत्रे यांवरील वंदीचे कायदे, व ज्या कायद्यामुळे हिंदूंना आपल्या जमिनी अहिंदूंना विकाव्या लागत आहेत असे सर्व अन्यायी कायदे रद्द करावेत.

(७) संस्थानी नोकऱ्यांत हिंदूंना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान मिळावे.

(८) सरकारी दप्तरे प्रांतिक भाषेत व मध्यवर्ती दप्तर हिंदी भाषेत असावे. राज्यकारभाराची भाषाही हिंदी असावी.

(९) सर्व प्रकारचे शिक्षण मातृभाषेतून असावे.

(१०) गोवध कायद्याने बंद करावा.

(११) मशिदीसमोरील वाद्यबंदी रद्द करावी.

(१२) मुसलमानी सणांप्रमाणेच हिंदूंच्या सणांनाही योग्य सुटचा मिळाव्यात.

(१३) हिंदु मंदिरांची जप्त केलेली वर्षासने पुन्हा सुरू करावीत.

(१४) हिंदु मंदिरांच्या जागी बांधलेल्या मशिदी काढून टाकून मंदिरे पुन्हा बांधून देण्यात यावीत व त्यांची उत्पन्ने त्यांना पुन्हा चालू करण्यात यावीत.

(१५) जुलमाने वा प्रलोभनाने नेल्या गेलेल्या हिंदू स्त्रिया हिंदूंच्या ताब्यात देण्यात याव्यात.

(१६) मुसलमानांना धर्मप्रचारासाठी सरकारी तिजोरीतून पैसा देऊ नये.

गांधींचा विरोध

अशा रीतीने हिंदुसभा, आर्यसमाज व स्टेट काँग्रेस या तीनही संस्थांनी आपापल्या मागण्या घोषित करून एकाच वेळी व एकदम लढा सुरू केला होता.

स्टेट काँग्रेस सुरू करण्याला गांधीजी व काँग्रेस यांचा आरंभी पाठिंबा होता, पण निजामाविरुद्ध आंदोलन करणे त्यांना मुळीच पसंत नव्हते. हिंदु संस्थानिकांच्या त्या त्या राज्यात स्टेटची काँग्रेस स्थापन करण्यास व संस्थानिकांविरुद्ध लढा उभा करण्यास काँग्रसचे प्रोत्साहन होते. पण निजामी शासनाविरुद्ध मात्र लोकांनी लढा करण्यास गांधींची मान्यता नव्हती! तशातच हिंदुसभेने चळवळ सुरू केली, तेव्हा आता या लढ्याचे स्वरूप जातीय झाले अशी सबब पुढे करून गांधींनी निजाम संस्थानातील स्टेट काँग्रेसच्या पुढाऱ्यांना आपली चळवळ स्थगित करण्यास भाग पाडले. अखेर दि. २३ जानेवारी १९३९ ला स्टेट काँग्रेस या लढ्यातून बाहेर पडली. त्यांनी लढा बंद केल्यानंतर निजामी शासनाने तिच्या पुढाऱ्यांची बंधमुक्तता केली.

आंदोलन वाढत चालले

पण दि. २१ ऑक्टोबर १९३८ ला सुरू झालेले आदोलन दिवसेंदिवस वाढतच गेले होते. वीर यशवंतराव जोशी प्रभृतींना अटक झाल्यावर हिंदुसभेने लढा तसाच पुढे चालू ठेवला व तेव्हापासून निजाम राज्यात ठिकठिकाणी तुकड्या तुकड्यांनी सत्याग्रह सुरू झाला.

दि. २८ ऑक्टोबर व ४ नोव्हेंबर या दिवशी हिंदुसभेच्या दोन पथकांनी सत्याग्रह केला तेव्हा त्यांस शिक्षा ठोठावण्यात आल्या.

आर्यसमाजाच्या एका शाखेचे अध्यक्ष श्री माणिकराव यांजवर मुसलमान गुंडांनी हल्ला करून त्यांस जखमी केले होते. दि. २७ ऑक्टोबर १९३८ ला त्यांचे इस्पितळात निधन झाले. पोलिसांनी त्यांचे प्रेत त्यांच्या नातेवाइकांच्या हाती देण्यासही नकार दिला! तेव्हा आर्यसमाजीयांनी निषेधार्थ मिरवणूक काढली. पोलिसांनी पं. देवीलाल व इतर तीस आर्यसमाजीयांना अटक करून नेले.

त्याच दिवशी स्टेट काँग्रेसचे तारानाथ तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली खुद्द हैदराबाद येथे एका तुकडीने सत्याग्रह केला. तेव्हा त्या सर्वांना अटक करण्यात आली. दि. २८ ऑक्टोबरला हिंदु नागरिक स्वातंत्र्य संघाच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली. तेव्हा पोलिसांनी तिच्यावर लाठीहल्ला केला व अनेकांना अटक केली. दि. १ नोव्हेंबरला सेनापति बापट यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रही तुकडी कायदेभंग करण्यासाठी येत असता तिला गुलबर्गा येथे अटक करण्यात आली व तिला परत पाठविण्यात आले. त्या तुकडीत निजाम राज्यातील एक स्वयंसेवक होता त्यास मात्र तुरुंगात पाठविण्यात आले.

दि. २ नोव्हेंबर १९३८ ला वीर यशवंतराव जोशी व जुक्कलकर यांनी हैदराबाद तुरुंगांत उपोषण सुरू केले. दि. ३ नोव्हेंबरला स्टेट काँग्रेसचे पुढारी स्वामी रामानंद तीर्थ यांना अटक झाली. दि. ३ नोव्हेंबरलाच आर्यसमाजाच्या

एका पथकाने सत्याग्रह केला. त्या सर्वांवर खटले भरून त्यांना शिक्षा ठोठावण्यात आल्या. दि. ४ नोव्हेंबरला पुन्हा हिंदु नागरिक स्वातंत्र्य संघाच्या वतीने कायदेभंग करण्यात आला. सर्वांना शिक्षा झाली.

अशा रीतीने निजाम राज्यातील प्रजाजनांचे सत्याग्रहाचे आंदोलन दिवसेंदिवस वाढत चालले होते.

इकडे महाराष्ट्रात पुणे येथे हिंदु नि:शस्त्र प्रतिकार मंडळ स्थापन करण्यात येऊन त्याच्या वतीने दि. ७ नोव्हेंबर १९३८ ला पं. नथुराम गोडसे यांच्या नेतृत्वाखाली निघालेले अकरा जणांचे पथक दौरा करीत हैदराबादला गेले. ते तेथे पोहोचताच त्यास अटक झाली. दुसरे पथक दि. २१ नोव्हेंबरला निघाले, व तेथून दर आठचार दिवशी पथके पाठविण्यास सुरवात झाली.

वन्दे मातरम्‌चे आंदोलन

निजाम राज्यातील तरुण हिंदु विद्यार्थीवर्गही या आंदोलनात पेटला. त्यांनीही याच वेळी ' वन्दे मातरम् ' ची चळवळ सुरू केली. हा युवा वर्ग कोणत्याच पक्षाशी तसा संबंधित नव्हता. पण या सर्वत्र पेटलेल्या वातावरणात त्यांनीही पेट घेतला. हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी ' वन्दे मातरम् ' हे राष्ट्रीय गीत म्हणण्यास प्रारंभ केला. मुसलमान विद्यार्थ्यांनी सरकारी धोरणाशी हातमिळवणी केली व त्यांनी ' वन्दे मातरम् ' म्हटले जाण्यास विरोध केला. त्यातून भांडण जुंपले. विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी वन्दे मातरम् गीत म्हणण्याच्या हिंदु विद्यार्थ्यांच्या आग्रहाला विरोध केला व त्यांना विद्यापीठाच्या वसतिगृहातून काढून टाकले.

या संबंधात निजाम सरकारने एक प्रेसनोट प्रसिद्ध केली. तीत असे म्हटले होते की, विद्यापीठातील विद्यार्थ्यांची तीन वसतिगृहे आहेत. त्या प्रत्येकात हिंदु व मुसलमान विद्यार्थ्यांच्या साठी वेगवेगळी प्रार्थनामंदिरे आहेत. आजपर्यंत त्यांचा योग्य उपयोग होत होता; पण सत्याग्रहाची चळवळ सुरू झाल्यापासून हिंदु विद्यार्थी तेथे ' वन्दे मातरम् ' हे गीत म्हणू लागले. मुसलमान विद्यार्थ्यांच्या भावना त्यामुळे दुखविल्या जाऊ लागल्या व ते संतप्त झाले. हिंदु विद्यार्थ्यांनी वन्दे मातरम् गीत म्हणू नये व आपापसात वाद वाढवू नये अशी अधिकाऱ्यांनी त्यांस ताकीद दिली असताही विद्यार्थी ऐकेनात. अखेर दि. २८ नोव्हेंबर १९३८ ला वन्दे मातरम् गीत म्हणण्यास बंदी करण्यात आली व जे विद्यार्थी हा हुकूम मोडतील त्यांस विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. त्याप्रमाणे त्यांची विद्यापीठाच्या वसतिगृहातून व नंतर विद्यापीठातूनही दि. १२ डिसेंबर १९३८ ला हकालपट्टी करण्यात आली.

अशा रीतीने उस्मानिया विद्यापीठातून सुमारे साडेआठशे विद्यार्थी बाहेर पडले. या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे पुढे काय हा प्रश्न होता. त्या वेळी नानासाहेब केदार हे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु होते. त्यांनी या सर्व विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाच्या त्या त्या परीक्षेस बसण्याची परवानगी दिली व अभ्यासाचीही सोय केली. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले नाही व निजाम सरकार एकाकी पडून फजीत पावले.

वन्देमातरम्‌साठी ३६, ३६ फटक्यांची शिक्षा

या वन्देमातरम् चळवळीने विद्यापीठाचे वातावरण दुमदुमून सोडले, एवढेच नव्हे तर तिने तुरुंगातही प्रवेश केला. सत्याग्रह करून तुरुंगात बंदिवान झालेले राजकीय कैदीही तेथे ‘ वन्देमातरम् ’ म्हणू लागले व तेथील वातावरणही त्यांनी भारून टाकले. तुरुंगाधिकाऱ्यांनी त्यास विरोध केला तेव्हा वन्देमातरम्‌चे पुरस्कर्ते अधिकच आग्रही बनले. श्री. रामचंद्र रेड्डी, राजाराम रेड्डी, आणि मोतीलालजी या सत्याग्रहींना वन्देमातरम् म्हटल्याबद्दल तुरुंगाधिकाऱ्यांनी ३६, ३६ फटक्यांची शिक्षा ठोठावली. पण तिला न जुमानता त्यांनी प्रत्येक फटक्याबरोबर वन्देमातरम् म्हणणे चालूच ठेवले! राष्ट्रभक्तीचा त्यांनी नवा आदर्श उभा केला! अखेर निजाम सरकारला शरणचिठ्ठी द्यावी लागली.

श्री. घारपुरे यांनी वन्देमातरम् गीताचे इंग्रजी भाषांतर केले व ते निजामचे दिवाण सर अकबर हैदरी यांना पाठविले व त्यात गैर काय आहे म्हणून विचारले व आपण हे गीत म्हणणार असेही बजावले. तेव्हा व्यक्तिशः कोणी वन्देमातरम् गीत म्हणण्यास सरकारची हरकत नाही असे त्यांस कळविण्यात आले व पुढे विद्यार्थ्यांना वन्देमातरम् म्हणण्याची मोकळीक देण्यात आली. तुरुंगातही वन्देमातरम् म्हणण्यास विरोध करण्याचे अधिकाऱ्यांनी अखेर सोडून दिले.

इकडे महाराष्ट्रात या आंदोलनाची तयारी सर्वत्र चालू होती. हिंदुमहासभेचे अधिवेशन डिसेंबरात नागपूर येथे व्हावयाचे होते. तोपर्यंत या चळवळीला हिंदुसभेची अधिकृत मान्यता मिळण्यासाठी वातावरण तयार केले जात होते.

पुण्यास ‘ हिंदु प्रतिकार मंडळ ’ स्थापन झाले. आंदोलनात भाग घेण्यासाठी श्री. ग. वि. केतकर यांच्या केसरीतील कार्यालयात एक कचेरी उघडण्यात आली. निधि गोळा करण्यात येऊ लागला. प्रसिद्धीची व्यवस्था सुरू झाली. नाशिक व खानदेश या भागातील हिंदुसभावादी मंडळींनी दि. १५ ऑक्टोबर १९३८ ला नांदगाव येथे एक परिषद भरविली. शेठ गुलाबचंद हिराचंद हे तिचे अध्यक्ष होते. या परिषदेस स्वा. सावरकर, डॉ. मुंजे, ल. ब, भोपटकर प्रभृति पुढारी उपस्थित होते. वीर यशवंतराव जोशी व त्यांचे सहकारी हैद्राबादहून मुद्दाम या परिषदेसाठी आले

होते. तेथेच चळवळीचा निर्णय ठरला. पुढे हिंदुमहासभेच्या नागपूर अधिवेशनात तिची अधिकृत घोषणा झाली. त्या आधीच लढयाला तोंड लागलेही होते.

स्वा. सावरकरांचे पत्रक

अशीच आणखी एक परिषद पुणे व ठाणे जिल्हयाच्या वतीने लोणावळा येथे दि. ५ नोव्हेंबर १९३८ ला झाली. या आंदोलनाचे 'हिंदु निःशस्त्र प्रतिकार मंडळ' असे नामकरणही करण्यात आले व येथून पुढे महाराष्ट्रात सर्वत्र सभा घेऊन आंदोलनाच्या कार्यपद्धतीची आखणी करण्यात आली. गावोगावी प्रचारक पाठविण्यात आले व लोकांना या लढयाची कल्पना स्पष्ट करून सांगण्यात आली. स्वयंसेवक व निधि दोन्हींची जुळणी करण्याचे काम जोराने सुरू झाले. स्वा. सावरकरांची नागपूर हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदी रीतसर निवड झाल्यानंतर त्यांनी दि. २५ नोव्हेंबर १९३८ ला या संबंधात एक अधिकृत पत्रक प्रसिद्ध केले. त्यात निजाम सरकारने तेथील हिंदूंविरुद्ध कसे अन्याय चालविले आहेत व अर्ज विनंत्या व मागण्या केल्या असतानाही ते सर्व मार्ग विफल ठरल्यामुळे लढयाशिवाय अन्य मार्ग लोकांपुढे आता कसा उरला नाही हे स्पष्ट केले. या पत्रकात सावरकरांनी सर्व परिस्थितीचे तपशीलवार विवेचन केले असल्याने ते या आंदोलनाला पायाभूत ठरले. त्याचा आशय असा होता :

हिंदुसभेची भूमिका

निजाम राज्यातील हिंदूंना अत्यंत माथेफिरूपणाने आणि संतापदायक रीतीने वर्षानुवर्षे वागविण्यात येत आहे. हिंदूंचे राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक अस्तित्वच नष्ट करण्याचे त्यामागील धोरण स्पष्ट आहे. ही परिस्थिति आता दडून राहिलेली नाही. हैदराबाद राज्यच संपूर्णपणे इस्लाममय करण्याचे उद्दिष्ट स्पष्ट झाले आहे. ही परिस्थिति बदलण्यासाठी हिंदूंनी घटनात्मक सर्व मार्गांचा आजपर्यंत उपयोग करून पाहिला; परंतु ते सर्व निरुपयोगी ठरल्याने आता त्यांजपुढे कायदेभंगाच्या आंदोलनाशिवाय अन्य मार्ग उरलेला नाही.

ही परिस्थिति उजेडात आणण्याचे कार्य निजाम राज्यातील हिंदूंमधील प्रामुख्याने आर्यसमाजाने केले आहे. मुसलमान पोलिसांच्या व गुंडांच्या अत्याचारापायी हजारो हिंदूंना तुरुंगवास भोगावा लागला व लागत आहे. या एका वर्षात मुसलमान गुंडांनी डझनभर आर्यसमाजी कार्यकर्त्यांचे मुडदे पाडले असूनही गुन्हेगारांना कसलेही शासन झालेले नाही.

हिंदुमहासभेने हा प्रश्न हाती घेऊन तेथील परिस्थिति पाहण्यासाठी पाच वर्षापूर्वी आपले प्रतिनिधि पाठविले होते. हिंदूंच्या छळवादासंबंधीचा त्यांचा वृत्तान्त यापूर्वीच प्रसिद्ध झाला आहे. तो निजामाकडे व केंद्रीय सरकारकडे आणि ब्रिटिश

सरकारकडेही पाठविण्यात आला असताही सर्वांनी त्याकडे दुर्लक्ष केले. प्रतिवर्षी हिंदुसभेच्या वार्षिक अधिवेशनात या संबंधात ठराव करण्यात आले असून या अन्यायाकडे निजाम सरकारचे लक्ष वेधण्यात आले, पण उपयोग झाला नाही. गतवर्षी कर्णावती (अहमदाबाद) येथील अधिवेशनात डॉ. मुंजे व भाई परमानंद यांचे एक शिष्टमंडळ निजाम सरकारकडे पाठविण्याचे ठरविण्यात आले असता निजाम सरकारने त्यांची भेट घेण्यासही नकार दिला ! तरीही भाई परमानंद यांनी निजामाचे दिवाण सर अकबर हैदरी यांना व्यक्तिगत भेटण्याची परवानगी मागितली. पण त्या भेटीत हिंदूंवर अत्याचार होत आहेत हे मान्य करण्यासच हैदरींनी नकार दिला ! निजाम राज्यातील आर्यसमाज, हिंदुसंघटनवादी, जैन सर्वांनी आपापल्या परीने शिष्टमंडळे पाठविण्याचा प्रयत्न केला व हिंदूंची करण्यात येंत असलेली दुर्दशा त्यांजपुढे मांडण्याचा प्रयत्न केला. पण निजाम शासन कशालाच दाद देत नाही, आणि ब्रिटिश साम्राज्य सत्ताधीशही कशाची दखल घेत नाहीत !

घटनात्मक मार्ग संपले

अशा रीतीने सर्व घटनात्मक व न्याय्य मार्ग बंद झाले असून हिंदूंवर मुसलमानांचे अत्याचार एकसारखे वाढतच आहेत. हिंदूंची दुकाने व बाजार लुटणे, हिंदु पुढाऱ्यांचे खून करणे, हिंदु स्त्रियांना पळवून नेणे, त्यांचा अपमान करणे, हजारो हिंदूंचे बळजबरीने मुसलमानीकरण करणे हे प्रकार वाढत आहेत. या मुसलमानी राज्यात गांजलेल्या हिंदूंच्या किंकाळ्यांनी वातावरण भरून गेले आहे. अखेरीस हिंदु संघटनवाद्यांना ही परिस्थिति असह्य झाली असून हिंदुमहासभा, आर्यसमाजी, सनातनी, किंबहुना हिंदु संघटनवादी सर्व पक्षांनी व गटांनी सविनय कायदेभंगाचा आश्रय करण्याचे ठरविले आहे. निजामी राज्यातील असहाय व निराधार हिंदुप्रजेला मदत करण्याचा हाच एकमेव उपाय उपलब्ध राहिला आहे. हैदराबाद राज्यातील हिंदुसभा, आर्यसमाज, सनातनी व इतर सर्वांनी या आधीच हिंदुविरोधी सरकारी हुकूम तोडून त्याचे परिणाम भोगण्याची तयारी दाखविली आहे.

महाराष्ट्र हिंदुसभेनेही काही महिन्यांपूर्वी निजाम राज्यात आपले प्रतिनिधि पाठवून माहिती गोळा केली. त्यावरून तर दिवसेंदिवस परिस्थिति फारच बिघडत चालल्याचे दिसून आले आहे. म्हणून पुण्यास श्री. ग. वि. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली हिंदु निःशस्त्र प्रतिकार मंडळ स्थापण्यात आले असून त्याने स्वयंसेवक नोंदण्यास व निधि गोळा करण्यास सुरवातही केली आहे व त्याप्रमाणे निःशस्त्र प्रतिकारकांच्या तुकड्या निजाम राज्यात महाराष्ट्रातून जाण्यासही सुरवात झाली आहे.

काँग्रेसच्या धोरणाचे वाभाडे

या पत्रकात काँग्रेसच्या धोरणावर सावरकरांनी कडाडून टीका केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, काँग्रेसनेत्यांना पॅलेस्टाईनमधील अरब, ॲबिसिनिया-

मधील लोक, झेक, एवढेच काय, जगात जेथे जेथे थोडाही अन्याय आहेसा वाटतो त्यांच्याबद्दल हे लोक सहानुभूतीचा पूर वाहवितात पण आपल्याशेजारी असलेल्या हैदराबाद किंवा भोपाळसारख्या मुसलमानी संस्थानातील आपल्या हिंदुबांधवांवर सतत वाढत्या प्रमाणावर अन्याय व अत्याचार होत असतानाही सहानुभूतीचा एक शब्दही त्यांच्या तोंडून बाहेर पडत नाही! त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर किंवा राजकोट येथील हिंदु संस्थानिकांच्या राज्यातील प्रजेच्या हक्कासाठी त्यांचा जीव कासावीस होतो, पण मुसलमानी संस्थानांत हिंदु प्रजेचा कितीही छळ झाला तरी त्याबद्दल चकार शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडत नाही! त्यांचे राष्ट्रीयत्व हे अशा प्रकारचे कोडगे आहे!

सावरकर पुढे म्हणतात पण हिंदुसभा व आर्यसमाज हे अन्याय व अत्याचार सहन करणार नाहीत. सेनापति बापटांनी आधीच रणशिंग फुंकले आहे. निजाम राज्यातील हिंदु प्रतिकारकांनी आंदोलन सुरू केलेच आहे. तेथील आर्यसमाजानेही त्यात उडी घेतलीच आहे. आता निजाम राज्याबाहेरील हिंदुसमाज व आर्यसमाज हा लढा शेवटपर्यंत लढविल्याशिवाय राहणार नाहीत.

आर्यसमाजाची परिषद

दि. २५ डिसेंबर १९३८ ला सोलापूर येथे आर्यसमाजाची मोठी परिषद भरली. त्या परिषदेसाठी निजाम राज्यातील व ब्रिटिश मुलुखातीलही सर्व ठळक आर्यसमाजी नेते उपस्थित होते. निजाम राज्यात सत्याग्रहाची चळवळ सुरू करावयाची कीं नाही याचा तेथे निर्णय व्हावयाचा होता. आर्यसमाजाच्या नेत्यांनी या परिषदेस स्वा. सावरकरांनाही पाचारण केले होते. आर्यसमाजात दोन गट होते. एक काँग्रेसच्या म्हणजे गांधींच्या कच्छपी होता. गांधी निजाम शासनाविरुद्ध चळवळ करण्याच्या विरुद्ध होते. हिंदुसभेने हे आंदोलन करण्याचे निश्चित केले होते. आर्यसमाजाचे त्यास सहकार्य हवे होते. या सभेत त्या संबंधीचा निर्णय ठरावयाचा होता. निजामी राज्यातील आर्यसमाजी लोकांनीही चळवळ करण्याचे निश्चित ठरविलेच होते, एवढेच नव्हे तर त्यांनी सुरवातही केली होती. अखेर या सभेत आंदोलन खडे करण्याचे ठरले व त्याप्रमाणे निश्चय प्रकट करण्यात आला. काँग्रेसवादी आर्यसमाजीयांनी त्यात भाग घेतला नाही, पण त्यांनी विरोधही केला नाही.

हिंदुमहासभेचा ठराव

याच्या मागोमाग नागपूर येथे हिंदुमहासभेचे वार्षिक अधिवेशन दि. २८ डिसेंबर १९३८ ला स्वा. सावरकरांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यात निजाम राज्यात निःशस्त्र प्रतिकाराचे आंदोलन छेडण्याची अधिकृत घोषणा झाली. हिंदुसभेच्या वतीने हे आंदोलन संघटित करण्यासाठी एक समिति नियुक्त करण्यात

आली. तीत सर गोकुळचंद नारंग, लाहोर, श्री. चांदकिरण सारडा, राजस्थान, भाई परमानंद व श्री. इंद्रप्रकाश, दिल्ली, पं. आनंदप्रियजी, बडोदा, पटवारी वकील, अहमदाबाद, बाबू पद्मराज जैन, कलकत्ता, पुण्याचे श्री. ल. ब. भोपटकर, ग. वि. केतकर, ग. म. नलावडे, मुंबईचे माणिकराव तळपदे व लक्ष्मीदास तेरसी, नागपूरचे डॉ. मुंजे, अकोल्याचे मामा जोगळेकर, व मसुरकर महाराज यांचा समावेश होता. पुणे येथे ग. वि. केतकर यांच्याकडे पुणे केंद्र कार्यालयाचे काम सोपविण्यात आले. तथापि अनेक ठिकाणांहून उत्स्फूर्तपणे स्वयंसेवकांनी सत्याग्रहाच्या तुकड्या तयार करून निजाम राज्यात प्रवेश केला व कायदेभंग केला. त्यांना शिक्षा झाल्याचे वृत्त अनेकदा मागाहून पुणे कार्यालयात येऊन पोहोचले तर काही आलेच नाही. हिंदुसभा व आर्यसमाज यांनी हा लढा शेवटपर्यंत लढविला. त्यात महाराष्ट्रातून सुमारे चार हजार प्रतिकारक पाठविले गेले आणि आर्यसमाजाने तर सुमारे सतरा हजार पाठविले. त्यांचे काही जथे एक एक हजाराचेही होते. त्यामुळे निजाम राज्यातील तुरुंगात राहण्यासही जागा राहिली नाही.

हिंदुसभावाद्यांच्या निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीस निजाम राज्यातील यशवंतराव जोशी प्रभृतींनी आधीच दि. २१ ऑक्टोबरला प्रारंभ केला होता. त्यांना २६ ऑक्टोबर १९३८ ला २१ महिन्यांची शिक्षा झाली. त्यांच्या सहकाऱ्यांनाही अशाच कमीअधिक शिक्षा झाल्या. आधी जाहीर केल्याप्रमाणे सेनापति बापट दि. १ नोव्हेंबरला एक जथा घेऊन गेले होते; पण त्यांना गुलबर्गा येथे अटक करून परत पाठविण्यात आले. दि. ४ डिसेंबरला निजाम राज्यातीलच आणखी एका जथ्याने कायदेभंग केला. पं. नथुराम गोडसे व त्यांच्या बरोबरचे दहा जण दि. ७ डिसेंबरला हैदराबादेस दौरा करीत जाण्यास निघाले. त्यांना दि. १४ डिसेंबरला अटक झाली व वर्षावर्षाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. निजाम राज्यातील शेळगावी विनायकराव घारपुरे आणि त्यांचे सहकारी यांनी निजाम राज्यात बंदी करण्यात आलेले त्रिकाळ पत्र नेऊन ते चौकाचौकात वाचून दाखविले, पण त्या पत्राला बंदी असल्याचे न समजल्यामुळे पोलिस त्यांची दखल घेऊ शकले नाहीत. दि. १२ डिसेंबरला मुखेडकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचा हुकूम तोडून एक मिरवणूक काढण्यात आली. तेव्हा सर्वांना अटक झाली. १६ डिसेंबरला औरंगाबादच्या कॉलेजच्या वसतिगृहामधील विद्यार्थ्यांनी वन्देमातरम् म्हणण्याला प्रारंभ केला. अधिकाऱ्यांनी त्यांस प्रथम विरोध केला. तेव्हा तेथे लढा सुरू झाला. अखेर विद्यार्थ्यांना वन्देमातरम् म्हणण्यास विरोध करण्याचे सरकारने सोडून दिले. दि. १७ डिसेंबरला नागपूरहून सत्याग्रहींचे एक पथक निघाले.

दि. १३ डिसेंबरला बाबूराव मोरे यांनी घोषणा दिल्याबद्दल त्यांना अटक करण्यात आली. दि. १४ डिसेंबरला माधवराव वडगावकर, पुरुषोत्तमराव चपळगावकर, रामराव पाटील, श्रीपतराव सौंदगीकर या बीड येथील पुढाऱ्यांना पोलिसांनी अटक केली. दि. २१ ला साताऱ्याहून श्री. भडकमकर यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या जथ्याला अटक झाली.

दि. २२ डिसेंबरला हैद्राबाद, महबूब नगर, वारंगळ, मोंगीर, निजामाबाद, पैठण, वैजापूर, परभणी, इत्यादी ठिकाणी 'निजाम निषेध दिन' मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला. त्यात शेकडो प्रतिकारकांना अटक झाली.

दि. २६ डिसेंबरला लक्ष्मणराव कुळकर्णी, संतोषकुमार भरद्वाज, आणि त्यांचे सहकारी यांनी हैदराबाद येथे सुलतान बाजारात हिंदु निःशस्त्र प्रतिकार संघाच्या वतीने मिरवणूक काढली. दि. २२ डिसेंबरला गांधींच्या सूचनेवरून स्टेट काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी त्यांची भेट घेतली, त्या वेळी त्यांनी जातीय चळवळीशी स्टेट काँग्रेसच्या चळवळीची गल्लत होऊ नये आणि म्हणून त्यांनी आपली चळवळ तावडतोब बंद करावी असा आदेश दिला. तेव्हा दि. २३ डिसेंबरला स्टेट काँग्रेसचे शेवटचे डिक्टेटर श्री. काशीनाथराव वैद्य यांनी स्वतः सत्याग्रह करून चळवळ स्थगित करण्याची घोषणा केली. त्यांना अटक झालीच. दि. २४ डिसेंबरला पुण्याहून आठ निःशस्त्र प्रतिकारकांची तुकडी निजाम राज्यात गेली. तेव्हा त्यांना हैदराबाद येथे अटक झाली.

नागपूर अधिवेशनात झालेल्या घोषणेनुसार दि. ५ जानेवारी १९३९ ला हिंदुमहासभेच्या वतीने नागपूर हिंदुसभेचे सुप्रसिद्ध नेते डॉ. परांजपे व त्यांच्याबरोबर २२ हिंदुसभा निःशस्त्र प्रतिकारकांची तुकडी यांनी निजाम राज्यात कायदेभंग केला. त्यांना कैदेची शिक्षा झाली व त्यांना औरंगाबाद तुरुंगात दाखल करण्यात आले. सोलापूरचे अंदुरकर यांनी कायदेभंग केल्याबद्दल त्यांना वर्षाची शिक्षा झाली. दि. २५ जानेवारीस अ. स. भिडे गुरुजी हे सात जणांची तुकडी घेऊन औरंगाबादला गेले. त्यांनी तेथे सभा भरविली. त्याबरोबर त्यांना अटक होऊन तुरुंगात दाखल करण्यात आले.

या लढ्यात भाग घेण्यासाठी महाराष्ट्रातून व इतर ठिकाणांहून ज्या मोठ्या तुकड्या गेल्या त्यांत मुंबईचे देवधर, चांदकिरण सारडा (राजस्थान), गजाननराव दामले, मुंबई, दामुअण्णा गोडबोले, पुणे, भंडाऱ्याचे जोशी, पाटणसांगवीचे श्री. बंध, राजमहेंद्रीचे सुब्बाराव, नागपूर हिंदुसभेचे जोशी, धुळ्याचे श्री. आवेकर वकील व शामराव पवार, मुंबईचे फाटक, सांगलीचे जोग, पुण्याचे विश्वासराव डावरे व त्यांच्या बरोबरची तुकडी, उमरखेड येथून भय्यासाहेब दाणी, नागपूरचे बाळशास्त्री हरदास, पुण्याचे कस्तुरे व त्यांची २५ जणांची तुकडी, सुधीर ओक व त्यांची अकरा

जणांची तुकडी, वि. घ. देशपांडे, नागपूर, पुण्याचे दाते व २६ जणांची तुकडी या व अशा कित्येक लहान मोठ्या तुकड्यांनी जानेवारी ते एप्रिल १९३९ या काळात कायदेभंगाच्या आंदोलनाला धार आणली.

त्यानंतर तर या चळवळीस अधिकच उधाण आले. दि. २१ एप्रिलला अण्णासाहेब भोपटकर यांच्या नेतृत्वाखाली दोनशे जणांच्या तुकडीने निजाम राज्यात प्रवेश करताच तिला स्टेशनवरच अटक करण्यात आली. त्याच वेळी श्री. धोंडूमामा साठे यांच्या नेतृत्वाखाली २२ जणांच्या तुकडीने पैठण येथे कायदेभंग केला व त्यांना तेथेच शिक्षा देऊन औरंगाबाद तुरुंगात दाखल करण्यात आले. त्यानंतर मुंबईचे अनंत हरि गद्रे यांच्या नेतृत्वाखाली दीडशे जणांची तुकडी औरंगाबाद तुरुंगात येऊन दाखल झाली. त्या मागोमाग पुण्याचे केशवराव केळकर वकील, महाडचे बापूराव जोशी यांच्याही तुकड्या आल्या. या सर्वांची नोंद ठेवणेही कठीण झाले. वातावरणच इतके पेटले होते की पुण्याच्या किंवा मुंबईच्या केंद्र कार्यालयाकडे नोंद न करताही अनेक लोक उत्स्फूर्ततेने आंदोलनात भाग घेत. ते तुरुंगात आल्यावर काही माहिती होत असे. निजाम राज्यातील अनेक तरुण कार्यकर्त्यांनी निजाम राज्याच्या बाहेर येऊन व नावे बदलून सत्याग्रह केले. हेतु हा की निजाम राज्यातील आपल्या नातेवाईकांना त्यामुळे उपसर्ग लागू नये.

आर्यसमाजाच्या तर पुढे पुढे हजार हजार सत्याग्रहींच्या तुकड्या आल्या. महाशय कृष्ण, खुशालचंद यांच्या तुकड्यांनी सत्याग्रहाचे वातावरण सर्वभर दुमदुमून टाकले. त्यांना तुरुंगात ठेवण्यास जागा अपुरी झाली. शिक्षा झालेल्यांना निजाम सरकार एका ठिकाणाहून दुसरीकडे हलवी; पण हिंदुसभा कार्यकर्त्यांनी आपले खटले लढविण्याचे ठरविल्यामुळे त्यांचे खटले बरेच दिवस चालूच राहिले. त्यामुळे त्यांना हलविता न आल्याने औरंगाबाद येथे खूपच गर्दी झाली.

भागानगर निःशस्त्र प्रतिकारातील हिंदुसभावादी प्रतिकारकांचे खटले लढविण्याचे तंत्र इतरांहून वेगळे होते. गांधीछाप सत्याग्रहात कायदेभंग करणाराने त्याजवर खटला झाला म्हणजे न्यायालयात आपण होऊन गुन्हा कबूल करावा व जास्तीत जास्त शिक्षेची मागणी करावी असा परिपाठ होता! तोच प्रकार आर्यसमाज व स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रही पथकांनी अनुसरला. त्यामुळे त्यांच्यावरील खटल्याचे निकाल झटपट लागत गेले. पण हिंदुसभेच्या प्रतिकारकांनी आपल्यावरील खटले लढविण्याचे ठरविले. आपण पोलिसांचा किंवा सरकारचा हुकूम तोडला कीं नाही व आपण गुन्हा केला कीं नाही हे सरकारने साक्षी पुराव्याने न्यायालयात सिद्ध करावयाचे आहे, ते दायित्व शासनाचे आहे असे ते म्हणत. तसेच पोलिसांचा हुकूमच जर मुळात नियमबाह्य असला तर तो बेकायदेशीर हुकूम पाळण्याचे आपल्यावर कसलेच दायित्व नसल्याने आपले कृत्य गुन्ह्याच्या सदरात पडणार नाही, आपण अन्यायाचे प्रतिकारक आहो व आपला प्रतिकार निःशस्त्र असल्याने

आपण निःशस्त्र प्रतिकारक आहोत असे ते प्रतिपादन करीत. तेव्हा त्यांनी गुन्हा केला आहे हे सिद्ध करण्याची सरकारी यंत्रणेवर जबाबदारी पडे.

कायदेभंग करणाराने गुन्हा केला हे शाबीत करण्यासाठी न्यायालयात साक्षी-पुरावा उभा करून गुन्हा सिद्ध करणे हे पोलिस खात्याला फारच जिकिरीचे झाले. खोटे पुरावे सिद्ध करताना उलट तपासणीत त्यांची फारच तिरपीट उडे. त्यामुळे या लढाऊ खटल्यांचा झटपट निकाल न लागता ते कित्येक आठवडे कोर्टात चालत. त्यामुळेही पोलिस व न्यायालये हैराण झाली.

औरंगाबाद तुरुंगात हाल

उत्तर भारतातून व महाराष्ट्रातून निजाम राज्यात उतरण्याला मनमाडमार्गे औरंगाबाद हा मार्ग सर्वात सोईचा होता. नागपूर विदर्भातील कित्येक पथकांनी चांदा, अमरावती अकोला इत्यादि भागांतून जालना नांदेड इत्यादि भागांत कायदे-भंगाचे आंदोलन उभे केले, तर मुंबई पुण्याकडील लोकांना औरंगाबाद पैठण इत्यादि ठिकाणे सोयीची होती. उत्तरेतून येणारी आर्यसमाजाची पथके तर औरंगाबादेसच येत गेली, त्यामुळे तेथे गर्दी उसळून गेली. महाराष्ट्रातून येणारे प्रतिकारक आपण गुन्हा केल्याचे कबूल करीनात. त्यामुळे त्यांच्यावरील खटल्यांचे निकाल लागेपर्यंत त्यांना औरंगाबादेहून दुसऱ्या तुरुंगात हलविताही येईना. त्यांजवरील खटले दोन दोन तीन तीन महिने चालत राहिले आणि त्यात एकसारखी नव्या प्रतिकारकांची भर पडत गेली. त्यामुळे औरंगाबाद तुरुंगात एकच गोंधळ उडाला.

औरंगाबादचा तुरुंग तसा मोठा नव्हता, सुमारे अडीचशे-तीनशे कैद्यांची तेथे सोय होती. तर तेथे दीड दोन हजार प्रतिकारक दाखल झाले होते. शेवटी तुरुंगा-शेजारी एक मोठा तबेला होता. तेथे काही राजकीय कैद्यांना ठेवण्यात आले. आरंभी तर या जागेला दरवाजेही नव्हते व तेथे पायखान्यांचीही सोय नव्हती. राजकीय कैदी खुशाल भांडे घेऊन बाहेर बर्हिदिशेस जात व येत ते पळून जाणारे नव्हते हेच या तुरुंगाला संरक्षण होते.

दिवस कडक उन्हाळ्याचे जसजसे येत गेले व प्रतिकारकांची संख्या वाढत गेली तसतसा पाण्याचा तुटवडा अधिकाधिक भासू लागला. तसेच इतक्या दीड दोन हजार लोकांना रोज दोन वेळा दोन दोन भाकऱ्या व कालवण तयार करून देणेही तुरुंगाधिकाऱ्यांना जिकिरीचे झाले. सत्याग्रही लोक रोज स्नान करीत. पण पाण्याच्या कमतरतेमुळे पाण्याचा तुटवडा पडे. रोज स्नान कसले करता असे तुरुंगाधिकारी म्हणत ! त्यांचे म्हणणे स्नान म्हणजे 'जुम्मा के जुम्मा' (शुक्रवारानंतर पुन्हा पुढच्या शुक्रवारी) असे ! अशा स्थितीत वाद न होईल तर काय होईल ! एवढ्या लोकांची व्यवस्था करण्याच्या कामी तुरुंगाचे अधिकारी अगदी टेकीस आले. पुढे त्यांतूनच तुरुंगात अंतर्गत लढे निर्माण झाले.

भाकरीचे भांडण

भाकऱ्या कच्च्या मिळू लागल्या. पिठात कचकच फार वाढली. दळण्याच्या गिरणीतून पीठ वेळेवर मिळणेही कठीण झाल्याने अन्न मिळण्यास उशीर होऊ लागला. सारा तुरुंग सत्याग्रहींनी भरून गेला असल्याने त्यांच्या बोलण्याचालण्याचा इतर कैद्यांवर प्रभाव पडू नये या हेतूने शासकांनी अगदी कामापुरतेच कैदी तेथे ठेवले होते. सत्याग्रही वाढल्यामुळे सेवेसाठी त्यांचीही संख्या कमी पडल्याने ती वाढविणे व दुसऱ्या तुरुंगातून त्यांना आणणे भाग पडू लागले तर जागेच्या अभावी त्यांना सत्याग्रहीपासून अलग कसे ठेवावयाचे हा अधिकाऱ्यांपुढे प्रश्न पडला. ज्यांना शिक्षा झाल्या होत्या त्यांना तुरुंगाचे कपडे देण्यासाठी नवे कपडे शिवण्याकरिता वेगळी व्यवस्था करावी लागली. कोर्टातील खटले चालूच होते. त्यामुळे जवळपास रोज या ना त्या कोर्टात कैद्यांची पलटण पाठवावी लागे. या सर्व वाढत्या कामामुळे तुरुंगावरील अधिकारी हैराण झाले व एवढ्या लोकांना रोज अन्नपाणी पुरवता पुरवता टेकीस आले. भाकरी कच्च्या म्हणून सत्याग्रही कैद्यांची तक्रार वाढत गेली. सत्याग्रहींत तरुणांचाच भरणा फार होता. काही उच्छृंखलही होते. अधिकाऱ्यांची धावपळ पाहून त्यांची गंमत करण्याची प्रवृत्तीही त्यांच्यात वाढत होती. तुरुंगाचे अधिकारी आरंभी आरंभी फार सौजन्याने वागले. पण परिस्थिति त्यांच्या आटोक्याबाहेर कठीण होत गेली. अशा स्थितीत एक दिवस अतिप्रसंग घडला.

दि. ७ जून १९३९ या दिवशी भाकऱ्या फारच कच्च्या होत्या. त्या दिवशी काही ना काही कारणावरून तुरुंगाचे अधिकारी दिवसभर अगदी काहून गेले होते. त्यांच्या मदतीसाठी निजाम सरकारने खास अलिगडवाले सुपरिंटेंडेंट म्हणून पाठविले होते. कैद्यांनी भाकऱ्या हातात घेऊन तुरुंगाच्या अधिकाऱ्यांपुढे त्या दाखविल्या व या भाकऱ्या कशा खावयाच्या असे बोलणे सुरू झाले. जुने मोहतमीम व दाते प्रभृति काही कैदी यांच्यात बोलणे चालू होते. एवढ्यात तेथे जमलेल्या कैद्यांतून कोणीतरी अधिकाऱ्यांची हुर्यो केली. त्याबरोबर नवे ताज्या दमाचे आलेले सुपरिंटेंडेंट खूप खवळले व त्यांनी कैद्यांना जरब बसविण्याचे ठरविले. त्यांनी बाहेरून गुंडांची सेना बोलाविली व ती येताच धोक्याची घंटा खणखण वाजू लागली.

तुरुंगातील मारहाण

बहुतेकांना तुरुंग नवाच असल्याने या घंटेचा अर्थही समजला नाही. पण ज्यांना अर्थ माहीत होता त्यांनी सर्वांना भराभर आपापल्या किंवा नजीकच्या खोल्यात जाण्यास सांगितले व बरेच सत्याग्रही गेलेही. तरी पण पुष्कळ बाहेर होते. अधिकाऱ्यांनी जे गुंड लोक आणविले होते ते लाठी परजीतच आत आले व त्यांनी सापडेल त्यास मारहाण करण्यास सुरवात केली. त्यात बऱ्याच जणांना जखमा झाल्या. श्री. धोंडूमामा साठे व त्यांची तुकडी आपल्या खोलीत जाऊन

स्वस्थ बसलेली होती. पण त्या खोलीचे दार मुळातच मोडके होते व त्याला कुलुपाचीही सोय नव्हती. त्यामुळे गुंडांना दार उघडे दिसताच त्यांनी खोलीत शिरून मारहाण करण्यास सुरवात केली. धोंडूमामा साठे यांना तर त्यांनी इतके मारले की ते रक्तबंबाळ न्हाऊन निघाले व त्यांच्या हाताच्या बोटांची हाडे वाकून मोडली ती कायमचीच ! त्यांना त्या प्रसंगाची जन्माची आठवण राहिली आहे. तुरुंगाचे अधिकारी खोल्याखोल्यांना कुलुपे लावीत या खोलीपाशी आले तेव्हा त्यांनी साठे प्रभृतींची गुंडांच्या तडाख्यातून सुटका केली. हा प्रकार दोन अडीच तास चालू होता. या प्रकारामुळे सायंकाळचे जेवण मिळू शकले नाही. दुसऱ्या दिवशी सुमारे बारा वाजता अधिकाऱ्यांनी एका एका खोलीचे (वॉर्डचे) कुलूप काढून कैद्यांना अन्नपाणी दिले व लगेच कोंडून ठेवले. धोंडुमामा साठे व त्यांचे सहकारी यांना दवाखान्यात नेण्यात आले तेव्हा त्यांचे सारे शरीर व कपडे रक्तबंबाळ झालेले दिसत होते. त्यांची ती अवस्था पाहून अनेकांना चर्र झाले. पण सर्वजण आपापल्या खोल्यांच्या पिंजऱ्यात कोंडलेले असल्याने कोणी काही करू शकत नव्हता किंवा त्यांना भेटून शाब्दिक सहानुभूतीही दाखवू शकत नव्हता. दाते, बाळशास्त्री हरदास, डावरे प्रभृति ज्या वॉर्डात होते त्यात सुमारे पन्नास कैदी ठेवण्यात आलेले असता धोक्याच्या घंटेच्या सूचनेबरोबर जे कैदी तेथे जवळपास होते ते सर्व त्यात शिरल्याने तेथे कैद्यांची संख्या जवळजवळ तिप्पट झाली. एवढ्या लोकांना शौचासाठी कोठडीच्या आत एकच पायखाना होता. दुसऱ्या दिवशी काही झाडूवाल्यांनी लपत छपत खिडकीतून पाणी थोडे थोडे पुरवले म्हणून काहींची परसाकडेची थोडी तरी सोय झाली तर कित्येकांचा कोंडमारा झाला. पण कैद्यांना तीन दिवस केवळ नर्कयातना भोगाव्या लागल्या. पुढे अधिकारी एका एका वॉर्डातील लोकांना तोंड धुणे व अन्न व पाणी घेणे यासाठी फक्त अर्धा तास बाहेर काढीत व पुन्हा दिवसभर कोंडून घालीत. असे तीन दिवस चालले.

याच काळात अण्णासाहेब भोपटकरांना ज्या वॉर्डात ठेवले होते त्या वॉर्डातील त्यांच्या बरोबरीच्या सर्व कैद्यांना (फक्त भोपटकर, देशदास रानडे, अनंत हरि गद्रे व केशवराव केळकर सोडून) बाहेर काढण्यात आले व दरवाज्यात एका एका बाजूस चार चार गुंड ठेवून त्यांच्या मधून एक एक कैद्याला आत सोडण्यात येई. हे गुंड त्यांना लाथाबुक्यांनी झोट येऊन पडेतो मारीत. अशा रीतीने सर्वांना दहशत बसविण्यात आली.

दंडाबेडचा व फटके

नंतर दाते व त्यांच्या वॉर्डातील लोकांना उभे करण्यात आले व दंगलखोर कोण हे दाखविण्यासाठी दोन वॉर्डर कैद्यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी दहाबारा प्रमुख लोकांकडे बोट केले. तेव्हा त्या सर्वांना लोहारखान्यात नेऊन त्यांच्या

पायांत दंडाबेड्या ठोकण्यात आल्या. पण तेवढयाने अधिकाऱ्यांचे समाधान नव्हते. त्यांनी शं. रा. दाते, भा. गो. बापट, कापरे व काजरेकर यांना दहा दहा फटक्यांची शिक्षा सुनावली. या कोणाही मंडळींचा दंगलीशी काहीच संबंध नव्हता. वास्तविक दंगल झालीच नव्हती. अन्न नीट मिळत नव्हते याबद्दलची तक्रार होती. दाते तर मोहतमीम यांच्याबरोबर बोलत होते. पण दहशत निर्माण करण्याचे अधिकाऱ्यांचे धोरण होते. योगायोग मात्र वेगळा होता. ज्या दिवशी फटके मारण्याकरिता तिकटी उभी करण्यात आली होती त्याच दिवशी केवळ योगायोगाने औरंगाबादचे कमिशनर तुरुंगात अण्णासाहेब भोपटकर यांना भेटण्यास आले होते. कोर्टात त्या दिवशी भोपटकरांचा खटला चालावयाचा होता व त्यांनी आपल्या बाजूने कमिशनरची साक्ष काढली होती. म्हणून भोपटकरांचे म्हणणे समजून घेण्याकरिता ते तुरुंगात भोपटकरांना भेटण्यासाठी आले होते. त्या भेटीच्या वेळी मध्यंतरी झालेल्या दंगलीचा प्रश्न निघाला. भोपटकरांनी कमिशनरला झालेला सर्व प्रकार सांगितला व आता या चौघांना तुरुंगाचे अधिकारी फटक्यांची शिक्षा देत आहेत असेही सांगितले. तेव्हा कमिशनरने आपल्या अधिकारात फटक्यांची शिक्षा रद्द केली. मात्र ज्यांच्या पायात दंडाबेड्या ठोकण्यात आल्या होत्या त्यांचा तो खुळखुळा शेवटपर्यंत तसाच राहिला.

एकदा बापूजी अणे हे दाते प्रभृतींना भेटण्यासाठी तुरुंगावर आले. त्या दिवशी दाते यांची कोर्टात तारीख होती म्हणून त्यांच्या तुकडीला कोर्टात नेण्यात आले होते. म्हणून बापूजी अणे कोर्टात आले. तेव्हा दाते, बापट प्रभृतींच्या पायांत दंडाबेड्या त्यांनी पाहिल्या. त्यांनी कलेक्टरकडे जाऊन तक्रार केली. पण हे खोटे आहे, ज्यांच्यावर खटले चालू आहेत अशा कैद्यांना दंडाबेडी घालणे शक्य नाही असे ते म्हणाले. त्यावर आपण प्रत्यक्ष डोळ्यांनी कोर्टात पाहिल्याचे बापूजींनी सांगितले. तेव्हा कलेक्टरने तुरुंगाधिकाऱ्यांना दूरवाणीवरून विचारले. त्यांनी ते खरे असल्याचे मान्य केले. तेव्हा या दंडाबेड्या काढून टाकण्याचा त्यांनी आदेश दिला. पण तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी तो मानला नाही. त्यांनी नंतर एक सावधगिरी मात्र घेतली. ती ही की ज्या दिवशी कोर्टात तारीख असल्याने जावयाचे असे त्या दिवशी जाताना दंडाबेड्या काढावयाच्या व परत आल्यावर त्या पुन्हा ठोकावयाच्या !

निजामावर बाहेरूनही दडपण

इकडे महाराष्ट्रात तुरुंगातील अत्याचारांची वार्ता कोर्टात दावे चालण्याकरिता जेव्हा कैद्यांना आणीत तेव्हा त्यांजकडून वकिलांना व इतरांना सविस्तर समजे. त्यामुळे ती महाराष्ट्रात सर्वत्र पसरली. तेव्हा भोपटकर प्रभृतींना भेटण्यासाठी तात्यासाहेब केळकर, डॉ. मुंजे, बापूजी अणे, मध्यप्रदेशचे त्या वेळी मंत्री असलेले गोखले प्रभृति मंडळी येत गेली. त्यामुळे तुरुंगावरील अधिकाऱ्यांवरही त्याचा परिणाम झाला, व छळण्याचे प्रकार काही कमी झाले. श्री. शिवराम विष्णु दामले यांनी

तर बाबासाहेब जयकरांना व दत्तोपंत ताम्हनकरांनाही या सर्व हकीकती विलायतेत कळवून पार्लमेंटमध्येही या संबंधात प्रश्न उपस्थित करविला. जयकर त्या वेळी विलायतेत प्रीव्ही कौन्सिलचे सभासद होते. विलायतेतूनही सूत्रे हलल्यामुळे निजामावर दडपण येत गेले व या लढ्याच्या संबंधात काही तरी करणे प्राप्त आहे असे निजाम सरकारला आवश्यक वाटू लागले. औरंगाबादमधील या अत्याचारांनंतरही सत्याग्रहींची आवक सुरूच होती. त्यानंतरच महाराष्ट्रातून बापूराव जोशी यांचे पथक औरंगाबादला लगोलग आले. आर्यसमाजाचे पं. बुद्धदेव यांचेही पथक औरंगाबादेसच आले. भारतातील सुमारे ९० पुढारी मंडळींनी व्हाईसरॉयकडे पत्र पाठवून औरंगाबाद तुरुंगातील अत्याचारांच्या चौकशीची मागणी केली. त्यामुळे पुन्हा सत्याग्रहींचा दबदबा वाढला व निजाम सरकारला नमते घेणे भाग पडले.

सुधारणांची घोषणा

निजाम शासनाने नव्या सुधारणांचा एक आराखडा तयार केला होता पण आधी चळवळ विनशर्त मागे घेतल्याशिवाय तो प्रसिद्ध करण्याची निजामी शासनाची प्रथम तयारी नव्हती, तर तो प्रसिद्ध झाल्याशिवाय व त्यात आपल्या मागण्या बऱ्याच प्रमाणात मान्य झाल्याचे दिसल्याशिवाय सुरू झालेला लढा मागे घेण्यास सत्याग्रही आंदोलनाचे नेते तयार नव्हते. अखेर दि. १७ ऑगस्ट १९३९ ला निजाम सरकारने सुधारणांचा आराखडा प्रसिद्ध केला. त्यात सर्वांना नागरिक स्वातंत्र्याचे सर्व हक्क राहतील हे मान्य केले. निःपक्षपातीपणाने व लायकीनुसार नोकऱ्या दिल्या जातील व ब्रिटिश सरकारच्या कायद्याच्या धर्तीवर वृत्तपत्रासंबंधाने कायदा करण्यात येईल, व लोकनियुक्त विधिमंडळ निर्माण करून काही खाती लोकांच्या प्रतिनिधींकडे सोपविण्यात येतील हे मान्य केले.

सरकारच्या या सुधारणांवर त्या अपुऱ्या असल्या तरी त्यांचा वापर कसा होतो हे पाहिले जाईल; तोपर्यंत लढा स्थगित करण्याची सावरकरांनी घोषणा केली. तेव्हा निजामी शासनाने निजामाच्या वाढदिवसानिमित्त सर्व कैद्यांना शिरापुरीचे खास जेवण देऊन सर्वांची मुक्तता केली.

राजबंदींना सोडण्याचा हुकूम आला तेव्हा औरंगाबादच्या तुरुंगावरील सुपरिटेंडेंटने दाते व गद्रे यांना व काही आर्यसमाजी पुढाऱ्यांना बोलावून झाले गेले विसरून जा, तुम्हा सर्वांची सरकारने सुटका केली आहे असा प्रेमाचा निरोप दिला! भोपटकरांना यापूर्वीच औरंगाबादहून गुलबर्ग्याच्या तुरुंगात हलविले होते व तेथे त्यांची प्रकृति बिघडल्यामुळे त्यांची दि. १ ऑगस्टच्या थोडे आधी सुटका करण्यात आली होती.

अशा रीतीने भागानगर निःशस्त्र प्रतिकार लढ्याचा यशस्वी शेवट झाला. हिंदुमहासभेच्या विविध कार्यांतील हे एक महत्त्वाचे पर्व होऊन गेले.

गांधींचे देशी राज्य

या लढयात चार संघटनांनी भाग घेतला. एक स्टेट काँग्रेस, दुसरी हिंदुसभा, तिसरा आर्यसमाज; याशिवाय विद्यार्थ्यांमधून स्वयंस्फूर्तीने निर्माण झालेले वन्देमातरम्चे आंदोलन हे चौथे होय. स्टेट काँग्रेस ही निजाम राज्यातीलच जबाबदार कार्यकर्त्यांची संघटना होती; पण तिचे नेतृत्व गांधी व काँग्रेस यांच्या हाती होते. निजामाविरुद्ध लढ्यात स्टेट काँग्रेसने भाग घेऊ नये, निजामाला दुखवू नये असे गांधींचे मत होते. हिंदु संस्थानी राज्यात स्टेट काँग्रेस स्थापन करण्यास व संस्थानिकांविरुद्ध लढा करण्यास त्यांचा पाठिंबा होता. फक्त निजामच्या विरुद्ध लढा करण्यास त्यांचा विरोध होता! तरीही त्यांना डावलून स्टेट काँग्रेसच्या नेत्यांनी लढा सुरू केलाच. त्यामुळे ते फार नाराज झाले. निजाम राज्यातील लढ्याचे स्वरूप मुसलमान राजा व मुसलमान प्रजा यांच्या संयुक्त सामर्थ्याविरुद्ध हिंदूचा लढा होता. काही झाले तरी निजामाचे राज्य हे देशी राज्य आहे व तेथे हिंदूचा छळ झाला तर त्यांनी तो सोसला पाहिजे अशी गांधींची धारणा होती. गांधींना मुसलमान समाजाला दुखवावयाचे नव्हते. अखेर गांधींनी स्टेट काँग्रेसच्या नेत्यांवर आपला प्रभाव पाडला व हिंदुसभा या लढ्यात भाग घेत असल्याने या लढ्याला जातीय स्वरूप प्राप्त झाले आहे या कारणास्तव तरी स्टेट काँग्रेसने लढ्यातून आपले अंग काढून घ्यावे असा गांधींनी आग्रह धरला. त्याप्रमाणे स्टेट काँग्रेसचे अखेरचे डिक्टेटर श्री. काशीनाथराव वैद्य यांनी स्वतः सत्याग्रह केला व लढा बंद केला.

हिंदुसभेबरोबर आर्यसमाजाने संगनमत करू नये व त्यांनीही हिंदुसभेच्या लढ्यापासून दूर राहावे असाही गांधींनी प्रयत्न केला. त्या वेळी मध्यप्रांत विधानसभेचे सभापति घनश्यामदास गुप्त हे होते. ते आर्यसमाजी होते. परंतु आर्यसमाजाच्या ज्या शाखा व कार्यालये निजाम राज्यात होती त्यांच्यापुढे गांधींचे व गांधीवाद्यांचे चालले नाही. सोलापूरला डिसेंबर १९३८ मध्ये भरलेल्या आर्यसमाजाच्या सभेत आर्यसमाजाच्या सर्वश्रेष्ठ नेत्यांनी व सार्वदेशिक सभेने माघार न घेण्याचे ठरविले व त्यांनी या लढ्याला खूपच धार आणली. पण तेही गांधीवादी सत्याग्रहाच्या धोरणास अनुसरून आपले खटले लढवीत नसत. एकदम गुन्हा कबूल करीत व त्यांना ताबडतोब शिक्षा होऊन त्यांची सरकारला सोइस्कर अशा अन्य तुरुंगात रवानगी होत असे.

दि. १७ ऑगस्टला जेव्हा निजामाने सुधारणांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला तेव्हा त्यात नागरिक स्वातंत्र्याचे सर्व हक्क मान्य करण्यात आले होते. आर्य-

समाजाची मागणी तेवढीच असल्याने ती या जाहीरनाम्याने पुरी होत होती. त्यामुळे त्यांचाही लढा पूर्ण यशस्वी झाला होता. हिंदुसभेने आपला लढा स्थगित करण्याची घोषणा केली तेव्हा आर्यसमाजाने तर तो आता पुढे चालविला पाहिजे असें गांधींचे मत व्यक्त झाले होते ! हिंदुसभेला अशा लढ्यात यश यावे हे गांधींना सहन झाले नाही. म्हणून आर्यसमाजाने तो पुढे चालूच ठेवावा अशी त्यांनी भूमिका घेतली. पण आता हा लढा कशाकरता चालवावयाचा हे गांधींना सांगता आले नाही. हिंदुसभेने लढा स्थगित केला, तरी आर्यसमाजाचा लढा चालूच रहाणार कीं काय असे वातावरण चार दिवस गांधींच्या विरोधामुळे राहिले होते. तथापि आर्यसमाजाच्या नेत्यांनी लढा सुरू करताना गांधींजींचा विचार जसा अमान्य केला, त्याचप्रमाणे लढा बंद करतानाही गांधीचे म्हणणे त्यांनी अमान्य केले. आता लढा चालू ठेवण्याला काही कारण उरले नव्हते. त्यामुळे गांधींजीचे हे नवे धोरण हिंदू सभेविषयीच्या केवळ मत्सरबुद्धीतून निर्माण झाले होते हे तेवढे स्पष्ट झाले.

हिंदुसभेचा लढा सुरु करताना स्वा. सावरकरांनी आपली भूमिका स्पष्ट करून निजाम सरकारला कळविली होती. पुढे लढा सुरू झाल्यानंतर निजाम सरकार लवकरच सुधारणा जाहीर करणार आहे तेव्हा हे लक्षात घेऊन हिंदुसभेने आपला लढा बंद करावा, अशा सूचना निजाम सरकारकडून हस्तेपरहस्ते सावरकरांकडे पाठविल्या जात होत्या. निजाम सरकारची प्रतिष्ठा त्यात गुंतली होती. परंतु सावरकरांनी त्यांना गोड शब्दात पण स्पष्टपणे कळविले की सुधारणांचे स्वरुप पाहून व त्यात आमच्या मूलभूत मागण्या स्वीकारलेल्या असल्या तरी आम्ही आपण होऊन लढा बिनशर्त मागे घेऊ. आमचे व्यक्तिशः निजामाशी भांडण मुळीच नाही. अखेर निजाम सरकारने सुधारणांचा जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर त्यात लोकशाही स्वराज्याचे हक्क जरी मर्यादित होते तरी त्यात नागरिक स्वातंत्र्य मान्य करण्यात आलेले असल्यामुळे या सुधारणा जरी अपुऱ्या आहेत तरी त्यांत प्रगति होण्याची बीजे आहेत, व म्हणून हिंदुसभा आपले आंदोलन स्थगित करीत आहे अशी त्यांनी घोषणा केली. आर्यसमाज व हिंदुसभा यांनी हा लढा संगनमतानें व निर्धाराने शेवटपर्यंत चालविला व यश मिळविले. तथापि या कामात हजारो सत्याग्रहींना तुरुंगवास सोसावा लागला. कित्येकांना दंडाबेडीच्या यातना सहन कराव्या लागल्या. कित्येकांना फटके खावे लागले, हाल तर सर्वांचेच झाले. औरंगाबादच्या तुरुंगात श्री. शं. रा. दाते स्वतःच होते. त्यामुळे तेथील जीवन व दंडाबेडी त्यांनी प्रत्यक्ष अनुभविलीच होती. पण इतर तुरुंगातही सत्याग्रहींचा फार छळ झाला, त्याची इतिहासात नोंद नाही. या लढ्यात १८ हुतात्मे प्राणास मुकले. त्यांचेबद्दल येथे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले पाहिजे. त्यांची नावे अशी :

लढ्यातील बलिदान

	नाव	प्रांत	तुरुंग	दिनांक
१)	धर्ममूर्ति श्यामलालजी वकील	निजाम राज्य	बिदर	१६-१२-३८
२)	पंडित परमानंद	रावळपिंडी		५-४-४९
३)	व्यंकटराव कंधारकर, वकील,	निजामराज्य	निजामाबाद	९-४-३९
४)	तुळजाराम	निजामराज्य	गुलबर्गा	१४-४-३९
५)	स्वामी सत्यानंद	बंगलोर	चंचलगुडा	२८-४-३९
६)	विष्णु भगवंत अंदुरकर	निजामराज्य	"	२-५-३९
७)	छोटेलालजी अललपूर	उत्तरप्रदेश	गुलबर्गा	३-५-३९
८)	माधवराव	निजामराज्य	"	२८-५-३९
९)	नानूमलजी	राजपुताना	चंचलगुडा	७-६-३९
१०)	सुन्हेरजी	रोहतक	औरंगाबाद	१३-६-३९
११)	पुरुषोत्तम प्रभाकर	नागपूर	हैदराबाद	१७-६-३९
१२)	मलखानसिंग	उत्तरप्रदेश	"	१-७-३९
१३)	स्वामी कल्याणानंदजी	"	गुलबर्गा	८-७-३९
१४)	शांतिप्रकाश	दिल्ली	हैदराबाद	२७-७-३९
१५)	सदाशिव विश्वनाथ पाठक	सोलापूर	हैदराबाद	१२-८-३९
१६)	नामदेव पांडुरंग	निजाम	गुलबर्गा	दिनांक समजला नाही.
१७)	स्वामी ब्रह्मानंदजी	राजपुताना	चंचलगुडा	"
१८)	फकीरचंद	उत्तरप्रदेश	औरंगाबाद	"

या सत्याग्रहींना तेथे झालेल्या हालामुळे तुरुंगातच मरण आले. त्यांच्या स्मृतीस अभिवादन.

*

(९)

युद्धकालीन राजकारण

सन १९३९ च्या ऑगस्ट महिन्यात भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचा लढा यशस्वी रीतीने संपला आणि थोड्याच दिवसांनी युरोपात दुसरे महायुद्ध सुरू झाले. जर्मनीने दि. १ सप्टेंबर १९३९ ला पोलंडवर स्वारी केली व अँग्लो फ्रेंचांनी दि. ३ सप्टेंबरला जर्मनीविरुद्ध युद्ध घोषित केले. या युद्धाने जगातील सर्वच राष्ट्रांतील राजकीय रंगपट एकदम पालटून गेला.

भारतासारख्या देशात तर नवे युग सुरू झाले. या वेळपर्यंत स्वातंत्र्याच्या चळवळीची गरज भारतीय लोकांना होती. ते एक प्रकारचें सततचे गरजवंत होते; व इंग्रज त्यांना खेळवीत होते. तर आता इंग्रजांनी हे युद्ध सुरू केल्यामुळे इतरांच्या मदतीसाठी इंग्रज हे गरजू झाले होते. त्यांना भारताच्या संपूर्ण सहकार्याची आवश्यकता निर्माण झाली होती.

इंग्रजांनी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारताना त्यात हिंदुस्थानला गोवले होते. कारण हिंदुस्थान हा ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग होता. भारताला युद्धात गोवताच काँग्रेसने त्याची लगेच दखल घेतली. हिंदुस्थानच्या लोकनियुक्त प्रतिनिधींच्या संमतीशिवाय ब्रिटिशांनी हिंदुस्थानला परस्पर या युद्धात गोवले याबद्दल काँग्रेसने तीव्र नापसंती व्यक्त केली, आणि हे युद्ध आम्ही कशाकरता लढावयाचे अशी पृच्छा केली. दि. ७ सप्टेंबर १९३९ ला काँग्रेसच्या कार्यकारी समितीची बैठक वर्धा येथे झाली. तीत ब्रिटिश सरकारने आपले युद्धहेतु जाहीर करावेत अशी काँग्रेसने मागणी केली. काँग्रेसनेत्यांनी इंग्रजांच्या युद्धहेतूविषयी संशयही व्यक्त केला. काँग्रेसच्या संबंधित ठरावात असे म्हटले आहे की "आम्हांला नाझींचा आक्रमणवाद मुळीच मान्य नाही. पण त्याचबरोबर ब्रिटिशांनी सुरू केलेल्या या युद्धामागे भारतासारख्या देशावर आपली साम्राज्यवादी पकड बळकट करण्याचेच धोरण असावे असा आम्हांस संशय येतो. तसे नसेल तर ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानचे संपूर्ण स्वातंत्र्याचे जे उद्दिष्ट आहे ते प्रथम तावडतोब मान्य करावे. ते जोपर्यंत ब्रिटिश सरकार मान्य करणार नाही, तोपर्यंत त्यांच्या हेतूविषयी लोकांच्या मनात संशय राहणारच.

"पहिल्या महायुद्धाच्या वेळीही इंग्रजांनी आपले युद्धहेतु जाहीर करताना लोकशाही स्वातंत्र्याच्या घोषणांचा पुरस्कार केला होता ! पण पुढे त्या घोषणा बाजूसच राहिल्या व ब्रिटिश साम्राज्यशाहीची पकड मात्र बळकट झाली. तेव्हा या वेळी नाझींच्या विरुद्ध इंग्रजांना भारताचे सहकार्य हवे असले तर त्यांनी भार-

ताचे स्वातंत्र्य तावडतोब मान्य केले पाहिजे. तरच त्यांच्या घोषणेवर लोकांचा विश्वास बसेल."

या सर्व प्रतिपादनावरून तावडतोब स्वातंत्र्य देण्याची घोषणा करण्यास ब्रिटिश सरकार तयार झाले असते तर त्यांना युद्धकार्यात सहकार्य करण्याची काँग्रेसची तयारी होती हे स्पष्ट होते. पण तसे झाले मात्र नाही.

यापूर्वी सरकारने १९३५ चा सुधारणा कायदा अमलात आणण्याचा प्रयत्न केला होता. १९३१ साली झालेल्या गोलमेज परिषदेच्या वेळी ब्रिटिश सरकारने जी घोषणा केली होती तीत केंद्रशासनात हिंदुस्थानला केवळ नाममात्र अधिकार देण्याची योजना होती त्यामुळे १९३५ च्या सुधारणा कायद्यास काँग्रेसने आपला विरोध व्यक्त केला होता, तर या कायद्यात मुसलमानांना स्वतंत्र मतदार संघ दिले होते म्हणून त्यास हिंदुसभेचाही विरोध होता. मुस्लिम लीगचाही त्यास विरोध होता कारण तो कायदा अमलात आला तर केंद्रशासनात हिंदूंचीच बहुसंख्या होणार; शिवाय त्यात संस्थानिकांचेही प्रतिनिधि यावयाचे असल्याने व त्यांच्या प्रतिनिधींत बहुसंख्य हिंदूच असणार हे स्पष्ट असल्याने मुसलमानांची पाकिस्तान निर्माण करण्याची जी आकांक्षा होती ती धुळीस मिळणार हे उघड होते. हे जाणून व याच कारणास्तव मुस्लिम लीगनेही १९३५ च्या कायद्याला आपलाही विरोध व्यक्त केला होता.

त्या वेळी देशात सत्तेवर असलेले असे मुख्य राजकीय पक्ष काँग्रेस व मुस्लिम लीग हे दोनच होते. हिंदुमहासभेची संघटना ही आरंभापासून मुख्यतः हिंदूंच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यापुरती मर्यादित होती. ती केवळ राजकीय संस्था बनली नव्हती. हिंदुसभेचे सर्व कार्यकर्ते आरंभापासून व या काळातही काँग्रेसमधूनच राजकीय चळवळीत भाग घेत होते. त्यामुळे देशातील दोन्ही मुख्य राजकीय पक्षांचा १९३५ च्या कायद्याला वेगवेगळ्या कारणास्तव पण विरोधच होता.

तरीही ब्रिटिश सरकार तो अमलात आणण्याचा प्रयत्न करीतच होते संस्थानिकांशी पत्रव्यवहार चालू होता. त्यांना १९३५ च्या कायदयाच्या घटनेत समाविष्ट करून घेण्याचे सरकारी तंत्र सुरूच होते. १९३७ साली प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या तेव्हा त्यात हिंदु बहुसंख्य प्रांतांत काँग्रेस व मुस्लिम बहुसंख्य प्रांतांत तीन ठिकाणी मुस्लिम लीग बहुमतात निवडून आली होती. तेव्हा १९३५ चा कायदा केंद्रीय क्षेत्रात अमलात आणण्याची योजना केली तरी हेच पक्ष लोकप्रतिनिधि म्हणून निवडून येणार हे उघड दिसत होते. व त्यांचा १९३५ च्या घटना कायद्याला विरोधही होता. म्हणून ब्रिटिश सरकारच्या वतीने व्हाईसरॉय यांनी १८ ऑक्टोबर १९३९ ला घोषणा केली की १९३५ चा सुधारणा कायदा रद्द करण्याची ब्रिटिश सरकारची तयारी असून युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानला वसाह-

तींचे स्वराज्य देण्याचीही तयारी आहे व तोपर्यंतच्या काळात येथे राष्ट्रीय सरकार निर्माण करण्यास म्हणजे विद्यमान १९१९ च्या कायद्यास धरून निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांची केंद्रीय कार्यकारी मंडळात नेमणूक करण्यास सरकार तयार आहे.

ब्रिटिश सरकारने १९३१ साली वसाहतीच्या स्वराज्याचा कायदा करून कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड. इत्यादी वसाहतींना स्वातंत्र्य दिले होते. फक्त त्यांनी ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये रहावे एवढीच त्यात अट होती. पुढे तीही अट त्यांनी सैल करून टाकली होती व खऱ्या अर्थाने या वसाहतींचे पूर्ण स्वातंत्र्य मान्य केले होते. तसेच स्वातंत्र्य युद्धसमाप्तीनंतर भारताला देण्यात येईल असे ब्रिटिश सरकारच्या वतीने या वेळी सांगण्यात आले.

पण युद्ध जिंकल्यानंतर ही गोष्ट व्हावयाची होती व युद्ध समाप्तीनंतर तरी केव्हा याला कोणतीच कालमर्यादा घालण्यात आलेली नव्हती. लोकांनी मात्र युद्धकार्यात आताच ताबडतोब सहभागी व्हावे अशी ब्रिटिश सरकारची अपेक्षा होती. त्यामुळे मदत आज करावयाची व स्वातंत्र्यासाठी भविष्यकालीन उधारीच्या वायद्यावर अवलंबून राहावयाचे यास काँग्रेसची तयारी नव्हती. ब्रिटिशांच्या प्रामाणिक धोरणाविषयी अविश्वासाचा तो भाग होता.

काँग्रेसने या वेळी घटनासमितीचीही मागणी केली. आम्हांला स्वातंत्र्य द्यावयाचे तर आमची घटना आम्ही करू, ती कशी असावी हे आमचे आम्ही ठरवू. फक्त तिला मान्यता देण्याचे ब्रिटिश सरकारने आश्वासन द्यावे असे मागणे काँग्रेसने सुरू केले. तेव्हा ब्रिटिश सरकार म्हणू लागले की आम्ही तुम्हांस स्वातंत्र्य द्यावयास तयार असलो, तरी युद्ध चालू असताना ते शक्य नाही व जोपर्यंत तुमची सर्वांची एकमुखी मागणी तयार होत नाही व हिंदुमुसलमानांची एकजूट होऊन सर्वसंमत योजना सिद्ध होत नाही तोपर्यंत घटनात्मक बदलाचा विचार व्यर्थ आहे. त्यांचे म्हणणे असे की आज लोकांनी सरकारला युद्ध जिंकण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य करावे व ब्रिटिश सरकारच्या सद्‌हेतूबद्दल विश्वास बाळगावा. पण याला काँग्रेसची तयारी नव्हती. काँग्रेस त्यांना वचनात बांधून घेऊ पाहात होती, तर ते देण्याची ब्रिटिशांची तयारी नव्हती.

मुस्लिम लीगच्या मागण्या

युद्ध सुरू होताच ब्रिटिश सरकारने १९३५ ची घटना रद्द करण्याचे जाहीर केल्याबरोबर पाकिस्तानची मागणी पुढे करण्यास मुस्लिम लीगला नवी संधि उपलब्ध झाली व तिने पाकिस्तानच पाहिजे अशी मागणी सुरू केली. त्यामुळे तिढा वाढत गेला. जिनांनी व्हाईसरॉयकडे पाठविलेल्या पत्रात युद्धसहकार्यासाठी अटी घालताना चार मुद्द्यांवर आश्वासन मागितले होते. ते मुद्दे असे : (१) युद्ध संपताच

किंवा शक्य तितक्या लौकर हिंदुस्थानच्या राज्यघटनेचा सर्व विचार नव्याने करण्यात यावा. (२) हिंदु व मुसलमान या दोन जमातींच्या मंजुरीशिवाय कोणतीही घटना करण्यात येऊ नये, किंवा कोणत्याही प्रकारची घोषणा करण्यात येऊ नये. (३) पॅलेस्टाईनमधील अरबांच्या सर्व न्याय्य मागण्या मंजूर व्हाव्यात व (४) हिंदुस्थान बाहेर धाडावयाचे लष्कर हे कोणत्याही मुसलमान राष्ट्राविरुद्ध वापरले जाऊ नये.

जगातील मुसलमान तेवढे सर्व एक या पाकिस्तानवाल्यांच्या जागतिक भूमिकेचे यात निदर्शन होते.

या मागण्यांना व्हाईसरॉयनी दि. २३ डिसेंबर १९३९ ला पाठविलेल्या उत्तरात असे म्हटले की (१) दि. १८ ऑक्टोबर १९३९ ला केलेल्या घोषणेनुसार हिंदुस्थानच्या राज्यघटनेच्या १९३५ च्या कायदयाचा किंवा तो कायदा ज्या भूमिके-वर आधारलेला आहे, त्या भूमिकेचा फेरविचार करण्याची आता सोय झालेली आहे. (२) हिंदुस्थानच्या कारभारात कोणतीही घटना यशस्वी होण्यास मुसलमान जमातीचा संतोष किती महत्त्वाचा आहे याची जाणीव साम्राज्य सरकारला आहे हे तुम्हांसही माहीत आहे. म्हणून त्या बाबतीत तुम्ही निर्धास्त राहण्यास हरकत नाही. (३) पॅलेस्टाईनमधील अरबांच्या न्याय्य मागण्या ब्रिटिश सरकारने मान्य केल्या असून त्या प्रश्नाचे महत्त्व सरकार जाणते. (४) हिंदुस्थानातून बाहेर जाव-याचे लष्कर कोणत्याही मुसलमान राष्ट्राविरुद्ध वापरले जाऊ नये असे आश्वासन आपण मागता ; पण हा प्रश्न केवळ तात्त्विक स्वरूपाचा आहे. ब्रिटिश सरकारचे कोणत्याही मुसलमानी राष्ट्राशी युद्ध चालू नसल्याने सुदैवाने या प्रश्नाचे स्वरूप अधिकच केवळ तात्त्विक झालेले आहे. म्हणून आपल्या पत्रात मागण्यात आलेले आश्वासन देण्याचा प्रश्न उत्पन्न होत नाही. आणखी असे की हिंदुस्थानच्या स्वसं-रक्षणाच्या हक्कासाठी स्वतःचे लष्कर वापरण्याचा हक्क त्यायोगे मर्यादित करण्या-सारखे होणार असल्याने तसे आश्वासन देता येणार नाही. मात्र या बाबतीत हिंदी मुसलमानांच्या भावना काय आहेत हे ब्रिटिश सरकारने लक्षात घेतलेले आहे ही गोष्ट आपण जाणताच.

ब्रिटिश सरकारची मुसलमानांच्या संबंधात किती जवळीक होती हे या उत्तरावरून चांगले दिसून येते.

या वेळी ब्रिटिश सरकारबरोबर तडजोड घडवून आणण्याचे काँग्रेसचेही प्रयत्न सुरू होते. व्हाईसरॉय यांनी राष्ट्रीय सरकार म्हणजे ज्यात सर्व पक्षांचे प्रतिनिधि असतील अशी कार्यकारी मंडळाची फेररचना करण्याची तयारी दर्शविली होती. व त्या दृष्टीने काँग्रेस पुढाऱ्यांच्या व्हाईसरॉय यांच्याबरोबर भेटीगाठी सुरू होत्या. या वाटाघाटीतून स्वातंत्र्य किती प्रमाणात उपलब्ध होऊ शकते हे पाहण्याचा

काँग्रेसचा प्रयत्न होता. पण ब्रिटिश सरकार युद्धकाळात कोणत्याच पक्षाला नाराज करू इच्छीत नव्हते व त्याच बरोबर कोणताही घटनात्मक बदल घडवून आणण्यास व राज्ययंत्रावरील आपली पकड ढिली होऊ देण्यास तयार नव्हते. त्यामुळे राजकारणाची कोंडी निर्माण झाली होती.

ब्रिटिश सरकार अभी के अभी स्वातंत्र्य देण्याच्या आपल्या मागणीला मान्यता देत नाही हे दिसून येताच या युद्धात त्यांच्याशी सहकार्य करावयाचे नाही असे काँग्रेसने ठरविले व सात प्रांतांत जेथे काँग्रेसची मंत्रिमंडळे प्रांतीय राज्यकारभार करीत होती ती त्यांनी दि. २२ ऑक्टोबर १९३९ अखेर सोडून दिली.

१९३७ च्या निवडणुकीनंतर प्रारंभी काँग्रेसने असेच असहकाराचे धोरण स्वीकारले होते. त्यांनी सुरवातीला मंत्रिमंडळे बनविण्यासच प्रथम नकार दिला होता. काँग्रेसचे या वेळचे सर्वसामान्य धोरण बाहेरून फक्त अकरणरूप दडपण आणण्याचे होते. प्रांतीय कारभारात सत्ता मिळालेलीच नाही, सर्व काही गव्हर्नरच्या तंत्राने चालणार आहे असा काँग्रेसने दावा केला होता. वस्तुस्थिति मात्र तशी नव्हती. पण हे गांधींना मान्य नव्हते. आपण १९३५ ची नवी घटना अभ्यासिलीच नाही असेही ते एकदा म्हणाले. तेव्हा दि. २१ जून १९३७ ला व्हाईसरायने एक निवेदन प्रसिद्ध करून काँग्रेसचे म्हणणे कसे चुकीचे आहे हे स्पष्ट केले.

या वेळी मात्र १९२१ सालाप्रमाणे विधिमंडळांच्या निवडणुकीवरच बहिष्कार घालण्याऐवजी निवडणुका जिंकून झाल्यावर काँग्रेसने बहिष्कार घातलेला होता. त्यामुळे निवडून आलेल्यांत काँग्रेसचे नसलेले जे सभासद होते त्यानी प्रथम मंत्रिमंडळे बनविली व १९३५ च्या घटनेने प्रांतीय कारभारात प्रत्यक्ष किती अधिकार आहेत हे अनुभवाने दाखवून दिले. आपल्याला मिळावयाची सत्ता इतरांना मिळाल्यामुळे काँग्रेसवाले बेचेन झाले होते. पुढे जुलै १९३७ मध्ये त्यांनी यापूर्वी त्याज्य ठरविलेली मंत्रिमंडळे स्वत: बनविण्याचे ठरविले व सुमारे पावणे दोन वर्षे राज्यकारभार केला.

तथापि यापुढे मंत्रिमंडळात राहण्याने युद्धकार्याचे दायित्व पतकरावे लागणार होते व त्यास काँग्रेसचा विरोध होता म्हणून त्यांनी मंत्रिपदे सोडली.

काँग्रेसनेत्यांची अशी अपेक्षा होती की या धोरणाचे ब्रिटिश राज्यकर्त्यांवर पुरेसे दडपण येईल व ते काँग्रेसच्या मागण्या मान्य करतील. कारण सात राज्यांतील विधिमंडळांतून काँग्रेसचे बहुमत होते व त्यांनी मंत्रिमंडळे सोडल्यास व इतर पक्षांनी ती बनविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचा विधिमंडळात पराभव करून घटनात्मक पेचप्रसंग निर्माण करण्याचे काँग्रेसजवळ बळ होते. तथापि इंग्रजांनी या घटनात्मक आपत्तीला सरळ बगल दिली व काँग्रेसने मंत्रिमंडळे सोडून देताच त्यांनी तेथील राज्यकारभार घटनेच्या ९३ व्या कलमाखाली आपल्या हाती घेतला.

काँग्रेसच्या राजकीय धोरणातील ही गंभीर चूक होती. ती काँग्रेसवाल्यांच्या लक्षात पुढे आली. पण तेव्हा वेळ निघून गेलेली होती. कोणत्याही प्रश्नाचा स्वतंत्रपणे व सर्वांगीण दृष्टीने विचार करण्याचे काँग्रेस नेत्यांत अवसानच राहिले नव्हते. इंग्रजांच्या दृष्टीने मात्र ती इष्टापत्तीच ठरली. त्यांच्या मागची अंतर्गत कारभारात कटकट निर्माण होण्याची शक्यता आता राहिली नाही. त्यामुळे ते निर्वेध झाले.

हिंदुमहासभेचे धोरण

हिंदु महासभेचे धोरण आरंभापासूनच प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वावर आधारलेले होते व शेवटपर्यंत ते तसेच राहिले. सरकारने हिंदु महासभेचे म्हणणे जे मान्य केले त्या बाबींपुरते तिने सरकारशी सहकार्याचे धोरण स्वीकारले; व जेथे तिचा सरकारी धोरणाशी विरोध निर्माण झाला तेथे तिने सरकारी धोरणास आपला स्पष्ट विरोध व्यक्त केला.

युद्धकाळात तिच्या हाती कोठेच राजसत्तेची सूत्रे नव्हती. त्यामुळे अन्य मार्गांनी तिला जे काही करता आले ते ती करीत राहिली.

हिंदुमहासभेचे हे धोरण नित्याचेच आहे. युद्धकाळात व त्यानंतरही तिचे तेच धोरण राहिले. हे धोरण केवळ सरकारच्याच बाबतीत नव्हे तर सर्वच पक्षांच्या बाबतीत तिचे हे नित्याचे धोरण आहे. लो. टिळकांनी प्रतियोगी सहकारितेचे जे तत्त्व म्हणून सांगितले ते राजकारणातील किंबहुना सर्वच जीवनव्यवहारातील मूलभूत स्वरूपाचे स्थायी तत्त्व म्हणून हिंदुसभेने ते आरंभापासूनच स्वीकारले आहे.

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी दि. २८ डिसेंबर १९३९ ला कलकत्ता येथे हिंदु महासभेचे २१ वे वार्षिक अधिवेशन स्वा. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यात युद्धविषयक प्रश्नाच्या संबंधात सर्वसंमत झालेल्या प्रस्तावात म्हटले आहे की, (१) हिंदुमहासभेचे उद्दिष्ट संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याचे आहे, व जर हे युद्ध स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या रक्षणासाठी व आक्रमकांना विरोध करण्यासाठी आहे असे ब्रिटिश सरकारने घोषित केले आहे तर या उद्देशांचे त्यांनी पालन करण्याची सर्वात अधिक आवश्यकता हिंदुस्थानात असून ब्रिटिश सरकारने १९३१ च्या वसाहतीच्या स्वराज्याच्या कायद्यानुसार हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचा कायदा ताबडतोब करावा अशी या सभेची मागणी आहे. (२) १९३५ च्या कायद्याची उभारणी जातीय मतदारसंघ निर्माण करून व जातीय मतदार संघांतही मुसलमानांना हुकमी जातीय बहुमत देऊन करण्यात आली आहे. त्यांस हिंदुमहासभेचा तीव्र विरोध आहे. ते धोरण लोकशाहीला विघातक आहे. ते बदलण्यात यावे व शुद्ध लोकशाही पायावर घटना करण्यात यावी. तसेच (३) परकीय आक्रमणाला तोंड देण्यास एकाकी हिंदुस्थान लष्करी दृष्ट्या आज स्वयंपूर्ण

व स्वावलंबी नसल्याने हिंदुस्थानच्या संरक्षणासाठी ग्रेट ब्रिटन बरोबर सहकार्य करण्यास पुष्कळच जागा आहे. म्हणून येथे राष्ट्रीय सेनेची उभारणी तावडतोब करण्यात यावी. त्यासाठी लढाऊ आणि बिनलढाऊ जाती असा भेदभाव न करता किंवा जातीयवाद त्यात न आणता शक्य तितक्या लौकर सैन्याचे हिंदीकरण करावे. शस्त्रनिर्बंधाचा कायदा विलायतेत आहे त्या धर्तीवर येथे बनविण्यात यावा. तसेच प्रादेशिक सेना व विद्यापीठांतून छात्रसेनाही सुरू करण्यात याव्यात.

मुस्लिम लीगची भूमिका

मुस्लिम लीगच्या व इतर मुसलमानांच्या (पंजाबात युनियनिस्ट पक्षाचे मंत्रिमंडळ या वेळी होते.) ताब्यात जी मंत्रिमंडळे होती ती त्यांनी सोडली नाहीत. उलट त्यांनी ती राबवून मुसलमानी संघटनेचे व सत्तेचे बळ वाढविले व त्या बळावर युद्धासाठी मोठ्या प्रमाणावर मुसलमानांची सैन्यभरती सुरू केली. त्यामुळे ब्रिटिश सत्तेवरही त्यांचे दडपण एकसारखे वाढत राहिले.

या बाबतीत जिनांनी व त्यांच्या मुस्लिम लीगने केवळ आपल्या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने व्यवहारी भूमिका घेतली होती. पाकिस्तान घडवून आणणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यासाठी १९३५ चा कायदा त्यांना रद्द व्हावयास हवा होता. युद्ध सुरू झाल्यावर ब्रिटिश सरकारने तो रद्द करण्याची घोषणा केली. त्यामुळे त्यांचा नव्या मागणीचा मार्ग एकदम खुला झाला.

काँग्रेसने सात प्रांतांत १९३७ वर्षी जुलैमध्ये मंत्रिमंडळे स्थापन केली होती. त्या वेळी प्रांतांतील निवडणुकांत मुसलमानांचे प्रतिनिधि म्हणून बऱ्याच ठिकाणी मुस्लिम लीगवालेच निवडून आले होते. असे असता त्यांना डावलून काही संयुक्त (विशेषतः मजूर) मतदार संघातून निवडून आलेल्या मुसलमानांना काँग्रेसने मुसलमानांचे प्रतिनिधि म्हणून आपल्या मंत्रिमंडळात घेतले होते. मुंबई राज्यात मुस्लिमलीगचे २२ लोक निवडून आलेले असता मुस्लिम लीगला डावलल्यामुळे जिनांचा काँग्रेसवर फार राग होता. १९३९ वर्षी काँग्रेसने मंत्रिमंडळे सोडली तेव्हा हायसे वाटून जिनांनी सुस्कारा सोडला व त्यांनी सुटकेचा दिवस (डिलिव्हरन्स डे) म्हणून एक दिवस साजरा केला.

काँग्रेसच्या धोरणामुळे मुस्लिम लीग व काँग्रेस यांच्यात कमालीचा कडवटपणा निर्माण झाला होता. काँग्रेसने आपण होऊन हातची मंत्रिमंडळे सोडून दिली ही गोष्ट मुस्लिम लीगच्या पथ्यावरच पडली. जर काँग्रेसने प्रांतांतील सत्ता न सोडता या वेळी १९३५ च्या केंद्रीय कारभाराचा भाग स्वीकारला असता तर परिस्थिति बदलून गेली असती. (युद्धाच्या अंती १९३१ च्या वसाहतीच्या स्वराज्याचा पार्लमेंटचा कायदा भारतालाही लागू करण्याची इंग्रजांनी आपली तयारी स्पष्ट व्यक्त केलेली होती.) तसे झाले असते तर मुस्लिम लीगच्या फुटीर धोरणाला

परस्पर पायबंद बसला असता व पाकिस्तानचा विचारही तिला सोडून द्यावा लागला असता. प्रांताप्रांतांतून जेथे लीगची व इतर मुसलमानांची मंत्रिमंडळे होती तेथे त्यांनी हाती आलेली सत्ता राबविल्यामुळे त्यांचे बळ आपोआप वाढत गेले व काँग्रेसवाल्यांनी ती सोडल्यामुळे त्यांचे बळ घटत गेले. त्यांनी प्रांतांतील सत्ता राबविली असती व केंद्रीय सत्तेत भागीदारी केली असती तर देशाची फाळणी होती ना! व युद्धाअंती हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचे टाळण्याचा विचार ब्रिटिश करते तरी त्यांना तसे करणे शक्य झाले नसते. कारण हिंदुस्थानचे सैनिकी सामर्थ्यच त्या वेळी इतके वाढलेले व ते त्यांच्या हाती आलेले असते. पण काँग्रेसचे सारे धोरण आरंभापासूनच चुकत गेले व पुढे भलत्याच प्रतिष्ठेच्या नादी लागून त्यांनी अहिंसेचे व देशाचेही धिंडवडे काढले!

जिनांनी मात्र काँग्रेसच्या या चुकीच्या धोरणाचा पुरेपूर फायदा उठवला. त्यांनी लाहोर येथे मुस्लिम लीगच्या अधिवेशनात दि. २२ मार्च १९४० दिवशी आपली भूमिका पुन्हा अतिशय स्पष्ट शब्दांत मांडली आहे. त्यांनी म्हटले : The present artificial unity of India dates back only to the British conquest and is maintained by the British bayonet. But the termination of the British Empire which is implicit in the recent declaration of His Majesty's Government, will be the herald of the entire breakup with the worst disaster that has ever taken place during the last one thousand years under the Muslims. It is a dream that the Hindus and Muslims can ever evolve common nationality. This misconception of one Indian nation has gone far beyond the limits and is the true cause of most of our troubles and will land India to destruction if we fail to revise our notions in time.

Before the war was declared the greatest danger that the Musalmans of India faced was the possible inauguration of the Federal Scheme in this country. But the Muslim League was stoutly resisting it in every direction and we shall never accept the Federal Scheme as embodied in the Government of India Act.

We stand unequivocally for the freedom of India. But this is not the freedom which is the goal of the Congress.

Mr. Gandhi is fighting for a Constituent Assembly. May I point out to Mr. Gandhi and the Congress that they are fighting for a constituent assembly which we cannot accept.

(हिंदुस्थानची सध्याची जी एकता आहे ती येथे ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यापासूनची आहे, आणि तीही ब्रिटिशांच्या तरवारीच्या बळावरच टिकून

राहिली आहे. ही ब्रिटिशांची सत्ता ब्रिटिश सरकारच्या अलीकडच्या घोषणेनुसार संपुष्टात यावयाची असून त्याबरोबरच त्या एकतेचेही तुकडे होतील व त्यातून भीषण आपत्ति ओढवेल. इतकी की मुसलमानांच्या गेल्या हजार वर्षातील सत्ता काळातील ती सर्वांत मोठी आपत्ति ठरेल!

हिंदु आणि मुसलमान यांच्यात एक उभयसामान्य राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल असे मानणे हे स्वप्नरंजन आहे व तेच आपल्या आपत्तीचे खरे कारण आहे. ही कल्पना आता इतकी ताणली गेली आहे की आपण त्या संबंधात आपले विचार वेळीच स्पष्ट बदलले नाहीत तर त्यातून या देशात हानि मात्र घडून येईल. युद्ध सुरू झाले त्यापूर्वी मुसलमानांपुढे सर्वांत मोठे भय येथे संघराज्य प्रत्यक्षात अस्तित्वात येते कीं काय याचे होते. पण मुस्लिम लीग त्याला जोरदार-पणे विरोध करीत होती. आम्ही १९३५ च्या कायद्यातील संघराज्याची योजना केव्हाही स्वीकारणार नाही.

आम्हांला हिंदुस्थानचे स्वातंत्र्य जरूर हवे आहे; पण काँग्रेसला ते ज्या प्रकारचे हवे आहे त्या प्रकारचे नव्हे. गांधींना घटनासमिति हवी आहे. पण मी गांधी व काँग्रेस यांना सांगू इच्छितो की त्यांना ज्या प्रकारची घटनासमिति हवी आहे तिला आम्ही कधीच मान्यता देणार नाही.)

काँग्रेसचे धोरण – जिनांच्या धोरणाचा पाठपुरावा

मुस्लिम लीगला बगलेत मारून ब्रिटिश सरकारकडून तावडतोब स्वातंत्र्याच्या मागणीला मान्यता मिळविण्याच्या खटपटीत काँग्रेस नेते होते. त्यासाठी त्यांनी लीगला कोरा चेक देऊ केला. रामगड येथे काँग्रेसचे ५३ वे अधिवेशन मौलाना अबुलकलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ मार्च १९४० ला भरले होते. या अधिवेशनात अल्पसंख्याक कोण समजावयाचे या संबंधात मौ. आझाद यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मौलाना आझाद यांनी या वेळी मुसलमानांच्या ज्या काही मागण्या असतील त्या सर्व जशाच्या तशा मान्य करण्याचे काँग्रेसचे धोरण असल्याचेही घोषित केले. या भाषणात मौलाना आझाद मुसलमानांच्या भारतातील महत्त्वाचे वर्णन करताना म्हणतात की, "In the texture of Indian politics, nothing is further removed from the truth than to say that Indian Muslims occupy the position of a political minority. हिंदुस्थातील मुसलमान हा एक राजकीय अल्पसंख्य समाज आहे हे मुळातच खरे नाही, (आणि हेच मुस्लिम लीग म्हणत होती.) आणि म्हणून अल्पसंख्याकांची व्याख्या त्यांना लागू पडत नाही असे सांगून आझादांनी ती व्याख्या अशी केली आहे की Politically speaking, the word minority does not mean just a group that is numerically

smaller and therefore entitled to special protection. It means a group that is so small in number and so lacking in other qualities that give strength, that it has no confidence in its own capacity to protect itself from the much larger group that arounds it. It is not enough that the group should be relatively smaller but that it should be absolutely so small as to be incapable of protecting its interests. (राजकीय दृष्टचा अल्पसंख्य समाज याचा अर्थ इतरांपेक्षा केवळ संख्येने कमी असलेला व म्हणून विशेष संरक्षणाची आवश्यकता असलेला समाज नव्हे; तर तो समाज संख्येने इतका लहान असला पाहिजे व सामर्थ्य प्राप्त करून देणाऱ्या इतर गुणांतही तो इतका कमी असला पाहिजे की, त्याच्या भोवती असणाऱ्या बहुसंख्य समाजापासून आपले संरक्षण करून घेण्याच्या बाबतीत त्याला आत्मविश्वासच असू शकणार नाही. केवळ संख्येने अल्प असणे पुरेसे नाही. आपले हितसंबंध स्वतःच्या बळावर सुरक्षित राखणे त्याला केवळ अशक्य असले पाहिजे.) तात्पर्य आझादांच्या या व्याख्येनुसार अल्पसंख्य म्हणजे ज्यांना आपल्या हितसंबंधांचे संरक्षण करण्याचे सामर्थ्यच असू शकत नाही ते. आझाद पुढे असेही म्हणतात की हिंदुस्थानात निर्माण झालेल्या राष्ट्रीय चळवळीला पायबंद घालण्यासाठी ब्रिटिश नोकरशाहीने या देशात दोन अपसमजुती फैलावल्या. (१) हिंदुस्थानात हिंदु व मुसलमान अशा दोन जमाती असल्याने एकमुखी राष्ट्राच्या नावाने हिंदुस्थानला कोणताही हक्क सांगता येणार नाही. (२) संख्येने मुसलमान हिंदूंच्यापेक्षा कमी असल्याने हिंदुस्थानात लोकशाही निर्माण करणे म्हणजे हिंदूंचे वर्चस्व प्रस्थापित करणे होय. म्हणून काँग्रेसने मुसलमानांना असे आवाहन केले की, आपल्या हितसंबंधासाठी ज्या कोणत्या तरतुदी त्यांना आवश्यक वाटत असतील त्या त्यांनी सांगाव्या. काँग्रेस त्यांना बिनशर्त पाठिंबा द्यावयास तयार आहे. काँग्रेसचे हे धोरण मुस्लिम लीगच्या इस्लामी साम्राज्यवादी आकांक्षांस खतपाणी घालणारेच होते.

गांधींना आझादांचे धोरण मान्य असले तरी ते मात्र मुसलमानांना अल्पसंख्य समाजच समजत होते व त्या कारणास्तव त्यांच्या हव्या त्या मागण्या मान्य करण्याची त्यांची तयारी होती. फक्त त्या अखंड हिंदुस्थानच्या कल्पनेच्या कक्षेत असाव्यात एवढेच त्यांना अपेक्षित होते. हरिजनमध्ये ते लिहितात :

Safeguards for the minorities is not only a common cause but a representative assembly of Indians cannot evolve a stable constitution without the fullest satisfaction being given to the legitimate minorities. I use the word legitimate advisedly because

I see that the minorities crop up like mushrooms till there will be no majority left. By fullest satisfaction I mean which will not militate against progress of the nation as a whole.

(अल्पसंख्याकांना संरक्षणात्मक अधिकार पाहिजेत हे सर्वांनाच मान्य आहे; आणि वास्तव अल्पसंख्याकांचे अगदी पूर्ण समाधान करण्याची तरतूद केल्याशिवाय हिंदुस्थानची प्रातिनिधिक लोकसभा स्थिर स्वरूपाची राज्यघटना निर्माण करूच शकणार नाही. मी वास्तव (Legitimate) शब्द सहेतुक वापरला आहे. कारण एरवी अल्पसंख्य समाजांचे पावसाळ्यातील छत्र्यांप्रमाणे इतके पीक येत असते की मग बहुसंख्य समाजच उरत नाही. पूर्ण समाधान या शब्दांच्या योगाने एकात्म राष्ट्राच्या प्रगतीला अडथळा येणार नाही ही त्याची मर्यादा हा अर्थ मला अभिप्रेत आहे.)

अशा रीतीने मुसलमानांची म्हणजे मुख्यत: मुस्लिम लीगची मागणी तत्त्वत: व अप्रत्यक्षपणे मान्य करून तिच्या विरोधाला काटशह देण्याचा काँग्रेसने प्रयत्न केला. या वेळेपर्यंत आपण अल्पसंख्य आहोत व आपले हितसंबंध सुरक्षित राहण्यासाठी आपणांस घटनात्मक तरतुदीची आवश्यकता आहे असा दावा मुस्लिम लीग करीत असे; पण आता मुसलमानांना केवळ अल्पसंख्य न मानता त्यांना हिंदूंच्या बरोबरीचे मानण्याची काँग्रेसची तयारी झाली होती व त्यास अनुसरून काँग्रेसचे त्यावर हे उत्तर होते. मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघातून निवडून आलेल्या प्रतिनिधींनी आपल्याला हव्या त्या मागण्या मांडाव्या व ते ज्या मागण्या करतील त्या जशाच्या तशा मान्य करण्याची हमी देण्यास काँग्रेस तयार होती.

परंतु आता मुस्लिम लीगची मागणी अधिक पुढे गेलेली होती. लीगने आपली भूमिकाच बदलली होती. हिंदुस्थान हे बहुसंख्याक हिंदूंचे राष्ट्र आहे व येथे मुसलमान हे एक अल्पसंख्य जमात आहेत व त्यांना संरक्षणाची गरज आहे ही भूमिका सोडून या देशात एक राष्ट्र आहे याऐवजी हिंदु व मुसलमान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे येथे आहेत व म्हणून त्यांची दोन स्वतंत्रच राज्ये झाली पाहिजेत अशी मुस्लिम लीगची नवी भूमिका निर्माण झालेली होती. पाकिस्तानचा विचार हा या भूमिकेवर आधारलेला होता. हिंदुस्थान हे एक राष्ट्र आहे हा विचारच मुस्लिम लीगने सोडला होता. त्यामुळे स्वतंत्र मतदार संघातून निवडल्या गेलेल्या मुसलमान प्रतिनिधींच्या कोणत्याही मागण्या मान्य करण्यास जरी काँग्रेस तयार होती तरी त्या मागण्या हिंदुस्थान हे एक राष्ट्र आहे या विचाराच्या कक्षेत असल्या पाहिजेत हा विचार त्यामागे गांधींना अभिप्रेत होता आणि तेच नेमके मुस्लिम लीगला अमान्य होते. त्यामुळे दोघांचे रस्ते एकमेकांपासून अगदी अलग झाले होते.

तरीही मुसलमानांचे समाधान करण्यास काँग्रेस कटिबद्ध झालेली होती म्हणून त्यांचे समाधान कशाशिवाय होणार नाही हे मुस्लिम लीगच्या लाहोर येथील

अधिवेशनात जो पाकिस्तानचा प्रस्ताव दि. २६ मार्च १९४० ला सर्वसंमत करण्यात आला त्यात नमूद करण्यात आले आहे. तो प्रस्ताव असा :

It is the considered view of this session of the All India Muslim League that no constitutional plan will be workable in this country or acceptable to the Muslims unless it is designated on the following basic principle viz. that geographically contiguous units are demarcated into regions which should be so constituted with such territorial adjustments as may be necessary that the areas in which the Muslims are numerically in majority as in the North Western and Eastern zones of India should be grouped together to constitute independent states in which the constituent units shall be autonomous and sovereign.

(हिंदुस्थानच्या ईशान्य व वायव्य भागात मुसलमानांची आहे त्याप्रमाणे बहुसंख्य मुसलमान वस्ती असलेले भौगोलिक प्रदेश वेगळे काढण्यात यावेत व–सोइस्कर सीमा निश्चितीसाठी–आवश्यक ती प्रादेशिक अदलाबदल करून अशा वेगळ्या केलेल्या विभागात संपूर्णपणे स्वतंत्र व सार्वभौम घटक राज्ये एकत्रित करण्यात यावीत. त्याशिवाय मुसलमानांचे समाधान होणार नाही व त्याशिवाय कोणतीही राज्यघटना सुरळीत चालणार नाही.)

या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मुस्लिम लीगला सबंध पंजाब, सिंध, सीमाप्रांत व बलुचिस्तान इ. हा हिंदुस्थानच्या वायव्येकडील प्रदेश व बंगाल व आसाम हे ईशान्येकडील प्रदेश पाकिस्तानात समाविष्ट व्हावयास हवे होते. त्यासाठी सीमा भागात केवळ सोयीस्कर सरहद्दी ठरविण्यासाठी किरकोळ स्वरूपाची थोडीफार अदलाबदल करण्यापुरती त्यांची तयारी होती इतकेच. अखंड हिंदुस्थानात राहावयाची त्यांची तयारी नव्हती. याच्या उलट अखंड हिंदुस्थानच्या मर्यादेत राहण्याच्या अटीवर मुसलमानांना ज्या काही तरतुदी हव्या असतील त्या देण्यास काँग्रेस तयार होती. दोघांच्या या भूमिकांत वस्तुतः केवळ आभासात्मक स्वरूपाचा फरक होता. मूलतः नव्हता, हे कोणासही दिसून येण्यासारखे होते. तरीही अहंकारातून निर्माण झालेल्या चिडाचिडीमुळे त्यांच्यात सहकार्य होऊ शकत नव्हते.

जिनांचा राग

मुस्लिम लीग हीच केवळ मुसलमानांची प्रतिनिधि आहे असे नसून काँग्रेसही हिंदुमुसलमान आदि सर्वांची प्रतिनिधि आहे हे दाखविण्याकरिता १९४० च्या रामगड काँग्रेसचे अध्यक्षपद मौ. अबुल कलाम आझाद यांना देण्यात आले होते. दिल्लीस एक आझाद मुस्लिम परिषदही भरविण्यात आली. त्यावरून मुस्लिम लीगच्या बाहेर व काँग्रेसच्या बाजूनेही मुसलमान आहेत असा देखावा दाखविता

येत होता. काँग्रेसच्या वतीने व्हाइसरॉय यांच्या बरोबर पत्रव्यवहारही आता आझादांच्या मार्फत होऊ लागला होता. जिनांना ते फार मोठे शल्य होते.

काही करून केंद्रीय सरकारात भागीदारी करण्यास काँग्रेस उत्सुक झालेली होती. त्यासाठी मौ. आझाद यांची एकसारखी खटपट सुरू होती. पुढे काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने आझाद यांनी व्हाइसरॉयांची भेट घेऊन सर्वपक्षीय केंद्र-सरकार बनविण्याची योजना स्वीकारण्याची तयारी दाखविली, तेव्हा त्या संबंधात मौ. आझाद यांनी जिना यांना दि. १२ जुलै १९४० ला एक तार पाठविली होती. त्यात त्यांनी जिनांना असे विचारले होते की, काँग्रेसच्या दिल्लीच्या ठरावात ज्या 'राष्ट्रीय' सरकारचा उल्लेख करण्यात आला आहे ते सरकार कोणत्याही एका पक्षाचे नाही हे निश्चित. संयुक्त मंत्रिमंडळ असाच त्याचा अर्थ आहे. तेव्हा हिंदुस्थानच्या फाळणीवर आधारभूत नसलेली कोणतीच हंगामी योजना स्वीकारावयाची नाही अशी लीगची भूमिका आहे कीं काय हे तारेने कळवावे.

आझादांच्या या तारेला जिनांनी पाठविलेले उत्तर मासलेवाईक आहे. त्यावरून आझादांच्या धोरणाविरुद्ध जिनांची किती तडफड झाली होती हे दिसून येते. जिना आपल्या उत्तरात म्हणाले : "तुमच्या म्हणण्यावर विश्वास नाही. हिंदी मुसलमानांचा तुमच्यावरील विश्वास संपूर्ण नष्ट झाला आहे. तुमच्याशी पत्रव्यवहाराने किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारे चर्चा करण्यास माझा नकार आहे. काँग्रेस ही राष्ट्रीय आहे हे परक्यांना भासविण्याकरिता तुम्हांला तिचे अध्यक्ष करण्यात आले आहे हे अद्यापिही तुम्ही ओळखू शकत नाही काय? तुम्ही धड हिंदूंचे प्रतिनिधि नाही आणि धड मुसलमानांचे प्रतिनिधि नाही. काँग्रेस ही हिंदु संस्था आहे. तुम्हांला जर काही स्वाभिमान असेल तर तत्काळ आपल्या जागेचा राजीनामा द्या. तुम्ही आतापर्यंत मुस्लिम लीगचे शक्य तेवढे अनिष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यात तुम्हांला अपयश आलेले आहे. तुम्ही तो नाद सोडून द्या." पुढे केंद्रात राष्ट्रीय सरकार बनविण्याच्या संबंधात व्हाइसरॉय यांनी जिनांना विचारले तेव्हा मुसलमानांना हिंदूंच्या बरोबरीने जागा मिळतील तरच लीग त्यात भाग घेण्यास तयार होईल असे जिनांनी त्यांस कळविले होते.

प्रांताप्रांतांतून हाती असलेली मंत्रिमंडळे काँग्रेसने बाहेरून केवळ दडपण आणण्याच्या आपल्या विचारसरणीस अनुसरून सोडून दिल्याने काँग्रेस वर्तुळात पोकळी निर्माण झाली होती. काँग्रेसच्या 'अभी के अभी' स्वातंत्र्याच्या मागणीला व्हाईसरॉयने वाटाण्याच्या अक्षता लावल्या आणि मुस्लिमलीगनेही लाथा झाडल्या. त्यामुळे काँग्रेस गोटात तीव्र निराशा पसरली. काय करावे हे त्यांना सुचेना!

अशा या केवळ अगतिक परिस्थितीत गांधींनी आपले निर्वाणीचे अहिंसावादाचे शस्त्र बाहेर काढले. युद्धकार्य हे बोलून चालून हिंसाचाराचे कृत्य असल्याने

व अहिंसा हाच आपला परम धर्म असल्याने आपण युद्धाला अहिंसेच्या कारणास्तव विरोध करणार अशी गांधींनी घोषणा करण्याचे ठरविले व त्यासाठी सविनय कायदेभंगाची तयारी सुरू केली. पण जेव्हा अहिंसा सत्याग्रहाला कसलेही बळ येण्याचे लक्षण दिसेना तेव्हा आपले तत्त्व नैतिक दृष्टचा किती उच्च आहे याचे प्रदर्शन त्यांनी सुरू केले ! गांधी (दि. १८।९।१९४०) म्हणतात : At the time when Britain is engaged in life and death struggle, we cannot resort to Satyagraha. A Satyagrahi does not believe in taking advantage of weakness of his opponent. Whatever we have to achieve, we will achieve through our own strength and that is why we have said that we do not want to embarrass Britain. (सध्या ब्रिटिश लोक युद्धाच्या जीवनमरणाच्या झगड्यात गुंतलेले असताना आम्ही सत्याग्रह करू शकत नाही. आपल्या प्रतिपक्षाच्या दुर्बळ स्थितीचा फायदा घेणे यावर सत्याग्रहीचा विश्वास असत नाही. आम्हांस जे काही मिळवावयाचे ते आम्ही आमच्या सामर्थ्यावर मिळवू, आणि म्हणून आम्ही या वेळी ब्रिटिशांना अडचणीत टाकू इच्छीत नाही.) आपल्या या धोरणाने इंग्रज प्रसन्न होतील असे गांधींना वाटत असावे !

गांधी ज्या अहिंसावादाचा प्रचार करू इच्छीत होते त्या त्यांच्या अहिंसा· वादाचे स्वरूप त्यांनीच हरिजन पत्रात (दि. २९।४।३९) स्पष्ट करून दाखविलेले होते. ते असे : True Ahimsa lay in running into the mouth of Himsa. If cows could be credited with intelligence it is conceivable that given a sufficient number of such cows who would run into the tiger's mouth, the latter would lose the relish for cow flesh and change his nature. (खरी अहिंसा ती की जी हिंसेच्या तोंडात प्रवेश करते. गाईंना ज्ञान आहे असे मानले तर पुरेशा संख्येने गाईंनी वाघाच्या तोंडात बळी जाण्याने वाघाची गोमांसाची रूचीच जाईल आणि त्याचा स्वभावही बदलेल.)

गांधींचा हा युक्तिवाद किती भ्रामक व भीषण होता, याचे वर्णन करण्याची गरज नाही. त्यांची केवळ अगतिक अवस्था यातून व्यक्त होत होती. गांधींची ही अहिंसा मरण्याचे तत्त्वज्ञान शिकविणारी आहे. जगण्याचे तत्त्वज्ञान शिकविणारी नाही. अशा अहिंसावादाचा पाठपुरावा कोण करणार ? व काँग्रेसवाले झाले तरी ते किती करणार ! पण ब्रिटिश सरकार जेव्हा ताबडतोब संपूर्ण स्वराज्य देण्याची निश्चित स्वरूपाची घोषणा करीना तेव्हा काँग्रेस गांधींना व गांधी अहिंसेला शरण गेले ! व हिंसेविरुद्ध प्रचार करण्याचा नागरिक स्वातंत्र्याचा आपला अधिकार बजावण्यासाठी त्यांनी युद्धविरोधी मोहीम सुरू केली. पण ती जेव्हा सामुदायिक स्वरूप घेईना तेव्हा त्यांनी तिला व्यक्तिगत कायदेभंगाचे स्वरूप दिले. युद्धाला व

युद्धातील हिंसाचाराला विरोध करण्याचा आपला नागरिक स्वातंत्र्याचा अधिकार बजावणे हे त्याचे स्वरूप होते ! पण गांधींचा हा अहिंसेच्या प्रचाराचा सत्याग्रह वाया गेला. त्यांना विनोबा हे एक काय ते खरे शिष्य लाभले !

गांधींचे हे विचार केवळ परवंचना करण्यासाठी होते पण त्यामुळे कोणीच फसत नव्हते. त्यांची व काँग्रेसची यापूर्वी काही अटींवर युद्धकार्यात सहकार्य करण्याची तयारी होती. त्या अटी इंग्रज मान्य करीनात तेव्हा त्यांना अहिंसेच्या तत्त्वाची आठवण झाली ! इंग्रज जर केंद्र शासनात काही सत्ता लगोलग देण्यास व स्वातंत्र्याचे हक्क काही निश्चित कालमर्यादा घालून मान्य करण्यास तयार झाले असते व हिंदुस्थानच्या घटनासमितीने तयार केलेल्या घटनेस ब्रिटिश सरकार मान्यता देईल अशी घोषणा करते, तर हे युद्ध नाझीवादाविरुद्ध आहे व स्वातंत्र्य व लोकशाहीच्या पुरस्कारासाठी आहे असे घोषित करून युद्धकार्यात भाग घेण्याची काँग्रेसची तयारी होती व त्यास गांधीजींचा पूर्ण आशीर्वाद होता. पण इंग्रजांच्या युद्धहेतूबद्दल काँग्रेसला विश्वास नव्हता व काँग्रेसच्या हेतूबद्दल म्हणजे युद्धकार्यात ती मनोभावे सहकार्य करील याविषयी इंग्रजांना विश्वास नव्हता. दोघेही अविश्वासाच्या वातावरणात परस्परांबद्दल संशय बाळगून होते. अशा परिस्थितीत आपले उदात्त तत्त्वज्ञान व ब्रिटिशांबद्दलचे प्रेम दोन्ही व्यक्त करण्यासाठी गांधींनी हा पवित्रा घेतला होता. त्यायोगे ब्रिटिशांना पाझर फुटेल अशी गांधीजींची समजूत असावी. पण तो केवळ भ्रम होता.

ब्रिटिश सरकार हेही या वेळी लोकांच्या सहकार्यासाठी गरजू होते. म्हणून मध्यंतरी व्हाइसरॉय यांनी १९३५ च्या केंद्रीय कायद्याचा भाग काही प्रमाणात लागू करण्याचाही विचार चालविला होता. तथापि एकदा टाकून दिलेल्या त्या भागाला स्पर्श करण्याचे काँग्रेस पक्षनेत्यांना कमीपणाचे वाटत होते. म्हणून ब्रिटिश सरकारने 'राष्ट्रीय' सरकार या नावाची त्याला फोडणी देऊन पाहिले. केंद्रीय सरकारच्या कार्यकारी मंडळात यापूर्वी चारदोन हिंदी लोक असले तरी त्यांना लोकप्रतिनिधिपणाचे महत्त्व नसे. अधिकृत लोकप्रतिनिधि असे कोणीच नसत. तथापि या वेळी निरनिराळ्या पक्षांचे प्रातिनिधिक लोक कार्यकारी मंडळात स्वीकृत करण्याची व त्यांची संख्याही वाढविण्याची व्हाइसरॉयने तयारी दर्शविली. मात्र त्यांजवर लोकप्रतिनिधि असल्याची अधिकृत कवचकुंडले चढविण्यास इंग्रजांची तयारी नव्हती. कारण तसे करण्याने घटनात्मक बदल होत होता. तो इंग्रजांना अपेक्षित नव्हता. त्यांचा उद्देश स्पष्ट होता. त्यांना युद्धाचा गाडा पुढे रेटावयाचा होता. त्या कामी त्यांना येथील जनतेचे साहाय्य हवे होते. जनतेचे प्रतिनिधि म्हणून त्यांची अधिकृतपणे निवड केली तर मुस्लिम लीगच्या व काँग्रेसच्याही धोरणामुळे राजकीय अडचणी नव्याने वाढण्याची शक्यता, व त्यायोगे युद्धकार्यात अडथळे येण्याचा अधिक

संभव, म्हणून काँग्रेसच्या आहारी न जाता तिचा होईल तेवढा उपयोग करून घेण्याची इंग्रजांची इच्छा व तयारी होती तर प्रत्यक्षात हुकमी अधिकार प्राप्त झाल्याचे स्पष्ट दर्शन झाल्याशिवाय केवळ विश्वासावर अवलंबून राहण्याची काँग्रेसची तयारी नव्हती. त्यामुळे तुझे माझे जमेना, तुझ्यावाचून गमेना अशी मोठी केविलवाणी स्थिति सरकारची व काँग्रेसचीही झाली.

राजकारणात अशी काही अगतिकता प्राप्त झाली म्हणजे गांधीजी आपला अहिंसावादाचा व चरखा खादीचा लोकांना उपदेश करीत व स्वराज्यसंपादनाचा हाच मार्ग आहे असे सांगत ! त्यामुळे त्यांच्या व काँग्रेसच्या सर्वच धोरणाला पोरकटपणा, हास्यास्पदता व बुवाबाजीचे थेर यांचे स्वरूप प्राप्त झाले.

काही करून राष्ट्रीय सरकार बनविले जावे व काँग्रेस पुन्हा सत्तारूढ व्हावी यासाठी काँग्रेसवाल्यांची धडपड सुरू होती, तर सरकारचे धोरणही दुसऱ्या महायुद्धातील यशापयशावर हेलकावे खात होते व मुस्लिम लीगलाही खूष करीत राहण्याचे होते. त्यामुळे काँग्रेसच्या हाती काही केल्या काही लागेना.

खरे असे होते की, काँग्रेसवाल्यांना सत्ता हवी होती. काही अटी पतकरूनही ती मिळवण्याच्या खटपटीत ते होते. पण त्यात यश येईना तेव्हा त्यांनी परत गांधींचे नेतृत्व स्वीकारून अहिंसावादाचा पुरस्कार करण्याचे अखेर ठरविले. या मार्गाने सरकारवर दडपण येईल अशी काँग्रेसनेत्यांना अपेक्षा असावी. निदान अन्य मार्ग त्यांना दिसत नव्हता. ते भलत्याच प्रतिष्ठेच्या आहारी गेले होते, गांधींच्या धोरणामुळे काँग्रेसवादी मंडळीत सतत चुळबूळ सुरू असे. गांधींचे धोरण त्यांना पटत नव्हते पण स्वतंत्रपणे काही धोरण ठरविण्याचे व स्वीकारण्याचे त्यांच्यात बळ नव्हते. नाकर्तेपणाची केवळ परमसीमा त्यांनी गाठली होती. या अगतिक अवस्थेचे विश्लेषण करताना गांधीजी लिहितात : The Congress has to make its choice. The temptation is irresistible. Congressmen can again become Cabinet Ministers or members at the Centre. They will have an insight into the war machine. . . If they have my way, I would have the Congress to resist the irresistible temptation and not grudge those who believe in the accepted method of filling all these posts . . For the Congress to merge itself into the stereotyped method would be a disaster of the first magnitude. (आपण आता कोणता मार्ग स्वीकारावा असा काँग्रेसवाल्यांपुढे प्रश्न आहे. त्यांनी अहिंसेचा मार्ग सोडला तर दुसरा एकच मार्ग त्यांच्यापुढे आहे. त्या मार्गाचा लोभ सोडणे मोठे अवघड आहे, त्या मार्गाने जावयाचे म्हटले म्हणजे काँग्रेसवाल्यांनी प्रांताप्रांतांतून पुन्हा प्रधानक्या घेणे किंवा केंद्रीय सरकारात भाग घेणे होय. त्यायोगे

युद्धशास्त्राचें तंत्र त्यांना अवगत होईल; पण काँग्रेस माझ्या मार्गाने जावयाचे ठरवील तर हे सगळे मोहपाश तिला आवरून धरावे लागतील. जर आजपर्यंतच्या चाकोरीतून जाण्याच्या मार्गाचाच अवलंब करण्याचें काँग्रेसने ठरविले तर ती एक महान् आपत्तीच ठरणार आहे.)

अखेर दि. १४ सप्टेंबर १९४० ला काँग्रेसनेते पुन्हा गांधींना शरण गेले व त्यांनी घोषणा केली की Congress is pledged under the leadership of Mahatma Gandhiji to nonviolence for the vindication of India's freedom. (भारताच्या स्वातंत्र्याच्या समर्थनार्थ काँग्रेस महात्मा गांधींच्या नेतृत्व-खाली अहिंसेला बांधलेली आहे.) तेव्हा सरकारने अनेक काँग्रेस नेत्यांना व त्यांच्या अनुयायांना स्थानबद्ध करून ठेवण्याचे धोरण स्वीकारले.

त्यामुळे काँग्रेसची चळवळ संपुष्टात आली व तिच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली. काँग्रेस व लीग यांच्यात एकमत होत नाही हे स्पष्ट झाले. तेव्हा ब्रिटिश सरकारने त्यांना सोडून त्यातल्या त्यात सर्वसामान्य लोकांचा ज्यांना पाठिंबा असेल अशा इतर काहींचा केंद्रीय कार्यकारी मंडळात समावेश करण्याचें ठरविले व लोकनायक माधव श्रीहरि उपाख्य बापूजी अणे यांची दिनांक १९।७।१९४१ ला केंद्रीय सभासद म्हणून नियुक्ति केली.

बापूजी अणे हे पूर्वी १९३१-३२ वर्षी काँग्रेसचे अध्यक्ष होतेच. पुढे काँग्रेसने १९३४ वर्षी मुसलमानांना जातवार मतदारसंघ देण्यास मान्यता दिल्यामुळे बापूजी अणे काँग्रेसमधून बाहेर पडले होते. तथापि त्यांची काँग्रेसनेत्यांबरोबरची बैठक मोडली नव्हती. काँग्रेसने असहकारितेचे व अहिंसावादाचे धोरण सोडून द्यावे व युद्धसहकार्याची भूमिका स्वीकारून केंद्रात राष्ट्रीय सरकार बनविण्याच्या कामी भाग घ्यावा, हेच देशाच्या व काँग्रेसच्या हिताचे आहे असे त्यांनी परोपरीने सांगून पुष्कळ प्रयत्न केले होते. पण काँग्रेस त्यास तयार झाली नाही. तेव्हा व्हाइसरॉयने नवे पर्याय काढले. त्यांनी बापूजींनाच विचारले व त्यांनी कार्यकारी मंडळात भाग घेण्याचे मान्य केले म्हणून त्यांची नेमणूक केली. त्याचबरोबर मोदी, हैदरी, राघवेंद्रराव व फेरोझखान नून यांचीही केंद्रीय कार्यकारी सभासद म्हणून नेमणूक करण्यात आली. हे काँग्रेस किंवा मुस्लिम लीग यांच्या बाहेरचे पण सर-कारच्या दृष्टीने बऱ्याच लोकांचा पाठिंबा असलेले लोक होते.

पुढे बापूजी अणे यांच्या प्रयत्नामुळे हळुहळू काँग्रेसच्या नेत्यांची हिंदुस्थान सरकारने १९४१ अखेरपर्यंत स्थानबद्धतेतून सुटका केली. त्याला आणखीही कारण घडले. जपान व अमेरिकाही या युद्धात १९४१ च्या अखेरीस पडली. जपानने दि. ८ डिसेंबर १९४१ ला अमेरिकेविरुद्ध युद्ध घोषित केले व जर्मनी व इटली यांनी अमेरिकेविरुद्ध युद्धाची घोषणा दि. १२ डिसेंबर १९४१ ला केली. त्यामुळे युद्धाच्या ज्वाळा जगभर पसरल्या.

जपानने युद्धघोषणा करताच त्याने आग्नेय आशियावर झडप घातली व चार महिन्यांत इंडोचायना, इंडोनेशिया, सयाम, मलाया, सिंगापूर, अंदमान जिंकून ते ब्रह्मदेशातून हिंदुस्थानच्या पूर्वसीमेवर उभे राहिले. त्यामुळे ब्रिटिश सरकार अधिकच अडचणीत आले. हिंदुस्थानचे युद्धकार्यात मनःपूर्वक सहकार्य मिळविण्याची त्यांना आता अधिकाधिक आवश्यकता वाटू लागली. त्यासाठी काँग्रेसची समजूत कशी काढावयाची व मुस्लिम लीगलाही कसे गोंजारावयाचे याचा विचार जोराने सुरू झाला. ब्रिटिश मंत्रिमंडळातील एक मंत्री क्रिप्स यांनी यासंबंधाने एक योजना तयार केली व तिला ब्रिटिश युद्ध मंत्रिमंडळाने पाठिंबा देऊन क्रिप्स यांना हिंदुस्थानातील पुढाऱ्यांशी बोलणी करण्यासाठी हिंदुस्थानात मार्च १९४२ मध्ये पाठविले. क्रिप्स यांच्या योजनेत काँग्रेसने व मुस्लिम लीगनेही या वेळेपर्यंत केलेली मागणी पुरी होण्याची शक्यता होती. मुस्लिम लीगला हिंदुस्थानातून फुटून निघावयाचेच असले तर त्यासाठी बाहेर पडण्याकरिता तीत दरवाजाही तयार ठेवण्यात आला होता. त्यामुळे ही योजना काँग्रेस व लीग या दोघांना मान्य होईल व युद्धकार्याला सर्वांचा एकमुखी पाठिंबा मिळेल अशी त्यांस आशा होती.

क्रिप्स योजना

सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांची योजना स्थूलमानाने पुढीलप्रमाणे होती:

(१) युद्धसमाप्तीनंतर लगेच हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल. त्यासाठी पार्लमेंट अवश्य तो कायदा करील.

(२) ब्रिटिश कॉमनवेल्थमधून हिंदुस्थानला फुटून बाहेर पडावयाचे असले तर त्यास तोही अधिकार राहील.

(३) युद्ध संपताच घटनासमिति नेमण्यात येईल. प्रांतिक विधिमंडळांच्या नव्या निवडणुका होतील. त्यांचे जे सभासद असतील त्यांच्या द्वारे त्यांच्या दशांश संख्येने प्रतिनिधि निवडून घेऊन त्यांची घटना समिति बनविण्यात येईल.

(४) ते जी घटना तयार करतील ती प्रत्येक प्रांताच्या विधिमंडळापुढे मांडण्यात येईल. ज्यांना ती मान्य असेल अशा प्रांतांचे संघराज्य निर्माण होईल. जर काही प्रांतांना ती घटना मान्य नसेल तर त्यांनाही वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल. आपली स्वतंत्र घटना बनविण्याचे त्यांनाही स्वातंत्र्य राहील.

(५) घटना समितीत संस्थानांचेही यथाप्रमाण प्रतिनिधि घेण्यात येतील.

(६) युद्ध चालू आहे तोपर्यंत व्हाइसरॉयचे कार्यकारी मंडळ १९१९ च्या घटनेप्रमाणेच राहील. मात्र त्यात हिंदुस्थानातील काँग्रेस, मुस्लिमलीग, हिंदुसभा व इतर हितसंबंधी यांच्यातून मंत्र्यांची नेमणूक करण्यात येईल. युद्धकार्याला सर्वतोपरी मदत करण्याचे या कार्यकारी मंडळाचे धोरण राहील. सरसेनापति मात्र ब्रिटिशच राहील.

(७) नवी घटना तयार होताच संस्थानांच्या संबंधातील ब्रिटिशांचे त्यांच्याशी असलेले संबंध संपुष्टात येतील.

क्रिप्स यांनी आपली योजना काँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदुसभा यांच्या व इतर पुढाऱ्यांना वेगवेगळे बोलावून त्यांच्यापुढे मांडली व त्यावर चर्चा केली.

हिंदुमहासभेचा फाळणीला विरोध

स्वा. सावरकरांनी प्रांतांना फुटून निघण्याच्या योजनेला आपला तीव्र विरोध व्यक्त केला व योग्य वेळी हा विरोध करण्याचा आपला हक्क राखून ठेवून केंद्रीय राष्ट्रीय सरकारात भाग घेण्याची तयारी दर्शविली. काँग्रेसचे नेते गांधीजी यांनी या योजनेचे वर्णन बुडत्या बँकेवरील पुढील मुदतीचा चेक (post dated cheque on a crashing bank) असे केले व आजच सर्व सत्ता आमच्या हाती देऊन तुम्ही चालते व्हा असे सुचविले. जपानची स्वारी हिंदुस्थानचे दार ठोठावीत होती व इंग्रजांचा सर्व आघाड्यांवर पराभव होत होता या पार्श्वभूमीवर गांधींची भिस्त होती. पण ब्रिटिशांना युद्ध जिंकावयाचे होतें; हिंदुस्थान सोडून पळून जावयाचे नव्हते व म्हणून त्यांनी क्रिप्स यांच्या बरोबर ही योजना देऊन त्यांना इकडे पाठविले होते. पण काँग्रेसने भलत्याच अपेक्षेने ती योजना नाकारली. त्यामुळे क्रिप्स यांनी ती परत घेतली. वाटाघाटी मोडल्या.

आता राजकारणात पुन्हा पोकळी निर्माण झाल्याने काँग्रेस नेते पुन्हा अडचणीत सापडले. त्यांनी याही वेळी चालून आलेली संधि वाया घालविली होती अशी संधि या आधी १९३९ वर्षी आली होती। त्याहूनही विशेष अशी १९४२. साली आली. पण भलत्याच अपेक्षा बाळगून काँग्रेसने त्या दोन्ही वाया घालविल्या होत्या. त्यामुळे आता त्यांच्यापुढे दारुण निराशा पसरली होती.

अशा परिस्थितीतून मार्ग काढण्याकरिता राजाजी पुढे झाले. त्यांनी मुस्लिम लीगचे समाधान केल्याशिवाय काँग्रेस व लीग यांचे सहकार्य होणार नाही व त्याशिवाय केंद्रीय राज्यकारभारात सत्ता मिळणार नाही हे लक्षात घेऊन लीगचे समाधान करण्याचा मार्ग म्हणजे पाकिस्तानला मान्यता देणे हाच एकमेव असल्याने त्यांनी पाकिस्तानच्या विचारास मान्यता देण्याचे ठरविले व पाकिस्तानच्या तत्त्वास मान्यता देणारा एक ठराव तयार करून त्यांनी तो मद्रास विधिमंडळाच्या काँग्रेस सभासदांच्या बैठकीपुढे संमतीसाठी २५ एप्रिल १९४२ ला मांडला व तेथे तो सर्वसंमत करून घेऊन काँग्रेसच्या अखिल भारत समितीकडे मान्यतेसाठी पाठविला.

राजाजींची योजना

राजाजींची योजना पुढीलप्रमाणे होती :

(१) लीगने हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मागणीस पाठिंबा देऊन तात्पुरते सरकार बनविण्यासाठी काँग्रेसबरोबर सहकार्य करावे.

(२) युद्ध समाप्तीनंतर हिंदुस्थानच्या वायव्य व ईशान्य प्रदेशातील निव्वळ मुसलमान बहुसंख्य वस्तीचे जिल्हे वेगळे काढण्यासाठी समिति नेमावी. वेगळचा काढण्यात आलेल्या भागात सार्वत्रिक मतदानाने हिंदुस्थानापासून फुटून निघावयाचे कीं काय ते ठरवावे.

(३) अशा प्रांताने बहुमताने हिंदुस्थानापासून फुटून निघावयाचे ठरविले तर त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या वेळी सीमेवरील जिल्ह्यांनाही त्यांनी हिंदुस्थानात सामील व्हावयाचे कीं पाकिस्तानात सामील व्हावयाचे याबाबत स्वयंनिर्णयाचा हक्क देण्यात यावा.

हिंदुस्थानापासून फुटून निघावयाचे ठरले तर संरक्षण, व्यापार, वाहतूक आणि इतर आवश्यक बाबीसाठी उभयतांचे करारमदार व्हावेत.

(५) जनतेची अदलाबदल केवळ स्वखुषीवरच होईल.

राजाजींच्या या योजनेला कॉंग्रेसच्या ऑल इंडिया कमिटीच्या एप्रिल १९४२ अखेरीस भरलेल्या सभेत तीव्र विरोध करण्यात आला. राजाजींची योजना १२० वि. १५ मतांनी नापास करण्यात आली आणि त्याच सभेत बाबू जगत नारायण लाल यांचा अखंड हिंदुस्थानचा प्रस्ताव संमत करण्यात आला. त्यात असे म्हटले होते की, भारतीय संघराज्यातून किंवा फेडरेशनच्या घटनेतून कोणत्याही प्रांताला किंवा एखाद्या प्रादेशिक विभागाला बाहेर पडण्याची संधि देऊन हिंदुस्थानचे एकसंधत्व नष्ट करण्याची कोणतीही सूचना ही या देशातील जनतेच्या हितसंबंधांना घातक असून अशा कोणत्याही सूचना कॉंग्रेसला मान्य नाहीत.

राजाजी योजनेला गांधीचा विरोध

राजाजींच्या या सूचनेला आरंभी गांधींनीही विरोधच व्यक्त केला होता. त्यांनी ' हरिजन ' मध्ये राजाजींच्या या योजनेच्या संबंधात आपले मत व्यक्त करताना म्हटले होते की " माझ्या मते राजाजी चुकत आहेत. देशाच्या फाळणीची सूचना करून ते एक आभासात्मक वातावरण निर्माण करीत आहेत. त्यातून नव्या संघर्षाची बीजे पेरली जात आहेत. हिंदुस्थानची दोन भागांत फाळणी करणे हे अराजकापेक्षाही वाईट आहे. हे विच्छेदन सहन होण्यासारखे नाही. मी तर असे म्हणेन की देशाचे तुकडे करण्याआधी माझे तुकडे करा. मोंगलांनी, की ज्यांनी दोन शतके येथे राज्य केले, त्यांनीही जे केले नाही ते करता कामा नये.

" देशाचा प्रत्येक घटक विभाग जर स्वयंनिर्णयाचा हक्क सांगू लागेल तर येथे एक राष्ट्र असे राहणारच नाही. आणि मग स्वातंत्र्यही राहणार नाही. मी स्पष्ट म्हटले आहे की पाकिस्तानचा विचार हे थोतांड आहे. तो टिकू शकणार नाही. त्याला आकार देण्याचा प्रयत्न सुरू झाला म्हणजे त्यातील अव्यवहार्यता लक्षात येईल. "

काँग्रेसच्या राजकारणाचा डाव पुन्हा कुजला तेव्हा त्यांना पुढे काय करावे याचा मार्ग दिसेनासा झाला होता. काँग्रेसवाले अतिशय बेचैन झाले होते. देशाच्या फाळणीचे तत्त्व स्वीकारण्यास त्यांच्या मनाची या वेळपर्यंत तयारी झाली नव्हती. राजाजींनी तशी तयारी दाखविली तेव्हा इतर काँग्रेसवाल्यांनी त्यांना मोडून काढले होते. आता पुन्हा चळवळीशिवाय त्यांजपुढे दुसरा मार्ग नव्हता. अहिंसेचा प्रयोग होऊन व फसून चुकला होता. त्यामुळे काँग्रेस गोटात तीव्र निराशा पसरली होती. अशा वेळी गांधीनी पुन्हा नव्याने चळवळीला उधाण आणावयाचे ठरविले.

वर्धा येथे दि. १४ जुलै १९४२ ला काँग्रेसच्या अ. भा. कार्यकारी मंडळाची सभा झाली. या सभेत ब्रिटिश सरकारला निर्वाणीचा खलिता पाठविण्याचे ठरले. गांधींच्या नेतृत्वाखाली लढ्याची आखणी करण्यात आली. जपानी आक्रमणाचे संकट दाराशी येऊन ठेपले होते. ते लक्षात घेऊन ब्रिटिशांनी हिंदुस्थानावरील आपली सत्ता सोडून द्यावी, त्यांची येथे साम्राज्यसत्ता असल्यामुळे जपानी आक्रमणाला प्रतिकार करण्यासाठी जनतेत जो उत्साह असावयास पाहिजे तो निर्माण होऊ शकत नाही असा काँग्रेसचा युक्तिवाद होता. ब्रिटिश सत्ता येथून निघून गेली तर येथे अराजक निर्माण होईल त्याची वाट काय या प्रश्नाला काँग्रेसचे उत्तर आमचे आम्ही पाहून घेऊ असे होते.

ब्रिटिश सरकार असे सहजी सत्ता सोडून जाणार नाही व त्यासाठी लढा करणे प्राप्त आहे हे लक्षात घेऊनच हा ठराव करण्यात येत होता. पण ब्रिटिश सत्ता सोडून गेले तर येथील राज्यकारभाराची व्यवस्था काय या प्रश्नाला उत्तर देण्याची आवश्यकता होती. त्याशिवाय जनतेतील सर्वसामान्य लोकमत चळवळीला अनुकूल होण्याची शक्यता नव्हती. म्हणून त्यावर कांग्रेसने असे उत्तर दिले की The Provisional Government can only be formed by the cooperation of the principal parties and groups in the country. It will thus be a composite government representative of all sections of the people of India. (देशातील प्रमुख राजकीय पक्ष आणि गट यांच्या सहकार्याने तात्पुरते सरकार बनविता येईल. हिंदुस्थानातील सर्व लोकांच्या प्रातिनिधिक स्वरूपाचे ते सरकार असेल.) या वेळी देशातील प्रमुख राजकीय पक्ष म्हणजे काँग्रेस, मुस्लिम लीग व हिंदुमहासभा हे ब्रिटिश सरकारनेही क्रिप्सच्या योजनेच्या वेळी मान्य केलेले होते.

तथापि काँग्रेसच्या या तात्पुरत्या सरकारात मुस्लिम लीग येण्याची शक्यता नव्हती. आधी फाळणीला काँग्रेसने मान्यता दिल्याशिवाय व त्यासाठी आवश्यक त्या तरतुदी केल्याशिवाय मुस्लिम लीग सहकार्य करणार नाही हे काँग्रेस धरून चालली होती. अद्याप देशाच्या फाळणीला उघड मान्यता देण्याइतका काँग्रेस

नेत्यांचा धीर चेपला नव्हता. म्हणून मुस्लिम लीगच्या समाधानासाठी काँग्रेसने पुढील खुलासा केला :

The future constitution, according to the Congress view, should be a federal one with the largest measure of autonomy for the federating units with the residuary powers in these units.

(काँग्रेसच्या मताप्रमाणे भारताची भावी राज्यघटना संघ राज्याची राहील. तिच्यात घटक विभागांना जास्तीत जास्त स्वायत्तता राहील आणि शेषाधिकारही घटक विभागांकडेच राहतील.) जिनांना जे पाकिस्तान हवे होते ते या योजनेने काँग्रेसने पर्यायाने मान्य केले होते. तरीही मुस्लिम लीग काँग्रेसशी तात्पुरते सरकार बनविण्याच्या कामी सहकार्य करील याची गांधींना मुळीच खात्री नव्हती. म्हणून गांधींनी आणखी चार पावले पुढे जाण्याचे ठरविले, व त्यांनी या देशातील राज्यकारभाराची सर्व सत्ता मुस्लिम लीगच्या हाती देण्याची तयारी दर्शविली. या संबंधात जिनांना लिहिलेल्या पत्रात गांधी म्हणतात :

In all sincerity let me explain it again that if the Muslim League cooperated with the Congress for immediate independence subject of course to the provision that independent India will permit the operations of the Allied armies in order to check the Axis aggression and thus to help China and Russia, the Congress will have no objection to the British Government transferring all the powers it today exercises to the Muslim League on behalf of the whole of India including the so-called Indian India. The Congress will not only not obstruct any Government which the Muslim League will form on behalf of the people but will even join the government. This is meant in all seriousness and sincerity.

(जर्मन गटाच्या राष्ट्रांचे आक्रमण थोपविण्यासाठी व अशा रीतीने चीन व रशिया यांना मदत करण्यासाठी दोस्त राष्ट्रांच्या सैन्याच्या हालचालींना हिंदुस्थानात परवानगी राहील या अटीवर ब्रिटिशांकडून ताबडतोब स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामी मुस्लिम लीगने काँग्रेसशी सहकार्य केले तर संस्थानी प्रदेशासह सर्व हिंदुस्थानच्या वतीने ब्रिटिशांच्या हाती असलेली येथील सर्व सत्ता मुस्लिम लीगच्या हवाली करण्यास काँग्रेसचा विरोध असणार नाही एवढेच नव्हे तर लीगने बनविलेल्या मंत्रिमंडळात ती सहभागीही होईल. हे मी अत्यंत प्रामाणिकपणे व गंभीरपणे लिहीत आहे.)

यावरून काँग्रेस सत्तेसाठी किती अधीर झाली होती हे दिसून येते. काँग्रेसच्या मुस्लिम अनुनयाच्या या धोरणास हिंदुमहासभेचा तीव्र विरोध होता. हिंदुसभेचे धोरण शुद्ध राष्ट्रवादावर उभारलेले होते. ब्रिटिश सरकार काँग्रेसची तावडतोबीच्या स्वातंत्र्याची मागणी मान्य करणार नाही व काँग्रेसला लढा करावा लागेल हे उघड दिसत होते. यासाठीही तिला देशातील सर्वांचे सहकार्य हवे होते. तसेच क्रिप्स योजनेनुसार तात्पुरते मंत्रिमंडळ बनविण्याची संधि कधी निर्माण झाली तर त्यात हिंदुसभा ही एक भागीदार होणारी होती. व काँग्रेसनेही तशी सर्वपक्षीय मंत्रिमंडळाची घोषणा जाहीर केली होती. हे सर्व लक्षात घेऊन स्वा. सावरकरांनी हिंदुसभेच्या वतीने काँग्रेस नेत्यांपुढे सहकार्यासाठी आपल्या अटी सुचविल्या.

दि. २ ऑगस्ट १९४२ दिवशी स्वा. सावरकर यांचे त्या संबंधात एक ऐतिहासिक भाषण पुण्यास झाले. काँग्रेसने स्वातंत्र्यासाठी करेंगे या मरेंगे चळवळ करण्याची योजना आखली होती. व सर्व देशाने या चळवळीस साहाय्य करावे अशीही काँग्रेसनेत्यांनी इच्छा व्यक्त केली होती. त्यास उद्देशून सावरकरांनी काँग्रेसच्या या आवाहनास प्रतिसाद देताना हिंदुमहासभेच्या वतीने पुढील अटी मांडल्या :

(१) काँग्रेसने अखंड हिंदुस्थान राखण्याचे आश्वासन द्यावे. कोणत्याही परिस्थितीत देशाच्या फाळणीस मान्यता देणार नाही अशी स्पष्ट घोषणा करावी.

(२) कोणत्याही प्रांताला भारतातून फुटून निघण्याचा अधिकार असणार नाही असे स्पष्ट घोषित करावे.

(३) बहुसंख्य व अल्पसंख्य समाजांना विधिमंडळांतून त्यांच्या त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वत्र प्रतिनिधित्व राहील असे स्पष्ट करावे.

(४) सार्वजनिक सेवांत लायकीनुसार भरती केली जाईल या तत्वास मान्यता द्यावी.

(५) हिंदुसमाजाचे प्रतिनिधित्व करणारी संस्था हिंदुमहासभा आहे हे मान्य करावे व हिंदूंच्या हक्कसंबंधात तिच्या संमतीशिवाय काही न करण्याची हमी द्यावी.

(६) अल्पसंख्याकांना त्यांची भाषा, धर्म, संस्कृति इत्यादि बाबतींत परिणामकारक संरक्षणाची सर्वत्र तरतूद करण्यात यावी. मात्र असे करताना संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेत म्हटल्याप्रमाणे, राज्यात अंतर्गत पोटराज्ये निर्माण करून बहुसंख्याकांच्या न्याय्य हक्कांवर अतिक्रमण न करण्याची हमी द्यावी.

(७) नव्या राज्यघटनेत शेषाधिकार केंद्रीय सरकारच्याच हाती राहतील हे मान्य करावे.

या अटी काँग्रेस मान्य करण्यास तयार असली तर तिच्याशी सहकार्य करून तिच्या आंदोलनातही हिंदुमहासभा सहभागी होईल असे सावरकरांनी घोषित केले. पण गांधींनी किंवा अन्य काँग्रेस नेत्यांनी तिकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. काँग्रेसला या

अटी मान्य होण्याची शक्यताच नव्हती. मुस्लिम लीगच्या समाधानासाठी याच्या नेमक्या उलट अशा कित्येक गोष्टी काँग्रेसने आधीच मान्य केलेल्या होत्या.

काँग्रेसने हिंदुसभेच्या अटींची दखल घेतली नाही व मुस्लिम लीगने काँग्रेसच्या अटींची दखल घेतली नाही. अशा स्थितीत काँग्रेसने लढा करावयाचे ठरविले तेव्हा ब्रिटिश सरकारने तो मोडून काढण्याची तयारी केली. दि. ८ ऑगस्टला काँग्रेसच्या अखिल भारतीय समितीच्या सभेत चलेजाव धोरणाची घोषणा करण्यात आली. या वेळी बापूजी अणे केंद्रीय कार्यकारी मंडळात होते. काँग्रेसचे धोरण चुकत आहे हे त्यांना दिसत होते. पण ते काही तिला परावृत्त करू शकले नाहीत.

'करेंगे या मरेंगे' हे या चळवळीचे सूत्र होते. काँग्रेस नेत्यांचे हे धोरण ठरताच गांधींना व इतर काँग्रेस नेत्यांना सरकारने पुन्हा स्थानबद्ध करून तुरुंगात ठेवले.

या वेळी रेल्वेचे रूळ उखडणे, तारा तोडणे, पूल पाडणे अशाही गोष्टी अहिंसेत जमा होतात असे गांधींनी काँग्रेसवाल्यांना सांगितले असल्याचे काँग्रेसचे एक वेळचे अध्यक्ष पट्टाभिसीतारामय्या यांनीच पुढे उघड केले. गांधींना व काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाला अटक झाल्यावर इतर काँग्रेस नेत्यांनी दोन महिने काही हिंसक कृत्ये केली तेव्हा सरकारने अनेकांना तुरुंगात डांबले. १९४२ च्या अखेरीपूर्वीच या चळवळीचा सर्व जोर संपून गेला.

पुढे गांधींनी तुरुंगात असताना २१ दिवसांचे उपोषण आरंभिले. त्यांनी उपोषण करू नये असे सरकारने त्यांस सुचविले होते. तथापि त्यातून त्यांनी केले व त्यात त्यांस मरण आले तर त्याची जबाबदारी सरकारवर राहणार नाही असेही सरकारने घोषित केले. तेव्हा गांधींचे व आपले पूर्वापार संबंध लक्षात घेऊन बापूजी अणे यांनी दि. १७।२।४३ ला केंद्रीय कार्यकारी सभासदत्व सोडले. नंतर सरकारने त्यांच्या जागी डॉ. नारायण भास्कर खरे यांची दि. ७।५।४३ ला नेमणूक केली. पुढे त्यांच्याच विशेष प्रयत्नाने नेहरू प्रभृति काँग्रेस नेत्यांची १९४५ वर्षी स्थानबद्धतेतून सुटका झाली.

गांधी पुण्यास आगाखान वाड्याच्या तुरुंगात असतानाच गांधींचे कार्यवाह महादेवभाई देसाई व त्यांच्या पत्नी कस्तुरबा यांचे निधन झाले. जेव्हा गांधीही पुढे आजारी पडले, तेव्हा सरकारने केवळ प्रकृतीच्या कारणास्तव दि. ६ मे १९४४ ला त्यांची सुटका केली.

(१०)

हिंदुमहासभेची भूमिका

दुसऱ्या महायुद्धाच्या संबंधात हिंदुमहासभेचे धोरण स्वा. सावरकरांनी पुणे येथील आपल्या दि. ३१ जुलै १९४० च्याच प्रकट भाषणात स्पष्ट केले होते. ते म्हणाले : आमचा या युद्धाला नैतिक पाठिंबा नाही. पण प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वानुसार संरक्षणापुरता संधि राहील. या सहकार्याचे स्पष्टीकरण करताना ते म्हणाले की " महासभेचे प्रतिनिधित्व सरकार मान्य करते कीं नाही या बाबतीत एकदा अखेरचे हो किंवा नाही हे उत्तर घ्यावयाचे आहे. ते मान्य करून घेण्यासाठी जो उपाय सुचेल तो योजून आपले म्हणणे मान्य करून घेण्यासाठी कष्ट केले पाहिजेत. परिस्थितीच अशी निर्माण होत आहे की जो जो दिवस जातो आहे तो तो तुम्हांला स्वराज्याच्या अधिकाधिक जवळ नेत आहे. हे लक्षात ठेवून आपण आपली धोरणे आखली पाहिजेत.

हिंदुस्थानच्या सध्याच्या परिस्थितीत, या कोटीकोटींच्या देशात, महासभा काय, राष्ट्रसभा काय किंवा महाराष्ट्रसभा काय, यांनी काही योजना आखावी अशी आज परिस्थिति नाही. येऊन जाऊन काय तर कोणाचा कार्यक्रम किती पंगु याची तुलना करावयाची ! जन्मजात अंधळ्यांनी इतरांच्या अंधत्वाशी तुलना करण्यासारखेच हे आहे. या पंगुपणाचे आपण सर्वचजण भागीदार आहोत. तो पंगूपणा घालविण्याचे प्रामाणिक प्रयत्न आपण सर्वांनी केले पाहिजेत, मग ते प्रयत्न फॉरवर्ड ब्लॉक म्हणून करा किंवा बॅकवर्ड ब्लॉक म्हणून होऊ द्यात.

आपण पंगु आहोत याचा अर्थ आपण उद्योग सोडले पाहिजेत असा मात्र नाही. 'पंगुं लंघयते गिरिम्' असेही घडू शकते. हिटलरचेच उदाहरण घ्या ना. वीस वर्षांपूर्वी हाच हिटलर तुरुंगात पडला असताना, देशाची स्थिति पाहून ढसाढसा रडत होता. त्याने आपल्या आत्मचरित्रात हे लिहून ठेवले आहे. तो मनाचा अत्यंत हळवा होता. अनेक वेळा त्याच्या आयुष्यात हे करू कीं ते करू असे प्रसंग उद्भवले आहेत आणि त्याला रडू कोसळले आहे. त्याने आत्महत्येचेही तीनदा प्रयत्न केले होते. आजचा जर्मनी बारा वर्षांपूर्वी हिंदुस्थानप्रमाणेच पंगु होता. आज ज्याप्रमाणे महायुद्धाच्या राजकारणाची चर्चा करावयाची आपल्याला लाज वाटते त्याचप्रमाणे तेव्हाच्या जर्मनीला युरोपीय राजकारणाची चर्चा करायला लाज वाटत असे; पण हिटलरच्या प्रयत्नांनी ते राष्ट्र वर आले. जर्मनीच्या उदाहरणाप्रमाणे हे राष्ट्र देखील तसेच प्रयत्न करीत गेले तर आज ना उद्या आपण गिरि उल्लंघू शकू. आपल्या राष्ट्राची परंपरा पाच हजार वर्षे नुसती जिवंत नाही, तर नांदत आलेली आहे.

हिंदुमहासभा बोलून चालून येवढ्याकरिता प्रवृत्त झाली आहे की या राष्ट्रात नांदत असलेले खरे राष्ट्र जे हिंदुराष्ट्र ते कायम राहिले पाहिजे. हे धोरण कोणाला आकुंचित वाटो, कोणाला विस्तृत वाटो, पण हिंदुमहासभेचे धोरणच समजले नाही असे मात्र यापुढे कोणालाही म्हणता येणार नाही.

मी जगाच्या पुढे मान ताठ करून हीच प्रतिज्ञा घेतली आहे. या जगात हिंदूंचा कोणी तरी वाली असलाच पाहिजे.

जगताच्या सगळ्या राजकारणाची कसोटी, सत्याची कसोटी, असत्याची कसोटी, हिंसेची कसोटी, अहिंसेची कसोटी, ही एकच असली पाहिजे. ती कसोटी म्हणजे हिंदूंचे कल्याण होईल ते सत्य, हिंदूंचे अकल्याण ते असत्य.

जगताचे काय होईल, मानव्याचे काय होईल, हे विचार मुख्य नाहीत. तेही विचार आहेत, पण ते विचार दुय्यम आहेत. सूर्य गेला तर काय होईल ? सूर्य विझला तर सूर्य विझला म्हणून मला दुःख होणार नाही, तर हिंदूंना प्रकाश मिळणार नाही म्हणून मला दुःख होईल. आजकाल आपले कल्याण विसरणे हाच न्याय ठरला आहे ! स्वतःची माणुसकी विसरणे हेच माणुसकीचे लक्षण झाले आहे!

महायुद्धाकडे हिंदुमहासभा या एकाच दृष्टिकोनाने बघते. महायुद्धामुळे हिंदूंचा किती लाभ होईल आणि किती हानि होईल. महायुद्धाबाबत हिंदुमहासभेने याच दृष्टीने ठराव केला आहे. याउलट राष्ट्रीय सभेच्या वतीने गांधींनी लोकशाही राष्ट्रांवर संकट आले असताना त्यांना अडविणे योग्य नाही, ते संकटात असताना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न मला सोडवावयाचा नाही असे म्हटले आहे. What is even the Freedom of India if Britain and France lose their Freedom ? (ब्रिटन आणि फ्रान्स यांचेही स्वातंत्र्य नष्ट झाले तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे काय होय !) असे गांधी म्हणतात. नेहरूही चीनमधून नुकतेच परत आले, त्यांनीही नाझीझम प्रभृति हुकुमशाही वादांचा विरोध करणे हे हिंदुस्थानचे एकमेव ध्येय असल्याचे घोषित केले. या दोन प्रमुख पुढाऱ्यांनी हे जे धोरण प्रदर्शित केले त्याचेच प्रतिध्वनि इतरांच्या तोंडून दूरध्वनिक्षेपित झाले आहेत.

पण महासभेने या परिस्थितीत निश्चित भूमिका मांडणारा ठराव केला आहे. चालू युद्ध हे इतर राष्ट्रांच्या स्वातंत्र्याकरिता चालले आहे, लोकशाहीकरिता ते आहे, हे युद्ध नैतिक आहे ही गोष्ट हिंदुमहासभा अमान्य करते. सर्वचजण स्वतःच्या संरक्षणासाठी स्वतःच्या राष्ट्राच्या स्वार्थासाठी लढत आहेत. कोणी काही दहावा अवतार होऊन जगाच्या उद्धारासाठी लढत नाहीत.

जर्मनीने पोलंडवर स्वारी केली तेव्हा प्रे. रुझवेल्ट यांनी हिटलरला तार करून, हे कृत्य योग्य नाही असे कळविले होते. मीही पण प्रे. रुझवेल्ट यांना तार धाडून हिटलरप्रमाणेच हिंदुस्थानच्या बाबतीत तुम्ही इंग्लंडला तार करा असे कळविले होते. त्या तारेवरून तेथील वृत्तपत्रांतून अग्रलेखही आले होते.

महासभेने आपले धोरण काय राहील ते आपल्या दुसऱ्या ठरावात सांगितले आहे. हिंदुस्थानच्या बाबतीत व्हाईसरॉय, भारतमंत्री म्हणत आहेत की, तुम्ही अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडवा म्हणजे आम्ही तुम्हांला स्वराज्य देतो. हे म्हणणे वांझेच्या मुलीच्या लग्नासाठी पैसे देतो म्हणण्यासारखेच आहे. पोलंडच्या बाबतीत हिटलरनेही चेंबर्लेनला सांगितले की, तुम्ही आधी हिंदुस्थान मुक्त करा म्हणजे मी पोलंड मुक्त करतो. जगामध्ये प्रत्येक राष्ट्र आपल्या लाभासाठी सर्व काही करीत आहे.

साम्राज्ये असलेली राष्ट्रे साम्राज्य रक्षणासाठी, तर साम्राज्ये नसलेली राष्ट्रे ती संपादन करण्यासाठी लढत आहेत. नैतिक दृष्टीने साम्राज्यसत्तेला पाठिंबा देण्यास आम्ही बांधलेले नाही. तुम्ही तुमचे जीव वाचविण्याकरिता प्रयत्न करीत आहां. आमचे जीव वाचविण्याकरिता आमच्या विचारांच्या चौकटीत बसत असेल, तर आम्ही काही सहकार्य करू.

पाकिस्तानच्या संबंधात सावरकर म्हणाले :

मुसलमानांच्या पाकिस्तानच्या योजना आजच्या नाहीत. त्या १५–२० वर्षांपूर्वीपासूनच्या आहेत. किंबहुना त्या अहमदशहा अबदालीच्या काळापासून आहेत. या पाकिस्तानच्या कल्पनेला जे आजचे नित्याचे स्वरूप आलेले आहे ते या युद्धामुळे आलेले आहे. मी तुम्हांला सांगतो, या बाबतीत इंग्लिश मुत्सद्द्यांशी बोलणीचालणी होऊन अलिखित करार झालेले आहेत. त्यांच्या साहाय्याबद्दल इंग्लिशांची हानि न होईल अशा बेताने व हिंदूंची कितीही हानि झाली तरी मुसलमानांच्या मागण्या पुरविण्यात येतील. यातून यादवीचे प्रकरण उद्भवण्याचाही संभव आहे.

युद्धपरिस्थितीच्या आजच्या घडीकडे वळून सावरकर म्हणाले : हिटलर कॅलेपर्यंत येऊन पोचला आहे. एक वर्तमानपत्र म्हणते, त्याने कॅले घेतले. दुसरे पत्र कॅले घेतले नाही म्हणून म्हणते, तर तिसरे पत्र तो कॅलेपर्यंत पोचणार आहे असे म्हणते. ब्रिटिश मुत्सद्दी लढाईच्या भयंकर पेचात सापडलेले आहेत. या वेळी गांधीजींनी सांगितले की हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न दुय्यम आहे.

I don't want to embarrass the British. कोणाची लढाई आहे ? ही काय गांधींची लढाई आहे ? He did not like to embarrass the Nizam also ! निजामालाही अडचणीत टाकण्याची गांधींची इच्छा नव्हती. मग तिकडे हिंदूंचे काहीही होवो !

व्हाईसरॉयसाहेबांनी आता नुकतीच विजयासाठी प्रार्थना करा असे सांगितले आहे. प्रार्थना करायला मनुष्य केव्हा लागतो ? प्रार्थना करायला सांगणे हे काही मोठे शुभ लक्षण नव्हे ! आतापर्यंत ख्राईस्टची आठवण कोणालाच नव्हती. मला तर ख्राइस्टची कीव येते. कारण जर्मन व अँग्लोफ्रेंच ही त्याची दोन्ही कोकरे आपल्याला विजयप्राप्ति व्हावी म्हणून त्याची प्रार्थना करीत आहेत ! एका कानाने तो हिटलरची प्रार्थना ऐकत आहे तर त्याच्या दुसऱ्या कानात इंग्लिशांची प्रार्थना शिरत

आहे ! कोणाची प्रार्थना तो ऐकणार? मला वाटते या प्रार्थनेवर ख्राईस्ट काहीच बोलणार नाही. तो स्वस्थ बसेल.

युद्धाच्या या परिस्थितीत व्यवहाराला धरून, व गडबडीत फसून जाऊ नये असे धोरण महासभेने आखले आहे. ते बुद्धिप्रधान आहे. जवाहरलालनी एकदा सांगितले की या वेळी सत्याग्रह करता कामा नये आणि लगेच पुन्हा दुसऱ्या ठिकाणी ते सांगतात, इंग्लिशांचे ते काहीही जरी असले तरी आमचा स्वातंत्र्यसंग्राम आम्ही सोडणार नाही ! अशी परस्परविरोधी केविलवाणी स्थिति होता कामा नये.

हिंदु महासभेचा केवळ हिंदुस्थानच्या संरक्षणापुरताच महायुद्धाशी संबंध आहे व या संरक्षणापुरता संधि करायला हरकत नाही. केवळ पोथीतले शब्द वाचून राजकारणातील कोडी सुटत नसतात. एखादा मनुष्य काल शत्रु होता म्हणून आज तो शत्रु राहीलच असे नाही किंवा काल मित्र होता म्हणून आज तो मित्र राहीलच असेही नाही. अशा स्थितीत सांभाळून, बेताने मैत्री ठेवावयास हरकत नाही. गेल्या युद्धातील फ्रान्सचा दोस्त इटली आज नाही का फ्रान्सच्या विरुद्ध लढत आहे आणि १९३५ साली रशियाला ढोंगी म्हणून संबोधणारा हिटलर पोलंडच्या प्रश्नावर एका रात्रीत रशियाचा दोस्त नाही का बनला ?

महासभेने आपल्या सहकार्यासाठी पुढे मांडलेल्या अटींत युद्ध संपताक्षणीच वसाहतीचे स्वराज्य मिळाले पाहिजे अशी मागणी केली आहे. वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणे म्हणजे तुमच्या स्वातंत्र्याच्या बाष्कळ बडबडीला कलंकच नाही का असे कोणी म्हणतील. पण ध्येय व वास्तववाद यांत फरक आहे, आणि यात कलंक असला तरी राजनिष्ठेच्या प्रतिज्ञा घेऊन मंत्रिमंडळे स्वीकारण्याच्या कलंकापेक्षा खास कमी आहे.

महासभेचे दुसरे मागणे म्हणजे हिंदुस्थानचे अखंडत्व कायम राहिले पाहिजे. आज पाकिस्तानची चळवळ जिवंत चळवळ आहे. ती खंबीर आश्वासनावर आधारलेली आहे. याचा अर्थ खाकसारांच्या फावड्यांनी हिंदुस्थान उकरला जाईल असा नाही. खाकसारांच्या फावड्यांनी हिंदुस्थान उकरावयाचा म्हणजे फावड्यांनी हिमालय उकरण्याच्या प्रयत्नासारखे आहे. जोपर्यंत हिंदु राष्ट्र अशी कल्पना मनात आहे असा एक हिंदु जरी जिवंत असेल तरी तोपर्यंत पाकिस्तान होणे शक्य नाही.

काँग्रेसने आझाद मुस्लिम परिषद स्वतःच्या खर्चाने भरविली. काँग्रेस मुसलमानांना मुसलमान म्हणून मानते तर तेवढाच न्याय हिंदूंना हिंदू म्हणून कां देत नाही ? तुम्ही राष्ट्रीय असाल तर कोणालाच बोल देऊ नका. अर्थात् तुमच्यात तेवढी शक्ति असेल तर ! आझाद परिषदेचे ठराव काँग्रेसने उचलून धरले आहेत. आझाद परिषदेने मुसलमानी हिंदुस्थान असा तुकडा न पाडता सर्वच हिंदुस्थान आमचा आहे असे म्हटले आहे. पण तिनेही सांगितले आहे की, मुसलमानांना काय हवे

आहे हे सांगण्याचा अंतिम अधिकार मुसलमानांचा असला पाहिजे आणि मुसलमानांना काय पाहिजे हे सांगणारे मुसलमान मुसलमान गटातूनच निवडून येणार आहेत तर हिंदूंना मात्र काय पाहिजे हे सांगण्याकरिता स्वतंत्र हिंदु मतदार संघ नाहीत! अशा स्थितीत घटनापरिषदेत हिंदूंची काय दुर्दशा होईल याची कल्पना करा ! मुस्लिम लीगचे जे प्रतिनिधि येतील ते पाकिस्तानची मागणी करणार, तर आझाद परिषदेचे मुसलमान येतील त्यांचे म्हणणे काँग्रेसने मान्यच केले पाहिजे; कारण मुसलमानांना काय हवे हे ठरविण्याचा अंतिम अधिकार काँग्रेसने मुसलमानांच्या हाती दिलेला आहे ! या परिस्थितीचा, तुम्ही कोणीही असा, राष्ट्रसभावादी असा, किंवा अन्य कोणी असा, तुम्हांला जर हिंदु म्हणून जिवंत रहावयाचे असेल, तर विचार केला पाहिजे.

आज काँग्रेस आणि लीग, काँग्रेस आणि लीग असे सारखे ऐकू येते, याचे कारण एकच. ते म्हणजे काँग्रेस आज प्रस्थापित सत्तेला विरोध करीत नाही. काँग्रेसने जेव्हा विरोध केला तेंव्हा त्यांनी तिला दमडीचेही महत्त्व दिले नाही.

गांधींनी चार वेळा स्पष्टपणे सांगितले की, मुसलमानांनी पाकिस्तान मागितले तर अशी कोठली शक्ति माझ्याजवळ आहे की मी त्यांना अडवू शकेन ! मी स्पष्टपणे सांगतो, मी गांधींना ती शक्ति दाखवितो. ती शक्ति हिंदुमहासभा आहे.

मुसलमानांची पाकिस्तानची कल्पना म्हणजे केवळ पंजाब स्वतंत्र करावयाचा अशी नाही, तर या देशात पंजाब, सिंध, बंगाल, निझाम अशी स्वतंत्र मुसलमानी राज्ये स्थापन करावयाची अशी आहे. या पाकिस्तानासाठी सर्वस्व त्याग करण्याची घोषणा हुबळीच्या मुस्लिम लीग परिषदेत मुसलमानांनी केली आहे.

मी कर्नाटकच्या दौऱ्यावर गेलो होतो तेव्हा तेथले लोक म्हणाले, आमच्याकडे हिंदुमुसलमान प्रश्न काही नाही. सर्व काही ठीक आहे. त्याच कर्नाटकाच्या मुसलमानांनी हा ठराव केला आहे. मी मद्रासकडे गेलो तेव्हा तेथेही मला असेच सांगण्यात आले; पण तेथेही मुस्लिम लीगची परिषद झाली आणि फझलुल हक्कांनी सांगितले की, मलबार हा अरबस्थानचा भाग आहे, तो त्याला जोडला गेला पाहिजे. असे आहे काय ! होय तर मग मीही आव्हान देतो. We shall annex Arabia to Malbar. आम्ही अरबस्थानच मलबारला जोडून घेऊ. वचने किं दरिद्रता !

सावरकर पुढे म्हणाले: शब्दांनी मनुष्य कसा फसतो याचे उत्कृष्ट उदाहरण गांधींच्या शब्दांत सापडते. ते म्हणतात : 'मी जिनांचे राज्यात सुखाने राहीन; कारण, त्यांचे राज्य झाले तरी ते हिंदीच राज्य आहे.' हिंदी या शब्दाने कशी फसगत होते याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. येथे राज्य केलेले औरंगजेब वगैरे हिंदीच होते. मग त्यांच्या विरुद्ध शिवाजीमहाराजांना कां उठावे लागले ? आज

त्यांना कोणी मार्ग चुकलेले देशभक्त Misguided patriot म्हणतात. पण महाराष्ट्रात तरी त्यांना Misguided patriot म्हणणारा कोणी नराधम नाही. हिंदुस्थानात रहाणारे म्हणजे हिंदी असे म्हटले, तर येथले साप, विंचू, वाघ, हेही सर्व हिंदीच होतील; पण, आपण त्यांना तसे मानतो का?

गांधीजींनी सर शिकंदरांचे पूर्वज ब्राह्मण होते व त्यांना त्यांचा अभिमान वाटतो असे म्हटले होते. गांधींच्या या उद्‌गारांवरून मुस्लिम लीगच्या ईस्टर्न टाईम्स या पत्राने त्यांच्यावर बदनामीची फिर्याद करण्याची चळवळ चालविली आहे. आपण आपल्यावरून भोळसटपणाने त्यांची कल्पना करतो. तसे वघितले तर इंग्लिशही आर्यच आणि हिटलरही स्वस्तिकाचीच पूजा करतो. प्राणिशास्त्रदृष्टया सिंह आणि गाय एकच, पण गाय सिंहाच्या पोटात जाते.

अशा स्थितीत रक्ताच्या संबंधाचा काय उपयोग? औरंगजेब तर रजपुतानीच्याच पोटचा होता आणि त्याने आपल्या भावांचा शिरच्छेद केला. तेव्हा यात रक्ताचा संबंध नाही. तसे म्हटले तर मग आपण नाही का दत्तक घेऊन त्याला सर्व मालमत्तेचा वारसा देत! तेव्हा यात रक्ताचा संबंध कोठे आहे? मानसिक भाव, मानसिक ममत्व हेच राष्ट्राचे खरे लक्षण आहे. तो मानसिक भाव, ते मानसिक ममत्व हिंदुत्वात आहे. ते मुसलमानांत नाही. या परिस्थितीवर एकच उपाय आहे. तो म्हणजे हिंदूच्या वतीने बोलण्याचा अधिकार हिंदूंच्याच प्रतिनिधींना पाहिजे हे व्हाईसरॉय साहेबांकडून मान्य करून घ्यावयाचे. हिंदुमहासभेची ही चौथी मागणी आहे.

सावरकर पुढे म्हणाले : एखाद्याचे हातपाय छाटून टाकावयाचे आणि त्याला म्हणावयाचे आम्हांला साहाय्य कर! हे म्हणणे आमच्या दुःखावर डागण्या देण्यासारखे आहे. आधी आम्हांला साहाय्य करण्याची शक्ति द्या. शस्त्रनिर्बंध रद्द करा, मग आम्ही तुम्हांला साहाय्य करू. शिवाजी महाराजांनी नाही का विजापूरकरांना साहाय्य केले? त्यांनी काय एकदम फौज गोळा केली? त्यांनी फक्त मन वळविण्याचे कार्य केले.

आज मुसलमानी विद्यापीठांतून विमानविद्येचे वर्ग निघत आहेत. आपल्या विद्यापीठांनीही असे कां करू नये? तेव्हा विद्यापीठे, शाळा, कॉलेजे यांच्या दाराशी लष्करी शिक्षण, विमानशिक्षण देण्यासाठी धरणे धरून बसा. बाकीचा कार्यक्रम ईश्वरावर नि योगायोगावर सोपवा. तो आता सांगता येत नाही.

दुसऱ्यांना पददलित करणाऱ्या राष्ट्रांवर जेव्हा तिसऱ्या राष्ट्राची झेप पडते तेव्हा त्यांना पददलित राष्ट्रांवरील पाय काढून घ्यावा लागतो. याच वेळी आमच्या मागण्यांना हो किंवा नाही असे निश्चित उत्तर सरकारकडून घ्यावयाचे. तसे उत्तर आले नाही तर परिस्थितीत जे काही सुचतील ते उपाय योजावयाचे आणि

हिंदूंनो! केव्हा तरी तुम्हांला आपले म्हणणे मान्य करून घेण्यासाठी असह्य यातना भोगाव्या लागतील. एवढे मात्र खरे की, जो जो दिवस जातो आहे तो तो दिवस तुम्हांला स्वराज्याच्या जवळजवळ नेत आहे. महासभेच्या भूमिकेचा गांधी विपर्यास करतात. हिंदुमहासभेला हिंदूंचेसाठी व हिंदु संस्थानिकांसाठी खास सवलतीची वागणूक हवी आहे असे गांधीजींनी 'हरिजन'च्या अंकातील 'दोन पक्ष' या लेखात अट्टहासाने सांगण्याचा प्रयत्न केला आहे, हिंदुमहासभेचे महत्त्वाचे ठराव त्यांनी वाचले असते, आणि ते वाचणे त्यांचे कर्तव्य आहे, तर हिंदुमहासभेने कायदेमंडळे, नोकऱ्या किंवा इतर कोणत्याही बाबतीत हिंदुसमाजासाठी जादा सवलती अगर संरक्षक बंधने यांची मागणी काडीमात्र केलेली नाही ही गोष्ट गांधीजींना दिसून आली असती. त्यांनी भरमसाट विधाने करण्यापूर्वी ही काळजी घेतलेली दिसत नाही. हिंदुमहासभेच्या ठरावात असे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, या देशातील जमातींना जे काही हक्क अगर अधिकार द्यावयाचे असतील ते लोकसंख्येच्या प्रमाणात किंवा इतर कोणत्या तरी जगन्मान्य झालेल्या अशा पूर्णपणे राष्ट्रीय विचारानुसार आखण्यात आलेल्या योजनेनुसारच दिले जावेत आणि त्या योजनेची अंमलबजावणी सर्व जमातींबाबत सारख्याच न्यायाने केली जावी. हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाच्या संरक्षणाच्या दृष्टीने हिंदु समाजाच्या हितसंबंधांना यत्किंचितही धक्का बसू न देणे महासभेला फार अगत्याचे आहे.

हिंदुसमाज हा बहुसंख्य आहे म्हणून हिंदु नागरिकांच्या हक्कांचा संकोच करण्याची व मुसलमान अल्पसंख्य आहेत म्हणून त्यांना जास्त सवलती देण्याची भाषा ही अराष्ट्रीय आहे; म्हणूनच महासभा ती पत्करू शकत नाही. महासभेची ही विशुद्ध भूमिका माहीत असूनही महासभेला केवळ जातीय ठरवावयाचेच या बुद्धीने गांधींनी महासभेच्या विचारसरणीचे विकृत चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. मुस्लिम लीग या अराष्ट्रीय संस्थेच्या जोडीला कसे तरी करून महासभेला बसवावयाचीच ही गोष्ट गांधींनी ठरवून स्वतःसाठी व काँग्रेससाठी राष्ट्रीयत्वाचा शिक्का मारून घेण्याची अधीरता दाखविली आहे.

दुसऱ्या जमातीच्या हितसंबंधांवर जरूर तर आक्रमण करून स्वतःच्या जमातीसाठी विशेष तऱ्हेचे अधिकार व सत्ता मागणे ही गोष्ट अराष्ट्रीय आहे. या महत्त्वाच्या तत्त्वावर जगातील सर्व लोकांचे एकमत आहे. हिंदुमहासभेला काही शिकावयाचे नसून काँग्रेसलाच या बाबतीत महासभेकडून धडे घ्यावयास हवे आहेत. ज्या मुस्लिम लीगवाल्यांना गांधीजींनी पूर्णपणे अराष्ट्रीय म्हटले त्यांनाच गांधीजींनी कोरे चेक दिले नाहीत काय? काँग्रेस मंत्रिमंडळे हिंदूंच्या हिताकडे प्रसंगी दुर्लक्ष करूनही मुस्लिम हितसंबंधांची विशेष जपणूक करीत होती अशा आशयाची पत्रके काँग्रेस मंत्रिमंडळाच्या वतीने कोणी काढली ? विशेषतः संयुक्त प्रांतातील मुस्लिम जनतेच्या बाबतीतील पक्षपातीपणाचे जाहीर निलाजरे पत्रक

ना. पंतांच्या प्रधानमंडळाने काढले त्याचे कौतुक कोणी केले? हिंदुस्थानवर स्वारी करण्याच्या अफगाणिस्थानच्या अमिराच्या कारस्थानांना साहाय्य करणाऱ्या अल्लीबंधूंचा कोणी पाठपुरावा केला? निजामच्या राज्यातील अन्यायाविरुद्ध स्टेट काँग्रेसने सुरू केलेली चळवळ कोणी बंद पाडली ? आणि भोपाळच्या नबाबी कारभाराला रामराज्याचे प्रशस्तिपत्रक कोणी दिले? आणि ही प्रशस्तिपत्रके देण्याचे कार्य चालू असताना विशिष्ट हिंदु संस्थानिकांना त्रास देण्यास कोण पुढे झाले? हिंदूंच्या हिताचा होम करणाऱ्या व मुसलमानांना जादा हक्क देणाऱ्या जातीय निर्णयाचा कोणी निष्ठापूर्वक स्वीकार केला ? हिंदु समाज व हिंदु संस्थानिक यांचे हक्कसंबंध सहानुभूतीने राखा असे म्हणणे काँग्रेस व गांधीजी यांच्या मते अराष्ट्रीय ठरते; परंतु मुसलमानांना कुरवाळणे हा मात्र राष्ट्रीयत्वाचा ऐन गाभा असल्याची त्यांची कल्पना आहे ! हिंदु समाजाला विशेष हक्क द्या अशी हिंदुसभेची भूमिका मुळीच नाही. गांधीप्रणीत राष्ट्रीयत्वाच्या थोतांडाचे बुडाशी कुऱ्हाडीचा घाव घालून तो हाणून पाडणे हे महासभेचे उद्दिष्ट आहे. काँग्रेस ही एकच संस्था हिंदी राष्ट्राची प्रातिनिधिक संस्था आहे असा अट्टहास गांधींनी आपल्या लेखात केला आहे. तथापि गांधींनी आपल्या लेखात लिहिलेल्या कित्येक विधानांनीच त्यांचा हा अट्टहास अस्थानी ठरला आहे. मुसलमानांच्या फार मोठ्या विभागाचे असे मत आहे की, ते स्वतंत्र मताचे आहेत व काँग्रेस ही त्यांची प्रातिनिधिक संस्था नाही; त्याचप्रमाणे लक्षावधि हिंदुसंघटनवाले असे स्पष्टपणे घोषित करीत आहेत की, काँग्रेस ही हिंदु हितसंबंधांचे किंवा राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण करील असा विश्वास वाटत नाही. अशा परिस्थितीत काँग्रेस ही प्रातिनिधिक होऊ शकत नाही. लोकशाही स्वराज्य पक्ष व डॉ. आंबेडकरांचा पक्ष व इतर नेमस्त संस्था असे जाहीर रीतीने सांगत आहेत की काँग्रेस ही हिंदुस्थानची प्रातिनिधिक संस्था म्हणून त्यांना मान्य नाही.

खरी वस्तुस्थिति अशी आहे की, काँग्रेस ही फक्त काँग्रेसवाल्यांचीच प्रतिनिधि आहे. देशातील इतर पक्षोपपक्षांप्रमाणेच ती संस्था एक पक्ष आहे. हिंदुमहासभेची स्पष्ट भूमिका अशी आहे की सरकार आणि काँग्रेस अगर काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्या दरम्यान होणारी कोणतीही तडजोड जोपर्यंत हिंदुमहासभेने अधिकृत रीतीने मान्य केली नाही तोपर्यंत ती हिंदुराष्ट्रावर बंधनकारक ठरणार नाही. काँग्रेसच्या अखत्यारांतील काँग्रेसवाल्यांपुरतीच काही तडजोड अगर उद्योग काँग्रेसने केले तर त्याबद्दल महासभेला काही म्हणावयाचे नाही. मात्र काँग्रेसने दुसऱ्या घरचे व्यवहार चोंबडेपणाने करू नयेत. मुसलमानांच्या हितासाठी हिंदूंना भूर्दंड बसविण्याची करामत व उद्योग करण्याचा काँग्रेसला काही अधिकार नाही.

“ आपण कोणतीही प्रगति करण्यापूर्वी सर्व पक्षीयांनी एकत्रित येऊन काही ठरविले पाहिजे अशा तऱ्हेची भ्रामक विचारसरणी आपण उराशी बाळगून होतो

ही आपली चूक झाली" असे म. गांधींनी या लेखात म्हटले आहे. हा भ्रामकपणा कोणी 'आपण' (we) यांनी निर्माण केला नसून ती फक्त गांधीजींचीच करामत होती व आता गांधी स्वतःच्या एकटयाची कर्तबगारी अनेकांच्या माथी मारू पहात आहेत! हा भ्रामकपणा फक्त गांधी व काँग्रेस यांनीच निर्माण केला होता. मुसलमानांचे काय वाटेल ते करून समाधान करावे व त्यांची व हिंदूंची एकी झाल्याखेरीज कोणतीही राजकीय प्रगति, स्वातंत्र्य, अगर स्वराज्य नाही अशा घोषणा आजपर्यंत कोणी चालविल्या होत्या ? हिंदुमहासभेने या भ्रामक व गैरसमजूत करणाऱ्या घोषणांना अगदी स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. " याल तर तुमच्यासह न याल तर तुमच्याशिवाय, आम्ही प्रगतीसाठी, खऱ्या राष्ट्रीय स्वराज्यासाठी व अंतिम विजयासाठी शेवटपर्यंत लढा लढवू" अशी महासभेची स्पष्ट घोषणा आहे.

स्वा. सावरकरांचे हे भाषण हिंदुमहासभेच्या विचारसरणीचा गाभा आहे. म्हणूनच त्यांनी 'राजकारणाचे हिंदूकरण व हिंदूंचे सैनिकीकरण' करण्याचा संदेश दिला. मदुरा येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनात डिसेंबर (१९४०) स्वा. सावरकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सैनिकीकरणाच्या महत्त्वाचे तपशीलवार विवेचन केले होते. त्यात त्यांनी म्हटले होते की, सैन्यात हिंदुत्वनिष्ठांची जेवढी भरती करता येईल तेवढी करा. त्याच्या आड येईल असे काही करू नका. ते म्हणतात :

"एकदा देशातील सैन्य हिंदुत्वनिष्ठांनी भरलेले तर होऊ दे, मग पाहू स्वराज्याच्या कायद्याचे. आणि समजा, आज इंग्रजांनी अगदी जीव तोडून स्वच्छ सांगितले की, युद्धसमाप्तीनंतर अगदी तीनशे चौसष्ट दिवस नि चोवीस तास यांच्या आत आम्ही पार्लमेंटचा कायदा करून तुम्हांस वसाहतीचे स्वराज्य नक्की देऊ आणि इतके करूनही त्यांनी नंतर नाही दिले तर आम्ही काय करणार आहोत? सरकारने वचनभंग केला इतकेच म्हणणार कीं नाही? किंबहुना, गेली दीडशे वर्षे ते हेच करीत आले नाहीत काय ? त्यात फार तर आणखी एका वचनभंगाची भर पडेल इतकेच! इंग्रजांना आपला शब्द खरा करावयास लावण्याचे सामर्थ्य जर कशात असेल तर ते या हिंदुत्वनिष्ठांच्या सैनिकीकरणात आहे. हिंदूंचे राष्ट्रीय सैन्य नसेल तर अशी कितीही वचने त्यांनी दिली नि लाथाडली तरी त्यांचे काय वाकडे होणार आहे? युद्धसमाप्तीनंतर एका वर्षात स्वराज्य देऊ असा पार्लमेंटचा ठराव करा म्हणून आम्ही त्यांच्यामागे लागत आहो, याचा अर्थ आमचा आमच्या सामर्थ्यापेक्षाही ब्रिटिशांच्या शब्दावर अधिक विश्वास आहे ! ब्रिटिश सरकार हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य आज देऊ असे आश्वासन देत नाही व पाकिस्तानची योजना स्वीकारणार नाही असेही सांगत नाही. याचा अर्थ त्यांच्या पोटात पाप आहे असे आम्ही धरून चालतो व जर सरकारने या संबंधात स्पष्ट घोषणा केली नाही तर आम्हीही जमेल त्या मार्गाने प्रतिकाराची चळवळ हाती घेऊही."

प्रतिकाराच्या चळवळीसंबंधानेही स्वा. सावरकरांचे मार्गदर्शन स्पष्ट होते. ज्या चळवळीमुळे आपले हित साधेल किंवा किमान आपल्या हिताची हानि होणार नाही व प्रतिपक्ष्याची होईल ती चळवळ हाती घेणे योग्य होय हे सावरकरांचे विचारसूत्र होते, व त्याच धोरणाने त्यांनी राजकारण चालविले होते.

असा प्रत्यक्ष प्रतिकाराचा प्रसंग बिहारच्या गव्हर्नरने आणून दिला. १९४१ सालचे हिंदुमहासभेचे वार्षिक अधिवेशन बिहार राज्यात भागलपूर येथे भरावयाचे होते. बिहारच्या गव्हर्नराने बकरीदचे निमित्त पुढे करून हिंदुमहासभेच्या अधिवेशनास बंदी घातली. तेव्हा तिने ती बंदी मोडून हिंदुमहासभेचे अधिवेशन भरविले.

वर व्यक्त केलेली भूमिका स्पष्ट शब्दांत विशद करून या युद्धकाळाचा फायदा घेण्याच्या दृष्टीने हिंदुमहासभेने हिंदुत्वनिष्ठांच्या सैनिकीकरणाच्या चळवळीवर विशेष भर दिला. जोपर्यंत देशात स्वदेशनिष्ठ सैन्य सर्व प्रकारांनी सुसज्ज होत नाही तोपर्यंत स्वराज्याच्या कागदी हक्कांना अर्थ उत्पन्न होत नाही असे हिंदुमहासभेचे मत होते. पहिल्या महायुद्धाच्या काळात (१९१४–१८) लो. टिळकांनीही सैनिकीकरणावरच विशेष भर दिला होता. सैन्यात शिरण्यास, तेथील साधने हस्तगत करण्यास व युद्धशास्त्राचे ज्ञान संपादन करण्यास युद्ध ही एक संधि असते.

सावरकरांनी सैनिकीकरणावर भर दिला ते काँग्रेसवाल्यांना आवडले नाही. सैन्यात शिरणे म्हणजे सरकारला युद्धकार्यात केवळ मदत करणे व हिंसाचारास पाठिंबा देणे असे ते मानू लागले. स्वातंत्र्यवीर सावरकरांना हिणविण्यासाठी त्यांना रिक्रूटवीर म्हणण्यासही काँग्रेसवाल्यांनी कमी केले नाही! त्यांनीच काय, पण हिंदुत्वाचा निष्ठेने पुरस्कार करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांना देखील सावरकरांचे धोरण समजले वा पटले नाही व त्यांनीही सैनिकीकरणास विरोधच केला. त्यामुळे हिंदुत्वनिष्ठांतही दोन गट पडले, व त्यांच्यात अंतर्विरोध सुरू झाला. उलट हिंदुमहासभेचे एक कार्यकर्ते बुलढाण्याचे श्री. रामभाऊ कानिटकर यांनी सैनिक भरतीचे कामच हाती घेतले. या वेळपर्यंत हिंदुस्थानातील देशी सैन्यातील हिंदु व मुसलमान यांचे परस्पर प्रमाण सुमारे १: २ होते. सावरकरांच्या झंझावाती प्रचारामुळे व सरकारला सैनिकांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाल्यामुळे लढाऊ जाती व बिनलढाऊ जाती हा भेद नष्ट झाला व हिंदूंची मोठ्या प्रमाणावर सैनिक भरती होऊन सैन्यातील हिंदुमुसलमानांचे परस्पर प्रमाण ३ : २ झाले. त्याचबरोबर शेकडो सुशिक्षित हिंदु तरुणांनी लष्करात कमिशने संपादन करून हिंदु अधिकारी वर्गाची सैन्यात मोठ्या प्रमाणावर भरती झाली. सुभाषचंद्र बोस यांना त्यांच्यातूनच स्वातंत्र्य सैनिक उपलब्ध झाले व त्यायोगे इंग्रजांचा अमेरिकेच्या मदतीमुळे युद्धात जय झाला तरी सुभाषचंद्रांच्या स्वातंत्र्य

संग्रामामुळे हिंदुस्थानला स्वातंत्र्य संपादन होऊ शकले. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या दूरदर्शित्वाचे हे एक निदर्शनच होते. सुभाषबाबूंनीही सिंगापूर येथील नभोवाणीवरून दि. २५ जून १९४४ ला भाषण करताना सावरकरांच्या सैनिकीकरणामुळे केवढा लाभ झाला व सावरकरांचे मार्गदर्शन किती अचूक होते याचे वर्णन केले. ते म्हणाले : When due to misguided political whims and lack of vision, all the leaders of the Congress party are decrying all the soldiers in the Indian army as mercenaries, it is heartening to know that Veer Savarkar is fearlesly exhorting the youths of India to enlist in the armed forces. These enlisted youths themselves provide us with trained men from which we draw the soldiers of our Indian National army. (चुकीच्या राजकीय प्रवृत्तीमुळे आणि दूरदृष्टीच्या अभावी काँग्रेसचे सगळे नेते हिंदुस्थानच्या सैन्याला पोटभरू समजतात. पण आनंदाची गोष्ट ही की एक वीर सावरकर मात्र हिंदुस्थानातील तरुणांना सैन्यात भरती होण्यास निर्भयपणे सांगत आहेत. याच शिक्षण घेतलेल्या तरुणांतून आमच्या हिंदुस्थानी राष्ट्रीय सैन्याला सैनिक मिळत आहेत.) हिंदुसभेने युद्धाच्या संबंधात एकदा जी भूमिका स्पष्टपणे घेतली तीत तिला पुढे केव्हाही बदल करावा लागला नाही. याच्या उलट काँग्रेसच्या वारंवार बदलत्या धोरणाने तिचे हसू मात्र झाले.

गांधींची सरकारने तुरुंगातून सुटका केली तरी काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाचे सभासद नगरच्या किल्ल्यात तुरुंगातच होते. आता युद्धात इंग्रजांची सरशी होऊ लागली होती. त्यांना काँग्रेसच्या सहकार्याची फारशी आवश्यकता राहिली नव्हती. त्यामुळे ते गप्प होते. काँग्रेसच्या राजकारणाचा डाव फसला होता. त्याला पुन्हा तोंड पाडण्यासाठी गांधींनी प्रयत्न सुरू केला. त्यांनी व्हाईसरॉयची भेट मागितली, पण व्हाईसरॉयने नकार दिला. अखेर गांधींनी जिनांशी बोलणी करण्याचे ठरविले. गांधी व जिना यांच्या मुंबईस दि. २८।९।४४ रोजी भेटी सुरू झाल्या. त्या वीस दिवस चालल्या होत्या. या वाटाघाटीत गांधींनी जिनांना राजाजींची योजना सादर केली. त्यांनी फाळणीचे तत्त्व मान्य केले, पण जिनांची भूक अधिक होती. त्यांना निर्विवादपणे सबंध पंजाब, सिंध, सीमा प्रांत इ. पश्चिमेकडील व पूर्वेकडील सबंध बंगाल व आसाम हवा होता. राजाजींच्या योजनेत त्या भागातील जिल्ह्यांना स्वयंनिर्णयाचे तत्त्व लागू करण्याची तरतूद होती. ती जिनांना मान्य नव्हती. ते लोकसंख्येच्या अदलाबदलीस तयार होते; तर गांधींना लोकसंख्येची अदलाबदल मुळीच मान्य नव्हती. अखेर वाटाघाटी मोडल्या. त्यामुळे पुन्हा चिडाचीड निर्माण झाली. आता दंगे करून हिंदूंवर दडपण आणण्याचे धोरण मुस्लिम लीगने स्वीकारले व ठिकठिकाणी दंगे मोठ्या प्रमाणावर होऊ लागले.

जर्मनीविरुद्धचे युरोपातील युद्ध ८।५।४५ ला संपले. जपानबरोबरचेही युद्ध अखेरच्या अवस्थेत आले असल्याने ब्रिटिश सरकार पुढच्या तजविजीस लागले होते. डॉ. खरे यांच्या प्रयत्नाने सरकारने काँग्रेसच्या नेत्यांची मे–जून १९४५ मध्ये सुटका केली. तेव्हा पुन्हा राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी कांग्रेसचे प्रयत्न सुरू झाले. मध्यंतरी दिल्लीच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या बैठकांना काँग्रेसवाले उपस्थित राहू लागले होते. त्या वेळी भुलाभाई देसाई व लियाकत अलीखान यांच्यात बोलणी होऊन कांग्रेस व मुस्लिम लीग यांना केंद्रीय सरकारात ४०, ४० टक्के जागा व इतर सर्वांना मिळून २० टक्के जागा मिळाव्यात यावर त्यांच्यात तडजोड झाली होती. भुलाभाई यांनी गांधींची भेट घेऊन या योजनेस त्यांची संमतीही मिळविली. त्यामुळे वाटाघाटी सफल होऊन 'राष्ट्रीय' सरकारात कांग्रेस व मुस्लिम लीग दोघेही येतील व राज्यकारभार सुरळीत चालेल अशी ब्रिटिशांना आशा दिसू लागली. म्हणून व्हाईसरॉय वेव्हेल यांनी सिमला येथे दि. २९।३।१९४५ ला कांग्रेस व लीग नेत्यांची परिषद बोलाविली. हिंदु व मुसलमान यांना या राष्ट्रीय सरकारात समान प्रतिनिधित्व देण्यास ब्रिटिश सरकार तयार होते. मुस्लिम लीगला ते मान्य होते. पण या बैठकीत मुसलमानांचे सर्व प्रतिनिधि मुस्लिम लीगचेच असतील यावर जिनांनी आग्रह धरला. कांग्रेसला ते मान्य नव्हते. काँग्रेस हिंदु-मुसलमान यांना समान प्रतिनिधि नसले व हिंदूंना कमी व मुसलमानांना जास्त असले तरी चालेल यास तयार होती; पण मुस्लिम लीगलाच मुसलमानांचे सर्व प्रतिनिधित्व द्यावयास ती तयार नव्हती. पुढे गांधी यालाही तयार झाले की महामंत्रिपद मुस्लिम लीगला द्यावे व त्यांनी सर्व लीग-वाल्यांचे मंत्रिमंडळ नेमावे. मुस्लिम लीगच्या राज्यात आम्ही आनंदाने राहू असे ते म्हणत. फक्त इंग्रजांनी सत्ता सोडावी म्हणजे झाले ! गांधींच्या याही विचारास काँग्रेसचा विरोध होता. काँग्रेस नेत्यांना काही करून सत्ता हवी होती. लीगनेच मंत्रिमंडळ बनविले तर काँग्रेसला सत्तेत स्थान कोठे राहिले ! तात्पर्य कोणाचा कोणास मेळ राहिला नाही. या परिषदेत काँग्रेसच्या वतीने बोलणी करण्यास आझाद हेच प्रमुख होते. अखेर बोलणी फिसकटली व सिमला परिषद मोडली.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी १५।८।४५ ला जपान बरोबरचेही युद्ध समाप्त झाले. आता सरकारने पक्षनेत्यांशी वाटाघाटी करण्याचा विचार सोडून दिला होता. त्यांनी पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे घटनात्मक कारभाराचा बदल करण्यास सुरवात केली. क्रिप्स योजनेतील युद्धकालीन तरतूद करण्याची आता गरजच राहिली नव्हती. कारण युद्ध संपले होते. सरकारने विधिमंडळांच्या निवडणुकांची तयारी सुरू केली व १९४५ च्या नोव्हेंबरपर्यंत सर्व प्रांतीय विधिमंडळांच्या व केंद्रीय विधिमंडळाची निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत काँग्रेसने भाग घेतला व कोणत्याही परिस्थितीत देशाची फाळणी होऊ देणार नाही अशा घोषणा करीत निवडणुका जिंकल्या.

या निवडणुकांच्या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हिंदुसभेच्या इच्छुकांविरुद्ध काँग्रेसला सर्वतोपरी मदत केली व हिंदुसभेच्या उमेदवारांस विरोध केला. त्यामुळे जेथे हिंदुत्वनिष्ठांचे थोडेफार बळ होते तेही विभागले जाऊन काँग्रेस सर्वत्र निवडणुकीत यशस्वी झाली. त्याबरोबर हिंदुबहुसंख्य वस्तीच्या प्रांताप्रांतांतून काँग्रेसची मंत्रिमंडळे स्थापन झाली व मुस्लिम बहुसंख्य प्रांतांत विशेषत: पंजाब, सिंध, बंगाल व आसाममध्ये मुस्लिम लीगची मंत्रिमंडळे स्थापन झाली. केंद्रात काँग्रेस व मुस्लिम लीग यांना यथाप्रमाण स्थान देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले.

भावी घटनेचें स्वरूप कसें असावे याचा आराखडा निश्चित करण्याकरिता काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात हिंदुस्थान अखंड ठेवून एकवाक्यता घडवून आणण्याकरिता मे १९४६मध्ये ब्रिटिश मंत्रिमंडळाचे तीन सदस्य हिंदुस्थानात आले. त्यांनी हिंदुस्थानचे तीन विभाग करून एकात (अ) हिंदु बहुसंख्य वस्तीचे प्रांत, दुसऱ्यात (ब) पश्चिमेकडील मुस्लिम बहुसंख्य वस्तीचे प्रांत, व तिसऱ्यात (क) पूर्वेकडील मुस्लिम बहुसंख्य वस्तीचा प्रदेश म्हणजे बंगाल व आसाम मिळून अशा तीन भागांत हिंदुस्थानची विभागणी केली व घटक प्रांतांना व या तीन गटांना मुख्य अधिकार व शेषाधिकारही ठेवून केंद्रीय सत्ता काही खात्यांपुरती मर्यादित ठेवली. या योजनेला हिंदुमहासभेचा तीव्र विरोध होता. तसेच पश्चिमेकडील व पूर्वेकडील मुसलमान बहुसंख्य वस्तीच्या प्रदेशातही हिंदुवस्ती एकेका भागात फार मोठी होती. पूर्व पंजाब व पश्चिम बंगाल हिंदु बहुसंख्य वस्तीचे भाग होते व आसाममधील फक्त सिल्हट जिल्ह्यात काय ती मुस्लिम बहुसंख्य वस्ती होती. १९३१ प्रमाणेच १९४१ मध्येही काँग्रेसने शिरगणतीवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे याही वेळी हिंदूंची वस्ती काही भागात अधिक असूनही तिची तशी नोंद झालेली नव्हती त्याचा फायदा मुस्लिम लीगला मिळाला. या सर्व भागांतील हिंदूंचा व शिखांचा पाकिस्तानात जाण्यास तीव्र विरोध होता. हिंदुमहासभेने मुस्लिम लीगच्या मागणीला तीव्र विरोध केला. पंजाब व बंगाल मधील हिंदूंनी मोठी चळवळ केली. त्या भागात सर्वत्र दंगली उसळल्या. त्यात हजारो लोक प्राणास मुकले. अखेर ही त्रिसदस्य योजना ब्रिटिश सरकारने मागे घेतली. काँग्रस व मुस्लिम लीग यांजपुढे निरनिराळे पर्याय ठेवण्यात आले पण उभयमान्य असा कोणताच नव्हता. अखेर देशाची फाळणी करण्याशिवाय अन्य मार्ग नाही असे मान्य करण्यात आले. फाळणीला आता काँग्रेसची मान्यता होतीच. पंजाब, बंगाल व आसाम मधील हिंदूंचा पाकिस्तानात न जाण्याचा निर्धार व्हाइसरायला मान्य करावा लागला. त्यांनी मुस्लिम लीगच्या विरोधास न जुमानता पंजाब, बंगाल व आसाम यांची फाळणी करण्याचे ठरविले. पंजाबातील २९ जिल्ह्यांपैकी १२ जिल्हे हिंदुस्थानात राहिले व पूर्व बंगाल व आसाममधील सिल्हट जिल्हा हा भाग पाकिस्तानचा म्हणून वेगळा करण्यात आला.

बंगालमध्ये मुस्लिम लीगच्या मंत्रिमंडळाच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर दंगली झाल्या. तीत शेकडो हिंदु मारले गेले. त्याची प्रतिक्रियाही तशीच तीव्र झाली. कलकत्ता येथे हिंदूंनीही मुसलमानांच्या कत्तली केल्या व बिहार प्रांतातही दंगली उसळल्या. पूर्व बंगालमध्ये नौखाली व लगतचा प्रदेश येथे हिंदूंवर भयंकर अत्याचार झाले. तिकडे पंजाबातही तोच प्रकार झाला. पश्चिम पाकिस्तानातून लाखो हिंदु लोक निर्वासित होऊन हिंदुस्थानात आले. तेव्हा पूर्व पंजाबमधून मुसलमानही पाकिस्तानात हाकलले गेले. जिना लोकसंख्येच्या अदलाबदलीस तयार होते, पण काँग्रेस तयार नव्हती. तिच्या सेक्युलरपणात ते बसत नव्हते. त्यामुळे हत्या फार झाली व काँग्रेसला अखेर केवळ नाइलाजाने लोकसंख्येच्या अदलाबदलीस तयार व्हावे लागले. यात लोकांचे कमालीचे हालही झाले.

बंगालमधील भीषण प्रकार

पण पूर्व बंगालमधील लोकसंख्येच्या अदलाबदलीस काँग्रेसने फार विरोध केला. दि. १६ ऑगस्ट १९४६ पासूनच मुस्लिम लीगने डायरेक्ट ॲक्शनचे म्हणजे दंगे व खुनाखुनीचे सत्र सुरू केले होते. कलकत्ता येथे मोठ्या प्रमाणावर दंगे झाले. त्यांची प्रतिक्रिया हिंदुस्थानभर सर्वत्र झाली. पूर्व बंगालमध्ये हिंदुवस्ती फार थोडी, तेथे हिंदूंवरील अत्याचारांना ऊत आला. विशेषतः नौखाली व टिपेरा जिल्ह्यांत या अत्याचारांचे प्रमाण सर्वांत अधिक होते. हिंदुसभेचे अनेक कार्यकर्ते पूर्व बंगालमध्ये गेले व तेथे त्यांनी हिंदूंच्या साहाय्यार्थ मदतकेन्द्रे सुरू केली. हिंदुसभेचे कार्यवाह आशुतोष लाहिरी यांनी काढलेल्या पत्रकात म्हटले की दि. १०।१०।४६ पासून नौखाली व टिपेरा भागात पाच हजारांवर हिंदूंची कत्तल झाली असून हजारो हिंदु निर्वासितांच्या छावण्यांकडे धाव घेत आहेत. त्यासाठी त्यांनी मदतीची मागणी केली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनीही पत्रक काढून मोठ्या प्रमाणावर साहाय्याची मागणी केली. महाराष्ट्रातून त्यासाठी निधि गोळा करण्याचे काम सुरू झाले. नगर येथील हिंदुसभेचे कार्यकर्ते श्री. विष्णु रामकृष्ण करकरे यांनी हा निधि गोळा करण्याच्या कामात पुढाकार घेतला व त्यांनी निधि व कपडे गोळा करून पूर्व बंगालमध्ये चार स्वयंसेवकाची तुकडी घेऊन जाण्याचे ठरविले.

या अत्याचारांच्या वार्ता अतिशय भीषण होत्या. बंगाल हिंदुसभेने या संबंधात एक पुस्तिकाच प्रसिद्ध केली. या अत्याचारांच्या भयंकर वार्ता येत गेल्याने काँग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी, पं. कुझरू, म. गांधी यांनीही पूर्व बंगालला भेटी दिल्या. गांधींनी तर नौखाली भागात काही ठिकाणी पदयात्राही काढली. सरकारने त्यांना लष्करी संरक्षण दिले होते.

काँग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी यांनी पूर्व बंगालमधील अत्याचारांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे जातीने निरीक्षण करण्याचे ठरवून ते चांदपूर भागात गेले. तेथील परिस्थिति पाहून आल्यावर ते आपल्या निवेदनात (२६।१०।४६) म्हणाले : "मी जी विधाने करीत आहे त्या माझ्या विधानांची शाबिती तेथील स्थानिक पुराव्याच्या बळावर कोणत्याही निःपक्षपाती न्यायालयात करण्याचीं माझी सिद्धता आहे. ते म्हणाले : (१) नौखाली नि टिपेरा जिल्ह्यांतील हिंदूवरील आक्रमण हे पूर्वनियोजित असून त्यासाठी पूर्वीपासून तयारी करण्यात आली होती. (२) मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांची भाषणेच या दंग्यांना कारणीभूत झाली. (३) या संबंधात या भागातील नामवंत हिंदु पुढाऱ्यांनी धोक्याची सूचना आधी दिलेली होती. (४) काही मुसलमान अधिकाऱ्यांनी या दंग्यांना उत्तेजन दिले. (५) हिंदू-विरुद्ध आगळीक केल्यास सरकारकडून काही शासन केले जाणार नाही अशी मुसलमानांची सार्वत्रिक समजूत होती. (६) शंभर शंभर नि हजार हजार दंगेखोरांच्या तुकड्या शेजारच्या गावातील हिंदूंच्या घरावर चाल करून जात होत्या. (७) या दंगलखोरांचे नेते हिंदूंकडून मुस्लिम लीगसाठी व कलकत्त्यात बळी पडलेल्या मुसलमानांसाठी वर्गणी मागत व ही वर्गणी दहा दहा हजार रुपयांचीही असे. (८) ही वर्गणी वसूल केल्यावर दुसरा जमाव तेथे येई व तो हिंदूंची घरे लुटी. रोकड व दागिने तर लुटण्यात येतच; पण धान्य, कापड, भांडीकुंडीही लुटून नेण्यात येत. (९) लूटमार करण्यापूर्वी इस्लामी धर्माचा स्वीकार करण्याची सक्ती करण्यात येत असे. (१०) त्यांच्या घोषणा लीग झिंदाबाद, पाकिस्तान झिंदाबाद या असत. (११) कलकत्त्यात बळी पडलेल्या मुसलमानांचा सूड म्हणून आपण हे करतो असे ते सांगत. (१२) हे अत्याचार करणारे गुंड शेजारच्या गावाहून आलेले असत. (१३) लुटीनंतर अनेकांना ठार मारण्यात येई व जे मुसलमान होत त्यांना मुसलमानी पेहेराव चढविण्यात येई. त्यांच्या टोप्यांवर पाकिस्तानचा छाप असे. (१४) नमाज पढण्याची सक्ती करण्यात येई. (१५) हिंदु स्त्रियांच्या बांगड्या फोडून व मंगळसूत्रे तोडून टाकण्यात येत. (१६) हिंदूंच्या देवळातील मूर्ती फोडण्यात व देवळे जाळण्यात आली. (१७) काहीं वेळा स्त्रियांचा सक्तीने निका लावण्यात येत होता. (१८) जबरी संभोगाची बाब नाजूक असल्याने नक्की आकडा समजू शकला नाही. (१९) बाटविलेल्या नागरिकांना बाहेरगावी जाण्यास परवाना लागत असे.

गांधीजींनी स्वतः नौखाली जिल्ह्यात दूरपर्यंत जाऊन व सर्वत्र हिंडून डोळ्यांनी तेथील परिस्थिति पाहून या संबंधात अत्यंत जबाबदारीने व प्रत्येक शब्द तोलून अनेक प्रसंगी आपले विचार प्रकट केले आहेत. ते म्हणाले की "इतक्या दिवसांनंतरही तेथील हिंदूंना आश्वासन देता येत नाही. प्रत्येक गावात एक तरी हिंदु व एक तरी मुसलमान प्राणपणाने एकत्र राहून दंगा करणाऱ्यांच्या

अत्याचारांना तोंड देण्यासाठी मिळेल काय याच्या शोधात मी अद्यापि वणवण हिंडत आहे, पण अजूनही मला 'प्रकाश' दिसत नाही, व तो हिंदु व तो मुसलमानही दिसत नाही. याचा काय अर्थ समजावयाचा ?"

गांधीजींनी रामगंज येथे (दि. १५।११।४६) प्रार्थनेच्या शेवटी केलेल्या भाषणाचे वृत्त अ. प्रे. हिंद या वार्ता संस्थेनें पाठविले. त्यात गांधीजी म्हणाले होते : "पूर्व बंगालमध्ये माझ्या माहितीप्रमाणे मुस्लिमांनी आक्रमण केले आहे. राजवाड्यासारखी घरे नष्ट करण्यात आली. शाळा व देवळेही त्यांनी सोडिली नाहीत. जबरदस्तीने धर्मांतर करण्यात आले. स्त्रियांना पळवून नेण्यात आले. हिंदूंना मुसलमानांची भयंकर धास्ती बसली आहे.

"या मुसलमानांवर मुस्लिम लीगवाल्यांचे वजन नव्हते किंवा ते लीगवाल्यांना न जुमानता काही तरी करीत होते असेही दिसत नाही. प्रार्थनेला मुसलमान लोक कां येत नाहीत याची चौकशी करता मुसलमानांकडून असे सांगण्यात आले की 'गांधींच्या सभेला हजर रहाण्यापूर्वी किंवा हिंदूंशी दोस्ती करण्यापूर्वी आम्हांला लीगच्या पुढाऱ्यांची तशी आज्ञा पाहिजे.' यावरून या भागात लीगवाल्यांचे वजन किती होते हे दिसून येते."

सक्तीचे धर्मांतर फार मोठ्या प्रमाणावर झाले हो गोष्ट आता सर्वमान्य झालेली आहे. दि. २९ ऑक्टोबरच्या 'हिंदुस्थान स्टँडर्ड'च्या अंकात श्री. ललितचंद्र दास, एम. एल. सी. यांचे एक पत्रक प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यांनी म्हटले की : बंगाल सरकारचे एक मंत्री शमसुद्दिन अहंमद यांच्या समक्ष डि. मॅजिस्ट्रेट यांनी स्पष्ट व असंदिग्धपणे असे सांगितले की, येथे सामुदायिक धर्मांतर व स्त्रियांना सक्तीने पळविणे व त्यांचा निका लावणे यांसारखी कृत्ये दंगेखोरांनी केली यात शंका नाही. त्यांना आक्रमित (हिंदु) जमातीने कोणत्याही प्रकारचे निमित्त दिले नव्हते. ही सर्व दंगल योजनापूर्वक चालली होती व त्यांत सेवानिवृत्त सैनिकही भाग घेत होते."

मिस म्युरिअल लेस्टर या गोऱ्या बाईनी नौखाली भागात दूरपर्यंत प्रवास करून स्वतः जमविलेल्या माहितीच्या आधारे काढलेल्या निवेदनात (दि.७।११।४६) म्हटले : "मी हे पूर्व बंगालमधील दिवाणजी बारी या मदत केंद्रातून लिहीत आहे. हे एक खाजगी घर असून येथे हजारो लोकांना गेल्या काही आठवड्यांत अन्न, निवाऱ्याची जागा व संरक्षण देण्यात आले आहे. येथे आश्रयार्थ आलेल्या प्रत्येकाची एक एक दुःखाची कहाणी आहे. कित्येक स्त्रियांवर त्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या पतींचे खून करण्यात येत असलेले पाहण्याचा प्रसंग ओढवला. त्यानंतर त्यांचे जबरीने धर्मान्तर करण्यात आले व ज्यांनी त्यांचे पति ठार मारले त्यांच्यापैकी कोणा तरी एकाशी त्यांचा सक्तीने निका लावण्यात आला. या स्त्रियांच्या तोंडावर प्रेत-

कळा दिसत होती. त्यावर निराशाही दिसत नव्हती. कारण निराशेतही काही हालचाल असते, पण तीही त्यांच्या तोंडावर दिसत नव्हती. त्या शून्याकार दृष्टीने व निर्विकार मुद्रेने समोर पाहात होत्या. त्यांची दृष्टि निश्चेष्ट दिसत होती. त्यांच्या भावना नष्ट झाल्या होत्या. ज्या स्त्रियांनी आक्रमकांचा प्रतिकार केला अशा कित्येक जखमी होऊन पडल्या होत्या. आक्रमकांचा यशस्वी प्रतिकार करणे त्यांस अशक्य होते. या लोकांना जिवंत राहण्यासाठीची किंमत म्हणून त्यांच्या तोंडात जबरीने गोमांस कोंबण्यात आले व मुसलमानी धर्माला त्यांजकडून सक्तीने मान्यता घेण्यात आली. या भागात जे अत्याचार व जाळपोळ झाली त्या संबंधाने इतके तरी निर्विवादपणे म्हणता येईल की, गावकऱ्यांनी एकाएकी उसळून केलेल्या प्रकारांपैकी हा प्रकार म्हणता येत नाही. बंगालमधील गुंड लोकांनी काय वाटेल ते केले तरी त्यांना स्वतःच्या प्रेरणेने अशा प्रकारची चळवळ संघटित करणे केवळ अशक्यच होते. घरांवर पेट्रोलचे फवारे उडवून ती जाळण्यात आली. त्यांना नियंत्रित असलेले हे पेट्रोल कोणी दिले ? त्यांना स्टिरप पंप या इतक्या दूरवरच्या प्रदेशात कोणी पुरविले ? त्यांना हत्यारे कोठून मिळाली ?"

हा सर्व वृत्तान्त समजल्यावर "मेलेली मढी जिवंत होऊन थरारतील, मी तर चांगला जिवंत आहे" असे पं. नेहरू यांनी उद्गार काढले.

ना. सुऱ्हावर्दी यांनी या बातम्या अतिरंजित आहेत म्हणून तक्रार केली पण हे सर्व अत्याचार मुसलमानांनीच केले आहेत अशी कबुली त्यांनी स्वमुखाने दिली. लक्ष्मीपूर येथे दि. १८ नोव्हेंबर रोजी एका प्रचंड सभेत भाषण करताना सुऱ्हावर्दी म्हणाले की "जरी या भागात थोड्याच घटना घडल्या असल्या व जरी समाजांपैकी एका लहानशा विभागानेच त्या घडविल्या असल्या तरी आपण सर्वांनी झालेल्या प्रकाराचा असंदिग्धपणे निषेध केला पाहिजे. काही झाले तरी गुन्हे करणारे मुसलमान जातीचे होते. आणि आपण आता ताबडतोब प्रयत्न करून शांतता प्रस्थापित केली पाहिजे."

या सर्व भयानक परिस्थितीचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. बिहारमध्ये त्याचा सूड घेतला गेला. सरदार वल्लभभाई दि. २ नोव्हेंबर रोजी एका निवेदनात स्पष्टपणे म्हणाले की आम्ही व्हाईसरॉयला असे बजावले होते की, जर बंगालमधील अत्याचार थांबले नाहीत तर बिहारमध्ये त्यांचा सूड घेतला जाईल व त्याच्या पाठोपाठ सर्व हिंदुस्थानभर ही लाट पसरेल, आणि मग परिस्थिति आवाक्याबाहेर जाण्याचा संभव आहे. बिहारच्या बाबतीत तरी ही भीति खरी ठरली आहे.

गांधींनी दि. २ जानेवारी १९४७ पासून विशेषतः नौखाली भागाचा दौरा सुरू केला. त्यांनी मासिमपूर (नौखाली) येथील दि. ८।१।१९४७ च्या आपल्या

दैनिक प्रार्थनेला अनेक मुसलमानांना बोलाविले होते. पण या प्रार्थनेत रामनामाचा उच्चार सुरू होताच मुसलमान उठून जाऊ लागले. तेव्हा गांधींना अतिशय वाईट वाटले. मुसलमानांना रामनाम आवडत नाही असेही त्यांना सांगण्यात आले.

या दौऱ्यांत गांधींनी वेळोवेळी व्यक्त केलेले अभिप्राय त्या वेळच्या वृत्त-पत्रांतून व गांधींच्या ' हरिजन ' वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले आहेत. गांधी म्हणाले, " गेल्या ऑक्टोबर १९४६ मध्ये नौखालीत जे काय घडले त्याच्यामागे दुसऱ्या धर्माबद्दल असहिष्णुता दाखविणारी वृत्तीच होती. येथील हिंदु संख्येने कमी असतील; पण राम व खुदा ही दोन्ही नावे एकाच देवाची आहेत हे ओळखले पाहिजे. पाकिस्तानात वाटेल त्याला आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याची मोक-ळीक राहील असे सांगितले जाते; परंतु मी आज येथे जे प्रत्यक्षपणे पाहात आहे ते काही निराळेच आहे."

मासिमपूरच्या ग्रामसेवा संघाने गांधींना सादर केलेल्या पत्रकात दंग्याच्या वेळच्या प्रत्यक्ष नुकसानीचे आकडे दिले. त्यात ६६९ घरे लुटण्यात आली व ३३४ घरे जाळून टाकण्यात आली. वित्तहानि १७ लाखांहून अधिक झाली. अल्पसंख्य (हिंदु) जमातीची माणसे मात्र मेली नाहीत. कारण सर्वांनीच धर्मान्तर केले.

रामगंज ठाण्यातील हिंदूच्या एका घराची गांधींनी पाहणी केली. तेव्हा त्यांना तेथे मृत माणसांच्या कवटया, हाडे, जळालेली लाकडे व घरमालकाच्या घरगुती मालमत्तेच्या झालेला चुराडा असे दृश्य दिसले. गांधी आले असल्याचे सम-जताच भोवतालच्या घरांतून सुमारे शंभर स्त्रिया तेथे गोळा झाल्या. त्या एक सारख्या रडत होत्या. आमची सौभाग्यलेणी (पति) गुण्डांनी नष्ट करून टाकली असून त्यांनी आम्हांला बळजबरीने बाटविले आहे असे त्या स्त्रियांनी गांधींना सांगि-तले. डॉ. सुशीला नायर यांच्याबरोबर गांधी आणखी एका जवळच्या गावी गेले. तेथे १६ घरे भस्मसात् झाली होती. तेथे फक्त एक माणूस जिवंत होता. तो मुका होता. त्याने खुणांच्या साहाय्याने गांधींना अत्याचारांचे वृत्त समजून दिले. या सर्व घटनांचा गांधींच्यावरही बराच परिणाम झाला व मौनाचा दिवस असूनही (दि. ११।११।४६) गांधींनी भाषण केले. त्यात ते म्हणाले : मी ज्या ज्या ठिकाणी हिंडलो त्या त्या जागी मला हिंदूंची जळलेली घरे दिसली व सक्तीच्या धर्मान्तराची कहाणी ऐकावयास मिळाली. हिंदु स्त्रियांच्या कपाळाला कुंकू नव्हते व हातात बांगडया नव्हत्या. मुसलमानांनी या अत्याचारांचा निषेध करावयास पाहिजे.

पण मुसलमानांकडून कसलेही सहकार्य मिळत नसल्याचे गांधींना आढळून आले. मुस्लिम लीग श्रेष्ठींकडून सूचना मिळाल्याशिवाय आपण शांतता प्रस्थापनेचे काम हाती घेणार नाही असे स्थानिक मुसलमानांनी गांधींना स्पष्ट सांगितले. बंगाल सरकारने या दंगलीची पाहणी करण्याकरिता नेमलेल्या अधिकाऱ्यांनी शेकडा

८०–९० टक्के घरे जाळण्यात आल्याचे व नामशूद्रांची शेकडो कुटुंबे बाटविण्यात आल्याचे मान्य केले.

पूर्व बंगालमधील अत्याचारांत भाग घेणाऱ्या गुन्हेगारांना अटक करण्यात येत नसे. गांधींच्या आश्रमातील एक मुसलमान महिला अमतुस सलाम यांनी वीस खेडचांना भेटी दिल्या. त्यांनी आपला अनुभव सांगताना म्हटले की खून, स्त्रियांना पळविणे, सक्तीची धर्मान्तरे व जाळपोळ या बाबींसाठी अटक करावयाची झाल्यास २० खेड्यांतील फक्त दोन व्यक्ति सोडून सर्वांनाच अटक करावी लागेल.

गांधी आपल्या दौऱ्यात हिंदु निर्वासितांनी आपापल्या गावी परत राहण्यास जावे असे सांगत असले तरी तसे घडत नसून लोक अद्याप बाहेरच पडत असल्याचे गांधींना आढळून आले. लीग श्रेष्ठींच्या स्पष्ट आज्ञा असल्याशिवाय हिंदूंना सुरक्षिततेची हमी द्यावयास मुसलमान तयार नाहीत असे मुसलमानांनी गांधींना स्पष्ट सांगितले. या परिस्थितीत निश्चित काय करावे हे मला समजत नाही, प्रकाश दिसेल अशी मी आशा करतो, पण मी तुम्हांला मार्गदर्शन करू शकत नाही असे गांधींनी निर्वासितांच्या छावण्यांतील हिंदूंना सांगितले. दिल्ली येथील मुक्कामात (२४।१२।४६) प्रार्थना समयी लोकांनी गांधींना उद्देशून घोषणा केल्या. बंगाली हिंदूंना हत्याकांडापासून वाचवा, पळविलेल्या स्त्रियांची मुक्तता करा अशी लोकांची मागणी होती. त्यांस उद्देशून गांधी म्हणाले, "बंगालमधील अत्याचारांनी ज्याचे हृदय विदीर्ण झाले नाही असा एकही पाषाणहृदयी माणूस आपणांस आढळणार नाही. ही प्रत्यक्ष कृतीची वेळ आहे. करिता तोंडाची वाफ दवडू नका. मारा किंवा मरा. परंतु नुसती बडबड न करता मारण्यास वा मरण्यास शिका. मी मात्र तुम्हांस मरण्याचे शास्त्र शिकवू इच्छितो. गांधींनी स्त्रियांना उद्देशून उपदेश करताना म्हटले की त्यांनी जवळ विषाची पुडी बाळगावी व संकट ओढवताच विषप्राशन करून आत्महत्या करावी.

बंगालच्या किंकाळ्यांनी नगरचे विष्णु रामकृष्ण करकरे हे अगदी बेचैन झाले होते. नगरला असताना ते हिंदुसभेची सर्वसामान्य कामे आस्थेने करीत. विशेषतः शुद्धिकार्यात त्यांना रस असे. तसेच संकटात सापडलेल्या स्त्रियांना सोडविण्याचेही काम ते करीत, बंगालमधील अत्याचारांच्या वार्ता ऐकून त्यांनी बंगालमध्ये मदतीसाठी महाराष्ट्रातर्फे एक पथक घेऊन जाण्याचे ठरविले. त्यांनी या कार्यासाठी काही निधि गोळा केला, कपडे गोळा केले व ते दि. ५ नोव्हेंबर १९४६ ला बंगालकडे जाण्यास निघाले.

नागपूरला त्यांना श्री. द. मा. देशमुख व श्री. चांदे हे येऊन मिळाले. नागपूर सोडण्यापूर्वी त्यांनी त्या वेळच्या मध्यप्रदेशाचे गृहमंत्री श्री. द्वारकाप्रसाद मिश्र यांची भेट घेतली व नौखालीच्या हिंदूंसाठी मदतीची मागणी केली. त्यांनी सहानुभूति

दिली. नागपूरहून करकरे रायपूरला गेले. तेथे स्टेशनवरच त्यांना एक मुसलमान गुंड एका तरुण हिंदु स्त्रीला पळवून नेत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. चंद्राबाई नावाच्या या महिलेला शेरखां अबदुल हुसेन नावाचा मुसलमान गुंड पळवून नेत होता. त्याच्या तडाख्यातून करकरे यांनी चंद्राबाईची सुटका करून तिला रायपूरचे प्रख्यात हिंदु पुढारी लाला गुरुदत्त मल्ल यांच्याकडे पोचविले. पुढे हिंदुसभेतर्फे तिची शुद्धि करण्यात आली.

तेथून ही मंडळी कलकत्त्याला गेली. तेथे बो बाजारात हिंदुसभेचे कार्यालय होते. दि. १६ ऑगस्ट १९४६ च्या दंग्यात जखमी व निराधार झालेल्यांकरिता आश्रय केंद्र व इस्पितळ उघडण्यात आले होते. तेथील कार्यकर्त्यांची भेट घेऊन करकरे यांची तुकडी बजबज येथे गेली. तेथेही एक आश्रय केंद्र उघडण्यात आले होते. तेथील स्त्रियांना व मुलांना कपडे हवे होते. करकरे यांनी आपल्याबरोबर आणलेल्या कपड्यांचे तेथे वाटप केले. तेथे हिंदुसंस्थांनी अनेक मदत केंद्रे उघडली होती. तेथून ते चांदपूर येथे गेले. तेथे पाकिस्तानी अत्याचारांचा भेसूर थैमान सुरू होता. मुसलमान गुंड अल्ला हो अकबरच्या घोषणा करीत व हातात पेटलेल्या मशाली घेऊन मिरवणुकीने जाळपोळ करीत होते. चांदपूरला बंगालमधून गेलेल्या एका मदत तुकडीत कलकत्त्यातील एक वृत्तपत्रकार त्यांना भेटले. त्यांनी नौखालीच्या अत्याचारांचे टिपण केलेले कागद करकरे यांना पाहावयास मिळाले. खावयास अन्न नाही, व अंगावर वस्त्र नाही अशा स्थितीत हजारो स्त्रीपुरुष तेथे आलेले होते. चांदपूरहून दौलतगंज, विपुला, सोनाइमुरी इत्यादि हिंदु वस्तीच्या गावांना त्यांनी भेटी दिल्या; पण आता त्या गावांत एकही हिंदु राहिला नव्हता. सोनाईपुरी येथे मुसलमान होण्यास जे तयार झाले नाहीत त्यांना एकत्र करून त्यांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करण्यात आली होती. त्यांच्या प्रेतांनी भरलेला खड्डा पाहून पाकिस्तान ही काय चीज आहे याची प्रचिती आली असे करकरे यांनी उद्‌गार काढले. येथे झालेले सर्वच अत्याचार अंगावर शहारे आणणारे होते. येथून जवळच दलाल बाजार येथे करकरे गेले. तेथे रॉय नावाचे एक संपन्न घराणे होते. त्यांची तिजोरी फोडता येईना व ती इतकी जड होती कीं गुंडांना हलविता येईना. शेवटी क्रेन आणून ती नेण्यात आली व पेट्रोल फवारून त्यांचा प्रचंड वाडा जाळून टाकण्यात आला. तेथून नंदीग्राम, हाजीगंज, श्रीपूर, बादलपूर इत्यादि नौखाली जिल्ह्यांतील अनेक गावांना करकरे व त्यांचे सहकारी यांनी भेटी दिल्या व बंगाली हिंदूबद्दल महाराष्ट्राची सहानुभूति त्यांनी व्यक्त केली.

नौखाली जिल्हा हिंदुसभेचे अध्यक्ष राजेंद्रलाल राय हे होते. त्यांनी व त्यांच्या कुटुम्बीयांनी मुसलमानांच्या गुण्डगिरीला विरोध व प्रतिकार करण्याचा खूप प्रयत्न केला; व अखेर लढता लढता ते प्राणास मुकले.

आचार्य कृपलानी यांनीही म्हटले की I am clearly of the opinion that what the Government, Provincial or Central, may or may not do, every Bengalee, male or female, has to defend himself or herself, by whatever means he or she can think. In this connection, I could keep before every Bengalee the example of Shri Rajendralal Roy and his family who defied a mob for full two days and fell fighting. Even as a believer in absolute non-violence, I hold that resistance offered by Shri Rajendralal Roy and his family was the nearest approach to non-violence. (माझे असे स्पष्ट मत आहे की प्रांतिक किंवा केंद्रीय सरकार काही करो वा न करो, प्रत्येक बंगाली स्त्री-पुरुषाने सुचतील त्या साधनांनी स्वतःचे रक्षण केले पाहिजे. श्री. राजेंद्रलाल रॉय आणि त्यांच्या कुटुंबीयांनी दोन दिवसपर्यंत जमावाला मोठ्या शर्थीने तोंड दिले आणि लढत लढत ते प्राणास मुकले. आत्यन्तिक अहिंसावादीही असणाऱ्या माझे असे मत आहे की राजेंद्रलाल रॉय आणि त्यांच्या कुटुंबीयांनी केलेला हा प्रतिकार हा जवळजवळ अहिंसेच्याच घरात मोडतो.)

करकरे यांनी आपल्या या दौऱ्याचे वृत्त प्रसिद्ध केले. पुढे गांधींनीही नौखालीचा दौरा केला व मुसलमानांचे मन वळविण्याचा व हिंदु अबलांचे अश्रु पुसण्याचा प्रयत्न केला. पण जखम काळजात इतकी खोलवर गेलेली होती की, त्याचा काही परिणाम झाला नाही. गांधींनी उद्‌गार काढले : The question of East Bengal is not one of Bengal alone. The battle for India is to day being decided in East Bengal. (पूर्व बंगालचा प्रश्न हा केवळ बंगालचा प्रश्न राहिलेला नाही. पूर्व बंगालमध्ये हिंदुस्थानचीच लढाई आज लढली जात आहे.) गांधींच्या अहिंसेला मुसलमानांचे हे उत्तर होते.

या नौखालीच्या भीषण हत्याकांडाचा करकरे यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला होता. आत्यन्तिक अहिंसेचे व मुस्लिम अनुनयाचे धोरण या सर्व परिस्थितीस जबाबदार आहे असे त्यांचे या परिस्थितीने मत झाले होते. गांधी खून खटल्यात त्यांना पुढे जन्मठेपेची शिक्षा झाली. नौखालीच्या भीषण हत्याकांडाचे तेही शासनाचे एक प्रकारचे बळी ठरले.

१९४१ पासून १९४७ पर्यंत मुंबईतही मधून मधून मुसलमानांचे दंगे होत. हिंदु समाजावर राजकीय दडपण आणून त्यास पाकिस्तान मान्य करण्यास भाग पाडण्यासाठी दहशत निर्माण करण्याचे मुसलमानांचे धोरण होते. दंगे व अत्याचार करून ही दहशत निर्माण करण्याचा त्यांचा मार्ग होता. त्याला हिंदूंनीही शक्य तेथे प्रतिकार केला. १९४६ वर्षी मुंबईच्या दंग्यांच्या काळात मुसलमान वस्तीतील अल्पसंख्य हिंदूंना संरक्षण देणे, त्यांना सुरक्षितपणे अन्यत्र पोहोचविणे, कोकणातून

बोटींनी येणाऱ्या लोकांना सुरक्षितपणे त्यांच्या त्यांच्या जागी पोहोचविणे, कोठे सुरामारी किंवा दंगल झाली तर तेथे धावून जाऊन लोकांना संरक्षण देणे, जखमींना इस्पितळात पोहोचविणे ही कामे हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर केली. यासाठी मुंबई हिंदुमहासभेचे सुमारे दीडशे कार्यकर्ते निरनिराळ्या साहाय्य केन्द्रांत सतत काम करीत होते. त्यासाठी सहा ठिकाणी मदत केंद्रे निर्माण करण्यात आली होती. ती अशी : (१) गिरगाव–प्रमुख रा. के. नगरकर; (२) खेतवाडी–प्रमुख गं. बा. परमेकर; (३) सातरस्ता–प्रमुख लक्ष्मणराव चाळके व रघुनाथ घोडेकर; (४) चिंचपोकळी–प्रमुख रा. तु. मसुरकर; (५) दादर–प्रमुख बाळाराव सावरकर व ल. र. साटेलकर, (६) परळ–प्रमुख प. म. पेंडसे व केसरकर.

हिंदुसभेच्या खेतवाडी केंद्रावर कार्य करणारे प्रमुख श्री. गं. बा. परमेकर व पंडित बखले यांना दंग्यात भाग घेतल्याबद्दल सरकारने चार महिने स्थानबद्ध करून ठेवले होते. पण सरकारच्या या आक्रमक धोरणामुळे खचून न जाता कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने आपले कार्य चालू ठेवले. हे कार्यकर्ते अहोरात्र या मदत कार्यात गुंतलेले असत.

दंगलग्रस्त भागात हिंडून लोकांना संरक्षण देणे, त्यांची ने आण करणे इत्यादि कामे ते करीत. त्यासाठी त्यांनी पांच सहा लॉऱ्या ठेवल्या होत्या. अनंत हरि गद्रे हे या काळात मुंबई हिंदुसभेचे अध्यक्ष होते व स्वयंसेवक पथकांचे नेतृत्व श्री. नगरकर, परमेकर, वासुदेव नाना पवार, लक्ष्मण नारायण पवार, महादेव श्रीधर पराडकर, देसाई मास्तर, वाघ, दत्तात्रेय अर्जुन पुजारी, गावडे, राणे, परब, ओघले शास्त्री, नरसीशेठ इत्यादि मंडळी करीत होती. या कार्यात त्यांनी फार मोठा भाग घेतला. त्यांच्यामुळेच ही कार्ये व्यवस्थित रीतीने पार पडू शकली. हिंदुसभेने या कार्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधि उभा केला. कारण तिचा रोजचा खर्च सुमारे चारपाचशे रुपयांचा होता. मोरारजी देसाई यांना हिंदुसभेचे संरक्षण कार्य पाहण्याची एक दिवस इच्छा झाली. त्यांनी इच्छा व्यक्त केल्यावरून हिंदुसभेच्या मोटारीतून त्यांना दंगलग्रस्त भागांतून हिंडविण्यात आले. तेव्हा जेथे रस्ते गजबजलेले असावयाचे तेथे त्यांना शुकशुकाट दिसला. हिंदुवस्तीतून मुसलमान व मुसलमान वस्तीतून हिंदु निघून गेले होते. त्यामुळे वातावरण संशयग्रस्त स्थितीतच असल्याचे त्यांना आढळून आले.

ब्रिटिशांनी स्वातंत्र्य कां दिले ?

१९४७ च्या मार्च महिन्यात ब्रिटिश सरकारने माऊंटबॅटन यांना सर्वाधिकार देऊन व त्यांची व्हाइसरॉयपदी नेमणूक करून हिंदुस्थानात पाठविले. त्यांनी प्रथम निरनिराळ्या योजना काँग्रेस व मुस्लिम लीग यांजपुढे ठेवल्या. प्रथम अखंड हिंदुस्थान ठेवण्याच्या पायावर त्यांची रचना होती. लीगला ते मान्य नव्हते व काँग्रेस

फाळणीला तयार होती. तेव्हा माऊंटबॅटन यांनी पंजाब, बंगाल व आसाम यांचीही फाळणी करुन मुस्लिम बहुसंख्य वस्तीचा प्रदेश पाकिस्तानात व बाकीचा हिंदुस्थानात दाखल करण्याची योजना स्वीकारली व जुलै १९४७ पर्यंत फाळणीचे सर्व काम झपाट्याने उरकले. तथापि लाहोर व कलकत्ता शहरांच्या संबंधात वाद राहिला होता. तो निकालात काढण्याचे काम रॅडक्लिफ कमिटीकडे सोपविण्यात आले. तीत एक हिंदु व एक मुसलमान सभासद होता. त्यांच्यात एकमत झाले नाही. तेव्हा एकट्या रॅडक्लिफ यांनी निर्णय दिला. त्यांनी लाहोर पाकिस्तानला व कलकत्ता हिंदुस्थानला देऊन वाद निकालात काढला. ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यासंबंधीचे विधेयक ब्रिटिश पार्लमेंटात दि. ४।७।४७ ला मांडले व ते तेथे पास होऊन त्यावर ब्रिटिश बादशहाची दि. १८।७।४७ ला सही झाली व ब्रिटिशांची हिंदुस्थानावरील सत्ता समाप्त झाली.

आपण हे सत्तान्तर करण्यास कां तयार झालो, हे पार्लमेंटमध्ये सांगताना त्या वेळचे पंतप्रधान ॲटली म्हणाले की Britain is transferring power due to the fact that the Indian mercenary army is no longer loyal to Britain and Britain cannot afford to have a large British army to hold down India. (हिंदुस्थानातील पोटभरू हिंदी सेना ब्रिटनशी एकनिष्ठ राहिली नाही व हिंदुस्थान आपल्या कबजाखाली ठेवण्यापुरेसे ब्रिटिश सैन्य बाळगण्याचे ब्रिटनजवळ सामर्थ्य राहिले नाही.)

यावरूनच आपण हिंदुस्थानवरील सत्ता कां काढून घेत आहो व सत्तान्तरास कां तयार झालो याचे ब्रिटिश पंतप्रधानांनी स्पष्ट उत्तर दिले आहे. हिंदुस्थानातील सेना ही पोटभरू सैनिकांची आहे अशी ब्रिटिशांची या वेळपर्यंत धारणा होती व हिंदुस्थानावरील आपली पकड सोडण्याची ब्रिटिशांची मुळीच इच्छाही नव्हती. या आधी काही दिवसांपूर्वी याच पार्लमेंटात या प्रश्नावर युद्धकाळात चर्चा चालू असताना त्या वेळचे पंतप्रधान चर्चिल यांनी म्हटले होते की, मी काही ब्रिटिश साम्राज्य मोडीत काढण्याकरिता महामंत्री झालेलो नाही. (I have not become the Prime Minister of Her Majesty's Government to liquidate the Empire.) ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची ही धारणा स्पष्ट होती. तथापि परिस्थिति अशी निर्माण झाली की इंग्रजांना हिंदुस्थान सोडणेच भाग पडले.

हिंदुस्थानातले सैन्य हे पोटभरूंचे नव्हते. ते राष्ट्रीय सैन्य होते. संधि मिळताच त्यांनी उठाव केला व सुभाषबाबूंच्या नेतृत्वाखाली बंड उभारले. त्याच बरोबर नाविक व वैमानिक दलानेही बंड केले. तेव्हा आता अन्य उपाय राहिला नाही. शिवाय युद्धात केलेल्या घोषणांचे दडपण व युद्धात ब्रिटनची हाडे खिळखिळी झालेली, या सर्वांचा सामुदायिक परिणाम म्हणजेच हे सत्तान्तर होते. हिंदी सैन्याच्या संबंधाने स्वा. सावरकर म्हणाले : They are not rice soldiers. They are

not serving the British. They are learning and getting the training of war. Let them take up the rifles, know the machine guns, and latest baloons and when the day of our rising will come they will be the soldiers who will be in the forefront. (ते काही भाडोत्री किंवा पोटभरू सैनिक नाहीत. ते ब्रिटिशांची सेवा करण्यासाठी सैन्यात गेलेले नाहीत. ते तेथे युद्धकलेचे शिक्षण घेत आहेत. त्यांना बंदुका घेऊ द्या, मशीनगन्स चालवावयास येऊ द्या. त्यांना वैमानिक बनू द्या. जेव्हा उठावाचा क्षण येईल तेव्हा हेच सैनिक आघाडीवर लढताना दिसतील.)

सैन्य भरतीच्या मागे स्वा. सावरकरांचे जे उद्दिष्ट होते ते त्यांच्या या वरील उद्‌गारातून स्पष्ट झाले आहे. असे असूनही काँग्रेसने व काही हिंदुत्वनिष्ठ संघटनांनीही त्यांना इंग्रजाचे दास व लाचार वृत्तीचे म्हणून हिणविण्यास कमी केले नाही. पण अशा निंदा-स्तुतीला भीक घालणारे सावरकर नव्हते. रघुवंशात म्हटल्याप्रमाणे

कातर्यं केवला नीतिः शौर्यं श्वापदचेष्टितम् ।
ततः सिद्धिसमेताभ्यामुभाभ्यामन्वियेष सः ।।

सावरकर हे आपल्या वास्तव ध्येयापासून केव्हाही ढळले नाहीत. राष्ट्रीय प्रेरणेमुळे भारतीय सेना ही राष्ट्रवादी ठरून तिने इंग्रजांना येथे राज्य करणे अशक्य करून टाकले. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले याचे कारण युद्धात इंग्रजांना कागदोपत्री जय मिळूनही इंग्लड हे दुबळे राष्ट्र बनले. हिंदुस्थानातील राष्ट्रवादी सेना बंड करून उठल्यामुळे इंग्रजांना सत्ता सोडून जाणे भाग पडले. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हा सावरकरांच्या विचारसरणीचा विजय होता. तथापि या देशात लोकमत जागृत व संघटित करण्याचे कार्य काँग्रेसने अनेक वर्षे सातत्याने केले होते. त्यामुळे १९४५ अखेर जेव्हा निवडणुका झाल्या तेव्हा काँग्रेस विजयी झाली. त्या वेळीही काँग्रेस नेत्यांनी आपण कोणत्याही परिस्थितीत देशाची फाळणी होऊ देणार नाही अशा आणाभाका दिल्या होत्या. त्यामुळे लोकांनीही काँग्रेसला विश्वासाने निवडून दिले. तथापि ही प्रतिज्ञा निवडणुकीनंतर काँग्रेसवाल्यांनी मोडली व देशाची फाळणी स्वीकारली. त्यामुळे या देशात नवेच प्रश्न निर्माण झाले. त्या आपत्ती या देशाला अजूनही भोगाव्या लागत आहेत.

हिंदूंनी केलेल्या आंदोलनामुळे व राष्ट्रीय सैन्य निर्माण झाल्यामुळे या देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष फायदा मुस्लिम लीगला मिळाला. त्यांनी युद्धकाळात मंत्रिमंडळे राबवून इंग्रजांवर आपले दडपण कायम ठेवले. त्यांनी एका बाजूने मुस्लिम सैन्य भरती करून आपल्या लढाऊ सामर्थ्याची वाढ केली आणि त्याच बरोबर हिंदुस्थानात जागोजाग दंगे निर्माण करून हिंदूंवर आपले दडपण वाढविले. गांधीवाद्यांच्या चकीच्या धोरणामुळे ते सतत वाढत राहिले. १९४० ते ४७ या

काळात हिंदुस्थानात जेवढे दंगे झाले व हिंदूंची जेवढी हानि झाली तेवढी त्याआधीच्या ५०० वर्षांतही झाली नव्हती. मुंबई, सक्कर, दिल्ली, लाहोर, कलकत्ता, नौखाली, जबलपूर, कोहट इ. शेकडो मोठ्या शहरांतून मुसलमानांनी दंगे घडवून आणले. कत्तलीच्या रूपाने मुसलमानांनी केलेल्या अत्याचारांना जगाच्या इतिहासात तोड राहिली नाही. एका बाजूने गांधींचा अहिंसावाद व दुसऱ्या बाजूने मुसलमानांचे अत्याचार या कात्रीत सापडल्यामुळे या देशाची फाळणी अपरिहार्य होऊन बसली. व्हाइसरॉयला आपल्या अहिंसेची भूमिका स्पष्ट करताना गांधींनी म्हटले की Already there has been a movement to win over to the Muslim side the so-called scheduled classes and the so-call ed aboriginal races. The cast Hindus who are the bugbear are, it can be shown conclusively, a hopeless minority. Of the armed forces, the Rajputs are not nationalist as a class. Brahmins and the baniyas are still untrained in the use of arms. Their supremacy, where it exists, is purely moral. The shudras count, I am sorry to say, more as a scheduled class than anything else. That such Hindu society, by reason of mere superiority of numbers, can crush millions of Muslims is an astounding myth. This should show you why, even if I am alone, I swear by non-violence and truth. (हिंदुस्थानातील वर्गीकृत जाती व जमाती यांना मुसलमानांच्या बाजूने वळविण्याचा मोठा प्रयत्न आधीपासूनच सुरू आहे. सवर्ण हिंदु जे त्यांच्या डोळ्यात सलतात तें तसे पाहिले तर अगदीच अल्पसंख्य आहेत. शस्त्रधारी रजपूत (लढाऊ जाती) या सर्व राष्ट्रीय वृत्तीच्या नाहीत. ब्राह्मण आणि वैश्य यांना शस्त्रधारणेचा सराव नाही. शूद्राविषयी बोलावयाचे म्हणजे ते वर्गीकृत जाती-जमाती सारखेच! अशा स्थितीत लक्षावधि मुसलमानांना आपल्या लोकसंख्येच्या बळावर हिंदु काबूत राखू शकतील असे मानणे हे एक थोतांडच आहे. मी सत्य-अहिंसेचा पुरस्कार एकटा असूनही कां करतो याचे कारण हे आहे.)

हिंदु समाजाच्या स्थितीचे गांधींनी केलेले हे वर्णन वास्तववादी नाही. त्यात सत्याचा अंश असला तर फारच थोडा आहे. मुसलमानी आक्रमणाला व अत्याचारांना हिंदूंनी कित्येक ठिकाणी चोख प्रत्युत्तरे दिली आहेत व जेथे ती त्यांना देता आली नाहीत तेथे ब्रिटिश सत्ताधारी आपल्या सैन्यबळासह आडवे आले तेथेच हिंदूंना माघार घ्यावी लागली. सैनिकी वृत्तीच्या बाबतीत तर हिंदु व मुसलमान दोघेही सारखेच होते व कित्येक बाबतीत रणक्षेत्रावर मुसलमानांपेक्षा हिंदूंनी अधिक पराक्रम दाखविला आहे. हिंदूंना सैन्यात भरती न करण्याचे व अधिकाराच्या जागा न देण्याचे ब्रिटिश सरकारचे धोरण होते व म्हणूनच शस्त्रबळात काही काळ हिंदु मागे असल्याचे आढळले. याच कारणास्तव पहिल्या

महायुद्धात लो. टिळकांनी व दुसऱ्या महायुद्धात स्वा. सावरकरांनी हिंदूंच्या सैन्य भरतीचा आग्रह धरला व सुशिक्षित, देशभक्त, राष्ट्रवादी तरुणांना सैन्यात शिरा असा उपदेश केला. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेल्या भाषणात लेखण्या मोडा व बंदुका हाती घ्या हा जो उपदेश केला त्याचे रहस्य हेच होतें. युद्धापूर्वी सैन्यातील हिंदु व मुसलमान यांचे परस्पर प्रमाण १ : २ होते. ते ४ वर्षांत उलट होऊन ३ : २ असे झाले. सावरकरांच्या प्रभावी प्रचाराचा हा परिणाम होता व त्यामुळेच हिंदुस्थानातील सेना इंग्रजांना एकनिष्ठ राहिली नाही व हिंदुस्थान आपल्या ताब्यात ठेवण्याइतके ब्रिटिश सैन्य आपण ठेवू शकत नाही व म्हणून आपणाला हिंदुस्थानला स्वातंत्र्य द्यावे लागत आहे असे उद्गार ब्रिटिश पंतप्रधानांना काढावे लागले. सावरकरांच्या तत्त्वज्ञानाचा हा निःसंदिग्ध विजय होता.

मुसलमानांच्या अत्याचारांनाही असेच कठोरपणेही विरोधाचे धोरण काँग्रेसने स्वीकारले असते तरीही ते अत्याचार इतक्या थराला गेले नसते. बंगालमध्ये मुस्लिमलीगचे मंत्रिमंडळ सत्तेवर असताना कलकत्यात मुसलमानांनी हिंदूंच्या ज्या कत्तली केल्या त्याची प्रतिक्रिया बिहारमध्ये झाली व मुसलमानांनाही दे माय धरणी ठाय होऊन त्यांनी बिहार प्रांतातून पूर्व बंगालमध्ये पलायन केले. आज बांगला देशात पाकिस्तानवादी बिहारी मुसलमानांचा जो प्रश्न निर्माण झाला आहे तो बिहारमध्ये हिंदूंनी केलेल्या उठावामुळेच निर्माण झालेला आहे.

*

(११)

संघटनात्मक कार्य

हिंदुसभेचे कार्य महाराष्ट्रात वाढविण्याच्या कामाला १९४० पासूनच्या काळात विशेष गति प्राप्त झाली. स्वा. सावरकर हिंदुमहासभेचे अध्यक्ष झाल्यापासून हिंदुत्वाच्या विचाराला शास्त्रीय बैठक प्राप्त झाली होती. भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचा लढा यशस्वी रीतीने लढविल्यामुळे कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण होते. १९४० वर्षी महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वार्षिक सभेत कार्यवाहपदी श्री. शंकर रामचंद्र दाते यांची निवड करण्यात आली. प्रांतिक हिंदुसभेच्या घटनात्मक कारभाराला व्यवस्थित रूप प्राप्त व्हावे म्हणून नवीन नियमावलि तयार करण्यात आली व प्रांत, जिल्हा व स्थानिक हिंदुसभांच्या परस्पर संबंधांची घटनात्मक कारभाराची स्वतंत्र आखणी करून साखळी करण्यात आली. या काळात महाराष्ट्राचे कार्यक्षेत्र पश्चिम भागापुरते दहा जिल्ह्यांचे व त्यांतील संस्थानांपुरते मर्यादित होते. मराठवाडा निजाम राज्यात होता व विदर्भ मध्यप्रांतात होता.

प्रचार दौरे

या काळात दुसरे महायुद्ध सुरू झालेले असल्याने राजकारणाला विशेष गति प्राप्त झालेली होती. म्हणून हिंदुसभेचे धोरण सर्वत्र प्रसृत करण्यासाठी योजना आखण्यात आल्या. त्यासाठी महाराष्ट्रभर दौरे काढण्याचे ठरले. रत्नागिरी जिल्हयापासून त्यास प्रारंभ झाला. श्री. शंकर रामचंद्र दाते, श्री. गंगाधर विश्वनाथ उपाख्य नानासाहेब गोखले व पं. नथुराम विनायक गोडसे यांनी हे काम अंगावर घेतले. रत्नागिरी जिल्हयातील दौऱ्यास जानेवारी १९४१ पासून प्रारंभ झाला. रत्नागिरी हिंदुसभेचे कार्यवाह पेंशनर महालकरी श्री. गोविंद विसाजी गोगटे हे होते. त्यांनी रत्नागिरीस मोठी बैठक भरविली, व दौऱ्याची आखणी केली. या दौऱ्यात रत्नागिरी, राजापूर, जैतापूर, देवाचे गोठणे, डोंगर, वाडे, देवगड, विजयदुर्ग, खारेपाटण, कोर्ले, कुवेशी, जानशी, मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी इत्यादि गावी दौरा झाला. प्रकट सभा, खाजगी बैठका व भेटी असे कार्यक्रम असत. जेथे हिंदुसभेची शाखा नव्हती तेथे ती स्थापन करण्यात येत असे. या दौऱ्याचा चांगला उपयोग झाला. या दौऱ्यात रत्नागिरी जिल्हयातील बरीच मंडळी ठिकठिकाणी येऊन मिळत व काही ठिकाणी दौऱ्यात सहभागीही होत. या दौऱ्याच्या आखणीत पुढाकार घेणारे व मार्गदर्शन करणारे रत्नागिरी जिल्हयाचे एक पुढारी श्री. नारायणराव जोग हे आकस्मिकपणे जैतापूर येथील मुक्कामात निधन पावले. त्यांचे चिरंजीव केशवराव यांनी वडिलांचे कार्य पुढे चालविले आहे. ते प्रांतिक हिंदुसभेचें एक कार्यकर्ते आहेत.

दुसऱ्या फेरीत उत्तर रत्नागिरीत दौरा झाला. त्यात संगमेश्वर, चिपळूण, गुहागर, खेड, दापोली, हर्णै, पालगड, केळशी, आंजर्ले इत्यादि भागांचा त्यांनी दौरा केला. जागोजाग हिंदुसभा शाखा स्थापन करणे, त्यांच्या कार्याला घटनात्मक वळण लावून देणे, चालू राजकारणाचा प्रकट सभांतून व खाजगी बैठकीतून प्रचार करणे ही कामे झाली. याचप्रमाणे पुढे सातारा, सोलापूर, नगर, धुळे, जळगाव, नाशिक व कुलाबा या जिल्ह्यातही सर्वत्र दौरे झाले. पुण्यातील व इतर जिल्ह्यांतील अनेक कार्यकर्त्यांनी दौरे काढून महाराष्ट्रातील बहुतेक सर्व तालुक्यांच्या ठिकाणी व काही त्यापेक्षाही लहान गावी दौरे काढून हिंदुसभेच्या शाखा स्थापन केल्या व सैनिकीकरणाची मोहीम काढली. हे काम दर महिन्यातून चार आठ दिवस चाले. अशा रीतीने १९४३ अखेरपर्यंत महाराष्ट्राच्या दहा जिल्ह्यांत एकूण ९२ शाखा स्थापन झाल्या होत्या व त्यांचे काम व्यवस्थित चालू झाले होते. सभासदांची संख्याही पन्नास हजारांहून अधिक होती. एकटया पुण्यात दहा हजारांवर हिंदुसभेचे सभासद नोंदण्यात आले होते.

या काळात शुद्धिकरणाचेही काम मोठ्या प्रमाणावर चालू होते. हिंदु प्रचारक संघाने धुळे जिल्ह्यात हे काम मोठ्या प्रमाणावर केले. श्री. वि. ग. जावडेकर यांच्या नेतृत्वाखाली भिल्ल सुधारसंघ स्थापन करण्यात आला होता. भिल्ल समाजाच्या मुली पळवून नेणे व त्यांच्या स्त्रियांना भ्रष्ट करण्याचा उद्योग या भागातील मुसलमान मोठ्या प्रमाणावर करीत. त्यांना शुद्ध करून परत भिल्ल समाजात स्थिर करणे, त्यांच्यात शिक्षणाचा प्रचार करणे हीं कामे या संघातर्फे मोठ्या प्रमाणावर चालू होती. त्यांच्यासाठी अनेक गावी शाळा चालविण्यात येत.

बॅ. जमनादास मेहता यांची निवडणूक

मार्च १९४१ मध्ये दिल्लीच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची एक पोटनिवडणूक निघाली. ती बॅ. जमनादास मेहता यांनी लढविली व जिंकली. लोकशाही स्वराज्य पक्षाच्या वतीने ते उभे होते. त्यांचा मतदारसंघ जळगाव, धुळे, नाशिक, नगर, पुणे, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांचा होता. त्यांच्या प्रचारार्थ हिंदुसभेचे कार्यकर्ते सर्वत्र काम करीत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक व धुळे जिल्ह्यातील हिंदुसभेचे एक प्रमुख नेते श्री. त्र्यं. व्यं. उपाख्य भाऊराव कुळकर्णी यांनी धुळे जिल्ह्यातील त्यांचा दौरा आखला. ते त्यांजबरोबर सर्वत्र होते. इतरत्रही स्थानिक संघ कार्यकर्ते सहकार्य करीत. धुळे, नगर, जळगाव व नाशिक जिल्ह्यांत हिंदुसभेच्या वतीने दाते त्यांच्याबरोबर सर्वत्र होते. काही ठिकाणी स्वा. सावरकरांनीही त्यांच्यासाठी व्याख्याने दिली. केळकर, भोपटकर, राजवाडेप्रभृति मंडळी अनेक ठिकाणच्या दौऱ्यांत होती. त्यामुळे हिंदुसभेच्या कार्यास मोठी चालना मिळाली व हिंदुसभा, व लोकशाही स्वराज्य पक्ष या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत

याचा चांगला प्रचार झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही त्यांना सर्वत्र चांगले सहकार्य मिळत असे.

जून १९४१ मध्ये दि. ६ ला कोल्हापूर येथे डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली हिंदु धर्मपरिषद भरली. तेथे आक्रमणाचा प्रतिकार करण्यास हिंदुसमाजाने संघटित झाले पाहिजे असा त्यांनी उपदेश केला.

याच महिन्यात दि. २३ जूनला जर्मनी व रशिया यांचे युद्ध सुरू झाले. त्यामुळे जर्मनीला युरोपात पूर्व व पश्चिम आणि उत्तर आफ्रिकेतही लढावे लागले. या काळात अमेरिकेची अँग्लो-फ्रेंचांना मदत होती. त्यामुळे युद्धात जय पराजयांचे हेलकावे सुरू होते. त्याचा येथील राजकीय पक्षांच्या धोरणावर व राजकारणावर परिणाम घडून येत होता.

भोपटकरांची षष्ठ्यब्दीपूर्ति

हिंदुमहासभेचे एक पुढारी व भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनाचे एक नेते श्री. लक्ष्मण बळवंत उपाख्य अण्णासाहेब भोपटकर यांच्या वयाला दि. १० मे १९४० ला साठ वर्षे पूर्ण झाली. ह्यानिमित्त त्यांचा षष्ट्यब्दीपूर्ति समारंभ तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने साजरा झाला. त्या निमित्त त्यांना २५ हजार रुपयांची थैली देण्यात आली. अण्णासाहेब भोपटकरांना देण्यात आलेल्या या निधीच्या रकमेतून तिच्या विश्वस्तांनी हिंदुस्थानची भावी राज्यघटना कशी असावी याचा आराखडा तयार करण्याचे काम करण्याकरिता गोखले समितीला मदत दिली. ही समिति श्री. दामोदर विश्वनाथ उपाख्य बाबूराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आली होती. तिने एक नमुना घटनेचा मसुदा तयार केला. तोच पुढे लोकशाही स्वराज्य पक्षाने व हिंदुसभेने स्वीकारला. डॉ. आंबेडकरांनी या घटनेच्या प्रती मागून घेतल्या होत्या. तिचा उपयोग डॉ. आंबेडकरांनी घटनासमितीत मोठ्या प्रमाणावर केला. ती घटना व नंतर संसदेच्या घटनासमितीने केलेली सध्याची भारताची घटना यांतील बऱ्याच ठिकाणचे साम्य लक्षात घेण्याजोगे आहे.

त्या शिवाय ठिकठिकाणच्या हिंदुसभांनी भोपटकरांचे गौरव समारंभ घडवून आणले. भोपटकर हें नामांकित वकील, खंदे लेखक, झुंझार नेते, व शुद्ध राष्ट्रवादी विचाराचे पुढारी होते. पुण्याच्या लॉ कॉलेजात ते कित्येक वर्षे प्राध्यापक होते. पुण्यात होणाऱ्या अनेक सार्वजनिक कार्यांत त्यांचा पुढाकार असे. १९२४ वर्षी मुंबई विधानसभेवर ते निवडून गेले होते. कॉंग्रेसच्या सत्याग्रहाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतल्यामुळे ठाण्याच्या व येरवड्याच्या तुरुंगात त्यांना दोनदा बराच काळ तुरुंगवास भोगावा लागला. भागानगर निःशस्त्र प्रतिकाराच्या आंदोलनातही त्यांनी तुरुंगवास भोगला होता. महाराष्ट्रातील अनेक सार्वजनिक स्वरूपाचे खटले त्यांनी

वकील फी न घेता, एवढेच नव्हे तर अनेक प्रसंगी पदरमोड करून चालविले. श्री. वि. रा. पाटील, ग. म. नलावडे, वा. व. गोगटे, वीर यशवंतराव जोशी, शि. ल. करंदीकर, व १९४८ चा दिल्ली येथील स्वा. सावरकर यांच्यावरील गांधी खुनाचा खटला हे सर्व व असे इतर अनेक खटले अण्णासाहेब भोपटकरांनी विनामूल्य चालविले. गोरखपूर येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. लोकशाही स्वराज्य पक्षाचेही ते अध्यक्ष व खंदे पुढारी होते. तसेच महाराष्ट्र हिंदुसभेचे ते कित्येक वर्षे अध्यक्ष होते.

हिंदु शब्दाची व्याख्या कोणी केली ?

या काळात हिंदु शब्दाच्या व्याख्येसंबंधाने वृत्तपत्रांतून एक चर्चा सुरू झाली होती. हिंदु कोणास म्हणावे या संबंधाची स्वा. सावरकर यांची व्याख्या प्रसिद्ध आहे. "आसिन्धुसिन्धुपर्यन्ता यस्य भारतभूमिका। पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिन्दुरिति स्मृतः॥" ही व्याख्या स्वा. सावरकर यांनी ते अंदमानच्या तुरुंगात असताना बनविली होती. या व्याख्येच्या संबंधात नागपूरच्या महाराष्ट्र दैनिकाच्या दि. ८ सप्टेंबर १९४० च्या अंकात श्री. हरिहरराव देशपांडे यांचा एक लेख प्रसिद्ध झाला. त्यात त्यांनी ही व्याख्या बापूजी अणे यांनी केलेली आहे असे प्रतिपादन केले. तेव्हा "या व्याख्येचा कर्ता कोण" हा एक चर्चेचा विषय बनला. सुदैवाने या व्याख्येचे कर्ते सावरकर व बापूजी अणे दोघेही विद्यमान होते. सावरकरांनी बापूजी अणे यांना २७ सप्टेंबर १९४० ला पत्र लिहून ही व्याख्या अणे यांनी केली असे देशपांडे म्हणतात, पण आपलीही समजूत तशीच आहे काय ते कळवा असे विचारले.

ही व्याख्या अंदमानच्या तुरुंगात असताना आपण केली असल्याचे सावरकरांनी या पत्रात तपशीलवार लिहिले होते. त्याला बापूजी अणे यांनी ३० सप्टेंबर १९४० ला उत्तर पाठवून ती व्याख्या आपली नसून ती सावरकरांनीच केलेली आहे हे मान्य असल्याचा स्पष्ट खुलासा केला. या उत्तरपत्रात बापूजी अणे म्हणतात की, "गैरसमजुतीने किंवा गफलतीने हरिहरराव देशपांडे यांची चूक झाली आहे. १९१४ साली 'हिंदुधर्माची मीमांसा' या विषयावर मी एक लेख लिहिला होता व त्यात हिंदुत्वाचे लक्षण नमूद करताना ते चार श्लोकांत केले होते. त्यांचा प्रारंभ 'आसिन्धु-सेतुबन्धान्ता' असा होता. त्यामुळे हरिहरराव देशपांडे यांची गफलत झाली असावी."

स्वा. सावरकर व बापूजी अणे या दोघांच्याही विचारांत किती सादृश्य होते हे यावरून दिसून आले.

याच काळात मुसलमानांनी ठिकठिकाणी दंगली निर्माण केल्या. हिंदु समाजावर दडपण आणून त्यांना पाकिस्तान देण्यास भाग पाडणे हा त्यामागे मुख्य उद्देश

होता. ब्रिटिश सरकारची त्यांना फूस होती. या काळात मुंबईत व इतर अनेक ठिकाणी महाराष्ट्रात दंगे झाले.

दि. २६ मार्च १९४० रोजी महाड येथे मुसलमान गुंडांनी मोठा दंगा केला व त्यात महाडचे हिंदुसभेचे पुढारी श्री. पुरुषोत्तम प्रभाकर तथा बापूराव जोशी यांचे बंधु रघुनाथ प्रभाकर उपाख्य अप्पाराव जोशी यांना बेसावध गाठून मारहाण केली. अखेर त्यात त्यांचे दि. ३१ मार्चला निधन झाले. दंगा बराच वाढला. पोलिसांनी बापूराव जोशी व डॉ. डिंगणकर यांना अटक केली. भावाच्या अन्त्य-विधिसमयीही बापूरावांना सरकारने सोडले नाही. या दंग्यामुळे महाराष्ट्रात फार खळबळ माजली.

दि. २६ एप्रिल १९४१ ला मुंबईस मुसलमानांनी मोठा दंगा सुरू केला. त्याचा प्रतिकारही हिंदूंनी तसाच केला. १९४१ पासून पुढील चारपाच वर्षें हे दंगे मुंबईस मधून मधून सतत पेटत. त्यामुळे हिंदूंना आत्मरक्षणार्थ फार सावधगिरी व दक्षता बाळगावी लागे. विशेषतः कोकणातून बोटींनी मुंबईत येणाऱ्या लोकांना मुसलमान वस्तीतून यावे लागे तेव्हा त्यांच्यावर हल्ले होत; त्यासाठी त्यांना सुरक्षितपणे आणण्या-नेण्यासाठी मुंबई हिंदुसभेने श्री. अनंत हरि गद्रे यांच्या अध्यक्षतेखाली मोठी संघटना उभी केली. श्री. नगरकर, परमेकर यांनी या काळात विलक्षण धाडस दाखवून हिंदूंचा बचाव करण्याची कामगिरी पार पाडली. हे काम बरेच दिवस चालले होते. कारण दंगेखोरांना दंग्याची उबळ राहून राहून येत होती.

दि. २१ जून १९४० ला राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाचे सरसंघचालक डॉ. केशवराव बळीराम हेडगेवार यांचे निधन झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन करण्याच्या कामी त्यांचा पुढाकार होता व तेच संघाचे पहिले सरसंघचालक झाले. डॉ. मुंजे यांच्या सूचनेवरून संघाची स्थापना करण्याच्या संबंधात स्वा. सावरकरांचा सल्ला घेण्यासाठी ते १९२५ वर्षी रत्नागिरीस गेले होते. त्या वेळी रत्नागिरीस प्लेग असल्यामुळे सावरकरांचा मुक्काम शिरगाव येथे विष्णुपंत दामले यांच्याकडे होता. तेथे हेडगेवार व सावरकर यांच्यात बराच विचारविनिमय झाला. सावरकरांच्या आशीर्वादाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. नागपूरच्या १९३८ वर्षीच्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाच्या स्वयंसेवक दलाचे हेडगेवार हे प्रमुख होते. १९३८ वर्षीच त्यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यास हिंदुयुवकांचे एक मोठे संमेलन भरले होते. त्यांनी क्रांतिकार्यातही मोठा भाग घेतला होता. हिंदुमहासभेच्या सर्व कार्यांत त्यांचा भाग असे. भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात भाग घेण्याकरिता जाणाऱ्या तुकड्यांना निरोप देण्यासाठी भरणाऱ्या अनेक सभांना ते उपस्थित असत. त्यांच्या निधनाबद्दल हिंदुसभेने ठिकठिकाणी सभा भरवून दुखवटा व्यक्त केला. हेडगेवारांच्या पश्चात् सैनिकीकरणाच्या प्रश्नावर हिंदुसभेशी नव्या संघनेत्यांचे

मतभेद झाल्याने उभयतांत पूर्वीसारखे सामरस्य राहिले नाही. पण तरीही हिंदुत्वनिष्ठेमुळे उभयतांचे संबंध तुटले नाहीत.

सावरकरांचा साठी समारंभ

१९४३ च्या दि. २८ मे ला स्वा. विनायक दामोदर सावरकर यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त त्यांचा पुण्यास सत्कार करण्यात आला व त्यांस सुमारे दोन लक्ष रुपयांचा निधि अर्पण करण्यात आला. हे काम अंगावर घेऊन डॉ. गोपाळराव पळसुले यांनी मोठ्या कर्तबगारीने शेवटपर्यंत पार पाडले.

सावरकरांचा हा सत्कार समारंभ अतिशय भव्य प्रमाणात स. प. कॉलेजच्या पटांगणात साजरा झाला. अशाच प्रकारचे समारंभ वऱ्हाडात व नागपूर येथे व अनेक अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणात साजरे झाले. सावरकरांची या समयी झालेली भाषणेही अतिशय हृदयस्पर्शी अशी झाली. सावरकर अंदमानच्या यातनांतून जिवंत बाहेर येतील व हे दिवस दिसतील असे वाटत नव्हते. देवाच्या कृपेने ते प्राप्त झाले याचा सर्वत्र आनंदी आनंद झाला. सावरकरांनी हिंदुसमाजाला हिंदु राष्ट्रवादाचे दार्शनिक सिद्धान्त दिले व टिळक परंपरेचे राजकारण प्रत्यक्षात आचरून तेच यशस्वी आहे हे सिद्ध करून दाखविले. त्यामुळे महाराष्ट्राचे अंतःकरण सावरकरांनी जिंकले होते. या काळात काँग्रेसच्या धोरणाची पडती कमान व हिंदुसभेची चढती कमान सर्वत्र दिसून येत होती. राजकारणात नित्य नवे प्रश्न निर्माण होत होते व त्यांना तोंड कसे द्यावयाचे याचे मार्गदर्शन सावरकरांकडून मिळत होते. सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या चळवळीने राजकारणाला व्यवहारी अधिष्ठान प्राप्त झाले होते. सावरकरांच्या विचारसरणीचा व प्रभावाचा हा उच्च काळ होता.

गोरखपूर येथे १९४६ च्या नाताळात अखिल भारत हिंदुमहासभेचे वार्षिक अधिवेशन श्री. ल. ब. भोपटकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या आधी दि. १४ व १५ डिसेंबर १९४६ ला बार्शी येथे महाराष्ट्र हिंदु सभेचे प्रांतिक अधिवेशन श्री. भालजी पेंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने पार पडले. या अधिवेशनास त्या वेळच्या मुंबई राज्यातील महाराष्ट्रातून व मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधि उपस्थित होते. या वेळी घटनासमिति निर्माण झालेली असून तिने हिंदुस्थानची नवी घटना कोणत्या तत्त्वावर करावी या संबंधाने प्रस्ताव केला व त्याच वेळी प्रांतांची भाषावार पुनर्घटना करावी असाही प्रस्ताव केला. महाराष्ट्र हिंदुसभेने त्याच वेळेपासून भाषावार राज्यरचनेचा विचार स्वीकृत केला आहे.

ख्रिस्ती व पारशी समाजांचे धोरण

गोलमेज परिषदेनंतर १९३२ वर्षी ब्रिटिश पंतप्रधान मॅकडोनल्ड यांनी जातवारीचा निर्णय दिला, त्या वेळी त्यांनी हिंदी ख्रिश्चन लोकांनाही स्वतंत्र

मतदार संघ देण्याची योजना केली होती. पण भारतीय हिंदी ख्रिश्चन समाजाने आपल्याला स्वतंत्र मतदारसंघ नकोत व राखीव जागाही नकोत असे स्पष्ट केले. त्यामुळे मॅक्डोनल्ड यांना तो विचार रद्द करावा लागला.

पारशी व ख्रिश्चन जमाती या मुसलमानांच्या तुलनेने इतक्या छोट्या धार्मिक जमाती आहेत की, आझाद यांच्या विचारसरणीप्रमाणे त्या काही संरक्षणे अपेक्षित्या तर त्यांना दोष देता आला नसता; पण त्यांनी हिंदुस्थानच्या राष्ट्रीय एकात्मतेत एकजीव होऊन जाण्याचीच भूमिका घेतलेली होती. त्यामुळे त्यांचा प्रश्न निर्माणच झाला नाही व जेव्हा सत्ताधाऱ्यांनी तो उकरून काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनी उलट त्यास मोडता घातला. हिंदुसमाजाने आपल्याला कधीही परकेपणाने वागविले नाही असे पारशी समाजाच्या नेत्यांनी उद्गार काढले. हिंदु-सभेने त्यांच्या या धोरणाचे स्वागत केले. आपले धार्मिक वेगळेपण राखूनही ते या देशाच्या राष्ट्रीय जीवनाशी एकरूप झाले.

मुसलमानांनी मात्र अशी वृत्ति कधी दाखविली नाही. उलट हिंदूंबरोबर आपण एक राष्ट्र या नात्याने कधी राहूच शकणार नाही अशी मुस्लिम लीगने भूमिका घेतली व त्यांनी वेगळे व्हावयाचे ठरविले, तर आझादांनी सगळे घरच मुसलमानांच्या स्वाधीन करण्याची तयारी दाखविली! गांधींचीही हीच भूमिका होती. निजाम राज्य हे 'मुस्लिम' राज्य असले व तेथे हिंदूंचा धार्मिक छळ होत असला व त्यांना नागरिक स्वातंत्र्याचेही हक्क नसले तरी अखेर ते 'देशी' राज्य आहे असे गांधी म्हणत व मानीत. हिंदूंनी ते देशी राज्य आहे याकरिता सर्व अन्याय सहन करावेत, त्याविरुद्ध चळवळ करू नये असे गांधींचे धोरण होते. त्यांच्या या देशीपणाला केवळ मुस्लिम अनुनयाची घाण येत होती. त्यामुळे हिंदुमहासभेचा काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्याशी सतत झगडा चालू राहिला.

ख्रिस्ती परिषद

दि, २८–३१ ऑक्टोबर १९४० या दिवशी अहमदनगर येथे ख्रिस्ती समाजातील मंडळींची एक परिषद झाली होती. तीत दि. ३० ला श्री. नानासाहेब मोडक यांचे ख्रिस्ती समाजाचे मनोगत व्यक्त करणारे भाषण झाले. हिंदुसंघटनेच्या दृष्टीने ते महत्त्वाचे होते. ते म्हणाले की "इतर समाजांच्या मानाने येथील ख्रिस्ती समाज अगदी अलीकडचा आहे. हा समाज धर्मान्तरित लोकांचा बनला आहे. या समाजात सर्व जातींचे लोक आलेले आहेत. म्हणून ख्रिस्ती धर्म स्वीकारूनही आपल्या समाजात आचार, विचार आणि भाषा यांमध्ये भिन्नत्व आढळते. तसेच येथे किती तरी पंथ शिरलेले दिसतात. लग्नविधि सोडून बाकी सर्व बाबतींत भिन्नत्व सापडते. त्यात आपण अत्यन्त अल्प आहोत. आपल्या समाजाची सुरवात मिशनऱ्यांनी केली. मिशनऱ्यांच्या हुकमतीखाली आपल्या समाजाची वाढ होत राहिल्याने व त्यांच्याकडून

मिळालेल्या शिक्षणाने आपली झालेली सर्व तयारी मिशनऱ्यांच्या कामापुरतीच झाली. त्याचा परिणाम असा झाला की आपल्या जीवनक्रमाला आवश्यक व पोषक अशा कामाला आपण मुकलो.

" ज्या ज्या जातींतून ख्रिस्ती समाजात लोक आले त्यांना परत आपापल्या जातींच्या आश्रयाची जरुरी भासू लागली. अशा परिस्थितीत अन्नवस्त्र, शिक्षण आणि धार्मिक आचार या साध्या गोष्टी पुऱ्या पाडता येईनात, तेथे राजकारण तर दूरच ! व्यवहारातील रोजच्या गरजा व अडचणी दूर करणे हेच खरे राजकारण. त्यासाठी प्रथम राष्ट्रीय भावना जागृत होणे जरूर आहे. त्याखेरीज राजकारणात भाग घेणे खरे नाही. ही राष्ट्रीय भावना ज्या वेळी जागृत होईल तेव्हाच सभोवतालच्या इतर समाजांशी आपले संबंध कसे काय आहेत याची कल्पना येईल. राजकीय भवितव्यात इतर समाजांप्रमाणेच आपल्या समाजालाही स्वातंत्र्य पाहिजे. मात्र त्यासाठी इतर समाज ज्या त्यागाचे दिव्य करीत आहे त्या मानाने आपण अद्याप काहीच करीत नाही. अशा स्थितीत आपल्याला स्वातंत्र्य कसे मिळेल ? तेव्हा ते मिळविण्याकरिता आपण इतर समाजांशी समरस झाले पाहिजे.

"आपल्याला हिंदुस्थान देशातच राहाणे व मरणे आहे. त्या दृष्टीने हिंदी ख्रिस्ती समाजाला विभक्त राहून भागणार नाही. हिंदुस्थान हाच आपला मायदेश व तो स्वतंत्र कसा होईल हे एकच ध्येय आपल्यापुढे असले पाहिजे. या ध्येयानुसार इतर समाजांशी सहकार करूनच आपल्याला राजकारण खेळले पाहिजे. आपणांस विभक्तीकरण नको आहे. संयुक्त मतदारसंघच पाहिजे. देवघेवीवाचून हिंदी ख्रिस्ती समाजाला जगता येणे शक्यच नाही. यापुढे ख्रिस्ती व हिंदू वेगळे हा विचार सोडला पाहिजे. आपण धर्माने ख्रिस्ती असलो तरी आपले मन हे हिंदु मन आहे. आपले पूर्वज व आपण हिंदुस्थानातच जन्मलो आहोत. हिंदु मन आपण सोडू शकत नाही. आजच्या परिस्थितीत धर्मबाब बाजूस ठेवून राजकारणात इतर सर्वांशी आपण सलोख्याने वागले पाहिजे. तरच आपण आपले इच्छित साध्य करू."

नानासाहेब मोडकांनी आपल्या भाषणात शेवटी असे उद्गार काढले की हिंदुमहासभेची राजकीय विचारसरणी आपल्याला मान्य असून आपण त्यांच्याशी समरस होऊ इच्छीत असलो तरी हिंदुसभा आपल्याला आपण ख्रिस्ती म्हणून केवळ वगळते. त्यांनी याबद्दल खेद व्यक्त केला व हिंदुसभेत आपल्याला प्रवेश मिळावा अशी इच्छाही व्यक्त केली.

श्री. नानासाहेब मोडक यांचे हे भाषण प्रसिद्ध झाल्यावर दाते यांनी 'काळ' वर्तमानपत्रात पूर्वी प्रा. बापूसाहेब माटे यांनी ख्रिश्चन समाजाला केलेले आवाहन पुन्हा प्रसिद्ध केले व श्री. अण्णासाहेब भोपटकर, प्रा. बापूसाहेब माटे व शं. रा. दाते हे नगरला जाऊन गोपाळराव गायकैवारी यांच्या मार्फत मोडकांना भेटले व

त्यांनी मोडकांबरोबर दीर्घकाळ वाटाघाटी केल्या. त्या वेळी मोडक यांचे व खिरस्ती समाजाचे मन केवळ हिंदूच आहे हे सर्वांच्या प्रत्ययास आले. मोडक म्हणाले की, आम्हांला काँग्रेसचे राजकारण अव्यवहार्य वाटते. हिंदुसभेशी आमची मते जुळतात पण आम्ही खिरस्ती म्हणून केवळ तुम्ही आम्हांला हिंदुसभेत घेत नाही व आमचा समाज इतका छोटा आहे की आम्ही स्वतंत्रपणे काही करण्याची शक्यताच नाही. हिंदु खिरस्ती समाजाला हिंदुसभेत प्रवेश मिळावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. पुढे अशा खिरस्ती लोकांना हिंदुसभेत संलग्न सभासद (ॲसोसिएट मेंबर) म्हणून स्वीकारण्याचाही विचार झाला. पण हा प्रश्न भारतीय स्तरावर सोडविला पाहिजे, केवळ प्रांतिक स्तरावर त्याचा विचार करणे योग्य होणार नाही. शिवाय हिंदुसभा ही खिरश्चन-मुसलमानांचे हिंदूकरण करणारीही संस्था असल्याने उभय समाज एकाच संघटनेत आल्याने नवे प्रश्न निर्माण होतील व सध्याच्या जातीय मत-दार संघाच्या काळात व युद्धकालीन राजकीय अस्थिर वातावरणात यायोगे सोयीपेक्षा अडचणीच अधिक निर्माण होण्याचा संभव हे सर्व लक्षात घेऊन महाराष्ट्र हिंदुसभेने हा विचार सोडून दिला. मात्र नानासाहेब मोडकांनी लोकशाही स्वराज्य पक्षात यावे, तेथे त्यांना येता येईल व हिंदुसभेची भूमिका व त्या पक्षाची भूमिका राष्ट्रीय-त्वाच्या दृष्टीने एकच असल्याने मोडकांची अडचण दूर होण्यासारखी आहे असाही विचार त्यांजपुढे मांडण्यात आला.

पारशी समाजाचे धोरण

१९४३ साली मुंबई कॉर्पोरेशनच्या निवडणुकीच्या संबंधात मुंबईच्या पारशी समाजाने जे धोरण स्वीकारले होते त्या संबंधाचा पत्रव्यवहार प्रा. पी. ए. वाडिया या पारशी विद्वानाने दि. २२ जानेवारी १९४४ ला प्रसिद्ध केला. काही पारशी लोकांनी मुसलमानांप्रमाणे आपणही स्वतंत्र मतदार संघ मागावे अशी इच्छा व्यक्त केली असताना प्रा. वाडिया यांनी आपल्या ज्ञाति बांधवांनी अशी मागणी करू नये असे त्यांना स्पष्टपणे बजावले. संयुक्त मतदार संघात मुंबईत पारशांसाठी काही राखीव जागा असाव्यात अशी काही पारशांनी मागणी केली होती. त्यावर भारत मंत्री ॲमरी यांनी पारशांना सवतासुभा दिला पाहिजे असे उद्गारही काढले होते. त्या वेळी पारशी पुढाऱ्यांनी ॲमरी यांच्या वरील धोरणाचा एक पत्रक काढून तीव्र निषेध केला. वाडिया यांनी असे स्पष्टपणे म्हटले की, तत्त्वतः वेगळेपण राखण्याच्या मी विरुद्ध आहे. शिवाय ते व्यवहार्यही नाही. त्यास माझा विरोध आहे, अशा मागणीमुळे जितके पारशी सदस्य मुंबई महापालिकेत हक्काने येतील त्यापेक्षा अधिक सदस्य आजच निवडून येत आहेत. हिंदु समाजाने पारशांना परके-पणाने कधीच वागविलेले नाही व त्यांच्याच मताच्या बळावर कित्येक पारशी आजपर्यंत सहज निवडून आले आहेत व यापुढे येतीलही. पारशी व हिंदु यांमध्ये

पूर्वापार मैत्रीचे दृढ संबंध आहेत व ते तसे असणे राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. पारशी निराळे झाल्यास हिंदु समाजाचे काहीच नुकसान होणार नाही. ही गोष्ट वस्तुतः मुसलमानांनीही लक्षात घ्यावयास हवी. पण कोणतीही गोष्ट सरळ बुद्धीने पहाण्याच्या मनोवृत्तीतच आज मुसलमान नाहीत. त्यामुळे त्यांना काही सांगण्याचाही उपयोग नाही.

शिरगणतीचे महत्त्व

सन १९४१ हे वर्ष शिरगणतीचे होते. मागील १९३१ च्या शिरगणतीच्या वेळी काँग्रेसने तिच्यावर बहिष्कार पुकारला होता. ब्रिटिश राजसत्तेशी असहकार करण्याचे जे नाना प्रकार या देशात सुरू करण्यात आले होते त्यात स्वतःची हानि करून घेणारेही अनेक प्रकार होते. शिरगणतीवरील बहिष्कार हा त्यातीलच एक होता. १९३१ प्रमाणेच १९४१ च्या शिरगणतीच्या वेळी हिंदुमहासभेने सर्वत्र प्रचार करून शिरगणतीचे महत्त्व समाजास पटवून दिले व ही नोंद नीट व्हावी यासाठी दक्षता घेतली.

यापूर्वी शीख, जैन, लिंगायत इत्यादि पंथांचे लोक आपापल्या पोटधर्माची नोंद करीत, हिंदु म्हणून करीत नसत. पण हिंदु हा शब्द राष्ट्रवाचक असून जैन; बुद्ध, शीख यांचे धर्मपंथ वेगवेगळे असले तरी त्यांचे राष्ट्रीयत्व हिंदु असल्याने सर्वांनी आपली नोंद हिंदु म्हणून करावी असा हिंदुसभेने प्रचार केला. या संबंधात नगर येथे दि. २२ फेब्रुवारी १९४१ ला हिंदुसभेचे नेते श्री. गोपाळराव गायकैवारी यांचे एक जाहीर भाषण झाले. ते म्हणाले की शिरगणतीच्या वेळी फरेंच, पोर्तुगीज, इंग्रज, जर्मन इत्यादि लोक आपापल्या राष्ट्रवाचक नावाची नोंद करतात. फक्त हिंदुस्थानातील लोकांच्या बाबतीत मात्र जात, वंश, जमात यांची नोंद केली जाते. शिरगणतीच्या चौथ्या सदरात धर्म म्हणून जेथे नोंद करावयाची तेथे ख्रिश्चन मुसलमान, जैन लिंगायत इ. नोंद करणे ठीक आहे; पण तिसऱ्या राष्ट्रवाचक सदरात हिंदु राष्ट्रीयत्वाचीच नोंद व्हावयास पाहिजे.

याच सभेत नगर येथील ख्रिस्ती समाजाचे पुढारी नानासाहेब मोडक यांचेही भाषण झाले. त्यांनीही म्हटले की गणतीच्या चौथ्या सदरात धर्माची नोंद आहे तेथे ख्रिस्ती लोकांनी ख्रिस्ती धर्म म्हणून नोंद करावी, पण राष्ट्रवाचक जे तिसरे सदर आहे जेथे वंश जात जमात यांची नोंद करावयाची असते तेथे ख्रिश्चन लोकांनी हिंदु म्हणूनच नोंद करावी. कारण त्यांचा धर्म जरी ख्रिस्ती अलला तरी त्यांचे राष्ट्रीयत्व हिंदुच आहे.

ते पुढे म्हणाले की 'हिंदी' हा शब्द राष्ट्रवाचक नसून परकीयांनी या देशाला 'इंडिया' हे जे नाव दिले आहे त्याचे ते भाषांतर आहे. वास्तविक आपल्या देशाचे नाव इंडिया नसून हिंदुस्थान आहे व म्हणून येथील प्रत्येक समाजाने स्वतःस हिंदु

म्हणूनच म्हटले पाहिजे. जो समाज आपल्याला हिंदु म्हणवून घ्यावयास तयार नसेल तो या देशाचे राष्ट्रीयत्वच कबूल करीत नाही व त्यामुळे त्याला या देशात कोणतेच राजकीय हक्क मागण्याचा हक्कच पोहोचत नाही. हिंदु हा शब्द धर्मवाचक नसून तो राष्ट्रीयत्वाचा निदर्शक आहे. आणि याच दृष्टीने मी हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व मानतो. येथील ख्रिश्चन लोकांची पितृभूमि हीच आहे, या देशाशिवाय आम्हांला जगात दुसऱ्या कोणत्याही देशाचा जिव्हाळा नाही."

हिंदु राष्ट्रीय निधि

१९४१ च्या मे महिन्यात पुण्यास तात्यासाहेब केळकर, भोपटकर, स्वा. सावरकर, प्रभृति मंडळींची एक बैठक भरून तीत हिंदुसभेच्या कार्यवाढीसाठी एक निधि उभा करण्याचे ठरले. त्याची रक्कम दोन वर्षांत सुमारे दीड लाख रुपये जमली होती. श्री. मो. रा. ढमढेरे हे त्या संस्थेचे कार्यवाह होते. त्यातून हिंदुसभेच्या कार्यवाढीसाठी श्री. रामभाऊ राजवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचारकांची योजना करण्यात आली होती. ती १९४५ पर्यंत चालू होती.

पालखीबरोबर औषधी पथक

आषाढी-कार्तिकी एकादशीला पंढरपूर यात्रेच्या समयी पावसापाण्यातून व अनेक हालअपेष्टा सोसून पंढरीचे वारकरी नियमाने जातात. अलीकडे बरीच वर्षे सरकारी यंत्रणेमार्फत त्यांना कॉलऱ्याची लस आधी टोचण्यात येते. त्यामुळे माणसे दगावण्याचे प्रमाण फार कमी झाले आहे, तथापि शेकडो लोक प्रवासात आजारी पडतात. पालखीबरोबर पदयात्रेने जाणारांना औषधोपचाराची फार गरज असते. ती पुरी करण्याच्या उद्देशाने हिंदुसभेच्या वतीने डॉ. हरि भास्कर भिडे यांच्या नेतृत्वाखाली एक औषधोपचार पथक पालखीबरोबर पाठविण्यात येऊ लागले. १९४० पासून काही वर्षे हे पथक नियमाने पालखीबरोबर जात असे. पुढे जागोजाग सरकारी दवाखान्यांतून औषधोपचाराची सोय होऊ लागली तेव्हा हे पालखीबरोबर जाणारे वैद्यकीय पथक बंद करण्यात आले. पंढरपूर यात्रेची संधि साधून अनेक ख्रिश्चन मिशनरी यात्रेच्या दिवसांत ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याकरिता तेथे येत. त्यामुळे अनेक वेळा वारकरी व मिशनरी यांच्यात वाद निर्माण होई. मिशनऱ्यांच्या या प्रचाराला आळा घालण्याचे हिंदुसभेने ठरविले व सोलापूर पंढरपूर, बार्शी, इत्यादि ठिकाणच्या हिंदुसभा कार्यकर्त्यांनी आपली प्रचार मिशने त्या वेळी तेथे नेऊन मिशनऱ्यांच्या चळवळींना पायबंद घातला. तेव्हा मिशनऱ्यांनी यात्रेच्या दिवसांत आपला प्रचार बंद ठेवला.

बंगाल दुष्काळपीडितांना वैद्यकीय मदत

१९४३ वर्षी बंगालमध्ये मोठा दुष्काळ पडला व त्यात हजारो लोक मृत्युमुखी पडले. त्यामुळे तिकडे रोगराईही फार वाढली. तेव्हा तेथील लोकांच्या मदती-

साठी अनेक संस्थांनी मदतपथके काढली. पुणे येथील हिंदसेवक समाजाने एक आरोग्यपथक तिकडे पाठविण्याचे ठरविले होते. त्यांना डॉक्टरांची आवश्यकता होती. हिंदुमहासभेचे श्री. हरि भास्कर भिडे हे डॉक्टर असल्याने त्यांनी हरिभाऊंना बोलाविले व त्यांनी जाण्याचे मान्य केले. पंढरपूर पालखीबरोबर जाणाऱ्या औषधोपचार पथकाच्या कार्याचा त्यांस चांगला अनुभव होता. त्यांनी बंगालमध्ये सहा महिने राहून तेथे औषधोपचाराचे काम उत्तम रीतीने केले.

कृष्णाघाटाचे कार्य

या काळात हिंदुसभेने अनेक ठिकाणी स्थानिक प्रश्न धसास लावले. सातारा जिल्ह्यात कऱ्हाड येथे कृष्णा नदीच्या काठी एक सुंदर घाट बांधण्यात आलेला आहे. अलीकडच्या काळात त्यावर वाळूचे थर साचून त्याचा बराच भाग बुजल्यासारखा झाला होता. मुसलमानांची ताबुताची मिरवणूक या घाटावरून नेण्याची कधीही पद्धति नसताना १९३९ साली मुसलमानांनी या घाटावरून मिरवणूक नेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यास हिंदु समाजाने विरोध केला. हा घाट हिंदूंनी हिंदूंकरिता बांधला असून तो हिंदूंच्याच वहिवाटीचा आहे असे हिंदु समाजाचे म्हणणे होते. तेव्हा हिंदूंनी आपला हा हक्क असला तर तो दिवाणी कोर्टातून शाबीत करून घ्यावा असे हिंदूंना सांगण्यात आले. हिंदूंनी ते मान्य केले व त्यांनी आपल्या शाबितीकरिता कोर्टात दावा दाखल केला. जुन्या पिढीतील लोक घाट केवढा मोठा आहे याचे वर्णन करून सांगत; परंतु वाळूच्या थराखाली तो बुजला गेल्यामुळे नव्या पिढीला त्याची नीटशी कल्पना नव्हती. म्हणून हिंदूंनी घाटावरील वाळू उकरण्याचे ठरविले व या कामी वर्गणी गोळा करून व त्यातून काही मजूर कामास लावून वाळू हलविण्याचे काम सुरू झाले. या कामी लोकांचा इतका उत्साह होता व घाटाचे भव्य स्वरूप जों जों दिसू लागले तों तों तो इतका वाढत गेला की भाऊकाका गरुड यांच्या नेतृत्वाखाली शेकडो तरुण स्वयंस्फूर्तीने या कामात सहभागी झाले व घाटाचे भव्य स्वरूप लोकांच्या प्रत्ययास आले. कऱ्हाड हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. शंकर बापूजी जोशी यांनी घाटाचे हे प्रकरण आरंभापासून धसास लावले व १९४० साली दाखल केलेल्या या संबंधीच्या दाव्यात अपार कष्ट करून यश मिळविले. १९४० साली (दावा नं १४६।१९४०) कऱ्हाडच्या कोर्टात दाखल झाला होता. त्याचा हिंदूंच्या बाजूने १४ एप्रिल १९४२ ला निकाल झाला. हा घाट श्री. श्यामजी व्यंकटेश काळे यांनी बांधला असून रामाच्या देवालयापासून कृष्णाबाईच्या देवालयापर्यंत त्याचा परिसर आहे. तो बांधण्याच्या वेळच्या जमाखर्चाच्या वह्याही श्री. काळे यांच्या घरी होत्या. त्यामुळे या दाव्याच्या कामी प्रत्यक्ष पुरावाच उपलब्ध झाला. उभयपक्षी ५०-५० साक्षीदार तपासले गेले. कऱ्हाडातील वकील मंडळींनी स्वयंस्फूर्तीने या कामी साहाय्य केले. त्यामुळे या दाव्यात त्यांना यश आले. त्यावर

मुसलमानांनी जिल्हा कोर्टात अपील केले (नं. २८५।१९४२) त्याचा ३ वर्षांनी दि. २१ मार्च १९४५ ला हिंदूंच्या बाजूनेच निकाल लागला. तेव्हा त्यावरही हायकोर्टात (क्र. ८२८।१९४५) अपील दाखल करण्यात आले. त्यातही पूर्वीचा निकालच दि. ७ मार्च १९४९ ला कायम करण्यात आला. अशा रीतीने १९४० पासून १९४९ पर्यंत श्री. शंकरराव जोशी व त्यांचे अनेक सहकारी यांनी चिकाटीने कृष्णाघाटाचे प्रकरण यशस्वी रीतीने लढविले. हा घाट हिंदूंचा व हिंदूंच्यासाठी आहे हे निर्विवाद ठरल्यानंतर घाटाची व्यवस्था पाहण्याचे काम विष्णु गणेश जोशी वकील यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यांनी घाट व त्याची इतर मिळकत यांचा १९५० च्या विश्वस्त कायद्यानुसार ट्रस्ट केला असून ते बरीच वर्षे घाटाचे ट्रस्टी म्हणून काम पाहात. त्यांच्या निधनानंतर हे काम ट्रस्टी व सेक्रेटरी या नात्याने हल्ली शंकरराव जोशी हे पाहात आहेत. आता या वास्तूची बरीच वाढ करण्यात आली असून हिंदुसमाजाला लग्नकार्यादि आपले धार्मिक विधि करण्यासाठी या वास्तूचा चांगला उपयोग होत असतो.

भागलपूर अधिवेशन

हिंदुमहासभेचे १९४१ सालचे तेविसावे अधिवेशन भागलपूर येथे भरण्याचे मदुरा येथील १९४० च्या अधिवेशनाच्या वेळीच ठरले होते. त्याप्रमाणे बिहार हिंदुसभेने स्वागत मंडळ निर्माण केले व अधिवेशनाची तयारीही सुरू केली. याही अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वा. सावरकरांनाच देण्यात येणार हे ठरल्यासारखेच होते. पण या अधिवेशनाला मोडता घालण्याचे बिहार सरकारच्या मनात आले आणि त्यांनी बकरीदचे निमित्त करून अधिवेशनाला बंदी करण्याचा व्यूह रचला !

हिंदुमहासभेची वार्षिक अधिवेशने सामान्यतः नाताळात भरत असत. भागलपूर येथील अधिवेशनाच्या तारखा नाताळात दि. २८, २९ व ३० डिसेंबर १९४१ अशा ठरविण्यात आल्या होत्या. योगायोगाने मुसलमानांचा बकरीदचा सण या वर्षी दि. २९ डिसेंबर १९४१ ला येत होता. ते निमित्त पुढे करून महासभेच्या अधिवेशनामुळे भागलपूर येथे दंगा निर्माण होण्याचा संभव सरकारने गृहीत धरला व शांतता व सुव्यवस्था राखण्याची शासनावर जबाबदारी असल्याने हिंदुसभेने भागलपूर येथे आपले अधिवेशनच भरवू नये असे स्वागत समितीच्या सभासदांना कळविले !

त्यावर स्वागत समितीने सरकारला कळविले की, भागलपूर येथे नाताळात हिंदुमहासभेचे अधिवेशन दि. २८, २९, व ३० डिसेंबरला भरविण्याचे चार महिन्यांपूर्वीच ठरले असून हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचा व बकरीदचा अर्थाअर्थी काही संबंध नाही व हिंदुमहासभेच्या अधिवेशनामुळे दंगा निर्माण होण्याचे काही कारणही नाही. शिवाय अधिवेशन कोठे भरवावयाचे व केव्हा भरवावयाचे या संबंधात

पूर्वीच ठरलेल्या योजनेत बदल करणे झाल्यास तो अधिकार अखिल भारत हिंदुमहासभेच्या कार्यकारी मंडळाचा आहे. स्वागत समिति त्या बाबतीत कोणताच बदल स्वतंत्रपणे करण्यास असमर्थ आहे.

बिहार सरकारने निर्माण केलेली ही अडचण स्वा. सावरकरांना कळविण्यात आली. तेव्हा त्यांनी दि. २५ सप्टेंबर १९४१ ला बिहारचे गव्हर्नर स्टयुअर्ट यांना सामोपचाराचे पत्र लिहिले व हिंदुमहासभेची अधिवेशने दर वेळीं नाताळात भरतात त्याप्रमाणेच हे अधिवेशन यंदा भागलपूर येथे नाताळात भरावयाचे आहे, व हिंदुमहासभेचे धोरण सरकारला सैनिकीकरणाच्या बाबतीत सहकार्याचे आहे, तसेच हिंदुसभेकडून कोणतीही गैरवाजवी गोष्ट केली जाणार नाही याचा गव्हर्नरांनी विश्वास बाळगावा व बकरीदची सबब पुढे करून त्या वेळी अधिवेशन भरल्यास दंगा होण्याचा संभव आहे ही भीति बाळगू नये, हिंदुसभेकडून कोणतीही आगळीक होणार नाही व मुसलमानांनी करण्याचे योजिल्यास सरकार त्यांचा बंदोबस्त करण्यास समर्थ आहे, असे कळविले.

सावरकरांचे हे दि. २५ सप्टेंबर १९४१ चे पत्र बिहारच्या गव्हर्नरला मिळण्याच्या आधीच दि. २६ सप्टेंबरला बिहार सरकारने भारत संरक्षण कायद्याखाली वटहुकूम काढून हिंदुमहासभेच्या अधिवेशनास बिहार राज्यातील भागलपूर, पाटणा, मोंगीर, शहाबाद, गया, दरभंगा व मुझफरपूर या कोणत्याही शहरात दि. १ डिसेंबर १९४१ ते १० जानेवारी १९४२ या काळात हिंदुमहासभेचे अधिवेशन भरविण्यास मनाईचा हुकूमही काढला ! त्यामुळे पेचप्रसंग निर्माण झाला. या हुकुमाचा हिंदुमहासभेच्या कार्यकारी मंडळाच्या दिल्ली येथील बैठकीत दि. ११ व १२ ऑक्टोबर १९४१ ला विचार झाला. या सभेत कार्यकारी मंडळाने एकमताने ठराव पास केला तो असा :

" अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या अधिवेशनास बिहार सरकारने भारत संरक्षण कायद्याखाली केलेली बंदी अन्यायाची व बेकायदेशीर आहे. ही सभा सरकारच्या या धोरणाचा निषेध करते. हे अधिवेशन भागलपूर येथे नाताळात भरविण्याचे गेल्या एप्रिलमध्येच निश्चित झाले होते.

" हिंदु लोकांच्या न्याय्य अशा नागरिक हक्कांवर अशा प्रकारची निष्कारण नियंत्रणे घातल्याने गुंडांच्या गुंडगिरीला फूस मिळते व त्यांच्यातील दंगेखोर प्रवृत्तीला उत्तेजन मिळते. या बाबतीत महासभेच्या कार्यकारी समितीचे असे म्हणणे आहे की, जे कोणी दंगेखोर लोक असतील त्यांचे नियंत्रण करण्याकरिता सरकारने आपली शक्ति उपयोगात आणावी. लोकांच्या स्वयंभू अशा नागरिकत्वाच्या हक्कांचे नियंत्रण करण्यावर ती खर्च करू नये. याकरिता बिहार सरकारने ही बंदी ताबडतोब काढून घ्यावी व लोकांना आपल्या संघ व सभास्वातंत्र्याचे हक्क निर्वेधपणे उपभोगू द्यावेत."

कार्यकारी मंडळाने बिहारच्या स्वागत समितीलाही असे कळविले की अधिवेशन ठरल्या ठिकाणी व ठरल्या वेळी होईल असे धरून चालावे व पुढील व्यवस्थेला लागावे.

हिंदुमहासभेचा हा ठराव सभेचे अध्यक्ष स्वा. सावरकर यांनी गव्हर्नरकडे पाठविला व त्याबरोबर एक पत्रही पाठविले. त्यात त्यांनी म्हटले की "दंगाधोपा होऊ नये व शांतता व सुव्यवस्था राहावी हे हिंदुसभेलाही मान्यच आहे. भागलपूर येथे पूर्वी दंगेधोपे झाले ते मुसलमान गुंडांनी केले. त्या वेळी तेथे हिंदुमहासभेचा संबंध नव्हता. मुसलमान समाजातील राजकीय पुढाऱ्यांनी काही विशिष्ट राजकारण साधण्याच्या उद्देशाने सध्या जो प्रचार चालविला आहे त्यामुळे हे दंगे सर्व हिंदुस्थानभर होतात व पूर्वी भागलपुरातही झाले. तरी मुसलमान समाजातील गुंडांवर सरकारने बंदी घालणे न्यायाचे, श्रेयस्कर व परिणामी हितकर होईल. अशी बंदी सरकारने घातली तरच बंडखोर वृत्तीला आळा बसेल. परंतु कायद्याचे बंधन पाळणाऱ्या हिंदूंच्या सभास्वातंत्र्याच्या व नागरिकत्वाच्या हक्कांवर बंदी घालणे अन्यायाचे आहे. यापूर्वी हिंदुमहासभेची बावीस अधिवेशने झाली, परंतु तेथे दंग्याला प्रवृत्त करणारी बेलगामी व बेजबाबदार भाषणे मुळीच झाली नाहीत व पुढेही होणार नाहीत. हिंदुसभेचे धोरण युद्धसहकार्याच्या बाबतीत प्रतियोगी सहकारितेचे असल्यामुळे व हिंदुमहासभेच्या सैनिकीकरणाच्या धोरणामुळे अनेक सभासदांकडून युद्धप्रयत्नास मदतच होत असल्याने हिंदुराष्ट्राकडून दंगाधोपा उत्पन्न होण्यासारखी परिस्थिति निर्माण केली जाण्याची शक्यताच नाही.

याच वेळी सावरकरांनी "मद्रासला मुस्लिमलीगचे अधिवेशन १९४० वर्षी भरले असताना त्या वेळी हिंदूंकडून आगळीक वा दंगाधोपा होण्याचा किंचितही संभव नसतानाही हिंदूंवर बंधने घालण्यात आली व दंग्याधोप्यास प्रोत्साहन देणाऱ्या जिना प्रभृति पुढाऱ्यांची भाषणे तेथे सरकारने शांतपणे होऊ दिली" या गोष्टीचा उलेख करून म्हटले की "या सर्वांचा विचार करता हिंदूंच्या सभास्वातंत्र्याच्या सनदशीर हक्कांवर गदा न आणता सरकारने गुंडांवर बंदी घातली पाहिजे, शांतता व सुव्यवस्था सरकारने ठेविली पाहिजेच; परंतु शांतता व सुव्यवस्था याचा अर्थ कायद्याने दिलेले अधिकार कायद्याच्या कक्षेत पाळणारे नागरिक जे असतील त्यांना ते अधिकार भोगू द्यावयाचे हा आहे व हा हक्क बजावण्यास जे विरोध करतील त्यांचा बंदोबस्त करावयाचा व त्यांचा काटा मार्गातून काढून टाकावयाचा असा असावयास पाहिजे. "जातीय दंगा झाल्यास पोलिस अपुरे पडतील" ही सरकारची सबब तर अत्यंत लंगडी आहे. जर्मनी, जपान, इटलीसारख्या शत्रूबरोबर लढून विजय मिळविण्याची तयारी करणाऱ्या सरकारला गुंडांच्या गुंडगिरीचा बंदोबस्त करता येत नाही असे म्हणणे अत्यंत लाजिरवाणे, असत्य व

मूर्खपणाचे आहे. अधिवेशनाच्या तारखा अजून लांब असल्याने पोलिसांची पुरेशी व्यवस्था करणे सरकारला सहज शक्य आहे."

हिंदुमहासभेने आपले अधिवेशन भागलपूरलाच व ठरलेल्या तारखांना भरेल असे विहार सरकारला कळविल्यावर बिहार सरकारचा पारा खूपच चढला व हिंदुसभेने सरकारला हे आव्हान दिले आहे असे धरून त्याचा सर्व साधनांनी प्रतिकार करण्याचे सरकारने ठरविले.

यानंतर बिहार सरकारच्या एका पत्राला उत्तरादाखल सावरकरांनी अधिवेशनाच्या तारखा बकरीदच्या आधी ठेवण्याची तयारी दर्शविली व बकरीदशी संबंध येऊ नये म्हणून अधिवेशन २४ ते २७ या दिवशी भरविण्यात येईल असे गव्हर्नरला कळविले. परंतु बकरीदच्या आधी अधिवेशन भरविल्यास दंग्याची भीति राहतेच या सबबीवर बिहार सरकारने ते अमान्य केले, व बंदीचा काळ कमी करून तो १ डिसेंबर ते १० जानेवारीऐवजी ४ जानेवारीपर्यंत राहील असे कळविले. त्यावर सावरकरांनी बिहार सरकारला दिनांक ४, ५ व ६ जानेवारी या तारखांना अधिवेशन निर्वेधपणे भरू देण्याची, कोठलीही सबब न सांगता हमी देण्याची तयारी आहे काय तर या तारखांचाही विचार करता येईल असे कळविले असता तशी हमी देण्याचे बिहारचे गव्हर्नर स्टुअर्ट यांनी नाकारले! तेव्हा येथे लढ्याचा प्रश्न उत्पन्न झाला.

सरकारशी मिळते घेण्याचा व तडजोड घडवून आणण्याचा सावरकरांनी शक्य तो प्रयत्न केला; परंतु सरकारला अधिवेशन भरूच द्यावयाचे नव्हते. या सर्व प्रकरणाची माहिती सावरकरांनी व्हॉईसरॉय यांजकडे कळवून त्यांनी बिहार सरकारला सल्ला द्यावा अशी विनंती केली. तथापि त्यांनीही या प्रकरणात लक्ष घालण्यास नकार दिला.

लढ्याची तयारी

एकदा लढा निर्माण झाल्यावर तो लढविण्याचे निश्चित करून सावरकर त्या उद्योगास लागले. अधिवेशनाची पूर्व तयारी करण्याकरिता पुण्याहून श्री. गंगाधर विश्वनाथ उपाख्य नानासाहेब गोखले यांना बरोबर चार सहकारी घेऊन भागलपूरला पाठविण्यात आले व भागलपूर दिन सर्व भारतभर दिनांक १४ डिसेंबर १९४१ ला पाळावा असे पत्रक काढले. या पत्रकात या प्रश्नाला अखिल भारतीय स्वरूप कसे आहे, बिहार सरकारने घातलेली बंदी किती अविचारी, अन्यायमूलक व उपमर्दकारक आहे याचे वर्णन करून ही बंदी उठविण्याबद्दल व्हाईसरॉय साहेबांना विनंती करण्याचे आंदोलन उभे करण्याचा आदेश दिला.

त्याशिवाय हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांना उद्देशून त्यांनी एक गुप्त पत्रक काढले. त्यात भागानगर लढ्याप्रमाणेच भागलपूर येथे निःशस्त्र प्रतिकार कसा करावा

तेथे कसे जावयाचे व काय काय करावयाचे या संबंधाने तपशिलवार सूचना देण्यात आल्या होत्या. त्यात म्हटले होते की, प्रत्येक हिंदुसभेने आपापला स्वतंत्र विभाग समजून यापुढे मुख्य कचेरीकडून सूचना येतील याची वाट न पाहता कार्याला लागावे, भागलपूरला आठ आठ दहा दहा कार्यकर्त्यांनी छोटे छोटे जथे करून जावे, भागलपूरला रेल्वेने सरळ न जाता अलीकडे कोठेतरी उतरून तेथून अन्य मार्गाने भागलपुरात प्रवेश करावा, जवळ जाण्यायेण्याच्या खर्चाची व आठ पंधरा दिवसांकरिता खाण्यापिण्यासाठी पैशाची तरतूद करून घ्यावी, बिहार प्रांतात या दिवसांत थंडी पुष्कळ असते म्हणून बरोबर पुरेसे कपडे ठेवावेत. आपण केव्हा, कोठून व कसे भागलपूरकडे जातो याची जाहीर वाच्यता करू नये, हे जथे १७ ते २१ तारखांच्या दरम्यान निघावेत, भागलपूरला त्यांना हिंदुसभेचे कार्यकर्ते भेटतील. तेथे काय करावयाचे त्याचा तपशील ते सांगतील. दिनांक २४ डिसेंबरला तोपर्यंत सरकारची बंदी उठली नसेल तर भागलपूर येथे अगर भागलपूर जिल्ह्यात ते ज्या ठिकाणी असतील तेथे त्यांनी अटक होईपर्यंत मिरवणुका व प्रभातफेऱ्या काढाव्यात व प्रकट सभा घ्याव्यात. त्यांना अध्यक्षांचे भाषण व ठरावाचे मसुदे मिळण्याची सोय केली जाईल. त्यांनी सभांतून अध्यक्षीय भाषण वाचून दाखवावे व ठराव पास करून घ्यावेत. हे कार्यक्रम सर्व जथ्यांनी एकत्र जमून न करता वेगवेगळ्या वेळी व वेगवेगळ्या ठिकाणी करावेत. त्यांना अटक होईपर्यंत त्यांनी निःशस्त्र प्रतिकार करावा. या जथ्यांनी "हिंदु धर्मकी जय" या घोषणांनी भागलपूर नगर दुमदुमून सोडावे.

पूर्व योजनेनुसार सावरकर दिनांक २३ डिसेंबरला मुंबईहून निघाले. त्यांच्याबरोबर पंढरपूरचे भाऊसाहेब काणे, मिरजेचे दामुअण्णा भट, पुण्याचे गणपतराव नलावडे, सांगलीचे गणपतराव गोडबोले, पेणचे रामभाऊ मंडलीक, ठाण्याचे रा. म. आठवले, पंढरपूरचे फणसळसर, पुण्याचे डॉ. पळसुले, बार्शीचे बाबाराव काळे, महाडचे बापूराव जोशी, पुण्याचे धोंडूमामा साठे, न. गो. अभ्यंकर इत्यादि मंडळी व फार मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवक होते. याच गाडीने चाळीसगावला धोंडो केशव जोगळेकर, शंकरराव वैद्य, म. भा. शुक्ल, आत्मारामपंत चितळे, शंकरराव पटवर्धन, भा. रा. शुक्ल, धुळ्याचे भाऊराव कुलकर्णी व अनंतराव क्षिरे ही मंडळी होती. ही गाडी गया स्टेशनावर पोचल्यावर रात्री २ च्या सुमारास स्वातंत्र्यवीर सावरकर यांजवर अटकेचे वॉरंट दाखवून पोलिस सुपरिंटेंडेंट यांनी त्यांना अटक केली व स्वातंत्र्यवीर सावरकरांना रात्रीच गयेच्या सेंट्रल तुरुंगात नेण्यात आले. बाकीच्या प्रतिनिधींनी भागलपूरला जाऊन ठरलेल्या योजनेनुसार अधिवेशन पार पाडावे असा त्यांस सावरकरांनी आदेश दिला.

याच वेळी बंगालमधून बाबू आशुतोष लाहिरी व नागपूरचे प्राध्यापक वि. घ. देशपांडे हे भागलपुराकडे जात असता त्यांना बिहार हद्दीतील सीमेवरील कोळगाव

स्टेशनवर अटक करून भागलपूर तुरुंगात नेण्यात आले. डॉ. मुंजे, बाबासाहेब खापर्डे, श्री. नलिनी रंजन घोष, व बॅरिस्टर एन्. सी. चतर्जी यांनाही अटक झाली. मध्य प्रांतातून जाणाऱ्या तुकडीचे नेतृत्व बाबासाहेब घटाटे यांजकडे होते. डॉ. काणे, मनोहरपंत देशपांडे, गोविंदराव पांडे, तात्याजी कोळते, बाळशास्त्री हरदास, बिंदुमाधव पुराणिक, हरिकृष्ण वर्मा, नरदेव आर्य, शंकरराव बूट, रा. न. देशपांडे, पन्नालास व्यास, डॉ. यादवराव अणे, डॉ. काळे, शेकदार बंधू, साधुमहाराज कोलारकर या सर्व मंडळींना भागलपूर स्टेशनावरच अटक झाली. अहमदाबादेहून निघालेले मुजुमदार आनंदप्रिय, व गोळवलकर, मद्रास हिंदुसभेचे डॉ. वरदराजलू नायडू, श्री. गणपति, पंजाबचे भाई परमानंद, महारतनचंद्र, कॅप्टन केशवचंद्र हरबिंदसिंग, अयोध्येचे राजा महेश्वर दयाळ, चंद्रगुप्त वेदालंकार, अलाहाबादचे राम मोहनलाल, मोरमाचे राजे, बिहारमधील बोधनारायण मिश्र, रासबिहारीलाल, हकीम गंगाप्रसाद गुप्त, गजाधर प्रसाद शर्मा, गुप्तेश्वर प्रसाद, स्वागत मंडळाचे चिटणीस गौरी शंकर प्रसाद, बजरंगदत्त शर्मा जयस्वाल, पाटण्याचे डॉ. त्रिपाठी इत्यादि पुढाऱ्यांनी या आंदोलनात भाग घेतला. भागलपूरच्या हद्दीत येताच कित्येकांना अटक करून बिहार सरकारने आपल्या चढाईचे उग्र स्वरूप व्यक्त केले.

भागलपूरमध्ये ठिकठिकाणाहून व भिन्नभिन्न मार्गांनी हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे प्रतिनिधि लोटत होते. कोणी यात्रेकरूच्या वेषाने, कोणी प्रवासी म्हणून, कोणी वेषांतर करून, कोणी नावे बदलून, मोटारने, गाड्यांनी, पायी, सायकलवरून असे सर्व मार्गांनी लोक भागलपुरात येत होते. प्रसिद्ध पुढाऱ्यांना अटक झाल्यामुळे लोकक्षोभाची तीव्रता खूपच वाढली होती. सरकारने १४४ कलम लागू करून पांच माणसांना एकत्र जमण्यास बंदी केली असताही लोक टोळ्याटोळ्यांनी शहरभर हिंडत होते. घरोघर हिंदुमहासभेचे ध्वज उभारण्यात आले होते. रस्त्यारस्त्यांतून हिंदु धर्मकी जय, हिंदु राष्ट्रकी जय, स्वा. सावरकरकी जय असा जयजयकाराचा घोष चालला होता. पुण्याहून गेलेले नानाराव गोखले व नथुराम गोडसे यांनी गुप्त रीतीने सर्वत्र संचार करून वातावरण प्रक्षुब्ध करण्यास साह्य केले. भागलपूर येथे हाच एकमेव विषय सर्वत्र दुमदुमून राहिला होता.

अधिवेशनाच्या तारखा एक दिवस पुढे ढकलून दि. २५, २६ व २७ डिसेंबर १९४१ अशा निश्चित करण्यात आल्या होत्या. दि. २५ ला पंजाबचे अर्जुनदेव, लक्ष्मीनारायण शास्त्री, वर्ध्याचे देशपांडे, अयोध्येचे देशबंधु, दिल्लीचे रामनाथ कालिया, हरगोविंद गुप्त, पं. हरनारायण शर्मा, कामताप्रसाद, जितेंद्रशर्मा, कैलासचंद्र वर्मा, बंगालचे फणींद्रनाथ बानर्जी, हैदराबादचे विभूतिभूषण जैन, सीमा प्रांतातील माजी मंत्री मेहेरचंद खन्ना, पंजाबचे सर गोकुळचंद नारंग इत्यादींना अटक करण्यात आली, व त्यांना भागलपूर तुरुंगात पाठविण्यात आले.

हिंदुमहासभेचे एक उपाध्यक्ष डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे या वेळी बंगालच्या मंत्रिमंडळात होते. तेही भागलपूरला यावयास निघाले होते. त्यांच्याबरोबर बाबू पद्मराज जैन, मेजर पी. वर्धन, बंकिमचंद्र चतर्जी, रायबहादुर गुणेन्द्र राय, मनोरंजन चौधरी, नृपेंद्रकुमार चक्रवर्ती, क्षेत्रमोहन राय प्रभृति मंडळी होती. बंगाल प्रांताच्या एका मंत्र्याने बिहार सरकारचा हुकूम मोडण्यास जाणे हे एक आगळेच दृश्य होते. कलकत्त्याहून निघताना श्यामाप्रसाद मुखर्जींनीं एक प्रकट निवेदन केले. त्यांनी म्हटले की, "मी पूर्ण विचार करून भागलपूरला जावयाचे ठरविले आहे. अर्थात् मी तेथे मंत्री म्हणून जात नसून हिंदुमहासभेचा एकनिष्ठ सेवक म्हणून जात आहे. बंगालच्या व इतर ठिकाणच्या लोकांना भागलपूरला चला असे सांगत असताना मी स्वतः मात्र दूर राहणे हे मला अशक्य आहे." श्यामाप्रसाद मुखर्जींना बिहार सरकारने भागलपूरच्या अलीकडे कोळगाव स्टेशनवर अटक केली व त्यांना कोळगावच्या डाक बंगल्यात ठेवले व त्यांच्या बरोबरच्या लोकांना भागलपूरच्या तुरुंगात आणले.

दि. २५ डिसेंबरला पूर्वयोजनेनुसार भागलपूर युवक संघाचे अध्यक्ष बाबू कृष्णवल्लभ नारायणसिंह उपाख्य बबुवाजी यांनी १४४ कलमाचा भंग करून मोठ्या जमावासह प्रभात फेरी काढली व लजपतराय पार्कजवळच सभा सुरू केली. तिला प्रचंड गर्दी झाली. तेथे त्यांचे भाषण झाले. पं. रामचंद्र शर्मा यांनी स्वा. सावरकरांचे अध्यक्षीय भाषण वाचून दाखविले व अधिकृत प्रस्तावही पास करण्यात आले. पोलिसांनी त्यांना अटक करून नेले.

तोच देवी बाबू धर्मशाळेत लाला नारायण दत्त यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे अधिवेशन सुरू झाले. तेथेही अध्यक्षीय भाषण वाचण्यात आले व ठराव पास करण्यात आले. सरकारने कोणाकोणाला अटक केली याचीही माहिती सभेत सांगण्यात आली. पोलिसांनी लाठीहल्ला करून ही सभा मोडली व धरपकड सुरू केली, तर तिसऱ्या ठिकाणी श्री. विश्वनाथ श्रीवास्तव हे स्वागताध्यक्षांचे भाषण वाचू लागले. स्वागताध्यक्ष कुमार गंगानंद सिंह व भागलपूरचे हिंदुसभेचे पुढारी रावणीधर मिश्र यांना पोलिसांनी आधीच अटक केली होती. श्रीवास्तव यांच्या भाषणानंतर मनोरंजन चौधरी, सरदार गोविंद सिंह, नंदगोपाळ चौधरी, कुमार मिश्र, गोकुळ देशपांडे प्रभृतींची भाषणे झाली. ती चालू असताच पोलिस तेथे येऊन त्यांनी लाठीमार केला. त्यात खामगावचे शेकदार बंधु यांना बरीच दुखापत झाली. पोलिसांनी सर्वांना अटक करून बंदीखान्यात नेले.

तुरुंगातच बी वॉर्डमध्ये डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरू झाली. तीत सावरकरांचे अध्यक्षीय भाषण वाचण्यात आले व नेपाळ नरेशाबद्दल निष्ठा व्यक्त करण्यात आली. या सभेत भाई परमानंद, डॉ. सर गोकुळचंद नारंग, मद्रासचे

श्रीगणपति, राजा महेंद्र दयाळ, बाबाराव खापर्डे, बाबू पद्मराज जैन, रायबहादुर खन्ना, प्रा. वि. घ. देशपांडे, चंद्रगुप्त वेदालंकार यांची भाषणे झाली. तुरुंगातही सर्व नेते एकत्र आलेले होते. त्यांनी तेथेही सभा भरवून भाषणे केली. या विभागाचे कमिशनर गोखले व जेलर प्रभृति मंडळीही या वेळी तुरुंगात सभेच्या वेळी उपस्थित होती ! हाच प्रकार दि. २५, २६ व २७ ह्या तीन दिवशी चालला. दि. २७ ला अधिवेशन समाप्त झाल्याची घोषणा करण्यात आली. अधिवेशन लजपतराय उद्यानात न भरता ते सर्व भागलपूर शहरभर, चौकाचौकांतून, बागाबागांतून, धर्मशाळांतून, व तुरुंगातही भरले. दि. २७ ला देवीबाबू धर्मशाळेत नरेंद्रदास यांच्या अध्यक्षतेखाली तिसऱ्या दिवसाचे अधिवेशन झाले. शेवटी धर्मशाळेतील सभेला अडथळा आणण्याचे पोलिसांनी सोडून दिले. या सभेत ग. वि. केतकरांनी सावरकरांचे भाषण पुन्हा वाचून दाखविले व तयार केलेले प्रस्ताव सर्वसंमत झाले; व शेवटी वन्दे मातरम् गीत होऊन अधिवेशन समाप्त झाल्याची घोषणा झाली.

सरकारने या अधिवेशनाला विरोध करण्याचे जे धोरण स्वीकारले त्याचा पूर्ण विचका झाला. भागलपूर जिल्हा मुस्लिम लीगच्या अध्यक्षांनीही या अधिवेशनास आपला मुळीच विरोध नसल्याचे जाहीर केले. त्यामुळे तर सरकारच्या फटफजितीला पारावारच राहिला नाही ! लजपतराय पार्कमध्ये अधिवेशन भरविण्याचे ठरले होते म्हणून सरकारने बाहेरून आणलेल्या पोलिसांचा तेथेच तळ ठोकला होता. तरीही मुंबईचे चोडणकर थत्ते व पेंढारकर, इंदूरचे डुबे, हरिकृष्ण वर्मा, वसंतराव आंग्रे, नागपूरचे नरदेव आर्य, इंदूरचे अकाली तारासिंग, मिरजेचे अप्पा कासार, व सांगलीचे वाकणकर यांनी हरप्रयत्नाने लजपतराय उद्यानात शिरून दि. २५ ला हिंदुसभेचा ध्वज उभारलाच व काही काळ तो तेथे फडकत ठेवला.

पोलिसांतही सरकारी धोरणाच्या विरुद्ध प्रतिक्रिया झाली होती. 'पोलिस हमारे भाई है' असे प्रतिकारक म्हणत. सरकारी धोरणाच्या निषेधार्थ पोलिस कॉन्स्टेबल भोलाप्रसाद व बिंदेश्वरीसिंग यांनी आपल्या नोकऱ्यांचे राजीनामेही दिले. बाबू राजेन्द्रप्रसाद यांच्या सर्चलाईट पत्राने म्हटले की एरवी हिंदुमहासभेचे अधिवेशन भरते, त्यापेक्षा किती तरी जास्त पटीने महत्त्वपूर्ण असे हे अधिवेशन भरले. सरकारची प्रतिष्ठा दुष्कीर्तीच्या धुळीस मिळाली !

अधिवेशन समाप्त होताच सरकारनेही सर्व राजबंद्यांना सभाबंदीचा काळ संपताच दि. ४ जानेवारीस मुक्त केले. या लढ्यात सावरकरांनी सरकारवर मात केली व सभास्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य यांसाठी यशस्वी लढा दिला याबद्दल रँ. अप्पासाहेब परांजपे यांनी सावरकरांचे अभिनंदन करून त्यांस १०० रु. चा चेक भेट म्हणून पाठविला. सर्व वृत्तपत्रांनी बिहार सरकारला मूर्खपणाबद्दल दोष दिला. भागानगरसारखाच हाही लढा गाजला व यशस्वी झाला. या लढ्याची सर्व

आखणी व कार्यवाही पुण्याचे नानासाहेब गोखले, पं. नथुराम गोडसे व ग. वि. केतकर यांनी केली होती.

हिंदुत्ववादी संघ व दल

हिंदुसभेच्या कार्यवाढीसाठी प्रचारक निर्माण करण्याच्या उद्देशाने पुण्यास दि. १० मे १९४२ ला हिंदुत्वनिष्ठांचे एक शिबिर भरविण्यात आले. श्री. वा. ब. गोगटे हे त्याचे कायवाह होते. दि. २८ मे पर्यंत ते चालले. त्यात अनेक नामवंत वक्त्यांची भाषणे झाली. या वेळी स्वा. सावरकरही आले होते व त्यांचेही भाषण झाले. या शिबिरात हिंदुराष्ट्र दल स्थापन करण्याचे ठरले. श्री. शिवराम विष्णु उपाख्य भाऊसाहेब मोडक यांना त्याचे सरदलचालक नेमण्यात आले. पं. नथुराम गोडसे यांनी हे सर्व कार्य व शिबिराची योजना घडवून आणली होती. याच शिबिरात मुक्कामास असताना श्री. हरि भास्कर भिडे यांना पोलिसांनी अटक करून नेले. त्यांचे चिपळूण येथे दोन महिन्यांपूर्वी एक भाषण झाले होते त्याबद्दल ही अटक होती. त्यांजवर खटला भरण्यात आला व त्यांना शिक्षाही झाली. पुढे अपिलात त्यांची मुक्तता झाली.

पं. नथुराम गोडसे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. तथापि संघाने सैनिकीकरणाला विरोध करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे संघ व सभा यांत जो दुजाभाव निर्माण झाला होता, त्यातच गोडसे यांनी संघाचे काम सोडून तत्सदृश हिंदुराष्ट्रदलाची संघटना हाती घेतली. पुण्याचे शिबिर हे त्यासाठी एक साधन होते. आपल्या विचारसरणीच्या प्रचारासाठी त्यांनी अग्रणी या नावाचे एक वर्तमानपत्र हाती घेतले व पुढे त्याचे नाव बदलून 'हिंदुराष्ट्र' केले. गांधींच्या एकंदर मुस्लिमधार्जिण्या वृत्तीविरुद्ध व आत्यंतिक अहिंसावादाविरुद्ध त्यांचा प्रचार होता. एक उत्तम प्रभावी वक्ता, हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कर्ता, आत्यंतिक त्यागी, अतिशय प्रामाणिक, ध्येयासाठी सर्वस्वावर पाणी सोडणारा व ब्रह्मचारी जीवन जगणारा असे त्यांचे वर्णन करावे लागेल. त्यांचे संघटनाकौशल्यही अप्रतिम होते.

त्यांच्याप्रमाणेच महाराष्ट्रात राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील अनेक कार्यकर्ते संघाचे धोरण न पटल्याने बाहेर पडले व त्यांनी हिंदुराष्ट्रदल, किंवा अन्य नावाखाली स्वयंसेवक संघटना निर्माण केली. त्यांचा उद्देश हिंदुत्वाचा प्रचार करण्याचा व हिंदुसमाजाचे बळ संघटित करण्याचाच होता. त्यापूर्वी डॉ. मुंजे यांनी हिंदुसभेच्या कार्यासाठी रामसेना निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता व तिच्या शाखा काही ठिकाणी स्थापनही झाल्या होत्या. पुढे हिंदुराष्ट्रदल निर्माण झाल्यावर रामसेना त्यात अंतर्भूत झाली. हिंदु समाजातील अंतर्गत दोष दूर करणे व बाह्य आक्रमणापासून हिंदूंचे संरक्षण करणे हेच या संघटनांचे ध्येय असे. राष्ट्रीय स्वयंसेवकसंघ नित्य नैमित्तिक राजकारणापासून अलिप्त असे; पण संघाच्या शिकवणीत मुरलेल्या

लोकांनी राजकारण स्वतंत्रपणे करण्यास हरकत नसे. तथापि १९४० नंतरच्या काळात संघ व हिंदुमहासभा यांच्या दृष्टिकोनात राजकारणावरून भेद झाला व संघाने काँग्रेसची बाजू उचलून धरली. तेव्हा सावरकरांची सैनिकीकरणाची विचारसरणी ज्यांना मान्य होती अशा संघातील मंडळींनी संघातून बाहेर पडून हिंदुराष्ट्रदल ही संघटना निर्माण केली.

सावरकरांची व हिंदुसभेची विचारसरणी जरी एकच होती; तरी पण सावरकरांवर व्यक्तिनिष्ठा असणारांची हिंदुसभेवर मात्र तशी निष्ठा नव्हती. त्यामुळे हिंदुराष्ट्रदल ही संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाप्रमाणे एकचालकानुवर्ती म्हणजे फक्त सावरकरनिष्ठ बनली. जरी सावरकर व हिंदुसभा यांच्या धोरणात भेद नव्हता तरी हिंदुराष्ट्रदलाचे दैवत सावरकर व्यक्ति होती. त्यामुळे हिंदुसभेची ज्या वेळी जी कामे असत त्यांपैकी त्यांना जी पटत ती तेवढी दलाचे स्वयंसेवक करीत. पुढे गोडसे यांनाही सावरकरांची काही काही धोरणे अमान्य झाली. १९४७ वर्षी १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनी स्वा. सावरकरांनी आपल्या घरावर राष्ट्रध्वज उभारला तर गोडसे यांनी फाळणीच्या निषेधार्थ आपल्या कार्यालयावर काळा ध्वज उभारला. सावरकरांचे धोरण स्वातंत्र्यप्रवण व त्याच्या अभिनंदनपर होते तर गोडसे यांचे धोरण फाळणीच्या निषेधार्थ दुःखनिदर्शक होते. दोघांच्या दृष्टि-कोनांतील हा फरक पुढे पुढे विशेष जाणवू लागला.

हिंदुसभा ही लोकशाही पद्धतीने चालणारी संघटना आहे. तेथे मतस्वातंत्र्य आहे व मतप्रचाराचेही स्वातंत्र्य आहे. त्यामुळे केवळ सावरकरनिष्ठेला वाहिलेल्या संघटनेचा हिंदुसभेच्या नित्य नैमितिक स्वरूपाच्या कार्याला हक्काचा उपयोग होईनासा झाला. त्यामुळे संघ व त्यातून फुटून निघालेले दल या दोन्ही संघटना एके काळी हिंदु सभेला पूरक व साहाय्यक होत्या तरी त्या पुढे तशा राहिल्या नाहीत. हिंदुसभेवर पराव-लंबित्वाचीच आपत्ति राहिली. त्यामुळे हिंदुसभेत सावरकरनिष्ठ व हिंदुसभावादी असे गट पडले. गोडसे सावरकरनिष्ठ गटाचे प्रमुख होते तर टिळक परंपरेत वाढलेल्या मंडळींना केवळ व्यक्तिनिष्ठा मान्य नव्हती. वादाचे स्वरूप तात्त्विक होते. व्यवहारात सावरकर हेच हिंदुसभेचे नेते असल्याने प्रत्यक्षात काहीच भेद नव्हता. वादाचे स्वरूप फक्त विचारस्वातंत्र्यावर आधारलेले होते. हिंदुसभेचे काम पुढे न वाढण्याची जी अनेक कारणे घडली त्यांत निष्ठाभेद हे फार महत्त्वाचे कारण होते. आजही ती अवस्था कमी अधिक तशीच आहे.

या संबंधात १९४२ वर्षी व नंतरच्या काळातही हिंदुसभावादी गोटात विशेष चर्चा चालत असे. त्या वेळी हिंदुसभेत जे विविध विचारप्रवाह होते त्यांचे दिग्दर्शन १९४३ च्या मे महिन्यात ‘काळ’ मधील लेखांतून तपशीलाने करण्यात आले. त्यावरून हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांत या काळात अंतःप्रवाह कसे होते याची काहीशी कल्पना येईल.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदुराष्ट्रदल

हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त व्हावे असे कोणास वाटत नाही? सर्वांसच वाटते; पण ते प्राप्त कसे करून घ्यावे याच्या मार्गासंबंधानेच या देशातील लोकांमध्ये मतभेद आहेत. इंग्रजांचे राज्य येथे स्थापन झाले त्या वेळेपासून इंग्रज लोक असे म्हणत आले आहेत की तुम्ही स्वराज्य चालविण्यास पात्र व्हा म्हणजे आम्ही ते तुम्हांस देऊ. तेव्हापासून हिंदुस्थानातील लोक स्वराज्य चालविण्याची आपली पात्रता प्रकट करू लागले आहेत. परंतु स्वातंत्र्य नाकारण्यास ही सबब पुरेशी नाही असे दिसून येताच इंग्रजांनी नवीन सबब पुढे केली. ती म्हणजे तुमच्यात लायकी असली तरी एकी नाही व म्हणून जोपर्यंत तुम्ही ऐक्य निर्माण करीत नाही, तोपर्यंत आम्ही तुम्हांला स्वातंत्र्य कसे देऊ शकणार!

तेव्हापासून या देशातील किती तरी लोक हे ऐक्य निर्माण करण्याच्या उद्योगात गुंतले आहेत! परंतु या देशातील मुसलमान पाकिस्तानी मनोवृत्तीचे असल्यामुळे हे ऐक्य किती कठीण आहे याचा त्यांना पदोपदी अनुभव येत आहे. ऐक्याचे हें मृगजळ असूनही ते मिळविण्याचा प्रयत्न निष्फळ होणारा असल्यामुळे अखेर स्वावलंबनाच्याच मार्गाने आपण गेले पाहिजे व तरच स्वातंत्र्य मिळणे शक्य आहे हे ओळखून व देशातील प्रतिकारशक्ति कमालीची घटत आहे हे ध्यानात घेऊन ती वाढविण्याचा उद्योग ज्यांनी सुरू केला, त्यांनीच या देशाला खऱ्या स्वातंत्र्याचे मार्गदर्शन केले असे म्हणणे योग्य होईल.

या बाबतीत नागपूरचे डॉ. हेडगेवार यांनी दूरदृष्टीने सद्यःपरिस्थितीचे निरीक्षण करून त्यावर उपाययोजना ठरविली. राष्ट्राच्या दुखण्याचे ते खरेखुरेच डॉक्टर ठरले! राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना याच कल्पनेतून निघाली आहे.

संघ व हिंदुमहासभा

तथापि संघावर अनेक लोक अनेक प्रकारे आक्षेप घेताना आढळून येतात. विशेषतः अलीकडे तर हिंदुसभेचे कार्यकर्ते व संघाचे कार्यकर्ते एकत्र जमले म्हणजे चर्चेचा मुख्य विषय बहुतकरून हाच असतो. संघ व हिंदुसभा यांच्या कार्यकर्त्यांचे काही ठिकाणी चांगले जमते तर काही ठिकाणी जमत नाहीं. याला अनेक कारणे आहेत. कित्येक वेळा संघाची मूलभूत भूमिका व त्याने आपल्यावर घालून घेतलेल्या मर्यादा यांचे योग्य आकलन न झाल्यामुळेही संघावर आक्षेप घेण्यात येतात; तर कित्येक वेळा कार्यकर्त्यांच्या व्यक्तिगत दोषांमुळे संघाच्या कार्यास विकृत रूप आलेले दृष्टीस पडते. अलीकडे ह्या वादाची जळमटे बरीच वाढलेली असून त्यांचा अतिरेकी परिणाम नवीन संघ किंवा दले काढण्यात झाला आहे.

हे सर्व प्रयत्न मुळात सद्धेतुपूर्वकच होत आहेत हे खरे असले, तरी केवळ सद्धेतु असला म्हणजे तो अचूक उपाय असतो असे मात्र नाही. म्हणून हे नवनवे

संघ व दले हिंदुराष्ट्राचे सामर्थ्य वाढविण्याऐवजी आपआपसातील झगड्यांत त्याची शक्ति क्षीणच करीत आहेत असे दुःखाने म्हणावे लागते. हिंदुसमाजाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी ज्या संस्था पुढे आल्या आहेत किंवा त्यांचे सामर्थ्यसंवर्धन करण्या-करिता जे संघ किंवा दले निर्माण होत आहेत त्यांच्या भूमिका व कार्यपद्धति यांचे थोडे अधिक विश्लेषण १९४३ वर्षी दाते यांनी काळमधील लेखांतून केले. ते आजही यथार्थ असल्याने पुढे दिले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारसरणी

" या सर्व संघांत किंवा दलांत अग्रेसर असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारसरणी पुढीलप्रमाणे असे :

"हिंदु तरुणांत हिंदुराष्ट्रवादाचे बीजारोपण करून त्यांच्या ठिकाणी हिंदुराष्ट्र-वाद वाढीस लावणे व त्यासाठी प्रबळ अशी संघटना निर्माण करणे हे संघाचे मुख्य कार्य होय. कालचक्राच्या क्रमानुसार हिंदुस्थान जरी स्वतंत्र झाला तरी जोपर्यंत हिंदु तरुणांची मने संघटित व हिंदुराष्ट्रवादाने भारलेली असणार नाहीत तोपर्यंत ते स्वातंत्र्य टिकविण्याचे सामर्थ्य हिंदुराष्ट्रात निर्माण होणार नाही. याकरिता प्राप्त परिस्थितीत शक्य त्या सर्व साधनांचा उपयोग करून हिंदूंची करता येईल तेवढी उपसैनिक स्वरूपाची संघटना निर्माण करावी व हिंदुराष्ट्रासाठी प्राणार्पण करण्याचीही त्यांची मानसिक तयारी करावी हा या संघटनेचा मुख्य उद्देश आहे. संघाच्या दैनंदिन प्रार्थनेतही हा विचार अन्तर्भूत केलेला आहे.

" याकरिता संघाच्या स्वयंसेवकांनी संघाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कार्यात प्रत्यक्ष पडण्यापेक्षा संघाचे कार्य जितक्या प्रकारे वाढविता येईल तितके वाढवावे असा संघातून उपदेश केला जातो, तो योग्यच आहे. जर संघाची शिकवण घेऊन बाहेर पडलेले तरुण संघाचे कार्य वाढविणार नाहीत तर ती शिकवण वाया गेली असेच म्हणावे लागेल. सुदैवाने तरुण कार्यकर्त्यांमध्ये ही संघनिष्ठा दिवसेंदिवस वाढत आहे हे शुभचिन्ह होय. आज (१९४३ साली) संघाची संख्या जवळपास तीन लाख आहे. हे संघनिष्ठांनी आजपर्यंत केलेल्या अविरत व अथक परिश्रमाचे फळ होय यात शंका नाही. हे सर्व आशादायक चित्र पाहून हिंदुराष्ट्राच्या भवितव्या-बद्दल विश्वास उत्पन्न होतो.

स्वयंनिर्मित मर्यादा

" संघाची संघटना संघाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कार्यात प्रत्यक्ष भाग घेत नाही. ही गोष्ट योग्य अशीच आहे, संघाने हे व्रत पाळले तरच त्याची योग्य प्रकारे वाढ होऊ शकेल. या दृष्टीने संघाने योग्य धोरण ठरविले आहे. जर संघ हे धोरण न ठेवील व प्रत्यक्ष राजकारणाच्या किंवा झगड्याच्या क्षेत्रात संघशः उतरू पाहील तर संघाचे कार्य मुळासकट उखडून टाकणे परकीय राजसत्तेला सहज शक्य होईल.

" नवीन झाड लावतात तेव्हा जनावरांनी ते तोडू किंवा खाऊ नये यासाठी त्याच्या भोवती काटेरी कुंपण घालतात, परंतु तेच झाड मोठे झाले म्हणजे तीच जनावरे त्याच्या बुंध्यांना दोरखंडाने बांधीत असतात. यावरून हे कोणाच्याही लक्षात येण्यासारखे आहे की जोपर्यंत संघाची संघटना सध्याच्या सरकारला किंवा हिंदुराष्ट्राचा विरोध करणाऱ्या कोणत्याही अन्य संघटनेला पुरून उरण्याइतकी सामर्थ्यवान् झालेली नाही तोपर्यंत कोठल्यातरी बाह्य किंवा अंतर्गत संरक्षणाच्या आधारानेच त्या संघटनेची वाढ केली पाहिजे. संघाने आजपर्यंत हेच धोरण आपल्यापुढे ठेविले आहे, म्हणूनच आजवर येथील सध्याच्या राजसत्तेची त्याजवर संक्रांत ओढवलेली नाही.

राजकीय झगडा व सामर्थ्यसंवर्धन

"कोणत्याही देशात परकीय राजसत्ता असली म्हणजे आपली सत्ता तेथे सतत टिकावी यासाठी देशात कोणतेही विरोधी सामर्थ्य निर्माण न होऊ देण्याकडे तिचा सतत कटाक्ष असतो, पण परतंत्र स्थितीतील लोकांचे कर्तव्य असे असते की परकीय सरकारला विरोधी असे सामर्थ्य हर प्रयत्नाने सतत निर्माण होत रहावे. या दृष्टीने या देशातही प्रयत्न सुरू आहेत. संघ जेव्हा अस्तित्वात आला, तेव्हा हिंदुस्थानात काँग्रेस हीच राजकारण करणारी एकमेव राष्ट्रीय संस्था होती व त्या वेळी देशातील सरकारविरोधी झगड्याचा सर्व भार तिने आपल्या शिरावर घेतला होता. जर त्या वेळी काँग्रेसने हे कार्य केले नसते व संघाचे कार्यकर्ते संघशः राजकारणाच्या आखाड्यात उतरले असते तर देशात संघटित उपसैनिक सामर्थ्य वाढविण्याचे जे कार्य संघाला आजपर्यंत करता आले ते त्याला करता आले असते कीं काय याबद्दल शंका वाटते. एवढेच काय, पण जर सरकारशी झगडण्यास अन्य कोणतीही संस्था आघाडीवर उभी नसती तर देशात विरोधी सामर्थ्य निर्माण करणारी संस्था या दृष्टीने सरकारची झडप संघावरच प्रथम पडली असती व संघाला आपले कार्य सोडून द्यावे लागले असते, निदानपक्षी, आज त्याची जी वाढ झालेली दिसत आहे ती झाली नसती. पूर्वी आखाडे किंवा व्यायाम संस्था यांवर सरकारची करडी नजर असे त्यावरूनही या म्हणण्यास बळकटीच येते.

" सारांश, सरकारी अवकृपेचा मारा एकीकडे सहन करीत राहून दुसरीकडे देशात सरकारविरोधी बळ निर्माण करण्याचे कार्यही सतत चालू ठेवणे सध्याच्या येथील परिस्थितीत कोणत्याही संस्थेला अशक्यप्राय आहे. म्हणून देशात सामर्थ्य वाढविण्याचे कार्य करणाऱ्या संस्था अगदी स्वतंत्र राजकारणपराङ्मुख पाहिजेत. सरकारचा रोष सहन करण्यासाठी दुसऱ्या स्वतंत्र संस्था हव्यात. तशा इतर संस्था आघाडीवर असल्यामुळेच सरकारच्या आघातातून संघ वाचू शकला व त्यास तेवढे कार्य आजपर्यंत सुरक्षितपणे करता आले.

"ज्या वेळी देशात जहाल व क्रांतिकारक पक्ष आघाडीवर होता तेव्हा काँग्रेसही सुरक्षित क्षेत्रात वावरत होती. त्या वेळी देशात लोकजागृतीच्या रूपाने सामर्थ्य वाढविण्याचे कार्य तिला चांगल्या रीतीने करता आले. पुढे काँग्रेस जेव्हा आघाडीवर आली तेव्हा सामर्थ्य संवर्धनाचे कार्य करणाऱ्या संस्था तिच्यापासून अलग झाल्या व त्या आपले कार्य स्वतंत्रपणे करू लागल्या. सांगण्याचे तात्पर्य इतकेच की, राजसत्तेची शक्ति प्रत्यक्ष लढ्यात आघाडीवर गुंतून पडली असली म्हणजे जेथून प्रत्यक्ष प्रतिकार होत नाही, त्या ठिकाणी ती फार ताणून धरू शकत नाही व या गोष्टीचाच परतंत्र राष्ट्रांनी फायदा घेऊन आपले सामर्थ्य वाढवावयाचे असते. आजही (सन १९४३) देशात काँग्रेस व हिंदुसभा या संस्था सरकारशी झगडा चालविण्यात आघाडीवर असल्यामुळे सरकारचे सर्व लक्ष तिकडे गुंतून पडले आहे व संघ प्रत्यक्ष राजकारणात पडत नसल्यामुळेच सरकारच्या अवकृपेच्या बाधेतून तो मुक्त आहे. संघाचे कार्य सरकार जाणून नाही असे नाही. परंतु आज प्रत्यक्षतः ते बाधक होत नसल्यामुळे व एकाच वेळी सर्वांना डिवचणे व सर्व दिशांनी प्रतिकार आपल्या अंगावर ओढवून घेणे हे कोणत्याही राजसत्तेला बाधक होणारे असल्यामुळे आज सरकार उपेक्षेच्या दृष्टीने संघाकडे पहात आहे. सरकारची संघाकडे पाहण्याची जोपर्यंत अशी दृष्टि आहे तोपर्यंतच संघाला आपले कार्य जोमाने वाढविता येणे शक्य आहे. काही दिवसांनी असा काळ येईल की संघाचे उपसैनिक सामर्थ्य येथील सत्ताधीशांना जाचक वाटेल व ते संघावर शस्त्र धरतीलही. पण हा काळ अद्याप बराच दूर आहे व संघाच्या सामर्थ्याची सरकारला व्यावहारिक जाणीव घेण्याइतके ते वाढेपर्यंत तो दूर असावा हेच इष्ट आहे. हिटलरने किंवा इंग्रजांनी सुद्धा आपली युद्धाची तयारी होईपर्यंत प्रत्यक्ष युद्धास हात घातला नाही यातील व्यवहारशास्त्र संघ जाणतो व त्याने ते जाणलेही पाहिजे.

परस्परसंबंधांचे स्वरूप

"अशा प्रकारे संघ व या देशातील राष्ट्रीय राजकीय संस्था यांचे परस्पर संबंध आहेत व असावेत. देशात सामर्थ्य उत्पन्न करीत राहाणे हे संघाचे कार्य होय; व उत्पन्न झालेल्या सामर्थ्याच्या साहाय्याने अधिकाधिक सत्ता मिळविण्यासाठी सरकारशी झगडा चालू ठेवणे हे येथील राजकीय संस्थांचे कार्य होय. अखेर सैनिकी सामर्थ्याच्या जोरावरच या देशाला स्वातंत्र्याची प्राप्ति व्हावयाची आहे व म्हणून हे सामर्थ्य सुव्यवस्थितपणे व निर्धोक रीतीने उत्पन्न होऊ देण्यासाठी व वाढविण्यासाठी हे कार्य करणाऱ्या संस्थांनी राजकीय लढा टाळला पाहिजे; व देशातील राजकीय संस्थांनी सरकारचा नित्य व नैमित्तिक विरोधाचा सर्व मारा स्वतःवर झेलला पाहिजे. त्यात त्या संस्था कदाचित् घायाळही होतील; परंतु सामर्थ्य निर्माण करण्याचा मार्ग हाच आहे. याकरिता या देशातील राजकीय संस्था व संघासारखी

देशात सामर्थ्य निर्माण करणारी संस्था यांचे बाह्य संबंध अगदी अलग राखले पाहिजेत. पण आतून मात्र ते अतिशय जिव्हाळ्याचे, प्रेमाचे, आपलेपणाचे व परस्परविश्वासाचे असले पाहिजेत.

हिंदुत्वनिष्ठेचा निकष

" काँग्रेसचे सध्याचे राजकीय धोरण हिंदुराष्ट्रवादाशी सर्वस्वी विसंगत आहे व ते दुरुस्त होण्याची आशाही तूर्त नष्ट झाली आहे. त्यामुळे हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांना हिंदुसभेच्या द्वारे हिंदुराष्ट्राचे राजकारण लढणे भाग झाले. पूर्वीची 'राष्ट्रीय' सभा आता नष्ट झाली असे समजून तिची जागा आजच्या हिंदुसभेने भरून काढली आहे. आजच्या काँग्रेसवर गांधीवादाची संपूर्ण काळी छाया पडली आहे. त्यामुळे काँग्रेस व हिंदुसभा यांच्यातील राजकारणविषयक तात्त्विक व मूलभूत मतभेद स्पष्ट झाले असून त्यायोगे काँग्रेसचे खऱ्या अर्थाने राष्ट्रीय व राजकीय स्वरूपही नष्ट झाले आहे. म्हणून संघाच्या तात्त्विक व पायाभूत भूमिकेवरून सरकारशी झगडा करणारी देशातील जी एकमेव खरी राष्ट्रीय संस्था हिंदुमहासभा तिच्याशी संघाचे परस्परसंबंध आपलेपणाचे व विश्वासाचे असावयास पाहिजेत. तसे जर ते राहणार नाहीत तर संघाच्या व पर्यायाने हिंदु राष्ट्राच्या कार्यास हानीच पोहोचणार आहे. हिंदुसभेच्या नित्यशः चालणाऱ्या कार्यात संघाने कोठेही संघशः भाग घेऊ नये हे योग्य होय; परंतु ज्या वेळी प्रत्यक्ष व नैमित्तिक स्वरूपाचा लढा सुरू होतो, त्या वेळी हिंदु राष्ट्रवादाची शिकवण संघातून घेऊन बाहेर पडलेले तरुण व्यक्तिशः जबाबदारीवर त्या चळवळीत दाखल होतात व त्या चळवळीला लागणाऱ्या लढाऊ सामर्थ्याची जोड देऊन ती यशस्वी करतात, व ते कार्य संपले म्हणजे पुनरपि आपल्या नित्याच्या कार्यास लागतात. अशी परिस्थिति असली म्हणजे योग्य जिव्हाळा कायम राहतो. विशेष प्रसंगी परस्परांना एकमेकांच्या साहाय्याचा उपयोग होतो व देशाचे सामर्थ्य एकंदरीने वाढीस लागते. भागानगर व भागलपूर येथील लढ्याच्या वेळी हाच अनुभव आला. संघाच्या शेकडो स्वयंसेवकांनी व्यक्तिशः जबाबदारीवर या चळवळीत भाग घेऊन त्या यशस्वी करण्यास साहाय्य केले.

"सारांश, हिंदुसभा ही संघाकडे आपल्या सामर्थ्याची ठेव (Reserve Bank) या दृष्टीने पाहाते व संघाने हिंदुसभेकडे संघाच्या उद्दिष्टांची पूर्ति करणारी व संघाच्या कार्याच्या वाढीस लागणारा निर्वेधपणा लाभू देण्यास साहाय्यभूत होणारी एक संस्था या दृष्टीने पाहावे अशी तिची अपेक्षा आहे. यात काहीच गैर नाही. अशा रीतीने संघाचे साहाय्य हिंदुसभेस व तिचे संघास लाभून उभयतांचे व पर्यायाने देशाचे सामर्थ्य वाढवीत जावे हे सर्व दृष्टींनी हितकर आहे.

हिंदु सभेपुढील समस्या

"राष्ट्रीय स्वयंसेवक संघासंबंधाने समाजात कोणत्या कल्पना वावरत आहेत व त्या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट कोणते अपेक्षित आहे व असावे यासंबंधीचे विचार वर मांडले आहेत. आता हिंदुमहासभेच्या कार्यवाढीच्या दृष्टीने कोणत्या घटना घडत आहेत याचा विचार केला पाहिजे.

"हिंदुसभा ही वास्तविक हिंदूंची सर्वांगीण उन्नति करण्यासाठी निघालेली संस्था आहे. परंतु कोणतीही उन्नति राजकीय परिस्थितीच्या अनुकूलतेवाचून होऊ शकत नसल्याने तिला समाजसंवर्धनाच्या इतर विषयांबरोबरच राजकारणाकडेही लक्ष द्यावे लागते. जर काँग्रेस ही खरीखुरी राष्ट्रीय विचारांची व कार्याची प्रवर्तक संस्था राहती तर हिंदुसभेचे राजकीय कार्यक्षेत्र मर्यादित स्वरूपाचेच राहिले असते. कारण हिंदु हे राष्ट्रीय वृत्तीचे मुळापासूनच आहेत. वाद आहे तो हिंदु हे राष्ट्रीय आहेत की नाहीत असा नसून हिंद्वेतर हे राष्ट्रीय आहेत कीं नाहीत असा आहे. त्यामुळे देशाचे राजकारण करणारी कोणतीही राष्ट्रीय स्वरूपाची संस्था असली तरी तीत हिंदु हे प्रामुख्याने असावयाचेच. आजची वस्तुस्थिति अशी आहे की तुम्ही नाव कोणतेही घ्या व ते केवढेही विशाल असू द्या, राष्ट्रीय स्वरूपाचे कार्य निघाले म्हणजे हिंदु हेच प्रामुख्याने नव्हे तर जवळ जवळ तेच काय ते त्यात भाग घेतात. या देशातील राजसत्ता परकीय असल्याने हिंदूंच्या वाढत्या बळाविरुद्ध उलट बाजूचे वजन वाढविण्याकरिता सरकार मुस्लिम लीगवाल्यांची मनधरणी करीत असते. अशा स्थितीत जोपर्यंत सत्ता देण्याचे सामर्थ्य ब्रिटिशांच्या हाती आहे, तो-पर्यंत मुसलमान हे कधीही हिंदूंशी न्यायाच्या भूमिकेवरून तडजोड करण्यास तयार व्हावयाचे नाहीत. त्यांच्या महत्त्वाकांक्षा वेगळ्या व त्या साध्य करून घेण्याचे त्यांचे मार्गही वेगळे आहेत. परंतु हा साधा व कोणासही सुचणारा व समजणारा विचार काँग्रेस प्रमुखांस पटत नाही. त्यामुळे आज देशातील राजकारण अडचणीचे व अवघड होऊन बसले आहे. ते सुधारावे यासाठी हिंदुसभा राजकारणात आज भाग घेऊ लागली असून तिची शक्ति जसजशी वाढत जाईल त्या प्रमाणात या देशातील राजकारण सुधारू लागेल. यासाठी आज हिंदुसभेचे बळ हरप्रयत्नाने वाढविले पाहिजे.

"आज हिंदु महासभेचे बळ पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे यात शंका नाही. पण त्याचे कारण त्या संस्थेची कार्यपद्धति अधिक सुसंघटित झाली आहे यापेक्षा तिला वीर सावरकरांसारखे लोकोत्तर पुढारी लाभले व जिनांच्या हेकेखोरपणामुळे मुसलमानांनी तीव्रतर यादवी माजविली यात अधिक सापडते. त्याचप्रमाणे काँग्रेस पुढाऱ्यांनी मुस्लिम अनुनय प्रकरणी अगदीच ताळतंत्र सोडून जे विचित्र धोरण स्वीकारले त्यानेही सर्वसामान्य जनतेची हिंदुसभेकडे सहानुभूति वाढत गेली. परंतु या सर्व अनुकूल घटनांचा जितका फायदा घेता यावयास पाहिजे तितका तो घेतला

गेला नाही. याचे कारण अद्यापिही हिंदुसभेच्या कार्याला सर्वस्वी वाहून घेणारे निष्ठावंत कार्यकर्ते कमी पडत आहेत हेच आहे.

"या बाबतीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने निष्ठावंत कार्यकर्त्यांचे जे पीक गेल्या चार पाच वर्षांत काढले आहे ते डोळ्यांपुढे ठेवण्यासारखे आहे. जर हिंदुमहासभेचे कार्यकर्ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या निष्ठेने कामे करतील तर त्यांच्याही कार्यास यश खचित येईल. परंतु आज हिंदुसभेत तशा निष्ठावंत कार्यकर्त्यांची संख्या अतिशय कमी आहे व त्यामुळेच तिच्या कार्याचा व्हावा तसा उठाव होत नाही. ही गोष्ट दुःखद असली तरी सत्य आहे व म्हणून ती दडवून न ठेवता स्पष्टपणे पुढे मांडणे अवश्य आहे.

"संघाच्या कार्याला एवढे यश येते आणि हिंदुसभेच्या कार्याला मात्र ते येत नाही यामुळे खेद वाटून हा दोष नाहीसा करण्याच्या हेतूने अनेक कार्यकर्ते नव्या नव्या वाटा हुडकू पहात आहेत. परंतु हिंदुमहासभेचे कार्य कां वाढत नाही याच्या कारणांची मीमांसा करणाऱ्यांनी काढलेली उत्तरे भिन्न भिन्न व क्वचित् परस्परविरुद्धही असून त्यात त्यांचा बराच गोंधळ झालेला दृष्टीस पडतो.

एकचालकानुवर्तित्वाचा वाद

"काहींचे मत असे आहे की, संघाचे कार्य कां वाढते याचे कारण ती संस्था एकचालकानुवर्ती आहे हे होय. तेव्हा जर हिंदुसभेचेही कार्य वाढीस लागावे अशी अपेक्षा असेल तर हिंदुसभेचेही कार्य एकचालकानुवर्ती व्हावयास पाहिजे. त्यांच्या मते हिंदुसभेतील कार्यशैथिल्याचा दोष हा तिच्या लोकशाही पद्धतीत असून ती जितक्या लवकर एकचालकानुवर्ती संस्था होईल तितकी तिची प्रगति अधिक झपाट्याने होईल व म्हणून हिंदुसभेची सर्व सूत्रे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्यासारख्या लोकोत्तर पुढाऱ्याच्या हाती देऊन सर्वांनी केवळ त्यांच्या तंत्राने व सांगीनुसार वागावे असे ते म्हणतात. आपल्या या म्हणण्याच्या पुष्टचर्थ ते असेही सांगतात की, काँग्रेस गांधींच्या नेतृत्वाखाली काम करू लागली, तिने त्यांना डिक्टेटर नेमले व म्हणूनच तिचे बळ वाढले. पण खरी वस्तुस्थिति अशी आहे की गांधींच्या काही काही चुकीच्या धोरणामुळे तिचे बळ वाढण्याऐवजी घटले; एवढेच नव्हे तर ते देशाच्या फाळणीस व एकराष्ट्रीयत्वासही घातक ठरले. देशात स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या वर्गाचा त्यामुळे कोंडमारा झाला. कोणत्याही समाजात स्वतंत्रपणे विचार करणारा असा वर्ग जर नसेल तर तो समाज जिवंत राहू शकत नाही. ध्येयवादात एकरूप असून विचारस्वातंत्र्य असले तर त्याची खरी प्रगति होऊ शकते. त्याशिवाय कोणतीही संघटना बीजभूत सामर्थ्याने संपन्न होऊ शकत नाही. केवळ पोथीनिष्ठ एकचालकानुवर्तित्वाने बीजभूत सामर्थ्य निर्माण होत नाही. कोणत्याही संघटनाकारांनी याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. प्रत्यक्ष कार्य करताना संघटित व

शिस्तबद्ध कार्याची आवश्यकता केव्हाही असतेच; पण वैचारिक क्षेत्रातही एकचालकानुवर्तित्वाचा युक्तिवाद खरा नसून भ्रामक आहे. संघाचे काय किंवा काँग्रेसचे काय, आज जे बळ वाढलेले दिसते ते त्या त्या संस्था एकचालकानुवर्ती आहेत म्हणून नव्हे तर त्या त्या संस्थांत निष्ठेने अहर्निश कार्य करीत रहाणारी माणसे अधिक आहेत म्हणून होय! जर हुकुमशाही निर्माण करण्याने त्या त्या संस्थांना बळ येते हे खरे असते, तर या देशातील स्वराज्ये पूर्वी कां नष्ट झाली असती? त्या वेळचे सर्व राजे हे आपापल्या राज्यात हुकुमशहाच नव्हते काय? आणि आजही खुद्द हिंदुसभेत वीर सावरकरांच्या शब्दाला हुकुमशहाच्या शब्दासारखाच मान दिला जात नाही काय? खुद्द सावरकर हे तसे वागत नाहीत, ते विचारस्वातंत्र्याचे महत्त्व नेहमीच जाणतात, किंबहुना त्यावर त्यांचा सतत भर असतो हे वेगळे. हिंदुसभेतील लोक त्यांच्या इच्छेच्या बाहेर निदान मोठ्या राजकीय प्रश्नावर तरी जात नाहीत, असा अनुभव आहे. पाच वेळा हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदी त्यांची पूर्वी निवड झाली असता यंदा सहाव्या वेळीही फिरून त्यांनाच निवडले यावरून त्यांचे नेतृत्व हिंदु जगतास मान्य आहे असाच त्याचा अर्थ होत नाही काय? मग कागदोपत्री शिक्कामोर्तब करून एखाद्याला डिक्टेटर नेमण्यापेक्षा स्वेच्छेने व मनापासून एकाद्याला नायक मानणे हे अधिक श्रेयस्कर नव्हे काय? कारण कागदोपत्री ठरावांचे देखील जर इच्छापूर्वक पालन करणारे न भेटले तर असे ठराव म्हणजे कचरापेटीयोग्यच होतात. तेव्हा खरी अडचण हिंदुसभेची घटना ही एकचालकानुवर्ती नाही, ही नाही; तर तिला निष्ठावंत कार्यकर्ते जितके हवे होते, तितके मिळाले नाहीत हीच खरी अडचण आहे.

निष्ठावंत कार्यकर्त्यांचा अभाव

"परंतु खरा दोष कशात आहे हे न उमगल्यामुळे सध्या काय विचित्र परिस्थिति झालेली आहे पहा! हिंदुसभेचे बळ वाढावे व कार्यकर्त्या स्वयंसेवकांची एक प्रबळ संघटना असावी यासाठी पूर्वी एकदा रामसेना निघाली होती. ती निघाली होती म्हणजे तसा एकदा ठराव झाला होता व तिच्या अधिकारित्वाची पिसे कोणाकोणाला चिकटविण्यात आली होती. परंतु सभा, समिति, उपसमिति, सभासद, घटना, कार्यकारी मंडळ इत्यादींची कागदोपत्री खोकी तयार करण्यापलीकडे त्या संस्थेच्या कार्याची फारशी काही वाढ होऊ शकली नाही. या बाबतीत नागपूरचे श्री. जगन्नाथ प्रसाद वर्मा हे अतिशय उत्साही व निष्ठावंत कार्यकर्ते होते. ते तसे होते म्हणून नागपुरास रामसेना ही चालती बोलती व कार्यकर्ती संघटना दिसू शकली. परंतु इतर प्रांतांत ती केवळ नाममात्रच होती व श्री. वर्माजींच्या पश्चात् नागपूर प्रांतातही कोणी नेटाचा व चिकाटीचा कार्यकर्ता न मिळाल्याने तेथेही तिने राम म्हटला आहे!

संघापासून अपेक्षा

"आजपर्यंत हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांची अशी सामान्य अपेक्षा असे की तिचे काम करण्यास संघाची मुले मिळावीत. वास्तविक ही अपेक्षा योग्य नव्हती. कारण हिंदुसभेचे जे नित्यनैमित्तिक कार्य, जे रोजच्या रोज करावयाचे त्यासाठी संघाची मुले उठल्या बसल्या कशी लाभणार व कां लाभावीत? विशेष प्रसंगी त्यांनी सहकार्य करावे हे वेगळे व सभेची नित्य कामेही त्यांनीच करावीत हे म्हणणे अगदी वेगळे होय. नियम हवा तो असा की, संघाच्या मुलांनी हिंदुसभेच्या नित्य-नैमित्तिक कार्यात भाग घेण्याची अपेक्षा हिंदुसभावाद्यांनी बाळगू नये; फक्त काही विशेष कार्य निघाले तर हिंदुसभेशी आपला काही एक संबंध नाही असे तुटसपणे संघाच्या अधिकाऱ्यांनीही न वागता हिंदुसभेच्या कार्यास त्यांनी व्यक्तिशः म्हणून शक्य तितकी मदत करावी. पण अनुभव पुष्कळ ठिकाणी आला तो असा की, हिंदुसभेचे काम करण्यास तिची अशी स्वयंसेवकचमू मुळीच उभी न करता सर्वच कामे संघातील मुलांनी करावी अशी अपेक्षा केली जाऊ लागली. त्यामुळेच वाद वाढीस लागला. इतका की, पुढे पुढे अशा वादातून मतभेद व त्यातून मतद्वेष व विरोध ह्या वृत्ति जन्मास आल्या. या सर्वांचे कारण हिंदुसभेजवळ स्वतःच्या कार्यासाठी लागणारे स्वयंसेवकांचे पथक नव्हते व अजूनही ते नाही हेच आहे.

" यावर काही कार्यकर्त्यांना असे वाटू लागले की, संघ हिंदुसभेच्या उपयोगी पडत नाही व तो इतःपर पडण्याची शक्यताही आता राहिली नाही, तेव्हा जर हिंदुसभेचे कार्य वाढवावयास हवे असले तर त्यासाठी आपण स्वयंसेवकांचे वेगळे दल काढले पाहिजे. वास्तविक ही कल्पना मुळीच गैर नव्हती. पूर्वी रामसेना याच उद्देशाने निघाली होती. परंतु रामसेनेच्या कार्याला यश कां आले नाही याची कारणे या मंडळींच्या लक्षात नीटशी न आल्याकारणाने त्यांनी भलत्याच रोगावर भलताच उपचार सुरू केला. त्यांची समजूत अशी झाली की, रामसेनेला यश आले नाही याचे कारण ती संघटना एकचालकानुवर्ती नव्हती व संघाला जे यश येत आहे याचे कारण ती संस्था एकचालकानुवर्ती आहे हे होय. वास्तविक हा त्यांचा भ्रम होता. रोगाचे खरे मूळ कार्यावरील निष्ठेच्या अभावात होते. परंतु जे कार्यकर्ते हिंदुसभेचे कार्य वाढावे अशा तळमळीने तिच्या दुखण्याचे संशोधन करीत होते त्यांच्यापैकी काहींना असे प्रामाणिकपणे वाटले की, जर आपल्याला हिंदुसभा बलवान् करावयाची असली तर त्यासाठी आपण वेगळीच एखादी एकचालकानुवर्ती संस्था काढली पाहिजे. दुर्दैवाची व दुःखाची गोष्ट अशी की, काही मोठमोठ्या व नामवंत थोर हिंदुत्वनिष्ठांनीही या कल्पनेचा पुरस्कार केला व त्यातून हिंदुराष्ट्र-दल हे नव्याने जन्मास आले.

हिंदुसभेचे परावलंबन

" या संस्थेचे सध्याचे तरी उद्दिष्ट व ध्येय असे आहे की, ही संस्था एकचालकानुवर्ती ठेवावयाची; व तिला हिंदुसभेचे जे जे कार्यक्रम पसंत पडतील ते ते तिने आचरणात आणावयाचे. उदाहरणार्थ, ठिकठिकाणच्या हिंदुसभेचे सभासद नोंदविणे, हिंदुत्ववृत्तीचा समाजात प्रचार करणे इत्यादि. म्हणजे अगदी संघाच्या पावलावर पाऊल टाकून चालणारी, पण संघाहून आपले अस्तित्व मात्र अगदी स्वतंत्र व भिन्न ठेवण्याचा कटाक्ष बाळगणारी अशी ही संस्था आपल्या शक्तिबुद्धीप्रमाणे व जमेल तेव्हा हिंदुसभेचे पटेल तेवढे कार्य करणार आहे. संघ हिंदुसभेच्या कार्यास उपयोगी पडत नाही म्हणून अव्यभिचारी भक्तीच्या मोठ्या ईर्षेने व त्वेषाने निघालेली ही संस्था हिंदुसभेच्या पासून तितक्याच दूर अंतरावर जाऊन पडावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय! परंतु तशी घटना घडून आली आहे खरी!

" परंतु या फुटीर वृत्तीमुळे कार्याचा नाश मात्र होतो. एखादे चांगले कार्य कोणी करतो म्हणाला तरी ते तसे घडत आहे कीं नाही हे पहाणे अवश्य असते. आपण जी कोणती गोष्ट करतो ती परिणामाच्या दृष्टीने किती यशस्वी होण्यासारखी आहे हा विचार न करणे शहाणपणाचे ठरणार नाही. एकच कार्य करणाऱ्या विविध संस्था एकाच ठिकाणी निघाव्यात हे फुटीर वृत्तीचे लक्षण असून समष्टिकार्याची हानि करणारे आहे. संघही हिंदुत्ववृत्ति वाढवीत आहे. हिंदुराष्ट्रदल हेही हिंदुत्ववृत्ति वाढवीत आहे व ही वृत्ति वाढविणाऱ्या आणखी शेपन्नास संस्था निघाल्या तर तेही हितकरच होय असे कोणी म्हणू व मानू लागला तर ते मात्र खरे नाही. जर खरोखरच कार्य घडून यावे अशी इच्छा असली तर विविध संस्थांचा फापट पसारा न वाढविता कार्याच्या दृष्टीने त्या सर्व एकाच संस्थेच्या अंशभागी करण्यात आल्या पाहिजेत. असे झाले तरच त्या कार्यक्षम होतील. अशा एकाच तऱ्हेच्या विविध संस्था काढल्याने फायदा काहीच होत नाही. उलट समष्टिजीवनाचा घात मात्र होतो. पण आज स्थिति अशी आहे की हिंदुसभेची स्वतःची अशी एकही अधिकृत स्वयंसेवक संघटना नाही. परंतु तिच्याशी ज्यांची घटनात्मक बांधिलकी नाही अशा विविध नामधारी स्वयंसेवक संघटनांचे मात्र हिंदुसभेचे कट्टर अनुयायी व कार्यकर्ते नेतृत्व करताना दृष्टीस पडतात! कोणी रामसेनेचे प्रमुख आहेत, कोणी युवक संघाचे प्रमुख आहेत, कोणी विद्यार्थ्यांच्याच संघाची उस्तवारी करीत आहे, तर कोणी राष्ट्रदलाच्या शाखांचा गावोगाव प्रसार करीत आहेत. आणि हा सर्व खटाटोप कशाकरिता ? तर हिंदुसभेच्या कार्याला जोराची गति प्राप्त व्हावी म्हणून! पण प्रत्यक्ष तिची अधिकृत स्वयंसेवक संघटना मात्र चालू करण्याची कोणाचीही तयारी नाही! उंटावरून शेळ्या हाकण्याचाच हा प्रकार नव्हे काय ?

" सारांश, हिंदुसभेचे कार्य आज वाढीस लागत नाही याचे खरे कारण पिळाने, निष्ठेने व तिच्याकरिता जीव टाकून काम करणाऱ्या माणसांची येथे खरोखरच वाण आहे हे असून त्यासाठी चालू असलेले हे फुटीर उपाय तिची प्रबळ संघटना कधीही करू शकणार नाहीत. स्वतंत्रपणाने मुलूख संपादन करून सवता सुभा स्थापन करणारे मराठे सरदार जसे अखेरीस प्रबळ होऊन त्यांनी मध्यवर्ती राजसत्ता खिळखिळी करून टाकली व अखेर त्यामुळेच ती नष्ट झाली व तेही नामशेष झाले तोच प्रकार सध्या चालू आहे. या वेगवेगळ्या नावांखाली संस्था काढून त्या चालविणाऱ्या माणसांना हिंदुसभेच्या कार्यातील शिथिलपणाची कारणे एक कळत तरी नाहीत किंवा स्वतःचे स्वयंभू पुढारीपण नष्ट होऊ नये यासाठी तरी ते या संस्थाची बारगिरी बाळगून राहण्याची अपेक्षा बाळगीत असावेत, याशिवाय अन्य कारण दिसत नाही.

" वरील विचार कोणास आवडणार नाहीत; असे असले तरी आता वेळ अशी आली आहे की ते स्पष्टपणे न बोलणे हे अधिक घातक ठरणार आहे ! "

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून वैचारिक मतभेदामुळे फुटून बाहेर पडलेल्या तरुणांनी प्रथम सावरकरांचे एकचालकानुवर्तित्व स्वीकारून हिंदुराष्ट्रदल काढले. पण खुद्द सावरकर हे पोथीनिष्ठ कधीच नव्हते. ते मतस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. परंतु अनुयायांना सावरकरांचेच नेतृत्व सतत राहील असे दल हवे होते. पुढे त्यांनाही सावरकरांच्या विचारपरंपरेशी जुळवून घेता न आल्याने त्यांनी आपला आणखी वेगळा सवता सुभा निर्माण केला. बदलत्या परिस्थितीत हिंदुसभेला हिंदुराष्ट्र-दलाचाही उपयोग होईनासा झाला. हिंदुसभेचे कार्य पोरकेच राहिले.

दाते यांनी काळमधून व्यक्त केलेल्या वरील विचारांनी हिंदुसभेच्या कार्य-कर्त्यांत बरेच मोठे वादळ निर्माण झाले. त्यामुळे हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांत भिन्न भिन्न विचारप्रवाह व वैचारिक मतभेद असल्याचेही स्पष्ट झाले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही पुढच्या काळात राजकीय संरक्षणाची व त्या-साठी राजकीय पक्षाच्या पाठिंब्याची गरज वाटू लागली. आरंभी ते काँग्रेसच्या कच्छपी होते; पण विशेषतः गांधीवधोत्तरच्या परिस्थितीत नेहरू सरकारने संघा-वर बंदी घातली तेव्हा संघाला राजकीय पक्षाचा पाठिंब्याची गरज अधिकच भासू लागली. हिंदुमहासभेशी त्यांचे संबंध पूर्वीच दुरावलेले होते. त्यामुळे संघी-यांनी जनसंघ निर्माण केला. तथापि तेथेही विचारस्वातंत्र्यास फारसा वाव न राहता एकचालकानुवर्तित्वाचे दडपण जनसंघावरही येत राहिले. त्यामुळे तेथेही पुढे फाटाफूटच निर्माण झाली व मधोक गट बाहेर पडून जनसंघाचे बळही घटत गेले आणि त्यामुळे संघही एका दृष्टीने पुन्हा पोरकाच राहिला.

निजामच्या वऱ्हाडच्या मागणीला विरोध

१९३५ चा घटना कायदा तयार होत असताना निजाम सरकारने वऱ्हाड प्रांत आपल्याला परत मिळावा म्हणून मागणी केली होती. १८०३–०४ च्या काळात मराठ्यांविरुद्ध इंग्रज व निजाम यांनी संयुक्त स्वारी करून वऱ्हाड प्रांत जिंकून घेतला होता. त्या वेळी तो निजामाला देण्याचे इंग्रजांनी कबूलही केले होते. तथापि पुढे निजामी राज्य कर्जबाजारी झाले व त्याची इंग्रजांच्या तैनाती फौजेची बाकी देणे वाढत गेली. तेव्हा त्या कर्जाच्या मोबदल्यात इंग्रजांनी वऱ्हाड प्रांत आपल्याकडे ठेवून घेतला. वऱ्हाड सुपीक असल्यामुळे आता इंग्रजांचे सर्व कर्ज फिटले असल्याने वऱ्हाड प्रांत निजामाला परत मिळाला पाहिजे अशी निजामी शासनाकडून चळवळ सुरू झाली. या वेळी १९१९ च्या सुधारणा कायद्यानुसार वऱ्हाड मध्यप्रांताला जोडला गेलेला होता व तेथे लोकशाही पद्धतीची दिद्दल राजवट सुरू होती. लोकमत जागृत झाले होते व कोणत्याही परिस्थितीत वऱ्हाड निजामाकडे परत देण्यात येऊ नये यासाठी तीव्र बनलेले होते. तथापि इंग्रज कोणते धोरण स्वीकारतात या संबंधात लोकांच्या मनात बाकबूक होती. वऱ्हाडचा प्रश्न विलायतेतील ब्रिटिश सरकारच्या प्रमुखांना व पार्लमेंटच्या सभासदांना समजून सांगण्याकरिता व वऱ्हाड निजामाला परत देऊ नये यासाठी लोकमत किती तीव्र आहे याची त्यांना कल्पना आणून देण्याकरिता गोलमेज परिषदेच्या काळात १९३१ वर्षी श्री. रामचंद्र अनंत कानिटकर हे विलायतेस गेले होते; तेथे त्यांनी यासंबंधात बराच प्रचारही केला होता. निजामाच्या वतीने वऱ्हाड मिळविण्यासाठी प्रचारक आधीच गेलेले होते. तथापि कानिटकरांच्यामुळे त्यांना बराच पायबंद बसला. तथापि ब्रिटिशांनी निजामाचा वऱ्हाडवरील कायदेशीर अधिकार मान्य केला होता व निजामच्या वारस पुत्राला प्रिन्स ऑफ बेरार ही उपाधीही मान्य केली होती. १९३५ च्या कायद्यात ब्रिटिश सरकारने वऱ्हाड निजामाच्या स्वाधीन केला नाही. तथापि दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा ब्रिटिश सरकारने १९३५ चा घटना कायदा रद्द करण्याचे ठरवून घटना समिति निर्माण करण्याचे व नवी जी घटना तयार होईल तिला मान्यता देण्याचेही घोषित केले तेव्हा निजामी शासकांच्या तोंडाला पुन्हा पाणी सुटले. वऱ्हाडमधील काँग्रेसचे एक पुढारी पंजाबराव देशमुख यांनी तर निजामचा पुत्र प्रिन्स ऑफ बेरार यास वऱ्हाड भेटीचे आमंत्रणही दिले व त्यांचा अमरावती, अकोला, खामगाव इ. ठिकाणी दौरा आयोजित केला. निजामी राज्यातून ही चळवळ उभी राहताच व तिला वऱ्हाडमधीलच काही लोक बळी पडल्याचे पाहताच हिंदुसभावाद्यांनी त्याविरुद्ध चळवळ करण्याचे ठरविले. तेव्हा निजाम पुत्राचा दौरा थोडा पुढे ढकलण्यात आला व गुपचूपपणे तो पार पाडण्याची योजना आखण्यात आली. पण ती वार्ता फुटलीच. दि. २३ मार्च १९४४ ला जेव्हा अमरावतीला हे युवराज आले तेव्हा लोकांनी त्यांचे काळ्या निशाणांनी स्वागत

केले. रामकृष्ण विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल या शाळांतील विद्यार्थ्यांनी शाळांवर बहिष्कार घातला व वऱ्हाड तुमचा नाही, तो लोकांचा आहे अशा घोषणा केल्या. दुसऱ्या दिवशी दि. २४ मार्चला खामगावच्या एका मुस्लिम शाळेला त्यांनी भेट दिली तेव्हाही खामगावला लोकांनी हरताळ पाडला. घरोघर काळी निशाणे लावली व चलेजाव घोषणा केल्या. हा सर्व उठाव हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी घडवून आणला व लोकमत निजामी शासनाविरुद्ध किती तीव्र आहे याचा त्यास प्रत्यय आणून दिला. या कामी श्री. वि. घ. देशपांडे, बाळशास्त्री हरदास, डोंगरे, बापट, सोमण, भिडे, डॉ. भोरकर डॉ. सावजी, शेठ गोविंदलाल, नंदलाल तोडरमल, रामप्रसादजी मुकुंदराय, शेकदार बंधु, देशपांडे, ल. ग. थत्ते, पु. भा. भावे अप्पलवार, सरदार जगजितसिंग प्रभृतींनी खूप मोठे आंदोलन घडवून आणले.

नळदुर्गची हिंदुधर्म परिषद

१९४४ साली दि. ११ मार्चला नळदुर्ग येथे महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेचे अधिवेशन हैद्रबादचे बॅ. शंकरराव बोरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. वास्तविक हे अधिवेशन तुळजापूर येथे भरविण्याचे आधी ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे तुळजापूरला तयारीही झाली होती. तथापि आयत्या वेळी निजाम सरकारने हे अधिवेशन तुळजापूर सोडून अन्यत्र कोठेही भरवावे असे सुचविले. त्यामुळे कार्यकर्त्यांनी नळदुर्ग येथे ही परिषद भरविली. या परिषदेस महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. शिवरामपंत करंदीकर, सोलापूरचे पुढारी वि. रा. पाटील व हिंदुसभेची इतर कित्येक प्रमुख मंडळी उपस्थित होती. श्री. रामचंद्र हिराचंद गांधी हे स्वागताध्यक्ष होते. श्री. किसनराव मुरुमकर, दासराव वकील, नागोराव देशमुख, मुरलीधर शिंदे, गजाननराव पंढरपूरकर, व्यंकटराव वकील भास्करराव वकील, अंबऋषि इ. मंडळींनी या अधिवेशनाचे काम अंगावर घेऊन यशस्वी तऱ्हेने पार पाडले. यापूर्वी गुलबर्गा व बिदर येथे जे दंगे झाले होते, त्यांचे वृत्तान्तही परिषदेने प्रसिद्ध केले होते. गुलबर्ग्याच्या दंग्याचा वृत्तान्त निजाम सरकारने जप्त केला होता व बिदर दंग्याच्या निमित्ताने अनेकांवर खटले भरले होते. सरकारच्या या कृत्यांचा परिषदेत निषेध करण्यात आला. या परिषदेत मराठवाड्यातून सुमारे पाचशे प्रतिनिधि आले होते. परिषदेमुळे लोकजागृतीचे काम मोठ्या प्रमाणावर झाले.

तसेच महाराष्ट्र हिंदुसभेचे एक फार मोठे प्रांतिक अधिवेशन १९४६ च्या डिसेंबरात बार्शी येथे श्री. भालजी पेंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्यासाठी महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांतून व मराठवाड्यातून सुमारे सात आठशे प्रतिनिधि उपस्थित होते. फाळणीपूर्वीच्या काळातील व त्या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन झाले असल्याने ते अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण असे झाले.

*

(१२)

हिंदुराष्ट्रवादाचा पाया

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिंदुस्थानच्या भावी घटनेसंबंधाने सर्वत्र विचार-मंथन सुरू होते. आम्ही आमची घटनासमिति नेमून आमची घटना करू व ब्रिटिश सरकारने ती मान्य करावी अशी काँग्रेसची मागणी होती; पण काँग्रेसपद्धतीची घटनासमिति जिनांना मान्य नव्हती. क्रिप्स यांनी भारताला वसाहतीचे स्वराज्य युद्धाच्या अंती देण्यात येईल असे ब्रिटिश सरकारच्या वतीने आश्वासन दिले होते. अशा स्थितीत भारताची भावी घटना कशी असावी याचा तपशीलवार विचार करण्याची आवश्यकता होती. महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष भोपटकर यांना त्यांच्या साठीसमारंभानिमित्त देण्यात आलेल्या देणग्यांच्या विश्वस्तांनी हिंदुस्थानच्या भावी घटनेसाठी एक नमुना आराखडा तयार करण्याकरिता श्री. दामोदर विश्वनाथ उपाख्य बाबूराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली. तिने स्वतंत्र हिंदुस्थानच्या भावी घटनेचा नमुना आराखडा तयार करण्याचे काम केले. त्यासाठी त्यांनी अनेक तज्ज्ञ सभासद घेतले होते. या समितीच्या बैठका १९४२–४३ वर्षी बहुतेक रोज श्री. मो. रा. ढमढेरे वकील यांच्या घरी भरत. अनेक मंडळी त्या चर्चेत भाग घेत. निरनिराळ्या देशांच्या घटनांचा तेथे अभ्यास केला जाई व आपल्या देशाच्या दृष्टीने तिचे स्वरूप कसे असावे यावर विचारविनिमय होई. त्यानंतर घटनेचा मसुदा तयार करण्यात आला. तो महाराष्ट्र हिंदुसभा, लोकशाही स्वराज्य पक्ष व अखिल भारत हिंदुमहासभा यांनीही मान्य केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जेव्हा केन्द्र सरकारचे विधिमंत्री झाले व घटनासमितीचे कार्य त्यांच्याकडे आले तेव्हा त्यांनी गोखले समितीने तयार केलेल्या या नमुना घटनेच्या प्रती मागून नेल्या होत्या. भारताची विद्यमान घटना व गोखले समितीने बनविलेली घटना यांत अनेक बाबतींत साम्य असल्याचे आढळून येईल.

त्या वेळी हिंदुस्थानची फाळणी पुढे होईल असे गृहीत धरून ही घटना बनविलेली नव्हती. तथापि घटनेचे संघराज्याचे स्वरूप, केंद्राकडे शेषाधिकार, केंद्रात व घटक राज्यांत दुपाखी विधिमंडळे, मंत्रिमंडळे, व न्यायसंस्था यांची कार्ये व त्यांचे अधिकार, मूलभूत हक्कांचे स्वरूप इत्यादि अनेक विषयांवर गोखले समितीने मांडलेले विचार भारताच्या घटनेने जवळजवळ जसेच्या तसे स्वीकारलेले दिसून येतील. मतदारसंघाच्या व निवडणुकीच्या संबंधात या नमुना घटनेत सुचविलेली योजना पुढे घटनासमितीने स्वीकारली नाही. अशा काही बाबी प्रत्यक्ष घटनेत

वेगळ्या आहेत; पण स्थूलमानाने हिंदुसभेच्या या आराखड्यातील तत्त्वे भारताच्या प्रत्यक्ष घटनेत स्वीकारलेली आहेत.

हे कार्य करणारांत हिंदुसभा कार्यकर्त्यांचा भाग मोठा होता हे उघडच आहे. तिच्या विधायक स्वरूपाच्या कामातील हे कार्य विशेष महत्त्वाचे होते. या घटनेला लोकशाही स्वराज्य पक्षाच्या दि. २।८।४४ च्या परिषदेत अधिकृत मान्यता देण्यात आली. त्यांनी असे म्हटले आहे की, "लोकशाही स्वराज्य पक्षाच्या मते आता अशी वेळ आली आहे की देशातील राजकीय पक्षांनी आपापसांतील सर्व मतभेद काढून टाकून व जगभर घडत असलेल्या घडामोडींचा ओघ व त्याचे दूरगामी परिणाम लक्षात घेऊन या देशासाठी एक घटना तयार केली पाहिजे.

"तसेच, अशी घटना सर्वांना सततची मान्य व हितकर होण्याकरिता तिची उभारणी अशा तत्त्वांवर केली पाहिजे की एकतर त्यायोगे देशातील विविध घटक व हितसंबंधी लोकांत ऐक्यभाव वाढत गेला पाहिजे आणि शिवाय जगातील स्वतंत्र राज्यांच्या मालिकेत या देशाचा योग्य तो वाटा व दर्जा त्याला उचलता आला पाहिजे. म्हणून अशी संकल्पित घटना पुढील पायावर उभारली जाणे इष्ट आहे.

घटनेची मूलभूत तत्त्वे

(१) या देशाला 'इंडिया' हे नाव देण्याबाबत कोणत्याही जुन्या इतिहासाचा आधार नसून तो एक अर्थशून्य शब्द आहे. आणि ज्या अर्थी अनादि कालापासून हा देश 'हिंदुस्थान' याच नावाने संबोधला व ओळखला जातो, त्या अर्थी अशा घटनेत या देशाचे नाव 'इंडिया' असे न ठेवता 'हिंदुस्थान' असे ठेवावे व याला "हिंदुस्थानची राज्यघटना" असे म्हणण्यात यावे.

(२) निसर्गानेच हा देश एकजिनसी व अखंड असा निर्माण केला असून मानवी स्मृतीच्या कालापासून आजपर्यंत तो तसाच मानला गेलेला आहे. सध्याची 'ब्रिटिश इंडिया' व 'हिंदु इंडिया' ही विभागणी नैसर्गिक नसून राजकीय आहे व आधुनिक राजकीय विचारसरणीप्रमाणे हिंदुस्थानातील संस्थाने अखंड हिंदुस्थानच्या व्यापक स्वरूपातच समाविष्ट करणे अवश्य आहे. त्यांचे सांप्रतचे अस्तित्व हे कालातिक्रमाचेच नुसते निदर्शक नाही तर त्यामुळे या देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगतीच्या गळ्यात लोढणे अडकविल्याप्रमाणे होत आहे. ती जर अखंड हिंदुस्थानात समाविष्ट न केली तर नवीन ध्येये व नवीन विचार यांच्या लाटेत ती वाहून जातील हे निश्चित आहे. तसेच या देशाची पाकिस्तान व हिंदुस्थान अशी विभागणी केली गेल्यास त्यामुळे या देशात भयंकर स्वरूपाच्या अंतःस्थ यादवीला घर करून दिल्यासारखे होणार असून बाह्य आक्रमणाच्या भक्ष्यस्थानी हा देश पडण्याचा संभव आहे. याकरिता जी घटना करावयाची ती अखंड, एकजिनसी व स्वयंपूर्ण अशा हिंदुस्थानचीच केली पाहिजे.

(३) ब्रिटिश मुत्सद्दी काही म्हणत असले तरी त्यांची मने स्वार्थाच्या आणि स्वयंप्रभुत्वाच्या कल्पनांनी भारलेली असून हिंदुस्थानला आपली बटीक न मानता एक सहकारी मानावे हा विचार त्यांना शिवत नाही. तसेच जगाच्या भूगोलावर या देशाचे जे स्थान आहे ते लक्षात घेता हे अगदी स्पष्ट आहे की, जगाच्या शांततेकरिता व सुव्यवस्थेकरिता हिंदुस्थान देश पूर्णपणे स्वतंत्रच झाला पाहिजे. हिंदुस्थानला हे स्वातंत्र्य स्वतःच्या बुद्धीप्रमाणे व स्वभावाप्रमाणे आपली उन्नति करण्याकरिता व सामर्थ्यवाढीकरिता भरपूर संधि मिळण्यासाठी हवे असून या देशातील स्त्रीपुरुष नागरिकांचा दर्जा पुरेपूर उंचावण्यास बाहेरील हितसंबंधांचे किंवा दडपणाचे त्यावर अडथळे येता कामा नयेत, यासाठीही त्यावरील बाह्य निर्बंध नष्ट व्हावयास पाहिजेत.

(४) सध्या अस्तित्वात असलेल्या विविध राज्यघटनांचे गुणदोष लक्षात घेता हिंदुस्थानची राज्यघटना स्वतंत्र, लोकमतानुवर्ती व लोकशाही स्वरूपाची आणि संघरूप असावी व मध्यवर्ती सरकारच्या हाती सर्व सामर्थ्य केंद्रित झालेले असावे.

(५) केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळांच्या दोन दोन सभा असाव्यात व वरिष्ठ सभेपेक्षा कनिष्ठ सभेला अधिक व्यापक अधिकार असावेत.

(६) केंद्रीय व प्रांतिक सरकारांत कनिष्ठ सभांचे प्रतिनिधित्व 'माणशी मत' या सार्वत्रिक तत्त्वानुसार ठरविण्यात यावे व वरिष्ठ सभांचे प्रतिनिधित्व अप्रत्यक्ष स्वरूपाचे असावे. प्रांतांच्या बाबतीत ते विविध विषयांवर उभारलेले असावे व केंद्रीय वरिष्ठ सभेच्या बाबतीत प्रांतिक विधिमंडळांचे सभासद हेच त्याचे मतदार असावेत.

(७) मतदारसंघ हे संयुक्त असून अनेक प्रतिनिधी एकेका गटातून निवडून येतील अशी व्यवस्था असावी. या बाबतीत दुसऱ्या कोणत्याही प्रकारचे राष्ट्रीय हक्क किंवा अधिक प्रमाणात सभासद राखून ठेवले जाता कामा नयेत.

(८) केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळांच्या सत्ता विभागणीच्या संबंधात शक्य त्या सर्व विषयांची केंद्रीय व प्रांतिक अशी विभागणी करण्यात यावी. जे विषय राष्ट्रीय महत्त्वाचे व सर्व प्रांतांना सारखे लागू असतील ते सर्व केंद्रीय विधिमंडळां-कडे सोपविण्यात यावेत व ज्यांना प्रांतिक महत्त्व आहे असे विषय प्रांताकडे सोपविण्यात यावेत. शेषसत्तेचे सर्व अधिकार केंद्रीय सत्तेकडे असावेत.

(९) प्रांतिक व मध्यवर्ती सरकारे ही आपापल्या विधिमंडळांना जबाबदार असावीत व अंतिम स्वरूपात ही दोन्ही जनतेला जबाबदार असावीत. कारण राज-कीय सत्तेचे अधिष्ठान व आश्रयस्थान जनता हेच आहे.

(१०) राजकीय सत्ता व सामर्थ्य यांचे पृथक्करण करता अंतिमतः जनता हेच त्यांचे उगमस्थान असल्यामुळे घटना अशी असावी की जेथे कायदा घडवून

आणण्याची, त्यास मान्यता देण्याची, आणि त्याची अंमलबजावणी नीट होत नसल्यास आपल्या प्रतिनिधींना केव्हाही परत बोलावण्याची सत्ता लोकांच्या हाती पाहिजे.

(११) मानवाचे मूलभूत हक्क प्रे. रुझवेल्ट यांच्या शब्दांत बोलावयाचे तर ते चार स्वातंत्र्यांत समाविष्ट झालेले आहेत. (१) सुखी जीवनाचे स्वातंत्र्य, (२) भयापासून संरक्षण, (३) भाषणस्वातंत्र्य, व (४) पूजास्वातंत्र्य. स्वतंत्र हिंदुस्थानाच्या राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला ही स्वातंत्र्ये उपलब्ध करून दिली पाहिजेत.

(१२) स्वतंत्र हिंदुस्थान राज्यातील लोकांचे सर्व प्रकारचे हक्क रक्षण करण्यासाठी केंद्रीय व प्रांतिक स्वातंत्र्याची न्यायदान व्यवस्था निर्माण करण्यात यावी. या व्यवस्थेला आपले काम चोख रीतीने करता यावे यासाठी तिच्यावर कोणाही बाह्य सत्तेचा ताबा असू नये.

(१३) कायद्याच्या बाबतीत स्वतंत्र हिंदुस्थान राज्यातील सर्व स्त्रीपुरुषांना समानतेने वागविण्यात यावे. त्यांचे हक्कही समान असावेत. कोणत्याही कायद्याने किंवा हुकुमाने त्यांच्यात भेदभाव निर्माण केला जाऊ नये.

(१४) अमुक जाती लढाऊ आणि अमुक बिनलढाऊ अशा प्रकारचे भेद तत्त्वतः चुकीचे व व्यवहारतः असत्य असल्याने असे भेदभाव करण्यात येऊ नयेत व सर्व प्रांतांतील सर्व लोकांना युद्धाच्या कलेचे शिक्षण हे देशातील लष्कराचे स्थान उच्च व कार्यक्षम राहील अशा रीतीने देण्यात यावे."

वर निर्देश केलेली सर्व तत्त्वे व इतरही अनेक उपयुक्त विचार भोपटकर सन्मान निधीच्या विश्वस्तांनी नेमलेल्या समितीने तयार केलेल्या स्वतंत्र हिंदुस्थान राज्याच्या घटनेत नमूद झालेले असल्याने लोकशाही स्वराज्य पक्षाची ही सभा या घटनेस आपली मान्यता देत असून तिला पूर्णपणे पाठिंबा देत आहे.

नमुना घटनेचे स्थूल स्वरूप

या घटनेचे स्थूल स्वरूप पुढीलप्रमाणे आहे :

स्वतंत्र हिंदुस्थानची राज्यघटना लोकसत्ताक असावी असे एकदा ठरल्यानंतर ती कोणत्या पद्धतीची असावी म्हणजे ती प्रत्येक प्रांत स्वतंत्र असावा किंवा एकच मध्यवर्ती सत्ता असावी आणि मध्यवर्ती सत्तेने तोडून दिलेल्या अधिकारापुरते त्या सत्तेचे घटक प्रांत असावेत असा प्रश्न साहजिकच उभा राहतो. म्हणजे प्रांत हे अवयव व मध्यवर्ती सत्ता अवयवी अशी राज्यघटना असावी किंवा सर्व अवयव संपूर्ण असून त्यांनी त्यांचा अवयवी म्हणून उत्पन्न केलेली मध्यवर्ती सत्ता असावी. इंग्रजी भाषेत ज्याला फेडरेशन म्हणतात त्यातही अशा प्रकारच्या दोन्ही राज्यव्यवस्था दृष्टीस पडतात. एका व्यवस्थेत स्वयंपूर्ण व स्वतंत्र अशा घटक प्रांतांनी

घटक प्रांतांच्या स्वास्थ्याकरिता व सुरक्षिततेकरिता एक मध्यवर्ती सत्ता अस्तित्वात आणून त्या सत्तेला आपले काही अधिकार देऊन टाकलेले असतात. बाकी सर्व शेष अधिकार त्या घटक प्रांतांचे जागीच वसत असतात. मध्यवर्ती सत्ता फक्त तोडून दिलेल्या अधिकारापुरती स्वामी असते.

दुसरा प्रकार असा की मूळ स्वयंपूर्ण अशी मध्यवर्ती सत्ता असते. त्या सत्तेने राज्यव्यवस्थेच्या सौकर्याकरिता व नागरिकांच्या अंगच्या गुणांचा योग्य परिपोष व्हावा म्हणून आपले काही अधिकार घटकप्रांत अस्तित्वात आणून त्यांस दिलेले असतात. या दुसऱ्या प्रकारच्या राज्यव्यवस्थेत तोडून दिलेल्या अधिकारापुरतेच घटक अवयवांचे स्वातंत्र्य असते. ह्या प्रकारात मध्यवर्ती सत्तेचे ठिकाणीच शेष अधिकार (Residuary powers) स्थित झालेले असतात.

आमच्या मते आपल्या देशाची भौगोलिक रचना, आपल्या लोकांचे स्वभाव-विशेष, आपल्या लोकांची वैचारिक परंपरा, आपल्या लोकांचा इतिहास, आपल्या लोकांचा भावी काल चढत्या कलेने वैभवपूर्ण कसा होईल इत्यादि सर्व गोष्टींचा विचार करता वर वर्णन केलेल्या पद्धतीपैकी जीत शेष अधिकार मध्यवर्ती सत्तेतच राहतील ती पद्धत योग्य आहे. घटना शास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास जी पद्धति ज्या देशास व ज्या काळी योग्य व प्रभावी दिसेल ती त्या देशाने मान्य करावी असे स्वाभाविकच होते. अमेरिकेची संयुक्त संस्थाने ही स्वतंत्र व शेषाधिकारसहित आहेत. तर कॅनडाच्या राज्यघटनेत मध्यवर्ती सत्ता शेषाधिकारी आहे. ऐतिहासिक परंपरेचा विचार केल्यास आपल्या देशास मध्यवर्ती सत्ता बलिष्ठ असणे हेच हितावह आहे असे आम्हांस वाटते, ' स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठच ' इत्यादि सर्व अवस्थांतून आमच्या पूर्वजांनी 'पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराट्' ही अवस्था स्पृहणीय मानली आहे आणि आजही हीच पद्धति या देशास हितावह ठरणार आहे.

ह्या मध्यवर्ती सत्तेचे तीन भाग पडतात, (१) विधिसमिति (The Legislature) (२) कार्यकारी समिति, (The Executive) आणि न्यायसमिति (The Judiciary). या संबंधीची व्यवस्था खालीलप्रमाणे आहे :

विधिसमिति

विधिसमिति ही तीन भागांत विभागलेली आहे. (१) विशांपति (President), (२) श्रेष्ठ मंडळ (The senate), (३) ज्येष्ठ मंडळ (The house of Representatives). कोणताही विधि (कायदा) घडविण्याचा झाल्यास ह्या तिघांची संमति असली पाहिजे. विशांपति (प्रेसिडेंट) हा लोकनियुक्त असावा आणि त्याची कालमर्यादा सहा वर्षांची असावी. त्यास निवडून देणारे मतदार हे सर्व सबंधच्या सबंध हिंदुस्थानातील प्रौढ प्रजाजन असावेत. म्हणजे प्रेसिडेंटची निवडणूक

ह्या देशातील सर्व प्रौढ (adult) मतदारांनी प्रत्यक्षपणे मते देऊन करण्याची आहे. (भारताच्या विद्यमान घटनेत अशी तरतूद नाही.) प्रेसिडेंट म्हणून त्यास काही विशेष अधिकारही दिलेले आहेत. प्रेसिडेंट हा खरा लोकांचा प्रतिनिधि असावा ह्या दृष्टीने ही जी प्रत्यक्ष मतदानाची पद्धत ठरविली आहे ती योग्य अशीच आम्हांस वाटते. श्रेष्ठ मंडळ म्हणजे सेनेटची संख्या तीनशे असावी आणि त्यांना सर्व हिंदुस्थानात जेवढे म्हणून प्रांत ठरतील त्या प्रांतांतील वरिष्ठ व कनिष्ठ विधिमंडळांतून निवडून गेलेल्या सर्व प्रतिनिधींनी निवडून देण्याचे आहे. म्हणजे ह्या सेनेटची निवडणूक अप्रत्यक्ष (indirect) पद्धतीने व्हावी. प्रांतांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात हे सभासद निवडून देण्याचे आहेत. सेनेट ही समिति अखंडित राहणारी आहे. मात्र दर तीन वर्षांनी तीतील एक तृतीयांश सभासदांची निवडणूक होत जावी आणि तीही वरील पद्धतीनेच. या समितीला निवडून देणारे मतदार हे प्रांतांच्या विधिमंडळातील सभासद असणार ही विशेष उल्लेखनीय गोष्ट ह्यात आहे. ज्येष्ठ मंडळ (House of Representatives) ह्याची निवडणूक प्रत्यक्ष मतदान पद्धतीने प्रौढ मतदारांनी करावयाची आहे. हे मंडळ पाच वर्षे काम करील व नंतर पुनः निवडणुका होतील. प्रायः सर्व सत्ता ह्याच मंडळात अधिष्ठित झालेली असते.

विशांपति (प्रेसिडेंट) हा जर खरोखरीचा राष्ट्राचा नायक व राष्ट्राचे प्रतीक म्हणून समजावयाचा असेल तर त्याला राष्ट्रातील जनतेच्या आशा आकांक्षा, सुखदुःखे, जनतेचे हृदय ज्ञात असेल असाच मनुष्य ह्या पद्धतीने निवडून जाणे शक्य आहे. श्रेष्ठ मंडळ (राज्यसभा) व ज्येष्ठ मंडळ (लोकसभा) ह्यांची अधिकार क्षेत्रे ठरविण्यात आली असून त्याप्रमाणे त्यांचेकडून वर्तन घडून येणार आहे. आर्थिक बिले वा इतर विधेयके कशी मांडावी वगैरेबद्दलच्या सूचना या आराखड्यात दिलेल्या आहेत. परंतु त्या दोन विधिमंडळांचे परस्पर संबंध थोडक्यात सांगावयाचे असल्यास असे म्हणता येईल की, एकाच वृक्षावर असलेले, एकाच मनाचे, एकाच विचाराचे, परस्पर स्नेही असे हे दोन पक्षी आहेत, फरक इतकाच की त्यातील एक पक्षी त्या झाडाची गोड फळे खाण्याचे काम करीत असतो. परंतु दुसरा पक्षी स्वतः काही एक न खाता पहिला पक्षी फळ कसे खातो ह्याचेवर दक्षपणे निरखून पहातो.

" द्वा सुपूर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वादु अत्ति अनश्ननन्यो अभिचाकशीति ॥ "

श्रेष्ठ मंडळ हा फळ न खाणारा पक्षी व ज्येष्ठ हा गोड फळे खाणारा पक्षी. ज्येष्ठ मंडळाचा प्रमाद घडत असल्यास तो टाळणे हेच श्रेष्ठ मंडळाचें कार्य आहे.

कार्यकारी समिति (The Executive)

कार्यकारी समिति ही देशातील सर्वांत महत्त्वाची समिति होय. त्या समितीच्या हातात सर्व हिंदुस्थानचा राज्यकारभार राहणार. तो निवडून आलेल्या प्रतिनिधीं-मधील मंत्र्यांच्या साहाय्याने होणार. प्रेसिडेंटने ज्येष्ठ समितीतील बहुसंख्य पक्षाच्या नेत्यास प्रधानमंत्री म्हणून पाचारण करून त्यास मंत्रिमंडळ बनवावयास सांगावे आणि प्रधानमंत्र्याने आपले उत्तरदायित्व ध्यानात घेऊन निवडून आलेल्या लोकां-मधून त्यास योग्य वाटतील त्यांचे मंडळ निवडावे. मग असे मंत्री श्रेष्ठ समितीतील असल्यासही हरकत नाही. प्रेसिडेंटने ह्या मंत्र्यांच्या सल्ल्याप्रमाणे वागावे. हे सर्व मंत्री सामुदायिक रीतीने ज्येष्ठ मंडळास जबाबदार राहतील. ज्येष्ठ मंडळ हे त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांस म्हणजे हिंदुस्थानातील प्रौढांस जबाबदार राहील. विधिसमितीने घालून दिलेल्या धोरणाप्रमाणेच त्यास वागावे लागेल. म्हणजे विधि-मंडळाच्या आज्ञा कृतिसृष्टीत उतरविण्याचे काम त्या समितीचे राहील. सार्वत्रिक प्रौढ मतदान असल्याकारणाने लोकमताचा दाबही ह्यावर चांगला पडेल.

न्याय समिति (The Judiciary)

कोणतीही घटना वैध (legal) आहे वा अवैध (illegal) आहे हे सर्वांत उच्चतम कार्य न्यायसमितीने करावयाचे आहे. कोणताही कायदा योग्य प्रकारे झाला किंवा झाला नाही, नागरिकत्वाच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली एखाद्या विशिष्ट स्थितीत झाली किंवा काय, घटक प्रांताप्रांतांत काही खटके उडाल्यास अथवा भांडण असल्यास त्याचा निकाल कसा लावावयाचा इत्यादि महत्तम व सर्वश्रेष्ठ कामे ह्या समितीने करावयाची आहेत. त्याकरिता आपल्या देशातील सर्वांत बुद्धिमान्, उदार, कार्यतत्पर, लोभ-क्रोध मोहादि विकारांपासून अलिप्त, अशीच माणसे या ठिकाणी असावयास पाहिजेत. म्हणून त्यांची निवड वा नेमणूक मतदानपद्धतीने करावयाची नसते. कारण अशी माणसे नेमकी निवडून येतीलच अशी खात्री नसते. म्हणून प्रेसिडेंटने मुख्य प्रधान व इतर प्रधान ह्यांच्या सल्ल्या-नुसार ही माणसे नेमण्याची आहेत. राष्ट्रातील न्यायदान अत्यंत चोख रहावे. न्यायाचा निर्दोष व जिवंत झरा कोणत्याही कारणाने गढूळ होऊ देता कामा नये.

सारांश, आपल्या देशाची राजकीय सत्ता ही या त्रिदलात समाविष्ट झालेली आहे. ही त्रिदलात्मक राज्यपद्धति आज सर्व स्वतंत्र देशांत प्रस्थापित झालेली आहे आणि तिची गोड फळे ती राष्ट्रे उपभोगीत आहेत व तशीच व्यवस्था आपल्याही देशात निर्माण झाली पाहिजे.

भारतीय घटना समितीचे कार्य

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केंद्रीय विधिमंडळाने निर्माण केलेल्या घटना-समितीच्या बैठका झपाट्याने सुरू झाल्या. तिने नेमलेल्या पोटसमितीने घटनेचा

आराखडा तयार करताना मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ रद्द केले व सर्व मतदारसंघ संयुक्त करण्याची सूचना एकमताने स्वीकारली. तिला अनुसरून मुंबईच्या महापालिकेनेही आपल्या मतदारसंघातील मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ दि. २९।१०।४७ च्या सभेत रद्द केले. मुसलमानांच्या बाबतीत काँग्रेसने स्वतंत्र मतदारसंघाचे यापूर्वी स्वीकारलेले धोरण रद्द केल्यामुळे काँग्रेस व हिंदुराष्ट्रवादी पक्ष यांच्यातील वैचारिक संघर्षाचे एक मूळ नाहीसे झाले. महाराष्ट्र हिंदुसभेच्या दि. १६।११।१९४७ च्या रामभाऊ मंडलीक यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या प्रांतिक सभेच्या बैठकीत स्वतंत्र मतदारसंघ नष्ट झाले व सर्वत्र संयुक्त मतदारसंघ बनविण्याचे धोरण घटना समितीने स्वीकारले म्हणून तिचे अभिनंदन करण्यात आले. तथापि नव्या योजनेत काही वर्गांना राखीव जागा ठेवण्याचे धोरण अद्याप कायम होते ते हिंदुसभेस मान्य नव्हते, त्यास हिंदुसभेने आपला स्पष्ट विरोध व्यक्त केला. हिंदुमहासभेच्या अखिल भारतीय समितीच्या सभेतही संयुक्त मतदारसंघांना पाठिंबा देण्यात आला व आता बदललेल्या परिस्थितीत हिंदुमहासभेच्या राजकारणाचे धोरण काय असावे यावर नव्याने विचार सुरू झाला. महाराष्ट्रात लोकशाही स्वराज्य पक्षाच्या वतीने निवडणुकीचे व घटनात्मक राजकारण करावे व इतर सर्व प्रकारचे राजकारण, शुद्धिसंघटन, हिंदीप्रचार, हिंदुराष्ट्रवादाचा प्रचार ही कामे हिंदुसभेने करावी असा विचार करणारा एक वर्ग होता; तर निवडणुका लढविण्यापासून सर्वच प्रकारचे राजकीय कार्यही हिंदुसभेच्याच वतीने करावे असे म्हणणारा दुसरा वर्ग होता, या विषयाचा विचार १९४८ मध्ये हिंदुमहासभेचे अधिवेशन भरले म्हणजे तेथे व्हावा यासाठी प्रयत्न सुरू होता. या वेळी देशात फाळणीमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांनी व त्या संबंधात काँग्रेसने स्वीकारलेल्या धोरणामुळे सारा देश संतप्त झाला होता. मुसलमानांनी देशाची फाळणी मागितली व ती काँग्रेसने मान्य केली. त्यांनी पाकिस्तानातून सर्व हिंदूंना हाकलले तेव्हा ते भारतात रहावयास आले, तर हिंदुस्थानातील मुसलमानांनाही पाकिस्तानात पाठवून द्यावे असे लोक म्हणू लागले. जिना लोकसंख्येची अदलाबदल करण्यास तयार होते. पण काँग्रेसच्या निधर्मी वादात ते बसेना ! भारतात काही केल्या हिंदु राज्य होऊ देणार नाही व मुसलमानांना पाकिस्तानात धाडणार नाही, अशी नेहरूंनी प्रतिज्ञा केली. पण हिंदु राज्य म्हणजे काय, ते कशास उद्देशून हिंदुराज्य म्हणतात याचे स्पष्टीकरण नेहरूंनी कधी केले नाही. तांबड्या चिंधीला बैल बुजतो अशी इंग्रजीत म्हण आहे त्याप्रमाणे हिंदु शब्दाची नेहरूंनी जणू धास्ती घेतली होती! गांधी वादातील ते एक वेड होते. पूर्व पंजाबमध्ये निर्वासित हिंदूंचा लोंढा इतक्या मोठ्या प्रमाणावर आला की नेहरूंना तो आवरला नाही व त्यांच्या इच्छेविरुद्ध पंजाबी हिंदूंनी पूर्व पंजाबमधून मुसलमानांना पाकिस्तानात घालविले. त्यामुळेही नेहरू हिंदूंविरुद्ध अतिशय चिडले होते. दिल्ली येथील ऑर्गनायझर या वृत्तपत्राने ऑक्टोबर १९४७

मध्ये लोकसंख्येच्या अदलाबदलीसंबंधाने लोकमत घेतले. तेव्हा ८४,६५६ लोकांनी अदलाबदल करावी असे मत नोंदविले. तर फक्त ६६६ लोकांनी मुसलमानांना घालवू नये असे मत दिले. यावरून लोकमताचा कौल स्पष्ट होता. दि २३।१०।४७ ला 'राष्ट्रीय' मुसलमानांनीही सर्व लीगवाल्यांना पाकिस्तानात हाकला अशी मागणी केली पण तीही नेहरूंनी मानली नाही. नेहरूंच्या हाती सत्ता आलेली होती व त्यांना ही अदलाबदल मान्य नव्हती. त्यांच्या निधर्मी राष्ट्रवादाच्या ब्रीदास त्यामुळे बट्टा लागत होता !

हिंदुस्थानचे राष्ट्रीय स्वरूप

फाळणीनंतरच्या परिस्थितीत हिंदुस्थानचे राष्ट्रीय लक्षण, स्वरूप व धोरण काय असावे यासंबंधाने देशातील अनेक नेत्यांपुढे विचार निर्माण झाला होता. हिंदुमहासभेने फाळणीपूर्वीपासूनच हिंदुस्थान हे हिंदुराष्ट्र आहे अशी स्पष्ट घोषणा केली होती. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासकालापासूनच हिंदुस्थान हे 'हिंदुराष्ट्र' आहे हीच इतिहासाची साक्ष आहे. मुसलमानी आक्रमण हे हिंदुस्थानवर म्हणजे हिंदुराष्ट्रावर परकीय आक्रमण आहे हाच विचार इतिहासानेही मान्य केलेला होता. त्यास रजपुतांनी, विजयनगरने, छत्रपति शिवाजी महाराजांनी व त्यांच्यानंतर थोरले बाजीराव व माधवराव इत्यादि त्या वेळच्या महामंत्र्यांनी व पुढे शिखांनी केलेला प्रतिकार हा हिंदुराष्ट्रावरील परकीय आक्रमण नष्ट करण्यासाठीच झालेला होता. सर्व हिंदुस्थानभर असे मुसलमानांचे राजकीय आक्रमण कधीच झालेले नव्हते व इंग्रजी शासन काळातही ते झाले नाही. संस्थानांच्या रूपाने येथे त्याही काळात हिंदु राज्ये अस्तित्वात होतीच.

अशी वस्तुस्थिति असतानाही गांधीवादी काँग्रेसच्या काळात मात्र या देशातील राष्ट्रवादाला निधार्मिकपणाची अभावात्मक पुटे देण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामागे येथील मुसलमानांना आपल्या चळवळीत ओढण्यासाठी लालूच दाखविण्याची बुद्धि होती व त्यांचा अनुनय करून त्यांना खूष करण्याच्या नादात या देशात परत इस्लामी साम्राज्यवाद निर्माण करण्याच्या परकीय मुसलमानांच्या महत्त्वाकांक्षेलाही खतपाणी घातले जात होते. या धोरणास हिंदुमहासभेचा तीव्र विरोध होता. गांधीवाद व टिळक-सावरकर वाद यांच्यातील मूलभूत स्वरूपाचा फरक या परस्परविरोधी दृष्टिकोनांत दिसून येईल. त्यामुळे त्यांच्यात एकमार्गी समन्वय होण्याची शक्यताच नव्हती.

अनुनयवाद वाढत चालला

काँग्रेसने गांधींचा मुस्लिम अनुनयवाद स्वीकारल्यापासून काँग्रेसच्या व हिंदु-महासभेच्या धोरणात सतत विरोध चालू राहिला. इंग्रज या देशाला जितके परके,

तितकेच इस्लामी साम्राज्यवादीही या देशाला परकेच आहेत ही हिंदुसभेची भूमिका, तर इस्लामी साम्राज्यवादी हे शंभर टक्के देशीच आहेत व त्यांच्या हिंदुविरोधी व अन्यायी शासनाखालीही हिंदूंनी हालअपेष्टा व अन्याय सोसूनही राहावे ही गांधींची विचारसरणी होती ! मुसलमानी अत्याचारांना उद्देशून हिंदूंना उपदेश करताना गांधींनी दि. २८।१।४२ च्या हरिजनच्या अंकात या संबंधात असे म्हटले आहे की The Congress Hindus have a rare opportunity to show their non-violent strength and utter freedom of communal tint and their ability to submit to the rule of their fellow country-men. (काँग्रेस-वादी हिंदूंना आपल्या अहिंसात्मक सामर्थ्याचे आणि जातीयतेपासून आपण संपूर्ण अलिप्त आहो व आपल्या देशबांधवांच्या शासनाखाली मुकाट्याने राहू शकतो याचे दर्शन घडविण्याची एरवी कधी न येणारी संधि प्राप्त झाली आहे.) इस्लाम धर्मनिष्ठ पाकिस्तान मागणाऱ्या जिनांच्या हाती गांधी हिंदुस्थानची सर्व राज्यसूत्रे देण्यास सुखेनैव तयार होते व त्यालाच स्वातंत्र्य (!) मानण्याची त्यांची तयारी होती. आपले 'मुस्लिम स्टेट' आहे असे आग्रहाने म्हणणाऱ्या निजामचे हिंदुविरोधी शासन हेही देशीच राज्य आहे असे गांधीजी आग्रहाने प्रतिपादन करीत ! सारांश या राष्ट्राकडे पाहण्याचा गांधींचा व त्यांच्या काँग्रेसचा दृष्टिकोन मुळात विकृत, इतिहासाशी विरोधी, परंपरेशी विसंगत व हिंदुराष्ट्राला घातक होता.

नेहरूंचा निधर्मवाद

पुढच्या काळात पं. नेहरूंनी याच दृष्टिकोनावर निधर्मीपणाचा आणखी गडद रंग फासला. पूर्वी युरोपात धर्माधिष्ठित राज्ये होती. त्यात कालान्तराने फरक होत गेला. रशियाने ख्रिश्चन धर्माची राज्यशासनातून हकालपट्टीच केली. त्यांच्या केवळ अर्थवादी विचाराने नेहरू प्रभावित झालेले होते. या देशात हिंदुराष्ट्रवाद किंवा धर्माधिष्ठित सत्ता निर्माण होऊ देणार नाही अशी त्यांची जाहीर प्रतिज्ञा होती. हिंदुसभा हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार करते म्हणून नेहरूंचा सतत जळफळाट चालू असे. पण हिंदुराष्ट्रवाद म्हणजे काय हे नीट समजूनही न घेता किंवा त्यासंबंधाने कसलाही विचार न करताच हिंदु शब्दाचा केवळ हेटाळणीने ते वापर करीत.

हिंदुराष्ट्रवादाचे समर्थक लोकशाहीचेच पुरस्कर्ते होते. परधर्मावर आक्रमण करण्याचा त्यांचा कधी विचारही नव्हता. केवळ हिंदुत्वाचे व हिंदुधर्मीयांचें संरक्षण व त्यावर होणाऱ्या आक्रमणाचा प्रतिकार एवढीच हिंदुराष्ट्रवाद्यांची भूमिका होती. पण हे नीट समजून घेण्याचे साधे व्यवहारीपणही नेहरूंनी कधी दाखविले नाही. हिंदु राष्ट्रवाद्यांच्या विरुद्ध नेहरू मत्सराने पेटले होते. पण जेव्हा त्यांनाच या विषयाचा स्वतंत्रपणे विचार करण्याची पाळी येई तेव्हा या देशातील बहुसंख्य समाजाच्या संस्कृतीचा या देशातील जीवनावर प्रभाव राहील हे त्यांनाही मान्यच

करावे लागे ! ते फक्त बहुसंख्य समाज या नावाने बोलत. पण या देशातील बहुसंख्य समाज हिंदु आहे व म्हणून या देशावर हिंदु संस्कृतीचाच प्रभाव राहील असे स्पष्टपणे म्हणण्यास त्यांची तयारी नसे. हिंदु शब्दाला नेहरू किती बुजरे होते व त्यांचे मन किती कचरत असे हे यावरून दिसून येईल. या संबंधात ते म्हणाले : So far as India is concerned we have very clearly stated both as Government and otherwise that we cannot think of any state which might be called a communal state. Naturally in such a state the predominent cultural outlook will be governed by the great majority of the population. (हिंदुस्थानापुरते बोलावयाचे तर सरकार या नात्याने व एरवीही आम्ही हे अगदी स्पष्ट केले आहे की, ज्याला जातीय राज्य म्हणता येईल असे राज्य बनविण्याचा आम्ही विचारही करू शकत नाही. अशा राज्यात तेथील बहुसंख्य लोकांच्या संस्कृतीचा प्रभाव राहील हे मात्र स्वाभाविकच आहे.)

मग हिंदु राष्ट्रवादी तरी दुसरे काय म्हणत होते ? ते हेच म्हणत होते व म्हणत आहेत की या देशात हिंदु हे बहुसंख्य आहेत व म्हणून या देशावर हिंदु संस्कृतीचा प्रभाव राहील, राहिला पाहिजे व राज्यकर्त्यांनी या दृष्टीने राज्यशासनाचे धोरण ठरविले पाहिजे याचेच नाव हिंदुराष्ट्रवाद. पण नेहरूंना हिंदु शब्दाचे वावडे होते. भांडण आहे ते शब्दाचे पण त्याबरोबर येणाऱ्या भावात्मक विचाराचे आहे. राष्ट्रवादाच्या विचारामागील केवळ अर्थप्रधान निधर्मवादाने अभावात्मक पोकळी निर्माण होते. राष्ट्राच्या जीवनास ती घातक असते. त्या जागी भावात्मक राष्ट्रवादाला रंग, रूप व आकार आवश्यक असतो. त्यानेच ती पोकळी भरून येते. आजच्या शासनपद्धतीतील निधर्मवादाच्या अभावात्मक विचाराने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती अनेक अनर्थांना कारण झाली व होत आहे, व म्हणून शासनाने हिंदु राष्ट्रवादाचा स्वीकार करण्याची आवश्यकता आहे.

आजचे शासन या दृष्टीने विचार करीत नाही. ते हिंदुराष्ट्र वादातील काही काही विषय तुकडयातुकडयांनी अमलात आणण्याचा प्रयत्न करते, पण राष्ट्रवादाची भावरूप मूर्ति घडवीत नाही. त्यांनी हिंदु कोड केले, व शालिवाहन शकाचे सौर पंचांगही बनविले. फसली सन स्वीकारला नाही. त्यांनी संस्कृत शब्दांच्या साहाय्याने नवे पारिभाषिक शब्द स्वीकारले, उर्दू शब्दांच्या साहाय्याने नाही. गांधींनी हिंदीसाठीही देवनागरी व उर्दू या दोन्ही लिपींचा आग्रहपूर्वक स्वीकार केला पण अखेर प्रत्यक्ष व्यवहारात देवनागरी लिपीच शासनाने हिंदीसाठी स्वीकारली आहे. या गोष्टी हिंदुराष्ट्रवादाच्याच निदर्शक आहेत. पण त्यामागील तत्त्वे व मूलभूत विचार प्रामाणिकपणे मान्य करण्याची काँग्रेस शासनाची तयारी नाही. केवळ अर्थप्रधान

शासन समाजाला एकात्म बंधन निर्माण करू शकत नाही. त्यामागे भावात्मक राष्ट्र-विचाराची बैठक असावी लागते. पण आजच्या शासनाला त्याचेच वावडे आहे !

सावरकरांचे पत्रक

हिंदुराष्ट्रवादी विचाराचा वारंवार विपर्यास करून नेहरू विकृत मनोवृत्तीने हिंदुराष्ट्रवाद्यांवर उठल्या सुटल्या तोंड टाकून बोलू लागले तेव्हा स्वा. सावरकरांनी एक पत्रक प्रसिद्ध केले. (दि. २३।१०।४७) त्या पत्रकात सावरकर म्हणतात :

" नेहरू सरकार हिंदु शिखांचे संरक्षण करण्यास दुबळे ठरले असता ही गोष्ट लपविण्यासाठी आणि प्रसंग येताच संयुक्त मतदारसंघातून मुसलमान मतदारांची मते उपटून आपली सत्ता टिकविण्यासाठी पं. नेहरू व त्यांचे ' कर्णे ' सध्या नवा सूर लावीत आहेत. सबंध हिंदुस्थानात पाकिस्तान प्रस्थापित करण्याच्या मुसलमानांच्या कारवाया हाणून पाडण्यासाठी आपण काय सावधगिरी दाखवीत आहोत याविषयी हे पंडितजी ' ब्र ' ही उच्चारीत नाहीत आणि हिंदुराज्याच्या भाषेवर मात्र ते तुटून पडत आहेत ! जणू काही हिंदुराज्याची नुसती मागणी ही सुद्धा पाकिस्तानी संकटापेक्षा फार भयंकर आहे ! पाकिस्तानात मुसलमानांनी उघडाउघड चालविलेल्या दमबाजीकडे आणि अत्याचारांकडे सोयीस्कर रीतीने दुर्लक्ष करून हिंदुराज्याशी टिच्चून लढण्याची ' राणा भीमदेवी ' भाषा ही मंडळी करीत आहेत यातले इंगित वरील निष्कर्षातच सापडणार आहे.

" हिंदुराज्यवादयांच्या नशिबी हिटलर मुसोलिनींचे दैव येईल असा धाक हे पंडितजी घालतात. पण ते हे विसरतात की हिंदवी क्रांतीच्या कार्यात त्यांच्या जन्माआधीपासून सरावलेले क्रांतिकारक हे हिंदुसंघटनवादयांच्या आघाडीवर आहेत. हिंदी स्वातंत्र्यासाठी त्यांच्यापैकी अनेकांनी केलेला त्याग हा गांधी नेहरूंच्या त्यागापेक्षा अनेक पटींनी मोठा आहे. पं. नेहरू सारख्यांच्या धाकाला ते भीक घालणार नाहीत. हिंदुत्वाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी ते हवा तो त्याग करतील, पण जर त्यांना हिंदुराज्य प्रस्थापनेत यश आले तर त्या राज्याशी द्रोह करणाऱ्या पंडितजींच्या नशिबी काय येईल याचाच पंडितजींनी विचार करावा.

" या भ्रांत राष्ट्रवाद्यांनी हिंदुराज्याच्या मागणीला ' जातीय, मूर्खपणाची, प्रतिगामी, धर्ममार्तंडाची, ' इत्यादि स्वरूपाची विशेषणे लावून गालिप्रदान केले आहे. ज्या हिंदु राज्याला ते शिव्या देत आहेत, त्याचे स्वरूप ते काय समजतात हा प्रश्नच आहे ! पण घटकाभर हिंदुराज्य या सर्व गालिप्रदानाला पात्र आहे असे जरी गृहीत धरले तरी मग प्रश्न असा की मुसलमानी राज्याची मागणी त्या विशेषणांनी युक्त अशीच नव्हती काय ?

मुसलमान वस्ती जास्त अशा भागात पाकिस्तान हवे हे मुसलमानांचे मागणे याच स्वरूपाचे नव्हते काय ? मग या भ्रांत राष्ट्रवाद्यांनी त्या मागणीला मान

देऊन मातृभूमीचे विच्छेदन कसे पत्करले ? मुसलमानांचे राज्य 'पाशवी' या विशेषणाच्याही पलीकडचे असता ते तुम्हांस कसे चालते ? असे असता पाकिस्तानच्या मागणीच्या विरुद्ध झगडण्याचे सोडून देऊन तुम्ही त्या कामी प्रत्यक्ष अँग्लो-मुस्लिम कटाला हातभार लावलेला आहे. पाहुण्याच्या इतमामाने तुम्ही पाकिस्तानचे उदक अशा परिस्थितीत सोडले असता त्याच भूमिकेवर असणाऱ्या हिंदु राज्याला तुम्ही कोणत्या तोंडाने गालिप्रदान करता ? पठाणी किंवा निजामी राज्य हे स्वराज्य पण हिंदुराज्य म्हणजे मात्र जातीय, हुकूमशाही, अराष्ट्रीय राज्य ! काय न्याय आहे !

"या देशात हिंदूंच्याबरोबर इतर आहेत म्हणून याला हिंदुस्थान, अगर येथील राज्याला हिंदुराज्य म्हणावयाचे नाही असेही म्हणण्यात येते. पण पाकिस्तान, बलुचिस्तान, वझिरिस्तान, अफगाणिस्तान, तुर्कस्तान या देशांत इतर लोक नाहीत काय ? मग नुसते हिंदुस्थान किंवा हिंदुराज्य म्हटल्याने तुम्ही साप चावल्यासारखे किंचाळत काय उठता ?

"पाकिस्तान हे स्वतंत्र मुसलमानी राज्य आहे ही गोष्ट तुम्ही मान्य केलीत; याचे कारण रक्तपात की पाकिस्तान असाच सवाल तुमच्यापुढे उभा करण्यात आला आणि रक्तपाताच्या भीतीने तुम्ही भ्याडपणाने पाकिस्तान मान्य केलेत. असल्या नादानपणाने तुमच्या मातृभूमीच्या विच्छेदनाच्या पापाचे समर्थन तर होत नाहीच, पण उलट न कळत तुम्हीच असे सिद्ध करीत नाही काय की 'रक्तपात की हिंदुस्थान' असा सवाल तुमच्यापुढे निर्माण करून तुम्हांला हिंदुस्थान मान्य करायला लावता येईल !

"येथे प्रश्न दोन व्यक्तींचा नसून दोन ध्येयवादांचा आहे. इंडियन राज्य की हिंदुराज्य असा प्रश्न नसून हिंदुराज्य की मुसलमानी राज्य असा प्रश्न आहे. अखंड हिंदुस्थान कीं अखंड पाकिस्तान असा प्रश्न आहे आणि हिंदुसंघटनवाद्यांच्या ध्येयवादानेच परत अखंड हिंदुस्थान प्रस्थापित होऊ शकणार आहे."

हिंदुमुसलमान प्रश्नासंबंधाने सावरकरांचे निदान

या देशातील हिंदुमुसलमानांच्या प्रश्नासंबंधाने स्वा. सावरकर यांनी अतिशय खोल व मर्मग्राही निदान केले होते. अहमदाबाद (कर्णावती) हिंदुमहासभेचे अध्यक्ष या नात्याने १९३७ वर्षी केलेल्या भाषणात त्यांनी या विषयी तपशीलवार विवेचन केले आहे. हिंदुस्थानात सर्व जातीजमातींचे एकसंध, एकात्म हिंदुस्थानी राष्ट्र निर्माण व्हावे हा त्यांच्याही विचाराचा स्थायी भाव होता. पण या एकात्म राष्ट्रवादाचा पाया किंवा गाभा हिंदुराष्ट्रवाद असणार हेही असंदिग्ध सत्य होते. या हिंदुराष्ट्रवादात एकरूप होऊन जाण्यासाठी येथील अहिंदु नागरिकांच्या न्यायबुद्धीला व राष्ट्रभावनेला आवाहन करणे, त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यास धक्का न

लावताही त्यांच्या निष्ठा या राष्ट्राच्या एकात्म जीवनाशी एकरूप करून सोडणे व त्यासाठी त्यांना आवाहन करणे हा त्याचा वास्तविक मार्ग होता. पण काँग्रेसने या मार्गाचा अवलंब केला नाही. त्यांनीही त्यांच्या जातीय भावनेचाच अनुनय केला व त्यांची इस्लामी साम्राज्यतृष्णा वाढीस लावली. या देशात ख्रिश्चन व पार्शी हे अल्पसंख्य असले तरी सुजाण आहेत व त्यांची संस्कृति, भाषा इत्यादि बाबी व हिंदूंची संस्कृति व त्यांच्या प्रांतिक भाषा समानच असल्याने त्यांनी आपण होऊनच एकात्म राष्ट्रीय विचाराचा स्वीकार केला. धर्मापुरते त्यांचे वेगळेपण राहिले तरी राष्ट्रजीवनाच्या इतर सर्व अंगांत ते हिंदूच राहिले. त्यांनाही हिंदूपासून फोडण्याचा ब्रिटिश राजनीतीने प्रयत्न केला. त्यांना स्वतंत्र मतदारसंघ देऊ केले, पण त्यांनी आपण होऊन त्यास नकार दिला. ब्रिटिशांनी हरिजनांनाही स्वतंत्र मतदारसंघ व स्वतंत्र जागा दिल्या होत्या. तेव्हा गांधींनीसुद्धा त्याचे दुष्परिणाम हेरले व ते रद्द करण्यासाठी त्यांनी प्राणान्तिक उपोषण सुरू केले. डॉ. आंबेडकरांनीही त्यांस प्रतिसाद दिला. त्यांनाही स्वतंत्र मतदारसंघाचे तत्त्व मान्य नव्हतेच. धार्मिक दृष्टया ते हिंदूच होते. केवळ सांस्कृतिक व आर्थिक दृष्टया इतर समाजाशी तुलना करता ते दलित होते इतकेच; पण त्यांनी मान्यता दिल्यामुळे तो वर्गही हिदुराष्ट्रवादातच एकात्म होऊन राहिला. पण मुसलमानांच्या बाबतीत मात्र सर्वच परिस्थिति वेगळी होती. पूर्वी या देशातील काही भागात परक्या मुसलमानांची राज्ये होती व त्यामुळे आपण येथले राज्यकर्ते होतो व पुढेही होऊ हा भाव त्यांच्या मनात रुळत होता. वंशाने परके, भाषेने वेगळे, संस्कृतीने भिन्न, राष्ट्रवादी परंपरांनी हिंदूहून वरचढपणाची भावना बाळगणारे, जुन्या इस्लामी परंपरेचे अभिमानी असे जे मुसलमान या देशात होते त्यांच्या मनात राष्ट्रीय एकात्मता कधीच रुजली नाही. आणि त्यांच्या स्वतंत्र राष्ट्रवादी आकांक्षांना इंग्रजांनी स्वतंत्र मतदारसंघ देऊन व त्यातही वरचढ प्रतिनिधित्व देऊन व हिंदूंच्या विरुद्ध त्यांस उभे करून त्यांच्यातील फुटीरपणाची भावना वाढीस लावली व काँग्रेसनेही त्याच भावनेस खतपाणी घातले. ती भावना मुळात होतीच, ती इंग्रजांच्या व काँग्रेसच्या प्रयत्नाने वाढत गेली. अखेर अल्पसंख्य मुसलमान स्वतंत्र राष्ट्रवादी बनले व त्यांनी मुस्लिम बहुसंख्य वस्तीच्या प्रदेशात स्वतंत्र सार्वभौम राज्याची मागणी केली. १९१६ च्या लखनौ करारातील स्वतंत्र मतदारसंघांना तात्पुरती म्हणून मान्यता देताना मुस्लिम बहुसंख्य वस्तीचे पंजाब व बंगाल या प्रांतांत त्यांना घटनात्मक बहुमत राहणार नाही अशी तरतूद करण्यात आली होती. पण दहा वर्षांनंतर नवीन होणाऱ्या घटनेत प्रांतांप्रांतांतून स्वराज्याचे बरेच अधिकार प्राप्त होतील हे दिसू लागले होते व त्यामुळे प्रांतिक स्वायत्ततेची स्वप्ने पडू लागली होती. त्यानिमित्त झालेल्या १९२७ च्या दिल्लीच्या ऐक्य परिषदेत मुसलमानांचे पंजाब व बंगाल हे स्वतंत्र मुस्लिम बहुसंख्येचे प्रांत म्हणून मान्यता

देण्यात आली. या घटनेचे मौ. आझाद यांनी विशेष स्वागत केले आहे. ते करताना त्यांनी व्यक्त केलेली भावना विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. ते म्हणाले :

By Lucknow pact, Muslims had sold their interests. The Delhi proposals of last March (1927) opened the door for the first time to the recognition of the real rights of the Musalmans of India. Delhi proposals gave them for the first time five provinces of which no less than three (Sind, N.W.F. Province and Baluchistan) constituted a real overwhelming Muslim majority. (– Indian Annual Register 1927 II p. 449.) लखनौ कराराने मुसलमानांनी आपले हितसंबंध विकले होते. १९२७ मार्चमध्ये झालेल्या दिल्ली कराराने मुसलमानांच्या खऱ्या हक्कांना प्रथमच मान्यतेचा दरवाजा खुला झाला. या कराराने मुसलमानांना त्यांचे असे पाच प्रांत मिळाले. त्यात सिंध, सीमा प्रांत व बलुचिस्तान येथे त्यांची खरीखुरी बहुसंख्या होती. (पंजाबात व बंगालमध्ये मुसलमानांच्या जवळजवळ बरोबरीने हिंदूंची संख्या होती. पण १९२७ च्या कराराने मुसलमानी संख्या थोडी अधिक असल्यामुळे हेही दोन्ही प्रांत मुसलमानी बहुसंख्येचे समजण्यात आले.) जेथे मुसलमानी बहुसंख्येचे प्रांत आहेत तेथे मुसलमानी सत्ता चालावी व जेथे मुसलमानी सत्ता नाही तेथे अल्पसंख्य समाज म्हणून जास्तीत जास्त व केंद्रात मुसलमानांना सत्तेत हिंदूंच्या बरोबरीने भागीदारी मिळावी व अशा रीतीने सर्व हिंदुस्थानभर इस्लामी सत्तेचा छाप उठवावा ही आझाद यांची महत्त्वाकांक्षा होती. त्यांचा फाळणीला जो विरोध होता तो यास्तव होय. मुसलमानांना जिना जेवढे मिळवून देत आहेत त्यापेक्षा माझ्या योजनेने त्यांना अधिक मोठ्या प्रमाणावर अधिक सत्ता मिळू शकणार आहे हे ते मुसलमानांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. अखंड पाकिस्तान निर्माण करण्याचा त्यांचा दृष्टिकोन हिंदुराष्ट्रवाद्यांनी बरोबर ओळखला होता.

मूलग्राही विवेचन

स्वा. सावरकर १९३७ मध्ये प्रथमच हिंदुसभेचे अध्यक्ष झाले. अहमदाबादच्या या अधिवेशनात त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हिंदुमुसलमान प्रश्नाचे मूलग्राही विवेचन केले आहे. हिंदुस्थानातील हिंदुमुसलमानांचा वास्तव प्रश्न समजण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेले विवेचन मूलभूत स्वरूपाचे आहे. या देशात अनेक धार्मिक अल्पसंख्य समाज आहेत. येथे पारशी आहेत, ख्रिश्चन आहेत, यहुदी आहेत, पण त्यांच्याशी हिंदूंचे भांडण नाही. राष्ट्रवादाची जी विविध अंगे असतात त्यांपैकी धर्म सोडला तर बाकीची भाषा, संस्कृति, परंपरा, जीवनपद्धति इत्यादि बाबतींत ते ते समाज हिंदुच आहेत. मुसलमानांची गोष्ट तशी नाही व त्यामुळेच येथे हिंदुमुसलमान वाद सतत चालत राहिला आहे. सावरकर म्हणतात :

"But with the Mohamedans, the case is quite different. I warn the Hindus that the Mohamedans are likely to prove dangerous to our Hindu nation and the existence of a common Indian state even if and when England goes out. Let us not be stone-blind to the fact that they as a community still continue to cherish fanatical designs to establish Muslim rule in India. Let us work for harmony, let us hope for the best, but let us also be on our guard.

As it is, there are two antagonistic nations living side by side in India. Several infantile politicians commit the serious mistake in supposing that India is already welded into a harmonious nation or that it could be welded for the mere wish to do so. These our well-meaning but unthinking friends take their dreams for realities. This is why they are impatient of communal tangles and attribute them to communal organisations. But the solid fact is that the so-called communal questions are but a legacy handed down to us by centuries of a cultural, religious and national antagonism between the Hindus and the Moslems. When time is ripe you can solve them. But you cannot suppress them by merely refusing recognition to them. It is safer to diagnoise and treat deep-seated disease than to ignore it.

Let us bravely face the unpleasant facts as they are. India cannot be assumed to day to be a unitarian and homogeneious nation but on the contrary there are two nations in the main, the Hindus and the Muslims in India, and as it has happened in many a country under similar situation in the world, the utmost that we can do under the circumstances is to form an Indian state in which none is allowed any special weightage or representation and none is paid any extra price to buy his loyalty to the state. Mercenaries are paid and bought off, not sons of the motherland to fight in her defence. The Hindus as a nation are willing to discharge their duty to a common Indian state on equal footing. But if our Moslem countrymen thrust a communal strife on the Hindus and cherish anti-Indian and extra-territorial designs of establishing a mohamedan rule or supremacy in India then let the Hindus look to themselves and stand on their own legs and fight single-handed as best as they can for the liberation of India from any non-Hindu yoke, be it English or Moslem or otherwise."

(पण मुसलमानांच्या संबंधात वस्तुस्थिति अगदी वेगळी आहे. मी हिंदूंना बजावून सांगतो की मुसलमान हे हिंदुराष्ट्राला धोकादायक होण्याचा संभव आहे. आणि उद्या इंग्रजी राज्य नष्ट झाले तरीही येथील हिंदुस्थानी राज्याला तो धोका आहेच. आपण वस्तुस्थितीकडे दगडासारखे पाठ करून बसता कामा नये. एक जमात या नात्याने या देशात इस्लामी राज्य स्थापन करण्याच्या त्यांच्या आततायी कारवाया चालूच असतात. आपण येथे सुसंवाद घडविण्याचा प्रयत्न करूया, जास्तीत जास्त चांगले घडविण्याचा प्रयत्न करूया, पण त्याचबरोबर आपण सावधही राहणे जरूर आहे.

वस्तुस्थिति अशी आहे की या देशात दोन परस्परविरोधी राष्ट्रे असून काही पोरसवदा भाबड्या राजकारणी लोकांची अशी अतिशय चुकीची समजूत आहे की हिंदुस्थान हे आधीच एकसंघ राष्ट्र झालेलेच आहे किंवा निदान तशी आपण केवळ इच्छा बाळगली की ते तसे होईलच. हे सद्भावनेचे पण अविवेकी मित्र आपल्या मनोरथांनाच वस्तुस्थिति समजतात ! त्यामुळे जातीय कटकटीच्या संबंधात ते उतावळे बनतात, आणि त्याबद्दल जातीय संघटनांना दूषण देतात. पण वस्तुस्थिति अशी आहे की हिंदु आणि मुसलमान यांच्यातील सांस्कृतिक, धार्मिक आणि राष्ट्रीय वैरभावाचा शतकांचा वारसा चालत आलेला असून सध्याचे तंटे हे त्याचेच व्यक्त स्वरूप आहे. अनुकूल काळ येईल तेव्हा ते मिटतील. पण आज ते नाहीतच असे म्हणून ते दबले जाणार नाहीत. रोगाकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा त्याची कारणे शोधून ती दूर करणे हेच सुरक्षितपणाचे आहे. म्हणून अप्रिय वाटणाऱ्या घटनांनाही आपण धैर्याने तोंड देऊया. आज हिंदुस्थान एकजीव व एकात्म राष्ट्र झालेलेच आहे असे मानण्याची चूक आपण करता कामा नये. उलट या देशात मुख्यतः हिंदु आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत हे मान्य करून चालले पाहिजे. जगात इतर अनेक देशांतूनही अशी परिस्थिति आढळते. अशा स्थितीत आपण जास्तीत जास्त एकात्म हिंदुस्थानी राज्य बनवू शकतो की तेथे राज्याबद्दल निष्ठा बाळगण्यासाठी कोणाला जादा किंमत द्यावी लागणार नाही किंवा कोणाला विशेष अधिकार किंवा प्रतिनिधित्व असणार नाही. देशाच्या संरक्षणासाठी भाडोत्री सैनिक पैशाने विकत मिळू शकतात ; पण मातृभूमीचे पुत्र विकत मिळत नसतात. हिंदु हे एक राष्ट्र या नात्याने आपले या बाबतीतील कर्तव्य पार पाडण्यास सिद्ध आहेत. पण आपले मुसलमान देशबांधव जर आपणांवर जातीय लढा लादणारच असले, देशविरोधी कारवाया करणार असले किंवा त्यांच्या देशबाह्य निष्ठा असल्या व या देशात मुसलमानी सत्ता किंवा श्रेष्ठता निर्माण करण्याचा ते प्रयत्न करू लागले तर हिंदूंनी त्याचा प्रतिकार करण्याकरिता आपल्या पायावर उभे राहिले पाहिजे व या देशाच्या स्वातंत्र्यासाठी एकाकीपणाने शक्य तो सर्व लढा दिला

पाहिजे. मग तो लढा इंग्रजांविरुद्ध असो, मुसलमानांविरुद्ध असो किंवा अन्य कोणाविरुद्ध असो.

सावरकरांच्या या विवेचनाचे सार त्यांच्या "राजकारणाचे हिंदूकरण व हिंदूंचे सैनिकीकरण" या शब्दांत साठविलेले आहे.

काँग्रेस नेत्यांचा प्रयत्न

स्वातंत्र्यानंतर राष्ट्रवादाच्या विचारातील ही पोकळी दूर करण्याच्या दृष्टीने हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर काँग्रेसच्या काही पुढाऱ्यांनी प्रयत्न केले. त्यांत बेळगावचे गंगा रराव देशपांडे यांचा प्रयत्न विशेष महत्त्वाचा होता. आता या देशातील राष्ट्रवादाचे स्वरूप हिंदु आहे हा विचार काँग्रेस नेत्यांच्या गळी उतरविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ते गांधीवादी होते. म्हणून त्यांना या संबंधात गांधींचे विचार समजून घ्यावयाचे होते. याकरिता त्यांनी काका कालेलकर यांच्याशी प्रथम विचारविनिमय केला व त्यांच्यामार्फत आपल्या विचारांचा आशय गांधींच्या कानावर घातला, व गांधींचे विचार समजून घेऊन त्यांसह एक पत्रक प्रसिद्ध केले. (नवा काळ, दि. २६-१०-४७) त्यात देशपांडे म्हणतात :

"काकासाहेबांना आलेल्या एका पत्रात महात्माजींचा अभिप्राय उत्तरादाखल आलेला आहे. त्याचे शब्दशः मराठी भाषान्तर पुढीलप्रमाणे आहे :

"हिंदु संघटनेची तर नेहमीच आवश्यकता आहे. परंतु हिंदुसंघटन कृपण नसावे. अन्य धर्मांचा विरोध करणारे ते नसावे. हिंदुधर्म सुधारण्याकडे त्याचा उपयोग व्हावा. राजकारणाशी त्याचा संबंध नसावा. अशा प्रकारचे हिंदु संघटन कोणाच्याही विरोधी नसणार, विरोधी होऊ शकणार नाही. पण आज ते तसे आहे. हे सर्व गंगाधररावांच्या ध्यानात येईल, त्यांना पटले तर हिंदुसंघटनेला ते खरोखर हवे आहे ते ते देऊ शकतील."

गंगाधरराव देशपांडे आपल्या पत्रकात पुढे म्हणतात : "एक गोष्ट निर्विवाद आहे. हिंदुसंघटन मुळीच नसावे असा महात्माजींचा हेतु नाही. त्यांच्या फक्त दोन अटी आहेत : (१) दुसऱ्या संघटनेशी या संघटनेचा विरोध नसावा; व (२) राजकारणाशी तिचा संबंध नसावा. या दोन्ही अटी पाळून हिंदुधर्म सुधारण्याकरिता व विकसित करण्याकरिता संघटनेचा उपयोग व्हावा. तो अवश्य आहे.

"लोकशाहीचे तत्त्व आज सर्वांना मान्य आहे. राष्ट्राविषयी निष्ठा बाळगणाऱ्या सर्वांना नागरिक हक्क राहतील. ज्यांची अशी निष्ठा नाही त्यांना हक्क मिळणार नाहीत. अशा राज्यसंस्थेत बहुसंख्य हिंदूंच्या संस्कृतीचा प्रभाव असणेही स्वाभाविक आहे हे पंडित नेहरूंचे म्हणणे मान्य केल्यास हिंदुसंघटनेच्या प्रश्नाला बुजण्यासारखे काही आहे असे वाटावयास नको. मुसलमानांसारख्या अलपसंख्या-

कांच्या मुर्वतीखातर बहुसंख्याकांच्या संस्कृतीला धोका येऊ नये एवढेच बहुसंख्य हिंदूंचे म्हणणे आहे. अशा प्रकारे विचार केल्यास आज माजलेला घोटाळा बराच दूर होईल व हिंदुसंघटनेला योग्य वळण मिळेल."

गांधींनी व्यक्त केलेले विचार गंगाधरराव देशपांडे यांनी आपल्या वरील पत्रकात नमूद केले आहेत. पण त्यामधील गांधींचे एक विधान मात्र वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे, असत्य व हिंदुराष्ट्रवाद्यांची बदनामी करणारे आहे. गांधी म्हणाले की, हिंदुसंघटन हे अन्य धर्मांच्या विरोधी असू नये, पण आजचे हिंदुसंघटन तसे विरोधी आहे असे ते म्हणतात. पण ते तसे आहे ही गांधींची समजूतच खोटी, भ्रामक व विपर्यस्त असून वस्तुस्थितीशी विरोधी आहे. हिंदुसंघटन हे कोणा एका धर्माच्या विरोधी असे कधीच नव्हते. ते फक्त हिंदुसमाजावर आक्रमण करणाऱ्यांच्या विरोधी होते. तसे ते असणार व असलेही पाहिजे. इस्लामी साम्राज्यवाद हा धर्माधिष्ठित असून हिंदुराष्ट्राच्या विरोधी व आक्रमक होता व आहे, म्हणून तेवढ्यापुरते हिंदुसंघटन इस्लामी साम्राज्यवादाविरुद्ध आहे. पण याचा अर्थ ते मुसलमानी किंवा अन्य धर्मांच्या विरुद्ध आहे हे म्हणणे चुकीचे होय. पण काँग्रेसनेत्यांनी असत्याचा जाणून बुजून आश्रय करून व त्याचा वारंवार उच्चार करून त्यालाच खरेपणा आणण्याचा गोबेलछाप प्रयत्न केला व हिंदुराष्ट्रवाद्यांविरुद्ध ते सतत खोटा प्रचार करीत राहिले. आजही सत्ताधारी पक्षाचा अल्पसंख्याकांचा अनुनय सुटलेला नाही व तथाकथित निधर्मीवादाचा गडद रंग राजकारणाला फासला जात आहेच. पूर्वी इंग्रजांच्या सत्तेविरुद्ध चळवळ करण्यासाठी मुस्लिम अनुनय होता, आता तो स्वतःच्या हाती सत्ता राखण्यासाठी मुस्लिम मते मिळविण्याकरिता आहे इतकेच !

श्री. धनंजयराव गाडगीळ यांचे विचार

राष्ट्रविचारातील ही निधर्मवादी पोकळी भरून काढण्याची आवश्यकता इतरही अनेक विचारवंतांना वाटली. श्री. धनंजयराव गाडगीळ हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांना ही पोकळी विशेष जाणवली व म्हणून त्यांनी दि. १० ऑक्टोबर १९४७ ला याविषयी एक महत्त्वाचे व विवेचनात्मक पत्रक प्रसिद्ध केले. विशेषतः फाळणीमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची नीट सोडवणूक करण्यासाठी तरी हा देश हिंदुराष्ट्र आहे हे मान्य करून त्या दृष्टीने शासनाने लोकसंख्येची अदलाबदल घडवून आणावी, तरच प्राप्त परिस्थितीतून काही नीट व्यवस्था लागेल असे त्यांनी म्हटले आहे. ते पत्रक हिंदुराष्ट्रवादाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे असल्याने पुढे दिले आहे. श्री. गाडगीळ म्हणतात :

(१) नव्या हिंदी संघाचे समर्पक वर्णन करावयाचे असेल तर 'हिंदुराष्ट्र राज्यांचा संघ' या शब्दसमुच्चयानेच ते होईल. या शब्दसमुच्चयात 'हिंदु' असा शब्द वापरण्याने त्या राज्याला धार्मिक वर्चस्वाचा जो वास येईल तो इंग्लंड आणि

अमेरिका यांना ' ख्रिश्चन ' राज्ये म्हटल्यास येणाऱ्या वासापेक्षासुद्धा कमी आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. कारण हिंदु हा शब्द काही एखाद्या विशिष्ट पूजा-प्रघाताला किंवा पारलौकिक कल्पनांना उद्देशून आहे असे नाही. ' हिंदु ' म्हणवून घेणाऱ्यांत निरीश्वरवाद्यांपासून तो थेट व्यक्तिपूजा करणाऱ्यांपर्यंत सर्वांचा समावेश होतो. आधिभौतिक वादापासून तो तहत चमत्कृतिपूर्ण अशा अध्यात्मवादाच्या कल्पनांपर्यंतच्या सर्व कल्पनांचा समावेश ' हिंदु ' मध्ये होतो. ' हिंदु ' शब्दाचा व्यापक अर्थ लक्षात घेतला तर पूर्वीच्या किंवा अलीकडच्या काळात समाज-सुधारणेच्या झालेल्या बुद्ध, जैन, लिंगायत, शीख, ब्राह्मो इत्यादि सर्व आंदोलनांचा समावेश त्यात होत असतो. म्हणूनच कित्येक ख्रिस्ती धर्माचे अनुयायीसुद्धा हिंदु-परंपरा आणि प्रघात राखून ख्रिस्ती धर्म पाळतात असे आढळून येईल.

म्हणून ' हिंदुराज्य ' म्हणण्याने काही एका ' विशिष्ट सांस्कृतिक आणि ऐतिहासिक समाजपरंपरा मानणाऱ्यांचे राज्य ' इतकाच अर्थ होत असतो आणि हिंदुसंघराज्य म्हणजे अशा समान संस्कृतीच्या पण भिन्न भिन्न धर्मांच्या लोक-राज्यांचा संघ असाच अर्थ होईल.

(२) हिंदी संघाला हिंदुराज्य म्हणण्याने या प्रदेशात फक्त हिंदु संस्कृति व परंपरा यांच्या वारसांनाच स्थान आहे आणि इतरांना ते नाही व कायद्याने पक्ष-पात करून इतरांचे उच्चाटन करण्यात येईल असा अर्थ मुळीच होत नाही. उलट त्या राजसत्तेची प्रमुख वैशिष्टये स्पष्ट करण्यास त्या शब्दप्रयोगाचा उपयोग होणार आहे. इंग्रजी राज्य आणि धर्मपीठ यांचे संबंध पुष्कळ घनिष्ठ आहेत. पण त्यामुळे इंग्रजी राजसत्तेने आपल्या प्रदेशात इतर नागरिकांना समान वागवणूक दिली नाही किंवा तशी देता येत नाही असे मुळीच नाही. हिंदु राज्यकर्त्यांनी आपल्या कारभारात नेहमी धार्मिक सहिष्णुता आणि समानता यांचेच धोरण त्या कल्पनांच्या प्रस्थापनेपूर्वीपासून चालविलेले आढळून येते. त्यामुळे एखाद्या राज-सत्तेला हिंदुराज्य म्हणण्याने त्या राज्यसत्तेच्या प्रदेशात धार्मिक असहिष्णुता आणि परकीयांबाबतचे वैषम्य यांचा परिपोष होईल असे म्हणणे बदनामीकारक आहे.

याच्या उलट हिंदीसंघाला ' हिंदु ' शब्द न लावण्याने काय होईल ते पहा. ज्या एका प्रमुख तत्त्वामुळे हा संघ एकसंध राहिला त्या तत्त्वाचाच उच्चार करण्यास त्यामुळे नकार दिल्यासारखा होणार आहे. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर हिंदी संघाला प्रादेशिक एकता अगर अखंडत्वही उरलेले नाही. पंजाब-बंगालच्या फाळणीने ही गोष्ट सिद्ध केली आहे की, प्रादेशिक अखंडत्व किंवा भाषिक सामर्थ्य याहीपेक्षा हिंदु परंपरा आणि संस्कृति याविषयीची निष्ठा ही अधिक प्रबल आहे.

आज हिंदी संघात आसाम्यांपासून तो गुजराथ्यांपर्यंत आणि पंजाब्यांपासून तो तामिळी लोकांपर्यंत सर्वांना एकत्र ठेवणारी कोणती प्रवृत्ति असली तर ती हिंदुपरंपरा आणि संस्कृति याविषयाची आपुलकीची भावना हीच होय.

केवळ सोय किंवा शेजार यांच्या विचाराने मोठमोठ्या राजकीय भूभागातील माणसे एकसंध राहू शकणार नाहीत. हजारो वर्षांच्या इतिहासाने ही गोष्ट सिद्ध केली आहे की, या देशातील लोकांना एकसंध राखण्यासाठी कोणती भावना कारणीभूत झाली असली तर ती हिंदु परंपरा आणि हिंदु संस्कृतीविषयीची निष्ठा ही भावनाच. कितीही दोष आणि वैषम्ये असली तरी त्याच भावनेने लोकांना एकत्र नांदविलेले आहे हे इतिहासप्रसिद्ध सत्य आहे. हे ऐतिहासिक सत्य अमान्य करणे म्हणजे इतिहासापासूनचा शहाणपणा न शिकण्यासारखे होईल. इतकेच नव्हे तर त्यामुळे भविष्यकाळातही अनेक धोके निर्माण होणार आहेत. कारण सगळ्यांना एकत्र राखणाऱ्या हिंदुत्वनिष्ठेच्या या भावनेचा आणि इतिहाससिद्ध सत्याचा त्याग केला म्हणजे ती जागा घेईल अशी दुसरी कोणतीही भावना नाही.

आज हिंदुस्थानात असणाऱ्या अनेक राष्ट्रीयांना हिंदु परंपरेविषयी आणि तिच्या विकासाविषयीचो आपुलकी आहे. अभिमानाने ते त्यासाठी प्रयत्न करीत असतात. या सर्वांच्या राजसत्तेला जर ‘ हिंदुराजसत्ता ’ असे संबोधावयाचे नसेल तर मग स्वतःला ‘हिंदु’ न म्हणवून घेणाऱ्या आणि हिंदु परंपरेच्या विकासाविषयी आत्मीयता नसणाऱ्या अशा परक्या लोकांच्याबरोबर एकत्र कां नांदावयाचे याचा विचारच हे सगळे लोक करावयास लागतील.

(३) देशाच्या फाळणीमुळे या देशात दोन राज्ये निर्माण झाली आहेत. एक मुसलमानी राज्य आणि दुसरे हिंदु राज्य. या प्रामाणिक कल्पनेने आणि अधिक विवेकाने देशाची फाळणी करण्यात आली असती तर फाळणीनंतर आज जे संकट ओढवले आहे त्याची भीषणता पुष्कळ अंशाने कमी झाली असती असा संभव आहे. पण ते पूर्वी काहीही झाले असले तरी आता दोन्ही राज्यांपुढे जे नवे प्रश्न उपस्थित आहेत ते नीट सुटावयास हवे असतील तर एक राज्य मुसलमान राज्य आहे आणि दुसरे हिंदु राज्य आहे हे रोखठोक आणि प्रामाणिकपणे मान्य करण्यानेच ते सुटतील.

मुसलमानी राज्यातून हिंदु व शीख पळून हिंदु राज्याच्या आश्रयाला येत आहेत. या लोकांना ‘निर्वासित’ म्हणण्यात आल्यामुळे त्यांच्या पुढाऱ्यांना राग आला आहे आणि तो अगदी न्याय्यही आहे. ‘निर्वासित’ याचा अर्थ या लोकांना आपले राज्यच नाही व त्यांना आश्रय देणारे राज्य हे त्यांच्यावर दया म्हणून आश्रय देते असा होतो. पाकिस्तानातील हिंदु व शीखांबाबतची हिंदुराज्याची भूमिका ही त्रयस्थाची आहे असे मुळीच म्हणता येणार नाही. तिकडून येणाऱ्या हिंदु-शिखांना या हिंदु राज्याचे भावी नागरिक असेच मानावे लागेल. देशाच्या फाळणीमुळे त्यांना दुसऱ्या राज्यात पडावे लागले इतकेच समजता येईल.

फाळणी करताना मुसलमानी राज्यात या हिंदु शिखांना नागरिकत्वाचे सर्व हक्क मिळतील आणि शांततेने त्यांना आपले जीवन आणि उद्योग चालविता येतील

अशी कल्पना होती. पण या कल्पनांचे पटल दूर झाले असून मुस्लिम राज्य आणि त्याचे मुसलमान नागरिक यांच्या वृत्तीमुळे त्या लोकांना देशत्याग करून हिंदु राज्यात सामील होण्यासाठी यावे लागले आहे. त्यांना आता आसरा देणे भागच आहे आणि हे कार्यही काही तत्त्वे आणि योजना यांच्या आधारेच करावयास हवे.

हिंदुस्थानातील बहुतेक भाग हे आधीच लोकवस्तीने गजबजलेले आहेत. त्यामुळे निर्वासित समजल्या जाणाऱ्या या लोकांना देशभर वाटून देणे हे त्या निर्वासितांच्या आणि त्या प्रदेशांच्या अशा दोन्ही दृष्टींनी योग्य व न्यायाचे होणार नाही. या बहुतेक सगळ्या प्रदेशातील निर्वासितांना आपण आपल्या लोकांत येऊन राहिलो आहो असे वाटणार नाही, शिवाय या सर्व प्रदेशातील लोकांपुढे आपल्या लोकसंख्येचे अनेक प्रश्न आहेतच व त्यामुळे आपल्या लोकांत एकरूप न होणाऱ्या अशा या बाहेरच्या लोकांना आपल्यात बसविण्याविषयी दूरदृष्टीने विचार करणारे लोक कितपत तयार होतील हा प्रश्नच आहे.

म्हणून पाकिस्तानातून येणाऱ्या हिंदु-शीखांना या राज्यात आसरा द्यावयाचा असेल तर प्रमाणतः या राज्यातील मुसलमान वस्तींचा ओघ पाकिस्तानकडे जाणे हे क्रमप्राप्तच आहे. ही वस्ती तिकडे जाऊन तिनेच या येणाऱ्या हिंदु-शीखांना जागा करून द्यावयास हवी.

ही अदलाबदल कोठे होऊ शकेल याचा व्यवहार्य विचार केला म्हणजे सरहद्दी जवळच्या प्रदेशातच ही वस्तीची अदलाबदल करणे आणि ती सुद्धा दोन्ही राज्यशासनांनी परस्परांतील विचाराने करणे हे इष्ट व उपयुक्त ठरेल. पाकिस्तानातून येणारे हिंदु शीख हे शेजारीच आत्मीयतेने राहू व जगू शकतील.

सध्याची परिस्थिति अगदीच दुर्दैवी आहे. वस्तीची अदलाबदल आजही चालू आहे. पण दहशत आणि धमकीच्या पोटी ही अदलाबदल होत आहे. उभयता सरकारांनी ही परिस्थिति पालटावयास हवी. ते त्यांचे कर्तव्य आहे. पण येणारे आणि त्यांना आश्रय देणारे यांना जोपर्यंत सरकारकडून हे कार्य न्यायीपणाने आणि योजनापूर्वक होईल असे आश्वासन मिळणार नाही तोपर्यंत ते कर्तव्य नीट पार पडणार नाही. या आश्वासनाच्या अभावी परिस्थिति न सुधारता ती अधिकच चिघळत जाणार आहे.

काही झाले तरी पाकिस्तानातील हिंदु व शीख तेथे राहणार नाहीत व त्यांना हिंदुस्थानात आश्रय दिला पाहिजे हे जर हिंदु राज्याला पटले असेल व त्याची तशी खात्री झाली असेल तर सरहद्दीनजीकच्या प्रदेशातील जरूर तितक्या मुसलमान वस्तीला पाकिस्तानने आश्रय दिला पाहिजे असे हिंदुस्थान सरकारने पाकिस्तान सरकारला सांगितले पाहिजे.

पंजाब व सरहद्द प्रांतांतून येणारांना पूर्व पंजाबात व दिल्ली विभागात आणि सिंध बलुचिस्तानातून बाहेर पडणारांना दिल्ली भागात अगर नजीकच्या राजपुताना अगर काठेवाडी प्रदेशात आश्रय दिलाच पाहिजे.

कोणत्या प्रदेशात या लोकांना स्थायिक करावयाचे याच्या मर्यादा हिंदुस्थान सरकारने ठरवून त्या प्रदेशात सक्तीने ही वस्तीची अदलाबदल करावयास हवी. याखेरीज दुसऱ्या कोणत्याही अन्य मार्गाने हा प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न करण्यात आला तर देशाच्या दूरदूरच्या भागात निष्कारण अनेक गुंतागुंतीचे संघर्ष निर्माण होतील. दोन्ही सरकारांनी आपसांत तडजोड करून ठरीव प्रदेशात सक्तीने लोक संख्येची अदलाबदल करणे हा एकच उपाय या प्रश्नावर आहे.

सूड आणि प्रतिसुडाचे आजचे घातचक्र बंद पाडण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. पण हा मार्ग हिंदुस्थानला पटण्याची शक्यता त्याच वेळी निर्माण होईल की ज्या वेळी हिंदुस्थान राज्याचे आजचे राज्यकर्ते हे स्वतःस आपण हिंदुराज्याचे प्रतिनिधि आहोत याची जाणीव दाखवितील व पाकिस्तानातील हिंदु-शीखांना आश्रय देण्याबाबत आपले त्या दृष्टीने कर्तव्य आहे हे ओळखतील.

(४) ही दृष्टि आली तरच जुनागड आणि हैद्राबादचे प्रश्न नीटपणे सुटू शकतील. जुनागडमधील गुजराथी हिंदु, निजामीतील आंध्र, मराठे आणि कानडी हिंदु व हिंदुस्थान राज्यातील हिंदु यांच्यात वंश, संस्कृति, भाषा आणि इतिहास यांनी निर्माण झालेले असे हिंदुत्वाचे नाते समान आहे. जुनागड हे काठेवाड संबोधल्या जाणाऱ्या प्रादेशिक भूभागाचा केवळ एक अंश आहे. या म्हणण्याला फार कमी महत्त्व आहे. महत्त्वाची गोष्ट आहे ती ही की जुनागडचा प्रदेश हा गुजराथच्या हिंदुराष्ट्राचा असल्यामुळे त्या प्रदेशातील लोकांना आपल्या इच्छेविरुद्ध पाकिस्तानच्या मुसलमानी राज्याच्या गुलामीत घालणे शक्य नाही.

हिंदुस्थान संघराज्यातील गुजराथी लोक स्वस्थपणे डोळे मिटून ही सक्ती सहन करणार नाहीत व हिंदी राज्यात गुजराथी राष्ट्राचे महत्त्वाचे स्थान असल्याने हिंदुस्थान संघराज्याने जुनागडच्या राजाशी हे भांडण सरकार या नात्याने मांडले आहे हे बरोबरच आहे. हैद्राबादचा प्रश्नही जुनागडच्या तत्त्वावरच आधारलेला आहे. ब्रिटिशांविरुद्ध लढताना शस्त्र म्हणून सत्याग्रहाचा कितपत उपयोग झाला किंवा न झाला हा प्रश्न बाजूला ठेवला तरी हैद्राबादच्या बाबतीत त्याचा उपयोग अगदी अयोग्य आहे. सत्याग्रहाचे नाव करून मुसलमान सैनिक आणि शिपाई हिंदु प्रजाजनांचा छळवाद करून त्यांना दहशत मात्र बसवीत आहेत. हैद्राबादच्या हिंदूंना असल्या विषम संघर्षापासून वाचविले पाहिजे. अशा संघर्षाचे परिणाम घातक आणि फार दूरगामी होतील.

आंध्रवासी, मराठे आणि कानडी लोकांना निजामीत आपल्याच बांधवांवर सर्व क्षेत्रांत होणारा अन्याय आणि जुलूम सहन होत नाही आणि होणार नाही. या सर्व अन्यायाचे परिमार्जन करावयाचे असेल तर त्यांनी हिंदु राज्यामार्फत हा प्रश्न हाताळावयास हवा.

मराठा कारकीर्दीत हैद्राबादी हिंदु आपल्या रक्षणासाठी मराठा राजांच्या कडे पहात असत. आज त्या राजांची जागा हिंदुस्थान संघराज्याने घेतलेली आहे. आणि म्हणून निदान मराठे राज्यकर्त्यांनी मुत्सद्देगिरी किंवा इतर शस्त्रांचा त्या कार्यासाठी जितका उपयोग केला तितका तरी हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांनी त्यासाठी करावयास हवा.

*

(१३)

गांधीवधोत्तर पर्व

नौखालीत झालेल्या भयंकर अत्याचारी प्रकारांपासून गांधी बरेच अस्वस्थ झालेले होते. आत्यंतिक अहिंसेवर त्यांचा अजूनही विश्वास होता. पण आता आपल्यापुढे अंधार आहे, प्रकाश दिसत नाही असे ते म्हणू लागले होते. दि. ४ डिसेंबर १९४७ ला गांधींचे मारवाडी चेंबरपुढे भाषण झाले. त्या वेळी ते म्हणाले की " हिंदुस्थानने दुर्बलांच्या अहिंसेने स्वातंत्र्य मिळविले आहे. ब्रह्मदेशाने हिंदुस्थान-जवळून शिकण्यासारखे काही नाही. " गांधींचाही नेहरूप्रमाणेच लोकसंख्येच्या अदलाबदलीस विरोध होता. नौखालीत त्यांनी हिंदूंना तेथेच मरण्याचा उपदेश चालविला होता; पण दिल्लीत पंजाबातून आलेले निर्वासित गांधींचे हे विचार ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. १९४७ च्या जानेवारीत गांधींचा दिल्लीस मुक्काम होता. गुंडापुढेही अहिंसा स्वीकारून मरण पतकरा या गांधींच्या मरणार्थी उप-देशाने पंजाबी निर्वासित खवळले होते. अशा स्थितीत पाकिस्तानला ५० कोटि रुपये देण्यास वल्लभभाईंचा विरोध असतानाही गांधींनी हट्ट धरला. तेव्हा त्यांच्या समाधानासाठी हिंदुस्थान सरकारने पाकिस्तानला ५० कोटि रुपये दिले. निर्वासि-तांचे हाल, पन्नास कोटींचे दान, काँग्रेसचे मुसलमानांसंबंधीचे आजवरचे धोरण, गांधींचा हिंदूंना आत्मनाश करण्यास सांगणारा व लाखो लोकांच्या मृत्यूस कारणी-भूत होणारा अहिंसावाद हे सर्व देशाचा घात करणारे आहे व म्हणून त्यांचा नाय-नाट करण्याचा मार्ग म्हणजे गांधींचा वध करणे प्राप्त असे मनाशी ठरवून गोडसे यांनी भावनेच्या भरात दि. ३० जानेवारी १९४८ ला गांधींना गोळ्या घालून ठार केले व ते आपण स्वतः होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाले. गांधींना मृत्युदंड देताना आपणही तो भोगला पाहिजे हे न्यायाचेच आहे असे ते शेवटपर्यंत म्हणत.

गांधीवधाची महाराष्ट्रातील प्रतिक्रिया

गांधीवधाची प्रतिक्रिया काँग्रेसगोटात अर्थातच अतिशय तीव्र झाली. पण उत्तर हिंदुस्थानात व महाराष्ट्राबाहेर दक्षिण हिंदुस्थानातही सर्वसामान्य समाजात ती फारशी झाली नाही. गांधींच्या अतिरेकी धोरणाचे ते पर्यवसान होते असे सर्व-सामान्य लोकमत होते. निर्वासितांमध्ये तर झाले ते ठीकच झाले असे मानण्याचीही प्रवृत्ति निर्माण झाली होती. दक्षिण महाराष्ट्रात मात्र त्याची प्रतिक्रिया फार तीव्र झाली. पण ती गांधीवधामुळे झाली नाही. ब्राह्मणद्वेषाच्या धगीतून ती उफाळली होती. महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद १९१७ सालापासून जवळ जवळ तीस वर्षे धुमसत होता. तो मधून मधून सुप्त होता इतकेच. त्यांनाही गांधींचा अहिंसावाद

मान्य नव्हता; पण ब्राह्मण समाज सर्वसामान्यतः गांधीवादाच्या विरोधी असल्यामुळे ब्राह्मणांच्या विरोधी म्हणून ते गांधीवादी समजले जात. पण गांधीवधाचे निमित्त मिळताच ब्राह्मणेतर समाजाचा ब्राह्मणद्वेष उफाळून वर आला व त्यांनी ब्राह्मण-समाजाचे हत्याकांड आरंभिले. सत्ताधारी काँग्रेसची त्यांना साथ मिळाली. गोडसे हे उपनाव ब्राह्मणांप्रमाणे मराठा समाजातही आहे. पण गोडसे यांनी गांधींचा वध केला याची प्रतिक्रिया इतकी तीव्र झाली होती की गोडसे या केवळ उपनावामुळे गैरसमज होऊन सातारा जिल्ह्यातील एका गोडसे आडनावाच्या मराठा कुटुंबातीलही तीन पिढ्यांची होळी करण्यात आली ! भावनेचा अतिरेक कोणत्या थराला जातो याचे हेही एक निदर्शनच होते. विवेक म्हणून राहिला नाही.

ही ब्राह्मणद्वेषाची आग दक्षिण महाराष्ट्रात सर्वत्र पसरली. त्यामुळे पुणे, मुंबई, सातारा, भोर, सांगली, औंध, मिरज, कोल्हापूर या पट्ट्यांत सर्वत्र ब्राह्मणांचीं घरे जाळणे, चीज वस्तु लुटणे व काही ठिकाणी माणसेही मारणे किंवा जिवंत जाळणे इ. प्रकार झाले. त्या वेळी काही काँग्रेसवाद्यांनी व समाजवाद्यांनी हिंदुसभावादी ब्राह्मणांची घरे जाळली गेली तर छान झाले असेही उद्गार काढले. महिना पंधरा दिवस ही द्वेषाची आग धुमसत होती. सरकारने हिंदुसभावादी व रा. स्वयंसेवक संघीय यांना मोठ्या प्रमाणावर अटक करून स्थानबद्ध करून ठेवले. तेव्हा ती काही प्रमाणात शमली. सरकारलाही ही आग पसरू देणे धोक्याचे आहे हे पुढे मान्य करावे लागले व त्यांनी अत्याचारी चळवळीस आवर घातला. तथापि त्याचे कडवट परिणाम दीर्घकाळ राहिले.

या दंगलीचे वृत्त मिळताच हिंदुसभेचे एक थोर नेते श्री. गंगाधर विश्वनाथ उपाख्य नानासाहेब गोखले हे महाराष्ट्रात दंगली झाल्या त्या त्या भागात स्वतः गेले व त्यांनी लोकांना धीर दिला व त्यांजकडून माहिती मिळविली. तथापि त्या वेळी ती प्रसिद्ध करणे शक्य नव्हते. पुढे काही दिवसांनी ऑगस्ट १९४८ मध्ये या जळितांची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेने शं. रा. दाते, गं. वि. गोखले, ह. भा. भिडे व सौ. शांताबाई गोखले यांना चौकशी करण्यास सांगितले. त्या चौकशी समितीने चौकशी करून आपला वृत्तान्त दि. १ मार्च १९४९ ला महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेला सादर केला. तो त्या वेळी प्रसिद्ध झाला आहे. तो तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर विशेष प्रकाश पाडणारा असल्याने येथे दिला आहे. तो असा :

चौकशी समिति

गेल्या वर्षी दि. ३१ जानेवारी १९४८ या दिवशी व त्यानंतरच्या ८–१५ दिवसांत पुणे, कोल्हापूर, सांगली, मिरज, सातारा व लगतच्या भागात फार

मोठ्या प्रमाणावर जाळपोळ झाली. कोल्हापूर येथील जळिताची चौकशी करण्या-करिता हिंदुस्थान सरकारच्या सूचनेवरून छत्रपतींनी एक चौकशी कमिशन नेमले होते. अशा प्रकारची चौकशी सांगली मिरज वगैरे भागाकरिताही कमिशन नेमून करावयास हवी होती. खुद्द मुंबई प्रांतातील पुणे, सातारा जिल्हा इत्यादि ठिकाणी जी जाळपोळ झाली तिचीही चौकशी होणे अवश्य होते. पण मुंबई सरकारने ती केली नाही, किंवा हिंदुस्थान सरकारनेही त्याकडे लक्ष दिले नाही. तथापि सांगली, मिरज येथील मंडळींच्या सूचनेवरून तेथील अत्याचारांची चौकशी करण्याकरिता महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेने ऑगस्ट १९४८ मध्ये भरलेल्या सभेत एक चौकशी समिति नेमली होती. काही ना काही अडचणींमुळे या समितीला ते काम लौकर पुरे करता आले नाही. म्हणून डिसेंबर १९४८ च्या प्रांतिक समितीच्या सभेत सदर समिति रद्द करून नवी समिति नेमण्यात आली. तीत श्री. शंकर रामचंद्र दाते, श्री. गंगाधर विश्वनाथ गोखले व सौ. शांताबाई गोखले यांचा समावेश करण्यात आला. नंतर श्री. हरि भास्कर भिडे यांना तीत समाविष्ट करून घेण्यात आले. सदर समितीच्या तिघा सभासदांनी दि. १५, १६, १७, १८, व १९ जानेवारी १९४९ या दिवशी सांगली व मिरज येथे जाऊन तेथील दंगलीची चौकशी केली.

यापूर्वी आमच्यापैकीच एक श्री. गं. वि. गोखले यांनी केसरी संस्थेच्या आदेशानुसार १९४८ च्या फेब्रुवारी महिन्यातच या भागात दौरा काढून दंगलीची सर्व कच्ची माहिती गोळा केली होती. त्यांनी सांगली, सांगलवाडी, हरिपूर, कवठे, डिग्रज, धामणी, अंकली, बुधगाव, माधवनगर, वागणी, अष्टे, भिलवडी, मिरज, मालगांव, बोरगांव, इचलकरंजी, जयसिंगपूर, चंदूर, कुरुंदवाड, नरसोबाची वाडी, औरवाड, गौरवाड, गणेशवाडी, कागवाड, हतकणंगले, कोल्हापूर, कागल, कोन-नोळा, सौन्दलगे, कळे, अंबप, कोडोली इत्यादि गावी जाऊन वस्तुस्थितीची जी टिपणे केली होती ती या समितीस फार उपयुक्त झाली व त्यामुळे कामात सौकर्यही पुष्कळ आले. जाळपोळ झाल्यानंतर लगेच ती करण्यात आलेली असल्याने ती ताजी, विश्वसनीय व साधार होती. आम्हांस जी नवीन माहिती मिळाली तीही सर्वस्वी या टिपणांशी जुळती, सुसंगत व धरून असल्याने सुमारे एक वर्षा-नंतर आता होत असलेल्या या चौकशीच्या वृत्तान्तातील विधाने सत्य, साधार, व यथार्थ अशीच असल्याचे आढळून येईल.

आम्ही ज्यांच्या भेटी घेतल्या त्यांत ज्यांचे प्रत्यक्ष नुकसान झाले ते तर होतेच; पण जे ही जाळपोळ चालू असता पाहात होते त्यांच्यापैकीही कित्येकांनी आम्हांस त्या वेळच्या घटनांची इत्यंभूत वर्णने तपशीलवार सांगितली, त्यावरून त्या घटनांची स्मृति लोकांच्या मनात अद्यापही किती ताजी व जखम किती ओली आहे याची कल्पना येऊ शकते. त्याशिवाय काँग्रेसच्या स्थानिक श्रेष्ठींपासून तो जाळ-पोळीत प्रत्यक्ष भाग घेतल्याबद्दल पुढे 'क्षमापत्र' लिहून देऊन आपली सोडवणूक

करून घेणाऱ्या गुंडप्रमुखांपर्यंत, वरिष्ठ स्थानिक अधिकाऱ्यांपासून तो कनिष्ठ शिपायांपर्यंत मंत्र्यांपासून मजुरी काम करणाऱ्या सामान्य माणसापर्यंत अनेक मंडळींना आम्हीं भेटलो व अनेक मुद्द्यांचे स्पष्टीकरणही करून घेतले.

या चौकशीत आमच्या असे निदर्शनास आले की या दंगलीच्या जबाबदारीचे खापर कोणाही एका व्यक्तीवर किंवा गटावर फोडणे योग्य होणार नाही. किंबहुना ही जी जाळपोळ झाली ती अनेक दिवस महाराष्ट्रात घडून येत असलेल्या विविध घटनांचा सामुदायिक परिणाम आहे असे म्हणणे अधिक योग्य होईल.

या चौकशीत ज्यांनी आम्हांस विविध माहिती पुरविली त्यांच्या नावाचा उल्लेख करण्याचे आम्ही शक्य तों टाळले आहे. काही ठिकाणी गुन्हेगारांवर न्यायालयांतून काम चालू असल्याने त्यांच्याही बाबतीत काही विधान करणे योग्य होणार नाही. तसेच साक्षी देणारेही अनेक प्रसंगी गुन्हेगारांची नांवे सांगण्यास कचरत. याचे कारण त्यांनी असे सांगितले की, नावे सांगून उपयोग काही नाही. उलट त्यांना प्रसिद्धि मिळाली तर गुंडांना दंश धरण्यास आणखी एक निमित्त मात्र मिळावयाचे ! म्हणून आम्हीही त्यांच्या नावांना शक्यतों प्रसिद्धि न देण्याचे त्यांस आश्वासन दिले. शिवाय आम्हांस कोणी विशेष व्यक्तीने गुन्हा केला किंवा केला नाही असे काहीच ठरवावयाचे नसल्याने व आमच्या चौकशीचे स्वरूप एकंदर परिस्थितीचे यथातथ्य स्वरूप दिग्दर्शित करणे एवढेंच केवळ असल्याने आम्हांस त्यांच्या नावाशी विशेष कर्तव्य नसून विविध घटना व त्यामागील विचारसूत्रे यांचेच परीक्षण करावयाचे होते. पुढील माहिती या दृष्टीनेच साकल्याने ग्रंथित केलेली आहे

सांगली व मिरज येथील जाळपोळीचे अवशिष्ट असलेले भाग आम्ही पाहिले.. गेल्या वर्षाच्या कालावधीत अनेकांनी त्यांत दुरुस्त्या केल्या असून आपली जळलेली घरे पुन्हा बांधण्याचा व बंद पडलेले व्यवसाय पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न चालविला आहे. अनेकांनी त्या कामी बऱ्यापैकी यशही संपादन केले आहे. तथापि असे असले तरी अद्यापही पुष्कळ जळकी घरे त्याच स्वरूपात उभी असल्याचे दिसून येते. वर्ष होऊन गेले तरीही त्यांच्या मालकांना त्यांच्या दुरुस्तीस हात घालता आला नाही. यावरून त्यांची विपन्नावस्था केवढी आहे याची कल्पना येऊ शकेल !

प्रेरणा

हे जाळपोळीचे प्रकार पुणे, कोल्हापूर, सांगली, मिरज, आदि संस्थाने, सातारा जिल्हा व कर्नाटकांतील काही भाग येथे फार तीव्रतेने आढळून आले. त्यास सुरवात पुण्यास व कोल्हापुरास झाली; व लगोलग जवळजवळ त्याच स्वरूपाचे प्रतिध्वनि दक्षिण महाराष्ट्रात सर्वत्र उमटले. यावरून इतरत्रच्या जाळपोळीच्या चळवळींची प्रेरणा पुण्यातील व कोल्हापुरांतील विविध घटनांकडे जात असल्याचे अनुमान करणे योग्य होईल.

असे म्हणण्याचे एक कारण असे की पुण्यातील ' राजकारणा ' ची छाया महाराष्ट्राच्या दक्षिण भागावर जशी पडलेली आहे तशी ती महाराष्ट्राच्या उत्तर भागावर पडलेली नाही. तेथे प्राय: मुंबईची छाया अधिक आढळून येते. त्या भागात वर्तमानपत्रे मुंबईची अधिक खपतात. मुंबईशी त्या भागाचे दळणवळणही अधिक आहे. कोकणासंबंधानेही काही प्रमाणात असेच म्हणता येईल.

मुंबईस जाळपोळ किंवा अतिरेकी दंगल फार झाली नाही. जी थोडी झाली ती सरकारने निग्रहाने बंद पाडली. त्याचाच परिणाम उत्तर महाराष्ट्रातही दिसून आला. तेथील सरकारी अधिकाऱ्यांनीही कडक धोरण स्वीकारले व जाळपोळ होऊ दिली नाही. लोकही सरकारचे हे धोरण लक्षात घेऊन शांत राहिले. त्याचप्रमाणे जर त्या वेळी दि. ३१ जानेवारीस पुण्यास व कोल्हापुरास दंगल झाली नसती, किंवा कोणी केली असती व अधिकाऱ्यांनी ती ताबडतोब व निग्रहाने दडपून टाकली असती, तसेच काँग्रेसश्रेष्ठींनी ज्या प्रकारची भाषणे या प्रसंगास उद्देशून केली तशी ती केली नसती, तर महाराष्ट्रात लोकक्षोभाचा जो ज्वालामुखी भडकला तो कदाचित् भडकलाही नसता असे पुष्कळांना वाटते.

जाळपोळ का केली ?

आम्हांपुढे ज्यांनी आपले अनुभव सांगितले त्यांनी, तसेच ज्यांच्याजवळ यासंबंधाने आम्ही विचारविनिमय केला, त्या बहुतेक सर्वांनी आपला असाच अभिप्राय व्यक्त केला आहे. एवढेच नव्हे तर जाळपोळीत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या व नंतर सरकारला क्षमापत्र लिहून देणाऱ्या एका गृहस्थाने आम्हांस असे सांगितले की " दि. ३० ला म. गांधींचा खून झाल्यावर पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी नभोवाणीवरून जे भाषण केले त्यातच जातीयवादाचा ताबडतोब नाश करण्यात आला पाहिजे अशा आशयाची जाहीर सूचना होती. हिंदुसभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या जातीयवादी संस्था आहेत. तेव्हा त्यांचा नाश करण्यात यावा असाच पं. नेहरूंचा लोकांना स्पष्ट आदेश होता. या आदेशाची अंमलबजावणी कोणी व कोणत्या मार्गाने करावयाची हे त्यांनी सांगितले नाही हे खरे; पण त्यामुळे ज्यांना जो मार्ग सुचला किंवा सुकर वाटला त्याचा त्यांनी अवलंब केला. पुणे व कोल्हापूर या ठिकाणी हिंदुसभावादी व संघीय लोकांची घरे अधिकाऱ्यांच्या डोळ्यांदेखत जाळण्यात आल्याच्या वार्ता प्रसिद्ध झाल्या होत्या, त्यावरून याच मार्गाचा अवलंब करण्याचे लोकांनी ठरविले तर त्यात त्यांची काय चूक ?

" लोकांनी जे केले ते काँग्रेस सरकारच्या व विशेषत: पं. नेहरूंच्या आदेशानुसार केले, आणि असे असता सरकार आता त्यांनाच पुन्हा दोष देत आहे ! "

या जाळपोळीला पं. नेहरूंच्या नभोवाणीवरील भाषणाने प्रथम चिथावणी मिळाली ही गोष्ट आम्हांस अनेकांनीही सांगितली. "जातवाल्यांचा समूळ नाश करा. असा काँग्रेस सरकारचा हुकूम आहे" असे कित्येक लोक अनेक दिवसपर्यंत मोटार लॉरीतून किंवा उघड्या ट्रक्समधून रस्त्याने हिंडून ओरडून सांगत असत व त्यामुळेच लोकांना जाळपोळीबाबत चिथावणी मिळाली. गांवोगावचे जबाबदार म्हणविणारे पुढारी जेव्हा तोल सोडून बोलतात, किंवा जबाबदार लोक जेव्हा उच्च स्थानावरून भावनावश होऊन बोलतात तेव्हा त्याचे परिणाम कसे होतात याचे नेहरूंच्या या घोषणेची जनमनावर झालेली प्रतिक्रिया हे एक उत्तम उदाहरण आहे.

"आता पुन्हा एखाद्या प्रसंगाचे निमित्त हुडकून जाळपोळीचे प्रकार केले जातील असे तुम्हांस वाटते काय" असा सदर 'पश्चात्तापदग्ध' गृहस्थास प्रश्न विचारला असता ते म्हणाले की "आता तसे होणार नाही. कारण सरकारच्या म्हणून त्या वेळी समजल्या गेलेल्या धोरणाबद्दल सरकार आता जे उपाय योजीत आहे त्यावरून ही गोष्ट सरकारला संमत नव्हती हे स्पष्ट झाले आहे. या धोरणाची अंमलबजावणी करणारांना सरकारने एक प्रकारे फशी पाडले आहे. त्यांना त्याबद्दल प्रायश्चित्त भोगावे लागले आहे!"

त्याचप्रमाणे दि. ३१ जानेवारी व दि. १ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्रांतून ज्या भडक वार्ता प्रसिद्ध झाल्या त्यांतूनही अशीच चिथावणी दिली गेली. तसेच अनेक काँग्रेस पुढाऱ्यांनी जी प्रक्षोभक भाषणे केली त्यामुळेही सार्वत्रिक लोकक्षोभाचा भयंकर भडका उडाला.

तथापि असे असताही हा प्रक्षोभ पुणे ते साताऱ्यावरून कोल्हापूर-बेळगांव पर्यंतचा जो टापू त्यातच विशेषत्वाने आढळून आला. पं. नेहरूंचे नभोवाणीवरील भाषण या भागांतील लोकांनी जसे ऐकले, तसेच ते इतर ठिकाणच्या लोकांनीही ऐकले होते. पण त्या योगाने ते अत्याचाराला प्रवृत्त झाल्याचे फारसे आढळून आले नाही. तसेच ज्या वृत्तपत्रांतून भयंकर अत्याचारांच्या बातम्यांची भडक वर्णने प्रसिद्ध झाली, त्यांच्यातूनही काही विशिष्ट टापूच्या बाहेर चिथावणी मिळाली नाही, किंवा तसे अत्याचार घडले नाहीत. यावरून हे दिसून येते की ज्या विशिष्ट भागात अत्याचाराला अनुकूल अशी परिस्थिति होती तेथेच, वाळल्या गवताला काडी लावावी तसा, भडका उडाला.

म्हणून या भागातील अत्याचारांचे स्वरूप लक्षात येण्यास येथील परिस्थितीचे ज्ञान अवश्य आहे. ह्या भागात गेल्या तीस चाळीस वर्षांत कोल्हापूर येथे उगम पावलेल्या व पुणे-सातारा जिल्ह्यात विस्तार पावलेल्या सत्यशोधक समाजाचा इतिहास लक्षात घ्यावयास पाहिजे. त्यासच पुढे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचे स्वरूप

आले व अजूनही ते कमी अधिक प्रमाणात तेथे आढळून येते. गांधी-वधोत्तर झालेल्या जाळपोळीत प्रायः ब्राह्मण समाजच बळी पडला (व त्यात कॉंग्रेसवादी ब्राह्मणांचाही समावेश होता.) यावरून त्या चळवळीचे ब्राह्मणविरोधी स्वरूप स्पष्ट होते.

आम्हांस असेही सांगण्यात आले की, या चळवळीत ब्राह्मणांचे जसे नुकसान झाले तसेच ते हिंदुसभावादी किंवा संघीय ब्राह्मणेतरांचेही झाले. हे खरेच आहे. तथापि महाराष्ट्रात सामान्यतः वस्तुस्थिति अशी आहे की, ब्राह्मणवर्ग प्रायः मनाने हिंदुसभावादी किंवा संघीय आहे तर कॉंग्रेसवादी ब्राह्मण फारच थोडे. तसेच हिंदुसभावादी ब्राह्मणेतरही थोडे आढळतात. त्यामुळे ठोकळ मानाने बोलावयाचे म्हणजे ब्राह्मण तेवढे हिंदुसभावादी किंवा संघीय असे समीकरण मानले गेले. याला अनेक ठळक अपवाद आहेत हे उघडच आहे. पण त्यांचे स्वरूप अपवादात्मकच समजावयाचे !

४२ वाल्यांची विचारसरणी

महाराष्ट्रात १९४२ ची म्हणून जी कॉंग्रेसची चळवळ प्रसिद्ध आहे ती याच भागात झालेली होती. कॉंग्रेसच्या नांवावर गुंडांचे जमाव संघटित करून लोकांना दहशत बसविणे, विरोधी माणसांना मारपीट करणे, पत्र्या मारणे, लुटालूट, जाळपोळ व खून करणे, हातपाय तोडणे, यांसारखी कृत्ये करणाऱ्या मंडळींच्या गुंडगिरीवर त्या काळी देशभक्तीचा अभ्रा चढविण्यात आला होता व अजूनही त्यांपैकी कित्येकांची कॉंग्रेस पक्षात केवढी चलती आहे हे पाहिले म्हणजे या भागातील जाळपोळीचा ग्रंथ सहज लावता येतो. हिंदुसभा व संघ यांच्या विरुद्ध कम्युनिस्टांच्या बरोबरीने कॉंग्रेसवाल्या मंडळींनी किती द्वेषपूर्ण व जहरी प्रचार चालविला हे लक्षात घेता त्या सर्वांनी या संधीचा फायदा कसा घेतला हे लक्षात येऊ शकेल.

या मंडळींच्या मते ब्राह्मण म्हणजे हिंदुसभावादी किंवा संघीय; या संस्था म्हणजे जातीय व त्यांचा समूळ उच्छेद करावयाचा म्हणजे या जातीच्या लोकांना नाहीसे करावयाचे. असा संकेत कॉंग्रेसच्या अनुयायांनी म्हणजे कॉंग्रेसनिष्ठ ब्राह्मणेतरांनी ऊर्फ बहुजन समाजाने मनाशी बाळगला, व त्याप्रमाणे ते वागले; तर काही ठिकाणी महात्माजींची अहिंसा पाळावयाची म्हणजे फक्त जीव घ्यावयाचा नाही, बाकी त्यांचे सर्वस्व नष्ट करावयाचे असे ठरविण्यात आले. पुणे, कोल्हापूर येथील लोकांनी या बाबतीत जे उदाहरण घालून दिले त्याचाच त्यांनी अन्यत्र अवलंब केला. जाळपोळ करणाऱ्या मंडळींचे वैचारिक अधिष्ठान या प्रकारचे होते. सन १९४२ साली ज्यांनी या भागांत ‘ लढा ’ केला त्यांचे त्या वेळचे ‘ चळवळीचे अहिंसात्मक ’ स्वरूपही वरील प्रकारचेच होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.

या जाळपोळीची वार्ता ऐकल्यावर एका फार मोठ्या जबाबदार व गांधीनिष्ठ कॉंग्रेसश्रेष्ठीने ‘ समाधान ’ व्यक्त केल्याचे जेव्हा आम्हांस समजले तेव्हा

सर्वसामान्य काँग्रेसवाल्यांच्या सत्य-अहिंसात्मक प्रवृत्तीचे सत्यस्वरूप काय, व महाराष्ट्रात हिंदुसभावाद्यांची व संघीयांची जाळपोळ एवढ्या मोठ्या प्रमाणात कां झाली याचा ग्रंथ आम्हांसही सहजच उलगडला !

चौकशी कां टळली ?

गांधीवधोत्तर जी सार्वत्रिक जाळपोळ झाली तिची चौकशी वास्तविक त्याच वेळी सरकारने करावयास पाहिजे होती. ब्रिटिश सरकारच्या अमदानीत असा एखादा प्रकार झाला असता तर त्याची कसून चौकशी केली पाहिजे असा आजच्याच (१९४९ सालच्या) राज्यकर्त्यांनी केवढा घोष केला असता याची कल्पना केली म्हणजे आजच्या काँग्रेस सरकारने या प्रकरणी चौकशी करण्याची टाळाटाळ कां केली याचे कोणासही गूढच वाटेल !

या अत्याचारांना सरकारने उत्तेजन दिले असे मुळीच म्हणता येणार नाही. तथापि हे खरे असले तरी स्थानिक अधिकाऱ्यांवर स्थानिक काँग्रेसश्रेष्ठींनी दडपण आणून त्यांस क्रियाशून्य व कर्तव्यभ्रष्ट केले हे तितकेच खरे आहे. खुद्द सरकारही प्रथम हतबुद्ध झाले, व त्यांनी गुंडांचा बंदोबस्त करण्याच्या कामी ढिलाई केली आणि शेवटी जेव्हा गुन्हयांच्या चौकशीची वेळ आली तेव्हा त्यांचे चटके कोणाकोणापर्यंत जाऊन पोहोचतील याचे भयानक स्वरूप त्यांना दिसू लागले तेव्हा चौकशीचा विचार कसा बाजूस पडला व शेवटी पक्षाचे ‘ राजकारण ’ आडवे येऊन चौकशीवर बोळा कसा फासण्यात आला याचा इतिहास ताजा असल्याने त्याची येथे पुनरुक्ति करण्याचे कारण नाही.

हा सर्व प्रकार पाहिला म्हणजे लोकांना आपले जीवित व वित्त अद्यापही असुरक्षित आहे असे कां वाटते याची कल्पना येऊ शकेल.

मुंबई प्रांतातील प्रदेशाबाबत सरकारने हे गुळमुळीत धोरण स्वीकारले खरे; पण कोल्हापूरच्या जाळपोळीबाबत हिंदुस्थान सरकारने मात्र चौकशी कमिशन नेमले व त्याची चौकशी होऊन “ कोयाजी रिपोर्ट ” बाहेरही पडला. कोल्हापूरप्रमाणेच सातारा, सांगली मिरज इत्यादि ठिकाणची अवस्था होती. सबब तेथील अत्याचारांचीही चौकशी व्हावी अशी स्थानिक मंडळींनी सरकारकडे विनंती केली असता सरकारने ती मान्य केली नाही. एवढेच नव्हे तर वेळोवेळी त्याबाबत सुचविले असताही ती टाळली. शेवटी तर जबाबदार काँग्रेसनेते असेही म्हणू लागले की कोल्हापूर येथे जो प्रकार झाला तोच सांगलीस झाला. माणसांची नांवे बदलली म्हणजे झाले. बाकी सर्व सारखेच ! मग आता चौकशी करून तरी हेच सिद्ध करावयाचे ना ? आम्ही ते गृहीतच धरून चालतो. आता सांगली–मिरज विलीन झाले असल्याने चौकशी करून वेगळे असे काय साधावयाचे आहे ?

यावरून कोल्हापूरची चौकशी कां झाली व सांगली–मिरजेकडील किंवा पुणे-सातारा जिल्ह्यांतील अत्याचारांची चौकशी कां झाली नाही याची काहीशी कल्पना येते. त्याचप्रमाणे कोल्हापूरची चौकशी तेथील अत्याचारांचे स्वरूप उघड करण्याच्या इच्छेच्या पोटी केवळ जन्मास आलेली असावी की विलीनीकरणास विरोध करणाऱ्यांना विलीन होण्यास प्रवृत्त करण्यासाठी असावी असाही संशय येतो. पण या ठिकाणी हे लक्षात ठेवावयास पाहिजे की, या दंगलीचा विलीनीकरणाशी वास्तविक काही संबंध नाही. कोल्हापुरास जशी दंगल झाली तशीच ती सांगली–मिरज भागात व खुद्द सातारा जिल्ह्यात व इतरत्रही झाली. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी खूनही पडले व माणसे जाळली गेली. हे सर्व प्रकरण इतके मोठे व इतके गंभीर होते व आहे की, या सर्व प्रकरणाची सरकारने कसून व उघड चौकशी करावयास हवी होती असे आम्हांस वाटते. आमची अशी खात्री आहे की, जर सरकार अजूनही या सर्व प्रकारांची चौकशी करील तर तीतून बाहेर पडणारी माहिती व मिळणारा अनुभव सरकारास पुढील धोरणे आखण्यास निःसंशय उपयोगी पडेल. केवळ कोल्हापूरच्या चौकशीने महाराष्ट्रातील एकंदर जाळपोळीमागील विविध प्रवृत्तींचे सम्यक् स्वरूप लक्षात येणार नाही.

आमच्या चौकशीचे क्षेत्र

आमच्या या चौकशीचे क्षेत्र सांगली, मिरज व काही भोवतालचा विभाग एवढ्यापुरतेच मर्यादित आहे. या विभागातील काही गावच्या लोकांनी आपल्या गावी घडलेल्या घटना आम्हांस सांगलीस येऊन सांगितल्या, त्यांचाही या वृत्तान्तात थोडा समावेश करण्यात आला आहे. हे सर्व वृत्तान्त परस्परांस पोषक, पूरक व सुसंगतच आहेत. एका ठिकाणच्या घटनांवरून जो निष्कर्ष काढावा, तोच सर्व ठिकाणी लागू पडतो व म्हणून एवढ्या चौकशीवरूनही या दंगलीचा सर्वसामान्य स्वरूपाचा काही निष्कर्ष काढणे शक्य आहे असे आम्हांस वाटते. हे निष्कर्ष काढण्यापूर्वी ज्या ज्या ठिकाणची माहिती आम्हांस उपलब्ध झाली ती प्रथम थोडक्यात निवेदन करून नंतर त्यांची चिकित्सा करणे योग्य होईल.

सांगलीस काय घडले ?

सांगली येथे दि. ३० जानेवारी १९४८ रोजी शुक्रवारी सायंकाळी ६ च्या सुमारास गांधीजींच्या वधाची वार्ता येऊन पोहोचली व लोकांवर सर्वत्र दुःखाची छाया पसरली. दुसरे दिवशी दि. ३१ रोजी सकाळी गांधीजींचा वध करणारा महाराष्ट्रीय ब्राह्मण हिंदुसभावादी व सांगली येथील हिंदुसभावाद्यांशी व संघीय मंडळींशी चांगला परिचित असल्याचेही स्पष्ट झाले. या घटनेमुळे येथील हिंदु

सभावादी व संघीय मंडळींना परमावधीचे दुःख झाले. दुपारी राजेसाहेबांनी गणपति मंदिरात दुखवटयाची सभा भरविली होती. तिला अनेक हिंदुसभावादी मंडळी उपस्थित होती. गावातील मंडळींनीही दुपारी शोकनिदर्शक मिरवणूक काढली व ती सायंकाळच्या सुमारास घाटावर विसर्जन पावली. या सभेत जी भाषणे झाली त्यांचा सूर दुःखावेगापेक्षा क्रोधाविष्कारावर अधिक होता. या सभेत संघ व हिंदुसभा यांच्याविरुद्ध अत्यंत बेजबाबदार व खोडसाळ चिथावणी देणारी भाषणे झाली.

गांधी-वधाच्या वार्तेमुळे आधीच वातावरण सर्वत्र प्रक्षुब्ध झालेले होते. पं. नेहरूंच्या नभोवाणीवरील घोषणेने त्याला चिथावणीचे स्वरूप प्राप्त झाले. कोल्हापूर येथे दि. ३१ रोजी दिवसभर झालेल्या जाळपोळीचे भडक, भयानक व फुगवून वाढविलेले वृत्त तेथून सांगलीस येणाऱ्या प्रत्येक आगगाडीबरोबर गावात पसरत होते. त्यामुळेही वातावरण फार प्रक्षुब्ध झाले होते. कोल्हापूरहून काही मंडळी ' संदेश ' घेऊन सांगली–मिरजेला आली असेही काहींनी आम्हांस सांगितले. नंतर दि. ३१ ला रात्री स्टेशनजवळील आवारात प्रचंड सभा भरली. तीत डॉ. देशपांडे यांचे जे भाषण झाले ते अत्यंत खोडसाळ, चिथावणी देणारे व अत्याचारांना उत्तेजक असे झाले असे अनेक काँग्रेस पुढाऱ्यांनीच आमच्याजवळ कबूल केले. सदर सभेच्या वेळी दोघा तरुणांना, ते संघाचे असावेत अशा समजुतीने बेदम मारण्यात आले. इतके की ते रक्तबंबाळ झाल्यामुळे त्यांस हॉस्पिटलमध्ये रवाना करावे लागले. केवळ काही जबाबदार काँग्रेस पुढाऱ्यांच्या प्रयत्नामुळेच त्यांचे प्राण वाचले असे त्यांजकडून आम्हांस समजले.

या जाहीर सभेनंतर काही खाजगी सभा झाल्या व तेथे बरेच ' गुप्तगू ' झाले. या सभेत हिंदुसभावादी व संघीय मंडळींची घरे जाळावीत अशा सूचना करण्यात आल्या. त्यास काही काँग्रेस प्रमुखांनी विरोध दर्शविला असला तरी याचा तेथे खल झाला हे खरे आहे; व जरी या सभेत जाळपोळीची तपशीलवार योजना ठरली नाही तरी येथून बाहेर जाऊन ती निश्चित करण्यात आली यातही संदेह नाही. त्यातील एका व्यक्तीला पुढे अटकही झाली.

पोलिसांना पूर्वसूचना

जाळपोळीची योजना आधी ठरली होती याचे एक गमक म्हणजे दि. ३१ च्या रात्रीच दुसऱ्या दिवशी उरकण्याच्या बेताची वार्ता बाहेर फुटली व एका जबाबदार गृहस्थाने पोलीस ठाण्यावर चिठ्ठी पाठवून त्याची माहिती त्यांना दिली व संरक्षणाची तजवीज करण्याची विनंति केली. तेव्हा पोलिस अधिकारी आपल्या वरिष्ठांना भेटून आले व बंदोबस्ताची व्यवस्था कशी ठेवावयाची याचा ' संदेश ' घेऊन आले. याच सुमारास १४४ कलम लावण्यासंबंधीचाही विचार झाला, पण

तो लावण्याची मुळीच आवश्यकता नाही असा 'वर' निर्णय घेण्यात आल्या-कारणाने त्या वेळच्या प्रमुख पोलिस अधिकाऱ्याने कसलाही बंदोबस्त न करता 'सब ठीक' चे धोरण आखले !

इकडे जी घरे जाळावयाच्या यादीत दाखल झालेली होती त्यांपैकी ज्या घरातील गुजराथी व जैन बिऱ्हाडकरूंना त्या बाबतचा सुगावा लागला त्यांनी आपली बिऱ्हाडे रातोरात हलविली व दारांना बाहेरून कड्या लावून टाकल्या असे मागाहून उघडकीस आल्याचे त्यांच्या घरमालकांनीच आम्हांस सांगितले. यावरून ही जाळपोळ पूर्वनियोजित होती याबाबत कसलीही शंका राहात नाही.

दुसरे दिवशी सकाळी ८ च्या सुमारास स्टेशनजवळ एका दुकानास आग लावण्यात आली. ती विझविण्यात आली, पण तोपर्यंत पेठ भागातील जोगांचा छाप-खाना, दांडेकर, भिडे वगैरे मंडळींची दुकाने एकामागून एक पेटविण्यात येत होती. या कामासाठी शेजारील पद्माळ, सोनी, सांगलवाडी, नांद्रे, इ. ठिकाणांहून बरीच मंडळी सायुध आली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. श्रीराम प्रेसच्या जोगांच्या मुलांनी बराच वेळपर्यंत दंगलखोरांचा प्रतिकार केला; पण समोर उभे असलेले पोलीस दंगलखोरांना हूं की चूं म्हणेनात किंवा जोगांच्या मदतीस कोणी येईनात! बराच वेळ प्रतिकार केल्यानंतर जेव्हा ते बेशुद्ध पडले तेव्हा त्यांस बाजूस सारून गुंडांनी जाळपोळीचा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पाडला!

विरोधाचे हे एक ठिकाण सोडले असता सामान्यत: लोकांनी गुंडांना कोठेही विरोध केल्याचे आढळून आले नाही. सांगलीत ब्राह्मण समाज थोडा नाही व त्यांच्या-तील तरुण मंडळींत गुंडगिरीचा प्रतिकार करण्याची ताकद नाही असेही नाही. तथापि असे असताही या वेळी अत्याचारांना प्रतिकार करण्यास कोणी पुढे आला नाही यांचे एक कारण ब्राह्मण समाजापैकीच एकाने गांधीजींचा खून केला, या गोष्टीच्या खेदाचे त्यांच्या मनावर दडपण इतके वाढले होते की त्यांचे मानसिक धैर्यच त्यामुळे नष्ट झाले व ते परिस्थितिशरण बनले असावेत. नाहीतर एरवी त्यांनी हे अत्याचार सहजी सहन केले नसते असे अनेकांनी आम्हांस सांगितले. पोलिसांची आपल्याला मदत मिळू शकत नाही या गोष्टीचाही त्यांच्या प्रतिकार-बुद्धीवर विपरीत परिणाम झाला असावा यात शंका नाही. गुंडांच्याजवळ हत्यारेही होती, व त्यामुळे परिणामकारक रीतीने प्रतिकार करणे अशक्य आहे अशीही त्यांची समजूत झाली असणे अगदी शक्य आहे. यावरून ब्राह्मणांनी किंवा हिंदुसभावाद्यांनी किंवा संघीयांनी गांधी-वधाबद्दल आनंद मानला किंवा पेढे वाटले असे विधान अनेक काँग्रेसवाले जे वारंवार व सरसकट करीत असतात ते किती खोटे, खोडसाळपणाचे व दुष्ट प्रवृत्तीतून निर्माण झालेले होते याची प्रचिती येते.

जाळपोळवाल्यांचे धोरण

ही जाळपोळ दि. १ ला सकाळी ८ पासून एकसारखी चालू होती. हातात यादी घेऊन टिपून घर घेतले जात होते. यादीत नसलेली घरे सोडून देण्यात येत होती. ज्या जैन-गुजरांच्या मालकीच्या घरांत ब्राह्मणांची दुकाने होती तेथे दुकानातील माल बाहेर रस्त्यावर काढून तो जाळण्यात येत होता. असे प्रकार सर्वत्र एकसारखे झाले आहेत. ही जाळपोळ चालू असता पोलिस लोक स्तब्ध उभे असत. त्यांनी दंगलखोरांना बाजूस सारण्याचा, किंवा दंगल थांबविण्याचा यत्किंचितही प्रयत्न केला नाही. सांगली येथील संरक्षण खाते नुकतेच श्री. कोरे या लोकनियुक्त मंत्र्याच्या हाती देण्यात आलेले होते. ते व त्यांचे सहकारी मंत्री व पोलिस अधिकारी, तसेच डॉ. देशपांडे, पाटणकर, वसंतराव पाटील, ताराचंद शहा, प्रभृति प्रजापरिषदेमधील पुढारी मंडळी गावात इकडून तिकडे हिंडत व चालू असलेली जाळपोळ स्वस्थ चित्ताने पाहात होती. प्रजापरिषदेच्या पुढाऱ्यांच्या धोरणानुसार मंत्री वागत असावेत असे उघड उघड दिसत होते. जाळपोळ करू नका असे त्यांच्यापैकी कोणीही सांगत नव्हते. त्यांच्या या वृत्तीचा अर्थ लोकांच्या ध्यानात येत होता.

हे काम अल्पावधीत उरकावे म्हणून गुंडांनी आपल्या तीन टोळ्या केल्या होत्या. एकीने पेठ भाग जाळला, दुसरीने जुन्या सांगलीत जाळपोळ केली, व तिसरीने इकडे काही आगी लावल्यावर गजानन मिल्स, आपटे व भिडे यांचे कारखाने जाळून टाकले. या जळितांत सांगलीचे एकंदर नुकसान सुमारे १५० घरांचे व सुमारे दीड कोट रुपयांच्या मालमत्तेचे झाले आहे!

गुंडांना आश्वासन !

पोलिस अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे ऐकत होते की नव्हते याबाबत पृच्छा करता त्यांनी न ऐकल्याचे एकही उदाहरण घडले नाही असे आम्हांस अधिकृतपणे सांगण्यात आले. लोकांचा जमाव पोलिसांच्या दटावणीला न भिण्याइतका प्रक्षुब्ध झाला होता असेही नव्हते. कारण एखाद्या ठिकाणी केवळ वायबार काढताच लोक धूम पळून जात असेही आम्हांस सांगण्यात आले. सांगलीच्या पोलिसांजवळ अश्रुवायु, बंदुका, मशीनगन्स इत्यादि सर्व संरक्षणविषयक तयारी भरपूर होती असेही जबाबदार अधिकाऱ्यांनी आम्हांजवळ सांगितले. गोळीबार करावा अशा सूचना करण्यात आल्या असता काँग्रेस पुढारी म्हणत की "छे, छे, तसे करू नका, आम्ही लोकांना परावृत्त करतो; पण गुंडांना दोन प्रहरपर्यंत कोणीही परावृत्त केले नाही. यावरून गोळीबार केला जाणार नाही असे आश्वासन देण्यात आलेले असावे असे त्यांच्या हालचालीवरून दिसून येत होते.

सारांश, प्रजापरिषदेचे पुढारी इकडून तिकडे हिंडत असताना, मंत्री येरझारा घालीत असताना, पुरेसे सशस्त्र पोलिस बळ अधिकाऱ्यांच्या हाताशी असताना,

हाती दारूगोळा, अश्रुवायु व इतर विविध साधने भरपूर असताना, वायबार काढताच लोक धूम ठोकीत अशी गुंडांची भ्याड वृत्ति अनुभवास येत असताना देखील गुंडांनी प्रजापरिषदेच्या पुढाऱ्यांच्या व मंत्र्यांच्या देखत दिवसा-ढवळ्या कित्येक घरांना, दुकानांना व कारखान्यांना आगी लावल्या, व लक्षावधि रुपयांचा माल लुटला व जाळला !

दुपारच्या सुमारास श्री. गोडबोले यांच्या घराकडे गुंडांचा घोळका गेला तेव्हा खुद्द श्रीमंत राजेसाहेब हे तेथे होते. त्यांच्याबरोबर मंत्रीही होते. बाहेर ५-५० पोलिस हातांत हत्यारे घेऊन उभे होते. पण गुंडांनी घर जाळण्याचा आग्रह धरला तेव्हा गृहखात्याच्या मंत्र्यांनी व इतर पुढाऱ्यांनी गुंडांचा बंदोबस्त करण्याऐवजी राजेसाहेबांना मागच्या दाराने बाहेर पडण्याचा संदेश दिला ! डि. मॅजिस्ट्रेटने गोळीबाराचा हुकूम केला असता त्यांचाच पाय ओढण्यात आला, व फक्त एक वायबार उडाल्याचा आवाज काय तो ऐकू आला. पण इतक्यात पोलिस पार्टी तेथून हलविण्यात आली व गोडबोले यांचे घर गुंडांच्या हाती पडून त्याची राखरांगोळी झाली !

हे घर जाळण्याच्या कामी सांगली संस्थानचे एक मंत्री श्री. पाटील यांच्या बंधूंनी विशेष पुढाकार घेतला होता. त्यांनी व त्यांच्या काही सवंगड्यांनी आता 'क्षमापत्र' लिहून देऊन आपली सुटका करून घेतली आहे ! यावरून ही जाळपोळ कां झाली, कोणी केली, कोणी करविली, त्यात भाग कोणी घेतला, सवलती कोणी दिल्या, कानाडोळा कोणी केला, या सर्व घटनांवर काही प्रकाश पडतो.

हा सर्व जाळपोळीचा प्रकार पाहून सांगली वाचविण्याकरिता सरकारकडे लष्कराची मागणी करण्यात आली. ते सायंकाळी ५-६ वाजता येणार असे दिसू लागताच ४ वाजता मोटारीतून कर्ण्यातून दौंडी पिटविण्यात आली की " वसंतराव पाटलांचा हुकूम आहे की कोणीही जाळपोळ करू नये, हातात हत्यार घेऊ नये, कर्फ्यूचा अंमल जारी केला जात आहे. जनतेने सावधान असावे."

एवढा प्रक्षुब्ध झालेला समाज, पण या घोषणेबरोबर एकदम स्तब्ध झाला व साताऱ्याहून पोलिस पार्टी येण्याच्या आधीच जिकडे तिकडे सामसूम झाले !

या जळितांतील अनेक उद्वेगजनक हकीकती आमच्या कानावर घालण्यात आल्या. त्या येथे द्यावयाच्या तर त्या फार प्रक्षोभक ठरतील व त्यांचा एक स्वतंत्र मोठा ग्रंथच होऊ शकेल ! सांगलीचे माजी स्टेट इंजिनिअर भावे यांचा वाडा जाळण्यात आला तेव्हा त्यांच्या घरातील मंडळींना शब्दशः " दे माय धरणी ठाय " झाले व घरातील माणसे उन्हातान्हात नदीत वाळवंटावर जाऊन बसली ! कित्येकांना अंगावरच्या कपड्याशिवाय काही राहिले नाही. ज्यांच्या घरी रोज चार-दोन नोकर काम करीत असत ते दुपारच्या दोन घासांना महाग झाले ! सारांश,

पाकिस्तानातून इकडे येणाऱ्या निर्वासित हिंदूंच्या ज्या प्रकारच्या कहाण्या आपण ऐकतो, तशीच अवस्था या लोकांची करण्यात आली ! विशेष दुःखाची गोष्ट ही की, हे वातावरण अजूनही पुरेसे बदलले आहे असे दिसत नाही.

ब्राह्मणांवर कटाक्ष

या जाळपोळीत ज्यांचे नुकसान झाले त्यांची नावनिशी पाहता हे दिसून येईल की ही जाळपोळ प्रायः ब्राह्मणांचीच झाली. इतरांपैकी एकादे दुसरे घर सापडले तर ते हिंदुसभावादी किंवा संघीय ब्राह्मणेतराचे तरी असेल किंवा जाळपोळ करणारांच्या गफलतीने चुकीने जाळले गेले असेल ! दोन जळक्या घरांच्या वेचकळीत सापडलेल्या घरांचाही विनाकारण नाश झाला अशीही एकदोन उदाहरणे आहेत.

ही जाळपोळ ज्यांनी करविली ती योजनापुरःसर होती यात आम्हांस कसलीच शंका नाही. इतक्या थोड्या वेळात, इतक्या पद्धतशीर रीतीने निवडक घरे शोधून, लुटीचे, जाळपोळीचे सर्व तंत्र यथासूत्र अमलात आणले गेले हे पूर्वयोजनेशिवाय अशक्य आहे. एवढेच काय जाळपोळवीरांची गटवार विभागणी करण्यात येऊन शिट्या वाजवून आदेश देण्यात येत होते व त्याप्रमाणे हालचाली घडत होत्या !

ही जाळपोळ घडवून आणणारांत केवळ मराठेच होते असे नाही. त्यांस 'ब्राह्मणेतर' हे नाव 'सार्थ' आहे. किंबहुना सांगली, मिरज भागांतील जाळपोळीत काही ठिकाणी मराठे जरी पुढे होते तरी वास्तविक पुढाकार जैन, लिंगायत व मुसलमान मंडळींचा होता. सामान्यतः असे म्हणण्यास हरकत नाही की, या भागातील 'राजकारण'-पराङ्मुख असा जो सर्वसामान्य समाज तो मात्र उदासीन होता व कित्येक ठिकाणी तर त्याने उदार मनाने ब्राह्मणांना आश्रय दिला ही वस्तुस्थिति आहे !

मग ही जाळपोळ कोणी केली ? ती करणारांचे पुढारी कोण व त्यांचे पाठीराखे कोण होते हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या संबंधाने अनेक लोकांशी विचारविनिमय करताना आम्हांस असे आढळले की या जाळपोळीत ती करण्यात व त्याबाबतच्या सर्व सूत्रबद्ध योजना आखण्यात या भागातील १९४२-प्रसिद्ध क्रांतिवीरांनी पुढाकार घेतला होता. त्यात मराठे होते, मराठेतर होते, लिंगायत होते, जैन होते, व मुसलमानही होते, एवढेच नव्हे तर त्यांत ब्राह्मणही होते. हे लोक या भागात ४२-वाले म्हणून प्रसिद्ध आहेत. पूर्वापार दरोडेखोर म्हणून जे प्रसिद्ध होते, त्यांना ४२ साली देशभक्तीची वस्त्रे चढविण्यात आल्यापासून त्यांनीही देशभक्तीच्या वेषाखाली गुंडगिरीचे तंत्र चांगल्या रीतीने हाताळले आहे. पूर्वी जोपर्यंत केवळ गुंड म्हणून त्यांची संभावना होत होती, तोपर्यंत त्यांना समाजात प्रतिष्ठा नव्हती; पण आता ४२ वाले म्हणून त्यांना लोकांत प्रतिष्ठा व सरकार

दरबारी मान व वजन प्राप्त झाले असून या भागातील कॉंग्रेस संघटनेत व समाज- वादी पक्षांत त्यांना विशेष प्राधान्य आहे! त्यामुळे ब्राह्मण म्हणजे हिंदुसभावादी व ब्राह्मणेतर म्हणजे ४२ चे वीर काँग्रेसवाले किंवा समाजवादी असे कमी अधिक प्रमाणात समीकरण मानले जाते.

जाळपोळ करून आपली जरब बसवावी व लुटालूट करून आपली तुंबडी भरावी हा या मंडळींचा सध्याचा कार्यक्रम असून सरकार दरबारी काँग्रेसश्रेष्ठी या नात्याने त्यांना भलताच भाव असल्यामुळे त्यांचे हे हेतु बऱ्याच प्रमाणात सिद्धीस जात आहेत व त्यामुळे सातारा व या भागातील ब्राह्मण लोकांना जीवित व वित्त यांची शाश्वती वाटेनाशी झाली असून त्यांच्यात निराशा व वैताग या वृत्ति विशेष प्रमाणात आढळून येतात.

विशिष्ट परिस्थिति

ही परिस्थिति या भागात सार्वत्रिक झाली असून स्थानिक परिस्थितीनुसार त्यात कमीअधिक चढउतार आढळून येतो. विशेषतः सांगलीस या परिस्थितीत ब्राह्मण–जैन यांच्यातील व्यावसायिक स्पर्धेने अधिक भर टाकली आहे. सांगलीस व लगतच्या भागात राजे ब्राह्मण, राज्ययंत्रातही अनेक प्रमुख जागी ब्राह्मणांचा भरणा अधिक, त्यामुळे त्यांची सामाजिक जीवनावर छापही अधिक होती. ती इतरांना असह्य वाटे. या ठिकाणचे जैन हे व्यापारात पुढारलेले, सर्वांत श्रीमंत व महत्त्वाकांक्षी असल्यामुळे श्रीमंतीने व वैभवाने कमी असलेल्या ब्राह्मणांचे येथे वर्चस्व असावे हे त्यांस खपत नसावे! तसेच अलीकडच्या काळात ब्राह्मण व्यापाऱ्यांनी व्यवसायांच्या विविध क्षेत्रांत व व्यापारात जे यश संपादन केले त्या योगाने इतरांच्यातील मत्सरबुद्धि वाढीस लागली. दक्षिण महाराष्ट्रात सांगली हे एक गाव असे आहे की व्यापार, कारखानदारी, शिक्षण इत्यादि सर्व क्षेत्रांत ब्राह्मण हे इतरांशी स्पर्धेत बरोबरीने व क्वचित् पुढे गेलेलेही आढळून येतात. यामुळे मूळच्या ब्राह्मणेतरी वादात ४२– वाल्यांच्या दहशतवादी आक्रमी व लुटालूट-बुद्धीची भर पडली व त्यातच त्यांस इतरांचा कोणत्या ना कोणत्या कारणामुळे गुप्त पाठिंबा मिळाल्यामुळे ही जाळपोळ सहजी होऊ शकली.

सांगली संस्थानच्या संरक्षण खात्याचे प्रमुख या वेळी श्री. कोरे हे होते. प्रजापरिषदेच्या पुढाऱ्यांच्या हातो प्रथमच सत्ता आली होती. कोल्हापूरप्रमाणेच येथेही त्या सत्तेचा अंमल गाजविण्याचा मोह त्यांस टाळता आला नसेल काय? श्री. कोरे हे लिंगायत गृहस्थ असून त्यांचा मोठा व्यापारधंदा कवठे महांकाळ येथून चालतो. त्यांच्या कंपनीच्या कित्येक मोटार ट्रक्समधून गुंडांच्या टोळ्या एका गावाहून दुसऱ्या गावी जाळपोळ व लुटालूट करीत गेल्या असल्याचे अनेकांनी

आम्हांस सांगितले. यावरूनही या जाळपोळीस सत्ताधाऱ्यांचे पाठराखीपण आहे अशी सामान्य जनांची समजूत झाली असली तर त्यात नवल नाही!

सारांश, म. गांधींचा खून झाला, तो एका ब्राह्मणाने केला, तो हिंदुसभावादी होता, हिंदुसभा व संघ या जातीय संस्था आहेत, व त्या चिरडून टाकल्या पाहिजेत अशी पं. नेहरूंनी नभोवाणीवर घोषणा केली व त्यास अनुसरून पुण्यास काँग्रेसजनांनी हिंदुसभावादी व संघीय मंडळींची घरेदारे व कारखाने जाळले, त्यांस पोलिसांनी प्रतिकार केला नाही, यावरून हे धोरण सरकारला अभिप्रेत आहे असे लोक समजून चालले. कोल्हापुरात मंत्रिमंडळातील लोकांनीच जाळपोळीला उत्तेजन दिले असल्याच्या वार्ता आल्या, वृत्तपत्रांतून दंग्याबाबतच्या ज्या भडक वार्ता प्रसिद्ध झाल्या व अत्याचारांची जी खुलावट करण्यात आली त्याने प्रक्षुब्धतेत भरच पडली व तशातच काँग्रेस प्रमुखांनी अत्याचारांना चिथावणी देणारी भाषणे करून या संतप्त वातावरणास काडी लावून दिली! त्यामुळे "एकैकमप्यनर्थाय, किमु तत्र समुच्चयः" अशी परिस्थिति निर्माण झाली. त्यातूनही ही जाळपोळ इतकी सार्वत्रिक झाली नसती. पण ४२ चे तंत्र आत्मसात् केलेल्या देशभक्त दरोडेखोरांच्या सशस्त्र टोळ्या या वेळी पुढे आल्या व त्यांनी या परिस्थितीचा फायदा घेऊन जागोजाग लुटालूट करून जाळपोळ केली. ही जाळपोळ फक्त हिंदुसभावादी व ब्राह्मण यांच्यापुरतीच मर्यादित असल्याने इतर समाज तटस्थ राहिला. त्यामुळे व सरकारी राज्ययंत्राचा व त्यातील जबाबदार पुढाऱ्यांचा त्यांस प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष पाठिंबा असल्याने ती इतक्या थोड्या कालावधीत व इतक्या विस्तृत क्षेत्रात इतक्या तडकाफडकी होऊ शकली.

या जाळपोळीत सर्व जातीचे लोक होते हे दर्शविणारा पुरावा पुष्कळच आहे. श्री. गोडबोले यांचे घर ज्यांनी जाळले त्यांच्या लेखी कबूली जबाबातील काही महत्त्वाच्या उताऱ्यांवरून अनेक गोष्टी स्पष्ट होतात. उदा. श्री. भालचंद्र अनंत जोग, राहणार सांगली, वय २०, जात ब्राह्मण धंदा तूर्त काही नाही हे गोडबोले यांना लिहून देतात :

"सांगली शहरात ता. १-२-१९४८ रोजी जी जाळपोळ झाली, त्या जाळपोळीत मी भाग घेतला होता. तुमच्या सांगली येथील घर नंबर ५११ चा वाडा सर्व सामानासुमानासहित मी व माझे सहाध्यायी (१) नेमगोंडा दादा पाटील (२) जिनपाल खोत (३) नेताजी पाटील व इतर लोक यांनी मिळून आग लावून जाळला. त्यामुळे तुमचे लाख रुपयांचे नुकसान झाले. मला घरच्या माणसांची सहानुभूति नाही व मजकरता कोणी खटपट करणारे नाही. मी लोकांच्या सांगण्यावरून हे कृत्य केले आहे. ही केवळ हूल उठली असे नसून मी ब्राह्मण म्हणून मूर्खपणाने ब्राह्मणांची घरे जाळली. त्यामुळे अत्यंत दुःख व खेद होत आहे व पश्चा-

त्ताप झाला आहे. मी गुन्हेगारी केल्याचा मजवर फौजदारी कज्जा चालू आहे. दिवाणी दावा तुम्ही करणार होता, परंतु मी माझे वडिलांना तगादा लाविल्यामुळे त्यांनी मजवरील दिवाणी जोखमीसाठी तुम्हांस दोन हजार रुपयांचा नं. २२८६९८ चा न्यू सिटिझन बँकेचा चेक दिला आहे. त्याचा स्वीकार व्हावा आणि आपणांस अशी विनंती आहे की, मजवरील फौजदारी फिर्याद मजपुरती काढून घेण्यास संमति द्यावी व मजवर कृपा करावी. मी आता यापुढे असले कोणतेही वाईट कृत्य करणार नाही. लिहून दिले. तारीख ३०।११।४८.

दुसरे गृहस्थ श्री. नेमगोंडा दादा पाटील हे सांगली संस्थानचे एक मंत्री श्री. पाटील यांचे बंधु आहेत. जात जैन, वय ३८, धंदा व्यापार सांगली हे लिहून देतात : " 'सांगली शहरात ता. १।२।१९४८ रोजी जी जाळपोळ झाली व त्या जाळपोळीत आपला म्यु. घर नंबर ५११ चा वाडा सर्व सामानासुमानासहित जाळला गेला. त्या जाळपोळीत इतरांबरोबर मी भाग घेतला होता. त्यामुळे आपले एक लाखावर नुकसान झाले आहे. याबद्दल मला अत्यंत दुःख व खेद होत आहे. पश्चात्ताप झाला आहे. मी गुन्हेगारी केल्याचा मजवर फौजदारी खटला चालू आहे. मजवर आपण दिवाणी दावा अलाहिदा करून नुकसान मागणार होता, याबद्दल मी आपणांस तडजोडीने नुकसानीची अंशतः फेड म्हणून सव्वीस हजार रुपये दिले आहेत, त्यांचा स्वीकार व्हावा आणि मजवरील फौजदारी फिर्याद मजपुरती काढून घेण्यास संमति द्यावी. असे केल्याने आपले मजवर फार उपकार होतील. श्री. बापूभाई रतनचंद शहा यांचेकडून आपणांस रुपये २६००० देवविले असल्यामुळे तशी पोच द्यावी.

अशाच आशयाची क्षमापत्रे श्री. नेताजी आबा पाटील व जिनपाल दादा खोत यांनीही लिहून दिली आहेत. या जाळपोळीच्या संबंधात ज्यांनी क्षमापत्रे लिहून दिली अशांपैकी एकाने आमच्याजवळ पुढील आशयाचे निवेदन केले :

" म. गांधींच्या खुनानंतर पं. नेहरूंचे जे नभोवाणीवर भाषण झाले, त्यात त्यांनी जातीयवाद्यांचा समूळ उच्छेद करा, त्यांची पाळेमुळे खणून काढा अशी घोषणा केली होती. ता. १।२।४८ च्या नेता पत्रात (हे कूपवाड येथे प्रसिद्ध होत होते.) कोल्हापूर येथील जाळपोळीची व भालजी पेंढारकर याचे हातपाय तोडल्याची भयंकर वार्ता भडकपणे देण्यात आली होती. पुण्यासही जाळपोळ झाल्याचे वृत्त त्याच दिवशी येथे हाती आले. जाळपोळ करणारांचा सरकारने किंवा पोलिसांनी कोठेही प्रतिकार केला नाही. उलट जातवाल्यांचा समूळ उच्छेद करा अशा घोषणा काँग्रेस पुढारी करीत होते. कोल्हापूरची जाळपोळ मंत्र्यांच्या डोळ्यादेखत झाली. सांगलीस देखील त्याचेच अनुकरण झाले. डॉ. देशपांडे, वसंतराव पाटील, ताराचंद शहा प्रभृतींच्या प्रेरणेने येथील अत्याचार झाले. आमच्या

अज्ञानाचा फायदा घेऊन या पुढारी मंडळींनी आम्हांस अत्याचारांस प्रवृत्त केले व आपण मात्र बाजूस राहिले. जाळपोळ चालू असता मंत्री हिंडत होते. त्यांच्याबरोबर डॉ. देशपांडे व वसंतराव पाटील हेही होते. पण त्यांच्यापैकी कोणीही कोणासही जाळपोळ करू नका असे सांगितले नाही. "

ही सर्व मंडळी ४२ – प्रसिद्ध देशभक्त क्रांतिवीर आहेत हे ध्यानात घेण्यासारखे आहे !

मिरजेची दंगल

सांगलीच्या खालोखाल मिरज येथे नुकसान झाले. सांगलीप्रमाणेच येथेही दि. १ फेब्रुवारीसच सकाळी ८ वाजल्यापासून दंगलीला सुरवात झाली. तिची पार्श्वभूमि दि. ३१ ला रात्री जी दुखवटयाची सभा बॅ. कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती त्या सभेतील भाषणांनी तयार केली. तत्पूर्वी कोल्हापूर येथील अत्याचारांचे वृत्तान्त येथे येऊन पोहोचले होते. स्थानिक राष्ट्रसेवादलातील मुले " ब्राह्मण कसाई आहेत " असे ओरडत होती. सभेचा एकंदर सूर प्रक्षोभक व चिथावणी देणारा होता. सभेहून रात्री जे लोक घरोघर गेले त्यांना उद्या काय होते याची धाकधूक व भीति वाटत होती.

रात्री एका स्थानिक पुढाऱ्याच्या घरी सभा होऊन जाळपोळीचा कार्यक्रम ठरला; व त्याप्रमाणे दुसरे दिवशी दि. १ ला सकाळी ८ वाजल्यापासून दंगलीस सुरवात झाली. मॅजिस्ट्रेटने १४४ कलमाखाली जमावबंदीचा हुकूम काढला, पण पोलीस पुरेसे नसल्यामुळे तो कागदावरच राहिला. पोलीस व अधिकारी अगदीच अननुभवी होते. पोलिसांची संख्याही पुरेशी नव्हती. सकाळी ९ च्या सुमारास सराफकट्टयावर लुटालूट व जाळपोळीस सुरवात झाली. त्याच्या आधीच खुद्द पोलिस अधिकाऱ्यालाच दगडाचा मार बसून तो जखमी होऊन हॉस्पिटलमध्ये जाऊन पडला.

सरकारी बंदोबस्त आधीच बेताचा, त्यांत ही स्थिति, त्यामुळे सर्वत्र दंगेखोरांना मोकळे रान सापडले. भानुतालमीतील लोकांनी थोडा प्रतिकार केला, व एकाजवळ बंदूक होती तिचाही त्याने उपयोग केला. त्यामुळे दंगेखोर जरा पांगले. पुढे डि. मॅजिस्ट्रेटनेही जमावांना पांगण्यास भाग पाडण्यासाठी हवेत गोळीबार करविला. त्यामुळे जमाव पूर्णपणे पांगून थोडा वेळ सर्वत्र शांतता झाली.

सकाळी झालेल्या जाळपोळीत फक्त ब्राह्मणांचीच घरे जाळण्यात आली. जाळणारांत मुसलमानांनी प्रामुख्याने भाग घेतला होता.

तथापि सकाळी इतकी जाळपोळ झाली असताही ब्राह्मण प्रतिकारास पुढे येतात यामुळे या मंडळींचे पित्त खवळले व त्यांनी म्यु. मोटारी पाठवून मालगांव

येथून सशस्त्र गुंडाची कुमक आणली. हे गांव ४२-वाल्याचे म्हणून प्रसिद्ध आहे. दुपारी ३ च्या सुमारास तेथील लोक हत्यारांनिशी येऊन दाखल झाले; त्यांच्याजवळ बंदुका, तरवारी, भाले, जंबिये, पिस्तुले इत्यादि सर्व प्रकारची शस्त्रे होती. आपण शांतता प्रस्थापित करणार आहो असे तोंडाने म्हणत ते रस्त्यांतून मिरवणूक काढू लागले. बॅ. कुलकर्णी प्रभृति लोक मिरवणुकीच्या अग्रभागी होते. जेव्हा ही मिरवणूक ब्राह्मणपुरीतून जाऊ लागली तेव्हा यादीबरहुकूम ब्राह्मणांची घरे टिपून जाळण्यात येऊ लागली. त्यांतल्या त्यांत संघीय व हिंदुसभावादी व सधन ब्राह्मण मंडळींवर गुंडांचा विशेष डोळा होता.

एकामागून एक घरे भराभर जळू लागली तेव्हा बायका–मुलांना घेऊन कित्येकांना या घरातून त्या घरात व त्या घरातून पलीकडच्या घरांत असा एकसारखा पळ काढावा लागला. घरातील मुलामाणसांची ताटातूट झाली. कोण कोठे आहे याचा पत्ता लागेना. अशा स्थितींत सुमारे ३०० स्त्रिया व मुले उघड्यावर शेतात जाऊन बसली. नंतर रात्री त्यांना रामाच्या मठात आश्रय मिळाला. कित्येक मराठ्यांनी त्यांस साहाय्य केले व धीर दिला ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

येथील जाळपोळीत डॉ. भडकमकर यांचा वाडा, श्री. धुंडिराज पटवर्धन यांचे घर, विद्यामंदिर हायस्कूलची इमारत आयडोमॅक्सचा कारखाना, देवल, महाबळ, वाटवे, आगाशे, करमरकर, डॉ. गोखले इ. अनेकांची घरे जाळण्यात आली. जाळलेल्या व लुटलेल्या घरांची एकंदर संख्या सुमारे ६५ असून एकंदर नुकसान ५० लाखांच्यावर झाले आहे.

येथील जाळपोळ सकाळी प्रायः स्थानिक काँग्रेस पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक मुसलमानांनी केली, व दुपारी मात्र मालगावाहून सशस्त्र गुंडलोक शेकड्यांनी आल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखाली जाळपोळीचे काम जोरात सुरू झाले. ते सर्व शिस्तशीर शिट्या वाजवून व हत्यारांच्या जोरावर झाले. प्रथम माल लुटावा, सोनेचांदी, नोटा काढून घेतल्यावर बाकीचा माल बाहेर फेकून द्यावा व रॉकेल व पेट्रोल किंवा वैरण यांच्या साहाय्याने घरे पेटवून द्यावी, असा प्रकार चार तासपर्यंत अविरतपणे चालू होता. मुख्य प्रधान डॉ. गोखले त्या दिवशी गावातच नव्हते. पोलिस अधिकारी जखमी होऊन हॉस्पिटलमध्ये पडले होते. खुद्द पोलिसांची संख्या इतकी थोडी होती की, मालगावाहून आलेल्या जमावापुढे त्यांचा निभाव लागणे शक्यच नव्हते. काही पोलीस राजवाड्याच्या संरक्षणार्थ तिकडे गुंतले होते. रात्री १०।११ पर्यंत हा धुडगूस चालला होता. पुढे कोल्हापूरहून लष्करी शिपायांची तुकडी आली तेव्हा लोकांच्या जिवात जीव आला, व दुसरे दिवसापासून सर्वत्र सामसूम झाले. मिरजेतील बॅ. कुळकर्णी, बाबगोंडा

पाटील, बिरोजे, पेंटर पाटील, मळवाडे, शंकरराव गाढवे, गंगावनवाले मास्तर, बाबू कबाडे, हनीफ बुकसेलर, बाबालाल, बुवा पवार, प्रभृति मंडळी या दंगलीत पुढाकार घेत होती असे अनेकांनी आम्हांस सांगितले.

कुरुंदवाड येथील हकीकत

कुरुंदवाड येथील जाळपोळीची हकीकतही सांगली–मिरज येथील प्रकारांशी सर्वस्वी जुळती अशीच आहे. येथेही दि. १ फेब्रुवारीसच सकाळी ८ वाजल्यापासून दंगलीस सुरवात झाली. गावात अस्थिर वातावरण दिसू लागल्यामुळे डॉ. फडणीस यांनी संस्थानचे कारभारी श्री. कोइमतूर यांना परिस्थिति निवेदन केली. त्याआधीच गावात श्री. गणपतराव फाटक वकील यांना मारहाण करण्यास सुरवात झाली होती. त्यांनी पेढे वाटले असे त्यांजवर खोटे बालंट घेण्यात आले. थोड्या वेळाने डॉ. फडणीस (संघचालक) यांच्या दवाखान्याचीही नासधूस करण्यात आली. पोतदार, परांजपे (डि. मॅ. परांजपे यांचा मुलगा) इत्यादि तरुणांना बडविण्यात आले. सरकारी अधिकाऱ्यांनी लोकांना शांत राहण्याचा परोपरीने उपदेश केला. गावातील पुढाऱ्यांची सभा घेण्यांत आली. मंत्री दुगे यांनी भाषण केले. स्थानिक काँग्रेसचे अध्यक्ष बिडकर हेही बोलले व कसे तरी करून वेळ मारून नेण्यात आली. पण परिस्थिति बिघडत चालल्याचे अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्याकारणाने त्यांनी १४४ कलम पुकारले.

यामुळे दंगेखोरांच्या हालचालींना थोडा पायबंद बसला. तथापि त्यांची एक सभा डॉ. टोळ यांच्या जागी भरली. हे एक समाजवादी गृहस्थ असून त्यांच्या आततायी वागणुकीबद्दल बेळगाव जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांना जिल्ह्याबाहेर हद्दपार केले होते. त्यामुळे त्यांनी कुरुंदवाडला आपले ठाणे दिले होते. ४२ बाले पुढारी म्हणून ते येथे प्रसिद्ध होते. त्यांच्या येथे भरलेल्या सभेत ब्राह्मणांची घरे जाळावयाची योजना निश्चित झाली. पण १४४ कलमामुळे जमाव करणे अवघड झाले. म्हणून आप्पाण्णा कटेकरी (हा तंबाखूचा एक स्थानिक व्यापारी आहे.) अधिकाऱ्यांकडे व श्रीमंत राजेसाहेबांचेकडे जाऊन "१४४ कलम मागे घ्या, नाही तर त्याचा परिणाम ठीक होणार नाही" अशा त्यांस धमक्या देऊ लागला. हा इसम दि. १ ला सकाळीच कोल्हापुराहून आला होता. नरसोबावाडी येथील लोकांस उद्देशून त्याने असे उद्गार काढले होते की, "सांगली अर्धी जळाली, मिरजही बहुतेक सर्वच पेटले आहे व इकडे माणसे पाठवून दिली असूनही अजून थंड कसे ? मी कोल्हापूरच्या कालच्या मीटिंगला हजर होतो. त्या मीटिंगमध्ये ब्राह्मणांची सगळी घरे पेटवावयाची ठरली आहेत. पण येथे काहीच दिसत नाही ! तुम्ही गप्प कां बसला आहांत ?" यावरून या सर्व घटनांमागील पूर्वयोजना उघड दिसून येते.

पुढे या योजनेप्रमाणे दुपारी १-२ च्या सुमारास मळचात असलेला दि. ब. कुलकर्णी याचा बंगला जाळण्यात आला. तथापि गावांत कशीबशी शांतता टिकून होती. संध्याकाळी ५ च्या सुमारास गांवाबाहेर (१४४ कलमाचा अंमल गावापुरताच होता.) सभा भरविण्यात आली. आप्पा मगदुम हा अध्यक्ष होता. सभेत अत्याचारांना चिथावणी देणारी भाषणे झाली व नंतर लोक गांवात शिरले. यांत बाहेरगावचेही काही लोक होते.

सायंकाळी ५-६ च्या सुमारास संरक्षण खात्याचे प्रधान श्री. दुगे यांच्या सांगण्यावरून ब्राह्मण मंडळींपैकी ज्या ५-७ जणांना हत्यारांचे परवाने होते, त्यांच्याजवळील हत्यारे काढून घेण्यात आली. त्यामुळेही गुंडांना अधिकच फावले. पूर्वयोजनेनुसार अंधार पडू लागताच गुंडांनी जाळपोळीस सुरवात केली. प्रथम राजा फाटक यांचे दुकान फोडण्यात व लुटण्यात आले व त्यास आग लावण्यात आली. त्यांच्या मागोमाग जाळपोळीचे सत्र सुरूच झाले. पोलिसांनी प्रतिकार केला. पण त्यांचे नुसते कोणी ऐकेना. शेवटी डि. मॅ. श्री. परांजपे यांच्या सांगण्यावरून पोलिस अधिकारी श्रीः बाजीराव जोशी यांनी गोळीबार केला. त्यांत एक इसम ठार व दोघे जखमी झाले. गोळीबारामुळे जमाव पांगला, पण तो शेजारच्या घरांतून घुसला व त्याने दगडफेक सुरू केली. इतक्यातच तेथे येऊन पोचलेल्या राजेसाहेबांनी शांतता निर्माण व्हावी या हेतूने पोलिसांना मागे घेतले व लोकांना शांत राहण्याचा उपदेश केला. पण त्याचा उपयोग झाला नाही. पोलिस मात्र काढून घेतले गेले. त्याचा परिणाम असा झाला की गाव गुंडांच्या ताब्यात जाऊन डि. मॅ. परांजपे व पोलिस अधिकारी बाजीराव जोशी यांना लपून बसण्याची पाळी आली. गुंडांनी काही ठिकाणी पोलिसांच्या हातांतील बंदुकाही हिसकावून घेतल्या व रात्री १ वाजेपर्यंत ब्राह्मणांची ५३ घरे जाळली व लुटली. या दंग्यांत ब्राह्मणांचे एकंदर नुकसान सुमारे १५ लक्षांवर झाले.

ही जाळपोळ एका विचित्र परिस्थितीमुळे थांबली. नाही तर ती कोठवर गेली असती हे सांगणे कठीण आहे. रात्री १०-११ च्या सुमारास दंगेखोरांनी डॉ. फडणीस यांची मोटार बाहेर काढली व ती जाळण्यासाठी तीवर पेट्रोल शिंपडण्यात आले. ते पेटवताच मोटार जळू लागली. पण या उद्योगात एकदोन माणसेही भाजली. या प्रकारामुळे दंगेखोरांचे लक्ष जाळपोळीकडून निघून या भाजलेल्या मंडळींना वाचविण्याकडे लागले. त्यामुळे त्यांचे जाळपोळीचे सत्र बंद पडले.

दुसरे दिवशी मृताची प्रेतयात्रा काढण्यात आली व तीत साऱ्या ब्राह्मणांना मुद्दाम तिच्या बरोबर यावयास भाग पाडण्यात आले. दहनापूर्वी भाषणेही अत्याचारांना चिथावणी देणारी झाली.

जाळपोळीवर प्रकाश

या जाळपोळीवर ती करणारांनी स्वतःच प्रकाश पाडला आहे. स्थानिक समाजवादी पक्षातर्फे शनिवार दि. १४।२।४८ रोजी श्री. देवधर यांच्या अध्यक्षते-खाली मारुती मंदिरासमोर जाहीर सभा भरविण्यात आली होती. तीत आप्पा मगदूम, डॉ. टोळ, व पैलवान मतवाल प्रभृतींची भाषणे झाली. ही सर्व भाषणे दि. १ फेब्रुवारीच्या घटनेवर चांगला प्रकाश पाडणारी आहेत.

श्री. मगदूम म्हणाले : " महात्मा गांधींच्या खुनाचा बदला घेण्याचा आम्ही अनुसरलेला म्हणजे जाळपोळीचाच मार्ग बरोबर आहे. ब्राह्मण वर्गाची पोटे फुगली आहेत, भांडवलशाही माजली आहे. त्यांचा नायनाट करून आम्हांस शेतकरी कामकरी वर्गाचे राज्य स्थापन करावयाचे आहे.

" ब्राह्मणांनी कारवाई करून कट करून म. गांधींचा खून केला. हा कट उधळून त्यांचा पुरा बंदोबस्त करण्यासाठी आम्ही डॉ. फडणीस, फाटक, गानु, मुळे, परांजपे वगैरेंची घरे जाळली. त्यांनी पाप केले त्याचा बदला त्यांना मिळाला तो बरोबर आहे. आम्ही ही गोष्ट विचारपूर्वक केली आहे व आमच्या देखरेखी-खाली व आमच्या सांगण्याप्रमाणे ही जाळपोळ झाली आहे."

ते पुढे म्हणाले : " अजूनही बदला पुरा झालेला नाही. ज्या बाजीराव फौजदारांनी आमच्या गोपाळाला गोळी घातली त्याचे धिंडवडे आम्ही उडविल्या-शिवाय राहणार नाही. ते बायकासारखे लपून राहिले आहेत. परंतु आज ना उद्या ते दिसतीलच. त्यांना व्यंग करून नाक, कान, पाय तोडून त्यांची गाढवावरून धिंड काढू तेव्हा आमचे समाधान होईल. समाजवादी पक्षाचा विजय असो ! "

बाजारपेठेतील इतरांच्या संबंधाने ते आपल्या भाषणात म्हणाले : "बाजारपेठ आमच्या तडाख्यातून सुटली असे समजू नका. तूर्त ते आम्हांस पैसे देत आहेत व तसे सबळ कारण आमच्या जवळ नाही म्हणून आम्ही त्यांना त्रास दिला नाही."

डॉ. टोळ आपल्या भाषणात म्हणाले : " कुरुन्दवाडात जातीयवादाने पछाड-लेल्या ब्राह्मणांची घरे आम्ही जाळली यात काही मर्दुमकी, पुरुषार्थ नाही असे काही लोक सांगतात, आम्हांला ते गुंड म्हणतात. पण आम्हांला गुंड म्हणणारेच गुंड आहेत. आम्ही त्यांची नुसती घरे लुटून जाळून स्वस्थ राहणार नाही. त्यांची पाळेमुळे खणून त्यांना नष्ट करणे हे आमचे पुढील काम आहे."

डॉ. टोळ पुढे म्हणाले : " म. गांधींच्या खुनाविरुद्ध आम्ही ब्राह्मणांची घरे जाळली ती जाणून बुजून जाळली हे आम्ही छातीठोकपणे कबूल करतो. भीत नाही. बांगड्या भरून लपून राहण्याची अहिंसा म. गांधींनी आम्हांला शिकविली नाही. म. गांधींच्या चितेचा धूर ज्यांनी काढला त्यांच्या घराचा धूर, दौलतीचा

धूर आम्ही काढला. यात अन्याय नाही. याला कोणी गुंडगिरी म्हणतात. ते भित्रे आहेत. भित्रेपणाने राज्य चालणार नाही."

ते पुढे म्हणाले : "कालच्या सभेत मिळालेली लूट परत करा म्हणून कमिटी नेमली आहे. तुम्ही आम्ही नेलेला माल परत करू; पण तो सर्व शेतकरी कामकरी वर्गाकरताच उपयोगी पडेल याची काळजी घेतली पाहिजे."

जाळपोळ करणाऱ्या पुढाऱ्यांची मनोगते काय होती यावर त्यांच्या वरील उद्‌गारांनी चांगला प्रकाश पडतो. त्यावर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

या दंगलीबाबतच्या निरनिराळ्या गुन्ह्यांबद्दल चोवीस लोकांना चार वर्षांच्या शिक्षा झाल्या आहेत. या शिक्षा झालेल्या आरोपींत कुरुन्दवाड येथील जैन समाजाचे पुढारी व कुरुन्दवाडचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. गुंडाप्पा दुगे यांचा मुलगा असून त्याला तीन वर्षांची शिक्षा झाली आहे.

आरोपींनी जाळपोळीनंतर स्वतःचे राज्य स्थापन केल्यासारखे केले होते व त्यांच्याविरुद्ध पुरावा होणेही कठीण होते. शाळेत जाणाऱ्या ब्राह्मण मुलांना व हायस्कूलमधील शिक्षकांनाही मारहाण झाली म्हणून शाळेत जाता येताना पोलिस बंदोबस्त देण्याची व्यवस्था कुरुन्दवाडचे अॅ. ॲडमिनिस्ट्रेटर मि. रणसुबे व फौजदार मि. मुल्ला यांनी केली. सुमारे दोन महिन्यांपर्यंत बायकामुलांना रस्त्यांतून फिरणेही धोक्याचे झाले होते. ही सर्व परिस्थिति मुंबई सरकारला व हिंदुस्थान सरकारला वेळोवेळी कळविण्यात आली. काही गुंड लोकांना अटक करण्याकरिता जेव्हा होम इन्स्पेक्टर मि. जितुरी हे पोलिस पार्टी घेऊन कुरुंदवाडास आले होते तेव्हा त्यांना गुंडांकडून प्रतिकार झाला व त्यांच्या मोटारीवर दगडफेक करण्यात आली. त्यानंतर क्रि. प्रो. को. कलम १४४ प्रमाणे जमावबंदी व सुमारे महिनाभर कर्फ्यू जारी करण्यात येऊन जादा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तथापि गावात पुढे पाच सहा महिने परिस्थिति भीतिदायकच होती.

या जाळपोळीसंबंधी रा. महावीर दुगे यांनी आपला एक स्नेही रा. महादेव कृष्णा मगदूम यास जाळपोळीनंतर दोनतीन दिवसांत एक पत्र पाठविले असून ते उद्‌बोधक असल्याने पुढे दिले आहे. सदर महावीर यांचे वडील हे कुरुंदवाड संस्थानात त्या वेळी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व कलेक्टरच्या हुद्द्यावर होते. मंत्री रा अण्णासाहेब दुगे यांचे ते चुलते होत. ते पत्र असे :–

प्रिय मित्र महादेव यांस

सर्वांचा जयहिंद. शुक्रवारी रात्री ६॥ वाजता गांधीजींचे निधनाची वार्ता रेडिओवरून समजल्यावर आम्हांस फार दुःख झाले. दुसऱ्या दिवशी ४ वाजता आम्ही सर्वजण कृष्णानदीवर गांधीजींच्या स्मरणार्थ जाऊन आलो.

रविवारी सकाळी आठ वाजता फाटक वकिलाला मारले. तावडतोब वसंत पोतदाराला मारण्यात आले. नंतर फडणिसाचा दवाखाना फोडला. त्या वेळी तो गावात नसल्यामुळे बचाव झाला.

रात्री ७॥ ला राजाभाऊ फाटक व मुळे यांची दुकाने जाळीत असता गोळीबार झाला. त्यात २ जखमी व एक ठार झाला. पुढे फडणीस, फाटक, परांजपे, गानू वकील, जमदग्नि, सोमण, जामेत्री, साठे वकील, गुरुजी जोशी, काकतकर यांची घरे जाळली व कित्येकांच्या घरातील सामान जाळले. फडणिसाची मोटार जाळीत असता रामू आंबी व दादू कोतळे आत असल्यामुळे भाजले गेले. तो कार्यक्रम पहाटे ३ वाजता संपला. मंगळवारी रात्री ९ वाजता दादू कातळे स्वर्गवासी झाले. आंबीला साधारण बरे आहे. बाकी ठीक आहे. भाऊ मगदूम, भालचंद्र सुतार, बापू पाटील यांना जयहिंद. कळावे.

तुझा मित्र

M. G. Dugge

याखेरीज सदर खटल्यात जो पुरावा देईल अगर पुराव्यास मदत करील त्यास जीव घेण्याच्या धमक्यांची पत्रे पुष्कळच आलेली असून तसा जाहीरनामाही लावण्यात आलेला होता.

जाळपोळीत भाग घेणारे आजपर्यंत आपणाला काँग्रेस कार्यकर्ते म्हणवून घेत असत. परंतु सरकारने जेव्हा या गुंडांना ता. ८।३।४८ रोजी अटक केली तेव्हा त्यांनी मुंबईसरकारचा निषेध करणारी सभा घेऊन मिरवणूक काढली. त्यात " बाळासाहेब खेरांचा धिक्कार असो, बाळ खेराचा धिक्कार असो, बाळ खेऱ्याचा धिक्कार असो, बाळ्या खेऱ्याचा धिक्कार असो, मुंबई सरकारचा निषेध करा, महात्मा गांधीकी जय" अशा गावभर घोषणा केल्या. यावरून गुंड व दंगेखोर यांच्या मनःप्रवृत्तीवर चांगलाच प्रकाश पडतो.

कौठे एकंद

कौठे एकंद येथील हकीकत तर विशेषच लक्षात घेण्यासारखी आहे. हा गांव बधगाव संस्थानातील असून तेथे ब्राह्मणांची ८-१० घरे आहेत. जाळपोळ करण्याकरिता शेजारच्या नागावचे सुमारे ५० लोक आले होते. " ब्राह्मणांची घरे जाळा असा नेहरू सरकारचा हुकूम आहे " असे ते लोक सांगत होते, व तशा घोषणा करीत होते. या लोकांनी ब्राह्मणांची सर्व घरे लुटली व नंतर जाळली. गुन्हेगारांची यादी खुद्द डी. एस. पी.च्या जवळ देण्यात आली असताही तपास केला गेला नाही. जाळपोळीचा पंचनामा करण्यात आला असता केलेला पंचनामा गुंडांनी फाडला.

दि. ३ फेब्रुवारीस मामलेदार, सबइन्स्पेक्टर, दोन कारकून व ३-४ हत्यारी पोलीस गावात गेले व त्यांनी चौकशी सुरू केली. लोकांनी शांत राहावे म्हणून

मामलेदाराने सभा घेतली. सभेत भाषण चालू असताना हत्यारी पोलीस पांगून उभे होते. त्यांच्या भोवताली पाच पाच सहा सहा लोक उभे होते. त्यांनी एकदम पोलिसांच्या हातांतील बंदुका हिसकावून घेतल्या व मामलेदार, इन्स्पेक्टर, कारकून व शिपाई या सर्वांना चावडीवरील खोलीत बंद करून बाहेरून कुलूप ठोकले. पुढे दिवाणांनी पोलिस पार्टी पाठवून या लोकांना सोडवून आणले. सब इन्स्पेक्टराने विलीनीकरणानंतर या गुन्ह्याची याद वरिष्ठ अधिकाऱ्याकडे नोंदविली, पण पुढे काही हालचाल झाली नाही.

अशा गोष्टी घडू लागल्या म्हणजे सर्वसामान्य लोकांचा शासनसंस्थेवर विश्वास कसा टिकून राहणार ?

जायगव्हाण (सं. सांगली)

सांगलीसारख्या मोठ्या गावांतून जशा जाळपोळी झाल्या, तशाच त्या खेडेगावातूनही झाल्या. त्याचे एक उदाहरण म्हणून जायगव्हाण या गावचे देता येईल. हे अगदी लहान खेडेगाव असून सांगलीपासून २१ मैलांवर आहे. या गावी ब्राह्मणांची ९ घरे होती. ती सर्व जाळण्यात आली. सांगलीस दि. १ फेब्रुवारीला दंगल झाल्यानंतर दुसरे दिवशी दि. २ फेब्रुवारीस या गावी जाळपोळ झाली. जाळणाऱ्यात गावातील लोक फारसे कोणी नव्हते. बहुतेक सर्व बाहेर गावांहून मोटार ट्रक्समधून आले होते. ब्राह्मणांची एकंदर ९ घरे असली तरी पुरुषमाणसे गावात ४-५ च होती. प्रतिकार करणे अशक्य होते. गुंडांनी ब्राह्मणांना प्रथम घराबाहेर काढले, नंतर लुटालूट केली, व शेवटी घरे जाळली. "ब्राह्मणांची घरे जाळा असा नेहरू सरकारचा हुकूम आहे" असे हे जाळपोळ करणारे ओरडत होते. एकंदर नुकसान सुमारे दीड लक्ष रुपयांचे झाले. दोन दिवसांनंतर गावकऱ्यांनी ब्राह्मणांना शिधापाणी देण्यास सुरवात केली. जाळपोळ करणारे लोक सांगली संस्थानचे मंत्री ना. कोरे यांच्या कौठे महांकाळ येथील मोटार ट्रक्समधून आले होते.

कौठे महांकाळ

खुद्द कौठे महांकाळ येथील हकीकत अशीच विलक्षण आहे. तेथे श्री. गणपतराव बळवंतराव देशमुख हे वकील असून नगराध्यक्ष होते. गांधी खुनाची वार्ता येथे दि. ३१ ला समजली. तेव्हा ताबडतोब सर्व दुकाने बंद करण्यात आली. श्री. देशमुख हे संघाचे प्रमुख होते. त्यांनी संघशाखा भरवून ध्वज खाली उतरला व शाखा विसर्जन केली.

दि. १ ला कूपवाड येथील नेता वर्तमानपत्रातील भडक बातम्यांनी वातावरण गरम केले होते. दुपारी सांगलीहून आलेल्या मोटारीबरोबर तेथील जाळपोळीचेही

वृत्त आले व गावात संघीय (सर्व जातींचे) व ब्राह्मण यांना मारहाण करण्यास सुरवात झाली. तथापि कशीबशी शांतता प्रस्थापित करून रात्र निभली.

दुसरे दिवशी लोक जायगव्हाण जाळण्यास गेले असून परत येताना येथे येऊन ते बापट व देशमुख वकिलांचा खून करणार आहेत अशा वार्ता येऊ लागल्या, तेव्हा त्यांस लपून बसावे लागले. ठरल्याप्रमाणे जाळपोळवाले आले. त्यांनी घट्ट म्हणजे सोने, चांदी, नोटा, पैसे इत्यादि जे काही ब्राह्मणांचे लुटता आले ते सर्व लुटले व लठ्ठ म्हणजे आकाराने मोठे पण किंमतीने कमी उदा., भांडीकुंडी, धान्य इत्यादि स्थानिक लोकांना लुटून नेण्यास सांगितले. लुटालूट करण्यास गावांतील सुमारे हजारावर लोक जमले होते. गावची एकंदर वस्ती सुमारे ३५०० असून ब्राह्मण कुटुंबे सुमारे ५० आहेत. त्यांचे एकंदर नुकसान पांच लाखांवर झाले असून या गावी मराठ्यांनी ब्राह्मणांना पुष्कळ संरक्षण दिले. लुटालूट करणाऱ्यांत प्रायः लिंगायतांचा भरणा विशेष होता. हा गाव श्री. कोरे यांचा असून लिंगायतांचे येथे विशेष वर्चस्व आहे.

नरसोबावाडी

ही वाडी कुरुंदवाडजवळ असून भर दिवसा येथे जाळपोळ व लुटालूट करण्यात आली. या गावातील ब्राह्मण प्रायः पुजारी असून देवस्थानच्या मालकीच्या जमिनी नजीकच्या औरवाड व गौरवाड या गावी आहेत. नरसोबावाडी ही कोल्हापूर संस्थानात व औरवाड गौरवाड गावे बेळगाव जिल्ह्यात असून देवस्थानच्या जमिनीची कुळे मुसलमान आहेत. त्यांचा व पुजाऱ्यांचा बऱ्याच दिवसांचा वाद चालू असून त्यांच्यात वितुष्टही आलेले आहे. या संधीचा त्यांनी फायदा घेऊन वाडीच्या ब्राह्मणांवर दि. १ ला सकाळीच हल्ला केला, पण त्यांनी तो एकजुटीने परतवून लावला. परंतु येवढ्याने भागले नाही. दुपारी भोवतालच्या गावांतून शेकडो लोक हातांत भाले, काठ्या, कुऱ्हाडी, बंदुका घेऊन आले व त्यांनी ब्राह्मणांची घरे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाळली. ब्राह्मणांना अक्षरशः फुटक्या मडक्यांतून झाडाखाली अन्न शिजवून खावे लागले.

याही जळीत प्रकरणी सुमारे ७२ आरोपींवर निरनिराळ्या गुन्ह्यांबद्दल कोर्टात खटला चालू आहे.

उगार

सांगलीचे जळीत झाल्याबरोबर तेथील वार्ता येथे येऊन पोहोचल्या; व रात्री ९ नंतर ब्राह्मणांची घरे जाळण्यात आली. ती जाळण्यात मराठे, मराठेतर, मुसलमान, लिंगायत, जैन सर्व जातींचे लोक होते. ब्राह्मणांची घरे जाळावीत असा काँग्रेस सरकारचा हुकूम आहे अशा गर्जना चालू होत्या. या गावातील ब्राह्मणांनी बरीच दहशत खाल्ल्याचे दिसून आले.

महाराष्ट्र काँग्रेसचे धोरण

अशी किती तरी उदाहरणे या भागात घडली आहेत. या प्रकरणांची सरकारने आपण होऊन ताबडतोब व स्वतंत्रपणे चौकशी करावयास हवी होती; पण सरकारने तर ती केलीच नाही, एवढेच नव्हे, तर असेंब्लीत या बाबतीत सरकारला साधे प्रश्न सुद्धा विचारले गेले नाहीत! सरकारने जशी चौकशी केली नाही, त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीनेही ती केली नाही. किंबहुना उलट तिने या जाळपोळ प्रकरणाला विशेष काही महत्त्व नाही असे ठरवून त्यावर काळा पडदा टाकला! एवढेच नव्हे तर ज्यांनी जाळपोळ केली किंवा खून वगैरे अत्याचार केले, त्यांनी ते गांधीप्रेमाच्या भरात केले असल्याने त्यांच्या गुन्ह्याकडे सरकारने दुर्लक्ष करावे किंवा निदान त्यांस पश्चात्तापदग्ध करून सोडून द्यावे असेही सुचविले! जर या प्रकरणाची कसून चौकशी झाली असती तर तीत अनेक जबाबदार काँग्रेस कार्यकर्ते गोवले गेले असल्याचे उघडकीस आले असते. यामुळेच काँग्रेस कमिटीने वरील प्रकारचे धोरण स्वीकारले हे उघड आहे!

कर्नाटक काँग्रेस चौकशी समिति

जाळपोळ करणाऱ्यांशी कर्नाटक काँग्रेस कमिटीतील जबाबदार घटकांचा असा काहीच संबंध नव्हता. कर्नाटकात जी जाळपोळ झाली ती कर्नाटकातील मराठी विभागातच प्रायः झाली. तथापि असे असताही या प्रकरणाची चौकशी करणे अवश्य आहे असे त्यांस वाटले व त्याकरिता दि. १३ एप्रिल १९४८ रोजी कर्नाटक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांनी एक समिति नियुक्त केली. तिच्या सभासदांत श्री. दोडमेट्टी, जनाब शेखसाहेब, डॉ. डी. एस. कुळकर्णी, श्री. एस. एन. अंगडी व श्री. बी. एल. मुनवळ्ळी असे पाच जण होते. परंतु अखेर तिघे गळाठले व श्री. दोडमेट्टी व अंगडी यांनी पहाणी करून आपला वृत्तान्त निवेदन केला. त्यांनी एप्रिल १९४८ मध्येच हुकेरी, चिकोडी, मिरज, सांगली, रबकवी, अथणी व तेरदळ या गावांस भेटी दिल्या. त्यांनी एकंदर ७३ मंडळींच्या भेटी घेतल्या, त्यांत त्यांनी सरकारी अधिकारी, काँग्रेस पुढारी व जाळपोळ करणारे व ज्यांची जाळपोळ झाली त्याही मंडळींच्या भेटी घेतल्या. ते आपल्या निवेदनात म्हणतात की " कर्नाटकातील ज्या भागात मराठी लोकवस्ती आहे तेथेच प्रायः हे अत्याचार झाले. कर्नाटकी वस्तीच्या भागात ते झाले नाहीत. "

या अत्याचारांच्या संबंधात निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे अभिप्राय असल्याचे त्यांच्या आढळात आले. या संबंधात ते म्हणतात :

" स्थूल मानाने बोलावयाचे तर या जाळपोळीत ज्यांना झळ लागली आहे त्यांचे म्हणजे ब्राह्मण वर्गाचे या संबंधातील मत तदितरांहून अगदी वेगळे असल्याचे

दिसून येते. आम्ही ज्यांच्या साक्षी घेतल्या त्यांत, जे या घटनांचा स्वतंत्र बुद्धीने विचार करू शकतील अशाच मंडळींच्या घेतल्या, हे लक्षात घेण्यात यावे. अशांपैकी काही ब्राह्मणांनी असे सांगितले की, या अत्याचारांचे कारण गांधीजींचा वध हे नसून महाराष्ट्रात मागील काळात व आजही ब्राह्मणांचा द्वेष व त्याचा जो प्रचार करण्यात आला व येत आहे तो कारणीभूत आहे."

ते पुढे म्हणतात : "याच्या जोडीला कूळकायद्यासारखे कायदे सरकारने केले त्याचाही काही परिणाम झाला असावा असे काहींनी सांगितले. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघीयांच्या व महासभावादी मंडळींच्या चळवळी यास कारण असतील असे त्यांस वाटत नाही. त्यांचा युक्तिवाद असा की हे कारण असते तर खेडेगावातील ब्राह्मणांत हिंदुसभावादी किंवा संघीयही फारसे कोठे नसता तेथील ब्राह्मणांची घरे कां जाळली गेली व त्यांजवर कां अत्याचार झाले ? तसेच जे ब्राह्मण उघड उघड काँग्रेसवादी होते त्यांचीही घरेदारे कां जाळली गेली ?

ब्राह्मणेतर समाजाचे मत

या संबंधात ब्राह्मणेतर मंडळींचे म्हणणे समितीने पुढीलप्रमाणे नमूद केले आहे : "लोक म. गांधींना देवासमान मानीत. त्यांनी आपला जीव धोक्यात घालूनही हिंदु व मुसलमान समाजांत ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला असता महासभावादी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघीय यांनी मुस्लिम द्वेष प्रचारिला व आत्यंतिक जातीयतेचे स्वरूप वाढविले. मराठी वर्तमानपत्रांनी (विशेषतः केसरी, काळ, विविधवृत्त, अग्रणी, हिंदुराष्ट्र इ.) म. गांधीजी व त्यांचे तत्त्वज्ञान यांच्याबाबत द्वेष, तिरस्कार फैलावला आणि अशा वातावरणात गोडसे या महासभावादी व संघीय ब्राह्मणाने गांधीजींचा खून केल्यामुळे लोक अत्याचारप्रवृत्त झाले."

कर्नाटक समितीचे मत

स्वतःचा अभिप्राय निवेदन करताना ही समिति म्हणते : "हे अत्याचार ब्राह्मणांविरुद्ध द्वेष पसरविण्यात आल्यामुळे झाले असे आम्ही म्हणू शकत नाही. तो युक्तिवाद मान्य केला तर झालेले अत्याचार पूर्वनियोजित होते व ही योजना शास्त्रशुद्ध पद्धतीने आखण्यात आली होती, हे मान्य करावे लागेल." आणि हे आपण कां मान्य करीत नाही याचे कारण सांगताना समिति म्हणते :

"महात्माजींच्या प्रभावी नेतृत्वाखाली काँग्रेसने जे विधायक कार्य केले त्या योगाने ब्राह्मणेतरांच्या मनांत ब्राह्मणांविषयी कितीही द्वेषभावना वसत असली तरी ती पूर्णपणे धुऊन साफ निघून गेली होती. महात्माजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्याच्या लढ्यात जनतेने जो पुढाकार घेतला व त्याग प्रकट केला त्यावरून हे सिद्ध झालेले आहे. त्यांच्यात आज्ञाधारकत्व व शिस्त विशेष रीतीने बाणलेल

होती. जुन्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची वाताहत झाली होती. त्यांचे काळ्या निशाणांनी स्वागत केले जात होते.

पण पुढे लगेच ही समिति म्हणते : "तरी पण एवढे खरे की अलीकड महाराष्ट्रातील बहुसंख्याक वर्गाला इतर काही घटकांबद्दल मनात जळजळ वाटत होती व तिचे कारण राजकीय होते."

आणि शेवटी ही समिति म्हणते :

"म. गांधीजींचा खून करणारा गोडसे ब्राह्मण होता व ब्राह्मण समाजात महासभा व संघ यांच्याबद्दल सर्वत्र सुप्त सहानुभूति होती. यामुळे सामान्य जनतेची अशी समजूत झाली की कोणताही अधम गुन्हा करण्यास प्रवृत्त होणारा हा वर्ग आहे. त्यामुळे सूडबुद्धि जन्मास आली.

या समितीने आपल्या वृत्तनिवेदनात हे मान्य केले आहे की " काही काँग्रेस कार्यकर्त्यांना देखील ब्राह्मणांची घरे जाळण्यात आपण काही पुण्य कृत्य करीत आहो असे वाटले."

कर्नाटक काँग्रेस समितीच्या अध्यक्षांनी नेमलेल्या समितीने जो वृत्तान्त निवेदन केला आहे त्याचा तात्पर्यार्थ वर दिला आहे. यावरून हे दिसून येईल की समितीने काढलेला निष्कर्ष तिला उपलब्ध झालेल्या माहितीशी जुळता नाही. या जाळपोळीचे कारण ब्राह्मणद्वेषाचे जे झरे महाराष्ट्रात पाझरत आहेत त्यांत सापडते असे ब्राह्मण समाजाला वाटते व त्यांनी समितीपुढे या बाबतीत मांडलेला युक्तिवादही बिनतोड आहे. समितीलाही तो खोडून काढता आलेला नाही. ब्राह्मणेतर समाजाने गांधींबद्दलच्या प्रेमाने वेडे होऊन हे अत्याचार केले हे म्हणणे जर खरे असते तर महाराष्ट्राबाहेर किंवा जेथे विशेषतः महाराष्ट्रीयेतर मंडळींची बहुसंख्या आहे तेथील मंडळींनीही या प्रकारच्या अत्याचारांत भाग घेतला असता, पण असा प्रकार कोठेही आढळून आलेला नाही. महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर समाजापेक्षा इतरत्र समाजांत गांधीप्रेम कमी आहे असे कोणासही म्हणता यावयाचे नाही. परंतु त्यांनी कोठेही महाराष्ट्रीयांवर किंवा ब्राह्मण समाजावर अत्याचार केले नाहीत हे लक्षात घेण्यासारखे आहे.

दुसरे असे की, हिंदुसभावादी व संघीय मंडळींना किंबहुना ब्राह्मण समाजाला गांधीवाद मान्य नव्हता हे जरी खरे मानले तरी त्यांना गांधीजींबद्दल आदर नव्हता हे म्हणणे वस्तुस्थितीस सोडून नव्हते काय ? या मंडळींना गांधीजींचा मुसलमान अनुनयाचा अतिरेक मान्य नव्हता हे खरे; परंतु गांधीजींच्या कार्याची व्याप्ति याहून किती तरी मोठी व विशाल होती. तेही या मंडळींना काहीच मान्य नव्हते हे म्हणणे किती चुकीचे आहे ! व म्हणून गांधीजींच्या खुनास कोणी व्यक्ति

प्रवृत्त झाली म्हणून त्याच्या दोषाचे खापर सबंध ब्राह्मण समाजावर फोडण्याची बुद्धि ब्राह्मणेत्तर समाजाला व्हावी हे कशाचे द्योतक समजावयाचे ?

जाळपोळीची प्रेरणा गांधीप्रेमातून निर्माण झाली हे खरे मानले तर मुसलमान समाजाला गांधीजींबद्दल कितपत प्रेम होते हे सुपरिचित असताही गांधीवधोत्तर झालेल्या जाळपोळीत अनेक ठिकाणी मुसलमानांनी ब्राह्मणांविरुद्ध अत्याचारांत भाग घेतला तो कसा ? यावरूनही हे दिसून येईल की या जाळपोळीच्या मागे गांधीप्रेमापेक्षा किंबहुना त्याऐवजी ब्राह्मणद्वेष किंवा अन्य काही कारणे होती.

शिवाय असे की ज्या गांधीजींची आत्यंतिक अहिंसेची शिकवण होती, त्यांची ती शिकवण सपशेल झुगारून देणाऱ्यांना गांधींचे अनुयायी तरी कसे म्हणता येईल ? समितीने आपल्या निवेदनात हे मान्यच केले आहे की,

" काही कॉंग्रेस कार्यकर्त्यांना ब्राह्मणांची घरे जाळण्यात आपण काही पुण्य कृत्य करीत आहो असे वाटले. " हे जर खरे, तर ही मंडळी गांधी तत्त्वज्ञानात मुरलेली होती असे कसे म्हणता येईल ? तसेच " महात्माजींच्या प्रभावी नेतृत्वाखाली कॉंग्रेसने जे विधायक कार्य केले त्या योगाने ब्राह्मणेतरांच्या मनात ब्राह्मणांविषयी कितीही द्वेष वसत असला, तरी तो पूर्णपणे धुऊन साफ निघून गेला होता " हे मत समितीने गृहीत कृत्यासारखे स्वीकारले असून ते वस्तुस्थितीस सोडून आहे. असे व्हावे अशी समितीची सदिच्छा आहे इतकेच फार तर म्हणता येईल; पण वस्तुस्थिति त्याहून अगदी वेगळी होती इकडे डोळेझाक करता येणार नाही. किंबहुना या समितीच्या पाहणीचा जर हाच निष्कर्ष असला तर तिला महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या अंतर्गत असलेल्या किंवा क्वचित् नसलेल्या ' ब्राह्मणेतर ' समाजाचे राजकीय मनोगत अद्याप नीटसे समजलेच नाही असे म्हणावे लागेल.

कोल्हापूर कमिशनचा निष्कर्ष

आमच्या या मतास कोल्हापूरच्या जाळपोळ चौकशी कमिशनच्या वृत्तान्तात दुजोराच मिळतो. कोल्हापूर येथील दंग्याच्या बाबतीत न्या. कोयाजी म्हणतात: (१) मुख्य प्रधानांनीच दंगेखोरांचा बंदोबस्त करण्यास पोलिसांना मनाई केली. (२) जाळपोळीचे प्रकार त्यांच्या डोळ्यांदेखत होत होते व एकंदर प्रकाराचा भयानकपणा त्यांना अज्ञात नव्हता. (३) मंत्र्यांनी पोलिसांच्या हालचालींना बंदी केली आहे हे लोकांना माहीत होते व म्हणून ते निर्दयतेने जाळपोळ करीत होते. (४) जाळपोळ करण्यास चिथावणी देण्यासाठी कोल्हापुराहून इतर गावी लोक गेले होते व त्यांनी जागोजाग अत्याचार घडवून आणले. (५) कोल्हापूर येथे ज्याप्रमाणे घटना घडल्या त्यांचेच अनुकरण अन्यत्र झाले. उदा. कोल्हापुरास पोलिस अधिकारी स्वस्थ बसून राहिले तसेच इतरत्रही घडून आले. (६) कोल्हापूर येथे तालिम संघाने अत्याचार करण्यात पुढारीपण घेतले होते व मंत्र्यांनी

त्यांस पाठीशी घातले होते, असा सर्वसामान्य समज होता. (७) दंग्यानंतर चौकशीच्या बाबतीतही मंत्री आडवे आले असल्याचे दिसून आले.

वास्तविक कारण

यावरून कोल्हापुरास झालेली जाळपोळ एकदम उत्पातासारखी झाली व ती पूर्वनियोजित नव्हती असे म्हणता येत नाही. उलट ती ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादातून निर्माण झाली असून पूर्वनियोजित अशी होती असाच कोयाजी कमिशनचा निष्कर्ष आहे. यासंबंधात न्या. कोयाजी म्हणतात :

"There is considerable evidence to indicate that there was a general anti–Brahmin feeling in the State for a long number of years and the activities of the popular leaders like Madhavrao Bagal and his lieutenants like Dr. Dhanawade incited and fanned this anti-Brahmin feeling. (संस्थानांत पुष्कळ वर्षेपर्यंत ब्राह्मणविरोधी वातावरण होते आणि माधवराव बागल व त्यांचे डॉ. धनवडे यांच्यासारखे अनुयायी ही वृत्ति वाढवीत होते याबद्दल पुष्कळ पुरावा आहे.)

तेथील इन्स्पेक्टर जनरल साद्री यांनी आपल्या निवेदनात पुढीलप्रमाणे म्हटले आहे :

"In my opinion the disturbances were not due to the spontaneous out-break of public feeling but were the result of a pre-arranged plan.

"I am of the opinion that disturbances were due to communal hatred. I think the speeches made by Madhavrao Bagal,—and I have read them,—saying that the Brahman class and the landlord class should be destroyed, were responsible for this and these speeches had been spread over several years." (माझ्या मते लोकमताचा तात्कालिक प्रक्षोभ हे दंग्यांना कारण नसून ते पूर्वयोजनेनुसार घडले आहेत. जातीय द्वेष हा या दंग्यांना कारणीभूत आहे. श्री. माधवराव बागल यांनी जी भाषणे केली, व मी ती वाचली आहेत, त्यांत त्यांनी ब्राह्मण वर्ग व जमीनदार वर्ग नष्ट केला पाहिजे असे प्रतिपादन केले. हा प्रचार या दंग्यांना कारणीभूत असून तो गेली कित्येक वर्षे चालू होता.)

जे कोल्हापुरास तेच इतरत्र

जे कोल्हापुरास व त्या संस्थानातील इतर भागास लागू तेच इतर संस्थानांच्या बाबतीतही लागू होते. कोल्हापूरच्या पुढारी मंडळींचा ब्राह्मणविरोधी प्रचार या सर्व भागात सारखाच चालू होता. पूर्वी तो ब्राह्मणांविरुद्ध उघडपणे होता, तर अलीकडे त्याला जमीनदार विरुद्ध कुळे असा मुलामा देण्यात येऊ लागला होता.

पण असे असताही मराठा जमीनदारांविरुद्ध कोणतेही अनुचित कृत्य केले गेले नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. यावरूनच या चळवळीचे स्वरूप प्रायः ब्राह्मणविरोधी होते ही गोष्ट नाकबूल करण्यात अर्थ नाही.

अलीकडे समाजवाद्यांनी ब्राह्मणेतर चळवळीला तात्त्विक प्रतिष्ठा मिळवून देण्याकरिता बरीच खटपट चालविली असून तिला काही प्रमाणात यशही आले आहे. परन्तु प्रसंग येताच वरचा तात्त्विक मुलामा उडून जाऊन आतील मूळचे जातीय द्वेषी स्वरूप बाहेर पडते. कुरुंदवाड येथील डॉ. टोळ प्रभृति समाजवाद्यांच्या प्रचारावरून हे स्पष्ट होऊ शकेल. हे सर्व दंगे किती पूर्वनियोजित होते हे कुरुंदवाड येथील हकीकतीवरून अगदी स्पष्टपणे दिसून येते. कर्नाटक समितीच्या मताप्रमाणे जर ते तात्कालिक स्वरूपाचे असते तर ते फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत म्हणजे १४ दिवसपर्यंत चालू राहिले नसते. तसेच हे दंगे तत्काल व स्थानिक लोकांनीच केले असते ; पण वरील अनेक उदाहरणांवरून हे दिसून येईल की दंगे, जाळपोळ, लुटालूट ही अनेक ठिकाणी बाहेरून आलेल्या शस्त्रधारी गुंडांनी केलेली असून सामान्यतः चळवळीत नसणाऱ्या स्थानिक मराठे व इतर लोकांनी ब्राह्मणांना प्रासंगिक मदत केली आहे. या गुंडांना राजसत्ताधाऱ्यांचा पाठिंबा होता हे कोल्हापूर येथीलही दंगलीच्या कोयाजी कमिशनने काढलेल्या निष्कर्षावरून स्पष्ट झाले आहे. कोल्हापूरला ज्याप्रमाणे मंत्र्यांनी दंगलखोरांना पाठीशी घातले त्याचप्रमाणे कुरुंदवाड–सांगलीच्या मंत्र्यांच्या नातलगांनी प्रत्यक्ष जाळपोळ घडवून आणली हे सिद्ध झालेले आहे. अशा स्थितीत ही जाळपोळ पूर्वनियोजित नव्हती असे म्हणण्यात अर्थ नाही.

आमची अनुमाने

ही सर्व वस्तुस्थिति लक्षात घेता व आम्हांला मिळालेली माहिती व प्रत्यक्ष पुरावे विचारात घेता आम्हांस पुढील अनुमाने काढावीशी वाटतात :

(१) गांधीवधोत्तर महाराष्ट्रात जी जाळपोळ झाली तिचे निमित्त आकस्मिक असले तरी तिची योजना आकस्मिक नव्हती. एकंदर वातावरण द्वेषयुक्त विचारांनी भारलेले होते, इतके की त्यास निमित्त मिळण्याचा अवकाश, तो त्याने पेट घेतला.

(२) पुण्यास व कोल्हापुरास जर जाळपोळ झाली नसती किंवा ती होताच बंद पाडण्यात आली असती व जागोजागच्या काँग्रेसपुढाऱ्यांनी जर अत्याचारांना चिथावणी दिली नसती तर हे अत्याचार या वेळी झालेही नसते. पण वर उल्लेखिलेल्या गोष्टी घडून आल्याकारणाने अत्याचारांना निमित्त मिळाले.

(३) दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांत नवीन 'लोकशाही' अंमल सुरू झाला होता व राज्यकारभाराच्या दृष्टीने अगदीच अपक्व लोकांच्या हाती सत्ता गेलेली होती. त्यांनी आपले गुण उधळले !

(४) सन १९४२ साली व नंतर सातारा ते बेळगाव या भागात जी तथा-कथित 'क्रांतिकारी' चळवळ झाली तिने गुंडांना देशभक्तीचा अभ्रा घातला असल्याने या मंडळींना काँग्रेस संघटनेत प्रतिष्ठितपणे देशभक्त म्हणून मिरवता येऊ लागले. त्याचप्रमाणे सुसंघटित अत्याचारांचे तंत्रही त्यांनी पद्धतशीर बसविले असल्याने सर्वसामान्य लोकांना त्यांची विलक्षण दहशत बसली आहे.

(५) ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद या भागात गेली ३०-४० वर्षे रुजला असून अलीकडे त्यावरच समाजवादाचे किंवा कम्युनिस्टवादाचे नवे कलम करण्यात आले आहे. त्यामुळे मूळच्या द्वेषबुद्धीला तात्त्विक अधिष्ठान देण्यात येऊ लागल्याने मुळच्या द्वेषबुद्धीत भर पडून तिचा प्रसारहीं अधिकच वाढला आहे.

(६) संघ व हिंदुसभावादी मंडळी प्रामुख्याने ब्राह्मण असल्याने व गांधींचा वध करणारा त्या जातीचा असल्याने ब्राह्मणेतर, समाजवादी व कम्युनिस्ट, व काही ठिकाणी मुसलमान मंडळींनी या संधीचा फायदा घेऊन आपापली तंत्रे उप-योगात आणून आपापल्या भावी उद्दिष्टांच्या दृष्टीने 'प्रात्यक्षिके' करून दाखविली आहेत; व त्यांत अनेकांनी आपले अनेक हेतु साधून घेतले आहेत.

या प्रकारच्या प्रचाराला व संघटनेला सरकारने वेळीच आळा घातला नाही तर हा भस्मासुर अखेर कोणत्या थराला जाईल व कोणाकोणाच्या डोक्यावर हात ठेवील याचा नेम नाही.

ही परिस्थिति बदलावयाची असेल तर सरकारने न्यायाची निष्ठुरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. काँग्रेसपक्षीयांनी दूरवर विचार करून व न्यायबुद्धि बाळगून यापुढे द्वेष पसरविण्याचे कार्य बंद केले पाहिजे. तसेच सर्वांच्या सहकार्या-वर भर देऊन न्याय व समता या तत्त्वांच्या पायावर राष्ट्राची उभारणी करण्याचे धोरण आचरणात आणले पाहिजे. तसे होईल तरच सध्याची द्वेषमूलक प्रेरणा बंद पडेल. आज ती ब्राह्मणांविरुद्ध दिसते, पण एकदा द्वेषाचा पाया चळवळीने स्वीका-रला म्हणजे ती कोठपर्यंत चरत जाईल याचा नेम नाही. या दृष्टीने पहाता वास्त-विक काँग्रेस, हिंदुसभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या मूलभूत भूमिका पुष्कळ अंशी सदृश, परस्परांशी जुळत्या, किंबहुना समान आहेत असे म्हणणे चूक होणार नाही. असे असूनही या वर्गातच परस्परांबद्दल अकारण अविश्वास, व अनादर निर्माण झाला आहे. ही परिस्थिति बदलली गेली, व प्रासंगिक मतभेद राखूनही आदर व विश्वास यांची देवाणघेवाण होऊ शकली तर महाराष्ट्रातील सामाजिक

विचारांना अवश्य ती उंची प्राप्त होईल व सध्याचे वाद मिटू शकतील. मात्र या दृष्टीने विचारपूर्वक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

शंकर रामचंद्र दाते
पुणे, गंगाधर विश्वनाथ गोखले
दि. १ मार्च १९४९ हरि भास्कर भिडे
सौ. शांताबाई गोखले

एस. जी. पाटील यांचे पत्र

१९५८ मध्ये श्री. शंकर रामचंद्र दाते यांच्या वयाला साठ वर्षे झाली म्हणून त्यांचा स्वा. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली षष्टयब्दी समारंभ महाराष्ट्रीय मंडळांत साजरा झाला. त्या समयी कोल्हापूर येथील श्री. एस. जी. शिरगुरकर पाटील यांनी दाते यांना अभिनंदनाचे पत्र पाठवून आपल्या सद्भावना व्यक्त केल्या. श्री. शिरगुरकर पाटील यांचे ' दलित बंधु हे ' वृत्तपत्र काही काळ दाते यांच्या छापखान्यात छापले जात असे. त्या निमित्ताने त्यांचा पाटलांबरोबर परिचय आला होता. १९४८ च्या जळितासंबंधात त्यांनी मोकळ्या मनाने आपले वैचारिक स्थित्यन्तर व्यक्त करून केलेले निवेदन हे त्या वेळच्या घटनांचा आणखी एक पुरावाच असल्याने ते येथे देण्यात येत आहे.

आपल्या दि. ११ ऑक्टोबर १९५८ च्या पत्रात श्री. शिरगुरकर पाटील लिहितात : "आज ' प्रभात ' मध्ये आपल्या षष्टयब्दीपूर्तीच्या समारंभाचे (वृत्त) वाचून मला धक्काच बसला. कारण तुम्ही पन्नास वर्षे तरी ओलांडली असतील असे मला तरी वाटले नाही. किंबहुना १९४२ मध्ये जेव्हा मी माझ्या संपादकत्वाखाली ' दलितबंधु ' आपल्याकडे छापीत होतो तेव्हा मी आपणांस माझ्याहून लहान समजत होतो. प्रकृतीचा गुणधर्म हा! किती निकोप प्रकृति मामा तुमची ! शरीरस्वास्थ्य हे जीवनास किती उपकारक असते याचे प्रत्यन्तर तुमच्या रूपाने आहे.

" मामा, तुमच्या साठ वर्षांच्या पूर्णतेत उभा महाराष्ट्र भागीदार आहे. कारण आजच्या महाराष्ट्रामागे तुमची लेखणी खर्च पडली आहे. तुमचे विचार तर या काळातही ' काळ ' माहात्म्य सांगत आहेत.

" मी तर हिंदुसभेचा द्वेष्टा, जन्मजात ब्राह्मणद्वेष्टा, पण वैयक्तिक गुणांचा चाहता. ४८ साली तर विश्रामबागच्या (सांगलीजवळील) ' नेता ' दैनिकातून ब्राह्मणद्वेषाचे अखेरचे – पराकोटीचे लेख लिहून दक्षिण महाराष्ट्रातील जाळपोळीस मी मुख्यतया कारण झालो. तथापि तुमच्या लेखणीस त्यानंतर महाराष्ट्र मुकला

याची खंत मात्र सतत वाटते. (१९५५ नंतर दैनिक काळ बंद झाला होता. त्या संदर्भात हा उल्लेख असावा.)

मामा, तुमच्या या षष्टयब्दीपूर्तीत मी एक माझ्यातील वैचारिक स्थित्यन्तर सांगून सहभागी होत आहे. अर्थात् आता या विचारांना फारच महत्त्व आहे. कारण महाराष्ट्र आज एकवटूनही एका ज्वालामुखीवर उभा आहे. ' संयुक्त महाराष्ट्र ' हा शब्द आणि त्यातील जोम चुकीने कां असेना, १९४८ साली ब्राह्मण-कांडात जाळला गेला आहे. त्या भावनेला कितीही कढ आणिले तरी त्यातून आजच्या भारतातून अलगत्व निर्माण होणार नाही. ज्याप्रमाणे आम्ही ब्राह्मण-द्वेषाच्या भूमीत जन्मून, ब्राह्मण द्वेषाचे बाळकडू पिऊन इतके कडवट ब्राह्मण द्वेष्टे झालो की, म. गांधींच्याबद्दल बिलकूल निष्ठा नसतानाही एका ब्राह्मणाने गांधींचा खून केला म्हणून ब्राह्मणांचे हत्याकांड आरंभिले, तसेच आज महाराष्ट्राचे झाले आहे. आसेतु हिमाचल भारत आमचा असताना काँग्रेस द्वेषाने आम्ही आज लोकशाहीचे मारेकरी होऊ पहात आहोत. श्री. अत्रे यांच्यासारखा एक उपेक्षित विद्वान् आणि कोठारी यांच्यासारखा असफल व असंतुष्ट विद्वान् यांनी महाराष्ट्राची चिरफाड स्वार्थाकरिता चालविली आहे. या वेळी, मामा, खरोखरीच मीमांसक व तारतम्यपूर्ण अशा तुमच्या निष्ठावंत लेखणीची, निदान एका लेखाची तरी फारच जरुरी आहे. तेव्हा आपण आपल्या षष्टयब्दीपूर्तीच्या वेळी हे कार्य करावे अशी विनंती करीत आहे.

आपला पत्ता ज्ञात नसल्याने सत्कारसमितीच्या पत्त्यावर लिहिले आहे. उत्तराची अपेक्षा करून पुरे करतो.

आपला

एस. जी. पाटील. "

यापेक्षा या संबंधात अधिक काही निवेदन करण्याची आवश्यकताच उरलेली नाही. तथापि यावरून एवढेच दिसून येईल की ब्राह्मण समाजाने सामाजिक सुधारणेचा व न्यायाचा नवा दृष्टिकोन स्वीकारून त्यागी व तपस्यापूत वृत्तीने प्रयत्न केला तर ब्राह्मणेतरवादाला कलाटणी मिळून ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांत सामंजस्य व सलोखा निर्माण होऊ शकेल व त्याचीच आजच्या काळात विशेष आवश्यकता आहे.

*

(१४)

हिंदुमहासभेची आवश्यकता

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही हिंदुसभावाद्यांवर सरकारचा आकस वाढतच राहिला. १९४६-४७ सालापासून पूर्व बंगालमधूनही हिंदु लोक फार मोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानात येण्यास सुरुवात झाली होती. सरकारी आकड्यानुसार १९४७ साली २,४४,००० व १९४८ साली ७,८६,००० असे एकूण दहा लाखांहून अधिक हिंदु लोक भारतात आले. त्यामुळे प. बंगालच्याही लोकसंख्येत मोठी भर पडून निर्वासितांचा प्रश्न अधिकाधिक बिकट होऊ लागला होता. पश्चिम बंगालमधून मुसलमानांना पूर्व बंगालात पाठवून देणे काँग्रेसच्या निधर्मवादी ब्रीदाच्या कक्षेत बसत नव्हते. पण पश्चिम पाकिस्तान जसा पाकिस्तान सरकारने निर्हिंदु केला, त्याचीच आवृत्ति आता पूर्व बंगालमध्ये निघू लागली होती. पूर्व बंगालमधून येणारी ही आवक थांबविण्यासाठी पं. नेहरूंनी पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अलीखान यांच्याशी बोलणे सुरू केले होते. त्या संबंधात लियाकत अल्ली यांची दिल्लीस १९५० मध्ये भेट व्हावयाची होती. या भेटीत अडथळा येऊ नये व वातावरण प्रक्षुब्ध होऊ नये यासाठी बहुधा नेहरू सरकारच्या सूचनेवरून मुंबई सरकारने ज्या तजविजी केल्या, त्यांत दि. ४ एप्रिल १९५० ला हिंदुसभेची महाराष्ट्रातील पुढारी मंडळी व कार्यकर्ते यांना स्थानबद्ध करण्याचे ठरविले. वास्तविक नेहरूंची ही भीति अकारण व व्यर्थ होती. पण गांधीवधापासून त्यांनी धसका खाल्ला होता व दहशत घेतली होती. अकारण भीतीच्या पोटी त्यांनी हिंदुसभेच्या अनेक मंडळींना स्थानबद्ध करून ठेवले. त्यात मुंबईचे स्वा. वि. दा. सावरकर, बाळाराव सावरकर, अग्रवाल, एस. व्ही. देवधर, अभ्यंकर, श्री. श्री. सप्रे, व्ही. पी. नायक, पं. बखले, इंदूरचे बाळाराव इंगळे, जाधव, सांगलीचे का. भा. लिमये, पुण्याचे ल. ब. भोपटकर, जगदीश भोपटकर, शंकर रामचंद्र दाते, गणपत महादेव नलावडे, श्रीपाद महादेव माटे, गजानन विश्वनाथ केतकर, प्रो. द. स. जोग, नागेश रघुनाथ आठवले, गोविंदस्वामी आफळे, रामचंद्र काशीनाथ रानडे, इत्यादींना अटक करून निरनिराळ्या तुरुंगांत स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. या स्थानबद्धतेची त्यांना जी कारणे देण्यात आली ती खोटी होती. तोही एक प्रकारचा सरकारचा हिंदुसभेच्या विरुद्ध कटच होता. ही कारणे खोटी असून स्थानबद्धता अकारण वा खुनशीपणाच्या बुद्धीतून निर्माण झाली असल्याने त्याविरुद्ध सर्वांनी उच्च न्यायालयात हेबिअस कॉर्पसचे अर्ज केले व ते चालून त्यात सर्वजण सुटले. चार दिवसांच्या लियाकत भेटीनिमित्त या मंडळींना चार महिने तुरुंगवास भोगावा लागला !

दाते तुरुंगात असताना 'काळ'चे त्या वेळचे कार्यकारी संपादक श्री. पाटणकर हे मुंबईस एका पत्रकार सभेसाठी गेले असताना त्यांनी मोरारजी देसाई यांना दाते यांच्या अटकेचे कारण विचारले तेव्हा दाते खाजगी संभाषणात हिंदूंना मुसलमानां-विरुद्ध चिथावणी देतात असे ते म्हणाले. दाते पुढे सुटून आल्यावर त्यांनी मोरारजी देसाई यांना पत्र पाठवून आपल्या विधानाबद्दल खुलासा मागितला. तेव्हा आता त्याची गरज नाही असे उत्तर देऊन मोरारजींनी माघार घेतली. दाते यांनी मोरारजींना पाठविलेले पत्र पुढीलप्रमाणे होते :

दाते यांचे मोरारजी देसाई यांना पत्र

माझे सहकारी श्री. पाटणकर यांनी गेल्या मे महिन्यात मुंबईस वृत्तपत्र-कारांच्या बैठकीनंतर आपली स्वतंत्र भेट घेऊन माझ्या स्थानबद्धतेच्या कारणांची आपणाजवळ चौकशी केली असता आपण म्हणालात की काळमधील काही लिखा-णाच्या कारणास्तव किंवा एखाद्या सार्वजनिक सभेतील माझ्या भाषणाच्या कारणामुळे मला स्थानबद्ध करण्यात आलेले नाही, तर कोणा व्यक्तीबरोबर माझ्या काही खाजगी संभाषणाच्या कारणावरून मला स्थानबद्ध करण्यात आले आहे. पाटणकरांच्या जवळ आपण केलेला वरील आशयाचा खुलासा काळच्या दि. २२।६।५० च्या अंकात व्यक्तींचा संदर्भ गाळून प्रसिद्धही झाला आहे. त्याचे कात्रण मी आपणांकडे सोबत पाठवीत आहे.

जर हे वृत्त खरे असेल तर मी मुसलमानांविरुद्ध हिंदूंना चिथावणी देणारे भाषण किंवा भाषणे खाजगी रीतीने केल्याचे आपण म्हटले आहे तेव्हा त्यासंबंधात अधिक तपशील आपण मला कळविल्यास उपकृत होईन. कारण माझ्या समजुती-प्रमाणे आपल्या या आरोपात कणसुद्धा खरा नाही. मी आपणांस आरंभीच हे स्पष्ट करू इच्छितो की मी कोणाही माणसाजवळ हिंदूंना मुसलमानांविरुद्ध चिथावणी देणारे भाषण केलेले नाही. खाजगीतही नाही. आणि उघडपणेही नाही. वस्तुस्थिति अशी आहे की माझ्या मतांत आतबाहेर काही नाही. जी आहेत ती स्पष्ट व उघड आहेत, मग ती कोणाला आवडोत वा न आवडोत. मी जे जाहीरपणे प्रचारीत नाही असा कोणताही खाजगी प्रचार मी कधीच केलेला नाही.

अशी वस्तुस्थिति असल्यामुळे मी खाजगी भाषणातून प्रचार केला हा आपला आरोप केवळ आश्चर्यकारक आहे. मला असे वाटते की आपल्या कोणा हितसंबंधी-यांनी माझ्याविरुद्ध खोटचा व स्वकपोलकल्पित गोष्टी रचून आपल्या कानात हे विष ओतले असावे आणि त्यांनी पुरविलेल्या बनावट माहितीच्या आधारावर आपण मला स्थानबद्ध करण्याची कृति करण्यास प्रवृत्त झाले असावेत.

म्हणून माझे म्हणणे असे आहे की माझ्या विरुद्ध आपला जो काय आरोप किंवा आक्षेप असेल तो मला आपण स्पष्टपणे सांगावा, म्हणजे आपला जो काही

गैरसमज झाला असेल किंवा आपल्या मनात माझ्या संबंधाने शंका किंवा किल्मिष निर्माण झाले असेल त्याचे निराकरण करणे मला शक्य होईल. माझे एवढेच म्हणणे आहे की खोटया आणि बनावट माहितीच्या आधारावर आपल्या कृति आधारलेल्या नसाव्यात. उत्तर यावे.

दि, १७।७।१९५० आपला

शंकर रामचंद्र दाते

मोरारजींचे उत्तर

श्रीयुत दाते यांसी सा. न. वि. वि. आपले ता. १७।७।५० चे पत्र मिळाले. आपण आपल्या खाजगी जीवनात हिंदूंना मुसलमानांविरुद्ध चिथवीत होता किंवा नाही या वादात आता उतरण्याची जरुरी आहे असे मला वाटत नाही. कळावे.

आपला

मुंबई दि. १९।८।५० मोरारजी देसाई

मोरारजी देसाई यांनी दाते यांच्या उघड आव्हानास सरळ बगल देऊन माघार घेतली. दुसऱ्यांवर खोटे आरोप लादून त्यांस तुरुंगात ठेवणाऱ्यांवर तशीच आपत्ति यावी ही दैवगति विशेष आहे खरी !

हिंदुसभेची आवश्यकता

हिंदुस्थान राजकीय दृष्टया स्वतंत्र झाल्यानंतरही हिंदुमहासभेने आपले अंगीकृत कार्य चालूच ठेवले पाहिजे असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या कलकत्ता येथील (१९३९) वर्षीच्या हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणातून म्हटले आहे. ते म्हणतात :

" पुष्कळ उथळ बुद्धीच्या टीकाकारांची अशी कल्पना दिसते की, मुस्लिम लीगचे किंवा काँग्रेस पुढाऱ्यांचे सध्याचे हिंदुविरोधी धोरण यांना प्रतियोगित्वाने प्रतिरोधक शक्ति म्हणूनच केवळ हिंदुमहासभा उभी करण्यात आली आहे; आणि हे तिचे आंगतुक समर्थक बाह्य कारण निघून गेले म्हणजे ती निर्माल्यवत् होऊन आपोआप विराम पावेल. परंतु या सभेचे ध्येय आणि उद्देश यांना काही अर्थ असेल तर हे स्पष्ट होईल की, एखाद्या तात्कालिक पक्षाला विरोध करण्यासाठी किंवा एखादे गाऱ्हाणे दूर करण्यासाठी क्षणिक उत्साहाच्या उद्रेकाने ती निर्माण झालेली नाही वस्तुस्थिति अशी असते की, कोणतीही व्यक्ति वा संस्था जीवित राहण्यायोग्य असेल तर बदलत्या परिस्थितीच्या विरोधी आवरणात ती उभी राहिली असता तिची संरक्षक आणि आक्रमक अशी उभयविध अंगे सिद्ध व उपस्थित होतात. तद्वत् हिंदुराष्ट्र देखील काँग्रेसछाप भ्रांत राष्ट्रकल्पनेच्या गुदमर-

विणाऱ्या कोंडीतून आपली मुक्तता करून घेऊन आपल्या पायावर उभे राहिले. तेव्हा आधुनिक कालाच्या भिन्न परिस्थितीत जीवनसंग्रामात झुंजण्यासाठी त्याने नवे साधन निर्माण केले तेच हिंदुमहासभा होय. ती क्षणिक प्रसंगाने निर्माण झाली नसून राष्ट्रीय जीवनाच्या मूलभूत आवश्यकतेतून उद्‌भवली आहे. तिच्या उद्देशाची आणि ध्येयाची विविध अंगे पाहिली तर हे स्पष्ट होईल की राष्ट्राच्या जीवना-इतकेच तिचे कार्य चिरस्थायी आहे.

पण ते असो. नित्य अस्थिर राजकीय घडामोडींना तोंड देण्यासाठी आपले धोरण ठरविण्याची दैनंदिन आवश्यकता विचारात घेतली तरी देखील हिंदुहित संबंधास जपण्यासाठी नि संकटापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी हिंदु जगताला अशी एखादी स्वतंत्र नि केवळ हिंदूंची अशी एक संघटना आवश्यक आहे व ती कोणत्याही अहिंदु वा उभयान्वयी संस्थेच्या नैतिक नि बौद्धिक वर्चस्वाखाली जाता कामा नये. सध्याच्या हिंदुस्थानच्या परतंत्र राजकीय परिस्थितीपुरतीच ही आवश्यकता नाही, तर हिंदुस्थान हे पूर्णपणे वा अंशतः स्वतंत्र होऊन आपल्या राजकीय भवितव्याचे नियंत्रण राष्ट्रीय विधिमंडळाच्या द्वारा करू लागल्यावर देखील हिंदु-महासभेसारखी केवळ हिंदूंची अशी संघटना निदान दोन शतकेपर्यंत तरी हिंदु जगताच्या द्वाररक्षक स्तंभाप्रमाणे उभी असणे अधिकच आवश्यक आहे. मग ती सध्याच्या हिंदुमहासभेचीच असो वा इतर कोणतीही असो."

याच भाषणात हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेसंबंधाने सावरकर म्हणतात : "हिंदुस्थानची भावी राज्यघटना पुढील व्यापक तत्त्वांवर आधारण्यात येईल. सर्व नागरिकांना समान अधिकार नि कर्तव्ये राहतील. मग त्यांची जात वा धर्म कोण-तेही असोत. मात्र त्यांनी या हिंदुस्थानी राज्याशी पूर्णपणे एकनिष्ठ राहण्याची आणि एकमेव त्यावरच निष्ठा ठेवण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. भाषण, विचार, धर्म नि संघ इत्यादीसंबंधीचे स्वातंत्र्याचे मूलभूत अधिकार सर्व नागरिकांना, सारखेच उपभोगिता येतील. या धोरणापेक्षा अधिक राष्ट्रीय असे धोरण कोणतेच असू शकणार नाही. सामान्य हिंदी राष्ट्राच्या वाढीशी हिंदु राष्ट्राची कल्पना कोणत्याही प्रकारे विसंगत नाही. कारण या हिंदी राष्ट्रात सर्व पंथ, उपपंथ, वंश, जाती, धर्म, नि संप्रदाय, हिंदु, मुसलमान, अँग्लो इंडियन, ख्रिश्चन इत्यादि सर्वांना एका राजकीय घटनेत समानतेने नि सलगपणाने एकत्रित करता येईल. अशा प्रकारचे संयुक्त हिंदुस्थानी राज्य हेच हिंदी राष्ट्र होय. हिंदुस्थानी राष्ट्रीय राज्य-घटनेसंबंधाचे हिंदुमहासभेचे हे धोरण निश्चितपणे नि अर्थपूर्णतेने मुस्लिम लीग किंवा कॉंग्रेस यांच्या धोरणापेक्षा अधिक राष्ट्रीय आहे. स्वतःला राष्ट्रीय म्हण-विणारी कॉंग्रेस देखील जितके ठणठणीत राष्ट्रीय धोरण मांडू शकत नव्हती तितके ठणठणीत राष्ट्रीय धोरण 'अराष्ट्रीय', 'दुराग्रही', 'जातीय' अशी कुविशेषणे

लावून जिची हिंदुराष्ट्रविषयक कल्पना काँग्रेसने डावलली आहे त्या हिंदुमहासभेचे आहे. वस्तुत: काँग्रेस हीच सरळ अर्थाने जातीय आहे, इतकेच नव्हे तर विकृत व विपरीतपणेही जातीय आहे. कारण हिंदु बहुसंख्य नि मुसलमान अल्पसंख्य अशी विभागणी मान्य करूनही पुन्हा सांस्कृतिक अधिकार, मतदान नि राज्ययंत्रातील घटक यांमध्ये बहुसंख्याकांना न्याय्य प्रमाणात जो अंश द्यावयाचा तो काढून घेऊन तो धार्मिकदृष्टचा अल्पसंख्य मुसलमानांना द्यावयास काँग्रेस भाग पाडीत असते."

हिंदूंच्या दृष्टीने ' स्व ' राज्य याचा अर्थच हा आहे की त्यात हिंदूंचे ' स्व 'त्व प्रभावाने नांदू शकेल. अल्पसंख्य समाजांनाही आपला धर्म व संस्कृति कायम राखूनही स्वत:स हिंदुस्थानी म्हणवून घेता येईल. कालान्तराने हिंदुराष्ट्रवाद ज्या प्रमाणात समर्थ होईल त्या प्रमाणात येथील अल्पसंख्य समाज क्रमाक्रमाने बहुसंख्य समाजात विरून जातील व त्यांच्यातून एकसंध संघटित हिंदुस्थानी राष्ट्र विकसित होईल.

सावरकर व लोकशाही स्वराज्य पक्ष

यापूर्वी दि. १ ऑगस्ट १९३७ ला स्वा. सावरकर यांचे लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त पुण्यास भाषण झाले होते. त्या वेळी त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली होती. लो. टिळकांची वैशिष्टचे सांगताना सावरकर म्हणाले की, त्यांचे पहिले वैशिष्टच हे की त्यांनी ' ध्येयनिश्चिति ' केली. त्यांना राष्ट्रस्वातंत्र्य प्रथम हवे होते. त्यांचा दुसरा विचार ' साधनानामनकेता ' हा होता. विनंतीपत्रापासून सशस्त्र क्रांतीपर्यंत सर्व मार्ग त्यांना मान्य होते. आमचे मार्ग त्यांना उघडपणे पसंत करता येत नव्हते तरी त्यांनी आमचे पाय कधीही ओढले नाहीत. टिळकांचे तिसरे वैशिष्टच म्हणजे त्यांचा हिंदुत्वाचा जाज्वल्य अभिमान. ही वैशिष्टचे सांगून सावरकर म्हणाले की, ही " वैशिष्टचे मला सध्याच्या लोकशाही स्वराज्य पक्षात दिसतात; म्हणून मी त्या पक्षाचा सभासद होत आहे." सावरकरांनी लोकशाही स्वराज्यपक्षाचे छन्दोबद्ध वर्णनही केले. ते असे :

राष्ट्रस्वतंत्रता ध्येयं यथासाध्यं च साधनम् ।
अभ्युत्थानाय हिंदूनां पक्षोऽयं संप्रवर्तित: ।।

(राष्ट्राचे स्वातंत्र्य हे ध्येय, ध्येयसिद्धीस उपयोगी ते साधन व हिंदुसमाजाचे पुनरुत्थान घडविणे हे अंतिम मूलभूत साध्य. त्यासाठी लोकशाही स्वराज्यपक्ष निर्माण झाला आहे.)

अहिंदूसकट सर्वांना समावेश देणाऱ्या राजकीय पक्षाचे धोरण कसे असावे या संबंधाने सावरकरांचे विचार यात स्पष्ट झालेले आहेत.

कलकत्ता येथे दि. २४ डिसेंबर १९४९ ला डॉ. नारायण भास्कर खरे यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुमहासभेचे २८ वे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनातील आपल्या भाषणात डॉ. खरे म्हणाले :

" काँग्रेस पुढारी म्हणत असतात की आम्ही या देशात हिंदुराज्य होऊ देणार नाही. येथे हिंदुराज्य किंवा हिंदु शासनपद्धति स्थापन व्हावी असे कोणीही म्हणत नाही. जे कोणी म्हणत नाही ते त्याजवर लादण्याचा उपद्व्याप थांबला पाहिजे. आमचे म्हणणे इतकेच आहे की, या देशात हिंदुराष्ट्र आज अस्तित्वात आहे, आणि पृथ्वीवरील कोणतीही शक्ति ते नाहीसे करू शकणार नाही. हिंदुस्थानात हिंदुराष्ट्र हे सांस्कृतिक पायावर उभारलेले असून या भूमिकेवरून या देशाचे राजकारण चालावे असे महासभेला वाटते.

" मुसलमानधार्जिणी बनलेली काँग्रेस महासभेला जातीय म्हणून हिणवीत आहे; पण जमात हा शब्द देशातील बहुसंख्य लोकांना लावीत नसतात. त्यांना 'राष्ट्र' हा शब्द लावण्यात येत असतो. जमाती हा शब्द अल्पसंख्याकांना लावण्यात येतो. या देशात हिंदु हे बहुसंख्य असल्याने येथे तेच राष्ट्र असून इतर संस्कृतींच्या अल्पसंख्य लोकांच्या जमाती आहेत.

" येथील राज्याचे स्वरूप जातीय असू नये तर सर्व जातीजमातींच्या व धर्मांच्या लोकांना समान कायदा व समान संधि असावी असेच हिंदुमहासभेला वाटते. वस्तुस्थिति अशी आहे की, हिंदुसभेने जातीयतेचा कधीच पुरस्कार केला नाही. उलट काँग्रेसने राजकारणात माजविलेल्या जातीयतेविरुद्ध ती एकसारखी लढत आली आहे. "

हिंदुमहासभेचे राजकीय धोरण

गांधीजींच्या वधानंतर हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांत मोठी खळबळ उडाली होती. हिंदुमहासभेचे १९४८ वर्षी भरावयाचे अधिवेशन अनिश्चित काल पुढे ढकलण्यात आले होते. बंगाल हिंदुसभेने असा प्रस्ताव केला की यापुढे हिंदुमहासभेने राजकीय कार्य स्थगित करावे व केवळ एक समाजसुधारणा करणारी संस्था म्हणून काम करावे. या काळात महाराष्ट्रातील अनेकांचे मत मात्र हिंदुमहासभेने राजकारण सोडू नये असे होते. तथापि प्राप्त परिस्थितीत त्यासाठी वेगळा राजकीय पक्ष संघटित करावा, व त्यात हिंदुमहासभेच्या सभासदांनी भाग घ्यावा. याच्या उलट काहींचे मत असे होते की हिंदुमहासभेने राजकारण सोडू नये, पण हिंदुमहासभा ही इतर धर्मीयांनाही खुली ठेवावी; तर कोणत्याही परिस्थितीत हिंदुमहासभेत परधर्मीयांचा समावेश होण्याची संधि देऊ नये, त्यायोगे शुद्धिसंघटन

कार्याची हानि होईल असे अनेकांचे मत होते. हिंदुमहासभेच्या अंतर्गत असे विविध विचारप्रवाह १९४७ साली घटनासमितीने स्वतंत्र मतदारसंघ रद्द केल्यापासून वाहात होते. त्यांचा आता विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. या संबंधात अखिल भारत हिंदुमहासभेच्या दि. १४ ऑगस्ट १९४८ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत असा प्रस्ताव करण्यात आला की, या देशात लोकशाही राज्यसंस्था असावी असे हिंदुमहासभा मानते व म्हणून या उद्देशाच्या परिपूर्तीकरिता जे उपाय योजावयाचे त्यांत महासभेचे सभासदत्व जातिधर्मनिरपेक्ष रीतीने या देशाच्या सर्व नागरिकांना खुले करावें की काय याचाही अखिल भारत हिंदुमहासभा समितीने विचार करावा असे कार्यकारी मंडळास वाटते. यासाठी महासभेचे ध्येय, उद्देश व धोरण या संबंधात वरील विचारांस अनुसरून आवश्यक ते सर्व फेरफार सुचविण्यात यावेत यासाठी एक समितीही नेमण्यात आली. तीत पुढील सभासद होते: (१) श्री. ल. ब. भोपटकर, अध्यक्ष, (२) देवेन्द्रनाथ मुखर्जी, (३) महंत दिग्विजयनाथ, (४) रामचंद्र अनंत कानिटकर, (५) कृष्णाजी हरि ढमढेरे, (६) शंकर रामचंद्र दाते, (७) कॅप्टन केशवचंद्र, (८) इंद्रप्रकाश, (९) नरेंद्रनाथदास, (१०) तेजनारायण, (११) प्रो. रामसिंग, (१२) एन. पंचनाथम् अय्यर, (१३) आशुतोष लाहिरी.

हिंदुमहासभेचे दोन मोठे पुढारी या वेळी दिवंगत झालेले होते. भाई परमानंद हे दि. ८ डिसेंबर १९४७ ला वारले व डॉ. बा. शि. मुंजे हे दि. ३ मार्च १९४८ ला दिवंगत झाले. या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर हे गांधीवधाच्या खटल्यात आरोपी म्हणून गुंतविण्यात आलेले असल्याने तेही विचारविनिमयास उपलब्ध नव्हते.

या सभेंतही विविध विचार व्यक्त करण्यात आले होते. हिंदुमहासभेने राजकारण कायमचे सोडावे असे म्हणणारा एक वर्ग होता, तर देशाची फाळणी झाल्यामुळे आता उर्वरित हिंदुस्थान हा केवळ हिंदुदेशच आहे व येथे हिंदुराष्ट्र प्रस्थापित झालेले असल्याने येथे जे अल्पसंख्य परधर्मीय आहेत त्यांना वेगळे महत्त्व देण्याचे कारण नाही. त्यांना हिंदूंच्या राष्ट्रीय जीवनात विरवून टाकण्यात यावे, व या दृष्टीने या देशातील सर्व नागरिकांना ते हिंदु आहेत असे समजून हिंदुमहासभेची द्वारे खुली करावीत असे म्हणणारा दुसरा वर्ग होता.

तिसऱ्या वर्गाचे म्हणणे असे होते की, हिंदुमहासभा ही संस्था परधर्मीयांचे हिंदूकरण करते व त्यांना हिंदु समाजात एकरूप करून विरवून टाकण्याचे तिचे कार्य गेली कित्येक वर्षे चालू असून हिंदुसमाजाची सुधारणा करण्यासाठी व हिंदुसमाजाचे संघटन बळकट करण्यासाठी शुद्धीकरणाच्या व संघटनात्मकच चळवळीची आवश्यकता आहे. हिंदुमहासभेतच अन्य धर्मीयांना प्रवेश देण्याने तिच्या या शुद्धिसंघटनात्मक कार्याला अडचणी उत्पन्न होतील, म्हणून हिंदुसभेत त्यांना प्रवेश देऊ

नये. मात्र घटनात्मक राजकीय कार्यासाठी हिंदुमहासभेने स्वतंत्र संघटना उभी करावी व हिंदुसभेने शुद्धीकरण, समाजसुधारणा इत्यादि कामांवर भर द्यावा. अशा स्वतंत्र राजकीय घटनात्मक सभेचे हिंदु सभासद हे हिंदुमहासभेचे सभासद राहतीलच असेही बंधन ठेवावे. म्हणजे तेथे येणाऱ्या सभासदांमध्येही हिंदुराष्ट्रवादाचा विचार अधिकाअधिक प्रभावी करण्यास संधि मिळेल व अजून जे लोक हिंदुराष्ट्रवादापासून दूर आहेत त्यांना अधिक जवळ आणता येईल. पूर्वी काँग्रेसच्या अंतर्गत जसे स्वराज्य पक्ष, प्रतियोगी सहकारिता पक्ष किंवा नंतर लोकशाही स्वराज्य पक्ष होते, तसाच हा स्वतंत्र राजकीय घटनात्मक कार्य करणारा पक्ष असून तो हिंदुमहासभेशी निगडित असावा.

चौथ्या वर्गाचा विचार असा होता की हिंदुमहासभेचे ध्येय, धोरण व घटना आहे अशीच राहावी. परधर्मीय अल्पसंख्याकांचा वेगळा विचारच करण्याचे हिंदुसभेला कारण नाही. तिने हिंदुमहासभा हाच सर्व दृष्टींनी पूर्ण असा राजकीय पक्ष म्हणून काम करावे व त्याच्या जोडीला शुद्धिसंघटनात्मक कार्येही करावीत. आता उर्वरित हिंदुस्थानात परधर्मीय अल्पसंख्य इतके थोडे आहेत की, त्यांचा राजकीय दृष्टीने स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकताच नाही.

या विविध विचारप्रवाहांचा मेळ कसा घालावयाचा व हिंदुसभेच्या कार्याला स्थैर्य कसे प्राप्त करून द्यावयाचे हा प्रश्न होता. त्यासाठी प्रांताप्रांतांतील हिंदुसभांनीही आपआपले विचार अखिल भारत हिंदुमहासभेला कळवावेत असे सुचविण्यात आले होते. त्यावर महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेने हिंदुमहासभेत अहिंदूंना प्रवेश खुला ठेवू नये असे आपले एकमुखी मत असल्याचे अ. भा. हिंदु महासभेला कळविले.

हिंदुमहासभेचे उपाध्यक्ष डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे या वेळी केंद्रीय मंत्रिमंडळाचे सभासद होते. त्यांनी श्री. शंकर रामचंद्र दाते यांना या संबंधात एक पत्र लिहून आपले विचार स्पष्ट केले. ते पत्र असे :

Dear Mr. Date,

I have received your letter about the future of the Hindu Mahasabha. This is a matter which cannot be discussed in course of a letter. My personal view is that in a free India there is no scope for a political organisation which confines its membership to a section of the people on consideration of religion. There are two alternatives open to us. One is that the Hindu Mahasabha may remain a social, cultural and religious body and do valuable work in these spheres. Its members may join any other political organisation or may initiate a new political party with a definite

economic and political programme. The other alternative is to change the objectives and creed of the Hindu Mahasabha and throw its doors open to all. In such a case any one who accepts the programme of the reconstituted party will be welcome to Join it. Here however a difficulty arises about the name. It is urged by some that the word Hindu should be interpreted in the widest sense possible and include every citizen living in Hindustan. If such a legal definition was accepted by the Constitution the matter would have been different; but for the Hindu Mahasabha to make such a claim and call upon Christains and Muslims and others to describe themselves as Hindus will hardly produce any practical result. If, therefore, we honestly feel that the Hindu Mahasabha should throw its doors open to all, we will have to change its name and call it Bharat Mahasabha or Hindustan Mahasabha or Hind Mahasabha.

It will be for you all to consider what exactly is more suitable in the changed conditions of the country. I would like to know the reactions of various people interested in the future of the Hindu Mahasabha. It is very strongly urged by many that the balance is in favour of keeping the Hindu Mahasabha as a non-political body which may attract new people who would not come into the Hindu Mahasabha as such though its aim and objects undergo radical changes. This letter represents my personal view and is not for publication.

Syamaprasad Mookerji

श्री दि. ६ सप्टेंबर १९४८

दाते यांस – हिंदुमहासभेच्या भवितव्यासंबंधाने आपले पत्र पावले. पत्रव्यवहाराच्या रूपाने याविषयी विचारविनिमय करणे कठीण. माझे व्यक्तिशः मत असे आहे की स्वतंत्र हिंदुस्थानात धर्माच्या पायावर उभारणी असलेल्या जनतेमधील एखाद्या विभागाच्या स्वतंत्र राजकीय संघटनेला वाव नाही. अशा स्थितीत आपल्यापुढे दोन पर्याय आहेत. एक असा की, हिंदुमहासभा ही सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्य करणारी संस्था राहावी. त्या क्षेत्रात तिला पुष्कळ उपयुक्त कार्य करता येईल. तिच्या सभासदांनी दुसऱ्या राजकीय संघटनांतून राजकीय कार्य करावे किंवा आर्थिक आणि राजकीय कार्यक्रमावर आधारलेला स्वतंत्रच राजकीय पक्ष काढावा. दुसरा पर्याय असा की हिंदुमहासभेचे उद्देश

बदलावेत व तिचे सभासदत्व सर्वांना खुले ठेवावे. ज्यांना तिचा कार्यक्रम मान्य असेल ते अशा पुनर्घटित संस्थेत भाग घेतील. पण या बाबतीत नावाच्या संबंधात अडचण वाटेल. काहींचे मत असे आहे की हिंदु या शब्दाचा जास्तीत जास्त व्यापक अर्थ करावा व या देशात रहाणारे ते सर्व हिंदु समजावेत. भारताच्या घटनेने अशी व्याख्या मान्य केली तरची गोष्ट निराळी; पण एरवी ख्रिश्चन, मुसलमान आणि इतर यांनी स्वतःला हिंदू म्हणवून घ्यावे ही गोष्ट प्रत्यक्षात व्यवहार्य होणे कठीण वाटते. अशा स्थितीत हिंदुसभेत इतर धर्मीयांनाही प्रवेश मिळावा असे आपणांस प्रामाणिकपणे वाटत असेल तर आपण तिचे नाव हिंदु-महासभा ऐवजी भारत महासभा, हिंदुस्थान महासभा, किंवा हिंदमहासभा असे काही बदलावे लागेल.

आपल्या देशाच्या बदललेल्या स्थितीत कोणता पर्याय योग्य हे आपण सर्वांनी ठरवावयास हवे. हिंदुमहासभेच्या भवितव्याबद्दल आस्था बाळगणाऱ्या निरनिराळ्या मंडळींची या संबंधात कोणती प्रतिक्रिया आहे ते समजण्याची माझी इच्छा आहे. पुष्कळांचे मत असे दिसते की हिंदुमहासभा ही आहे अशीच ठेवावी व तिने राजकारणाव्यतिरिक्त कामे करावीत. तिच्या ध्येयधोरणात बदल केल्यानेही जे हिंदुसभेत येणार नाहीत असे अनेक लोक यायोगे हिंदुसभेकडे आकृष्ट होणे शक्य आहे.

या पत्रातील मते माझी व्यक्तिगत आहेत. ते प्रसिद्धीसाठी नव्हे.

आपला

श्यामाप्रसाद मुखर्जी

या संबंधात १९४९ मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी, निर्मलचंद्र चतर्जी व डॉ. नारायण भास्कर खरे यांची दिल्ली येथे हिंदुमहासभाभवनात एक बैठकही झाली. काही सर्वमान्य मार्ग काढण्याबद्दल बराच विचारविनिमय झाला; तथापि त्याला काही आकार येण्यापूर्वी डॉ. मुखर्जी काश्मीरमध्ये अटकेत पडले व तेथेच त्यांचे निधन झाले. त्यामुळे तो प्रश्न अनिर्णीतच राहिला. दाते यांनी स्वा. सावरकर यांच्याबरोबर या संबंधात विचारविनिमय केला तेव्हा हिंदुसभेची आवश्यकता त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केली व तिने राजकारण सोडू नये असेही ते म्हणाले. तथापि हिंदुसभेचा बाहेरील लोकांशी संपर्क राखण्याची व राजकारणात काही समान सूत्र निर्माण करण्याची आवश्यकता त्यांनीही मान्य केली. १९३७ वर्षी लोकशाही स्वराज्य पक्षाचे ते सभासद झाले होते व युद्धकाळात सर्वपक्षीय परिषदेतही त्यांनी भाग घेतला होता तो याच दृष्टीने.

१९४९ च्या डिसेंबरात हिंदुमहासभेचे कलकत्ता येथे अधिवेशन भरले होते. डॉ. नारायण भास्कर खरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनात हिंदुमहासभेने एक पार्लमेंटरी आघाडी उघडण्याची आवश्यकता व्यक्त केली असून तिचा कार्यक्रम मान्य असणाऱ्या सर्व अ-हिंदूंनाही ती खुली असावी असे म्हटले आहे. या अधिवेशनात स्वा. सावरकरांचेही एक भाषण झाले. त्यात त्यांनी हिंदुमहासभेची आवश्यकता प्रतिपादन केली. ते पुढे म्हणाले की, हिंदुहिताचे रक्षण करण्यासाठी गत कालाहूनही आज हिंदुमहासभेची अधिक गरज आहे. काँग्रेस आता निवडणुकांच्या दृष्टीने विचार करीत आहे. काँग्रेस नेत्यांचा सत्ताभिलाष अनिवार झाला आहे.

मुरादाबादचा ठराव

मुरादाबाद येथे हिंदुमहासभेचे अध्यक्ष डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महासभेच्या कार्यकारी मंडळाच्या दि. २ ऑक्टोबर १९५० च्या सभेत याच विषयावर अधिक विचार झाला. सदर कार्यकारी मंडळाने संमत केलेला प्रस्ताव अनेक दृष्टींनी विशेष महत्त्वाचा होता. तो असा :

" (१) हिंदुमहासभेच्या कार्यकारी मंडळाला हे मान्य आहे की भारतातील अहिंदु अल्पसंख्याक जमातींचे या देशात मोठे हितसंबंध आहेत; व हिंदुमहासभाप्रणीत हिंदुराष्ट्राच्या विचारावर आधारलेल्या राज्यव्यवस्थेखाली त्यांचे संरक्षण कसे होईल याबद्दल त्यांना काळजी वाटत असेल; तसेच या व्यवस्थेनुसार त्यांना त्यात किती प्रमाणात भाग घेता येईल व देशाचे भवितव्य घडविण्याच्या व स्वतःचे हितसंबंध सुरक्षित राखण्याच्या कामी त्यांच्या प्रतिनिधींना किती प्रमाणात वाव मिळू शकेल याबद्दल त्यांच्या मनात शंका वावरत असतील.

" (२) त्या दूर करण्याच्या हेतूने हिंदुमहासभा असे स्पष्ट नमूद करू इच्छिते की तिच्या कलकत्ता अधिवेशनात (सन १९४९) तिने जो कार्यक्रम स्वीकारला आहे तो सर्वस्वी लोकशाही व राष्ट्रीयत्व यांवर आधारलेला असून या महान् उपखंडात वास्तव्य करणाऱ्या निरनिराळ्या जातीजमातींमध्ये ती कसलाही भेदभाव करीत नाही. जातिधर्मनिरपेक्ष रीतीने या देशातील सर्व एकनिष्ठ नागरिकांना देशाच्या राज्यकारभारात समान संधि मिळेल.

" (३) निरनिराळ्या अल्पसंख्य जमातींच्या मनातील शंका कुशंका आणि चिंता दूर व्हावी व त्यांच्या प्रतिनिधींना देशाच्या राजकीय प्रगतीच्या कामी परिणामकारक रीतीने भाग घेता यावा यासाठी व महासभेने मान्य केलेल्या कार्यक्रमाची विधिमंडळातून अंमलबजावणी करण्यासाठी या देशातील सर्व अहिंदु नागरिकांना ती आपल्या लोकशाही (पार्लमेंटरी) चळवळीची दारे खुली करीत आहे.

"(४) महासभेची अशी इच्छा आहे की स्वतंत्र भारताचे भवितव्य घडविण्याच्या कामी सर्व हिंदु व अहिंदु राष्ट्रघटकांनी संयुक्तपणे भाग घ्यावा व या कामात सर्वांना योग्य ती संधि लाभावी."

पुणे अधिवेशनापुढे आलेले प्रस्ताव

दि. २ ऑक्टोबर १९५० ला वरील प्रस्ताव संमत झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आतच दि. २८ डिसेंबर १९५० ला पुण्यास अखिल भारत हिंदुमहासभेचे वार्षिक अधिवेशन डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्या वेळी कार्यकारी मंडळाने संमत केलेला मुरादाबादचा प्रस्ताव चर्चेसाठी प्रामुख्याने आला. त्यावर श्री. आशुतोष लाहिरी, कलकत्ता, श्री. गणपति, मद्रास, इंद्रप्रकाश, दिल्ली, आर. सी. सिंग, श्री. ल. ब. भोपटकर, पुणे, ओंप्रकाश कहोल, पंजाब, व शं. रा. दाते, पुणे यांनी विविध उपसूचना किंवा प्रस्ताव सुचविले होते. त्यांचे स्वरूप मूळ प्रस्तावाला कमीअधिक पूरक किंवा त्याचे अधिक स्पष्टीकरण करणारेच होते. ते असे :

श्री. आशुतोष लाहिरी यांची उपसूचना "महासभा आणखी असे घोषित करते की पार्लमेंटरी क्षेत्रात व देशाच्या राज्यकारभाराबाबत जे कोणी गट किंवा व्यक्ति आज महासभेच्या किंवा अन्य कोणत्याही संघटनेच्या बाहेर आहेत व ज्यांना महासभेचे ध्येय व त्यावर आधारलेला कार्यक्रम मान्य आहे त्यांच्याशी सहकार्य करण्याची तिची तयारी आहे. त्यांच्या सहकार्याने नव्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांचा पाठिंबा तिला मिळावा अशी तिची इच्छा आहे. या दृष्टीने महासभेच्या अध्यक्षांनी व केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाने अशा प्रकारचे सहकार्य कितपत मिळू शकेल व काँग्रेसची कुजलेली राजवट नष्ट करण्यासाठी संघटित व पद्धतशीर प्रयत्न कसा करता येईल यासाठी प्रयत्न करावा.

मद्रासचे गणपति यांनी मुरादाबादच्या प्रस्तावातील शेवटचे (३ रा व ४था) परिच्छेद गाळावेत असे सुचविले.

श्री. इंद्रप्रकाश, दिल्ली यांनी मुरादाबादच्या ठरावातील 'अल्पसंख्याक' या शब्दापुढे "भारतीय संघराज्याला जे नागरिक एकनिष्ठ राहणार नाहीत ते वगळून" अशी दुरुस्ती सुचविली.

श्री. सिंग यांनी तीन वर्षेपर्यंत या पद्धतीने विधिमंडळातील कामाचा अनुभव लक्षात घेऊन नंतर या धोरणाचा फेरविचार करावा असे सुचविले.

श्री. ल. ब. भोपटकर यांचा ठराव : "महासभेचे असे मत आहे की देशाच्या हिताचा व्यापक दृष्टीने विचार करता आता अशी वेळ आली आहे की, या देशातील सर्व राष्ट्रवादी व लोकशाही प्रवृत्तीचे पुरस्कर्ते यांना एका बैठकीवर आणून विधिमंडळात घटनात्मक विरोधी पक्ष बनविण्याचा उपक्रम करण्यात यावा. असे न

झाले तर या देशात लोकशाही कारभार म्हणजे एक सोंग व थट्टेचा विषय होऊन बसेल व त्यातून हुकुमशाही निर्माण होईल व तिचे दुष्परिणाम भोगावे लागतील.

" म्हणून महासभा असे स्पष्ट करते की अशा नव्या वेगळ्या पक्षाच्या स्थापनेच्या कामी सहकार्यास ती तयार असून असा पक्ष जातिधर्मनिरपेक्ष असावा व तो स्वतःच्याच घटनेनुसार चालावा. त्याची उभारणी लोकशाही व राष्ट्रीयत्व यांवर केलेली असावी. अशा पक्षाला राष्ट्रीय लोकशाही (नॅशनल डेमोक्रॅटिक) पक्ष किंवा अन्य काही नाव द्यावे.

" महासभेचे असे मत आहे की अशा पक्षस्थापनेने हिंदुमहासभेची विचारसरणी उत्क्रान्त होईल व जे घडून यावे म्हणून गेली कित्येक वर्षे ती खटपट करीत होती व ज्यासाठी तिने एवढा त्यागही केला ते घडून येईल. तसेच महासभेच्या उद्देशासंबंधाने असलेले गैरसमज नष्ट होऊन उलट तिचे महत्त्व वाढेल."

श्री ओंप्रकाश यांचा प्रस्ताव – " हिंदुमहासभेस हे मान्य आहे की या देशातील निरनिराळ्या अल्पसंख्य अहिंदु जमातींनी आपले हितसंबंध भारताशी पूर्णपणे एकरूप केले असून महासभेच्या हिंदुराष्ट्रविषयक ध्येयानुसार हिंदूंशी हातात हात घालून सहकार्य करण्याची त्यांची मनीषा आहे. अशा लोकांना भारताच्या पुनर्घटनेत पूर्णपणे भाग घेण्याची संधि असावी.

" महासभा हे स्पष्ट करू इच्छिते की तिच्या कलकत्ता येथील अधिवेशनात तिने जो कार्यक्रम स्वीकारला आहे तो सर्वस्वी लोकशाही व राष्ट्रीयत्व यांवरच आधारलेला असून हिंदुस्थानात वास्तव्य करणाऱ्या जातीजमातींमध्ये ती कसलाही भेदभाव करीत नाही. देशाच्या राज्यकारभारात जातिधर्मनिरपेक्ष रीतीने सर्व देशनिष्ठ नागरिकांना समान संधि प्राप्त व्हावी असे तिचे म्हणणे आहे.

" हा हेतु कार्यवाहीत आणण्यासाठी व देशाच्या राजकीय प्रगतीत अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधींना योग्य भाग घेता यावा यासाठी व आपला कार्यक्रम विधिमंडळांच्या द्वारा अमलात आणण्यासाठी महासभा आवश्यकता निर्माण झाल्यास इतर राजकीय पक्षांशी, गटांशी अगर व्यक्तींशी पार्लमेंटरी कामापुरते सहकार्य करील.

" महासभेची अशी इच्छा आहे की आपल्या सर्वांच्या या मातृभूमीचा उत्कर्ष घडवून आणण्यासाठी भारतातील सर्व हिंदु व अहिंदु नागरिकांनी संयुक्तपणे हातभार लावावा व त्या कामी सर्वांना योग्य ती संधि मिळेल असे महासभा आपल्याकडून अल्पसंख्य जमातींना आश्वासन देत असून त्यांना सहकार्याची विनंती करीत आहे."

श्री. शं. रा. दाते यांचा ठराव–" या देशात निरनिराळ्या अहिंदु अल्पसंख्य जमाती असून ज्यांनी स्वतःस व आपले हितसंबंधही सर्वस्वी या देशाशी एकरूप

केले आहेत व जे हिंदूंशी हातात हात घालून महासभाप्रणीत हिंदुराष्ट्राच्या ध्येयानुसार काम करण्यास तयार आहेत, अशा लोकांना या राष्ट्राच्या पुनर्घटनेच्या व उद्धाराच्या कामी आपले शक्तिसर्वस्व लावण्यास संधि दिली पाहिजे.

" हिंदुमहासभा असे स्पष्ट करू इच्छिते की तिचे उद्देश व १९४९ साली कलकत्ता अधिवेशनात तिने मान्य केलेला कार्यक्रम हे राष्ट्रवाद व लोकशाही या तत्त्वावरच सर्वस्वी आधारलेले असून हिंदुस्थानात वास्तव्य करणाऱ्या निरनिराळ्या जातीजमातींत ती भेदभाव करीत नाही. ती जातिधर्मनिरपेक्ष रीतीने सर्वांना समान संधि देईल.

" हे उद्देश कार्यवाहीत आणण्यासाठी महासभा आपल्या लोकशाही आघाडीची (पार्लमेंटरी फ्रंट) दारे अल्पसंख्याकांना खुली करीत असून देशात लोकशाही राजवट नांदावी अशी तिची इच्छा आहे व त्यासाठी ती इतरांचे सहकार्य अपेक्षित आहे.

" हिंदुमहासभेच्या लोकशाही आघाडीचे नाव हिंदुस्थान महासभा किंवा महासभेची लोकशाही आघाडी असे असावे. हा पक्ष हिंदुमहासभेच्या बाहेरील इतर भारतीय नागरिकांनाही खुला राहील. हिंदुमहासभेचे सभासद या पक्षात पदसिद्ध सभासद राहतील. (त्यांनी या पक्षाचे पुन्हा वेगळे सभासद होण्याची आवश्यकताच नाही.) या पक्षाचे काम स्वतःच्या घटनेनुसार चालेल. ही घटना घडवून आणण्यासाठी एक समिति नेमण्यात यावी. "

महाराष्ट्र हिंदुसभेतील चर्चा

पुण्याच्या १९५० वर्षीच्या अधिवेशनात या प्रश्नावर पुष्कळच चर्चा झाली. श्री. गोगटे, वि. घ. देशपांडे, नलावडे, रा. स. भट इत्यादि मंडळी हिंदुसभेच्याच द्वारे निवडणुकीचेही राजकारण करावे व हिंदुसभेची घटना आज आहे तशीच राहावी, त्यात परिवर्तन करू नये या मताचे होते तर दाते, कृ ह. ढमढेरे, कानिटकर व महाराष्ट्रातील व उत्तर भारतातील बरीच मंडळी हिंदुसभेच्या विद्यमान घटनेत बदल करू नये याच मताची होती, पण मुरादाबादच्या प्रस्तावाचा पुरस्कार करणारी होती. चर्चा फार लांबत चालली व निर्णय करणे कठीण झाले तेव्हा याच विषयाचा विचार करण्याकरिता महासभेचे विशेष अधिवेशन बोलवावे असे ठरले. त्याप्रमाणे ते २७ ते २९ एप्रिल १९५१ मध्ये जयपूर येथे भरले. त्या आधी प्रांताप्रांतातील हिंदुसभांनीही या संबंधात आपले मत व्यक्त करावे असे सुचविण्यात आले होते. त्यास अनुसरून महाराष्ट्र हिंदुसभेने मुरादाबादचा ठराव व पुणे अधिवेशनात त्यावर आलेल्या निरनिराळ्या उपसूचना व ठराव हे सर्व छापून महाराष्ट्रातील जिल्हासभांकडे व हिंदुसभा कार्यकर्त्यांकडे पाठविले व त्यावर त्यांची लेखी मते मागविली. सुमारे अडीचशे लोकांनी मते पाठविली. या मतांपैकी

सुमारे ८० टक्के मते मुरादाबादच्या प्रस्तावास अनुकूल होती. (त्यातील काही भोपटकर तर काही दाते यांच्या प्रस्तावास अनुकूल होती.) तर सुमारे २० टक्के सभासदांनी निवडणुकीचे राजकारणही हिंदुसभेच्याच वतीने करावे असे सुचविले होते. पुढे पुण्यास दि. २४ व २५ फेब्रुवारी १९५१ ला महाराष्ट्र हिंदुसभेची बैठक सभेचे अध्यक्ष श्री. रामभाऊ मंडलिक यांच्या अध्यक्षतेखाली झाली, तिला पुण्याबाहेरील प्रतिनिधि फार थोडे उपस्थित होते. ज्यांनी आपली लेखी मते आधीच पाठविली होती त्यांनी सभेपुढे एवढाच विषय असल्याने व त्यांनी आपली मते आधीच कळविली असल्याने त्यांच्यापैकी बरेच जण या सभेला उपस्थित नव्हते. महाराष्ट्र प्रांतिक समितीच्या सुमारे दीडशे सभासदांपैकी उपस्थित राहिलेल्या एकूण ४५ सभासदांच्या या बैठकीत हिंदुसभेच्या वतीनेच राजकारण करावे असा प्रस्ताव २६ वि. १४ मतांनी संमत झाला, पण हे मत महाराष्ट्र हिंदुसभेचे प्रातिनिधिक मत समजता येणार नाही असे सभेचे कार्यवाह श्री. बाबाराव काळे यांनी एका पत्रकाद्वारे घोषित केले व लेखी आलेल्या विचारांच्या तपशिलासह सर्व वृत्तान्त महासभेच्या कार्यालयाकडे पाठविला.

महाराष्ट्रातील निरनिराळ्या हिंदुसभा कार्यकर्त्यांकडून लेखी स्वरूपात आलेल्या मतांचा जास्तीत जास्त समन्वय घडवून आणण्याच्या दृष्टीने व त्यांचा एकत्रिक समावेश करण्यासाठी दाते यांनी एक नवा प्रस्ताव तयार करून तो महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या समितीच्या या सभेपुढे मांडला होता. तो असा :

" भारत हे आता स्वतंत्र व सार्वभौम राज्य निर्माण झाले असून येथील राज्यघटनेतून स्वतंत्र जातीय मतदार संघाचे उच्चाटन झाले आहे हे लक्षात घेऊन,

" भारतात सर्व जातीजमातीत सलोख्याचे व मित्रत्वाचे संबंध निर्माण करून सर्वांचे मिळून भारतीय राष्ट्र निर्माण करण्याचा महासभेचा उद्देश तिच्या घटनेतच नमूद आहे हे लक्षात घेऊन,

" अखंड भारताचे एकसंध राज्य निर्माण करावे व या देशाची संस्कृति आणि परंपरा यांवर उभारलेले लोकशाही शासन निर्माण करावे आणि सर्व लोकांत आत्मभाव निर्माण करण्याचा व समान हक्क, समान कर्तव्ये आणि समान संधि यावर उभारलेली समाजरचना निर्माण करावी हा महासभेच्या घटनेतील उद्देश लक्षात घेऊन, तसेच

" महासभेच्या कार्यकारी मंडळाने दि. ७ व ८ ऑगस्ट १९४८ रोजी असा ठराव केला की या देशात प्रबळ लोकशाही शासन निर्माण करण्यात यावे आणि त्यासाठी मुरादाबाद येथे भरलेल्या सभेत दि. २।१०।५० रोजी असा ठराव केला की अल्पसंख्य जमातींना महासभेच्या लोकशाही राज्यकारभारात समाविष्ट होण्यास संधि द्यावी हे लक्षात घेऊन,

" आणि शिवाय हिंदु या शब्दाची व्याख्या बदलू नये असे या सभेचे स्पष्ट व सर्वांना मान्य असे मत असल्यामुळे व अशा स्थितीत अल्पसंख्याकांच्या संबंधात महासभेचे धोरण काय असावे याविषयी प्रांतिक सभांनी आपापली मते कळवावी अशी महासभेच्या कार्यालयाने विचारणा केली असल्यामुळे ही सभा आपले मत असे सुचविते की,

" अशा परिस्थितीत महासभेचे पार्लमेंटरी कार्य तिच्या इतर कार्यापासून अलग करावे. या पार्लमेंटरी कार्यासाठी स्वतंत्र संघटना निर्माण करावी व तेथे हिंदूंच्या शिवाय जे कोणी भारताचे अहिंदु नागरिक भारताच्या अखंडत्वावर विश्वास ठेवणारे असतील, जे या देशाशी सर्व दृष्टींनी एकरूप झालेले असतील, तसेच ज्यांना मुस्लिम लीगवाल्याप्रमाणे परदेशी (एक्स्ट्रा टेरिटोरियल) आकांक्षा किंवा आत्मसंबंध पूर्वीही नव्हते व आताही नाहीत,

" तसेच महासभेच्या घटनेत नमूद केल्याप्रमाणे हिंदुराष्ट्रवादानुसार वागणाऱ्या हिंदूंच्या बरोबरीने व सहकार्याने जे भारताचा उद्धार करण्यास तयार असतील, अशांचाही या पार्लमेंटरी पक्षात अंतर्भाव होण्यास मोकळीक असावी. त्याकरता या राजकीय पक्ष संघटनेस भारतीय महासभा असे स्वतंत्र नाव द्यावे. महासभेचे उद्देश मान्य करणाऱ्या (मुस्लिम लीगच्या सभासदांस वगळून इतर) अल्पसंख्याकांना या संघटनेचे सभासद होण्याची मोकळीक असावी. या संघटनेचे कार्य स्वतंत्रपणे चालावे व त्यासाठी लागणारे नियम तिचे तिने करावेत."

वरील ठराव दाते यांनी मांडल्यावर व त्यास अनुमोदन देण्यात आल्यावर याच विषयावरील दुसरा ठराव श्री. वा. ब. गोगटे यांनी मांडला. तो असा :

(१) महासभेच्या पार्लमेंटरी कामापुरता सुद्धा महासभेत अहिंदूंचा समावेश करण्यास ही सभा अत्यंत विरुद्ध असून सदर मुरादाबादचा ठराव गाडून टाकण्यात यावा.

(२) भोपटकर किंवा दाते यांच्या ठरावात सुचविल्याप्रमाणे स्वतंत्र राजकीय पक्ष काढण्याच्या कामी महासभेने पुढाकार घेण्याच्या विरुद्ध ही सभा आहे. अशा तऱ्हेची पार्लमेंटरी संघटना किंवा राजकीय पक्ष काढणे म्हणजे महासभेने आत्महत्या करण्यासारखे आहे.

(३) हिंदुमहासभेने सांस्कृतिक व राजकीय अशी कामे आजपर्यंतच्या प्रमाणेच करावीत. महासभेने राजकारणात आजपर्यंत महत्त्वाचे कार्य केले असून अखंड भारत निर्माण करण्याचे व हिंदुराष्ट्र, हिंदु संस्कृति आणि हिंदु समाजजीवन प्रस्थापित करण्याचे काम ती करू शकेल.

(४) महासभेने आपल्या पार्लमेंटरी चळवळी व निवडणुकी स्वत:च्याच नावावर कराव्यात व या कामी इतर व्यक्ति, संस्था किंवा पक्ष यांच्याशी प्रतियोगी सहकारित्व करावे.

(५) महासभेने आपले नाव बदलण्याचे, स्वतंत्र पार्लमेंटरी पक्ष काढण्याचे किंवा आपल्या मूलभूत धोरणात फरक करण्याचे कारण नाही, किंवा महासभेच्या कलकत्ता येथील अधिवेशनातील (१९४९) किंवा पुणे अधिवेशनातील (१९५०) कार्यक्रमात बदल करण्याचेही कारण नाही.

गोगटे यांच्या ठरावाशिवाय सांगलीचे श्री. माधवराव दिवाण यांनी भोपटकर व ओमप्रकाश कहोल यांच्या ठरावातील काही शब्दयोजना एकत्रित करून एक प्रस्ताव तयार केला. तोही सभेपुढे मांडण्यात आला.

दोन विचारप्रवाह

श्री. दाते यांनी मांडलेल्या ठरावावर दाते, हरिभाऊ भिडे, श्री. गणपतराव फडके, का. म. महाजन प्रभृतींची भाषणे झाली व त्यांनी त्यास पाठिंबा दिला. या मंडळींच्या विचारसरणीचा आशय सामान्यतः पुढीलप्रमाणे होता :

दाते म्हणाले की, मुरादाबाद ठरावासंबंधाने माझे म्हणणे अधिक स्पष्ट करण्याकरिता मी एक वेगळा ठराव सुचविला असला तरी त्या मूळ ठरावामागील मुख्य हेतु मला मान्य आहे. त्या हेतूचे असंदिग्ध स्पष्टीकरण करण्यासाठी मी जरा वेगळ्या पद्धतीने हा ठराव मांडला आहे इतकेच; गेल्या दोन महिन्यांत माझे जे निरनिराळ्या मंडळींशी बोलणे झाले, त्याचप्रमाणे ज्या अनेक लोकांनी आपापली मते लिहून पाठवली त्यांत जी मते व जे विचार व्यक्त झाले आहेत ते सर्व लक्षात घेता मूळ ठरावात काही आणखी भर घातल्यास तो कदाचित् आणखी पुष्कळांना मान्य होईल असे मला वाटल्यावरून मी या सभेपुढे आणखी एक मसुदा मांडीत आहे

या ठरावाचे दोन भाग आहेत. पहिल्या प्रास्ताविक विभागात ठरावाच्या कारणांची नोंद केली असून ठरावाची कार्यवाही दुसऱ्या भागात सुचविली आहे. असा ठराव का करावा याची जी कारणे घडली आहेत व त्या संबंधात महासभेने आतापर्यंत जे विचार वेळोवेळी व्यक्त केले आहेत त्यांच्याशी सुसंगत असाच हा ठराव आहे.

जोपर्यंत हा देश स्वतंत्र नव्हता तोपर्यंतची परिस्थिति वेगळी होती. फोडाझोडा तत्त्वाने वागणाऱ्या इंग्रजांनी त्या वेळी बहुसंख्य हिंदूंना कृत्रिम रीतीने अल्पसंख्य केले होते. मुसलमानांना हिंदूविरुद्ध चिथवून व साहाय्य करून, त्यांना स्वतंत्र मतदारसंघ देऊन व इतर विविध रीतींनी हिंदूंचा छळ करून, हिंदु बहुसंख्य

असताही त्यांस अल्पसंख्य समाजाचे स्वरूप इंग्रजांनी दिले व हिंदूंना हिंदु म्हणून जगणेच त्यामुळे या देशात अशक्यप्राय करून टाकले. अशा स्थितीत हिंदूंच्या संरक्षणार्थ महासभेला पुढे यावे लागले.

हिंदु समाजाचा सर्वांत मोठा भरणा असलेली जी काँग्रेस ती जर खरोखर राष्ट्रीय भूमिकेपासून विचलित झाली नसती, तिने जातीय मतदारसंघांना मान्यता दिली नसती, मुसलमानांचा अनुनय केला नसता, व त्यांच्या वाढत्या मागण्यांना ती मान्यता देत सुटली नसती, तर कदाचित् हिंदुसभेला स्वतंत्र राजकीय पक्ष बनण्याचे कारणही पडले नसते. परंतु तसे झाले नाही.

मुसलमानांच्या मनातील मूळच्या राजकीय महत्त्वाकांक्षेस इंग्रजांची फूस मिळाल्याने तिची वाढ झाली, व स्वातंत्र्याच्या चळवळीत मुसलमान आपल्या बाजूस यावेत या लोभाने काँग्रेसवाल्यांनी मुसलमानांच्या अराष्ट्रीय मागण्यांच्या अनुनयाची पराकाष्ठा केली. त्यामुळे मुसलमान अधिकच शिरजोर झाले व अखेर त्यातूनच पाकिस्तान निर्माण झाले.

हे सर्व खरे असले तरी आता भारत स्वतंत्र झाला आहे, एवढेच नव्हे, तर काँग्रेसवाल्यांनी पूर्वी केलेली चूक आता सुधारली असून नव्या घटनेतून स्वतंत्र मतदारसंघ काढून टाकले आहेत. आता या देशातून परके राज्यकर्ते निघून गेले असून राज्यघटनाही निदान एवढ्यापुरती तरी निर्दोष झाली आहे.

आता निवडणुकीत मते मिळविण्याकरिता काँग्रेस जर मुसलमानांची अजीजी करील, तर त्याच प्रमाणात हिंदूंची तिच्यावर अधिक नाराजी होईल. त्यामुळे काँग्रेसच्या मुसलमानांचा अनुनय करण्यालाही काही मर्यादा आपोआप बसणार आहे व जों जों आपण या अनुनयाविरुद्ध प्रचार करू तों तों त्याला अधिकाधिक पायबंद बसेल.

पण हे करताना हिंदुसभावाद्यांनी आपली राजकीय भूमिका पायाशुद्ध राखली पाहिजे. तसे न झाले तर आपल्या प्रचारात वैगुण्य राहील. इतरांना त्यात बोट शिरकविण्यास जागा मिळेल, व आपल्यालाही जाणत्या लोकमताचा पाठिंबा पुरेशा प्रमाणात मिळणार नाही. शिवाय असे की, महासभेने वेळोवेळी ज्या घोषणा केल्या आहेत व आपले उद्देश व्यक्त केले आहेत, ते लक्षात घेता महासभेने आता आपल्या राजकीय धोरणात सुसंगत असे फेरफार करणे अवश्य आहे.

महासभेच्या घटनेतील उद्देशातच असे म्हटले आहे की हिंदु व अहिंदु समाजात स्नेहभाव वाढवून त्यांच्यातून एकजिनसी असे भारतीय राष्ट्र निर्माण करणे हे महासभेचे उद्दिष्ट आहे. (महासभेची घटना सन १९४६) तसेच महासभेने लोकशाही राज्य शासनाचा पुरस्कार केला असून (घटना सन १९५०) सर्वांना समानतेने

वागवावे व सर्वांना समान अधिकार, समान कर्तव्ये, सर्वांवर समान जबाबदाऱ्या असाव्यात अशी तिची घोषणा आहे. या दृष्टीने पाहता आता आपणांला राजकारणात अमुक एक अल्पसंख्य व अमुक बहुसंख्य अशी भाषाच वापरता येणार नाही. राजकारणात सर्व सारखे, सर्व समान, व सर्वांच्या मिळून राष्ट्रीय एकजिनसीपणाची आवश्यकता ही भूमिका महासभेने मान्य केलेली आहे.

अशा स्थितीत स्वतंत्र भारताचे राजकारण महासभेने करावयाचे म्हटले तर तिच्या पक्षाची रचनाही त्यास अनुसरून सर्वांना सारखे वागविणारीच असणे अवश्य आहे. आज महासभेच्या कार्यक्षेत्रात केवळ राजकीय विभाग नसून त्यात धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक विभागही असल्यामुळे सर्वांची एकत्र गुंफण आहे. त्यामुळे एरवी साधा व सोपा असणारा हा प्रश्न अवघड होऊन बसला आहे.

जर या देशातील समाज सांस्कृतिक व राजकीय दृष्ट्याही एकजिनसीच असता, येथे अल्पसंख्य समाज मुळीच नसते, तर येथे हा प्रश्नच उपस्थित झाला नसता. कारण सर्वच गोष्टी सर्वच समाजास सारख्याच लागू पडल्या असत्या. पण आज तसे येथे नाही.

या देशात फाळणी झाल्यावरही तीन चार कोटी मुसलमान, सुमारे एक कोटी ख्रिश्चन व कित्येक लाख पारशी व इतरही अनेक येथे आहेत. हे सर्वच लोक या देशाशी निष्ठावंत आहेत असे नाही. पण हे सर्वच फितुरी करणारे निमकहराम आहेत असेही मानणे चूक आहे.

विशेषत: पाकिस्तानी मुसलमानांची प्रवृत्ति या देशाशी फितुरीची होती व आहे. मुस्लीम लीगवाल्यांनी पाकिस्तान निर्माण केले. आज या देशात व विशेषत: आपल्या प्रांतात हजारो छुपे पाकिस्तानी मुसलमान आहेत, त्यांची आपण गय करून चालणार नाही, ते अस्तनीतल्या निखाऱ्याप्रमाणे वागण्याचा संभव आहे. अशा लोकांच्या हेतूबद्दल व धोरणाबद्दल लोकांना संशय वाटला तर ते स्वाभाविक आहे. हे सर्व खरे आहे व त्यामुळे जास्तीत जास्त सावधगिरीची आज आवश्यकता आहे. आजच मुसलमान लोक काँग्रेसच्या कच्छपी अधिकाधिक लागत आहेत, व त्यामुळे काँग्रेसवाले त्यांच्या मतासाठी अधिकाधिक मुसलमानधार्जिणे होण्याची भीति आहे.

पूर्वी इंग्रज येथील मुसलमानांना फूस देत होते. पण आता त्यांच्यापेक्षा कितीतरी अधिक मोठ्या प्रमाणावर पाकिस्तानातील सरकारचा व लोकांचा येथील मुसलमान लोकांना पाठिंबा मिळत आहे.

अशा स्थितीत या लोकांच्या कारवायांना जर पायबंद घालावयाचा असेल तर त्यांची स्वतंत्र अशी संघटना कोठेही निर्माण होऊ देणेच धोक्याचे आहे. त्यांच्यातील लोकांची निरनिराळ्या राजकीय पक्षांत वाटणी झाली तर कोणी

काँग्रेसवाले म्हणून, तर कोणी समाजवादी म्हणून, तर कोणी कम्युनिस्ट म्हणून तर कोणी अन्य कोणी म्हणून पुढे येतील व त्यांची स्वतंत्र संघटना या देशात बळ धरू शकणार नाही. पण त्यासाठी आपण आपलीही स्वतंत्र हिंदूपुरती राजकीय संघटना करण्याचे सोडून दिले पाहिजे.

जेव्हा आपण पारतंत्र्यात होतो, व बहुसंख्य असताही आपणास सरकारने कृत्रिम रीतीने राजकीय दृष्ट्या अल्पसंख्य बनवून हिंदु म्हणून जगणेही अशक्यप्राय करून सोडले होते, त्या वेळी हिंदूंना स्वतंत्र राजकीय पक्षसंघटनेची विशेष आवश्यकता होती. पण तो काळ आता निघून गेला आहे. आपला देश स्वतंत्र झाला असून खंडित भारताचे कां होईना, पण आपण मालक झालो आहो. आज या देशात हिंदूंचे राज्य प्रस्थापित झाले आहे व त्यामुळे या देशातील राजकारणाची सूत्रे खेळविण्याची सत्ता व सामर्थ्य आज आपल्या हाती आले आहे. काँग्रेसवाले आपल्या भ्रांतिष्ट विचारसरणीस अनुसरून कितीही सेक्युलरपणाच्या गप्पा मारीत असले तरी आज या देशात हिंदु राज्य निर्माण झाले आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. अशा स्थितीत आता यापुढे या देशात अल्पसंख्याकांचा प्रश्नच कसा नाहीसा होईल याचा आपण विचार करावयास पाहिजे.

तो विचार दोन प्रकारांनी करता येतो. एक पाकिस्तानने आपल्या देशातील सर्व अल्पसंख्याकांना हाकलून लावण्याचे व पाकिस्तान निहिंदु करण्याचे धोरण स्वीकारले, व त्याप्रमाणे पश्चिम पाकिस्तानातून त्यांनी बहुतेक सर्व हिंदु ठार मारले किंवा हाकलून लावले. त्याचीही भारतात काही कमी प्रतिक्रिया झाली नाही. पंजाबची फाळणी होताच तेथील हिंदु-मुसलमानांची अदलाबदल झाली, काँग्रेस सरकारला नाइलाजाने, स्वतःच्या इच्छेविरुद्ध पण लोकमताच्या दाबामुळे ती करणे भाग पडले.

जर गेल्या वर्षी पूर्व बंगालमधील मुसलमानांनी हिंदूवर अत्याचार करून त्यांस पिटाळून लावले तेव्हा लोकमताचा भारत सरकारवर तसाच दाब राहिला असता तर बंगालमध्येही मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येची अदलाबदल करणे सरकारला भाग पाडता आले असते. पण नेहरू सरकारच्या डोक्यात सेक्युलरवाद, जातीयताविरोध इत्यादि संबंधाने गांधीवादी व आत्मघातकी असे भ्रांत विचार असल्यामुळे त्यांनी लोकसंख्येच्या अदलाबदलीस या वेळी फार विरोध केला व दबलेल्या लोकमताचा त्यांजवर दाब पडू शकला नाही, तथापि आज ना उद्या ही पाळी येणार आहे व तिला आपणांस तोंड द्यावे लागणार आहे. तरच हा हिंदु-मुसलमानांचा प्रश्न बऱ्याच प्रमाणात सुटणार आहे. तथापि अशा रीतीने बरेचसे पाकिस्तानी प्रवृत्तीचे भारतातील मुसलमान पिटाळून पाकिस्तानात

पाठविणे अवश्य व इष्ट असले तरी या देशातील अल्पसंख्याकांचा प्रश्न तेवढ्याने संपतो असे मात्र नाही.

येथले मूळचे असलेले पण बाटून ख्रिस्ती-मुसलमान झालेले, पण हिंदूंच्याच संस्कारांत वाढलेले किती तरी लोक येथे राहणार आहेत. तसेच सर्व परिस्थितीत या देशाशी प्रामाणिकपणाने एकनिष्ठ राहिलेला पारशी समाज येथे आहे. त्यांनी या देशाला आपलेच घर केले आहे. इतरही अनेक अल्पसंख्य अहिंदु समाज वा जाती या देशात आहेत. त्यांचा प्रश्न आपण कसा सोडविणार? का त्यांना वाऱ्यावर सोडून देणार? ज्यांना आपली विचारसरणी मान्य आहे अशा अहिंदु समाजातील लोकांना ते केवळ अहिंदु आहेत म्हणून आपण आपल्या राजकीय संघटनेत घेण्याचे टाळावे काय? की त्यांचा आपल्यात समावेश करावा?

आपण हिंदु या शब्दांची जी व्याख्या केली आहे व जी बदलू नये असे आपणा सर्वांस वाटते. त्या व्याख्येप्रमाणे हे लोक हिंदु या शब्दात अंतर्भूत होत नाहीत. आपली व्याख्या प्रादेशिक व काहीशी धार्मिक व सांस्कृतिक आहे. ज्यांची पितृभूमि हा देश आहे व ज्यांचे धर्म याच देशात जन्मास आलेले आहेत अशा लोकांनाच हिंदू असे आपण म्हणतो. पारशी लोक येथे येताना आपला अग्नि घेऊन आले; ते जर इराणातून तो इकडे न आणता येथेच यज्ञात अरणीतून अग्नि निर्माण करतात तसे करते तर त्यांना आम्ही वेगळे वेदपंथी म्हणून हिंदु समजलोही असतो. तथापि त्यांनी आता हा देश सर्व दृष्टींनी आपला असेच मानले आहे. त्यांचा या देशाच्या राजकीय जीवनात व आपल्या राजकीय संघटनेत समावेश करून घेणे इष्ट नाही काय?

आपल्या हिंदुत्वाची व्याख्या पाहता तिचा रोख राष्ट्रनिष्ठेवर आहे. अलीकडच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे या देशातील ज्या लोकांना राष्ट्रबाह्य निष्ठा (Extra Territorial Affinity) नाही ते लोक या देशाचे राष्ट्रीय होत असे हिंदुसभेला वास्तविक म्हणावयाचे आहे. या दृष्टीने विचार केला तर बरेच मुसलमान (निदान मुस्लिम लीगवाले तरी) हे या देशाचे राष्ट्रीय म्हणता येणार नाहीत. पण या देशातील ख्रिश्चन किंवा पारशी यांना हे विशेषण किंवा खरे म्हणजे दूषण लावता येणार नाही. उलट हिंदूंमधील जे कम्युनिस्ट किंवा इतर रशियानिष्ठ आहेत तेही पाकिस्तान्यांइतकेच अराष्ट्रीय व या देशाचे शत्रु समजावे लागेल.

सावरकरांनी हिंदुत्वाची व्याख्या केली तेव्हा माणसाचे मन राष्ट्रीय व निष्ठावंत बनविण्यास केवळ पितृभूमीच समर्थ नसून, विशेषतः मुसलमानांच्या बाबतीत पितृभूमीऐवजी धर्मभूमीच अधिक समर्थ आहे असे त्यांस आढळून आले व म्हणून त्यांनी पितृभूमि व धर्मभूमि यांवर सारखाच जोर दिला.

पाकिस्तानी मुसलमान सांगतात की जगात कोठेही राहणारे मुसलमान तेवढेच एकमेकांना जवळचे, व ते सर्व एकाच राष्ट्राचे घटक असे समजावे. ही पाकिस्तान्यांची विचारसरणी आहे. जर सावरकर हिंदुत्वाची आज व्याख्या करते तर त्यांना असे दिसून आले असते की, धर्माइतकीच कम्युनिझमची प्रेरणा काही ठिकाणी जाज्वल्य असून अनेक कम्युनिस्टांची रशियानिष्ठा तितकीच तीव्र आहे. तेही या अर्थाने या देशाचे खरे राष्ट्रिक नव्हेत, व म्हणून त्यांनाही वगळता येईल अशी व्याख्या करावी लागेल.

म्हणून जो जो कोणी या देशाहून अन्य देशावर प्रेम करतो, त्याजवर निष्ठा ठेवतो, कोणत्याही कारणाने असो, पण दुसऱ्या देशाला स्वदेशापेक्षा अधिक जवळचा मानतो, त्याला या देशाचे राष्ट्रीयत्व प्राप्त होता कामा नये.

हे लोक उपरे होत. ते या देशाचे नव्हेत. ते केव्हा दगा करतील याचा नेम नाही, त्यांना आपल्या पक्षातून कटाक्षाने वगळावे हेच युक्त आहे. पण असे करीत असताना जे कोणी तसे नाहीत, तर उलट या देशावर खरेखुरे प्रेम करणारे, त्याशी एकनिष्ठ राहणारे आहेत अशा सर्व लोकांचा, त्यांचा पारमार्थिक धर्म कोणताही असला तरी आपल्या राजकीय पक्षात समावेश करणें, म्हणजे ज्यांची त्यात याव-याची इच्छा असेल त्यांस येऊ देणे, त्यांस प्रतिबंध न करणे हे अवश्य आहे. यात या अल्पसंख्याकांचा अनुनय नसून या योगाने ते ते समाज या देशातील हिंदुसमाजाशी अधिकाधिक एकरूप बनून जातील. पूर्वी शक, हूण इत्यादि या देशात आले तेव्हा त्यांना अशाच रीतीने हिंदु समाजाने पचविले आहे. त्याच धोरणास अनुसरून आमचे म्हणणे असे की, हिंदुसमाजाने त्यांना आपल्यात पचवून टाकावे व जे कोणी गणंग आहेत त्यांना उघडे पाडून या देशात राहणे अशक्य करून टाकावे. फितुरी कर-णाऱ्यांना येथे कोणत्याही प्रकारे स्थान असता कामा नये.

ही विचारसरणी लक्षात घेता आता अशी वेळ आली आहे की, हिंदूंनी अल्प-संख्याकांच्या संबंधातील आपल्या धोरणात फरक केला पाहिजे. १९४७ सालच्या राज्यक्रांतीने हिंदुसमाजाची पूर्वीची भूमिका साफ बदलून गेली आहे. जे लोक पारतंत्र्यामुळे राज्ययंत्राखाली चिरडले जात होते, ते आता प्रत्यक्ष राज्यकर्ते झाले आहेत. अशा स्थितीत परिस्थितीत पडलेल्या फरकाबरोबर आपल्या राजकीय धोरणातही फरक पडणे अवश्य आहे.

हिंदुसभेने हा फरक व्यक्त करावयाचा म्हणजे अल्पसंख्याकांचा – जे या देशाशी खरेखुरे एकनिष्ठ आहेत अशा अल्पसंख्य अहिंदू जमातींचा – कोणताही भेदभाव न ठेवता हिंदसभेच्या राजकीय कार्यात समावेश करावयास हवा. हिंदुसभेत

त्यांचा समावेश करण्यास हरकत नसती, पण तिची घटना धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय अशी संमिश्र आहे, म्हणून तेथे तो करता येत नाही. अशा स्थितीत धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर कार्ये पार्लमेंटरी कार्यापासून अलग करण्याने हे साधेल. म्हणून आमची सूचना अशी की, या दोन प्रकारच्या कार्यांची विभागणी करावी व निवडणुकीच्या राजकारणापुरता स्वतंत्र पक्ष निर्माण करून महासभावाद्यांनी तेथूनच राजकारण करावे व ते अल्पसंख्य समाजांना बरोबर घेऊन करावे. आता अल्पसंख्याकांना स्वतःचे असे वेगळे राजकारण करण्याची संधीच देऊ नये.

असे करताना जे छुपे किंवा उघड पाकिस्तानी प्रवृत्तीचे असतील त्यांना येथे थारा देऊ नये. त्यासाठी जे पूर्वी मुस्लिम लीगी होते किंवा आज आहेत त्यांना या पक्षात स्थान असणार नाही. किंबहुना इतर मुसलमानांना घ्यावयाचे झाले तरी त्यांच्या विचाराची जातकुळी तपासून पारखून घ्यावी. पण देशी खिस्ती व पारशी समाजांच्या बाबतीत हा नियम लागू करण्याचे कारण नाही. ते समाज या देशाशी सर्व काळात व परिस्थितीत एकनिष्ठ राहिले आहेत व ते यापुढेही राहतील याबद्दल शंका घेण्याला कारण नाही. म्हणून अशा लोकांचा समावेश आपल्या राजकीय पक्षात करण्यास हरकत असू नये. याच दृष्टीने सदर ठरावाची भाषा योजिली आहे. उदा. अखंड भारतावर ज्यांचा विश्वास आहे, ज्यांची अन्य राष्ट्रावर पूर्वी निष्ठा नव्हती व आजही नाही, (सर्व लीगवाले यामुळे वगळले जातात.) अशा हिंदुराष्ट्रवादी हिंदूंशी सहकार्य करून भारताची उन्नति घडवू इच्छिणाऱ्या अहिंदु लोकांनाच या महासभेच्या राजकीय पक्षात स्थान मिळू शकणार आहे.

आपण ही भूमिका घेतली तर ती सर्व दृष्टींनी निर्दोष, कालानुसार व बदललेल्या परिस्थितीनुसार सुधारलेली अशी होईल. त्या योगाने निवडणुकीसाठी मुस्लिमांचा फाजील अनुनय करणे काँग्रेसला कठीण जाईल. त्यातून तसा ते करतील तर हिंदुसमाजच त्यांच्या अधिक उलट जाईल आणि हिंदुसभेच्या शुद्ध राष्ट्रीय आणि निरपवाद भूमिकेबद्दल कोणालाही कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

महासभेच्या कार्याच्या वाढीच्या दृष्टीने, न्यायाच्या दृष्टीने, अल्पसंख्याक समाजांचा स्वाभिमान राखून त्यांची राष्ट्रनिष्ठा वाढविण्याच्या दृष्टीने, काँग्रेसवाल्यांच्या अनुनयवादी बुद्धीला पायबंद घालण्याच्या दृष्टीने, आणि भावी निवडणुकीच्या दृष्टीनेही महासभेने हे व्यापक, उदार, न्यायनिष्ठ, तर्कशुद्ध आणि तितकेच जागरूकतेचे धोरण स्वीकारणे योग्य, इष्ट व आवश्यक आहे. उलट असे न केले तर महासभेची सर्वच दृष्टीने परागति होईल अशी भीति आहे.

गोगटे यांचे विचार

दुसऱ्या मताचें प्रमुख पुरस्कर्ते श्री. वा. ब. गोगटे यांनी दाते यांनी व्यक्त केलेल्या विचारसरणीवर टीका करताना व आपला ठराव मांडताना पुढील आशयाचे विचार व्यक्त केले :

हिंदुसभेचा उद्देश तिच्या घटनेत लिहिल्याप्रमाणे हिंदुराष्ट्र, हिंदु संस्कृति इत्यादींस अनुसरून या देशात हिंदु राज्य प्रस्थापित करणे हा आहे. या उद्देशास जे जे पोषक ते ते ग्राह्य, व जे जे त्याच्याशी विसंगत ते ते त्याज्य मानले पाहिजे.

महासभेला राजकीय स्वातंत्र्य अभिप्रेत होते. त्याचे कारण त्या साधनाने हिंदुराज्य प्रस्थापित करता येईल असे तिचे मत आहे. स्वातंत्र्य हेच हिंदुराज्याचे एक साधन आहे. त्याचप्रमाणे लोकशाही राजवट हीही एक साधनच आहे.

जोपर्यन्त लोकशाही हिंदुराज्याला पोषक आहे, तोपर्यन्त व तितक्याच मर्यादेपर्यन्त आम्हांस ती मान्य आहे. हिंदुराष्ट्रवादाशी ती विसंगत झाली तर आम्हांला लोकशाही सोडून द्यावी लागेल.

महासभा राजकारणात प्रामुख्याने भाग घेऊ लागली ती जातीय मतदार संघ सरकारने मुसलमानांना दिले त्यामुळे हे म्हणणे बरोबर नाही. महासभा ही आरंभापासून धर्मकारण व राजकारण दोन्ही करीत आली आहे. ती राजकारणापासून धर्मकारण वेगळे करूच शकत नाही.

पाकिस्तानातल्या मुसलमानांनी ज्याप्रमाणे भांडून आपली होमलँड मिळवली किंवा पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंनी ज्याप्रमाणे आपले घर बनविले, त्याचप्रमाणे हिंदुस्थान आमचे घर आहे. ते आज जरी खंडित झाले असले तरी ते अखंड करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

या आमच्या घरावर आमचीच मालकी राहणार आहे व राहिली पाहिजे. येथे अहिंदूंची मालकी निर्माण होण्याचा प्रश्नच संभवत नाही.

या देशात जे अहिंदु लोक आहेत त्यांना आम्ही न्यायाने वागवू. त्यांना नागरिकत्वाचेही हक्क देऊ. पण ते या राष्ट्राचे राष्ट्रिक आहेत असे आम्ही कधीही मान्य करणार नाही. एवढेच काय, पण आमचे राष्ट्र जर धोक्यात आले तर त्यांचे नागरिकत्वाचे हक्कसुद्धा काढून घेऊ.

आमच्या राज्यात आम्ही ख्रिश्चन, पारशी, मुसलमान आदि हिंद्वेतरांना जबाबदारीच्या किंवा सत्तेच्या जागा देणार नाही.

कारण या देशाचे ते राष्ट्रिक (नॅशनल) नव्हेत. हिंदु हेच तेवढे या देशाचे राष्ट्रिक आहेत. इतरांना आम्ही राष्ट्रिक मानण्यास तयार नाही. 'हिंदुस्थान हिंदुओंका, नहीं किसीके बापका' असे जे आम्ही म्हणतो ते याच अर्थाने. त्यांना

जर आमच्या या देशात रहावयाचे असेल तर ते आमच्याच सहानुभूतीवरच राहता येईल, एरवी नाही.

"याल तर तुमच्यासह" या सावरकरांच्या सूत्राचा उपयोग मुरादाबाद ठरावाच्या समर्थनार्थ करण्यात येतो. ते जर आपल्यात येत असले तर त्यांना तुम्ही आपल्यात कां घेत नाही असे विचारण्यात येते. पण सावरकरांचे हे सूत्र फक्त स्वातंत्र्यसंपादनापुरते होते. ते तत्त्व सर्व प्रसंगी लागू करावयाचे नाही.

या देशातील अहिंदूंना जर या देशाचे राष्ट्रिक व्हावयाचे असेल तर त्यांनी धर्मान्तर करून हिंदू व्हावे. तरच त्यास राष्ट्रिक बनता येईल, एरवी नाही.

आज हिंदुसभेने राजकारणाकरिता एक वेगळा पक्ष काढावा असे सांगण्यात येते. पण असे करणे म्हणजे हिंदुसभा ठार मारण्यासारखे आहे. हिंदुसभेत अल्पसंख्याकांना स्थान नाही म्हणून ते मिळवून देण्याकरिता असा पक्ष हवा असे सांगण्यात येते. पण मग काँग्रेसमध्ये व या नव्या पक्षात फरक तो काय राहिला? काँग्रेसमध्ये असे कितीसे मुसलमान आहेत? तेथे एखादाच मौ. आझाद किंवा किडवाई असताही काँग्रेस मुसलमानांचा अनुनय करू लागली. तसे याही पक्षाचे होणार! आम्हांला तें मान्य नाही. आमच्या मते आम्ही धर्म व राजकारण यांची फारकत करूच शकत नाही.

हिंदुराज्य व्यवस्थेत अहिंदूंना मताधिकार व निवडणुकीत भाग घेण्याचा अधिकार राहील काय या प्रश्नाचे उत्तर देताना गोगटे म्हणाले की तो राहील; परंतु जोपर्यन्त आमच्या हिंदुराज्याच्या हितसंबंधास तो बाधक ठरणार नाही तोपर्यन्तच राहील. तो बाधक आहे असे वाटल्यास तो काढून घ्यावा लागेल.

श्री. गोगटे यांना पाठिंबा देताना सौ. शांताबाई गोखले यांनी मुसलमानांचे अत्याचार व हिंदूंची विपन्नावस्था यांचे वर्णन केले व हिंदुसभेत अहिंदूंचा समावेश करू नये, ती आहे तशीच ठेवावी व हिंदुसभेने राजकारण सोडू नये असे सांगितले.

श्री. रा. स. भट यांनी आपल्या भाषणात स्वा. सावरकरांचा धावा केला. जोपर्यन्त त्यांना भाषण करण्याची बंदी आहे तोपर्यन्त असा काही ठराव करणे म्हणजे त्यांच्या पाठीत खंजीर खुपसणे आहे असे त्यांनी आवेशयुक्त भाषेत सांगितले. निदान सावरकर मुक्त होईपर्यन्त धीर धरा. उद्या जर सावरकरांनी अहिंदूंच्या हिंदुसभा प्रवेशास मान्यता दिली तर आम्ही त्यास आनंदाने आपल्यात घेऊ. पण याचा जो काय निर्णय लावायचा तो त्यांना लावू द्या, अशी त्यांनी निर्वाणीची विनंती केली.

श्री. गणपतराव फडके यांनी मात्र आपल्या भाषणात स्पष्ट बजावले की, आपण स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे. केवळ सावरकर म्हणतात म्हणून ते खरे

असे समजणे चूक आहे. त्यांना आमच्यापेक्षा अधिक समजते, ते मोठे आहेत, हे सर्व काही असले, तरी आपण आपली स्वतंत्र विचारशक्ति गहाण टाकणे अगदी चुकीचे आहे. सावरकरांचे म्हणणे पटले तर तसे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. दुसऱ्याकडे बुद्धि गहाण टाकण्याची महाराष्ट्राची परंपरा नाही.

या प्रश्नावर प्रांतिक हिंदुसभेचे कार्यवाह श्री. गो. र. काळे यांनी निवेदन केले की महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेची सभा दि. २४ व २५ फेब्रुवारी १९५१ ला मुरादबादचा ठराव व त्यावरील उपसूचना व श्री. भोपटकर, श्री. दाते, व श्री. ओमप्रकाश कोहोल यांच्या ठरावाबाबत मत व्यक्त करण्यासाठी भरावयाची होती ती भरण्यापूर्वी वरील ठरावासंबंधी मते कळविण्यासाठी महाराष्ट्रातील जिल्हा सभा व स्थानिक सभांकडे व व्यक्तींच्याकडे मतपत्रिकाही पाठविण्यात आलेल्या होत्या व त्याप्रमाणे ठिकठिकाणाहून सुमारे २५० पेक्षा जास्त मतपत्रिका व काहीं जिल्हासभांचे ठरावही आले होते. असे असता त्यांचा काहीही विचार न करता फक्त पुण्यास जे सभासद सभेस येऊ शकले किंवा जे पुण्याचेच होते तेवढ्यांचीच मते विचारात घेण्यात येऊन ठराव करण्यात येत आहे. महाराष्ट्राचे मत म्हणून तेच मत पाठविले जाणे माझ्या समजुतीने बरोबर नाही. हिंदुमहासभेच्या भूमिकेच्या दृष्टीने हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा व महत्त्वाचा होता. त्यासाठीच महासभेचे खास अधिवेशन बोलावण्यात आलेले असून सर्वांचे मत घेतले जावे यासाठीच जिल्ह्याजिल्ह्यातून मतपत्रिकाही मागविण्यात आल्या होत्या. व हिंदुसभांनी, हिंदुसभेतील पदाधिकारी व जबाबदार सभासदांनी आपली मते विचारात घेतली जातील या बुद्धीनेच मतपत्रिका भरून प्रांतिक हिंदुसभेकडे पाठविल्या होत्या. प्रांतिक सभेच्या बैठकीस पुष्कळांना उपस्थित रहाणे काही ना काही कारणाने शक्य होत नाही व त्यामुळे खरोखर प्रांतातील विचारी लोकांचे मत काय आहे ते नुसत्या उपस्थित रहाणारांच्या मतावरून ठरविण्याने तर त्यास खरे प्रातिनिधिकत्व येत नाही. म्हणूनच मतपत्रिका पाठवून मते मागविण्यात आली असता व ती अगोदर लोकांनी पाठविली असता ती विचारात न घेता प्रांतिक सभेत केवळ उपस्थित रहाणाऱ्यांच्याच मताने अशा महत्त्वाच्या प्रश्नी निर्णय घेणे हे अप्रशस्त आहे. ते खरे प्रातिनिधिक मत होऊ शकत नाही. आपण आपले मत लेखी कळविले असल्याने व सभेपुढे एवढाच विषय असल्यानेही अनेक सभासदांना उपस्थित राहणे आवश्यक वाटले नसणेही शक्य आहे. वरील सभेत पुण्याबाहेरील अवघे १०।१२ लोक उपस्थित होते व त्यांपैकी बहुतेकांनी आपली मते श्री. दाते यांच्या ठरावास अनुकूल अशी दिली. बाहेरगावाहून आलेल्या मतपत्रिकांची छाननी केली तर त्यांपैकी श्री. दाते यांचे ठरावास सर्वांत अधिक मते व त्या खालोखाल श्री. भोपटकर यांचे ठरावास मते असल्याचे दिसून आले. या उलट

कोणताही बदल नको असे मत देणारांची संख्या फारच थोडी असल्याचेही दिसून आले आहे. मात्र सभेस उपस्थित असलेल्यांत पुण्यामधील लोकांमध्ये बदल नको म्हणणारांचे मताधिक्य दिसून आले. उपस्थितांचीच मते घेतल्यामुळे व त्यात पुण्याचीच संख्या अधिक असल्याने साहजिकच बदल नको म्हणणारांची सूचना बहुमताने मान्य धरण्यात आली. तथापि या प्रश्नावर श्री. भोपटकर व श्री. दाते यांच्याच मतास महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांचा लेखी पाठिंबा असताना ती मंडळी सभेस उपस्थित राहू शकली नाहीत व पुण्यातील मंडळींस सभेस सहज येता आले याचा फायदा घेऊन जो ठराव झाला तो खरा प्रातिनिधिक होऊ शकत नाही व ते प्रांताचे खरे मतही ठरत नाही. पुण्याबाहेरील हिंदुत्वाभिमानी लोकांवर हा अन्याय झालेला आहे. तरी या बाबतीत माझी प्रांतिक हिंदुसभेच्या अध्यक्षांस व पदाधिकाऱ्यांस विनंती अशी की त्यांनी महाराष्ट्र प्रांताचे मत लेखी मते देणाऱ्या लोकांची मते विचारात घेऊनच अखिल भारत हिंदुसभेकडे प्रांताचे मत म्हणून कळवावे. केवळ प्रांतिक सभेत उपस्थितांच्याच मतांवर संमत झालेला ठराव पाठवू नये.

याच प्रश्नावर दाते यांनी काळ मधून (दि. २-३-५१) अधिक तपशीलवार विवेचन केले. तेही महत्त्वाचे असल्याने पुढे दिले आहे. ते असे :

श्री. वासुदेवराव गोगटे यांची व त्यांच्या मताच्या मंडळींची विचारसरणी आज हिंदुसभेची अधिकृत विचारसरणी आहे असे मानण्यास जागा नाही. महासभेच्या कार्यकारी मंडळाचे म्हणजेच अधिकृत मत मुरादाबादच्या ठरावात नमूद झालेले आहे. तथापि ते मत ग्राह्य नसून श्री. गोगटे प्रभृति मंडळी जे मत प्रतिपादन करतात तेच महासभेचे अधिकृत मत असावे असे त्यांचे म्हणणे आहे. महासभेतील मंडळींमध्ये या प्रश्नावर बरेच तीव्र दुमत असून या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल खास अधिवेशन भरून लावण्यात येणार आहे. त्या वेळी महासभेचे वास्तविक मत काय हे निर्णायक रीतीने ठरेल. तोपर्यंत हा प्रश्न वादग्रस्त स्वरूपातच राहणार, व म्हणून या प्रश्नाचा निर्णय आपल्या म्हणण्याप्रमाणे लागावा असे प्रत्येकास वाटणार हे अगदी स्वाभाविक आहे.

पुण्याच्या प्रांतिक सभेच्या परवाच्या बैठकीत काही मंडळींनी आपल्या भाषणाच्या ओघात असेही सांगितले की ज्यांना आमचे मत मान्य नसेल त्यांनी हिंदुसभा सोडावी. उगाच नसते प्रश्न येथे निष्कारण उत्पन्न करू नयेत. या मंडळींची भावनावशता व तीव्रता समजण्यासारखी आहे. जर महासभेने याच मताचा स्वीकार करून इतरांना येथे स्थान राहू द्यावयाचे नाही असे ठरविले, तर इतर तेथून जातीलही. त्यांनी जावे किंवा जाऊ नये हा प्रश्न तेथे असणाऱ्यांनीच सोडवावयाचा आहे व तो त्यांनी योग्य वेळी व योग्य रीतीने सोडविण्यासही हरकत नाही.

पण हा भावनावशतेचा भाग सोडून दिला व या मंडळींच्या युक्तिवादाचा विचार केला तर महासभेने हा युक्तिवाद व त्यावर आधारलेली ही विचारसरणी मान्य करण्यात केवढे धोके आहेत हे मात्र वेळीच स्पष्ट करणे अवश्य आहे. नाहीतर ह्या धोरणाचे संभाव्य परिणाम आरंभी लक्षात न आले तरी ते अंती भोगावे मात्र लागतील व मग पस्तावण्यासही जागा रहाणार नाही.

ह्या मंडळींच्या विचारसरणीचे मुख्य सूत्र असे की बहुमतीय लोकांनी अल्पमतीय लोकांची कदर बाळगण्याचे कारण नाही. एवढेच काय पण त्यांची उपेक्षा करण्याचे त्यांचे धोरण आहे, आणि याहूनही पुढे म्हणजे बहुमतीयांना ज्या वेळी अल्पमतीय लोक नकोसे वाटतील तेव्हा अल्पमतीयांना जीवन अशक्य करून टाकण्याचा त्यांचा हक्क आहे.

या विचारसरणीस अनुसरून ते म्हणतात की हा आम्हा हिंदूचा देश आहे. आम्ही येथले बहुसंख्य आहोत व म्हणून आम्हीं येथील राष्ट्र आहोत. या देशाचे राष्ट्रिक (नॅशनल) म्हणवून घेण्याचा फक्त आमचाच अधिकार व हक्क आहे. इतरांचा तो नाही. त्यांना नागरिकत्वाचे हक्क मिळू शकतील, व आम्हांस परवडेल तोपर्यंत आम्ही त्यांस लोकशाही राजवटीखाली मतदानाचा हक्क देऊ; पण आम्हांस त्यांचे राहणे गैरसोईचे वाटले तर ते काढून घेऊ. हिंदुराष्ट्र धोक्यात आले असे आम्हांस वाटले म्हणजे वरील सर्व गोष्टी अपरिहार्यतेने घडून येणाऱ्या आहेत.

इतरांना येथे जगावयाचे तर ते हक्काने नव्हे तर आमच्या कृपेवर; ज्या दिवशी आमची सहानुभूति नष्ट होईल त्या दिवशी त्यांना येथे जगणे अशक्यप्राय होईल. कारण आम्ही हिंदु आहोत व हे राष्ट्र आमचे आहे.

ज्यांना वरील विचारसरणी मान्य असून हिंदुत्वाचा तीव्र अभिमान आहे ते वरील विचारसरणीचा अंमल करू इच्छीत आहेत. ही विचारसरणी नवीन नाही. ती परिचयाची आहे. हेच तत्त्व मान्य असणाऱ्या इतरांनीही आपापल्या अभिमानास अनुसरून त्याची अंमलबजावणी केली म्हणजे कसे होईल ते पहा :

दक्षिणेस द्रविड लोकांची वस्ती पुष्कळ आहे. त्यांच्यात हिंदुत्वाच्या अभिमानापेक्षाही द्राविडी अभिमान अधिक तीव्र आहे. त्यांच्यातील पुष्कळ लोक याच असहिष्णु वृत्तीचे पुरस्कर्ते आहेत. ते म्हणतात आम्ही ज्या भागात रहातो तो आमचा द्रविडी संस्कृतीचा देश असून येथे हिंदुसंस्कृतीचे (किंवा वैदिक संस्कृतीचे) अल्पसंख्य लोक काही आहेत. ते उगाचच आमच्यावर कुरघोडी करू पाहतात पण त्यांचे वर्चस्व आम्ही चालू देणार नाही. आम्ही लोक येथले बहुसंख्य आहोत व म्हणून जे अल्पसंख्य आहेत त्यांना आमच्या कृपेवरच येथे जगता येईल. त्यांना सत्तेच्या किंवा जबाबदारीच्या कोणत्याही जागा मिळणार नाहीत. त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर आम्ही पैसे खर्च करणार नाही. विद्यापीठे ही आमच्या मुलांच्या शिक्षणा-

साठी आहेत. अल्पसंख्याकांसाठी नव्हेत. आमची जितक्या मर्यादेपर्यंत मेहेरबानगी होईल तेथपर्यंतच त्यांना आमच्या शिक्षण संस्थांचा उपयोग करता येईल. आम्हा बहुसंख्याकांची अभिमानास्पद अशी रावणी संस्कृति असून ती आर्यांनी गारून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हा त्यांचे आमचे जमणार कसे ? त्यांचा आम्हांस संपर्कच नको.

खुद्द महाराष्ट्रात ब्राह्मणेतर वाद निर्माण झाला, त्यामागे सुद्धा हीच विचारसरणी होती व ती अजून नाहीशी झालेली नाही. त्या विचाराचे पुरस्कर्ते म्हणतात :

आम्ही मराठे हे येथले बहुसंख्य आहोत. आमची मराठमोळी संस्कृति हीच श्रेष्ठ आहे. ब्राह्मण येथे अगदीच अल्पसंख्य आहेत. त्यांची संस्कृति आमच्याहून वेगळी आहे. आमच्यांत ते नकोत. त्यांना तेथे जगावयाचे असेल तर आमच्या कृपेवरच जगता येईल. त्यांना आमच्या सत्तेखाली आम्ही राहू देऊ. पण जोपर्यंत आमची मर्जी लागेल तोपर्यंतच. आम्ही त्यांना आमच्या राज्यात कोणतीही जबाबदारीची किंवा सत्तेची जागा देणार नाही. कारण त्यांच्यावर आमचा विश्वास नाही. आमच्या राज्यातही लोकशाही नांदेल, व सर्वांना मताधिकार राहील. पण तोही जेथपर्यंत आमच्या सत्ताधारित्वाला बाध येणार नाही तेथपर्यंतच; नाहीतर आम्ही तो अधिकार त्यांस मिळू देणार नाही.

अशा रीतीने कितीतरी उदाहरणे दाखविता येतील. पंजाबातील शीख-हिंदु किंवा आसामातील आसामी-बंगाली वादाचे स्वरूप कमी अधिक प्रमाणात याच स्वरूपाचे आहे. खेडेगावातील मराठे व महार यांच्यातील वादाचे स्वरूप ह्याच प्रकारचे आहे. मराठे म्हणतात की गाव आमचा आहे. आमची मेहेरबानी आहे म्हणून आम्ही महारांना गावात येऊ देतो. पण ते जर उगाच मिजास करतील, आपल्या लग्नाच्या मिरवणुकीत नवरदेवाला घोड्यावरून गावात मिरवतील, तर आमच्या मोठेपणाची शान जाते. म्हणून आम्ही त्यास तसे करू देणार नाही. कां तर आम्ही बहुसंख्याक आहोत व म्हणून गाव आमचा आहे.

हिंदुसभावादी मंडळींना हाच युक्तिवाद व हीच विचारसरणी मान्य आहे काय ? ती मान्य केली तर तिच्या आधाराने निरनिराळ्या क्षेत्रांत कसे निरनिराळे परिणाम घडून येतील हे त्यांच्या लक्षात आले आहे काय ? मग पाकिस्तानी मुसलमानांना तुम्ही कां नावे ठेवता ? त्यांनी गैर ते काय केले ? पाकिस्तानात गेलेल्या प्रदेशात हिंदु होते, त्यांजवर पाकिस्तानी मुसलमानांचा मुळीच विश्वास नव्हता. आजही नाही, भारतातील हिंदूंना जर येथील यच्चयावत् मुसलमान पाकिस्तानीच आहेत असे वाटले तर पाकिस्तान सरकारला व तेथील मुसलमानांनाही तेथील हिंदु भारतप्रेमी आहेत असे वाटण्यात काय चूक आहे ? मग

त्यांच्यावर त्यांनी कां विश्वास ठेवावा व त्यांना तेथे जगू द्यावे असे म्हणण्याचा तरी तुम्हांस काय अधिकार आहे ? तेथील हिंदु पाकिस्तान सोडून जाईनात म्हणून त्यांना तेथे जगणे मुसलमानांनी अशक्यप्राय करून टाकले. यात तरी मग काय गैर आहे ? सारांश गोगटे यांची विचारसरणी मान्य करणे म्हणजे पाकिस्तानी तत्त्वज्ञानाचा पाठपुरावाच करणे होय. हीच विचारसरणी हिंदुसभेला मान्य होणार असली तर ती मान्य नसणारांना आपला वेगळा विचार करणे भागच आहे.

पण आमच्या मते आजपर्यन्त तरी हिंदुसभेने या विचारसरणीला कधीही संमति दिलेली नाही. महासभेच्या ठरावावरून तसे दिसून येत नाही. महासभेत सावरकरांच्याच जोडीने केळकर, भोपटकर, डॉ. मुंजे, भाई परमानंद, प्रभृतींचे श्रेष्ठ स्थान आहे. राजकारणासाठी महासभेपेक्षा काँग्रेसची किंवा लोकशाही पक्षाची भूमिका हीच अधिक योग्य होय असे खुद्द तात्यासाहेब केळकर यांचेही मत होते. ते म्हणतात :

" काँग्रेस अगर तत्सम संस्था ही अशी असावी की जीत सर्वांचा समावेश झालेला आहे. ह्या दृष्टीने काँग्रेस ही केव्हाही हिंदुसभेपेक्षा श्रेष्ठ; पण आज ती निर्दोष नाही. काँग्रेस जर आपले पक्षपाती धोरण सोडील, सर्वांना राजकारणात एकच माप लावील, मुसलमानधार्जिणेपणा न दाखवील व धर्मकारण व राजकारण यांची गल्लत न करील तर केव्हाही ती श्रेष्ठच ठरेल."

हिंदुसभेसंबंधाने ते लिहितात : " हिंदुमहासभा ही विशेष रीतीने हिंदूंचे हित पाहणारी संस्था आहे. हे त्या संस्थेच्या नावावरूनच लक्षात येते. प्रथम राष्ट्रीय सभेचे स्वरूप राष्ट्रीय होते तोपर्यन्त हिंदुमहासभा धार्मिक व सामाजिक विषयांकडेच लक्ष देत होती. परंतु अलीकडे राष्ट्रीय सभा मुसलमानधार्जिणी व हिंदुहितविरोधी झाल्यामुळे हिंदूंच्या संरक्षणाकरिता महासभेला राजकीय चळवळ हाती घ्यावी लागली आहे."

हिंदुसभा ही आरंभापासूनच धर्मकारण व राजकारण संयुक्तपणे करणारी संस्था आहे व तिच्या तत्त्वज्ञानानुसार त्यांची एकमेकांपासून फारकत करणे अशक्य आहे हे श्री. गोगटे यांचे म्हणणे वस्तुस्थितीस धरून नाही. तात्यासाहेब केळकर हे महासभेचे दोन वेळा तरी अध्यक्ष होते व महासभेच्या कार्यकारी मंडळात तर ते कित्येक वर्षे प्रमुख होते. श्री. अण्णासाहेब भोपटकर यांचीही हिंदुत्वनिष्ठा श्री. गोगटे व त्यांचे सहकारी नाकारणार नाहीत. तीन वर्षेपर्यंत ते हिंदुमहासभेचे अध्यक्ष होते. गेली १५।२० वर्षे तरी ते महासभेचे एक श्रेष्ठ नेते व मार्गदर्शक आहेत. पण श्री. गोगटे जी तत्त्वे प्रतिपादन करतात ती महासभेने मान्य केलेली आहेत, असे त्यांचे मत नाही. हे त्यांनी स्वतःच या बाबतीत आणलेल्या ठरावावरून स्पष्ट होत आहे. गोगटे यांची हिंदुराष्ट्रवादावरील निष्ठा त्यांच्यापेक्षा काकणभर सरस दिसते. पण अद्याप तरी ती भूमिका हिंदुसभेने स्वीकारलेली नाही.

हिंदुमहासभेचे एक भूतपूर्व अध्यक्ष श्रीशंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांना परवाच्या पुण्याच्या अधिवेशनप्रसंगी निमंत्रण पाठविले असता त्यांचे उत्तरादाखल जे पत्र आले त्यात श्रींचे कार्यवाह लिहितात :

" हिंदुमहासभा राजकारणात सक्रिय भाग घेण्यास लागल्यापासून ते अगदी अयोग्य म्हणून नव्हे तर, ते आपले काम नव्हे म्हणून श्रींनी त्यापासून अलिप्त राहण्याचे ठरविले आहे. "

यावरूनही हे दिसून येईल की, एका वेळी हिंदुसभा ही राजकीय संस्था नव्हती. ती राजकारणात सक्रिय भाग घेत नव्हती, व ती पुढे जेव्हा घेऊ लागली तेव्हा शंकराचार्यांसारख्यांना ते आपले काम नव्हे म्हणून बाजूस व्हावे लागले.

या सर्वांचे तात्पर्य इतकेच आहे की हिंदुसभा आरंभी राजकारणात प्रत्यक्ष भाग घेत नव्हती. हिंदुसभेचे पुढारी काँग्रेसमध्येच त्या वेळी असत. पुढे काँग्रेस जेव्हा पक्कीच मुसलमानधार्जिणी बनली, तेव्हा हिंदुसभा राजकीय पक्ष बनू लागली ही वस्तुस्थिति आहे; व म्हणून महासभेच्या मूलभूत तत्त्वज्ञानाप्रमाणे तिला राजकारण व धर्मकारण यांची फारकत करणे अशक्य आहे हे श्री. गोगटे यांचे विधान वस्तुस्थितीस सोडून आहे.

श्री. गोगटे यांच्या प्रतिपादनाचा मुख्य भर हिंदुराज्यस्थापनेवर आहे. पण आज भारतात हिंदुराज्य प्रत्यक्षातच स्थापन झालेले आहे. मग आता नवीन स्थापना ती काय करावयाची ? तथापि हिंदुराष्ट्रवादाच्या विचारसरणीवर आधारलेल्या हिंदुसभावादी मंडळींच्या हाती राजसत्ता आली म्हणजेच येथे हिंदुराज्य प्रस्थापित झाले असे ते मानतात कीं काय हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

तथापि जर हिंदुसभावादी मंडळीच्या हाती राजसत्ता आली तरच येथे हिंदुराज्य प्रस्थापित झाले असे त्यांना म्हणावयाचे असेल तर ज्या वेळी हिंदुसभा पक्षाच्या हातून राजसत्ता अन्य पक्षाच्या हाती जाईल त्या वेळी येथील हिंदुराज्य नष्ट झाले असेही म्हणावे लागेल !

हा अनवस्था प्रसंग ते उत्पन्न करणार नाहीत, व आज येथे हिंदुराज्य प्रस्थापित झालेलेच आहे असे ते मानतील असे समजावे काय ?

बरे, आजचें राज्य हे हिंदुराज्यच होय हे त्यांस मान्य असले, तर या हिंदुराज्यात आता अहिंदु अल्पसंख्याकांच्या संबंधाने महासभेचे धोरण काय राहणार हा प्रश्न ओघानेच येतो. श्री. गोगटे प्रभृति मंडळी त्यांच्याशी सहकार्य करण्यास तयार आहेत. हे सहकार्य कितपत शक्य आहे हे अद्याप अज्ञातच आहे. कारण गोगटे प्रभृतींना त्यांचे राष्ट्रीयत्व मान्य नाही. असे जर आहे तर अहिंदूंना देशाच्या राज्यघटनेने दिलेले राष्ट्रीयत्व काढून घेण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न चालविले आहेत ? पाकिस्तानातून जे हिंदू भारतात आले त्यांना भारत सरकारने अद्याप

राष्ट्रीयत्वाचे व मतदारीचे हक्क दिले नाहीत म्हणून त्यांची तक्रार आहे ती योग्य आहे; पण त्याचबरोबर जे येथील अहिंदू आहेत त्यांचे राष्ट्रीयत्वाचे अधिकार काढून घ्यावेत याबद्दल त्यांनी अवाक्षरही कोठे काढले नाही ! गोगटे यांच्याप्रमाणेच जर महासभेचे मत असते तर तिने तसा एखादा ठराव तरी केला नसता काय ? जर गोगटे प्रभृतींचा त्यांच्या विचारसरणीवर खरोखरच विश्वास असला तर त्यांनी तशी चळवळ अवश्य करावयास पाहिजे व अहिंदूंना मिळालेले राष्ट्रीयत्वाचे अधिकार भारतीय घटनेतून काढून घेण्यासाठी तशी दुरुस्ती घडवून आणली पाहिजे.

पण तसे कोठेही व कोणीही, खुद्द श्री. गोगटे व त्यांच्या विचाराची मंडळीही काहीच करीत नाहीत ! किंबहुना हा विचारही त्यांच्या डोक्यास शिवला आहे की नाही हे सांगणे कठीण आहे ! कदाचित् येत्या निवडणुकीच्या वेळी ते तसा प्रयत्न करणार असतील तर न जाणे ! महासभा आता येत्या निवडणुकीत भाग घेणार आहे. त्या वेळी महासभेचे या विचाराचे जे उमेदवार असतील ते अहिंदु मतदारांना असे सांगतील काय की हे अहिंदु मतदारांनो, मी हिंदुसभेतर्फे निवडणुकीस उभा आहे. तुम्हांला मतदानाचा अधिकार मिळालेला आहे तरी तुम्ही मला तुमचे मत द्या. मी जर निवडून आलो तर मी हिंदुराज्याचा अभिमानी असल्यामुळे माझ्या हाती सत्ता येताच, केवळ तुम्ही अहिंदु आहात म्हणून मी तुमचे या देशाचे राष्ट्रीयत्व ताबडतोब रद्द करीन, तुम्ही जर आज सरकारी नोकरीत सत्तेच्या किंवा जबाबदारीच्या जागी असलात तर केवळ तुम्हां अहिंदु असल्यामुळे मी तुम्हांस त्या जागेवरून ताबडतोब कमी करीन ! आमच्या पक्षाच्या हाती सत्ता आली की तुम्हांला आमच्या हिंदुराज्यात आमच्या कृपेवरच केवळ जगावे लागेल तरी हे सर्व घडवून आणण्याकरिता, अहिंदु मतदारांनो, तुम्ही आम्हांस मते द्या !

हिंदुराष्ट्रवादावर उभारलेल्या गोगटे पुरस्कृत विचारांच्या उमेदवारांचा निवडणूक प्रचार असा होणार आहे काय ?

आनंदाची गोष्ट एवढीच आहे की निदान महाराष्ट्रातील राजकारणाचा विचार करणाऱ्या व आजपर्यंत प्रत्यक्ष राजकीय कार्य करणाऱ्या हिंदुसभेच्या अभिमान्यांना ही विचारसरणी मुळीच मान्य नाही. त्यांना प्रायः मुरादाबादचा ठराव तरी मान्य आहे किंवा भोपटकर किंवा दाते यांचा ठराव मान्य आहे. हे ठराव वेगवेगळे असले तरी त्यांच्यातील विचारसूत्र एकच असून त्यातील फरक शाब्दिक व सोयीच्या दृष्टीने इष्टानिष्ट काय याबद्दलचा आहे. गोगटे यांच्या विचारसरणीप्रमाणे तो मूलभूत वेगळ्या दृष्टिकोनाचा नाही.

महाड हिंदुसभेने मुरादाबादच्याच ठरावाला मान्यता दिली आहे. या सभेचे अध्यक्ष श्री. बापूराव जोशी पुण्याच्या या सभेसंबंधाने लिहतात :

" मला नाइलाजाने येता येत नाही. या बाबतीत मी आपले व महाड तालुक्यातील कार्यकर्त्यांचे मत कळविलेच आहे. तेच पुन्हा कळवितो की, मुरादाबादचा ठराव बदलू नये. कारण, त्यात हिंदुसभा कायम राखून अल्पसंख्याकांचा प्रश्न कुशलतेने सोडविला आहे. "

रत्नागिरी हिंदुसभेने असे कळविले आहे की, " हिंदुसभेने अहिंदु समाजातील लोकांना आपले सभासद करून न घेता राजकीय पोटशाखेने अहिंदु समाजाशी सहकार्य करावे. या दृष्टीने मुरादाबादचा ठराव ग्राह्य वाटतो. "

सांगली जिल्हा हिंदुसभेची बैठक भरून तीत या प्रश्नाचा विचार करण्यात आला तेव्हा तेथे भोपटकरांच्या ठरावास मान्यता देण्यात आली.

सोलापूर जिल्हा हिंदुसभेने ठराव केला की, भारतात अहिंदुसमाज आहेत त्यांच्याशी कायद्याच्या दृष्टीने महासभेचे धोरण समानतेचे असावे या दृष्टीने सर्वांचा समावेश करणारी एक राजकीय भूमिका निर्माण होणे अवश्य आहे. भारतीय राज्यघटनेत आता स्वतंत्र मतदारसंघाचे व जातीय तत्त्वांवर राखीव जागांचे उच्चाटन होऊन संयुक्त मतदारसंघ निर्माण झाला आहे. अशा स्थितीत कोणत्याही जातीय किंवा गटाचा आपल्यापुरता राजकीय पक्ष स्थापन होणे राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीने धोक्याचे होईल.... याप्राठी हिंदुमहासभेने राजकारणासाठी राष्ट्रीय प्रजासत्ताक पक्ष स्थापावा व त्याच्याद्वारे महासभेचे राजकीय कार्य चालू करावे या दृष्टीने दाते यांचा ठराव ग्राह्य वाटतो.

नगर हिंदुसभेच्या लोकांनीही दाते यांच्या ठरावासच पाठिंबा दिला आहे.

ठाणे जिल्हा हिंदुसभेने कहोल यांच्या सहकार्याच्या ठरावास पाठिंबा दिला असून त्या सभेचे अध्यक्ष श्री. गणपतराव फडके व इतर मंडळी यांनी पुण्यातील सभेतील हिंदुराष्ट्रवादावरील श्री. गोगटे यांचे विवेचन ऐकल्यावर दाते यांच्या सूचनेस पाठिंबा दिला.

सातारा, कऱ्हाड, सांगली, मिरज, कोल्हापूर, पंढरपूर, बार्शी, सोलापूर, रत्नागिरी, चिपळूण, महाड, लोणावळा, इत्यादि ठिकाणच्या हिंदुसभेच्या आजच्या अनेक कार्यकर्त्यांनी भोपटकर, दाते किंवा मुरादाबादच्या ठरावासच मान्यता दिली असून फक्त पुणे हिंदुसभेनेच तेवढा त्यास विरोध केला होता. यावरून पुण्यातील काही मंडळींचे मत जरी गोगटे यांच्या विचारसरणीस अनुकूल असले, व प्रत्यक्ष सभेत जरी त्यांचा ठराव पास झाला असला तरी महाराष्ट्रातील महासभेतील कार्यकर्त्या मंडळींचे मत त्यांच्या पाठीशी नाही हे येथे नमूद करणे अवश्य आहे,

जयपूरचे विशेष अधिवेशन

याच प्रश्नासाठी पूर्वी ठरल्याप्रमाणे हिंदुमहासभेचे विशेष अधिवेशन मुरादाबाद ठरावामागील विचारसरणीचा व त्यासंबंधीच्या प्रश्नाचा निर्णय

करण्याकरिता जयपूर येथे दि. २७–२९ एप्रिल १९५१ ला डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. तेथे पुन्हा या प्रश्नाचा सर्वांगीण खल होऊन सर्वानुमते एकमुखी प्रस्ताव संमत करण्यात आला. बॅ. एन. सी. चतर्जी, शं. रा. दाते, वि. घ. देशपांडे, वा. ब. गोगटे प्रभृतींनी त्यास पाठिंबा दिला व हिंदुमहासभेतील हा अंतर्गत वाद संपला. तो ठराव असा :

In view of the fact

(1) that Bharat has become an independent and sovereign state and that the communal electorates have been eliminated from the Constitution,

(2) that the Akhil Bharat Hindu Mahasabha has been aiming at promoting good feelings between Hindus and non-Hindus in Hindusthan,

(3) that the object of the Hindu Mahasabha is to establish Akhand Bharat and to establish a really democratic Hindu state in Bharat based on the culture and tradition of the land, and

(4) to organise and consolidate all sections of the people into one organic whole and to establish a social order in which all nationals will enjoy equal rights and opportunities and share equal responsibilities,

This Special Session of the Akhil Bharat Hindu Mahasabha feels that the achievement of these objectives will be greatly advanced by association of non-Hindu citizens in the Parliamentary sphere of its activities and by accepting their helpful and constructive co-operation.

The Mahasabha hereby authorises its Working Committee to enlist the suffrage and support of non-Hindu citizens and to set up candidates wherever possible from among them subject to their acceptance of the election manifesto of the Hindu-Mahasabha.

"(१) भारतात आता स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य प्रस्थापित झाले आहे व या देशाच्या राज्यघटनेतून स्वतंत्र मतदारसंघ काढून टाकण्यात आले आहेत हे लक्षात घेऊन,

(२) तसेच महासभेचा पूर्वापार उद्देश हिंदुस्थानात हिंदु आणि अहिंदु समाजांत सद्भावना वृद्धिगत करण्याचा आहे हें लक्षात घेऊन, तसेच

(३) अखंड भारत प्रस्थापित करणे व या देशातील संस्कृति व परंपरा यांना अनुसरून भारतात खरेखुरे लोकशाहीनिष्ठ हिंदुराज्य प्रस्थापित करणे हाही तिचा उद्देश आहे हे लक्षात घेऊन, आणि

(४) या देशातील सर्व वर्गातील लोकांची एकसंध संघटना निर्माण करणे व ती प्रभावी बनविणे आणि ज्या व्यवस्थेत सर्व राष्ट्रीय घटकांना समान अधिकार व समान संधि उपलब्ध होऊ शकेल आणि समान उत्तरदायित्वही स्वीकारावे लागेल अशा प्रकारची समाजव्यवस्था निर्माण करणे हाही तिचा उद्देश आहे हे लक्षात घेऊन–

महासभेच्या या विशेष अधिवेशनाचा असा अभिप्राय आहे की, हे उद्देश विशेष चांगल्या रीतीने सिद्धीस जाण्यासाठी महासभेच्या पार्लमेंटरी कार्याच्या बाबतीत अहिंदु नागरिकांचे सहभागित्व आणि त्यांचे उपयुक्त व विधायक सहकार्य उपकारक ठरेल. तरी महासभेच्या कार्यकारी समितीने अहिंदु नागरिकांचा व त्यांच्या मतांचा पाठिंबा मिळवावा आणि शक्य असेल तेथे महासभेचा निवडणूकविषयक कार्यक्रम मान्य असणाऱ्या अहिंदूंनाही निवडणुकीस उभे करावे. "

या प्रस्तावानंतर हा वाद निकालात निघाला.

घटनात्मक राजकारण

स्वतंत्र व सर्वभौम भारताची राज्यघटना १९५० मध्ये तयार झाल्यानंतर व जयपूरच्या हिंदुमहासभेच्या विशेष अधिवेशनात निवडणुकीच्या राजकारणासंबंधाने हिंदुमहासभेचे धोरण निश्चित झाल्यानंतर हिंदुसभेने शक्य तेथे स्वतःच्या नावावर व जरूर तेथे इतर पक्षांच्या सहकार्याने विधिमंडळांच्या निवडणुकांत भाग घेतला. यापूर्वी हिंदुसभेचे कार्यकर्ते महाराष्ट्रात लोकशाही स्वराज्यपक्षाच्या वतीने निवडणुका लढवीत असत. १९३७ व १९४२ च्या निवडणुका लोकशाही स्वराज्य पक्षाच्या वतीने लढविण्यात आल्या. १९४५ वर्षी हिंदुसभेने स्वतःच्याच नावावर निवडणुकात भाग घेतला. नंतरच्या काळात नगरपालिकांच्या निवडणुकांत ती नागरिक आघाडीत सामील झाली. व १९५२ च्या विधिमंडळांच्या निवडणुकांत इतर पक्षांच्या सहकार्याने तिने निवडणुकात भाग घेतला. १९५७ साली व नंतरही महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने तिने निवडणुका लढविल्या. या निवडणुकांत श्री. रामभाऊ मंडलीक, श्री. जयंतराव टिळक, श्री. वि. रा. पाटील, श्री. हरि भास्कर भिडे, श्री. वा. ब. गोगटे, श्री. गणपतराव नलावडे

यांनी विधानसभा, विधानपरिषद व राज्यसभेच्या निवडणुका जिंकल्या होत्या. व त्यांनी तेथे चांगल्यापैकी कामही केले.

इतर प्रांतांतूनही अशाच रीतीने कोठे हिंदुसभेच्या वतीने तर कोठे इतर पक्षांच्या प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्याने हिंदुसभेने निवडणुकीत भाग घेतला व यथाशक्ति त्या जिंकल्या. तथापि स्वातंत्र्योत्तर काळात पक्षोपपक्षांची संख्या फार वाढल्यामुळे विरोधी पक्षांतील इच्छुकांची संख्याही फार वाढली व एका एका जागेकरिता सरासरी पाचसहा इच्छुक उभे राहू लागले. त्यामुळे विरोधी मतांची विभागणी फार होऊन त्यांना निवडणूक जिंकणे फारच कठीण झाले. लोकशाही शासन पद्धतीत दुपक्षीय विधिमंडळे असली तर सत्ताधारी पक्षावर विरोधी पक्षांना काही प्रमाणात दाब ठेवता येतो. एरवी सत्ताधारी पक्ष अनियंत्रित बनतो. हा अनुभव गेली पंचवीस वर्षे सतत आला असतानाही विरोधी पक्षांनी त्यापासून बोध घेतला नाही. त्यामुळे त्यांना विधिमंडळात जबाबदार तुल्यबल असा पर्यायी पक्ष निर्माण करता आला नाही. त्यातूनच विरोधी पक्षनेत्यांची सध्याची निराशेची, न्यूनगंडाची व वेछूट मनोवृत्ति निर्माण झाली आहे. ही परिस्थिति बदलावी व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन सर्वांना समान अशी काही भूमिका घेऊन व त्या पार्श्वभूमीवर एक संयुक्त आघाडी किंवा एक पर्यायी पक्ष बनवून सत्ताधारी पक्षाच्या इच्छुकाविरुद्ध एकच विरोधी इच्छुक उभा करावा व विधिमंडळात एक जबाबदार व तुल्यबल विरोधी पर्यायी पक्ष बनवावा यासाठी हिंदुसभेने आपल्याकडून पुष्कळ खटपट केली. या कामी १९५७ साली महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीने तसा प्रयत्न केला व तो बऱ्याच प्रमाणात यशस्वीही झाला. पण पुढे त्याच्याच रूपांतरातून जो पक्ष संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या रूपाने सिद्ध झाला त्याला तेवढेही बळ आले नाही. कारण पक्षीय हितबुद्धीच अधिक वाढीस लागली. जनसंघाने तर संपूर्ण महाराष्ट्र समितीतून आपले अंगच काढून घेतले. इतर पक्षांनीही समितीचे सामर्थ्य वाढविण्याऐवजी तिच्या बळाचा आपल्या पक्षवाढीसाठी उपयोग करून घेण्यावर भर दिला. त्यामुळे महाराष्ट्रात विरोधी पक्ष संघटित बळ धरू शकला नाही. समान भूमिकेच्या आधारावर ही स्थिति होती; आता तर त्यांच्याही विचारधारा वेगवेगळ्या दिशांनी वाहू लागल्या असल्याने त्यांच्यात कसलेच सामर्थ्य उरले नाही. अलीकडच्या काळात पुन्हा या दिशेने प्रयत्न केला पाहिजे याची जाणीव काही पक्षनेत्यांना झाली आहे; पण पक्षगत अहंकार अजूनही बळकट आहेत. व त्यामुळे निवडणुकीपुरतीही एकजूट आघाडी निर्माण होऊ शकलेली नाही. तथापि अशी आघाडी बनविल्याशिवाय विरोधी पक्षांनाही भवितव्य नाही, हे १९७१ च्या लोकसभेच्या निवडणुकांतील निकालावरून दिसून आले आहे. या निवडणुकीत भाग घेणारे पक्ष, त्यांनी उभ्या केलेल्या इच्छुकांची संख्या, त्यांच्या वतीने निवडून आलेल्यांची संख्या व निवडून आलेल्यांच्या प्रमाणात पक्षांना प्रत्येकी सरासरी पडलेली मते यांचे आकडे पुढे दिले आहेत.

पक्ष	निवडून आलेल्या दर इच्छुकामागे पक्षाला मिळालेली सरासरी मते	पक्षाने उभे केलेले इच्छुक	पक्षाने मिळविलेल्या जागा
सत्ताधारी काँग्रेस	१, ७९, ३९८	४३९	३५३
संघटना काँग्रेस	९, ५५, ३२९	२६८	१६
जनसंघ	४, ८९, ५३६	१५६	२२
स्वतंत्र	५, ६८, ७३१	५९	८
संयुक्त समाजवादी	११, ८४, ९७१	९१	३
प्रजा समाजवादी	७, ४९, ६६२	६५	२
कम्युनिस्ट (रशियावादी)	३, ००, १७७	८६	२३
कम्युनिस्ट (मार्क्सवादी)	२, ९६, ४२२	८५	२५
द्रविड मुन्नेत्र कळघम	२, ४४, ०३३	२४	२३
तेलंगण वादी	१, ८७, ३५९	१४	१०
अपक्ष इच्छुक	७, ७४, ९३७	१५४५	४३

वरील कोष्टकावरून हे दिसून येईल की, प्रत्येक विरोधी पक्ष सर्व जागा लढवू शकत नाही. त्यांच्या त्यांच्या बळाची काही काही केंद्रस्थळे असतात, त्यामुळे त्यांना इच्छुकामागे सरासरी मते अधिक मिळूनही त्यांच्या वाट्याला जागा कमी येतात. विद्यमान निवडणूक पद्धतीत हा दोष अपरिहार्य आहे. म्हणून सर्वच विरोधी पक्ष-. नेत्यांनी या वस्तुस्थितीपासून बोध घेतला पाहिजे. विरोधी पक्षातील फाटाफुटीमुळे अपक्ष इच्छुकांनाही निवडणुकीत भाग घेण्याचा मोह होतो व त्यांना उभे करून विरोधी मते फोडण्याचाही प्रयत्न केला जातो. म्हणून विरोधी पक्षांची एकजूट आघाडीचीच अत्यंत आवश्यकता आहे. तरच या देशात तुल्यबल विरोधी पर्यायी पक्ष उभा राहण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न

सन १९४६ वर्षी महाराष्ट्र हिंदुसभेचे प्रांतिक अधिवेशन बार्शी येथे भरले होते. त्यात भाषावार राज्यरचना करण्यात यावी व महाराष्ट्राचे निरनिराळ्या प्रांतांतून विखुरलेले भाग एकत्रित करावेत याविषयी एक प्रस्ताव संमत करण्यात आला होता, भारताची नवी घटना तयार झाल्यावर या विषयाला सर्व देशभर विशेष प्राधान्य मिळाले. सरकारने धार यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले होते. त्याने काही सूचना केल्या. त्यानंतर आंध्र प्रांतातील पोट्टू रामुलु यांनी या प्रश्नाला तीव्र स्वरूप आणले व त्यापायी त्यांनी देहत्यागही केला. तेव्हा नेहरूंनी फाजलअल्ली यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. त्यांनी हैदराबाद राज्याचे

विभाजन सुचवून महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र हे त्यातील घटक विभाग लगतच्या भाषिक राज्यांत समाविष्ट करावेत अशी सूचना केली. इतर प्रांतांच्या बाबतीतही त्यांनी अनेक पर्याय सुचविले होते. फाजल अल्ली कमिशनच्या शिफारशी नेहरू सरकारने स्वीकारल्या व त्याप्रमाणे मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आला. तथापि विदर्भातील काही लोकांची महाराष्ट्रात समाविष्ट होण्याची इच्छा नव्हती. परंतु पुढे बरेच मोठे लोकमत विदर्भ महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात यावा या बाजूचे झाले. मुंबई महाराष्ट्रातून वेगळी काढून ती केंद्रशासित करावी यासाठी काही दिवस बरेच प्रयत्न झाले तेव्हा त्याविरुद्ध चळवळही मोठी करावी लागली. त्या सर्व चळवळीत इतर पक्षांच्या बरोबरीने महाराष्ट्र हिंदुसभेने भाग घेतला. अजूनही तो प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. काही काळ महाराष्ट्र-गुजराथ असे द्वैभाषिक राज्य होते; पण गुजराथने नंतर वेगळे व्हायचे ठरविले. गुजराथ-महाराष्ट्र सीमेवरील डांग भागाचा वाद काही काळ राहिला; पण पुढे तोही मिटला. तथापि महाराष्ट्र-कर्नाटक यांच्यातील सीमा तंटा अजून मिटलेला नाही. महाराष्ट्राने या बाबतीत शुद्ध न्यायाची भूमिका घेतलेली आहे. सलग भाषिक खेड्याची मर्यादा स्वीकारण्यात यावी व अगदीच प्रादेशिक व अन्य विशेष महत्त्वाच्या अडचणी असतील तरच व तेवढ्यापुरत्या स्थानिक लोकांच्या इच्छेनुसार अपवाद करून स्वतंत्र निर्णय करावा ही या बाबतीत हिंदुसभेची व महाराष्ट्रातील निरनिराळ्या पक्षांची सर्वांना समान अशी भूमिका आहे. पण सत्ताधारी पक्षाचे राजकारण त्यास अद्यापही आडवे येत आहे. कर्नाटकात गेलेला मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रास देण्यास कर्नाटकाचा विरोध आहे व महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही ठिकाणी आपल्या पक्षाला पाठिंबा असावा यासाठी केंद्र सरकार अशुभस्य कालहरणम् किंवा 'ठंडे करके खाना' या गोविंद वल्लभ पंतांच्या धोरणानुसार या प्रश्नी न्याय करण्याची भाषा बोलत नाही. बेळगाव-कारवारचा प्रश्न त्यामुळे अधांतरी लोंबकळत पडला असून त्या भागातील मराठी भाषिक जनतेने आपल्याकडून सर्व प्रकारचा पुरावा उपलब्ध केला, निवडणुकांतून लोकमत व्यक्त केले तरी अन्याय दूर केला जात नाही.

त्याचे मुख्य कारण असे की देशाच्या फाळणीनंतर भारतात सुसंघटित असा तुल्यबल पर्यायी पक्ष निर्माण झालेलाच नसल्याने सरकारवर जे दडपण यावयास पाहिजे ते येत नाही व सरकारला इतरांच्या मतांचे महत्त्व वाटत नाही. न्याय करण्याची त्यांची बुद्धि नाही. किंबहुना या बाबतीत काही न करता हा प्रश्न आहे तशाच अवस्थेत कुचमत जिरवून टाकण्याचेच काँग्रेस सरकारचे धोरण आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीने १९५७ वर्षी महाराष्ट्राचीच फाळणी होण्याचा प्रसंग आला तेव्हा सर्व विरोधी पक्षांची संयुक्त आघाडी निर्माण केली. तेवढ्यापुरते महाराष्ट्रातून काँग्रेसचे बळ मोठ्या प्रमाणावर घटले. त्या वेळी मात्र काँग्रेस

शासकांना जाग आली आणि त्यांनी विदर्भासह महाराष्ट्र एकत्रित केला. पण सीमा प्रश्न अद्यापही तसाच राहिला आहे. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या जागी संपूर्ण महाराष्ट्र समिति निर्माण झाली. पण तिने बळ धरले नाही. भारतातील जनसंघ पक्षाचे महाराष्ट्रात एक मत, तर कर्नाटकात दुसरे मत होते ! संपूर्ण महाराष्ट्र समितीतून त्यांनी आपले अंगही काढून घेतले. इतर पक्षांचे धोरणही संपूर्ण महाराष्ट्र चळवळीचा आपल्या पक्षाला किती फायदा होतो एवढेच पाहण्याकडे विशेष राहिले. त्यामुळे सीमा प्रश्न अजूनही लोंबकळत राहिला आहे.

हिंदुसभेने मात्र सातत्याने या प्रश्नाची न्यायाची बाजू उचलून धरली आहे. महाराष्ट्र हिंदुसभेने १९४६ साली प्रथम या प्रश्नाला तोंड पाडले व नंतर प्रत्येक वेळी तिने याच धोरणाचा पाठपुरावा केला आहे. १९६० वर्षी हैदराबाद येथे भरलेल्या अखिल भारत हिंदुमहासभेच्या वार्षिक अधिवेशनातही तिने या प्रश्नावर सलग भाषिक खेड्याच्या पायावर सीमा प्रश्न सोडवावा असा प्रस्ताव संमत केला. तथापि हा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक इतके बळ एकट्या हिंदुसभेजवळ नसल्याने ती अधिक काही करू शकली नाही.

त्यानंतर गोव्याच्या स्वातंत्र्याचा लढा सुरू झाला. त्यातही महाराष्ट्र हिंदुसभेने भाग घेतला. गणपतराव फडके, हरि भास्कर भिडे, विटयाचें बापट, सातारचे पंचपोर, सांगलीचे पटवर्धन व गोखले वि. घ. देशपांडे (हे तेव्हा हिंदुसभेत होते) इत्यादींनी संयुक्त आघाडीत हिंदुसभेच्या वतीने भाग घेतला. त्यात काहींना कमी अधिक तुरुंगाच्या शिक्षाही झाल्या. पुढे सरकारनेच सेना पाठवून गोवा मुक्त केला. सारांश सर्वमान्य कार्यासाठी जेव्हा सामुदायिक चळवळी सुरू होत तेव्हा त्यांत इतर पक्षांच्या बरोबरीने व त्यांच्याशी सहकार्याने हिंदुसभा भाग घेत आली आहे. त्याशिवाय हिंदुसभेने स्वतःच्या अशाही चार चळवळी १९५० नंतरच्या काळात हाती घेतल्या व त्या पार पाडल्या. परदेशी मिशनऱ्यांविरुद्धची चळवळ, काशी विश्वेश्वर आंदोलन, युकॅरिस्ट कॉंग्रेसविरोधी आंदोलन, गोव्यातील नव हिंदूंची नामान्तर नोंदणी आणि अगदी अलीकडे वन्देमातरम् प्रकरण व पाचगणी येथील नैतिक मूल्यांची प्रतिष्ठापना करण्याच्या नावाखाली परदेशासाठी हेरगिरी करणाऱ्या संघटनेविरुद्ध मोर्चात भाग इ. होत. त्यांचा तपशील पुढे दिला आहे.

*

(१५)

परदेशी ख्रिस्ती आक्रमणांना विरोध

भारतात परकीय ख्रिस्ती मिशनऱ्यांचे आक्रमण गेली कमी अधिक चारशे वर्षे चालू आहे. जो जो प्रदेश इंग्रजांनी जिंकला तेथे तेथे मिशनरी लोकांनी हातपाय पसरले. त्यापूर्वी पोर्तुगीज लोकांनी मुसलमानी सत्ताधाऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून व त्यांच्या सारखे अत्याचार करून या देशातील लोकांना छळाने व जुलुमजबरदस्तीने बाटविले. हिंदु समाजाने भीतीच्या पोटी शुद्धीकरणाची चळवळ सोडून दिल्याने एकदा जे परधर्मात गेले ते कायमचेच; पण आता त्यात शुद्धीकरणाच्या चळवळीने थोडा पालट होऊ लागला आहे. छत्रपति शिवाजी व संभाजी यांनी फिरंग्यांना तरवारीचा धाक दाखवून काही दहशत बसविली होती. त्यामुळे अत्याचार थांबले. पुढे इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्यावर मिशनऱ्यांनी आपली प्रचार यंत्रणा वाढविली व समाजोद्धाराच्या नावाखाली धर्मान्तराचा सपाटा सुरू केला. लॉर्ड आर्यविन यांनी मिशनऱ्यांच्या संबंधात असे उद्‌गार काढले होते की, "Every additional Christian is an additional bond of union with the country and an additional source of strength to the Empire (प्रत्येक नवा ख्रिश्चन होणारा माणूस हा ब्रिटनला जोडणारा एक नवा दुवा आणि साम्राज्याच्या सामर्थ्यात भर घालणारा असतो.) यावरून ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचाराला ब्रिटिश सरकार किती महत्त्व देत असे हे दिसून येते.

१९५१ वर्षी (फाळणीनंतर) येथील ख्रिश्चनांची संख्या ८३,९२,०३८ होती व सुमारे दहा हजार मिशनरी व ११६८१ स्त्री प्रचारक होते. स्वातंत्र्य मिळताच ब्रह्मदेशाने परदेशी मिशनऱ्यांना बंदी केली हे पाहून भारत स्वतंत्र झाल्यावर ख्रिस्ती धर्मप्रचाराला आता येथे वाव राहणार नाही अशा समजुतीने येथील परदेशी मिशनऱ्यांनी भराभर आपल्या अनेक मिळकती विकून टाकल्या व बरेच परदेशी मिशनरी येथून निघून गेले. पण थोड्याच दिवसांत त्यांना आपली गैरसमजूत झाली असे दिसून आले. हिंदुस्थान सरकारच्या कृपेने येथे आपला धर्मान्तराचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालविण्यास भरपूर वाव आहे हे त्यांच्या लक्षात आले तेव्हा परदेशी गेलेले मिशनरी परत हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर येऊ लागले. या मिशनऱ्यांतून आपल्या देशासाठी हेरगिरीचा उद्योगही मोठ्या प्रमाणावर चालतो. फादर फेरर याला अलीकडच्या काळात महाराष्ट्र सरकारने हाकलून दिले तर आंध्र सरकारने त्यास आश्रय दिला ! आता त्यांनीही फेररला हाकलले तर केंद्र सरकारने त्यास पाठिंबा दिला आहे !

मिशनऱ्यांचे काम विशेषत: हरिजन व गिरिजन वर्गांत त्यांच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा फायदा घेऊन पैशाच्या बळावर चालते. शाळा दवाखाने, अनाथालये व बोर्डिंगे ही त्यांची विशेष साधने आहेत. भारतातील मिशनांसाठी परदेशातून १९५०–५४ या काळात २९,२७,३९,००२ रुपये देणग्यांच्या रूपाने आले यावरून या मिशनांना परदेशांतून केवढ्या मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत उपलब्ध होते हे दिसून येते. मध्यप्रदेश व मध्यभारतातील परदेशी मिशनऱ्यांनी वनवासी प्रदेशात फारच धुमाकूळ घातला तेव्हा त्या वेळच्या तेथील सरकारांनी त्यांच्या कारभाराची चौकशी करण्याकरिता न्या. नियोगी व न्या. रेगे यांची कमिशने नेमली होती. त्यांनी चौकशी करून मिशनऱ्यांच्या राष्ट्रविरोधी कारवाया उजेडात आणल्या. तेव्हा महाराष्ट्र हिंदुसभेने परदेशी मिशनऱ्यांविरुद्ध चळवळ उभारली. श्री. हरि भास्कर भिडे, श्री. रा. स. भट, श्री. कृ. गं. गांगुर्डे, सोमनाथ होनराव घैसास प्रभृतींनी ही चळवळ सुरू केली. त्यांनी १९५४-५५ वर्षात एकूण १३ परदेशी मिशनांवर मोर्चे नेले व परदेशी मिशनऱ्यांनो परत जा म्हणून प्रचार केला. सर्वसामान्य जनतेत त्यामुळे काही जागृति झाली. तथापि सरकारी धोरणावर त्याचा फारसा परिणाम झाला नाही. परंतु हिंदुसभेने केलेल्या या आंदोलनाचे महत्त्व त्यामुळे कमी होत नाही. या आंदोलनाचे वृत्त श्री. रा. स. भट यांच्या टिपणांच्या आधारे काळच्या दि, ११।११।१९७४ च्या अंकात देण्यात आले आहे. त्यावरून व सांगली हिंदुसभेच्या प्रतिवृत्ताच्या आधारे ते हिंदुसभेच्या या इतिहासात सारांशाने समाविष्ट केले आहे.

‘परदेशी मिशनऱ्यांनो, भारत सोडा’ आंदोलन

महाराष्ट्र हिंदुसभेच्या वतीने सन १९५४-५५ वर्षी परदेशी खिश्चन मिशनऱ्यांनी भारत देश सोडून जावे यासाठी एक मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्यात आले. परदेशी खिश्चन मिशनऱ्यांनी या देशात खिस्तीकरणासाठी चालविलेले उद्योग व त्या नावाखाली चालविलेली राष्ट्रद्रोही कारस्थाने उघडकीस आणणे व त्यांना या देशात येण्यास वा राहण्यासच सरकारने बंदी करावी यासाठी सरकारचे मन वळविणे हा यामागे मुख्य उद्देश होता. हे आंदोलन सन १९५४-५५ वर्षी वर्षभर करण्यात आले. त्यानिमित्त हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांनी निरनिराळ्या तेरा परदेशी खिस्ती मिशन केंद्रांवर मोर्चे नेले व परदेशी खिश्चन मिशनऱ्यांनी हा देश सोडून जावे अशी त्यांना समज देण्यात आली.

आंदोलनाचा परदेशात परिणाम

या शांततामय आंदोलनामुळे स्वदेशातील व परदेशातीलही खिस्ती मिशन केंद्रांतून बरीच खळबळ उडाली व त्यांच्यात धावपळही सुरू झाली.. नोव्हेंबर

१९५४ मध्ये ॲव्हनस्टन (अमेरिका) येथे जागतिक ख्रिस्ती धर्मपरिषदेचे अधिवेशन भरले होते. त्यातही या आंदोलनाची दखल घेण्यात आली व हिंदुस्थानात ख्रिस्ती धर्माचा प्रचार करणारांनी कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे यासंबंधाने प्रचारकांना उद्देशून काही खास मार्गदर्शनही करण्यात आले. त्याचबरोबर अशी दक्षता न बाळगली तर ख्रिस्ती धर्मप्रचारकांना हिंदुस्थानातून बाहेर पडावे लागेल याची त्यांस जाणीवही देण्यात आली.

त्या वेळी भारताचे त्या वेळचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांजकडे परदेशी मिशन केंद्रांनी काही स्पष्टीकरण मागितले. तेव्हा अमेरिकन मिशनांची समजूत काढण्यासाठी पं. नेहरूंना काही खुलासेही करावे लागले. नेहरूंनी तसे खुलासे केले व धर्मप्रचारास हिंदुस्थान सरकारचा विरोध नसल्याचे त्यांना कळविले. पण त्याचबरोबर काही मिशनरी देशद्रोही कारवाया करीत असल्याचे आढळून आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

न्या. नियोगी व न्या. रेगे यांची चौकशी मंडळे

याच सुमारास मध्यप्रदेश सरकारने न्या. नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली व मध्यभारत सरकारने न्या. रेगे यांच्या अध्यक्षतेखाली मिशनऱ्यांच्या हालचालींची माहिती गोळा करण्यासाठी चौकशी मंडळे नेमली. ख्रिस्ती केंद्रांतून चाललेल्या कार्याची तपशीलवार माहिती काढून ती निवेदन करण्यास त्यांना सांगितले होते. या दोन्ही चौकशी मंडळांचे वृत्तान्त सरकारने प्रसिद्ध केले आहेत. त्यावरून परदेशी ख्रिस्ती मिशनरी या देशाविरुद्ध कशा कारवाया करतात व गरीब, अडाणी, व आर्थिक नि सांस्कृतिक दृष्टया परावलंबी असलेल्या जनतेची कशी दिशाभूल करतात, त्यांस फसवितात व ख्रिश्चन धर्मात खेचण्याचा कसा प्रयत्न करतात हे चांगले दिसून आले आहे.

भारतातील देशी ख्रिस्ती लोकांनीही हिंदुसभेच्या या आंदोलनाचा फायदा घेतला. पुण्याचे बिशप श्री. पाटेकर यांच्यासारख्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीही येथील मिशन्स भारतीय ख्रिस्ती लोकांच्या स्वाधीन करून परदेशी मिशनऱ्यांनी येथून निघून जावे या विचारास पुष्टि दिली. काही ठिकाणी पूर्वास्पृश्य समाजांतही जागृति होऊन त्यांनी महार इसाई शुद्धीकरण संस्थेसारख्या संस्था काढून पूर्वास्पृश्यांतून ख्रिस्ती झालेल्यांना परत स्वधर्मात घेण्याची चळवळ सुरू केली. भारतातील अनेक वृत्तपत्रांनी या चळवळीची दखल घेतली व या विचाराला प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष चालना दिली. शेवटी भारत सरकारलाही परदेशी मिशनऱ्यांच्या भारत प्रवेशावर काही प्रमाणात निर्बंध घालावे असे वाटू लागले.

महाराष्ट्र हिंदुसभेने १९५४ वर्षी हे आंदोलन हाती घेतले व ते कमी अधिक वर्षभर चालविले. या आंदोलनात महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वतीने कमीत कमी

पाच व जास्तीत जास्त अकरा जणांनी भाग घेतला. हे स्वयंसेवक मिरवणुकीने खिरश्चन मिशनरी केंद्रांवर जात व परदेशी खिरश्चन मिशनऱ्यांनी हा देश सोडून जावे असा प्रचार करीत. या आंदोलनातील पहिला मोर्चा दि. २८ मे १९५४ दिवशी पुण्याहून निघून पसतीस मैलांवरील केडगाव येथील पंडिता रमाबाई मिशनवर गेला व त्यानंतर क्रमाक्रमाने वसई, लखनौ (उत्तर प्रदेश), वाई, सोलापूर, नगर, स्पायसर मिशन पुणे, पंढरपूर, कोडोली (कोल्हापूर), नागपूर, नगर, नाशिक व वेंगुर्ला अशा एकूण तेरा केंद्रावर गेला.

डिसेंबर १९५३ मध्ये पुण्यास स्वा. सावरकरांचे नाशिक येथील अभिनव भारत मंदिर या संस्थेच्या साठी एक व्याख्यान झाले. विषय होता 'धर्मान्तर हेच राष्ट्रान्तर.' व्याख्यानाच्या शेवटी सावरकर म्हणाले :" आज आपल्या देशात परकीय खिरश्चन मिशनऱ्यांनी उचल केली आहे. गोवा, त्रावणकोर इत्यादि ठिकाणी त्यांनी हिंदूंचे धर्मान्तर घडवून दंगेही घडविले आहेत. हे परकीय खिरश्चन लोक शिक्षण अन्नदान, औषधे इत्यादि रूपांनी हिंदूंचे धर्मांतर घडवून आणतात. या त्यांच्या धर्मान्तराचा परिणाम एका पिढीत राष्ट्रान्तर घडून येण्यात होतो.

"हिंदूंमध्ये सहिष्णुतेचे वेड फार बोकाळले आहे. हिंदुधर्मासारखा सहिष्णु धर्म नाही हा परकीयांनी प्रचार चालविला आहे. पण वस्तुस्थिति थोडी वेगळी आहे. हिंदुधर्म हा काही अंशी सहिष्णु आहे तर तो काही अंशी असहिष्णुही आहे. न्यायाच्या संबंधात सहिष्णुता असली पाहिजे; पण अन्यायाच्या बाबतीत हिंदु तत्त्वज्ञान असहिष्णुता शिकविते. अन्यायाशीही सहिष्णुता दाखविणे हा केवळ मुर्दाडपणा होय. म्हणून यापुढे हिंदु समाजाने खिरश्चन मिशनऱ्यांच्या कारवायांना प्रखरपणाने तोंड दिले पाहिजे. हिंदुसभा, आर्यसमाज इत्यादि हिंदु संस्थांनी पुढील पाच वर्षांत परदेशी खिरश्चन मिशनऱ्यांविरुद्ध आघाडी उघडली पाहिजे. त्यांना वेळीच आळा घातला तर धर्मान्तरातून निर्माण होणारा राष्ट्रान्तराचा धोका टळू शकेल."

हिंदुमहासभेचा प्रस्ताव

दि. ७, ८ व ९ मे १९५४ या दिवशी भाग्यनगर (हैदराबाद) येथे अखिल भारत हिंदुमहासभेचे वार्षिक अधिवेशन बॅ. निर्मलचंद्र चतर्जी यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या अधिवेशनात खिरस्ती मिशनऱ्यांनी या देशात चालविलेल्या धर्मान्तराच्या संबंधात संमत झालेल्या प्रस्तावात असे म्हटले होते की, " पाक-अमेरिका कराराच्या पार्श्वभूमीवर चाललेल्या परदेशी मिशनऱ्यांच्या हालचाली या भारताच्या सुरक्षिततेला व अखंडत्वाला धोका आणणाऱ्या आहेत.

" ब्रिटिश किंवा मोंगल राजवटीपेक्षाही मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र हिंदुस्थानात हिंदूंचे धर्मान्तर घडून यावे ही अतिशय गंभीर व दुःखाची गोष्ट आहे. लोकसभेत गृहमंत्र्यांनी केलेल्या निवेदनावरून असे दिसते की स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या

पाच वर्षांत भारतातील परदेशी मिशनऱ्यांची संख्या तिप्पट झाली आहे व त्यातही अमेरिकन मिशनरी अधिक आहेत.

" वर्तमान परिस्थितीचा विचार करता धर्मान्तरातून राष्ट्रान्तर निर्माण होते हा सिद्धान्त अनुभवास येत असून परदेशी मिशनऱ्यांच्या राष्ट्रघातक हालचालींना राष्ट्राच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सरकारी स्तरावरून पायबंद घालणे अवश्य आहे यासाठी सरकारने परदेशी मिशनऱ्यांच्या कार्याला या देशात सरसकट बंदी घालावी अशी हिंदुमहासभेची मागणी आहे."

वरील प्रस्तावाची सरकारने दखल घेतली नाही. तथापि परदेशी मिशनऱ्यांना या देशातून घालवून लावावे यासाठी लोकमत जागृत करण्यासाठी अ. भा. हिंदु-महासभेचे कार्यवाह श्री. हरि भास्कर भिडे व पुणे हिंदुसभेचे कार्याध्यक्ष श्री. रामचंद्र सदाशिव भट व कार्यवाह श्री. कृष्णराव गांगुर्डे यांनी आंदोलन करण्याचे ठरविले व " परदेशी मिशनऱ्यांनो भारत सोडा " या चळवळीला प्रारंभ केला.

हे आंदोलन शांततेने व थोडया लोकांनी मोर्चे काढून करण्याचे ठरले. त्यासाठी स्वयंसेवकांनी मोर्चे घेऊन परदेशी मिशनऱ्यांच्या केंद्रावर जावयाचे, तेथील केंद्र प्रमुखांच्या भेटी घ्यावयाच्या व त्यांनी या देशातून निघून जावे अशी त्यांस विनंती करावयाची व तशी सूचना देणारे एक लेखी निवेदन त्यांस द्यावयाचे असा कार्यक्रम आखण्यात आला. या लेखी सूचनेत असे म्हटले होते :

" परदेशी मिशनऱ्यांनो, सुमारे पाचशे वर्षांपूर्वी आपले पूर्वज या देशात धर्मप्रचाराचे काम करण्यासाठी म्हणून आले. त्यांनी लोकांचे अज्ञान व दारिद्र्य व त्यांच्यातील राष्ट्रभावनेचा अभाव लक्षात घेऊन येथील लक्षावधि लोकांना बाटवून ख्रिश्चन धर्मात घेतले व अशा रीतीने युरोपियन साम्राज्यशाहीचा रस्ता सुकर करण्यास साहाय्य केले.

" पाश्चात्यांची सत्ता या देशात प्रस्थापित होताच भारतात ख्रिश्चन धर्मीयांचा बडेजाव वाढत गेला. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामामुळे हिंदुस्थानच्या इतर भागांतील धर्मप्रचाराला आळा बसला तरी रोमन कॅथॉलिक लोकांच्या पोर्तुगीज गोव्यातील राजसत्तेच्या बळावर त्यांचे हिंदूंवर आक्रमण सुरूच होते.

स्वातंत्र्यानंतर भारतात परदेशी मिशनऱ्यांची वाढ

" हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावरही त्याचे परराष्ट्रीय राजकारण अँग्लो अमेरिकन गटाला मानवले नाही. गेल्या पाच वर्षांत योगायोगाने असो किंवा हेतुतः असो, पण परदेशी मिशनऱ्यांची संख्या येथे एकसारखी वाढत आहे. त्रावणकोर, कोचीन, मध्यप्रदेश, ओरिसा, आसाम व सीमा भागांतील प्रदेश येथे हे ख्रिस्ती मिशनरी आपल्या हस्तकांमार्फत स्वतंत्र ख्रिस्तीस्थाने निर्माण करण्याच्या घोषणा करीत आहेत. अशा स्थितीत परदेशी मिशनऱ्यांनी चालविलेल्या शाळा व रुग्णालये ही या

देशात देशद्रोही वातावरण फैलावणारी केंद्रे ठरणार असा ठिकठिकाणच्या अनुभवावरून या देशातील बहुसंख्य लोकांचा समज होत आहे. परदेशी मिशनऱ्यांपैकी खरोखर धर्मोपदेशक कोण व देशद्रोही वातावरण निर्माण करणारे प्रचारक कोण हे पाहात बसून आम्ही आमच्या राष्ट्रावर संकट ओढवून घेऊ इच्छीत नाही. तरी सद्यःस्थितीत निदान काही वर्षे तरी आपण सर्वांनी हा देश सोडून निघून जावे. आमच्या राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने आम्ही तुम्हांला ही समज देत आहो."

महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. गणपतरावजी नलावडे यांच्या सहीने वरील आशयाचे पत्रक काढून ते परदेशी मिशनऱ्यांना देण्याचे ठरले व त्याप्रमाणे पत्रके तयार करण्यात आली.

या आंदोलनाला प्रारंभ केडगाव येथील मिशनवर मोर्चा नेऊन करण्यात आला. या आंदोलनाचे स्वरूप लोकांना समजावे यासाठी दि. २८ मे १९५४ ला पहिले पत्रक काढण्यात आले.

पहिला मोर्चा केडगाव केंद्रावर

दि. २४ मे १९५४ दिवशी सकाळी सात वाजता महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे नेते श्री. हरि भास्कर भिडे यांच्या नेतृत्वाखाली हिंदुसभेचा पहिला मोर्चा निघाला. या मोर्चात श्री. हरि भास्कर भिडे, श्री. रा. स. भट, श्री. कृष्णराव गांगुर्डे, श्री. म. ग. घैसास व श्री. सोमनाथ बाळशेट होनराव असे पाचजण होते. कसबा गणपतीला वंदन करून हा मोर्चा शिवाजी रस्त्याने पदयात्रा करीत मंडई चौक, शाहू चौक, स्वारगेट चौक येथे व पुढे वाटेत गावोगावी छोटया सभा घेऊन व तेथे लोकांना मोर्चाचा उद्देश सांगत केडगावपर्यंत गेला.

या मोर्चामुळे मिशनऱ्यांनी बरीच धास्ती घेतली असल्याचे दिसून आले. या मोर्चाबरोबर पोलिस बंदोबस्तही बराच होता. वाटेत जेथे जेथे ख्रिस्ती चर्चे लागली तेथे तेथेही आरक्षक उभे होते. मोर्चाचा पहिला मुक्काम हडपसर येथे झाला. येथे पूर्वपाकस्तानात बळजबरीने बाटविलेले मूळचे हिंदु गृहस्थ श्री. चक्रवर्ती, त्यांची पत्नी व मुले यांचे हिंदूकरण करण्यात आले. तेथून हा मोर्चा लोणी, उरुळी कांचन, यवत येथे मुक्काम करीत व सभा घेत दि. २७ ला केडगाव येथे पोहोचला.

दि. २७ ला केडगाव येथे मोर्चा येणार याची जाहिरात आधीच झालेली होती. त्यामुळे जनतेत कमालीचे कुतूहल निर्माण झालेले होते. या संबंधात ख्रिश्चन मिशनरी प्रमुखांनी सरकारकडे आधीच पत्रव्यवहार करून संरक्षण मागविले होते. त्याप्रमाणे तेथे मिशनच्या वस्तीजवळ साध्या पोशाखातील व गणवेषातील सुमारे शंभर आरक्षक सिद्ध होते. मोर्चातील कार्यकर्ते सकाळी दहा वाजता मिशनच्या परिसरात पोचले. त्या वेळी तेथील वस्तीस जत्रेचे स्वरूप आले होते.

मोर्चातील मंडळी केडगाव येथे पोहोचताच हुबळी येथील दि सेंटेनरी ख्रिश्चन असोसिएशन या मिशनचे प्रमुख श्री. सी. एस. किर्बो यांनी महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. ग. म. नलावडे यांना पाठविलेली ७२ शब्दांची तार मोर्चाचे नेते श्री. भिडे यांच्या हाती पडली. या तारेत म्हटले होते : " या प्रकरणी विविध प्रांतांत करावयाच्या चौकशीसाठी आवश्यक असलेले शांततेचे वातावरण तुमच्या केडगाव मिशनविरुद्ध करण्यात येणाऱ्या निदर्शनांनी दूषित होणार असून आपल्या राष्ट्राच्या परंपरेला कलंकित करणारे व आपल्या राष्ट्राच्या सहिष्णुतेच्या कीर्तीला काळिमा फासणारे असून परदेशी पाहुण्यांचे आपले राष्ट्र करीत असलेल्या आदरातिथ्याचा अपमान करणारे आहे. अखिल भारतातील हिंदुसभेच्या व ख्रिश्चनांच्या पुढाऱ्यांची गोलमेज परिषद होईपर्यंत हे निदर्शन स्थगित करावे. प्रभु सर्वांना सद्‌बुद्धि देवो व सन्मार्ग दाखवो."

मोर्चा मिशनकडे निघाला तेव्हा मिशनच्या सर्व दरवाज्यांवर आरक्षकांचा बंदोबस्त ठेवण्यात आलेला होता. मोर्चातील कार्यकर्त्यांनी भगव्या टोप्या घातलेल्या होत्या. त्यामुळे त्यांजकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले.

या वेळी केडगाव मिशनमध्ये सातशे मुली असल्याचे समजले. त्यांना अनुज्ञेवाचून कोठेही बाहेर जाता येत नाही. बहुतेक परप्रांतांतील मुलींचा भरणा त्यात होता. मिशनतर्फे चालविण्यात येणाऱ्या अनाथाश्रमात सामान्यतः परप्रांतीय मुली ठेवण्याची पद्धति आहे. त्यामुळे त्या स्थानिक समाजात मिसळत नाहीत. सामान्यतः ख्रिस्ती स्त्रिया बांगड्या घालीत नाहीत व कुंकूही लावीत नाहीत. पण केडगावला मोर्चा येणार हे समजल्यामुळे आधल्या दिवशीच्या आठवडेबाजारात या सर्व मुलींना बांगड्या भरण्यात आल्याचे समजले. त्याचप्रमाणे मोर्चाची वार्ता ऐकून मुंबई, नाशिक, नगर, मनमाड आदि ठिकाणांहून सुमारे शंभर ख्रिस्ती मंडळी केडगाव येथे आल्याचे समजले.

मोर्चाच्या प्रचारासाठी हिंदुसभा कार्यकर्त्यांनी आधल्या दिवशी दि. २६ ला मिशनच्या जवळच्या भागात एक प्रचारसभा घेतली होती. तिला सुमारे हजार नागरिक उपस्थित होते. या सभेच्या वेळी माळीबाबा नावाच्या तेथे वास्तव्य करून असलेल्या साधूने पुढे येऊन मोर्चातील मंडळींना आशीर्वाद दिला. दि. २७ मे दिवशी सकाळी अशीच एक सभा घेण्यात आली. या सभेचे अध्यक्ष श्री. गणपतरावजी नलावडे हे होते. मुंबईहून आलेले एक तरुण ख्रिश्चन गृहस्थ श्री. सत्यवान नामदेव सूर्यवंशी यांनी नलावडे यांना काही गैरलागू प्रश्न विचारण्यास सुरवात केली. तेव्हा लोकांनीच त्यांस परस्पर गप्प बसविले व हवी तर तुम्ही दुसरी सभा घ्या पण येथे गडबड करू नका असे बजावले. ही सभा आटोपून मोर्चा मिशनच्या कार्यालयाकडे निघाला. त्या वेळी मोर्चात पुण्याहून आलेल्या सुंदराबाई

भोपटकर, गिरिजाबाई गोरे आदि महिलाही सामील झाल्या. मोर्चाबरोबर हजारो स्थानिक लोकही होते व त्यांत अनेक महिलाही होत्या.

मोर्चा मिशनजवळ येताच एक पांढरी टोपी घातलेले गृहस्थ गडबड करू लागले. तेव्हा एका हॅटवाल्या गृहस्थाने त्यांना दूर नेऊन शांत केले. या वेळी मोर्चात दोनशे लोक सामील झाले होते. " परदेशी मिशनऱ्यांनो भारत सोडा, " " मिशनऱ्यांच्या हस्तकांच्या कारवाया बंद पाडा " इत्यादि घोषणा देण्यात आल्या. मोर्चाला लाठीधारी आरक्षकांनी दाराशी अडविले. मोर्चाचे नेते गणपतराव नलावडे यांनी मिशनच्या चालकांची भेट मागितली. तेव्हा अधिकारी मोर्चेवाल्यांना भेटू इच्छीत नाहीत असे त्यांना आरक्षक अधिकाऱ्यांनी सांगितले. तेव्हा श्री. नलावडे यांनी तयार करून आणलेले निवेदन मिशनच्या दारावर डकविले व परदेशी मिशनऱ्यांनो भारत सोडा अशा घोषणा देत मोर्चातील मंडळी परत फिरली.

मोर्चा परतताच मिशनच्या लोकांनी डकविलेले पत्रक काढून आपल्या कार्यालयात नेले. मोर्चाला विघ्न करण्यासाठी पुणे, मुंबई, दौंड आदि ठिकाणांहून काही ख्रिस्ती मंडळी आली होती. पण त्यांना कोणाचाच पाठिंबा न मिळाल्यामुळे निराश होऊन ते परत गेले. केडगाव येथे त्या वेळी मिशनच्या चालकांत एक अमेरिकन, एक कॅनेडियन व एक ऑस्ट्रेलियन अशा तीन महिला होत्या. काही वार्ताहरांनी मोर्चाच्या वेळी त्यांना भेटण्याची इच्छा दर्शविली. पण आपण वाद विवादात पडू इच्छीत नाही असे त्यांनी वार्ताहरांना कळविले.

केडगाव मिशनवर महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेने दि. २७ मे १९५४ या दिवशी नेलेल्या मोर्चामुळे स्थानिक ख्रिस्ती समाजात ज्या विविध प्रतिक्रिया घडून आल्या, त्या अभ्यासण्यासारख्या होत्या. दि. २९ मे दिवशी पुण्यातील नाना पेठेतील चर्चमध्ये झालेल्या ख्रिश्चनांच्या सभेत या मोर्चाचे प्रतिध्वनि उमटले. श्री. रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली. ख्रिश्चनांची भूमिका समजावून सांगण्यासाठी हिंदुसभेकडे एक शिष्टमंडळ पाठवावे अशी सूचना या सभेत करण्यात आली. पण त्यावर एकमत झाले नाही. उलट ख्रिश्चन तरुणांच्या दोन गटांत दंगल होऊन कोणताच निर्णय न होता सभा स्थगित करण्यात आली. सुमारे एक तासानंतर आरक्षकांना बोलावून सभेत शांतता प्रस्थापित करावी लागली. या सभेत मोर्चाबद्दल निषेध व्यक्त करावा की दुःख व्यक्त करावे यावर वाद झाला. हिंदुसभा, लो. टिळक, सावरकर यांच्यावर कडवट टीका करण्यात आली. एक वक्ते म्हणाले, होत आहेत ना दोन हात, तर होऊच दे हिंदुसभेशी दोन हात ! येशूने सैतानाकडे कधी शिष्टमंडळ पाठविले होते काय ? हा देश आदिवासींचा आहे. आर्यांनी ख्रिश्चनांना चलेजाव म्हणण्याचे कारण नाही. या सभेबद्दल ख्रिस्ती तरुण समाज पुणे या नावाखाली एक पत्रकही प्रसिद्ध करण्यात आले होते.

दुसरा मोर्चा वसई मिशनवर

हा मोर्चा मुंबईहून दि. ६ जून १९५४ ला श्री. बाळाराव सावरकर यांच्या नेतृत्वाखाली वसई मिशनवर गेला होता. या मोर्चात मुंबईची बरीच मंडळी सामील होती. त्यात मुंबई हिंदु सभेचे पंडित बखले, पद्माकर ढमढेरे, काशीनाथ बिर्जे, अनंतराव कोल्हापुरे आदि बारा कार्यकर्ते होते. वसईरोड नाक्यापासून हा मोर्चा पदयात्रा करीत मणिपूर, पापडी, मूळनगर मार्गे वसई मिशनवर गेला. तेथील मिशनऱ्यांना मोर्चातील लोकांनी महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. नलावडे यांच्या सहीचे पत्रक दिले. परदेशी मिशनऱ्यांनी हा देश सोडून जावे अशी त्यात मागणी होती. मूळनगर येथील ख्रिश्चनांनी मोर्चेवाल्यांना उलट बजावले की, " हे गाव आमचे आहे. तुम्हीच येथे येऊ नका." परदेशी मिशनऱ्यांच्या शिकवणीने येथील ख्रिश्चन समाज अराष्ट्रीय बनला असल्याचा येथे कार्यकर्त्यांना प्रत्यय आला. पापडी येथील ख्रिश्चनांनी मोर्चेवाल्यांची कुरापत काढण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे प्रयत्न विफल झाले. मोर्चेवाल्यांनी मिशनच्या परिसरातील पाच सहा मैलांच्या क्षेत्रात परदेशी मिशनरी चलेजावचा प्रचार करून नंतर ते परतले. या सर्व भागातील हिंदूंनी मोर्चेवाल्यांचे स्वागत केले. वसई भागात दीर्घकाळपर्यंत ख्रिश्चन मिशनऱ्यांचे वर्चस्व असल्याचा परिणाम तेथे विशेषत्वाने दिसून आला.

तिसरा मोर्चा लखनौ मिशनवर

महाराष्ट्र हिंदुसभेप्रमाणेच उत्तर प्रदेशातील हिंदुसभेने लखनौ मिशनवर मोर्चा आयोजित केला. लखनौ हिंदुसभेचे अध्यक्ष सरदार त्रिलोचनसिंह व कार्यवाह श्री. विश्वनाथ अग्रवाल यांनी लालबाग येथे ख्रिश्चन मिशनऱ्यांचा जो तळ आहे त्यावर दि. १० जून १९५४ ला मोर्चा नेला. या ठिकाणचे पाद्री संस्कृतनिष्ठ हिंदीतून भजन करून भोळ्या भाबड्या हिंदूंना ख्रिश्चन धर्माच्या जाळ्यात ओढीत असता त्यांचे ते भजन चालू असतानाच मोर्चेवाले तेथे जाऊन पोहोचले. मोर्चातील कार्यकर्त्यांनी पाद्री धर्मोपदेशकांना विचारले की, आपण बायबलशिवाय दुसरे कोणते धर्मपुस्तक वाचले आहे काय? तसे नसेल तर इतर धर्मांतून मुक्ति मिळत नाही असे आपण कशाच्या आधारावर प्रतिपादन करता व लोकांना बाटविता? पाद्री लोक त्यावर चर्चा न करता धर्मस्वातंत्र्याची चर्चा करू लागले तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या लोकांनीही पाद्र्यांस प्रश्न विचारण्यास सुरवात केली. मोर्चाचे नेते सरदार त्रिलोचनसिंह यांनी ख्रिस्ती मिशनरी धर्मस्वातंत्र्याचा दुरुपयोग कसा करतात व भारतात हिंदूंचे धर्मान्तर घडवीत व अराष्ट्रीय कारवाया करीत असल्याची उदाहरणे सांगितली व परदेशी मिशनऱ्यांचे या देशातील अस्तित्व कसे धोकादायक झाले आहे हे दाखवून दिले. तेव्हा ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपला प्रचार

गुंडाळला व ते निघून गेले. तेव्हा लोकांनी या मिशनऱ्यांच्या प्रचारापासून सावध रहावे असा इशारा देऊन कार्यकर्ते परतले.

चौथा मोर्चा वाई मिशनवर

हा मोर्चा दि. १२ जून १९५४ ला पुण्याहून शिवाजी मंदिरातून निघाला. मोर्चाला निरोप देण्यासाठी हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. नलावडे व वा. ब. गोगटे हे उपस्थित होते. मोर्चाचे नेतृत्व श्री. ह. भा. भिडे यांच्याकडे होते. या मोर्चात श्री. रा. स. भट, कृष्णराव गांगुर्डे, प. ह. थत्ते, सो. बा. होनराव, म. ग. घैसास, वि. ना. जोशी, स. बा. तुळपुळे वि. वा. भिडे, ज्ञा. कृ. कुरणे, सुधाकर कुळकर्णी हे प्रमुख होते. हा मोर्चा सायकलवरून गेला.

मोर्चाचा पहिला मुक्काम खेड शिवापूर येथे झाला. श्री. कोंडे देशमुख यांनी मोर्चाचे स्वागत केले. थोडी विश्रांति घेऊन खेड शिवापूर येथील ख्रिस्ती मिशनवर मोर्चा गेला. तेथील मिशनऱ्यांनीही आधीच सरकारकडे पत्रव्यवहार करून पोलीस संरक्षण मागविले होते. परदेशी मिशनऱ्यांनो, भारत सोडा अशा घोषणा देऊन मोर्चाचे नेते श्री. भिडे यांनी मिशनच्या प्रमुखाची भेट मागितली. भेटण्यास मिशनऱ्यांनी नकार दिला. तेव्हा मिशनसमोरच सभा घेण्यात आली. तीत श्री. ह. भा. भिडे व गांगुर्डे यांची भाषणे झाली. नंतर हिंदुसभेने काढलेले पत्रक मिशनच्या दारावर चिकटविण्यात आले व मोर्चा पुढे निघाला.

वाटेत नसरापूर येथील मिशनवर मोर्चा नेण्यात आला व सांयकाळी शिरवळ येथे मंडळी मुक्कामास गेली. तेथील देवळात प्रकट सभा घेण्यात आली. सभेत ह. भा. भिडे, रा. स. भट, कृष्णराव गांगुर्डे यांची परदेशी मिशनऱ्यांच्या कारवायांसंबंधाने भाषणे झाली. शिरवळहून दुसरे दिवशी मंडळींनी कवठे गावी मुक्काम केला. तेथे श्री. अण्णाराव कामत या हरिजन नेत्याने मोर्चेवाल्यांस भोजन दिले. तेथून मंडळी सायंकाळी सातारा येथे पोहोचली. सातारा येथील स्थानिक पुढारी श्री. अष्टेकर, ढवळे व पंचपोर यांनी मोर्चाचे स्वागत केले. रात्री राजवाड्यासमोर प्रकट सभा झाली. तीत परदेशी मिशनऱ्यांनो भारत सोडा या आंदोलनाची पार्श्वभूमि सांगण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी सातारा येथील ख्रिस्ती मिशनच्या केंद्रावर मोर्चा गेला. तेथे भारत सोडा हे पत्रक चिकटवून मोर्चा वाईकडे निघाला.

वाई येथे मोर्चेवाले दुपारी पोहोचले. तेथील ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या मागणीवरून पोलिसांनी वाई मिशनच्या रुग्णालयाच्या सभोवार बंदोबस्त केला होता. वाई हिंदुसभेचे नेते श्री. बाळाराव काळे यांनी मोर्चेवाल्यांचे स्वागत केले. त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली. दुपारी एक वाजता मोर्चाने परदेशी मिशनऱ्यांनो, भारत सोडा अशा घोषणा देत वाईच्या आठवडे बाजारातून पदयात्रा केली. मिशनकडे

जाताना वाटेत तीन ठिकाणी मोर्चेवाल्यांनी सभा घेऊन मोर्चाचा उद्देश सांगितला. तेथून मोर्चा पुढे निघाला. तेव्हा मोर्चात सुमारे तीनशे स्थानिक मंडळी सामील झाली. मिशनसमोर सभा झाली. तीत श्री. ह. भा. भिडे, रा. स. भट व कृष्णराव गांगुर्डे यांची भाषणे झाली. म. गांधींचे मिशनरी विरोधी विचार गांगुर्डे यांनी वाचून दाखविले व मिशनऱ्यांच्या भारतविरोधी व हिंदुसमाज विरोधी कारवायांवर प्रकाश पाडला. हिंदुसभेवर घेण्यात येणाऱ्या आक्षेपांना भिडे यांनी उत्तर दिले. या घोषणांच्या गजरातच मिशनऱ्यांच्या हाती चलेजाव पत्रके देण्यात आली ती त्यांनी घेतली. नंतर मोर्चा परत फिरला. लोकांनी मोर्चातील कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

पाचवा मोर्चा सोलापूर मिशनवर

सोलापूर हिंदुसभेच्या वतीने दि. १३ जून १९५४ दिवशी दुपारी तीन वाजता हा मोर्चा निघून तो नवीपेठ, मेकॅनिकी चौक, भल्ला चौक, रामलाल चौक, फायर ब्रिगेड, डफरिन चौक या मार्गाने अमेरिकन मिशनवर गेला. या मोर्चात श्री. वि. रा. पाटील, भास्कर मोडक, गोपाळ जोशी, भालचंद्र गोरे, धर्मराव देशमुख प्रभृति ३२ मंडळी होती. वाटेत परदेशी मिशनऱ्यांनो चलेजावच्या घोषणा देण्यात येत होत्या. मोर्चा मिशनवर पोहोचल्यावर चलेजावचे पत्रक मिशनच्या दारावर चिकटविण्यात आले. मोर्चेवाल्यांना भेटण्याची मिशनऱ्यांची तयारी नव्हती. तेथून मोर्चा जनाना मिशनसमोर पोहोचल्यावर नागरिकांची विराट सभा घेण्यात आली. या सभेत धर्मराव देशमुख, देवेंद्र आर्य, वि. रा. पाटील प्रभृतींची भाषणे झाली. हा मोर्चा सोलापुरात चांगला गाजला.

सहावा मोर्चा स्पायसर कॉलेज, पुणे येथे

हा मोर्चा पुणे हिंदुसभेच्या वतीने दि. २७ जून १९५४ ला रविवारी दुपारी निघाला. खडकी येथील स्पायसर मिशन कॉलेजवर जाण्यासाठी या मोर्चात पुण्यातील अनेक नामांकित वकील समाविष्ट झाले होते. मोर्चाचे नेतृत्व हिंदुसभेचे एक ज्येष्ठ नेते श्री. का. म. महाजन यांजकडे होते. मोर्चात सफई, वि. ना. केळकर, पु. वि. डावरे, र. पां. भोंडे, के. पी. जोशी, ग. म. जेस्ते, ग. शि. दामले, म. र. तुळशीबागवाले, व न. गो. अभ्यंकर इत्यादि पुण्यातील प्रतिष्ठित वकील मंडळी सामील होती. शिवाजी मंदिरात दुपारी २ वाजता सभा झाली. तिला फार मोठी गर्दी जमली होती. या सभेत गणपतराव नलावडे यांचे भाषण झाले. त्यांनी परकीय मिशनऱ्यांच्या कारवाया सांगून ते राष्ट्रद्रोह कसा फैलावतात याची उदाहरणे सांगितली. या सभेत हिंदुसभेचे ज्येष्ठ व श्रेष्ठ नेते अण्णासाहेब भोपटकर यांचा संदेश वाचून दाखविण्यात आला. त्यात म्हटले होते :

"स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परदेशी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्माच्या नावाखाली हिंदुसमाजात जो गोंधळ माजविला आहे त्याविरुद्ध चळवळ करून तो बंद पाडणे

प्रत्येक हिंदूचे आद्य कर्तव्य आहे. या काळात परदेशी मिशनऱ्यांची संख्या दुपटीच्या वर गेली असून पंचमस्तंभीयांना शोभतील अशा कारवाया त्यांच्या हातून घडत आहेत. या प्रकारास शासनाने तावडतोब आळा घातला पाहिजे. याकडे राज्य व केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी पुण्यातील नामवंत वकिलांनी स्पायसर मिशनरी कॉलेजवर मोर्चा नेण्याचे निश्चित केले याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. या कामात त्यांना यश यावे ही इच्छा. "

अण्णासाहेब भोपटकरांचा आशीर्वाद घेऊन मोर्चा शिवाजी मंदिरातून निघाला. त्यात ५० सायकलस्वार व त्यामागे सात आठ टांगे होते. मोर्चातील मंडळी घोषणा देत होती. शहरातील प्रमुख रस्त्यांवरून घोषणा देत गणेशखिंड रस्त्याने मोर्चा पुढे स्पायसर कॉलेजवर गेला. मुसळधार पाऊस पडत असताही तेथे खूप गर्दी लोटली होती. वृत्तपत्रांचे वार्ताहरही उपस्थित होते. मिशनभोवती लाठी-धारी आरक्षकांचा ताफा संरक्षणार्थ सज्ज होता. नेहमीप्रमाणे मोर्चेवाल्यांनी कॉलेज प्रमुखांची भेट मागितली, पण त्यांनी ती नाकारली. तेव्हा परदेशी मिशनऱ्यांनो, चले जाव हे पत्रक मिशनच्या दारावर चिकटविण्यात आले व कॉलेजच्या प्रवेशद्वाराबाहेर प्रकट सभा घेण्यात आली. मिशनऱ्यांच्या कारवायांचा निषेध करण्यात आला. सभा संपल्यावर मोर्चा मिरवणुकीने जवळ असलेल्या राज्यपालांच्या बंगल्यावर गेला. त्यांचा मुक्काम त्या वेळी पुण्यास होता. तेथेही मिशनरी विरोधी घोषणा देण्यात आल्या व मोर्चा विसर्जित झाला.

त्यानंतर दि. ३ जुलै ते ९ जुलै असा एक सप्ताह हिंदुसभेने पाळला. त्यात पुणे शहरातील निरनिराळ्या पेठांतून फेऱ्या काढून व जागोजाग अशा २५ प्रचार सभा घेऊन दहा हजार नागरिकांना हिंदुसभेचा संदेश सांगितला व दि. ९ जुलै १९५४ ला श्री. ग. वि. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी मंदिरात त्याचा समारोप करण्यात आला.

सातवा मोर्चा पंढरपूर येथे

गेली कित्येक वर्षे अनेक मिशनरी लोक पंढरपूर येथे यात्रेच्या वेळी ख्रिस्ती धर्मप्रचाराचे काम करीत असत. त्यांच्या प्रचाराला पायबंद बसावा या हेतूने ' परदेशी मिशनऱ्यांनो भारत सोडा ' या आंदोलनाच्या निमित्ताने दि. १०, ११, व १२ जुलै १९५४ ला पंढरपूरला मोर्चा नेण्यात आला. हे दिवस आषाढी दशमी, एकादशी व द्वादशीचे होते. या दिवशी मोर्चातील स्वयंसेवकांनी प्रचार केला तेव्हा परदेशी व देशी ख्रिश्चन मिशनरी निघून गेले. या संबंधात मोर्चाचे नेते श्री. ह. भा. भिडे यांनी एक खास पत्रक काढले होते.

पंढरपूर हे आजही भाविक यात्रेकरूंचे ठिकाण असून लाखो लोक पांडुरंगाच्या दर्शनास आलेले असतात. या भोळ्या भाबड्या व अडाणी लोकांसमोर ख्रिस्ती

मिशनरी हिंदु देव-देवतांची निंदा-नालस्ती करतात. धर्मांतर घडवून आणणे हा त्यांचा यामागे उद्देश असतो. पंढरपूर क्षेत्रातील मिशनऱ्यांचा हा प्रचार बंद पडावा यासाठी यापूर्वी अनेकवार प्रयत्न झाले.

पूर्वी राज्यकर्ते ख्रिश्चनधर्मीय असल्याने हा प्रचार बंद पडू देण्यास त्यांचा विरोध असे. सोलापूर येथील हिंदुसभेचे श्री. वि. रा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली या वेळी हे मोर्चा पथक गेले. त्यात सोलापूरचे रामभाऊ देशमुख, भास्कर मोडक, झळकीकर जोशी, चव्हाण व कुर्डुवाडीचे दीक्षित इत्यादि मंडळी सामील होती. पुण्याहून श्री. रा. स. भट, जोशी व भिडे हे कार्यकर्ते आलेले होते.

या प्रचारकांनी शेकडो यात्रेकरूंशी संपर्क साधला. सकाळी प्रभात फेरी काढून व दिवसभर चौकाचौकांतून सभा घेऊन सारा वारकरी समाज आकृष्ट केला व मिशनऱ्यांच्या प्रचाराच्या संकटाची त्यांना कल्पना दिली. तसेच श्री. अण्णाराव फणसळकर यांच्या पुढाकाराने मोर्चापथकाने अनेक फडकऱ्यांची भेट घेऊन त्यांनाही ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या संकटाची कल्पना आणून दिली. तनपुरे महाराज, कैकाडी महाराज, तुकडोजी महाराज, गाडगे महाराज, गयाबाई मनमाडकर इत्यादींनी मोर्चाच्या कार्याची व उद्देशाची आपल्या प्रवचनांतून माहिती सांगण्याचे व मिशनऱ्यांच्या आक्रमणाला पायबंद घालण्यासाठी प्रयत्न करण्याचे मान्य केले. संत गाडगे महाराजांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य हिंदु समाजाने अधिक मन लावून करण्याची आवश्यकता व्यक्त केली. संत तुकडोजी महाराज यांनी सुरगणा भागातील मिशनऱ्यांच्या चळवळीचे त्यांना आलेले अनुभव सांगितले. या सर्व प्रचाराचा परिणाम असा झाला की आलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आपला गाशा गुंडाळून ते निघून गेले. या सर्व कार्यात पंढरपूरचे वसंतराव बडवे व श्री. बाबूराव घळसासी यांचे विशेष साहाय्य झाले. केसरीनेही दि. २० जुलै १९५४ च्या अंकात एक लेख लिहून मोर्चा पथकाच्या कामगिरीचे कौतुक केले.

आठवा मोर्चा कोडोली मिशनवर

मोर्चा पथकाला मारहाण

सांगली येथून ३०–३५ मैलांवर कोल्हापूर जिल्ह्यात कोडोली येथे ख्रिस्ती लोकांचे एक मोठे मिशन आहे. या मिशनवर दि. ७ जुलै १९५४ दिवशी सकाळी हा मोर्चा गेला. या मोर्चाचे नेतृत्व सांगली हिंदुसभेचे पंडितराव दांडेकरांनी घेतले होते. त्यात प्रमुखत्वाने भाग घेणारात आबाराव ओक, अप्पासाहेब दडगे, केशव नारायण जोग, शेषाप्पा बाळा वोळाज, किसनराव बागल, अ. मा. कुलकर्णी, श्रीपाद जोशी, बळवंतराव गोखले, विष्णुपंत बांदिवडेकर, वि. वा. चौगुले, भा. द. लिमये बापुराव साठे, चिंतोपंत गोखले, शामराव आपटे, इत्यादि सांगलीची मंडळी

होती. कोडोलीस जाण्यापूर्वी प्रथम आळते गावी एक मिशन आहे तेथे मोर्चा पथकाने परदेशी मिशनरी विरोधी पत्रके वाटली व हिंदुसभेची भूमिका सांगितली. येथील मिशनरी केवळ देशीच होते. त्यांनी कसलाही अडथळा आणला नाही. येथून दुसरे दिवशी मोर्चापथक कोडोलीस पोहोचले. गावात प्रवेश करून मोर्चा पथकाने घोषणा देण्यास प्रारंभ केला व 'परदेशी मिशनऱ्यांनो भारत सोडा' ही पत्रके वाटली. मोर्चा मिशनच्या रोखाने निघाला तेव्हा त्यात शेकडो गावकरी सामील झाले. एका चौकात सभा घेण्यासाठी पंडितराव दांडेकर तेथील कट्टयावर उभे राहिले व लोकांना बसा बसा म्हणू लागले. या वेळी खिरस्ती लोकांनी गुंडगिरी करून मोर्चाला मारहाण करण्याची योजना आखलेली आढळून आली. सभेच्या ठिकाणी सुरवातीलाच खिरस्ती लोकांची एक टोळी मोठ्या जमावाने आली व एकदम पुढे घुसून त्यांनी पंडितराव दांडेकरांना खाली ओढले. "आम्हांस जा म्हणणारे तुम्ही कोण ?" असा प्रश्न विचारीत ते आरडाओरडा करू लागले व त्यांनी लगेच दंगलीस प्रारंभ केला. पंडितराव दांडेकर प्रभृतींना त्यांनी मारहाण केली. मिशनच्या प्रमुखांच्या बंगल्याला आरक्षकांचा पहारा होता व सशस्त्र आरक्षक मारपिटीच्या जागी फक्त बघे होऊन पहात राहिले होते.

कोडोली येथील वस्ती ७–८ हजारांची असून त्यापैकी सुमारे तीन हजार बाटलेले खिरश्चन आहेत. तेच या दंगलीत प्रमुख होते. मोर्चातील लोकांना इतक्या मोठ्या प्रमाणावर मारहाण झाली की त्यांना सभा सोडून तेथून निघून जावे लागले. हिंदु लोकही त्यांच्या मदतीस येण्यास धजले नाहीत. कुलकर्णी यांच्या डोक्यावर लाठीचा जबर प्रहार झाल्याने ते रक्तबंबाळ झाले होते. अखेर त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. मोर्चा पथकाचे सामान एका स्थानिक हॉटेलात होते ते परत जाताना घेऊन जाण्यास दंगलखोरांनी विरोध केला. तेव्हाही पोलीस आरक्षकांनी मोर्चा पथकाला साहाय्य केले नाही. या वेळी गावातील हिंदुलोक जे मोर्चेवाल्यांना साहाय्य करण्यास पुढे आले त्यांना दंगलखोरांनी दमदाटी केली व तुम्हांसही मारपीट करू. प्रसंग आलाच तर फरशी कुऱ्हाडीही चालवू अशा धमक्या दिल्या.

दि. ९ जुलै १९५४ ला सांगली हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. माधवराव दिवाण यांनी कोल्हापूर जिल्हा मॅजिस्ट्रेटला तार केली की हिंदुसभेच्या वतीने निघालेल्या शांततापूर्ण मोर्चातील बारा लोकांना कोडोली येथील खिरश्चन लोकांनी दि. ८ जुलैला दुपारी मारहाण केली. काहींना जबर जखमा झाल्या आहेत. पोलिसांनी मदत दिली नाही. तरी गुन्हेगारांविरुद्ध कारवाई करावी. मोर्चेवाल्यांचे सामानसुमानही त्यांना परत नेऊ देण्यात आले नाही. तरी त्यांना ते परत नेऊ देण्यात यावे. या तारेच्या प्रती सांगली जिल्हा मॅजिस्ट्रेटला व राज्यसरकारलाही पाठविण्यात आल्या. त्यावर कोल्हापूरच्या डि. मॅजिस्ट्रेटने हिंदुसभेच्या पुढाऱ्यांना

कोल्हापुरास बोलावून उलट दम दिला की तुम्ही पुन्हा कोडोलीस मोर्चा न्याल तर तुम्हा सर्वांना मी अटक करीन. तेव्हा आम्ही तुमच्या धमकीस न जुमानता कोडोलीस पुन्हा मोर्चा नेऊ असे भाऊसाहेब मोडक, पंडितराव दांडेकर, अ. स. भिडे, माधवराव दिवाण प्रभृतींनी त्यास स्पष्टपणे बजावले.

या प्रकरणाची प्रतिक्रिया पुण्यातील महापालिकेतही दिसून आली. दि. २४ जुलैला महापालिकेच्या सभेत अमेरिकन व ख्रिश्चन मिशन संस्थांना महापालिकेच्या वतीने दिले जाणारे साहाय्य (देणग्या) बंद करण्यात याव्यात असा श्री. तुळशीबागवाले यांनी प्रस्ताव मांडला; पण त्यास काँग्रेस पक्षीय सभासदांनी विरोध करून तो हाणून पाडला. काँग्रेस पक्षीय सभासद गायकवाड यांनी तर मोर्चाचाच निषेध करणारी उपसूचना मांडली; पण ती उपसूचना मात्र मंजूर झाली नाही.

नववा मोर्चा नागपूर मिशनवर

नागपूर येथील मिशनवर नववा मोर्चा हिंदुमहासभेचे अध्यक्ष डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २६ जुलै १९५४ ला निघाला. नागपूर येथील सिव्हिल स्टेशन विभागात दोन ख्रिश्चन मिशने आहेत. मोर्चाचे नेतृत्व डॉ. खरे यांनी केले व दुसऱ्या पथकाचे श्री. ल. बा. चलपे यांनी केले. श्री. क. मु. तांबेकर, विक्रम सावरकर, कमलाकर रेखडे, हरिभाऊ ध्रुव, मधुकर देशपांडे आदि कार्यकर्ते या मोर्चात सामील होते. महाल भागातील टिळक पुतळ्याजवळील हिंदुसभेच्या कार्यालयातून फेरीला सुरवात करून मोर्चा डॉ. खरे यांच्या नेतृत्वाखाली मिशनवर गेला. तेथे आरक्षकांचा पाहरा होताच. मिशनच्या दाराबाहेर प्रकट सभा घेण्यात आली. सभेत डॉ. खरे म्हणाले की " हिंदुसभा ख्रिश्चन धर्मीयांना आपले बंधू मानते; परंतु परकीय मिशनऱ्यांकडून होणाऱ्या सक्तीच्या धर्मान्तराला हिंदुसभेचा विरोध आहे; तसेच फसवणुकीने व अज्ञानाचा गैरफायदा घेऊन केल्या जाणाऱ्या धर्मान्तराला आमचा विरोध आहे. ब्रह्मदेशाच्या शासनाप्रमाणे भारताच्या शासनानेही परदेशी मिशनऱ्यांना भारतात राहण्यास बंदी करावी अशी आमची मागणी आहे. सभेनंतर " परदेशी मिशनऱ्यांनो भारत सोडा " या घोषणांच्या गजरात ' भारत सोडा ' हे पत्रक मिशनच्या दारावर चिकटविण्यात आले व मोर्चा परत फिरला.

दहावा कोडोली मिशनवर दुसरा मोर्चा

कोडोली मिशनवर हिंदुसभेच्या वतीने पंडितराव दांडेकर यांच्या नेतृत्वाखाली दि. ८ जुलैला गेलेल्या मोर्चावर ख्रिस्ती लोकांनी गुंड घालून त्यांना मारहाण केली, त्याचा प्रतिध्वनि निरनिराळ्या वृत्तपत्रांतून उमटला. दि. ९ जुलैला पुण्यास मिशनरी विरोधी सप्ताहाच्या समारोपानिमित्त प्रा. श्री. म. माटे यांच्या

अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत ख्रिस्ती आक्रमकांच्या गुण्डगिरीचा निषेध करण्यात आला. सभेत श्री. ह. भा. भिडे म्हणाले की या गुण्डगिरीला हिंदुसभा किती पुरी पडते यावर या चळवळीचे यश अवलंबून आहे. त्यानंतर दि. १ ऑगस्टला लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त हिंदुसभा कार्यकर्त्यांची सभा भरली होती. त्या वेळी कोडोली मिशनवर मोर्चा घेऊन जाणाऱ्या सांगली येथील हिंदुसभा कार्यकर्त्यांना मुद्दाम बोलावून त्यांचा सत्कार करण्यात आला व या सभेत कोडोली मिशनवर पुन्हा दुसरा मोर्चा नेण्याचे ठरविण्यात आले व त्यास प्रतिकार झाला तरी शांततामय मार्गाने निदर्शने करावयाची असाही निर्बंध घालण्यात आला. या दुसऱ्या मोर्चाच्या संबंधात महाराष्ट्र प्रांतिक हिंदु सभेचे कार्यवाह श्री. ह. भा. भिडे यांनी दि. १५ ऑगस्टला पुढील आशयाचे निवेदन प्रसिद्ध केले :

" दि. १ ऑगस्टला भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या सर्वसाधारण सभेत ठरल्याप्रमाणे कोडोली गावी महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वतीने दि. २१ ऑगस्टला महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. गणपतरावजी नलावडे यांच्या नेतृत्वाखाली मिशनवर मोर्चा जाणार आहे. या मोर्चात महाराष्ट्रातील सर्व प्रमुख हिंदुसभा नेते सामील होणार आहेत. मोर्चास जाणारी मंडळी कोडोली येथे जाण्याकरिता शुक्रवार दि. २० ऑगस्ट १९५४ ला रात्री दहाच्या फोंडा पॅसेंजरने निघणार आहेत. "

बिशप पाटेकर यांचा मोर्चास पाठिंबा

कोडोलीला महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वतीने मोर्चा जाणार हे वृत्त प्रसिद्ध होताच पुण्याचे रे. बिशप श्री. बी. ए. पाटेकर यांनी दि. १८ ऑगस्ट दिवशी श्री. ह. भा. भिडे यांना पत्र लिहून या मोर्चात सामील होण्याचा आपला मनोदय कळविला. पाटेकर लिहितात : " केसरीच्या मंगळवार दि. १७ च्या अंकात महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वतीने कोडोली येथे परकीय मिशनरी विरोधी मोर्चा जाणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. मी या मोर्चात सहभागी होऊ इच्छितो. तरी मोर्चात माझे नाव अन्तर्भूत करून तसे प्रकट करावे. "

श्री. नलावडे यांचे पत्रक

या मोर्चासंबंधात महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. गणपतरावजी नलावडे यांनी जनतेस उद्देशून पुढील आशयाचे पत्रक प्रसिद्ध केले :

" महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचा मोर्चा 'परकीय मिशनऱ्यांनो, भारत सोडा' हे सांगण्यासाठी कोडोलीच्या अमेरिकन मिशनप्रमुखाकडे दि. २१ ऑगस्ट १९५४ ला जाणार आहे. या मोर्चात नागपूरपासून बेळगावपर्यंतचे कार्यकर्ते भाग घेणार आहेत. ज्या कारणाकरिता गोव्यात पोर्तुगीज व पांदिचरीत फ्रेंच आम्हांस

नकोत, त्याच कारणाकरिता अमेरिकन व इतर परदेशी मिशनरीही आम्हांस येथे नको आहेत. त्यांच्यापासूनच्या भारताच्या सरहद्दीवरील धोक्याबाबत पं. नेहरू यांनीही प्रांतिक काँग्रेस अध्यक्षांना नुकत्याच निर्वाणीच्या सूचना दिल्या आहेत. जेथे मिशनचे कार्य मोठ्या प्रमाणावर चालू आहे तेथे ते राजकारणात ढवळाढवळ करीत असतात. आसामच्या सरसीमेवर तर जवळजवळ त्यांचेच राज्य सुरू आहे.

"हरिजनांच्या दारिद्र्याचा व अज्ञानाचा गैरफायदा घेऊन धर्मप्रसार करावयाचा व लोकसंख्या वाढवून त्या बळावर राजकारण साधावयाचे हा त्यामागील त्यांचा डाव आहे. पं. नेहरूंच्या उदार निधर्मीपणाचा गैरफायदा घेऊन १९४७ नंतर मिशनऱ्यांनी वन्य जमातींतून जवळजवळ एक कोटी लोक बाटविले आहेत. त्यामागे स्वतंत्र पाद्रीस्थान निर्माण करण्याचे त्यांचे राजकारण आहे. हे राष्ट्रघातकी परके मिशनरी या देशातून घालवून देण्यासाठी पक्षभेदातीत असे हे कार्य हिंदुसभेने हाती घेतले आहे. त्याला कोडोलीच्या सर्व हिंदु जनतेने पाठिंबा द्यावा अशी विनंती आहे.

"कोडोलीतील हिंदी ख्रिश्चनांविरुद्ध हा मोर्चा नाही हे येथे पुन्हा स्पष्ट करण्यात येत आहे. ते आमच्याच रक्तमांसाचे असल्याने आम्ही त्यांना आमचे बंधु मानतो. त्यांच्यावरसुद्धा परके मिशनरी कसा जुलूम करतात याचे वर्णन पुण्याचे बिशप पाटेकर यांनी दैनिक भारत पत्राच्या दि. १२ ऑगस्ट १९५४ च्या अंकात केले आहे. त्यात म्हटले आहे की, 'हे परदेशी मिशनरी देशी ख्रिश्चनांना अर्धपोटी ठेवतात. स्वतः भरपूर पगार घेतात व स्वतः मालकीपणाने राहून देशी ख्रिश्चनांस नोकरासारखे वागवितात.'

"स्वतः श्री. पाटेकर यांनीही या मोर्चास पाठिंबा दिला आहे. यावरून कोडोलीचे हिंदी ख्रिश्चन लोक बोध घेतील अशी आशा आहे. त्यांनी अमेरिकन मिशनऱ्यांना मदत करू नये व आम्हांस विरोध करू नये हे त्यांच्याही हिताचे आहे. आमच्या चळवळीपासून त्यांना कोणताही उपसर्ग पोहोचणार नाही. गेल्या मोर्चाच्या वेळी त्यांच्यापैकी काहींनी अनुचित प्रकार केले असले तरी एक वेळ आम्ही ते क्षम्य मानले आहेत."

गणपतराव नलावडे

पुणे, १५ ऑगस्ट १९५४ — अध्यक्ष, महाराष्ट्र हिंदुसभा

आधी जाहीर करण्यात आल्याप्रमाणे दि. २० ऑगस्टच्या रात्रीच्या गाडीने मोर्चातील मंडळी निघाली. तत्पूर्वी दि. १९ ला पुण्याहून श्री. कामेरकर व दातार यांना सांगलीस पाठविण्यात आले व सांगली येथून माहितगार मनुष्य बरोबर घेऊन ते कोडोलीस गेले. त्यांनी प्रांताध्यक्ष नलावडे यांनी काढलेल्या पत्रकाच्या प्रती बरोबर नेल्या होत्या. त्यांच्याबरोबर तासगाव येथील हिंदुसभेचे कार्यकर्ते श्री. किंकर हेही गेले व त्या सर्वांनी कोडोली येथे ती पत्रके वाटली.

कोडोलीला मोर्चा जाणार हे आधीच दि. १५ ऑगस्टला प्रसिद्ध झालेले होते. त्यावरून कोल्हापूरच्या डि. मॅजिस्ट्रेटने तो दि. १५ ऑगस्टलाच येणार अशा समजुतीने तीन दिवसांसाठी १४४ कलम कोडोलीला लागू केले! पण त्या वेळी मोर्चा येणारच नव्हता.

श्री. भिडे यांचे पत्रक

या दुसऱ्या मोर्चाला उद्देशून महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे कार्यवाह श्री. ह. भा. भिडे यांनी दि. १९ ऑगस्ट १९५४ ला एक सविस्तर पत्रक प्रसिद्ध केले. त्यात म्हटले होते :

" महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वतीने दि. २५ मे १९५४ पासून नागपूर-पासून बेळगावपर्यंतच्या महाराष्ट्राच्या सर्व भागांतून अनेक ठिकाणी परकी मिशनऱ्यांनी भारत सोडून जावे अशी मागणी करणारे निदर्शनात्मक मोर्चे काढण्यात आले. हे मोर्चे अत्यंत शांतपणें व वैध मार्गाने काढण्यात येत असल्याची निश्चिति पटल्यामुळे महाराष्ट्रात कोठेही या मोर्चांना विरोध झाला नाही. महाराष्ट्रातील बहुतेक मराठी, इंग्रजी वृत्तपत्रांनीही या चळवळीची दखल घेतली व विस्तृत लेख लिहून तिला पाठिंबा दिला.

" या शांततामय मार्गाने चाललेल्या आंदोलनास कोडोली मिशनवर गेलेल्या मोर्चाचे वेळीं तेथील ख्रिस्ती लोकांनी मात्र मारहाण केली व विरोध केला. आमच्या मते ही गोष्ट त्यांच्या हातून अज्ञानाने व अपसमजाने घडली असावी. कारण आमचे मोर्चे देशी ख्रिश्चन समाजाविरुद्ध नसल्याचे त्यांच्या ध्यानातच आले नसावे. शिवाय भारताच्या घटनेने प्रचारस्वातंत्र्याचा जो अबाधित अधिकार प्रत्येक नागरिकाला दिला आहे त्याच्या कार्यवाहीत आपण आपल्या कृत्याने व्यत्यय आणीत आहोत याचीही त्यांना जाणीव झाली नसावी. क्वचित् तेथील अडाणी व अशिक्षित ख्रिस्ती समाजाला चुकीच्या मार्गाने जाण्यास परदेशी मिशनऱ्यांच्या हस्तकांनी चिथावले असण्याचाही संभव आहे. म्हणून प्रत्येक नागरिकाला घटनेने दिलेला प्रचारस्वातंत्र्याचा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी व अज्ञानाने त्यांनी ही गोष्ट केली असल्यास त्यांचा अपसमज नाहीसा करण्यासाठी, तसेच परदेशी मिशनऱ्यांच्या अशा प्रकारच्या कारवायांस पायबंद बसावा यासाठी दि. १ ऑगस्ट दिवशी भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वतीने कोडोली येथे पुन्हा मोर्चा नेण्याचा आदेश दिलेला आहे.

" हा मोर्चा संपूर्ण शांततामय मार्गानेच निदर्शने करील हे आम्ही सरकार, जनता व ख्रिस्ती समाज यांना निःसंदिग्धपणे सांगू इच्छितो. कदाचित् तेथील

ख्रिस्ती समाजाने पुन्हा आक्रमणाचा प्रयत्न केला तरीही मोर्चातील मंडळींनी आक्रमकांचा प्रतिकार करावयाचा नाही असा त्यांस आदेश देण्यात आला आहे.

"मात्र याच वेळी मी सरकारला असेही सांगू इच्छितो की अशा प्रकारे शांततामय निदर्शने करणारांवर आक्रमण केले जावे हे शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने दायित्व असणाऱ्या सरकारला कमीपणा आणणारे आहे. त्याचप्रमाणे शांततामय व वैध मार्गाने निदर्शने करणारांच्या मार्गात सरकारी यंत्रणेने अडचणी निर्माण करणे हे वरील सारख्या आक्रमकांना अप्रत्यक्ष प्रोत्साहन देणारे आहे.

ह. भा. भिडे

कार्यवाह, महाराष्ट्र हिंदुसभा

पुणे, दि. १९–८–५४

सरकारचा १५ ऑगस्टचा १४४ कलमाखालचा हुकूम चुकीचा निघाला होता. पुढे मोर्चा दि. २१ ऑगस्टला येणार हे ध्यानात येताच कोल्हापूरचे डि. मॅजिस्ट्रेट शेख यांनी सभा मिरवणुकीला कोडोली येथे बंदी करणारा दुसरा हुकूम काढला. तेव्हा शांततामय मार्गाने जेथपर्यंत जाता येईल तेथपर्यंत जाण्याचा मोर्चाचा निर्धार स्पष्ट करण्यात आला व १४४ कलम लागू करून आक्रमकांना संरक्षण देणाऱ्या सरकारी आज्ञेचा निषेध करण्यात आला.

दि. २० ऑगस्ट १९५४ च्या या मोर्चात भाग घेण्याकरिता सांगलीप्रमाणेच सातारा, वाई, कऱ्हाड, पुणे, कल्याण, मुंबई, खामगाव, चाळिसगाव इत्यादि ठिकाणचे हिंदुसभेचे नेते आले होते. त्यात महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे अध्यक्ष गणपतराव नलावडे, हरि भास्कर भिडे, वा. ब. गोगटे, द. बा. बर्वे, रा. स. भट, महाजन वकील, सफई वकील, कृष्णराव गांगुर्डे, म. र. तुळशीबागवाले, मा. पु. गोखले, पु. वि. डावरे वकील, सोमनाथ होनराव, आबासाहेब जोगळेकर, प. कृ. ढमढेरे, बापट वकील, भाऊकाका गरुड, माधवराव दिवाण, पंत सबनीस, दा. मो. भट, कल्याणचे गं. दि. घारपुरे, स. चिं. पटवर्धन, प. आ. घारे, प. ग. रानडे, पंडितराव दांडेकर, प. वि. जोशी, अ. स. भिडे, वोळाज, श्रीपाद जोशी, अप्पासाहेब दडगे, के. ना. जोग, किंकर, कुमार पाटील, गो. के. माने, जमदग्नि इत्यादि सुमारे चाळीस मंडळींनी भाग घेतला. महाराष्ट्रातील हिंदुसभेचा हा प्रातिनिधिक मोर्चा होता.

दि. २० च्या रात्री सांगली येथे प्रकट सभा भरवून या मोर्चाचा उद्देश व त्यामागील भूमिका स्पष्ट करण्यात आली. एवढ्या ठिकठिकाणची मंडळी या मोर्चासाठी आल्याबद्दल पंडितराव दांडेकरांनी सर्वांचे अभिनंदन केले. सांगली येथे पंडितराव दांडेकर, अ. स. भिडे गुरुजी, म. प. दिवाण आदींनी सांगलीस मोर्चातील मंडळींचे स्वागत केले.

दि. २१ ला दुपारी १२ वाजता एस. टी. च्या खास गाडीने मोर्चातील मंडळी कोडोलीस गेली. त्या वेळी मोर्चात एकूण चाळीस मंडळी होती. कोडोलीच्या अलीकडे एक मैलावर कोल्हापूर येथील अॅड. डि. मॅजिस्ट्रेट चव्हाण यांनी मोर्चातील मंडळींवर १४४ कलमाखाली काढण्यात आलेली आज्ञा बजावली व मोर्चा अडविला. त्याबरोबर नलावडे यांनी तेथेच सभा घेतली. ते म्हणाले की, " आजपर्यंत परकी मिशनऱ्यांनी आमच्या अज्ञ व दुबळ्या देशबांधवांचा गैरफायदा घेतला व आमच्या संस्कृतीवर आक्रमण केले, पण याच्यापुढे आम्ही ते चालू देणार नाही. बळाने, फसवून किंवा मोहाने हे परके मिशनरी जे धर्मान्तराचे कार्य करीत आहेत त्यामागे राजकारण आहे. आणि अद्यापही सरकारी नोकरशाही मिशनऱ्यांचीच पाठराखण करीत आहे! या सरकारी नोकरशाहीला पहिल्या मोर्चाच्या वेळी ख्रिस्त्यांच्या हल्ल्यापासून मोर्चापथकाला संरक्षण देता आले नाही. आता तेथे आमच्या मोर्चापासून मिशनऱ्यांचे रक्षण करण्याकरिता १४४ कलमाचा वापर करण्यात येत आहे! हे सरकारी धोरण अन्यायाचे असल्याने आम्ही ही सरकारी आज्ञा मानीत नाही, व न्यायाच्या निकषावर ती आज्ञा टिकणारीही नाही. याकरिता मोर्चा पथकाने ही बंदी आज्ञा मोडावी व कोडोली सीमेत प्रवेश करावा.

त्यानंतर प्रथम पुणे हिंदुसभेचे कार्याध्यक्ष श्री. रा. स. भट, मिरज हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. दामुअण्णा भट, सांगलीचे बळवंत गजानन गोखले व पांडुरंग गजानन जमदग्नि यांनी आम्ही या अन्यायी आज्ञेचा भंग करीत आहो अशी घोषणा केली व पोलिसांना बाजूस सारून कोडोली गावाकडे जाण्यास ते निघाले. अर्ध्या फर्लांग अंतरावर ते पोहोचताच त्यांना अटक करण्यात आली, पण नंतर गणपतराव नलावडे यांचा जामीन स्वीकारून त्यांस जामिनावर सोडण्यात आले.

कोडोली गावात घोषणा व पत्रके

हिंदुसभेचे कार्यकर्ते कोडोली गावाच्या सीमेवर १४४ कलमाखालची आज्ञाभंग करीत होते तर त्याच वेळी खुद्द कोडोली गावात हिंदुसभेचे कार्यकर्ते श्री. कामेरकर हे परदेशी मिशनरी विरोधी घोषणा देत पत्रके वाटीत हिंडत होते. म्हणून पोलिसांनी त्यांनाही अटक केली, व सीमेवर आणून सोडले. शेवटी मोर्चा सांगलीस परतला. रात्री सांगली येथे प्रचंड जाहीर सभा भरून पंडितराव दांडेकर, आबासाहेब जोगळेकर, भय्यासाहेब सफई, कृष्णराव गांगुर्डे इत्यादींची कोडोलीचा वृत्तान्त सांगणारी भाषणे झाली. १४४ कलमाचा भंग करणारे रा. स. भट, दा. मो. भट, ब. कृ. गोखले, पां. द. जमदग्नि व कामेरकर यांचा सत्कार करण्यात आला. त्याजवर भरलेले खटले नंतर सरकारने आपण होऊन काढून घेतल्याचे घोषित केले.

अकरावा मोर्चा अंबिकानगर मिशनवर

दि. ५ डिसेंबर १९५४ या दिवशी अंबिकानगर (अहमदनगर) येथील मिशन केंद्रावर मोर्चापथक गेले. दि. १ डिसेंबरला मनमाड पॅसेंजरने प्रथम पाटस या गावी हे पथक गेले व तेथे गावातून फेरी काढून परदेशी मिशनरी विरोधी प्रचार केला. रात्री दौंड येथे गांधी चौकात श्री. ह. भा. भिडे यांच्या अध्यक्षते-खाली प्रकट सभा झाली. तीत भिडे व गांगुर्डे यांची भाषणे झाली.

सभेत शिंदे नावाच्या एका गृहस्थाने उठून सांगितले की, मिशनरी लोक आम्हांस पैसे देतात व म्हणून आम्ही बाटतो. त्यावर भिडे यांनी उत्तर दिले की, दारिद्र्यामुळे धर्मान्तर होते हे खरे असले तरी केवळ पैशासाठी धर्मान्तर करणे हे पाप आहे. त्यायोगे तुमच्या मनाला समाधान असे लाभणार नाही. शिवाय अलीकडे सरकारने हरिजनांना इतक्या व विविध प्रकारच्या सवलती दिल्या आहेत की, त्यांना मिशनऱ्यांच्या तोंडाकडे पाहण्याचे कारणच नाही. त्यांनी हिंदु धर्मात राहणे हे अंतिमतः त्यांच्याही हिताचेच ठरणार आहे. जे लोक पैशासाठी धर्म विकतात ते राष्ट्रही विकतील व त्यामुळे अखेर त्यांचे व सर्वांचेच जीवन बरबाद होईल हे त्यांनी विसरता कामा नये. लोकांना हे समजावून सांगण्या-साठीच हिंदुसभेचे हे आंदोलन आहे.

दुसरे दिवशी सकाळी दौंड येथे प्रभात फेरी व चौकातील सभा करून मोर्चा श्रीगोंदा येथील मिशनवर गेला. तेथील गावकऱ्यांना मिशनऱ्यांच्या कारवा-यांचे परिणाम चांगले परिचित होते. त्यामुळे त्यांनी मोर्चेवाल्यांचें उत्स्फूर्त स्वागत केले. दि. ३ ला सकाळी मोर्चा बेलवंडी या साखर कारखान्याच्या गावी पोहोचला. तेथे प्रभात फेरी व मंदिरात प्रकट सभा घेऊन परदेशी ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कारवायांवर भाषणे झाली. या सभेस मोठी गर्दी झाली होती. तेथून दुपारच्या गाडीने विसापूर येथे जाऊन स्थानकाजवळच्या वस्तीत रात्री जाहीर सभा भरवि-ण्यात आली. या सभेत मिशनरी विरोधी भाषणे झाली. त्यात विशेष हे की जी. के. शिंदे नावाच्या ख्रिश्चन माणसानेही स्वयंस्फूर्तीने भाषण करून हिंदुसभेच्या या आंदोलनास उत्स्फूर्त पाठिंबा दिला, व देशी ख्रिस्ती लोकांना परदेशी मिशनरी कसे वाईट रीतीने वागवितात त्याची अनेक उदाहरणे सांगितली. दि. ४ ला मोर्चा अकोळनेर येथे गेला. तेथील प्रमुख मंडळींनी सभा घेतली. तीत ' हिंदु समाजाला लागलेली कीड ' या विषयावर श्री. हरिभाऊ भिडे व कृष्णराव गांगुर्डे यांची भाषणे झाली. सभेस मोठा समाज उपस्थित होता. नंतर सायंकाळी मोर्चा नगरास जाऊन पोहोचला.

नगर येथे दि. ४ ला मोर्चात भाग घेण्यासाठी पुण्याहून महाजन व सफई वकील आले होते. ' परदेशी मिशनऱ्यांनो, भारत सोडा ' अशा घोषणा देत मोर्चा-

पथकाने नगर शहरात प्रवेश केला. रात्री गांधी मैदानावर स्थानिक हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. गोपाळराव गायकैवारी यांच्या अध्यक्षतेखाली मोठी प्रकट सभा झाली. या सभेत गणपतराव नलावडे, महाजन, सफई व कृष्णराव गांगुर्डे यांची भाषणे झाली.

दि. ५ डिसेंबरला सकाळी ९ वाजता गांधी मैदानावरून मोर्चा सुरू झाला. तो घोषणा देत दिल्ली दरवाजाबाहेर असलेल्या मिशन केंद्रावर गेला. मोर्चात स्थानिक व बाहेरची मिळून शंभरावर मंडळी सामील होती. येथे एक परदेशी मिशनरी श्री. डेटी साहेब यांचा बंगला होता व शेजारी सेंट मोनिका ट्रेनिंग कॉलेज होते. दोन्ही ठिकाणी मोर्चाला विरोध करण्यासाठी सात आठशे ख्रिश्चन मंडळी जमली होती. इतर ठिकाणच्या प्रमाणे येथील परदेशी मिशनऱ्याने मोर्चा पथकातील नेत्यांची भेट घेण्याचे नाकारले. तेव्हा श्री. गणपतराव नलावडे यांच्या अध्यक्षतेखाली तेथे प्रकट सभा घेण्यात आली. तीत परदेशी मिशनऱ्यांच्या कारवायांवर भाषणे झाली व भारत सोडा पत्रक मिशनच्या दारावर लावून मोर्चा पथक परतले.

बारावा मोर्चा नाशिक मिशनवर

बारावा मोर्चा नाशिक येथील मिशनवर जाण्यासाठी पुण्याहून श्री. ह. भा. भिडे यांच्या नेतृत्वाखाली दि. १ जानेवारी १९५५ ला निघाला. त्यात रा. स. भट, गांगुर्डे, घैसास, होनराव, ठकार आदि कार्यकर्ते होते.

मोर्चा सकाळी चाकण येथे पोहोचला. त्या दिवशी बाजार असल्याने बाजारात मोर्चाचा उद्देश सांगण्यासाठी फेरी काढण्यात आली व प्रचारसभा भरविण्यात आली. तेथून मंचर येथे मोर्चापथक गेले. तेथे फार मोठी सभा झाली. सभेत भिडे, भट व गांगुर्डे यांची भाषणे झाली. तेथून मोर्चा खेड येथे गेला. तेथे श्री. भट यांच्या अध्यक्षतेखाली श्री. ह. भा. भिडे यांचे "मिशनऱ्यांचे कार्य व हिंदुसमाज" या विषयावर भाषण झाले. सभेस हजारावर लोक उपस्थित होते.

दुसरे दिवशी दि. २ जानेवारी १९५५ ला मोर्चा नारायणगाव येथे गेला. तेथेही गावभर फेरी काढून श्रीराममंदिरात प्रकट सभा भरविण्यात आली. तीत या आंदोलनाची सविस्तर माहिती सांगण्यात आली. दुपारी तेथून मोर्चापथक जुन्नर येथे गेले. वाचनालयाच्या सभागृहात रात्री सभा झाली. दुसरे दिवशी येथून मोर्चापथक संगमनेर येथे गेले. तेथे दि. ३ जानेवारीस रात्री नेहरू चौकात मिशनरी विरोधी प्रकट सभा घेण्यात आली. सभेत श्री. घारपुरे, भट, गांगुर्डे व भिडे यांची भाषणे झाली. संगमनेर येथे मिशनचे केंद्र आहे, या सभेस जमलेल्या तरुणांनी मिशनऱ्यांच्या कारवायांना प्रतिकार करण्याचा निश्चय जाहीर केला.

येथील सभाही फार प्रभावी झाली. थोड्याच दिवसांत त्यांनी बाटलेल्या तीस ख्रिस्त्यांचे हिंदूकरण केले.

येथून पथक नाशिककडे गेले. वाटेत दोन तास सिन्नर येथे थांबून व तेथे प्रचारफेरी काढून बाजारभागात प्रचारसभा घेण्यात आली. तेथून दुपारी मोर्चा-पथक नाशिकला पोहोचले. तेथे हिंदुसभेचे नेते श्री. विष्णुशास्त्री केळकर, डॉ. गायधनी, सरदार पेठे, श्री. वैद्य प्रभृतींनी मोर्चाचे स्वागत केले. दि. ४ च्या रात्री भद्रकाली पटांगणात केळकरांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची प्रकट सभा झाली. तीत गणपतराव नलावडे, हृ. भा. भिडे, रा. स. भट यांची भाषणे झाली. दि. ५ जानेवारी १९५५ ला सकाळी श्री. विष्णुशास्त्री केळकर यांच्या नेतृत्वाखाली शरणपूर येथील कानडा मिशन हॉस्पिटलवर मोर्चा गेला. मोर्चा गावातून घोषणा देत जात असताना लोकांनी त्यास उत्स्फूर्त पाठिंबा दिला व शेकडो लोक मोर्चात सामील झाले. मिशनला सरकारी आरक्षकांनी भरपूर संरक्षण दिलेले होते. शेजारी जाहीर सभा घेण्यात आली. तेथे काही ख्रिस्ती मंडळींनी सभेस विरोध करण्याचा प्रयत्न केला. पण विशेष प्रसंग घडला नाही. अमेरिकन मिशन प्रमुख तेथे नसल्याने 'भारत सोडा' पत्रक मिशनच्या प्रवेशद्वारावर लावून मोर्चा परतला.

तेरावा मोर्चा वेंगुर्ला मिशनवर

महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या वतीने परदेशी मिशनरी विरोधी १३ वा मोर्चा वेंगुर्ला येथे दि. २ फेब्रुवारी १९५५ ला नेण्याचे ठरले. या मोर्चाची पूर्व तयारी करण्या-करिता सांगलीचे केशवराव जोग, व श्री. अप्पासाहेब दडगे हे पुढे गेले व त्यांनी मोर्चाची तयारी केली. त्यापाठोपाठ शेषाप्पा वोळाज, कुमार पाटील, माधवराव क्षीरसागर, पांडुरंग जमदग्नि, आदि कार्यकर्ते वेंगुर्ला येथे गेले. या मोर्चाचे नेतृत्व सोलापूरचे श्री. वि. रा. पाटील यांनी केले. त्यासाठी सोलापूर, पुणे, मिरज, सांगली, कोल्हापूर आदि भागातून कार्यकर्ते आले होते. दि. २९ जानेवारीस पूर्व तयारीसाठी श्री. रा. स. भट, गांगुर्डे, ना. मो. दातार व म. ग. घैसास हे मिरजेस गेले होते. तेथे श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांच्या अध्यक्षतेखाली खरे मंदिरात प्रकट सभा झाली. तेथे मिशनरी विरोधी आंदोलनाला विरोध करण्यासाठी एक पत्रक प्रसिद्ध झाले होते. त्याचा मोर्चाच्या नेत्यांनी खरपूस समाचार घेतला. गांगुर्डे यांनी हरिजनांना उद्देशून सांगितले की त्यांच्यासाठी सरकारने अनेक सवलती दिल्या आहेत. त्यांचा त्यांनी फायदा घ्यावा. भट म्हणाले की आमचा प्रचार प्रभावी होत आहे याचा पुरावा म्हणजेच आमच्या प्रचाराविरुद्ध पत्रक काढण्याची मिशनऱ्यांना गरज वाटू लागली हा होय. त्यांच्या पत्रकातील विधाने कशी भ्रमोत्पादक आहेत त्याचे त्यांनी स्पष्टीकरण केले. या सभेला मोर्चा पथकाला पाठिंबा देणारे व विरोध करणारेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. ३० जानेवारीस श्री. वि. रा. पाटील सोलापूरहून मिरजेस येऊन पोचचले. तेथून दुपारी मोर्चातील मंडळी कोल्हापूरला गेली. तेथे श्री. किंकर यांनी सर्वांचे स्वागत केले. तेथे अंबाबाई मंदिरात रामाच्या पारावर प्रकट सभा झाली.

गांधी वधानंतर कोल्हापूर येथे हिंदुसभेच्या वतीने अशी ही पहिलीच सभा होती. ती चांगलीच गाजली. हजारावर श्रोते उपस्थित होते. श्री. भट, गांगुर्डे, दिनकर पाटील आदि वक्त्यांची भाषणे झाली. चीन व ब्रह्मदेश यांनी परदेशी ख्रिश्चन मिशनऱ्यांना जशी बंदी घातली आहे तशीच भारत सरकारनेही घातली पाहिजे अशी मागणी या सभेत करण्यात आली.

पूर्वी कोल्हापूर येथे परदेशी मिशनऱ्यांनी गंगावेशीजवळ मिशनसाठी जागा मागितली असता कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी ती त्यांना न देता तेथे मंदिर उभारून ती जागा मिळविण्याचा मिशनऱ्यांचा डाव कसा हाणून पाडला या संबंधीची सभेत माहिती सांगण्यात आली.

दुसरे दिवशी ३१ जानेवारीस मोर्चापथक फोंडा मार्गाने वेंगुर्ला येथे जाण्यास निघाले. वाटेत फोंडा येथे प्रचार फेरी व प्रकट सभा घेण्यात आली व तेथून कणकवली येथे मोर्चापथक गेले. तेथेही आठवडे बाजारात प्रचार सभा घेण्यात आली. तीत श्री. वि. रा. पाटील, रा. स. भट, कृष्णराव गांगुर्डे व केशवराव जोग यांची भाषणे झाली.

दि. १ फेब्रुवारीस दुपारी मोर्चापथक वेंगुर्ला येथे पोहोचले. वेंगुर्ला हे कोकण समुद्रावरील एक महत्त्वाचे बंदर असून येथे काजूचा मोठा व्यापार चालतो. येथे परदेशी ख्रिस्ती मिशनचे केंद्र मोठे असून त्याचे रुग्णालय, प्रसूति केंद्र, शल्यकर्म केंद्र इत्यादि व्यवस्था आहे. येथें मिशनऱ्यांचे कार्यही मोठ्या प्रमाणावर चालते. तरी पण मोर्चाला सहानुभूति दाखविणारा वर्गही मोठा होता.

चंद्रवंशी नावाच्या गृहस्थाने चालविलेल्या भारतीय संस्कृति संरक्षक मंडळाने मोर्चापथकास आपला पाठिंबा जाहीर केला व आपल्या बंगल्यात मोर्चापथकाची उतरण्याची सोय केली. मोर्चापथक वेंगुर्ला येथे येणार अशी वार्ता प्रसिद्ध झाल्याबरोबर या मंडळाने पुढील आशयाचे पत्रक प्रसिद्ध केले होते :

चंद्रवंशी यांचे पत्रक

" महाराष्ट्रात परदेशी ख्रिस्ती मिशनऱ्यांचे केंद्रावर मोर्चे नेण्याचे हिंदुत्वनिष्ठांचे कार्य सुरू आहे. वेंगुर्ले येथे अमेरिकन मिशनचे एक केंद्र असल्यामुळे आमच्या या मोर्चाच्या संबंधातील धोरणाबाबत सर्व लोकांस माहिती असणे अवश्य आहे. सबब ती येथे नमूद करीत आहो.

" वाचकहो, हा मोर्चा परदेशी मिशनरी उपदेशकांविरुद्ध आहे. तो ख्रिस्ती समाजाविरुद्ध किंवा ख्रिस्ती धर्माविरुद्ध नाही हे लक्षात ठेवा.

" भारतातील ख्रिस्ती बंधुभगिनींनो, तुमची हृदये राष्ट्रीय असतील, नाही असे नाही. परंतु इंग्लंड, अमेरिका ही पाश्चात्य गोरी राष्ट्रे तुमच्याकडे भारतातील आपले हस्तक व आधारस्तंभ या दृष्टीने पाहत असतात. महाराष्ट्रात या मोर्चा-विरुद्ध तुम्ही कित्येक ठिकाणी नापसंती व सक्रिय विरोधही दाखविला, पण हे ठीक नाही. चीनचा चांग कै शेक व त्याचे हस्तक ख्रिस्ती असल्याने अमेरिकेचा त्यांच्याकडे ओढा आहे व म्हणूनच अमेरिका लाल चीनला मान्यता देत नाही. केवळ डॉलरच्या जोरावर अमेरिकन मिशनरी केंद्रामार्फत आपले सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक वर्चस्व भारतातील दरिद्री बहुजन समाजावर लादण्याचा प्रयत्न करीत आहेत. तो हाणून पाडला पाहिजे.

" कम्युनिझम बळावण्यास ख्रिस्ती धर्म व संस्कृति हीच अनुकूल क्षेत्रे आहेत. तद्वतच कम्युनिझमचे मूळही जडवादातच आहे. भारतात ख्रिस्ती धर्म मानणारे तुरळकच आहेत. दक्षिण भारतात विशेषत: केरळमध्ये त्यांची संख्या जास्त आहे. म्हणूनच तेथे कम्युनिझमचा धोका निर्माण झाला आहे.

" आता येथील अमेरिकन मिशनसंबंधाने बोलावयाचे झाल्यास त्याला म्युनि-सिपालिटी, लोकलबोर्ड व मुंबई सरकार यांच्याकडून मदत मिळते, ती बंद झाली पाहिजे. म्युनिसिपालिटी व लोकलबोर्ड यांना आपल्या स्वत:च्या वैद्यकीय केंद्रातून पैशाच्या अभावामुळे उच्च प्रकारची औषधोपचाराची मदत जनतेस पुरविता येत नाही, पण त्याच म्युनिसिपालिटीला व लोकलबोर्डाला परदेशी धर्मप्रचारक मिशनरी केंद्राला मात्र पैशाची मदत पुरविता येते हे आश्चर्य नव्हे काय ? या मदतीच्या मोबदल्यात नगरपित्यांना व बोर्ड सभासदांना मिशनकडून सवलती व मानाची वागणूक मिळत असते.

"भारत परतंत्र असताना या परदेशी मिशनरी केंद्रांतून शिक्षक व नोकर नेमताना त्यांच्या लायकीकडे थोडे तरी लक्ष पुरविले जात असे. पण आता स्वराज्य काळात या सर्व नोकऱ्यांचे ख्रिस्तीकरण जोरात सुरू आहे ! निधर्मीपणाचा पुरस्कार करणाऱ्या आमच्या सरकारला हे कळत नसेल काय ?

" आज देशात विशेषत: महाराष्ट्रातील सर्व सत्तास्थाने श्रमजीवी बहुजन समाजाच्या प्रतिनिधींच्या हाती आहेत, तर मिशनरीविरोधी मोर्चाचे नेतृत्व बुद्धि-जीवी अल्पसंख्याकांकडे आहे. कित्येक जातीयवादी मिशनभक्त लोक मिशनविरुद्धच्या मोर्चाचे विकृत वर्णन करून हिंदुसमाजात बुद्धिभेद माजवू पाहतील तर ते प्रथम घरच्या म्हातारीचे काळ ठरतील. तरी याचा जनतेने विचार करावा.

चंद्रवंशी

सेक्रेटरी, भारतीय संस्कृति संरक्षक मंडळ, वेंगुर्ले

हा मोर्चा वेंगुर्ला येथे पोचल्यावर गावात सायंकाळी प्रचारफेरी काढण्यात आली. रात्री कऱ्हाडचे श्री. बदामी यांच्या अध्यक्षतेखाली महादेव मंदिरात प्रकट सभा झाली. सभेत वि. रा. पाटील व गांगुर्डे यांची भाषणे इतकी प्रभावी झाली की या सभेचे वृत्त घेण्याकरिता आलेल्या प्रेस ट्रस्टच्या वार्ताहराने त्यांस मुद्दाम भेटून त्यांचे अभिनंदन केले.

पूर्वनियोजनानुसार दि. २ फेब्रुवारी १९५५ ला सकाळी ६ वाजता मोर्चाने प्रभात फेरी काढली. वाटेत घोषणा दिल्या जात होत्या. सावरकरांची पदे म्हणण्यात येत होती. सात वाजता मोर्चा भाजी मंडईतून वेंगुर्ला मिशन रुग्णालयाकडे गेला. मोर्चा येणार हे जाहीर झालेले असल्याने सर्वत्र कडेकोट बंदोबस्त होता.

मिशन रुग्णालयाजवळ जमलेल्या लोकांना उद्देशून श्री. वि. रा. पाटील यांचे भाषण झाले. त्या वेळी वेंगुर्ला मिशन रुग्णालयातील प्रमुख सर्जन डॉक्टर बाहेर आले. तेव्हा त्यांना 'परदेशी मिशनऱ्यांनो भारत सोडा' हे पत्रक देण्यात आले. इतरही खिरस्ती डॉक्टर व दाया तेथे आल्या व प्रश्नोत्तरी चर्चा सुरू झाली. अमेरिकन मिशन प्रमुखाने मराठीतच सांगितले की, आमच्यासारखी सेवा करणारी डॉक्टर व नर्सेस मंडळी तुम्ही प्रथम तयार करा म्हणजे त्या क्षणी आम्ही आमच्या देशात जाण्यास तयार आहो. या देशात गोरगरिबांना वैद्यकीय मदत मिळत नाही. त्याची फार जरूर आहे. मोर्चाचे नेते पाटील यांनी लगेच उत्तर दिले की या देशाचे राज्य हे लोककल्याणकारी राज्य आहे. येथील जनतेची सर्व प्रकारची काळजी घेण्यास ते समर्थ आहे. ते त्यांचे कामही आहे. तेव्हा परदेशी मिशनऱ्यांनी येथे थांबण्याची मुळीच आवश्यकता नाही.

मिशनरी विरोधी पत्रके देण्यात व वाटण्यात आल्यावर मोर्चा परत फिरला. नंतर थोड्या वेळाने तो बोटीने रत्नागिरीस गेला. मोर्चा पथक रात्री ८ वाजता रत्नागिरीस पोहोचले. याच दिवशी स्वा. सावरकर मुंबईहून बोटीने रत्नागिरीस येऊन पोहोचले होते.

दुसरे दिवशी दि. ३ फेब्रुवारीस सकाळी मोर्चाचे नेते श्री. वि. रा. पाटील, ह. भा. भिडे, रा. स. भट व गांगुर्डे यांनी सावरकरांची भेट घेतली व वर्षभर चालविलेल्या या परदेशी मिशनरी विरोधी आंदोलनाचा सविस्तर वृत्तान्त त्यांस सांगितला. त्यांनी मोर्चातील कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले.

आंदोलनाचे परिणाम

या चळवळीचा सरकारवरही काही परिणाम झाला. भारत सरकारने परकीय मिशनऱ्यांच्या भारतात येण्यावर काही नवे निर्बंध घातले. दि. ७ एप्रिल १९५५ ला परदेशी मिशनऱ्यांच्या संबंधात भारत सरकारचे नवे धोरण जाहीर झाले. त्यात असे नमूद करण्यात आले होते की,

(१) सध्या भारतात चालू असलेल्या मिशन्समध्ये ज्या जागांवर काम करण्यासाठी भारतीय लोक मिळू शकत नाहीत त्याच तेवढ्या जागांवर विशेष दर्जाचे किंवा तत्सम समजले जाणारे मिशनरी भारतातील मिशन केंद्रात बोलाविले जाण्यास मुभा राहील, व ही आवकही तात्पुरत्या बदलीच्या स्वरूपात असेल किंवा जादा मिशनऱ्यांची अगदी गरजच असेल तरच ती मान्य केली जाईल.

(२) ज्या मिशनऱ्यांनी भारतात पाच वर्षे किंवा अधिक काळ काम केले असेल आणि परदेशात सुटीवर गेल्यामुळे जे परत येऊ इच्छीत असतील, त्यांनाच परत येऊ देण्यात येईल.

अशा रीतीने सरसकट हवे तितके परदेशी मिशनरी या देशात येण्यावर काही बंधने निर्माण झाली. याचा परिणाम काय होतो हे पाहण्याच्या उद्देशाने हिंदुसभेने आपले आंदोलन वेंगुर्ला मोर्चानंतर स्थगित केले.

परदेशी मिशनऱ्यांवरही या आंदोलनाचा परिणाम घडून आला. त्यांनी भारत सोडून जावे ही चळवळ प्रथम महाराष्ट्रात सुरू झाली. आरंभी तिच्याकडे उपेक्षेने पाहणारे हळुहळू या चळवळीची गंभीरता ध्यानी घेऊ लागले. आपल्या मार्गदर्शनाविना येशूचा संदेश भारतीयांना समजणार नाही असे मानणाऱ्या परदेशी मिशनऱ्यांची धार्मिक साम्राज्यशाही झुगारून देण्याचा उपदेश श्री. पवार यांच्या सारखे सुवार्तिक करू लागले. परदेशी मिशनरी देशी ख्रिस्ती लोकांना कसे हीनपणे वागवितात याची जाहीर चर्चा सुरू झाली. हे सर्व लक्षात घेऊन व चळवळीचे वाढते स्वरूप लक्षात घेऊन अमेरिकन मिशनच्या लोकांनी मिशनची सर्व मालमत्ता स्थानिक ख्रिस्ती लोकांच्या हाती देण्याची योजना तयार केली असल्याचे कोल्हापूर मिशनने प्रसिद्ध केले. या वेळी भारतीय ख्रिस्ती समाजाने जागरूक राहून ही मालमत्ता परदेशी मिशनऱ्यांच्या देशी हस्तकांच्या हाती जाऊ नये, तर ख्रिस्ती समाजाचा ज्यांच्यावर विश्वास आहे अशाच लोकांच्या हाती ती राहील हे पहाणे आवश्यक आहे, व त्याचप्रमाणे हे काम लांबणीवर पडणेही इष्ट नाही हेही ख्रिस्ती समाजाने ध्यानात घ्यावे असा केसरी पत्राने इशारा दिला. ते पुढे असेही म्हणाले की, आज कोडोलीच्या मोर्चाचा परिणाम म्हणजे कोल्हापूरच्या मिशनने दाखविलेली जागरूकता होय. कदाचित् लोकजागृतीची लाट थंडावली तर परदेशी मिशनऱ्यांचे हे विचार उद्या बदलतीलही; म्हणून जोवर चळवळ चालू आहे तोवर देशी ख्रिस्ती लोकांनी मिशनच्या मिळकतीच्या हस्तांतराचे हे काम सत्वर प्रत्यक्ष पार पाडून घेणे अवश्य आहे.

नेहरूंचे वक्तव्य

दि. ९ ऑगस्ट १९५४ या दिवशी पं. नेहरू यांनी प्रदेश काँग्रेस समित्यांच्या अध्यक्षांना उद्देशून केलेल्या वक्तव्यात म्हटले की,

"इतर सर्व बाबींपेक्षा हिंदुस्थानच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रगतीसाठी भावनात्मक ऐक्याची आवश्यकता आहे असे माझे मत आहे. आपण आपल्या राष्ट्राला निधर्मी म्हणतो याचा अर्थ या राष्ट्राचा धर्माला विरोध आहे असा नसून ज्याला कुठलाही धर्म नाही त्यासकट सर्वांना धर्माच्या बाबतीत या देशात स्वातंत्र्य आहे असा आहे. माझ्या मताप्रमाणे 'निधार्मिक' या शब्दाच्या अर्थामध्ये सामाजिक व राजकीय समतेची कल्पना सामावलेली आहे. जातीय भेद मानणारा समाज हा खऱ्या अर्थाने धार्मिक समाज नव्हे. काही जातीयवादी संस्था 'हिंदुराष्ट्रा' च्या घोषणा करतात. काहीही असले तरी हिंदुराष्ट्राच्या कल्पनेत राष्ट्रीयता नाही. ती लोकशाहीही नाही. ती एक मध्ययुगीन विचारसरणी आहे. सर्व धर्मांना समान स्वातंत्र्य देणारी आपली घटना आहे. तिच्याप्रमाणे धर्मान्तर घडवून आणण्याचे सर्वांना स्वातंत्र्य आहे.

"धर्मान्तर मला व्यक्तिशः आवडत नसले तरी माझे हे मत मी इतरांवर लादू इच्छीत नाही. परधर्मातील तत्त्वे पटल्यामुळे एखाद्या व्यक्तीने धर्मान्तर केले तर ते मी समजू शकेन. पण सामुदायिक धर्मान्तराचा अर्थच मला समजू शकत नाही. अलीकडे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रश्नावर खूप चर्चा ऐकू येते. मुख्यतः भारतातील परदेशी मिशनऱ्यांविरुद्ध तिचा रोख असतो. स्वमताच्या प्रचाराच्या दृष्टीने भारतातील प्रत्येक धर्माला प्रचारस्वातंत्र्य आहे. अर्थात् त्याला काही बंधने आहेत. परदेशी मिशनऱ्यांना कोणत्याही कारणासाठी भारतात प्रवेश देण्याचा मुख्य प्रश्न आहे. पण या देशात येण्यास परदेशी मिशनऱ्यांना बंदी करावी असा आमचा उद्देश नाही. उलट आम्ही त्यांचे स्वागत करतो.

"परदेशी मिशनऱ्यांनी देशाच्या काही भागात खूप चांगले काम केले आहे व त्यांच्यापैकी कित्येकांच्या कार्यामुळे या देशाचे हित झाले यातही संशय नाही. त्यांचा सद्हेतु असला तरी पण त्यांची राजकीय व सामाजिक उद्दिष्टे आमच्याशी जुळणारी नसतात. म्हणून राजकीय दृष्टीने आमच्या काही सरसीमा प्रदेशात त्यांना राहावयास आम्ही प्रोत्साहन देऊ शकत नाही. पण याचा धर्माशी काही संबंध नाही. त्यांच्या तेथील अस्तित्वामुळे नवीन प्रश्न निर्माण होतात व म्हणून आम्हांला त्या भागात आमचे नियम काटेकोरपणे लावावे लागतात. आदिवासी क्षेत्रातील मिशनऱ्यांच्या हालचालींबाबत अशा काही अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. या भागात ख्रिस्ती, मुसलमान, हिंदु वा इतर कोठल्याही मिशनऱ्यांच्या चळवळीमुळे असंतोष उत्पन्न होतो व त्यातून संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे.

"मतपरिवर्तनाने धर्मान्तर झाल्याचे उदाहरण या भागात क्वचितच आढळते. या भागात ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणेच हिंदु व मुस्लिम मिशनऱ्यांच्याही हालचाली चालू आहेत. शुद्धीची चळवळ ही माझ्या दृष्टीने बहुवंशी राजकीय आहे तीही या

भागात चालू आहे. धार्मिक चळवळीमागे जो राजकीय हेतु असतो त्याची खऱ्या धर्माला आवश्यकता नाही व म्हणून तो तेथे नसावा असे मला वाटते.

" ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या विरुद्ध आक्रमक चळवळी करण्याची प्रवृत्ति भारताच्या काही भागात चालू आहे. अशा प्रकारच्या चळवळीला प्रोत्साहन मिळता उपयोगी नाही असे माझे मत आहे. कारण त्यामुळे आमच्या ख्रिस्ती जनतेच्या मनात भीति उत्पन्न होते."

बिशप पाटेकर यांचे पत्र

पुण्यातील इंडियन ख्रिश्चन मिशनचे राइट रेव्हरंड बिशप श्री. पाटेकर यांनी परदेशी मिशनरी-विरोधी मोर्चाला पाठिंबा दिला होता. त्यांनी या संबंधात श्री. न. गो. अभ्यंकर यांना एक पत्र पाठवून आपले विचार स्पष्ट केले. ते म्हणतात: "माझ्या अनुभवाप्रमाणे परकीय मिशनऱ्यांनी या देशातून निघून जाणे अत्यवश्य आहे. त्याची कारणे अशी: " हे परदेशी मिशनरी इंडियन ख्रिश्चन लोकांवर मालक स्वरूपाची सत्ता गाजवितात. त्यांच्या स्वतःच्या देशाच्या मोठेपणाची निरनिराळी मते ते आमच्यावर लादू इच्छितात. आम्ही इंडियन ख्रिश्चन असूनही त्यांना 'ॲलिजन्स' दिला पाहिजे व ते सांगतील तसे आम्ही वागले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. इंडियन ख्रिश्चन लोकांना देण्यात येणारी त्यांची शिकवणूक अराष्ट्रीय आहे. ते इंडियन लोकांना समानतेने कधीच वागवीत नाहीत. काळ्या ख्रिश्चनांना ते हलके समजतात. ते स्वतःला फार मोठमोठे पगार घेतात व इंडियन ख्रिश्चन धर्माधिकाऱ्यांना अर्धपोटी ठेवतात. या गोऱ्या मिशनऱ्यांनी भारत देश सोडून जावे असे सांगण्याचे काम वास्तविक आम्हीच सुरू करणार होतो. परंतु ते काम हिंदु सभेने हाती घेतल्यामुळे आम्हांस फार आनंद होत आहे. आम्ही तिच्या मताशी सहमत आहो. आमचा ख्रिस्ती धर्म आम्हांस अवश्य पाळता येईल; परंतु त्यात परकीयांचा हस्तक्षेप असण्याचे कारण नाही. त्यांनी इंडियन ख्रिश्चन अधिकाऱ्यांना ट्रस्टी नेमून निघून जावे. फक्त मित्रत्वाच्या नात्याने त्यांनी जरूर तर मार्गदर्शन करावे व मदत करावी. सर्व स्वतंत्रमतवादी ख्रिश्चन लोकांनी हिंदुसभेच्या या चळवळीस अवश्य मदत करावी.

बी. ए. पाटेकर

पुणे

दि राइट रेव्हरंड बिशप ऑफ पूना

दिनांक १०-८-५४

इसाई महार शुद्धीकरण केंद्र

हिंदुसभेच्या या मोर्चांनी हिंदु समाजात व ख्रिश्चन समाजातही मोठी जागृति घडवून आणली. त्याचा परिणाम भारतात व भारताबाहेरही घडून आल्याचे

दिसून आले. श्री. डी. के. भगत (माजी आमदार) यांनी दि २१ सप्टेंबर १९५४ ला केसरी पत्राला असे कळविले की, जबलपूर येथे इसाई महार शुद्धीकरण केंद्र आपण स्थापन केले आहे. या केंद्राच्या वतीने ख्रिस्ती झालेल्या महारवर्गीय मंडळींना शुद्ध करून हिंदूतील मूळ जातीत घेणे हा या संस्थेचा उद्देश आहे. त्याचबरोबर वर्गीकृत जमातीतील ख्रिस्ती झालेले लोक स्वार्थीपणाने वर्गीकृत जमातीसाठी सरकारने संमत केलेल्या सवलतीचा फायदा घेऊने वर्गीकृत जमातीचे नुकसान करीत आहेत; त्यालाही प्रतिबंध करण्याचा या संस्थेचा उद्देश आहे.

महाराष्ट्र हिंदुसभेच्या या आंदोलनाचे पडसाद अमेरिकेतही उमटले. एव्हरस्टन (अमेरिका) येथील ख्रिस्ती लोकांच्या मेळाव्यापुढे भाषण करताना राजमाणिक्यम् या देशी ख्रिश्चन इसमाने सांगितले की, 'अमेरिकन लोक धर्मात वर्णभेद मानतात. ते ख्रिस्ती धर्मास विरुद्ध आहे. मी भारतात परत गेल्यावर भारताच्या अधिकाऱ्यांना असे सांगणार आहे की, भारतात ख्रिस्ती धर्माविरुद्ध चळवळ होऊ देता कामा नये. पण त्याचबरोबर तुम्ही अमेरिकन लोकांनीदेखील 'इंडियन ख्रिश्चन चर्च' अशी भाषा न वापरता 'ख्राइस्ट चर्च इन इंडिया' अशी भाषा वापरावी. कारण पहिल्या प्रयोगाने धर्माला राष्ट्रीय भावनेच्या संकुचित कोंदणात जखडले जाते. ते परिणामी अनिष्ट होय.

"तसेच आमची देशभक्ति किंवा राष्ट्रीयता संशयास्पद ठरेल असे काहीही करण्याचे अमेरिकन मिशनरी मंडळाने सर्व प्रकारे टाळावे. नाही तर पोर्तुगीजांनी ख्रिश्चन धर्मावर साम्राज्यशाही राजकारणाने जशी आपत्ति आणली तशी ती पुन्हाही येईल. ही भीति अनाठायी नसून ती अगदी खरी आहे हे मी अनुभवाने सांगतो. तसेच इकडील (अमेरिकेतील) मिशनऱ्यांना भारतात न पाठवता भारतातीलच मिशनऱ्यांकडून धर्मप्रसाराचे काम करवून घ्यावे."

या प्रकारच्या परदेशी मिशनरी-विरोधी कार्याला पं. नेहरूंचा फार विरोध असे. त्यांची मते अव्यवहारी, राष्ट्रवादाशी विसंगत व परक्यांपुढे दबणारी असत. स्वकीयांना विरोध व परकीयांपुढे दुबळेपणा हा त्यांच्या राजनीतीचा वारसा आजही चालविला जात आहे व त्याची आपत्ति देशात आजही विविध क्षेत्रात धुमाकूळ घालीत आहे.

*

(१६)

युकॅरिस्ट कॉंग्रेसला विरोध

१९६४ वर्षी मुंबईस जागतिक ख्रिश्चन युकॅरिस्ट कॉंग्रेसचे अधिवेशन झाले. सुमारे दर चार वर्षांनी ते जगाच्या निरनिराळ्या भागांत भरविले जाते. १९६४ वर्षी ते मुंबईस भरविण्याचे ठरविण्यात आले होते. या अधिवेशनासाठी जगातील निरनिराळ्या देशांतील ख्रिश्चन मिशनरी जमत असतात. हिंदुस्थान ख्रिस्तमय करून टाकण्याच्या प्रेरणेने हे अधिवेशन हिंदुस्थानात भरविण्याचे ठरविण्यात आले होते. पं. नेहरूंनी त्याला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे सर्व सरकारी यंत्रणा त्यासाठी राबत होती.

हिंदुमहासभेचा या अधिवेशनास व त्याच्या द्वारे येथील लोकांना बाटविण्याच्या त्यांच्या चळवळीस तीव्र विरोध होता. दहा वर्षांपूर्वीच हिंदुसभेने परदेशी ख्रिश्चन मिशनऱ्यांना चलेजाव केले होते. त्या आंदोलनाचा इतिहास मागे आलाच आहे. तथापि पारतंत्र्यामुळे मने मेलेल्या स्वाभिमानशून्य सत्ताधाऱ्यांना परक्यांच्या पुढे पुढे करण्याची व त्यांचा अनुनय करण्याची जी खोड लागली आहे ती काही केल्या जात नाही. तथापि अशाही स्थितीत हिंदुसभेने एकाकीपणाने हा लढा दिला. त्या आधी हिंदुत्वाच्या इतर काही अभिमानी मंडळींनी हिंदुसभेच्या या लढ्याला आपली सहानुभूति दाखविली होती. पण प्रत्यक्ष लढ्याची वेळ आली तेव्हा एकेका गटाने पाय मागे घेतले. सरकारी यंत्रणेचा प्रभाव किती असतो व सरकारी दडपणाखाली मी मी म्हणणारे हिंदुत्वनिष्ठही कसोटीच्या प्रसंगी कसे माघार घेतात याचा या आंदोलनात पुन्हा प्रत्यय आला. श्री. बापूराव घारपुरे यांनी या चळवळीची टिपणे ठेवली होती. त्यांच्या आधारे त्यांनी पाठविलेला वृत्तान्त काळच्या दि. १।८।१९७३ च्या अंकात प्रसिद्ध झाला. त्या आधारे येथे या लढ्याचे वृत्त संकलित केले आहे.

जागतिक ख्रिश्चन युकॅरिस्ट कॉंग्रेसचे ३८ वे अधिवेशन सन १९६४ साली हिंदुस्थानात प्रथमच भरत होते. या अधिवेशनाचा उद्देश सर्व हिंदुस्थान ख्रिस्ती बनविण्याची चळवळ मोठ्या प्रमाणावर घडवून आणण्याचा होता. त्यासाठी रोमन कॅथॉलिक चर्चचे पोप पॉल हेही हिंदुस्थानात यावयाचे होते. या ख्रिस्ती परिषदेच्या चळवळीला येथील कॉंग्रेस सरकारचे सर्व प्रकारचे सहकार्य व साहाय्य होते. इतर निधर्मवादी पक्षही सरकारला साथ देत होते. हिंदुमहासभेचा त्यास तीव्र विरोध होता. त्या निमित्ताने हिंदुसभेने मोठ्या प्रमाणावर चळवळ केली.

त्यात अनेक हिंदुत्वनिष्ठांना सरकारने आपापल्या गावी स्थानबद्ध करून ठेविले व कित्येकांना तर तुरुंगातही डांबून ठेविले होते. हे अधिवेशन मुंबई येथे सन १९६४ च्या नोव्हेंबरच्या शेवटच्या सप्ताहात सुरू झाले आणि ते डिसेंबरच्या पहिल्या सप्ताहात संपले. या ख्रिश्चन परिषदेला विशुद्ध राष्ट्रवादाच्या भूमिकेवर उभे राहून हिंदुमहासभेने व काही अन्य राष्ट्रवादी नागरिकांनी प्रखर विरोध केला. रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती पंथाचे धर्मगुरु पोप पॉल त्या परिषदेला उपस्थित रहाणार आणि प्रथमच पूर्वेकडील देशांना भेट देणार अशी फार मोठी जाहिरात रोमन कॅथॉलिक पादरी मंडळींनी फडकावली होती. त्यामुळे त्या परिषदेला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले होते.

सरकारचा हिंदुत्वनिष्ठांना विरोध

परिषदेला विरोध करणाऱ्यांची न्याय्य भूमिका ध्यानात न घेता महाराष्ट्र सरकारने चुकीची पावले टाकून जनतेचे न्याय्य आंदोलन दडपण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण आंदोलन इतके प्रखर झाले की ८ दिवस १९००० आरक्षक मुंबईच्या चर्चगेट स्टेशनसमोर ख्रिस्ती परिषदेच्या मंडपाच्या रक्षणार्थ आणून उभे करण्यात आले होते! जगातील सर्व देशांत आणि विशेषत: पाश्चात्य देशांत आणि अमेरिकेत त्या आंदोलनाच्या वार्ता छापल्या गेल्या. त्यामुळे फार मोठी खळबळ माजली होती. महाराष्ट्रात २५० हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांवर स्थानबद्धतेच्या आज्ञा काढून त्यांना डांबून ठेवण्यात आले. प्रत्यक्ष मुंबईत हिंदुमहासभेच्या ६२ कार्यकर्त्यांना रातोरात अटक करून दहा दिवस तुरुंगात टाकण्यात आले. अधिकारारूढ पक्षाची परधार्जिणी लाचार वृत्ति ज्या वेळी प्रकट झाली त्या वेळी हिंदुमहासभेने व इतर काही हिंदुत्वनिष्ठांनी त्या वेळी सर्वस्व पणाला लावून लढा केला.

कॅथॉलिक धर्मप्रचाराचा व्यूह

जागतिक युकॅरिस्ट परिषद १९६४ च्या नोव्हेंबर महिन्यात मुंबईस भरविण्यात येईल अशी वार्ता वृत्तपत्रांतून साधारणत: जानेवारी १९६४ मध्ये प्रकट झाली. बहुधा रोममध्ये ही कल्पना शिजली असावी. गेली ४५० वर्षे गोव्याचा मुख्य पॅट्रिआर्क पोपचा हाच पूर्वेकडील प्रतिनिधि मानला जात असे. गोव्यातील पोर्तुगीज सत्ता नष्ट झाल्यावर त्याचे ऐवजी ते प्रमुख स्थान कार्डिनल ग्रेशस यांना देऊन पूर्वेकडील नव्या रोमन कॅथॉलिक धर्मप्रसाराच्या व्यूहाची रचना या परिषदेच्या निमित्ताने करण्यात यावयाची होती. स्वत: पोप पॉल या परिषदेला येणार आहेत तेव्हा ही परिषद यशस्वी करण्याकरिता आपण खूप कष्ट घेतले पाहिजेत असा संदेश कार्डिनल ग्रेशस यांनी मुंबईच्या कॅथॉलिक पादरी लोकांना दिला होता. परिषदेची सिद्धता करण्याकरिता युकॅरिस्ट बुलेटिन या नांवाचे एक

साप्ताहिक वार्तापत्र मुंबईच्या फोर्ट विभागातील स्टीफन्स हाऊसमधून सुरू करण्यात आले होते.

परिषदवाल्यांचा हेतु

या परिषदेच्या मंडपाकरिता ४० लाख रुपये खर्च व्हावयाचा होता. परदेशांतून पंचवीस हजारांपेक्षा जास्त कॅथॉलिक पाहुणे मुंबईस येणार आहेत, भारताच्या कोनाकोपऱ्यातून पाच लाख खिरस्ती पाहुणे मुंबईस येणार आहेत, अशा वार्ता वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. या सर्व बातम्यांचे उगमस्थान होते युकॅरिस्ट बुलेटिन. या परिषदेच्या वेळी पंचवीस हजार वनवासी किंवा गिरिजन हिंदूंना मुंबईत आणून त्यांना पोप महाशयांच्या उपस्थितीत ' खिरस्ती धर्माची दीक्षा देण्यात येणार आहे ' आणि ' पोप स्वतः निर्धन हिंदु वस्तीत हिंडून पंचवीस लक्ष रुपये दान म्हणून वाटणार आहेत ' अशाही वार्ता कॅथॉलिक पादरी मंडळींनी पसरविल्या होत्या.

युकॅरिस्ट बुलेटिनच्या मार्च १९६४ च्या अंकात परिषदेचे एक प्रमुख कार्यकर्ते फादर विल्सन यांनी प्रसिद्ध केले की " आम्ही या परिषदेच्या वेळी केवळ काही थोडी गीते म्हणण्याकरिता एकत्र येत नाही. तर आम्हांला या देशात एक कट्टर कॅथॉलिक क्रूसेडर सेना निर्माण करावयाची आहे. (We want to create militant zealot Catholic crusadars.)

परिषदेच्या या स्वरूपाकडे पाहून मुंबई प्रदेश हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांनी परिषदेला विरोध करावयाचे ठरविले व आपल्या या विरोधाची कल्पना महाराष्ट्र प्रदेश हिंदुसभा आणि अखिल भारतीय हिंदुमहासभेला दिली. मुंबईहून ' हिंदु ' नावाच्या श्री. बाळाराव सावरकरांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या साप्ताहिकात ही युकॅरिस्ट परिषदेची वार्ता देण्यात येऊन तिला विरोध केला पाहिजे असे प्रकट करण्यात आले. इंग्रजीत निघणाऱ्या ' फ्री हिंदुस्थान ' नावाच्या श्री. पंडित बखले यांच्या साप्ताहिकात देखील हेच मत प्रकट करण्यात आले.

विरोधी आंदोलन सुरू

मसुराश्रमाच्या वतीने ब्रह्मचारी श्री. दत्तमूर्ति यांनी ऑगस्ट १९६४ मध्ये एक पत्रक सायक्लोस्टाईल करून या कॅथॉलिक खिरस्ती परिषदेला विरोध करावा असे आवाहन केले व त्याचप्रमाणे ' बॅन युकॅरिस्टिक कॉंग्रेस ' या नावाची एक इंग्रजी पुस्तिका छापून ती सर्वत्र वाटण्याचे ठरविले. त्या पुस्तिकेच्या प्रती केंद्रीय मंत्री, दिल्लीच्या संसदेचे सदस्य, महाराष्ट्र विधिमंडळाचे आणि विधान परिषदेचे सदस्य यांना पाठविण्यात आल्या. त्यामुळे महाराष्ट्राबाहेरील विचारवंत या विषयावर चर्चा करू लागले.

विरोधाला मुनशींचा विरोध !

सुप्रसिद्ध आर्यसमाजी डॉ. सुंदरलाल बहल यांच्या घरी हिंदुधर्मप्रसारक मंडळाची साप्ताहिक बैठक भरत असे. तेथे हा प्रश्न चर्चेला येऊ लागला. आर्यसमाजी मंडळींना जागे करण्याचे काम डॉ. बहल यांनी केले. असे तीन चार गट जागे झाल्यानंतर सर्वांची एक संयुक्त सभा दि. १८ सप्टेंबर १९६४ ला आर्यसमाजी नेते श्री. प्रतापभाई शूरजी वल्लभदास यांच्या घरी झाली. त्या सभेत ८० पेक्षा जास्त सदस्य उपस्थित होते. त्या सभेत अनेक लोक बोलले. सर्वांचा विचार स्पष्ट होता की परिषदेला विरोध करावा. परंतु तेथे श्री. कन्हय्यालाल मुनशी उपस्थित होते. ते म्हणाले, " विरोध करना मुझे पसंद नहीं है। ईसाई परिषद के लिये विदेश से आनेवाले पादरी हमारे अतिथि हैं। " तेव्हा त्यांचे शिवाय इतरांनी विरोध करावा यावर आग्रह धरला. पुन्हा एका आठवड्याने सभा झाली. तेव्हा (१) वृत्तपत्रप्रचारसमिति (२) स्वयंसेवक समिति (३) कार्यालय समिति व (४) सभा घेऊन प्रचार करणारी समिति अशा समित्या नेमल्या गेल्या.

फुटीर गटांची पैदास

पण या प्रकरणी नंतर कालहरणाचा डाव खेळला जात आहे असे तळमळीच्या कार्यकर्त्यांना दिसून आले. आर्यसमाजी बड्या नेत्यांवर केंद्रीय आणि प्रांतिक गृहमंत्र्यांकडून दबाव येऊ लागला. मुंबईच्या आर्यसमाजी नेत्यांत बरेचसे काँग्रेस सदस्य होते. ते हा कालहरणाचा डाव खेळू लागले. ' ईसाई युकॅरिस्ट परिषद विरोधी आघाडी ' असे नाव न घेता ' भारतीय संस्कृति संरक्षक मंडळ ' नाव घ्यावे असा आग्रह आर्यसमाजी नेते धरू लागले. सभेत नेमलेल्या समित्यांची यादी गहाळ झाली आणि पुढील सप्ताहाच्या बैठकीत या समितीत अमुक होता आणि अमुक नव्हता यावरच वाद होऊ लागला. समितीत निरनिराळ्या मतांचे लोक आहेत असे पाहून काही सरकारी हस्तकही त्या समितीत घुसले.

सनातनी गटाचे नेते श्री. दीक्षितजी महाराज यांनी ' नागरिक समिति ' नावाची संस्था स्थापून कार्य सुरू केले. कामाला वेग येत नाही असे ज्या काही आर्यसमाजी कार्यकर्त्यांना प्रामाणिकपणे वाटत होते पण वरिष्ठ आर्यसमाजी नेत्यांविरुद्ध बोलता तर येत नव्हते, अशांनी त्या ' नागरिक समितीला ' आतून पाठिंबा दिला. या नागरिक समितीला मसुराश्रमाचाही पाठिंबा होता. संघ-जनसंघवाल्यांची नेते मंडळी ठाणे येथे जमली. त्या सभेत महाराष्ट्र प्रांत संघचालक श्री. बाबाराव भिडे यांनी ' संघवाल्यांची स्वतंत्र समिति ' काढण्याची कल्पना आपल्या अनुयायांना दिली. ही सर्व परिस्थिति पाहिल्यावर परळ हिंदुसभेच्या कार्यालयात हिंदुसभेची कार्यकर्ती मंडळी चळवळीचा आढावा घेण्याकरिता

जमली. तेथे श्री. पद्माकर ढमढेरे यांनी सर्व परिस्थिति स्पष्टपणे मांडली. पोपला काळीं निशाणे दाखवावी, प्रकट सभा घ्याव्या आणि इतर प्रांतांतील स्वयं-सेवकांच्या तुकड्या येथे आणाव्या असे निर्णय तेथे घेण्यात आले आणि दहा जणांची ‘ कृतिसमिति ’ नेमण्यात आली. त्याच सभेत वार्ता आली की, संघसदस्यांची स्वतंत्र ‘ हिंदुजनजागरण ’ समिति स्थापन झाली. आणि ती समिति मोठा निधि जमविणार आणि पाच हजार सभा घेणार !

हिंदुसभावाद्यांनी आघाडी उघडली

हिंदुसभेजवळ धनाची बाजू लंगडी होती. मोठ्या सभा घेण्याकरिता पैसा बराच लागतो आणि वृत्तपत्रीय प्रचार तर बड्या भांडवलवाल्यांच्या हाती ! म्हणून त्याच बैठकीत चौकाचौकांत प्रचारसभा घेण्याचे ठरविण्यात आले. ते काम श्री. अप्पाराव कासार आणि श्री. वि. गं. देसाई यांनी हाती घेतले. त्यांनी सभा घेण्याचा सपाटा सुरू करताच या आंदोलनाला धार चढू लागली. रस्तोरस्ती गट-सभेमुळे हिंदुसभेकडे पैसा जमू लागला. पंडित व्रजेश आणि श्री. विक्रम सावरकर यांच्यासारखे तुफानी वक्ते मुंबईत येऊन ठाण मांडून बसले. गिरगाव, चौपाटी आणि शिवाजी पार्क येथे मोठ्या सभा झाल्या. चौपाटी येथे दि. २५।१०।६४ ला पं. व्रजेश आणि विक्रम सावरकर यांच्या सभेस पाच हजारांवर समुदाय उपस्थित होता. पोपला काळे झेंडे दाखविण्याकरिता सभेतील सर्वांनी आपले हात वर केले. मग वृत्तपत्रांनाही या चळवळीची नोंद घ्यावी लागली.

चळवळ वाढू लागली तेव्हा महाराष्ट्र सरकार आणि केंद्रीय सरकार हलू लागले. कॅथॉलिक पादरी आणि त्यांचे प्रमुख कार्डिनल ग्रेशस चिंताग्रस्त झाले. महाराष्ट्राचे मुख्य मंत्री नाईक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, “ विश्व ईसाई परिषदेला विरोध करणारे जातीयवादी आहेत !” यामुळे वातावरण जास्तच तंग होऊ लागले.

देशी ख्रिश्चनांचा परदेशीयांना विरोध

ही परिषद केवळ परदेशी मिशनऱ्यांच्या प्रेरणेने चालणाऱ्या रोमन कॅथॉलिक गटाची आहे. आम्ही रोमन नाही. आम्ही स्वदेशनिष्ठ कॅथॉलिक आहो. आमचा या परिषदेला विरोध आहे अशी स्पष्ट घोषणा मंगलोरच्या कॅथॉलिक गटाने आणि त्यांच्या साप्ताहिक वृत्तपत्राने केली. इंडियन नॅशनल चर्चचे प्रमुख फादर विल्यम्स यांनी हॉटेल ग्रिसलमध्ये पत्रकार परिषद घेऊन घोषित केले की “आम्ही भारतनिष्ठ ख्रिस्ती आहो. पोप किंवा झेवियर या परकीय धर्मगुरूंना आम्ही मानीत नाही. माझ्या मते झेव्हियर हा सेंट (संत) नव्हता. भारतातील कोणताही संत अहिंसक असतो. झेवियरने वांद्रा येथे हिंदुकोळी लोकांवर सशस्त्र हल्ला केला होता. त्याने

सारे पुरुष ठार केले व स्त्रिया पोर्तुगीज सैनिकांना बटीक म्हणून बहाल केल्या. (ही माहिती लिस्बनचे सरकारी पत्रसंग्रहालयात, 'गोवा इन्क्विझिशन' या पुस्तकात आणि 'ख्रिश्चॅनिटी इन वेस्टर्न इंडिया' या पुस्तकातही नमूद आहे.) देशभक्त ख्रिस्ती मंडळींच्या या वक्तव्याने मुख्य मंत्री नाईक यांच्या आरोपांना परस्पर उत्तर मिळाले.

चळवळ दडपून टाकण्याची मोहीम

हिंदुमहासभा ही नगण्य शक्ति आहे असे समजून सरकार झोपले होते. पण आंदोलनाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे हे पाहून युरोपातील मोठ्या वर्तमानपत्रांचे प्रतिनिधि या आंदोलनाच्या वार्ता छापू लागले. दिल्लीच्या संसदेत प्रश्नोत्तररूपाने माहिती येऊ लागली. आपली बाजू तर्कशुद्ध आणि शांतताप्रिय नागरिकांना साजेशी आहे असे सांगण्याकरिता २५।१०।६४ ला 'टाईम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्रात कार्डिनल ग्रेशस यांचा एक लेख प्रसिद्ध झाला. हा विरोध कशाला आहे हे जाणून घेण्याकरिता जनता उत्सुक होऊ लागली. भोपाळ, दिल्ली आणि कर्णावती येथून हिंदुमहासभेच्या स्वयंसेवक तुकड्या येणार या वार्ता प्रकाशित झाल्या. आंदोलन दडपशाहीने दाबून टाकण्याकरिता महाराष्ट्र सरकार सज्ज झाले. गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई नागपूरहून मुंबईस येऊन परिषदेच्या काळात स्वत: ठाण मांडून बसणार आणि परिषद यशस्वी होऊ देण्यास सरकारी साहाय्य करणार अशा वार्ता प्रसिद्ध होऊ लागल्या. हिंदुमहासभेचे महामंत्री प्रा. वि. घ. देशपांडे यांनी मुंबईस येऊन ठाण मांडले आणि आपली बाजू स्पष्ट करण्याकरिता २१।१०।६४ ला त्यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. त्यांच्या त्या अधिकृत वक्तव्यातील मुद्दे असे :

विरोधाची कारणे

(१) आम्ही निष्ठास्वातंत्र्यांचे पुरस्कर्ते आहोत. हिंदुधर्मावर आमची निष्ठा आहे. कोणत्याही प्रकारची सक्ती न करणाऱ्या धर्मप्रचाराला या देशात पूर्वीही वाव होता. आर्थिक किंवा राजकीय दडपणाने केल्या जाणाऱ्या धर्मप्रचाराला आमचा विरोध आहे. ख्रिस्ती नागरिकांच्या धार्मिक समारंभाला आमचा विरोध नाही. मात्र त्या नावाखाली रोमन कॅथॉलिकांच्या संघटित राजकीय, आक्रमक हालचालींना आम्ही विरोध करू इच्छितो.

(२) आमचा बाटवाबाटवीच्या कार्यक्रमाला विरोध आहे. परकीय मिशनरी आणि परकीय पैसा यांच्या बळावर आज भारतात धर्मांतर घडवून आणण्याचा प्रयत्न होत आहे. त्याला आमचा विरोध आहे.

(३) इंग्लंडसारख्या राष्ट्रांनी राष्ट्रीय चर्च स्थापिले. येथील राष्ट्रवादी ख्रिश्चनांच्या चर्चला आमचा विरोध नाही. रोमच्या पोपचे वर्चस्व ही राष्ट्रवादाला

विरोधी गोष्ट आहे· रोमन कॅथॉलिक पंथामुळे गोव्यात अलगपणाची भावना ४५० वर्षे टिकून आहे. नागभूमीमध्येही असे दिसते की धर्मांतरामुळे राजकीय बंडाळीला उत्तेजन मिळाले.

(४) रोमन कॅथॉलिक चर्चची वाढ या देशात छळबळाच्या आधारावर झाली. गोव्यात या धार्मिक जुलमाची परमावधि झाली. परकीय मिशनरी येथे कोटी कोटी रुपये ओतीत आहेत. येथील लोक अज्ञानी आहेत. परदेशी मिशनरी संघटित आहेत. जणू एका मोठ्या राष्ट्राच्या पोटात एक स्वतंत्र संघटित रोमन कॅथॉलिक राष्ट्र परदेशी मिशनरी निर्माण करू पहात आहेत. वनवासी आणि गिरिजन हे या राष्ट्रघातक कारवायांना बळी पडत आहेत. लोकांना आर्थिक पेचात धरून जे सामुदायिक धर्मांतर घडवून आणण्यात येत आहे त्याला आमचा विरोध आहे.

(५) परदेशी मिशनरी येथे येतात. त्यांच्यामुळे राजकीय कटकटी येथे निर्माण होण्याचा संभव असतो. सरकारविरुद्ध कट करण्याच्या प्रकारात त्यांचा हात असतो, या युकॅरिस्ट परिषदेच्या निमित्ताने हजारो परकीय मिशनरी येथे येतील. त्यातले कोण हेरगिरी करतील ते सांगणे कठीण.

(६) गोवा नुकताच स्वतंत्र झाला. ती घटना पाश्चात्य देशांतील कित्येक मिशनरी संघटनांना आवडली नाही. पोर्तुगीज सरकारचे हस्तक या परिषदेच्या निमित्ताने पुन: येथे येतील आणि चिथावणी देणारी कृत्ये करतील अशी शंका येते. चीन आणि पाकिस्तानशी आपला संघर्ष आहे. त्यांचेही हस्तक या संधीचा लाभ घेऊन परिषदेच्या वेळी येथे शिरतील.

(७) या परिषदेच्या वेळी बदनाम झेवियरचे शवदर्शन करण्याकरिता हे परकीय मिशनरी गोव्याला भेट देणार आहेत. स्वत: पोप पॉल झेवियरचे शव पाहण्यास जाणार आहेत. पोर्तुगीज साम्राज्यशाहीचा हस्तक बनून येथील लोकांवर अत्याचारी हल्ले करून त्यांना सक्तीने बाटविणाऱ्या झेव्हियरचा सत्कार पोपच्या हस्ते व्हावा हे आपल्या राष्ट्रीय सन्मानाला विपरीत आहे.

(८) ख्रिस्ती धर्म आणि त्यातही रोमन कॅथॉलिक पंथ आग्नेय आशियात राष्ट्रवादाविरुद्ध भयंकर षड्यंत्र खेळत आहे. व्हिएटनाम हे याचे स्पष्ट नि ताजे उदाहरण आहे.

(९) भारताला आज जबरदस्तीने केलेले धर्मांतर नको आहे. येथे शांततेचे वातावरण टिकावे आणि या देशाची आर्थिक प्रगति व्हावी ही सर्वांत मोठी गरज आहे. उदयोन्मुख देशांनी या परदेशी मिशनऱ्यांवर बंदी घातली आहे. कारण त्यांचा तेथे ख्रिस्तांचे साम्राज्य स्थापावयाचा प्रयत्न आहे. ब्रह्मदेशाने या मंडळींवर बंदी घातली आहे.

(१०) रोमन कॅथॉलिक जगाला येथे युकॅरिस्ट परिषद भरवून 'भारत हे रोमन कॅथॉलिक धर्माला मानणारे राष्ट्र आहे' असा प्रचार करण्याला संधि दिली जात आहे.

(११) चीनशी युद्ध चालू झाल्यानंतर येथे सर्व प्रकारचे निर्बंध राष्ट्रीय सुरक्षिततेकरिता आपण केले. ५० माणसांपेक्षां जास्त माणसांच्या जेवणावळी नकोत असे म्हटले आणि आता या हजारो परदेशी पाहुण्यांना भोजन घालण्यास अनुमति द्यावी, या पाहुण्यांचे सामान उतरवून घेण्याचे वेळी पोर्टट्रस्टने नियमाप्रमाणे पैसे घेऊ नयेत, मुंबईत जागेची टंचाई असताना सर्व सार्वजनिक जागा, शाळा आणि सरकारी इमारती पाहुण्यांचे स्वागतार्थ दिल्या जातील असा विचार सरकारने करावा हे अयोग्य वाटते. एका विशिष्ट धर्माच्या संमेलनाचा हा भार राष्ट्रीय तिजोरीवर कशाकरिता ?

(१२) पोप एका स्वतंत्र देशाचा (तो लहान देश का असेना) राजा आहे. त्याला या देशात येऊन गरिबांना स्वहस्ते दान वाटण्याचा अधिकार देणे आंतरराष्ट्रीय संकेताच्या विरुद्ध आहे. परदेशातून येणारी आर्थिक मदत मग ती रोकड असो कीं दूधभुकटीच्या रूपाने असो कीं कपडयाच्या रूपाने असो, आमच्या सरकारच्या स्वाधीन केली जावी आणि मग सरकारने ती वाटावी हेच योग्य.

म्हणून या प्रसंगी आम्ही मागणी करतो की युकॅरिस्ट परिषदेवर बंदी घालावी. परदेशी माणूस आणि त्यांतही पोर्तुगालचा नागरिक परिषदेला येऊ देऊ नये. या परदेशी पाहुण्यांना झेवियरच्या शवदर्शनाच्या कार्यक्रमाला जाऊ देऊ नये. परदेशी मिशने त्वरित बंद करावी. बाटवाबाटवी त्वरित थांबवावी. राष्ट्रीय चर्चकडे या परदेशी मिशनांची संपत्ति देण्यात यावी. परकीय मिशनरी शाळा आणि हॉस्पिटले सरकारने ताब्यात घ्यावी. त्यांना वाटल्यास नुकसान भरपाई द्यावी. जी दान रक्कम असेल ती सर्व येथील सरकारी यंत्रणेमार्फतच वाटली जावी.

लढ्याचे स्वरूप

हिंदुसभेची बाजू अशी न्याय्य असताना देखील सरकारी यंत्रणा ती बाजू समजून घेईना. हिंदुत्वनिष्ठांना भेटीस बोलावून धमकावण्याचे किंवा लोभ दाखवून आंदोलन समाप्त करण्याचे डाव टाकण्यास गृहमंत्र्यांनी प्रारंभ केला. विक्रम सावरकर आणि धर्मवीर वि. रा. पाटील यांना पकडून अटकेत ठेवले. मुंबईच्या मोठ्या दैनिकांच्या संपादकांना सूचना गेल्या की या आंदोलनाची वार्ता छापू नका.

या आंदोलनातील हिंदुत्वनिष्ठ नेत्यांत फूट पाडण्याचे प्रयत्न सरकारने पुष्कळ केले. प्रारंभी एक समिति होती. तिच्या तीन चार स्वतंत्र समित्या झाल्या. तरी हिंदुत्वनिष्ठांतील कार्यनिष्ठा कमी झाली नाही. विकेंद्रित स्वरूपात पण एकमेकांशी

बऱ्याच प्रमाणात जुळवून घेऊन काम करणारे विचारवंत या आंदोलनामागे होते. खडूने रस्त्यावर घोषणा लिहिणे, मोठी प्रचारपत्रके लावणे, रस्त्यांत गट सभा घेणे वृत्तपत्रांतून प्रसिद्धि देणे, मोठ्या सभा घेणे, काळे झेंडे दाखविणारी स्वयंसेवक मंडळी तयार करणे, प्रत्यक्ष काळे झेंडे दाखविताना पोलिसांनी लाठीमार केला तर त्या जखमी स्वयंसेवकांना उचलून हॉस्पिटलमध्ये पोचविणारे पथक या सर्वांची कामे वाटली गेली होती. बाहेरून अलग समित्या दिसतात म्हणून फुटलीशी वाटणारी ही आघाडी अजून बरीच सावध आहे असे जेव्हा सरकारच्या लक्षात आले तेव्हा गृहमंत्र्यांनी चळवळ दडपण्याकरिता नवे तंत्र सुरू केले, आणि त्याचा परिणाम दिसू लागला.

पुण्यास १५।११।६४ ला खाजगी सत्यनारायणाचे निमित्त करून श्री. गोपाळराव गोडसे, करकरे, श्री. भाऊराव अभ्यंकर, ग. वि. केतकर आदि मंडळींना अटक करण्यात आली व गांधीवधानंतर जे दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात आले होते तसे ते पुन्हा निर्माण करण्याचे डाव खेळले गेले.

या चळवळीतून संघवाल्यांच्या हिंदुजागरण समितीने केव्हाच अंग काढून घेतले होते. "गृहमंत्री आपल्या मागण्या मान्य करण्याचे वचन देत आहेत तरी आता आंदोलन बंद करावे" असे ते म्हणू लागले. आर्यसमाजी प्रचारक नि वक्ते मुंबईत येऊन बसले होते; पण त्यांचे नेतेच हदरले, मग ते काय करू शकणार ?

त्यानंतर वाचकांची पत्रे छापून हिंदुत्वनिष्ठांचे विरुद्ध काहूर उठविण्याचे तंत्र सुरू झाले. विनोबा भावे यांचे शिष्य सांगू लागले, 'आम्ही देखील हिंदु धर्म मानतो.' 'खरा हिंदु धर्म सहिष्णु आहे.' 'अतिथींचे स्वागत करणे म्हणजे हिंदु धर्म.' काही संपादक म्हणू लागले, 'सर्वांना मतस्वातंत्र्य असले पाहिजे, पं. नेहरूंची इच्छा आपण सन्मानिली पाहिजे.' श्री. काका कालेलकरांनी सांगितले की नेहरूंनी या परिषदेला संमति दिली होती तेव्हा पोपचे स्वागत करा, ईसाई परिषदेला विरोध म्हणजे जातीयता ! श्री. विनोबा भावे यांचे शिष्य मधुकर रायकर आपल्या वृत्तपत्रात लिहू लागले "हिंदुधर्म विशाल सागराप्रमाणे आहे. परिषदेला विरोध करणारे लोक हिंदुधर्माला धोका निर्माण करीत आहेत ! ते जातीयवादी आहेत. हिंदुसभावाले सच्चे हिंदु नाहीत. हिंदु धर्माच्या नावाने पुन्हा जातीयवाद मूळ धरीत आहे."

काय गंमत पहा ! "नागभूमि भारतापासून अलग करा" अशी घोषणा देणारे जयप्रकाश या देशात राष्ट्रभक्त मानले जातात ! "काश्मीर पाकिस्तानला देऊन टाका" असे म्हणणारे येथे देशभक्त ठरतात ! पोपच्या समोर गुढगे टेकणारे विनोबाशिष्य हे सच्चे हिंदु आणि झेव्हियरची ऐतिहासिक कामगिरी स्पष्ट सांगून परदेशी ख्रिस्ती प्रचारकांना येथे हेरगिरी करायला वाव देऊ नका" असे सांगणारे

हिंदुसभावाले सच्चे हिंदु नाहीत !!! केवळ हिंदुसमाजात भ्रम निर्माण करण्याचा धंदा करणाऱ्या या सर्वोदयी नेत्यांची कशी समजूत घालावयाची ?

मद्रासच्या ' कॅथॉलिक लीडर ' नावाच्या ५४ वर्षे चालू असलेल्या साप्ताहिकाच्या दि. ११।१०।६४ च्या अंकात एक पादरी महाशय लिहितात " २० लाख माणसांची सेना घेऊन आपण युरोपात विश्व युद्ध जिंकले. आपण का भीत आहोत ? भारताला शीघ्रातिशीघ्र इसाई राज्य बनविणे हे आपले कर्तव्य आहे. " विनोबांचे शिष्य ही अशी वृत्ते वाचीत नाहीत आणि वाचली तरी दुर्लक्ष करतात. त्यांची सारी शक्ति हिंदुधर्मनिष्ठांना खच्ची करण्याकडे लागते ! पुणे नगरपालिकेत युकॅरिस्ट परिषदेला विरोध दर्शविणारा प्रस्ताव आला तेव्हा भाषण आणि लेखन यांतून हिंदुत्वनिष्ठांवर सतत टीका करणारे समाजवादी नेते श्री. गोरे हे त्या प्रस्तावाला विरोध करायला उभे राहिले ! त्यांनी परिषदेला पाठिंबा दिला.

मुंबई महापालिकेत युकॅरिस्ट परिषदेसंबंधी ठराव आला तेव्हा रशियावादी कम्युनिस्ट श्री. वामनराव बापट म्हणाले की ' पोपचे स्वागत करावे. ' विश्वकीर्तीचे कम्युनिस्ट नेते भाई डांगे म्हणाले " पोपचे स्वागत करा. पोप अॅटम बाँबचे स्फोट करण्याला विरोध करतो. अतएव तो पुरोगामी आहे ! " कॅथॉलिक चर्चच्या प्रेरणेने कॅथॉलिक वर्कर्स युनिअन स्थापन झाली होती. शिक्षकांच्या संघटनेला कॅथॉलिक शिक्षक पादरी नेहमी विरोध करतात; पण हे मार्क्सवादी नेते म्हणतात, पोप पुरोगामी आहे.

या लढ्यातील प्रचारात हिंदुसभेव्यतिरिक्त श्री. दत्ता प्रधान (तेव्हा जनसंघवाले), श्री. विनायक भावे (सहसंपादक मराठा) व श्री. प्रभाकर मोरे (समाजवादी) यांचे मात्र चांगले साह्य झाले.

राष्ट्रपति राधाकृष्णन् यांच्या नावाने एक मुक्त पत्र प्रा. वि. घ. देशपांडे यांनी दि. १।११।६४ ला लिहिले. त्यात पत्रकार परिषदेतीलच विचार त्यांनी व्यक्त केले होते. पण त्या पत्रकाला मुंबईच्या दैनिकांनी प्रसिद्धि दिली नाही. वृत्तपत्रांनी प्रसिद्धि न देण्याचा कट केला. सत्यनारायण प्रकरणाचे निमित्त करून अन्य हिंदुत्वनिष्ठ गट काढता पाय घेऊ लागले, तेव्हा हे प्रकरण न्यायालयात नेण्याचा निर्णय घेण्यात आला. दि. ७।११।६४ ला श्री. एकनाथ खानोलकर यांच्या वतीने श्री. माधवराव पाठक विधिज्ञ यांनी मुंबई हायकोर्टात एक अर्ज दाखल केला.

त्याला विरोध करण्याकरिता युकॅरिस्ट काँग्रेसच्या वतीने सुप्रसिद्ध बॅ. पालखीवाला व सोली सोराबजी, व भारत सरकारच्या वतीने बॅ. एस. व्ही. गुप्ते, बॅ. नरिमन, बॅ. बॅप्टिस्टा, जोशी प्रभृति ठाण मांडून उभे होते.

अर्ज दाखल होताच पोर्टट्रस्टचे अधिकारी पत्रक काढून सांगू लागले की, ' युकॅरिस्ट परिषदेचे परदेशी पाहुणे येतील तेव्हा त्यांचे सामान समूल्य उतरवून

घेऊ.' सरकारी मुद्रणालय, लोहमार्ग, गृहनिर्माण मंडळ इत्यादि विभागांचे प्रमुख परिषदेला ज्या सवलती देणार होते त्या रद्द करण्याची भाषा बोलू लागले. हा अर्ज न्या. तारकुंडे यांनी काढून टाकला.

कार्डिनल ग्रेशस यांच्या कार्यालयात जाऊन एका हिंदुसभा कार्यकर्त्याने त्यांना आपला दृष्टिकोन समजावून दिला. त्या वेळी तेथे शर्मा नावाचे एक पत्रकार उपस्थित होते. पण सरकार ताठ होते म्हणून पादरी मंडळी निर्धास्त होती.

अखेर हिंदुसभेच्या शिष्टमंडळाने सरकारपुढे आपल्या किमान मागण्या मांडल्या. त्या मागण्या अशा : (१) पोपने येथे स्वहस्ते गरिबांना दान देऊ नये. (२) परिषदेच्या वेळी सामुदायिक धर्मान्तर होऊ नये. (३) इस्पितळात जाऊन तेथील रोग्यांना पोपने भेटू नये. (४) मिरवणूक काढू नये. (५) मुंबई महापालिकेने पोपचा सत्कार करू नये. या मागण्या मान्य झाल्या तरच आंदोलन मागे घेण्याच्या संबंधात विचार होईल. सरकारने पहिल्या दोन अटींचा विचार करण्याचे मान्य केले. पण बाकी अटी मान्य करण्यास नकार दिला. १९ हजार पोलीस चर्चगेट जवळील युकॅरिस्ट परिषदेच्या मंडपाजवळ उभे करण्यात आले.

हिंदुसभेने कोणतीही अट न घालता हे आंदोलन स्थगित करावे यासाठी सरकार एकसारखे प्रयत्न करीत होते. त्यासाठी साम, दाम, दंड व भेद या सर्व उपायांचा सरकार वापर करीत होते. हिंदुसभावादी निष्ठावंत होते. त्यामुळे दामाचा त्यांजवर काही परिणाम झाला नाही. तुरुंगाचे भय सरकारने दाखवून पाहिले, पण त्याचाही उपयोग झाला नाही. तेव्हा भेदाचा उपयोग सरकारने केला व एकाला एक थाप तर दुसऱ्याला दुसरी असे प्रकार सुरू झाले. तेव्हा तुरुंगात अटकेत असलेल्या व बाहेर असलेल्या हिंदुसभेच्या सभासदांच्या कृति समितीची एकत्रित बैठक झाल्याशिवाय कोणतेही आंदोलन मागे घेण्याचा स्वतंत्रपणे विचारही करता येणार नाही असे कार्यकर्त्यांनी सरकारला स्पष्टपणे कळविले. श्री. विक्रम सावरकर नागपूरच्या व श्री. वि. रा. पाटील हे औरंगाबादच्या तुरुंगात होते. सर्व एकत्र जमले तर वाटाघाटीतून आंदोलन स्थगित करण्यासाठी काही मार्ग निघेल असे सरकारला वाटत होते. म्हणून सावरकर व पाटील यांना तेथून मुंबईच्या तुरुंगात आणण्यात आले. म. गांधी व पितापुत्र नेहरू यांच्या येरवडा तुरुंगातील १९३० सालच्या भेटीची ही एक प्रकारे पुनरावृत्ति आहे असे मंत्री म्हणत होते. त्या बैठकीं-साठी नागपूरहून त्या वेळचे हिंदुसभेचे विधान परिषदेतील सदस्य श्री. वा. ब. गोगटे हेही विमानाने मुंबईस आले. त्यांच्यासह ऑर्थररोड तुरुंगातच कृतिसमितीची सभा झाली. पण तेथे अखेर जो निर्णय ठरला तो प्रकट करण्याचा अधिकार महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या कृतिसमितीचे जे सभासद बाहेर होते त्यांच्या हाती देण्यात आला होता. मुंबईस हिंदुसभा कार्यालयात ही बैठक झाली. तीत आंदोलन चालू

ठेवण्याचाच निर्णय प्रकट करण्यात आला. त्याबरोबर हिंदुसभा कार्यकर्त्यांची सार्वत्रिक धरपकड व स्थानबद्धता सुरू झाली.

आता हे हिंदुसभावाले काय करू शकतील ? असा प्रश्न जो तो विचारू लागला. दिल्ली आणि भोपाळहून स्वयंसेवकांच्या तुकड्या निघण्याची वेळ आली त्या तुकड्यांचे अग्रगामी दूत मुंबईस येऊन कामाला लागले. मग कपट नाटक सुरू झाले. भोपाळला आणि दिल्लीला खोटया तारा केल्या गेल्या की 'येऊ नका लढा स्थगित झाला ! '

हिंदुमहासभेचे अध्यक्ष श्री. नित्य नारायण बॅनर्जी यांना गळ घालून लढा बंद करण्याची खटपट झाली. महाराष्ट्रातील सुमारे २५० कार्यकर्त्यांवर आपले गाव न सोडण्याच्या सरकारी आज्ञा देण्यात आल्या. पुण्याच्या एका कार्यकर्त्याने तत्क्षणीच सांगितले, 'मी ही आज्ञा मोडणार आणि पोपला काळी निशाणे दाखविणार.' ठाण्याचे प्रो. आगासकर आणि पुण्याचे श्री. पेंडसेप्रभृति संघ जनसंघ नेत्यांवरही नोटिसा बजावण्यात आल्या. परिषद सुरू होण्यापूर्वी तीन दिवस अगोदर कृतिसमितीच्या कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. तरीही काळे झेंडे दाखविले जाणारच अशी चिन्हे दिसू लागली. तेव्हा पोप येण्यापूर्वी २४ तास संशयित कार्यकर्त्यांना अटक करण्याचे सत्र सरकारने सुरू केले. पण त्यातूनही दोन कार्यकर्ते निसटलेच. परळ हिंदुसभेच्या आणि दादर हिंदुसभेच्या कार्यालयांवर पोलीस पहारे बसविण्यात आले. एकंदर ४४ कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. आणि हे सर्व भारत सुरक्षा कायद्यान्वये करण्यात आले ! ! !

पोपचे आगमन झाले. मिरवणूक निघाली. मिरवणूक विल्सन कॉलेजजवळ येताच दोन युवक श्री. अशोक विरुमल (सिंधी) आणि नरेंद्र भट (गुजराथी) अकस्मात् पुढे आले. त्यांनी पोपविरोधी घोषणा केल्या. काळे झेंडे फडकविले आणि पोपविरोधाची पत्रके पोपच्या दिशेने फेकली. (परदेशांतील वार्ताहरांनी त्यांची छायाचित्रे काढून घेतली.) त्या दोघा तरुणांना अटक करून ऑर्थररोड तुरुंगात पाठविण्यात आले.

वृत्तपत्रात बातमी होती : पोपने सांगितले, 'विरोधकांना तुरुंगातून मुक्त करा. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नाईक यांनी हसत हसत नि पाईप ओढीत सांगितले,

'आम्ही त्यांना केव्हाच सोडले आहे ! ' ही वार्ता त्याच कार्यकर्त्यांनी तुरुंगात वाचली तेव्हा सारेजण गमतीने हसले ! ! ! असे होते हे मुख्य मंत्री. मुंबईपासून शंभर मैलांवर डहाणू विभागात तलासरी येथे श्री. बाबा कुळकर्णी हे वयोवृद्ध शुद्धिकार्यकर्ते रहात असत. वनवासी वारली लोकांत राहून ते कार्य करीत. ते घरच्या मुलामाणसांना भेटण्याकरिता तेथून मुंबईकडे निघाले होते. सरकारला वाटले हे

गृहस्थ पोपला काळे झेंडे दाखवायला निघाले आहेत. तेव्हा त्यांनाही अटक करण्यात आली.

तुरुंगातून बाहेर येणाऱ्यांना काही शिष्ट म्हणू लागले, 'हे आंदोलन करून शेवटी तुम्ही काय मिळविले? हिंदुत्वनिष्ठांची निंदा करण्याकरिता काही लोक म्हणत, परदेशात तुम्ही भारताचे नाव काळे केले. वृत्तपत्रांनी काळा पडदा उभा केला. त्यामुळे मुंबई बाहेरच्या कित्येकांना ह्या लढ्याच्या तीव्रतेची जाणीव झाली नाही. एका फुकट श्रेयवादी कार्यकर्त्याने प्रयागच्या एका आर्य समाजी परिषदेत सांगितले, 'लढा आम्हीच लढविला. बाकी सारे लढ्याशी द्रोह करून निघून गेले!' वस्तुस्थिति अशी आहे की मुंबईच्या ४४ कार्यकर्त्यांची नावे आर्थररोड कारागृहात नमूद आहेत. प्रयागला वक्तव्य करणाऱ्याचे नाव अटक केलेल्या व्यक्तीत नव्हते!!

मंत्री देशनिष्ठ नाहीत असे कसे म्हणावे? पण पक्षस्वार्थाकरिता, स्वतःच्या खोट्या इभ्रतीकरिता आणि अल्पसंख्याकांची मनधरणी करण्याकरिता भारत सुरक्षा कायदा कसा वापरला गेला हे भावी काळातील विधिज्ञांनाही कळले पाहिजे. रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती मंडळी आणि स्वदेशातील सरकारी यंत्रणेत माणसेच आहेत. त्यांचेवर या आंदोलनाचा काहीच परिणाम झाला नाही असे नाही. कार्डिनल ग्रेशस आणि मंत्री म्हणत होते 'ही परिषद भरावी अशी पं. नेहरूंची इच्छा होती.' हे खरे असेल तर पं. नेहरूंचा राष्ट्रवाद हिणकस ठरेल. तशी नाही असे मानले तरी एका कार्यकर्त्याने ग्रेशस साहेबांना उत्तर दिले. 'पं. नेहरूंच्या इच्छेपेक्षा देशाचे हित मी अधिक श्रेष्ठ मानतो.' त्या वृत्तीचे अभिनंदन करावे लागेल.

परदेशांतून २५ हजार पाहुणे येणार अशी जाहिरात फडकली होती. हिंदुस्थानात उग्र विरोध आहे हे कळताच त्यांनी येण्याचा बेत रहित केला असावा. कारण परदेशचे पाहुणे फक्त चार हजारच आले. त्यातही सिलोनचे एक हजार होते. भारताच्या कोनाकोपऱ्यांतून ५ लाख इसाई येणार अशी जाहिरात झाली होती. त्याकरिता भव्य मंडप उभा केलेला होता. पण आले ते २० हजार लोकच. पहिल्या दिवशी पोपला पाहण्याकरिता थोडी गर्दी झाली. तेव्हा ७० हजार लोक होते असे म्हणतात. मुंबईस कॅथॉलिक लोकच अडीच लाखांवर आहेत. या लढ्यामुळे पोलिस अधिकारीही बावचळले होते.

दोन डिसेंबरला झोपडीत राहणाऱ्यांनी म्युनिसिपल कमिशनरच्या घराकडे मोर्चा नेला. पोलिसांना वाटले हा मोर्चा पोपला काळी निशाणे दाखविणार! त्यांनी मोर्चावर लाठीमार केला. चाळीस माणसे जखमी झाली. जखमींपैकी एकजण दिगंबर सावंत मरण पावला. पोलिसांनी त्याचे प्रेतच घरच्या माणसांना पोपची स्वारी परत जाईपर्यंत दिले नाही. (चार दिवस ही वार्ता वृत्तपत्रांनी छापलीच नाही.)

'गोव्यातील झेवियर शवदर्शनाला पाच लाख लोक येणार' अशी जाहिरात पादरी करीत होते. पण प्रत्यक्षात दोन लाखच आले. गोव्याबाहेरील कॅथॉलिक केवळ दहा हजारच आले. 'या बाहेरच्या कॅथॉलिक पाहुण्यांकरिता खास बराकी उभ्या करण्यात आल्या होत्या पण त्या रिकाम्या पडल्या होत्या. बस गाड्या रिकाम्या धावत होत्या. दुकानदारांनी आशेने दुकाने लावली होती, पण गिऱ्हाईकाचे अभावी त्यांनी लवकर गाशा गुंडाळला.' हे सारे त्या वेळच्या वर्तमानपत्रातूनच प्रसिद्ध झाले आहे. या परिषदेच्या निमित्ताने २५ हजार वनवासींना प्रकटपणाने ईसाई धर्माची दीक्षा दिली जाणार होती. पण तो कार्यक्रम रद्द करण्यात आला.

सारी सरकारी खाती विनामूल्य पोप महाराजांपुढे हात जोडून उभी राहणार होती. रेल्वेच्या सर्व प्रकारच्या सवलती त्या परिषदेला मिळणार होत्या. पोर्टट्रस्ट खाते तर विनामूल्य सेवा करणार होते. पण घाईघाईने त्यांनी पत्रके काढली की "आम्ही सेवा विनामूल्य देणार नाही." सरकारी छापखाना लाखो प्रचार पत्रके फुकट छापून देणार होता. ते घडले नाही. तरी या युकॅरिस्ट काँग्रेसचे वर्तमानपत्र सरकारी छापखान्यातच छापले जात होते ! गृहनिर्माण मंडळाने सहा हजार टन सिमेंट पाहुण्यांची निवासस्थाने बांधायला देण्याचे वचन दिले होते. तर मुंबईमधील नगरपालिका आपल्या शाळा आणि बसगाड्या विनामूल्य सेवेला हजर करणार होती. पण ते सर्व रद्द झाले. पोपला जाहीर मानपत्र नगरपालिका देणार होती. तोही कार्यक्रम रद्द करण्यात आला. जनतेचा जोर पाहून पोपने गरिबांना स्वहस्ते दान न वाटण्याचे मान्य केले. राष्ट्राची इभ्रत राखली गेली.

आंदोलनामुळेच परिषदेच्या मंडपाला तारेचे कुंपण घालावे लागले. लोकांना दिसले की प्रेमाचा मंत्र जपून ख्रिस्ताचा संदेश पोचविणारे हे पादरी देखील केवळ पैसा, राजाश्रय आणि पोलिस यांच्या बळावरच साऱ्या कारवाया करू शकले. राजाश्रय उद्या नष्ट झाला तर त्यांचे काय होणार हे स्पष्ट झाले. हिंदुमहासभेने हा लढा अत्यंत संयमाने, शिस्तीने आणि दृढतेने लढविला. प्रखर राष्ट्रवाद हीच त्यामागची प्रेरणा होती.

आंदोलनातील काही क्रमवार घटना

जून-जुलै १९६४ मध्ये या युकॅरिस्ट परिषदेला विरोध केला पाहिजे या विचारास प्रारंभ झाला. त्यासाठी हिंदुसभा कार्यकर्त्यांच्या काही अनौपचारिक बैठकी झाल्या.

दि १६।८।६४ ला 'हिंदु' साप्ताहिकात श्री. बाळाराव सावरकर यांचा अग्रलेख प्रसिद्ध झाला.

दि. १३।९।६४ ला गुंजोटी (जिल्हा धाराशिव) येथील हिंदुमहासभा परिषदेत युकॅरिस्ट परिषद विरोधी ठराव सम्मत झाला. त्या वेळी प्रमुख वक्ते धर्मवीर वि. रा. पाटील हे होते.

दि. १९।९।६४ ला मुंबईस श्री. प्रतापसिंग शूरजी यांचे घरी सर्वपक्षीय हिंदु नागरिकांची सभा झाली. या सभेत ना. कन्हय्यालाल मुनशी हजर होते. केवळ मुनशी यांचे मत 'पोपला विरोध करू नये ' असे होते.

दि. २७।९।६४ ला दुसरी सभा त्याच जागी झाली. नंतर अकोला, मुंबई, सोलापूर, खामगाव, पुणे, औरंगाबाद, नागपूर, तुमसर, वर्धा, सातारा इत्यादि गावी प्रकट सभा होऊन युकॅरिस्ट विरोधी आंदोलनाला हिंदुसभेचा पाठिंबा देण्यात आला.

दि. ५।१०।६४ ला स्वतंत्रपणे हिंदुसभेच्या नेतृत्वाखाली ही चळवळ चालविण्याची गरज आढळून आली. या विषयावर कार्यकर्त्यांची सभा घेऊन चळवळीचा वेग वाढवावा या विषयावर सर्व कार्यकर्त्यांचे एकमत झाले. कृतिसमिति नेमली गेली. त्या समितीमधील सदस्य १. धर्मवीर श्री. वि. रा. पाटील, २. श्री. विक्रम सावरकर, ३. श्री. पंडित बखले, ४. श्री. ल. र. साटेलकर, ५. श्री. अप्पा कासार, ६. श्री. एकनाथ खानोलकर, ७. श्री. पद्माकर ढमढेरे, ८. श्री. माधवराव पाठक, विधिज्ञ ९. श्री. हरि भास्कर भिडे हे होते.

दि. १५।१०।६४ ला हिंदुसभेच्या वतीने रस्तोरस्ती प्रचारसभांना प्रारंभ झाला

दि. १८।१०।६४ ला ब्राह्मणसेवा मंडळ, दादर या संस्थेच्या पटांगणात प्रकट सभा झाली. सभेत कम्युनिस्ट लेखक श्री. विनायक भावे आणि रा. स्व. संघाचे प्रसिद्ध कार्यकर्ते श्री. रामदास कळसकर यांचीही भाषणे झाली. त्यांनी पाठिंबा दिला.

दि. २१।१०।६४ ला प्रा. वि. घ. देशपांडे (त्या वेळचे हिंदुसभेचे कार्याध्यक्ष) यांचे पत्रक प्रसिद्ध झाले.

दि. २४।१०।६४ ला महाराष्ट्र प्रदेश हिंदुसभेची बैठक भरून तीत युकॅरिस्ट परिषदविरोधी ठराव पसार झाला.

दि. २५।१०।६४ ला गिरगाव चौपाटीवर मोठी सभा झाली. पं. व्रजेश आणि श्री. विक्रम सावरकर यांची भाषणे झाली. सभेत पाच सहस्र श्रोत्यांनी हात उंच करून काळे झेंडे दाखविण्याच्या घोषणेस मान्यता दिली.

दि. ३१।१०।६४ ला धर्मवीर वि. रा. पाटील (महाराष्ट्र प्रदेश हिंदुसभाध्यक्ष) यांना अटक झाली. त्यानंतर गावोगावी अटकेचा निषेध करण्यात आला.

संकेश्वर पीठाचे स्वामी श्रीकल्याण सेवक महाराज यांचे पत्रक निघाले. त्यांनी हिंदुसभेला पाठिंबा दिला. पण याच वेळी शृंगेरीमठाचे शंकराचार्य दिल्लीत होते, त्यांनी सांगितले. 'पोपचे स्वागत करावे !'

दि. १८।११।६४ ला नागपूर येथे महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशनावर श्री. विक्रम सावरकर यांचा जनता मोर्चा निघाला. त्यांना अटक झाली. दिल्लीस प्रा. रामसिंग, श्री. प्रकाशवीर शास्त्री (संसद सदस्य) आणि शेठ बिशनचंद हिंदुसभा उपाध्यक्ष यांनी पोपला विरोध करा ही घोषणा दिली.

दि. २५।११।६४ ला कृतिसमितीच्या नेत्यांना अटक.

दि. २७।११।६४ ला मुंबईतील हिंदुसभा कार्यकर्त्यांना अटक आणि स्थानबद्धता. पोप महाशयांना तुरुंगातून श्री. बाळाराव सावरकर यांचे अनावृत पत्र. विषय 'आम्हांला लढा कां करावा लागला.' पोपच्या आगमनप्रसंगी दोन हिंदुसभा स्वयंसेवकांनी गिरगाव चौपाटीजवळ विल्सन कॉलेजच्या समोर पोपला काळी निशाणे दाखविली आणि घोषणा केल्या.

दि. ६।१२।६४ ला कार्यकर्त्यांची सुटका. आंदोलन समाप्त. आंदोलनाचे मुख्य क्षेत्र मुंबई होते. मुंबई येथे अटक झालेल्या प्रमुख हिंदुसभा कार्यकर्त्यांची नावे :

१. श्री माधवराव पाठक, विधिज्ञ २. श्री. एकनाथ खानोलकर, ३. श्री. पंडित बखले, नगरसेवक, ४. श्री. साटेलकर, ५. श्री. अप्पाराव कासार, ६. अधिवक्ते श्री. मगनलाल व्यास, अध्यक्ष गुजराथ प्रदेश हिंदुसभा. ७. श्री. वसंतराव गोळवलकर (कर्णावती), ८. श्री. बाळाराव सावरकर, ९. श्री. ना. मो. दातार, १०. श्री. वि. श्री. साठे, ११. श्री. बाळाराव जेरे, १२. श्री. ल. ग. थत्ते, १३. श्री. गो. र. प्रधान अध्यक्ष, परळ हिंदुसभा. १४. श्री. अ. स. भिडेगुरुजी, १५. श्री. नृसिंह जोशी (ग्वाल्हेर), १६. श्री. रामकुमार वर्मा, १७. श्री. भय्यालाल सिरोलिया एम. एल. ए. भोपाळ; १८. श्री वामनराव चव्हाण, १९. श्री. वि. ग. देसाई, २०. श्री. पद्माकर ढमढेरे, २१. श्री. ना. पां. साने, २२. श्री आबाराव गर्दे, २३. श्री. भार्गव जोशी, २४. श्री. अनंतराव कोल्हापूरे, २५. श्री. विरुमल सिंधी, २६. श्री. नरेंद्र भट्ट, २७. श्री. खेडकर गुरुजी, २८. श्री. तांबट, २९. श्री. चितळे अधिवक्ता ३०. श्री. बाबूराव मैराळ, नागपूर, ३१. श्री. बिंदुमाधव पुराणिक, नागपूर.

यांशिवाय या लढ्यात ज्यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य व साहाय्य झाले त्यांत श्री. माधवराव चुरी, पोतदार, गंगाधर जोशी, धर्मराव देशमुख, बांगड, मराठे, पु. व. तांबे, मधुकर काटणी, गो. रा. कवे, बापूराव घारपुरे, सौ. मंदाकिनी घमंडे, सौ. सुधा आफळे, सौ. निर्मला जोगळेकर, श्रीमती कृष्णाताई दिवेकर, श्रीमती सरोज तेलंग, यांचा प्रामुख्याने समावेश केला पाहिजे.

*

(१७)

प्रासंगिक विधायक कामे

देशात निर्माण होणाऱ्या महत्त्वाच्या घटनांची व प्रसंगांची दखल हिंदुसभा सतत घेत आली आहे. या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर काळातही जे निरनिराळे प्रश्न निर्माण झाले त्यांची हिंदुसभेने दखल घेतली आहे. गांधीवधाच्या खटल्यात सरकारने सावरकरांना गोविले तेव्हा त्यांचा खटला लढविण्यासाठी श्री. अण्णासाहेब भोपटकर हे पुढे झाले व त्यांनी सहा महिने दिल्लीस राहून हा खटला यशस्वी रीतीने लढविला. त्यात सावरकर पूर्णपणे निर्दोष ठरून सुटले. या खटल्याच्या खर्चासाठी श्री. ग. वि. केतकर व रामभाऊ मंडलीक यांनी मोठ्या प्रमाणावर निधि गोळा केला होता. ही त्यांची कामगिरीही फार महत्त्वाची ठरली. रामभाऊ मंडलीक हे मुंबई विधान परिषदेत हिंदुसभेच्या वतीने निवडून आलेले प्रतिनिधि होते. त्यांनी जनतेवर झालेल्या अन्यायांना वाचा फोडण्याचे कार्य सातत्याने चालविले होते. त्यात हिंदु मुसलमान किंवा अन्य असा कसलाही भेद त्यांनी कधीही केला नाही. त्यामुळे अनेक मुसलमानही त्यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त करीत. रामभाऊंना अन्यायाची चीड असे व अन्यायाची प्रकरणे धसास लावण्याचा त्यांचा स्वभाव असे. साताराचे जलमंदिर प्रकरण त्यांनी असेच धसास लावण्याचा प्रयत्न केला. ते प्रकरण असे :

जलमन्दिर प्रकरण

सातारा येथे दि. २३।७।५२ दिवशी जलमन्दिर प्रकरण म्हणून प्रसिद्ध असलेले प्रकरण निर्माण झाले. सातारा येथे छत्रपतींचे भवानी देवीचे एक मंदिर आहे. त्यास जलमंदिर म्हणतात. तेथील सुवर्णाची देवी व दागिने व चांदीची उपकरणी दि. २३।७।५२ ला चोरीस गेली. ती कोणी चोरली याचा पोलिसांना अखेरपयत नीट तपास लागला नाही. या चोरीच्या संशयावरून पोलिसांनी श्री. शं. न. आपटे, नी. श्री. भावे, पु. दा. कुलकर्णी, व का. कृ. जोशी या चौघा ब्राह्मणांना व आबा व सोपाना अडसूळ, ज. मा. गाडे, व काशीनाथ सालवे या चौघा महारांना अटक केली व त्यांचा कबुली जबाब मिळविण्यासाठी भयंकर स्वरूपाची मारहाण केली. आरोपीत मुख्यतः ब्राह्मण असल्याने या प्रकरणाला गावात चटकन ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचा रंग भरला व पोलिसांच्या मारहाणीमुळे गावभर विलक्षण दहशत निर्माण झाली. आपटे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे असल्याने या प्रकरणाला आणखीच जातीय स्वरूप देण्यात येऊ लागले, व गांधी वधोत्तर झालेल्या अत्या-

चारांची पुनरावृत्ति होते कीं काय अशीही साताऱ्यात भीति निर्माण झाली. पोलिस प्रमुख लुईस याने आपटे यांना बेदम मारल्यामुळे त्यांना अखेर हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले. या संबंधात ' काळ ' वर्तमान पत्राकडे सातारा येथील भयंकर मारहाणीचे व दहशतीबद्दलचे पत्र आल्यावरून दाते यांनी स्वतःच सातारला जाऊन या प्रकरणाची चौकशी केली व संबंधित व्यक्तींना व या प्रकरणाची थोडीफार माहिती असलेल्या मंडळींना भेटून सर्व वृत्त काळमधून प्रसिद्ध केले. ते वाचून महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष रामभाऊ मंडलीक हे पुण्यास आले व त्यांनीही सातारला जाऊन स्वतः सर्वांना भेटून चौकशी करून संबंधित प्रकाराचे वृत्त प्रसिद्ध केले. पोलिसांनी आपटे, भावे इत्यादिकांवर खटले भरले; तेव्हा आरोपी करण्यात आलेली ही सर्व मंडळी पूर्णपणे निरपराधी असून पोलिसांनी दाखल केलेला पुरावा बनावट व अविश्वसनीय ठरला व न्यायालयाने सर्वांची निर्दोष म्हणून सुटका केली. पोलिसांनी केलेल्या मारहाणीसंबंधाने न्यायाधीशांनी आपल्या निकालपत्रात म्हटले की, " मारहाणीची निवेदने वाचून अंगावर रोमांच उभे राहतील. " पुराव्याविषयी त्यांनी म्हटले की, " कोर्टापुढील पुरावा आरोपींचा गुन्ह्याशी संबंध जोडू शकत नाही. "

पोलिसांनी त्यावर जिल्हा न्यायाधीशांकडेही अपील केले पण तेथेही आधीच्याच निर्णयावर शिक्का मोर्तब झाले. त्यानंतर पोलिसांनी आणखी काही लोकांवर वहीम घेऊन खटला भरला, पण त्यातही ते फजीत पावले.

या प्रकरणी रामभाऊ मंडलिकांनी, तेव्हा ते मुंबई विधान परिषदेचे सभासद असल्याने, त्या वेळचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांना पत्रव्यवहाराने सर्व वस्तुस्थिति कळवून नीट चौकशी करण्याची विनंती केली. सातारा येथील ॲ. डि. मॅजिस्ट्रेटने या प्रकरणी चौकशी करून आपले जे निवेदन प्रसिद्धीस दिले, त्यातील कित्येक विधाने वस्तुस्थितीशी इतकी विसंगत होती की त्यांनी खरोखर चौकशी तरी नीट केली कीं नाही यावर लोकांचा विश्वास बसेना ! पुढे लुईस या पोलिस प्रमुखावर अन्यायाने मारहाण केल्याच्या आरोपावरून न्यायालयात दावा दाखल करण्याचे मंडलिकांनी ठरविले. अशा रीतीने सरकारी अधिकाऱ्याविरुद्ध न्यायालयात फिर्याद दाखल करण्यास सरकारची आधी परवानगी लागते. पण मोरारजी देसाई यांनी अशी परवानगी देण्याऐवजी पोलिस अधिकाऱ्यांना पाठीशी घातले. त्यामुळे फिर्याद दाखल करता आली नाही. रामभाऊंनी स्वतः केलेल्या चौकशीचा वृत्तान्त दि. ५।१०।५२ ला काळ व केसरीमधून प्रसिद्ध केल्याने त्यांजवर न्यायासनाच्या बदनामीची सरकारने फिर्याद दाखल केली. तीत रामभाऊंना दंडाची शिक्षा झाली. न्या. छगला यांनी आपल्या निकालपत्रात म्हटले की " जेथे फौजदारी कोर्टापुढे प्रकरण चालू आहे किंवा आरोपीस अटक होऊन फौजदारी कोर्टापुढे खटला सुरू व्हायचा आहे तेथे करण्याजोग्या गोष्टींना जी कायद्याची मर्यादा असते तिचे मंडलिकांनी सार्वजनिक सेवेच्या तळमळीमुळे उल्लंघन केले. तसेच खुद्द सरकारनेही

असे कृत्य केले की त्यामुळे त्याच प्रतिबंध केलेल्या कक्षेत सरकारचेही पाऊल पडले असे आम्हांस वाटते." (मॅजिस्ट्रेट दशरथ यांचा चौकशी वृत्तान्तही खटला निकालात निघण्यापूर्वीच प्रसिद्ध झाला होता त्यास उद्देशून हे विधान आहे.)

काशी विश्वेश्वर आंदोलन

काशी विश्वेश्वर मंदिराच्या काही भागात सध्या मशीद आहे. पूर्वी तेथे प्रत्यक्ष मंदिर होते. औरंगजेबाच्या काळात १६६९ मध्ये ते पाडून तेथे मशीद बनविण्यात आली. त्याच्या शेजारी जुना मंडप कायम आहे. तथापि त्यावर फरसबंदी करून मशिदीचे अंगण वाढविण्यात आले. तथापि तळमजल्याला जुना मंडप कायम आहे. त्यावरही मुसलमान आपला हक्क सांगू लागले होते. त्या संबंधात अलाहाबाद हायकोर्टात दावा चालून तळघरातील सभामंडप हिंदूंचा आहे, त्यावर मुसलमानांचा काही हक्क नाही असा १९४२ मध्ये निर्णय लागला. त्यात असे म्हटले होते की १८०९ पासून १९३६ पर्यंतच्या काळात त्या जागेशी मुसलमानांचा कधीही संबंध नव्हता हे मान्य करण्यात आले आहे.

१९५९ या वर्षी वाराणशी येथे हिंदुमहासभेचे ३३ वे वार्षिक अधिवेशन प्रा. रामसिंग यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या वेळी काशी विश्वेश्वराच्या मंदिराच्या आवारात सध्या जेथे मशीद आहे तो भाग परत मंदिरास मिळावा यासाठी प्रयत्न करण्याचे ठरले. तेव्हा त्या भागात प्रवेश करून यज्ञ करण्याची योजना आखण्यात आली. त्याबरोबर सरकारने त्या भागास १४४ कलम लागू करून हिंदूंना प्रवेश करण्यास बंदी केली. त्यातून सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. या चळवळीत उत्तर हिंदुस्थानातील हिंदुसभावादी मंडळींच्या बरोबर महाराष्ट्रानेही भाग घेतला त्यासाठी महाराष्ट्रातून सुमारे दोनशांवर सत्याग्रही या चळवळीत दाखल झाले. ज्ञानवापीच्या भागातून हिंदु लोक मशिदीच्या भागात जाऊ लागले व तो भाग परत मिळविण्याचा प्रयत्न करू लागले. ते मूळचे शिवमंदिर होते व ते परत शिवमंदिर झाले पाहिजे असा हिंदूंचा आग्रह होता. त्यानिमित्त हिंदु समाजाकडून प्रयत्न सुरू होताच सरकारने १४४ कलमाखाली तेथेही प्रवेश करण्यासच बंदी केली. तेव्हा हिंदुमहासभेने सत्याग्रहाचे आंदोलन सुरू केले. त्यात हिंदुस्थानातील इतर ठिकाणांप्रमाणे महाराष्ट्रातूनही अनेक सत्याग्रही गेले. त्यांना तुरुंगाच्या शिक्षा झाल्या. अखेर त्यातून विशेष काही निष्पन्न न होता आंदोलन स्थगित करावे लागले. अजूनही मशिदीच्या भागात सरकारने पोलिस पहारा कायम ठेविला आहे.

वाद्ये वाजवीत जाण्याचा हक्क

सार्वजनिक रस्त्यावरून नमाजाचे वेळी मशिदीवरून हिंदूंच्या मिरवणुकी वाजत गाजत जात असताना मुसलमानांचे वतीने पोलीस लोक (सरकार) वाद्ये बंद करण्यास हिंदूंना सांगत. या तक्रारीबाबत कायमचा निकाल लावून घेण्यासाठी

हिंदूंच्या वतीने मुंबई सरकारवर दिवाणी दावा लावण्यात आला होता. त्याचा निकाल सोलापूरचे सिव्हिल जज्ज श्री. बशिरुद्दीन अहंमद यांनी (दावा क्र. ८९। १९५४) दि. ६ जुलै १९५५ ला दिला. त्यांनी आपल्या निर्णयात स्पष्टपणे म्हटले की, "वादींना वैयक्तिक रीत्या, व हिंदु समाजाचे घटक या नात्याने, त्यांच्या धार्मिक व सामाजिक मिरवणुकी सार्वजनिक रस्त्याने कोणत्याही वेळी व मशिदीं-सह कोणत्याही स्थानकावरून अगर जवळून सवाद्य नेण्याचा पूर्ण हक्क आहे, असे घोषित करण्यात येत आहे.

"प्रतिवादी सरकारने स्वत: अगर त्याचे हाताखालील अधिकारी यांनी वर उल्लेखिलेल्या जाहीर केलेल्या हक्कास बाध येईल असे कोणतेही हुकूम काढू नयेत अशी कायमची ताकीद प्रतिवादी सरकार यास देण्यात येत आहे."

मालेगावचा दंगा

१९६३ वर्षी दि. २ सप्टेंबरला अनंत चतुर्दशीच्या दिवशी मालेगाव येथे मोठा दंगा झाला. त्याची वार्ता मिळताच त्या वेळचे महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. वि. रा. पाटील यांनी मालेगावला जाऊन हिंदु लोकांना धीर दिला व एकंदर परिस्थितीची पाहणी केली. अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपति विसर्जनाची मिरवणूक निघाली असता मशिदीवरून वाद्ये वाजवीत जाण्यास मुसलमानांनी विरोध करून हिंदूंच्या मिरवणुकीवर अचानक हल्ला केला. त्याचे पर्यवसान पुढे पोलिसांनी गोळीबार करण्यात व काही लोक ठार व जखमी होण्यात झाले. दि. ७ सप्टेंबरला महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेची सभा पुण्यास झाली. त्या सभेत मालेगाव येथील अत्याचारांची चौकशी करण्याकरिता सभेचे अध्यक्ष श्री. वि. रा. पाटील, नगरचे श्री. गोपाळराव गायकैवारी व विधान परिषदेचे सदस्य व विरोधी पक्षाचे नेते श्री. वा. ब. गोगटे यांची एक चौकशी समिति नेमण्यात आली. तिने मालेगावला जाऊन सर्व परिस्थितीची पाहणी करून व माहिती मिळवून आपला वृत्तान्त महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेस दि. ८ ऑक्टोबर १९६३ ला सादर केला. तो त्या वेळी प्रसिद्ध झाला आहे. चौकशी समितीने आपल्या निवेदनात मालेगाव शहराची पार्श्वभूमि नमूद करताना असे म्हटले आहे की, "येथील एकूण वस्ती सुमारे १.२१ लक्ष असून त्यांपैकी ८० हजार मुसलमान वस्ती आहे. स्वातंत्र्योत्तर काळात व निजामी राज्य विलीन झाल्यानंतर अनेक रझाकार व इतर मुसलमान येथे राहावयास आले. त्यामुळे तेथे आधीच मुसलमानी वस्ती मोठी होती तीत अधिकच भर पडली. यंत्रमागांच्यामुळे हा गाव औद्योगिक दृष्टचाही पुढारलेला असून येथील नगर-पालिकेत मुसलमानांचेच वर्चस्व आहे."

पूर्वीचा इतिहास नमूद करताना समितीने म्हटले आहे की, "सुमारे पन्नास वर्षांपूर्वीही मालेगाव शहरातून बालाजीची मिरवणूक जात असता पाच कंदिला-

जवळ ती आली तेव्हा मुसलमानांनी तीवर लाठीहल्ला केला व बालाजीची मूर्ति आडात फेकून दिली. खिलाफत चळवळीत हा गाव आघाडीवर होता, व १९२१ साली दंगल करून त्यांनी एक पोलीस इन्स्पेक्टर व चार पोलिस शिपाई ठार मारले होते, व हिंदूंना मारहाण करून त्यांची दुकाने लुटली होती."

समितीने असेही नमूद केले आहे की, "येथे मुसलमानांच्या बऱ्याच मशिदी असून त्यांपैकी बऱ्याचशा म्युनिसिपालिटीच्या परवानगीशिवाय बांधलेल्या आहेत. त्यांच्या काही मशिदी हिंदूंच्या ऐन वस्तीत असून हिंदु वस्तीच्या सभोवताली मुसलमान वस्ती चोहोकडे घेरून असल्याने हिंदु वस्तीची एक प्रकारे कोंडी झालेली आहे. हिंदु वस्तीच्या या रचनेमुळे येथे हिंदु-मुसलमान वादाचे प्रकरण वारंवार उद्‌भवते. वाद्यबंदी व गोवध ही या दंग्यांना वारंवार कारणीभूत झाली आहेत. १९४७ वर्षी येथील मुसलमानांनी सार्वजनिक रस्त्यावर उघडपणे गोवध करविण्याचे ठरविले. तेव्हा त्याविरुद्ध हिंदूंनी तक्रार केली. त्या वेळचे डि. मॅजिस्ट्रेट यांनी मुसलमानांना तसे न करण्याबद्दल ताकीद दिली होती. १९५२ वर्षी कै. प्रेमचंद गुलाबचंद या स्थानिक हिंदूची प्रेतयात्रा सवाद्य जात असता मुसलमानांनी अडवली. दोन वर्षांपूर्वी बालाजीचा रथ आरतीसाठी मशिदीच्या मागील रस्त्यावरून वाद्याशिवाय नुसताच जात असताही मुसलमानांनी आरतीचे तबक रस्त्यात फेकून दिले. तसेच पोळ्याच्या सणाच्या दिवशी बैलांची मिरवणूक मशिदीवरून जात असता त्यांच्या गळ्यातील घुंगरू वाजले या निमित्ताने मुसलमानांनी बैलांची मिरवणूक अडविली व हिंदूंना धक्काबुक्की केली."

गणेशचतुर्थीस गणपतीच्या मूर्ती मिरवणुकीने आणण्याची येथे पूर्वापार पद्धति आहे. असे असता १९५३ च्या गणेश चतुर्थीस दुपारी गणपति मूर्ती मिरवणुकीने येत असता त्या वेळी मुसलमानांनी मशिदीच्या ऐवजी त्या रस्त्यावर बसून नमाज पढण्यास सुरूवात केली. केवळ कुरापत काढण्याचा हा प्रकार होता. त्यात हिंदूंना थोडी धक्काबुक्की करण्यात आली, पण पोलिस वेळीच उपस्थित झाल्याने अधिक प्रसंग टळला. पोलिसही सावध होते व त्यांनी गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशीच हिंदु व मुसलमान समाजांच्या पुढाऱ्यांना बोलावून त्यांच्याबरोबर विचार विनिमय केला व गणेशोत्सवात शांतता राखण्याचे त्यांनी आश्वासनही दिले. तरी पण मुसलमानांनी गणपती मिरवणुकीने येत असता कुरापत काढलीच.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी दुपारी तीनच्या सुमारास गणपति-मिरवणूक जुम्मा मशिदीसमोरून जात असता मुसलमानांनी वाद्यबंदीचा आग्रह धरला व मशिदीतून मिरवणुकीवर दगडविटांचा वर्षाव सुरू केला. सोडावॉटरच्या बाटल्याही मिरवणुकीवर फेकण्यात आल्या. त्यामुळे बरेच लोक जखमी झाले. हिंदूंनीही आलेले दगड परत मशिदीच्या रोखाने फेकण्यास सुरवात केली. या वेळी सरदार

टॉकीजजवळ मुसलमान समाज मोठ्या प्रमाणावर जमला व अल्ला हो अकबर, काफीरको मारो अशा गर्जना करीत त्यांनी मिरवणुकीवर हल्ला केला. पोलीस व इतर सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांस दटावले असताही ते ऐकेनात. त्यांनी पोलिसांवरही दगडफेक सुरू केली. प्रकरण आटोक्याबाहेर चाललेले पाहून डि. मॅजिस्ट्रेटने १४४ कलम पुकारले व लोकांना निघून जाण्यास सांगितले. पण मुसलमान समाजाने दगडविटांचा वर्षाव अधिकच जोराने सुरू केला. तेव्हा पोलिसांनी गोळीबार केला. त्यात ६ इसम ठार व २० जखमी झाले.

समितीने आपल्या वृत्तान्तात असे म्हटले आहे की, (१) हा दंगा पूर्व-नियोजित होता. (२) हिंदूंची कुरापत मुसलमानांनी काढली ती योजनापूर्वक होती. (३) अनंत चतुर्दशीस मुसलमानांनी आपले कारखाने अचानकपणे बंद ठेवले. तशी आधी कोणाला सूचना नव्हती. (४) हिंदु वस्तीत जेथे मुसलमान कुटुंबे राहात होती त्यांना सुरक्षिततेकरिता अन्यत्र हलविण्यात आले होते. (५) मशिदीवरून हिंदूंची सवाद्य मिरवणूक नेण्यास आपला विरोध नाही असे अधि-काऱ्यांना अखेरपर्यंत सांगून त्यांना असावध ठेवण्याचे धोरण स्वीकारण्यात आलेले दिसले. (६) मशिदीतून दगडविटांचा साठा करून ठेवण्यात आलेला होता.

समितीने असेही नमूद केले आहे की, काही मुसलमान नेत्यांनी आमच्या-जवळ असे सांगितले की, मशिदीवरून वाद्ये वाजवीत मिरवणुका नेण्यास आमची वास्तविक काहीच हरकत नाही. पण या बाबतीत सरकारच दोषी आहे. अशा मिरवणुकांच्या प्रसंगी ते दोन्ही जमातींच्या लोकांना बोलावून शांततेच्या नावा-खाली काही तरी तडजोड करण्यास सांगते, व त्यामुळे मुसलमानांतील आग्रही लोकांना ताणून धरण्यास निमित्त मिळते. एवढेच नव्हे तर इंग्रजी राजवटीच्या काळातील परंपरेनुसार मिरवणूक परवान्यात काही अटी घालते. त्यात मशिदी-वरून वाद्ये वाजवू नयेत किंवा नमाज पढण्याच्या वेळात वाद्ये वाजवू नयेत अशा प्रकारच्या छापील अटी सध्याच्याही परवान्यांवर छापलेल्या असतात. कोर्टाचे निवाडे वेगळे असताही या अटींच्या पाठीवर मिरवणुकांना परवानगी देण्यात येत असल्याने मुसलमानांतील कडव्या मंडळींचा इतरांवर घुस्सा होतो व सरकार अटी घालीत असता तुम्ही नको कां म्हणता असा ते आम्हांसच उलट जबाब विचारतात. यावरून खरा प्रश्न मुसलमानांच्या हटवादापेक्षा त्यांच्यातील कडव्या लोकांच्या आग्रहाला खाद्य पुरविण्याच्या सरकारी धोरणाचा आहे असे दिसते.

मालेगावच्या या दंगलीत दगडफेकीमुळे जखमी झालेल्यांत ४४ हिंदु व १२ मुसलमान होते.

असाच दंगलीचा प्रकार १९६७ व १९७० वर्षीही झाला. १९६७ वर्षी सोलापूर येथे अनंत चतुर्दशीच्या दिवशी पोलिसांच्या पूर्ण परवानगीने व त्यांच्या

बंदोबस्ताखाली गणेशमूर्तीची मिरवणूक जात होती. मिरवणूक संपत येत असता मशिदीतून मुसलमानांनी दगडांचा मारा केला. त्याचा वर्मी मार एका पोलिस शिपायास लागून तो मृत झाला. मिरवणूक बरीच पुढे गेलेली होती. तथापि या अत्याचाराने दंगल उसळली व काही ठिकाणी मोडतोडीचे प्रकार झाले. पोलिस मिरवणुकीबरोबर होते. त्यांनी तिला आवर घातला व दंगलखोरांवर खटले भरून त्यांस शिक्षा ठोठावल्या.

सोलापूरच्या दंगलीची प्रतिक्रिया अहमदनगर येथे झाली. तेथे काही दर्गे उद्ध्वस्त करण्यात आले व मशिदींची जाळपोळ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तेथे एका मशिदीजवळ मार्कंडेयाचे मंदिर आहे. त्या मंदिरात कोणी दोन इसम दर्शनासाठी म्हणून गेले व जवळपास कोणी नाही असे पाहून त्यांनी बरोबर लपवून आणलेल्या हत्याराच्या साहाय्याने मार्कंडेयाच्या मूर्तीवर आघात करून ती विच्छिन्न केली. हा प्रकार कोणी केला हे पोलिस कधीच उघडकीस आणू शकले नाहीत. पण त्यांनी नगर येथील हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांवरच मूर्तिभंजनाचा आळ घेतला व त्यांना अटकेत ठेवले. हिंदुसभेचे कार्यकर्ते हिंदु देवतांच्या मूर्ति फोडतील हा विचारही स्वीकार्य मानण्याचे धाष्टर्य पोलिस अधिकाऱ्यांनी दाखविले याचे सर्वांसच आश्चर्य वाटले. पण सत्तेपुढे शहाणपणाला वाव नव्हता. काही दिवस चौकशीसाठी पोलिस कस्टडीत त्यांना ठेवून घेतल्यानंतर पुन्हा मुदतवाढ मागण्यात आली. तेव्हा मॅजिस्ट्रेटने त्यांस स्वतःच्या कस्टडीत ठेवून घेतले. पुढे पोलिसांनी त्यांजवर खटलाही भरला. पण पुरावाच नव्हताच. त्यामुळे न्यायाधीशांनी सर्वांची निर्दोष सुटका केली.

अहमदनगर येथील घटनेच्या पाठोपाठ मालेगावला दंगल झाली. तेथे एका मुसलमानाने एका हिंदूच्या घरातील गाय चोरून आणून ती आपल्या घरात कापली. त्यामुळे हरताळ, काही दंगल इत्यादि प्रकार झाले. पोलिसांनी हिंदूंवरही खटले भरले. तथापि जिल्हा न्यायसत्रात सर्व हिंदु निर्दोषी ठरून सुटले. मालेगाव हे महाराष्ट्राच्या पोटातील पाकिस्तान आहे असे कित्येक मुसलमान अभिमानाने बोलत असतात.

पण तेच तेवढे मुसलमानी दंगलीचे केन्द्र आहे असे नाही. भिवंडी तसेच आहे मालेगावप्रमाणेच भिवंडी येथेही मुसलमान वस्ती बहुसंख्य आहे व त्यांचाही विणकरीचा व्यवसाय आहे. भिवंडी येथे १९७० वर्षी शिवजयंतीनिमित्त मोठी मिरवणूक आयोजित करण्यात आली होती. तिला पोलिसांचा परवानाही होता. मिरवणूक मशिदीवरून वाजत जाण्यास मुसलमानांची हरकत नाही असे त्यांच्या पुढाऱ्यांनी पोलिसांना सांगितले होते, त्यामुळे त्यांच्या आश्वासनावर पोलीस विसंबले; पण त्यात ते चकले. मुसलमानांनी दंगल करण्याचा कट केला, व मिरवणूक मशिदीजवळ

येताच मिरवणुकीवर दगडविटांचा मारा करून मिरवणूक उधळली. मिरवणूक उधळली जाताच दंगल उसळली. पण मुसलमान सावध होते. हिंदुवस्तीतील मुसलमानी बिऱ्हाडे आधीच घरे बंद करून निघून गेलेली होती. हिंदूंच्या घरांना मुसलमानांनी आगी लावल्या. प्रकरण चिघळले व भिवंडीच्या परिसरातील मुसलमानांना पळता भुई थोडी झाली. त्याची काही प्रतिक्रिया महाड व जळगाव येथेही झाली.

या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याकरिता सरकारने न्यायमूर्ति मदन यांचे एकसदस्य मंडळ नेमले. त्यांनी दोन वर्षे चौकशी केली. त्या वेळी हिंदुसभेचे माजी अध्यक्ष व मुंबई उच्च न्यायालयातील नामांकित वकील माधवराव पाठक हे नियमाने उपस्थित राहात व हिंदूंच्या बाजूचा साक्षीपुरावा नीट मांडला जाण्यास मदत करीत. चौकशीचे काम झाल्यावर नंतर मदन यांनी आपला वृत्तान्त तयार करण्यात दोन वर्षे घालविली. त्यांचा सुमारे चार हजार पानांचा वृत्तान्त सहा भागात प्रसिद्ध झाला आहे. त्यांनी एवढे समुद्रमंथन करून अमृत काढलेच नाही. विष मात्र काढले. त्यांच्या शिफारशी अशा आहेत की हिंदूंनी मशिदीपुढे वाद्ये वाजवू नयेत, गुलाल उधळू नये, घोषणा करू नयेत इत्यादि. शिफारशी करण्यास मदन यांची आवश्यकता नव्हती. मुसलमान गुंड पूर्वीपासूनच त्या करीत आले आहेत. सार्वजनिक रस्त्यांवरून आपल्या मिरवणुकी सवाद्य नेण्याचा जनतेचा हक्क आहे हे मॅजिस्ट्रेट कोर्टापासून तर सर्वोच्च न्यायासनापर्यंत, एवढेच नव्हे तर पूर्वीच्या काळात ब्रिटिशांच्या प्रिव्ही कौन्सिलपर्यंत सर्वांनी एकमुखाने मान्य केले असता हे दीड शहाणे त्यावर बोळा फिरविण्यास तयार झाले ! त्यांच्या मंडळाचे कार्य म्हणजे शासनाला लक्षावधि रुपयांचा भुर्दंड मात्र ठरला. पण या बाबतीत मदन इतकेच सरकारही दोषी आहे. त्यांनीही गुन्हेगारांवर खटले भरण्यास प्रथम पोलिसांना प्रवृत्त केले व त्यांनी साक्षीपुराव्यासह खटले दाखल केले असताही व काही पुरावा न्यायासनापुढे नोंदला गेला असताही मुसलमानांनी कट करून दंगा घडवून आणला हा आरोप सरकारने काढून घेतला व गुन्हेगारांना पाठीशी घातले ! सारांश मुस्लिम अनुनय व हिंदूंवर अन्याय करण्याची प्रवृत्ति हा या राज्याचा जणू स्थायीभावच झाला आहे !

समग्र सावरकर वाङ्मय

स्वा. सावरकर यांचा मृत्युंजय दिन महाराष्ट्र हिंदुसभेने १९५९ वर्षी साजरा केला. सावरकरांना १९०९ वर्षी दोन जन्मठेपींची शिक्षा झाली होती. जन्मठेप याचा अर्थ 'मरणान्त' कारावास. त्यांना दोन जन्मठेपींच्या शिक्षा झाल्या व त्याही एकामागून दुसरी भोगावयाची असा निर्णय करण्यात आला होता. सावरकरांना या शिक्षेची वार्ता जेव्हा तुरुंगात अधिकाऱ्याने सांगितली, तेव्हा त्या वीर पुरुषाने उद्-

गार काढले की, तर मग ख्रिश्चन धर्माचे अभिमानी ब्रिटिश शासनकर्ते पुनर्जन्माचे हिंदूंचे तत्त्वज्ञान मानू लागले असे समजावयास हवे ! तुरुंगाच्या अधिकाऱ्याला सावरकरांच्या म्हणण्याचा अर्थ चटकन लक्षात आला नाही. तेव्हा तो स्पष्ट करताना सावरकर म्हणाले, असे पहा की जन्मठेप म्हणजे मरेपर्यन्त तुरुंगवास ना ? तेव्हा पुनर्जन्माशिवाय दुसरी जन्मठेप भोगण्यास मी असणार कसा ! ज्या अर्थी मी एकामागून दुसरी जन्मठेप भोगावी असे ब्रिटिश सरकारला वाटते त्या अर्थी ती दुसरी जन्मठेप भोगण्यासाठी म्हणून तरी त्यांनी माणसाला दुसरा जन्म असतो हे मान्य केले हेच सिद्ध होते ! या बेडर वृत्तीच्या माणसाला अंदमान तुरुंगात नेण्यात आले तेव्हा तेथील तुरुंगाधिकारी बारी बाबाने २५ वर्षांचा जन्मठेपेचा काळ त्या वेळी प्रचलितपणे गृहीत धरला जात होता त्यास अनुसरून दोन जन्मठेपींच्या कैदेच्या काळाचा १९०९–१९५९ असा बिल्ला त्यांच्या गळ्यात अडकविला व आता तुम्ही येथून प्रेतरूपानेच बाहेर पडावयाचे असे वर उद्‌गार काढले. तेव्हाही सावरकरांनी ताडकन उत्तर दिले की पण तोपर्यंत ब्रिटिश राज्य येथे राहणार आहे का ? तात्पर्य, सावरकरांच्या निर्भय वृत्तीचा प्रत्यय जागोजाग येत असे.

अंदमानातून त्यांची १९२१ ला सुटका झाली व त्यांस येरवडा व रत्नागिरी येथील तुरुंगात ठेवण्यात आले. १९२४ वर्षी त्यांना तुरुंगातून मुक्त करण्यात आले व रत्नागिरी जिल्ह्यात स्थानबद्ध करण्यात आले. १९३७ वर्षी जमनादास मेहता यांच्या प्रयत्नाने त्यांची सुटका झाली. त्यानंतर आणखी २२ वर्षे लोटली. तेव्हा सरकारी रूढ संकेतानुसारही दोन जन्मठेपींचा पन्नास वर्षांचा काळ संपला व ब्रिटिश राज्यही त्याच्या आधीच संपले व त्या सर्वांस सावरकर पुरून उरले याचा आनंद व्यक्त करण्याकरिता हिंदुसभेने त्यांचा मृत्युंजय दिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला व त्यांना एक निधिही अर्पण केला. शिवाय स्वतंत्र काही निधिही त्या निमित्ताने जमविला. पुढे या रकमेचा उपयोग स्वा. सावरकरांचे समग्र वाङमय प्रसिद्ध करण्यासाठी करावा या विचाराने श्री. गणेश कृष्ण फडके यांच्या नेतृत्वाखाली एक समिति नेमण्यात आली. तिने सावरकरांना पाच हजार रुपये देऊन त्यांच्या समग्र वाङमयाच्या प्रकाशनाचे अधिकार संपादन केले. पुढे या कामासाठी श्री. शंकर रामचंद्र दाते, गणेश कृष्ण फडके, व शिवराम विष्णु मोडक यांची एक समिति नेमण्यात आली. तिने प्रकाशनाचे हे काम दाते यांजकडे १९६३ वर्षी सोपविले व त्यांनी मे १९६५ मध्ये ते पुरे केले.

सावरकरांचे पूर्वी फुटकळ स्वरूपात प्रसिद्ध झालेले लेख, निबंध, काव्य, नाटके इत्यादि जे उपलब्ध होते ते सर्व या समग्र वाङमयात समाविष्ट झाले आहे. तथापि त्यांनी "१८५७ चे स्वातंत्र्य समर" हा १८५७ च्या क्रांतीवर लिहिलेला ग्रंथ हा मूळ स्वरूपात यापूर्वी केव्हाच प्रसिद्ध झालेला नव्हता. किंबहुना तो यापूर्वी उपलब्धच झालेला नव्हता. त्याचा इतिहास असा की सावरकरांनी विलायतेत असताना हा

ग्रंथ मराठीत लिहून काढला व तो प्रकाशनासाठी बाबा सावरकर यांच्याकडे १९०८ मध्ये पाठविला. तथापि त्याचा पोलिसांना सुगावा लागला व तो हस्तगत करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले. त्यामुळे तो ग्रंथ एका ठिकाणाहून दुसरीकडे व तेथून तिसरीकडे अशी त्याची सारखी धावपळ सुरू झाली. अशा परिस्थितीत तो छापणे शक्य नाही हे लक्षात येऊन तो परत गुप्त रीतीने सावरकरांकडे पाठविण्यात आला. पुढे जर्मनीत देवनागरी लिपीत तो छापता येईल का याचा शोध घेण्यात आला. पण तशी शक्यता दिसली नाही; व काही करून तो छापून प्रसिद्ध करण्याची तर सावरकर व त्यांचे क्रांतिवादी सहकारी यांना विशेष आतुरता लागली. अखेर त्याचे इंग्रजी भाषांतर करून ते प्रसिद्ध करण्याचे ठरले. त्याप्रमाणे तिघा चौघांनी ते काम अंगावर घेतले व काही महिन्यांतच ग्रंथाची मुद्रण प्रत तयार झाली. तरी हा ग्रंथ इंग्लंडमध्ये छापला जाणे शक्य नव्हते. तो प्रसिद्ध होण्यापूर्वीच तो 'भयंकर' आहे या कारणास्तव ब्रिटिश सरकारने तो आधीच जप्त केल्याची घोषणाही केली होती. त्यामुळे पोलिसांच्या हाती पडताच तो जप्त होणार होता. म्हणून तो ग्रंथ प्रकाशित करण्याची क्रांतिकारकांना विशेष घाई होती. अखेर तो हॉलंडमध्ये छापण्यात आला व फ्रान्समध्ये त्याचे प्रकाशन होऊन त्याच्या हजारो प्रती युरोप अमेरिकेत व भारतातही सर्वत्र पसरल्या. ब्रिटिश सरकारवर क्रांतिकारकांनी मात केली.

या मूळ मराठी ग्रंथाचे हस्तलिखित कुटिनो नावाच्या एका गोवेकर ख्रिश्चन माणसाजवळ सावरकरांनी फ्रान्समध्ये दिले होते. पुढे नाशिक प्रकरण होऊन त्यात सावरकरांना अटक व दोन जन्मठेपींची शिक्षा झाली. त्यामुळे तो ग्रंथ कुटिनो यांच्याजवळ पडून होता. तेही पुढे अमेरिकेत जाऊन स्थायिक झाले होते. भारत स्वतंत्र झाल्यावर व सावरकरांचे इतर सर्व प्रसिद्ध वाङ्मयही जप्तीतून मुक्त झाले तेव्हा कुटिनो यांनी सदर मूळ हस्तलिखित श्री. रामलाल वाजपेयी यांच्याबरोबर देऊन ते डॉ. मुंजे यांजकडे पाठविले व त्यांनी ते सावरकरांना नेऊन दिले.

मूळ हस्तलिखितही उपलब्ध झाले याचा सावरकरांना किती आनंद झाला असेल ! या वेळी समग्र सावरकर वाङ्मयाच्या प्रकाशनाचे काम सुरू झाले होते. तेव्हा त्यात याही ग्रंथाचा समावेश व्हावा अशी दाते यांनी सावरकरांना विनंती केली व त्यांनी ती मान्य केली. त्याप्रमाणे त्या हस्तलिखिताची मुद्रणप्रत तयार करण्यात आली व या समग्र वाङ्मयाचा शेवटचा आठवा खंड म्हणून १९६५ च्या दि. १० मेला ही 'क्रांतिकारकांची गीता' मूळ मराठीत प्रसिद्ध झाली. यापूर्वी सावरकरांच्या इंग्रजी ग्रंथाचे मराठी भाषान्तर पटवर्धन यांनी केलेले प्रसिद्ध झाले होते. तेही फार चांगले झालेले आहे. तथापि मूळ ग्रंथाची गोडी काही अवीट आहे. शिवाय या ग्रंथात स्वातंत्र्योत्तर काळात सावरकरांनी लिहिलेले काही लेख, अभिनव भारत संस्थेच्या सांगता समारंभानिमित्त पुण्यास

झालेली त्यांची भाषणे, इत्यादि सर्वांचा समावेश करण्यात आला आहे. शेवटी सावरकरांनी अवधूतोपनिषदाच्या भाषेत

" धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ।
धन्योऽहं धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् ॥ "

असे उद्गार आपल्या आत्मार्पणाच्या लेखात काढून लेखणी खाली ठेवली, व प्राचीन ऋषिमुनींच्या परंपरेस अनुसरून २६ फेब्रुवारी १९६६ ला त्यांनी आत्मार्पण केले. याच लेखाचा समावेश करून समग्र सावरकर वाङमय प्रकाशनाचीही समाप्ति झाली आहे.

सावरकरांच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक या नावाची स्वतंत्र संस्था हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी निर्माण केली. तिला आता मुंबई महानगर पालिकेने सावरकर मार्गावरच दादरला शिवाजी उद्यानाजवळ समुद्रकाठी मोठी जागा दिली असून तेथे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ज्या ज्या कार्यासाठी आपला देह झिजविला ती ती कार्ये भावी पिढ्यांना उपकारक व्हावीत अशा रीतीने करण्यात यावयाची आहेत.

सावरकर युद्धाभ्यास अध्यासन

महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे एक कार्यवाह श्री. य. वि. नामजोशी यांनी स्वा. सावरकर याचे एक स्वतंत्र शैक्षणिक स्वरूपाचे स्मारक करण्याचे योजिले व ते काम अंगावरही घेतले. पुणे विद्यापीठात स्वा. सावरकरांच्या नावाने एक युद्धाभ्यास अध्यासन निर्माण करण्याची त्यांची मनीषा होती. युद्धशास्त्राचा अभ्यास सैनिकी शाखांतून होतो; तथापि पदवी परीक्षेसही हा विषय घेता यावा व या विषयाचा अभ्यास तरुण पिढीत मोठ्या प्रमाणावर व्हावा अशी त्यांची इच्छा होती. हे काम मोठे होते. तथापि नामजोशी यांनी ते अंगावर घेतले व १९६३ पासून काही वर्षे त्यांनी ते चिकाटीने चालविले. या कामी त्यांना सुप्रसिद्ध गायक व गीतरामायणाचे कार्यक्रम करणारे सुधीर फडके यांचे संपूर्ण सहकार्य लाभले. त्यांनी गीतरामायणाचे कार्यक्रम करून त्याद्वारे मोठा निधि उभा केला व अमूर्त कल्पना साकार करून दाखविली. तेव्हा पुणे महानगरपालिकेने या निधीस दहा हजारांचे अनुदान देऊन आपली गुणग्राहकता व्यक्त केली. महाराष्ट्र शासनानेही या निधीस पाच हजारांची व लताबाई मंगेशकर यांनीही पांच हजारांची देणगी दिली. खर्चवेच वजा जाता नामजोशी यांनी पुणे विद्यापीठास १,८४,००० रुपयांचा निधि अर्पण केला असून मुख्यत: त्याच्या व्याजातून युद्धाभ्यास अध्यासनाचा खर्च चालतो. हे काम मोठे व महत्त्वाचे होते. ते नामजोशी यांनी आत्मविश्वासाने पार पाडले.

वन्दे मातरम्‌ला मुसलमानांचा विरोध

वन्दे मातरम् गीताला हिंदुस्तानच्या राष्ट्रजीवनात केवढे उच्च स्थान आहे हे सर्व सुपरिचित आहे. तथापि या गीताच्या गायनास काही मुसलमान विरोध करीत असतात. तरीही कित्येक नगरपालिकांनी आपल्या शाळांतून वन्देमातरम् गीत गाण्याचा परिपाठ स्वातंत्र्योत्तर काळात सुरू केला.

फाळणीनंतर काही काळ मुसलमान समाज परिस्थितीचे अवलोकन करीत राहिला होता. त्यांच्यापैकी काहींनी मुसलमान समाजातही सुधारणा घडवून आणण्यास हा काळ अनुकूल आहे हे लक्षात घेऊन एक नवी चळवळ उभारली होती. बहुपत्नीत्वाला विरोध, काडीमोडीच्या संबंधात कायदेशीर तरतूद, मुस्लिम स्त्रियांच्या शिक्षणास प्रोत्साहन व राष्ट्रीय जीवनात समरस होण्यासाठी मत-परिवर्तन घडवून आणणे इत्यादि मार्गांनी ही चळवळ मुसलमान समाजात कार्य करीत होती. तथापि सनातन प्रवृत्तीच्या व मुल्ला मौलवींच्या दडपणाखाली वावरणाऱ्या अंधश्रद्ध मुस्लिम समाजाचा या सुधारणांना विरोध होता. म्हणून त्यांनीही प्रतिक्रियात्मक चळवळ सुरू केली. इतर समाजाहून आपले वेगळेपण राखण्यावर त्यांचा विशेष कटाक्ष होता. त्यांच्या चळवळीचे एक अंग म्हणजे वन्दे मातरम् म्हणण्यास विरोध करणे हे होते. मुंबई महापालिकेच्या शाळांतून हे गीत म्हटले जात होते. त्यास विरोध करण्याचे या मंडळींनी ठरविले, व काँग्रेस पक्षीय खांडवाला या मुसलमान महापालिका सदस्याने हे गीत उर्दू शाळांतून म्हटले जाता कामा नये असा आग्रह धरला. त्यांचा युक्तिवाद असा की, मुसलमान अल्लाशिवाय अन्य कोणाला वन्दन करीत नाही व या गीतात तर मातेला वन्दन आहे तेव्हा ते गीत धर्मविरुद्ध असल्याने मुसलमान म्हणणार नाहीत. एक दिवस मुसलमानांचे एक शिष्टमंडळही महापालिकेच्या आयुक्तांना भेटले. त्यात महापालिकेतील व विधिमंडळातील काँग्रेस पक्षीय मुसलमान सभासद, काही लीगवाले आमदार, व जमियत उल उलमा या संस्थेचे प्रतिनिधि होते. त्यांनी उर्दू शाळां तून वन्दे मातरम् गीत म्हणण्याची सक्ती नसावी असा आग्रह धरला व आयुक्तांनी त्यांच्या म्हणण्याचा सहानुभूतीने विचार करण्याचे आश्वासन दिले.

यावर दि. २९ जानेवारी १९७३ च्या मुंबई महापालिकेच्या सभेत या प्रश्नाची चर्चा करण्याकरिता तहकुबी सूचना मांडण्यात आली. तेव्हा काँग्रेस-पक्षीय मुस्लिम सभासद खांडवानी यांनी वन्दे मातरम् गीत उर्दू शाळांतून म्हणण्यास सक्ती नसावी असा आग्रह धरून तहकुबी सूचनेस विरोध केला. हा प्रश्न चर्चेस येणार असल्याचे समजल्यामुळे समाजवादी पक्षाचे सभासद या सभेस उपस्थितच राहिले नाहीत ! अखेर तहकुबी सूचना पास झाली. आयुक्तांनी निर्णयार्थ हा प्रश्न महाराष्ट्र शासनाकडे पाठवून दिला. मध्यन्तरी दि. २६ फेब्रुवारीला

मुंबईतील महंमद उमर रजब या नावाच्या महापालिकेच्या उर्दू शाळेत पालिका शिक्षणाधिकारी डॉ. माधुरी शहा यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक मूल्यमापनाचा एक परिसंवाद चालू असता सुमारे चारशे मुसलमान महिलांनी तेथे येऊन वन्दे मातरम्‌ची सक्ती चालू देणार नाही अशा घोषणा केल्या.

मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष रजनी पटेल यांचा मुसलमानांच्या या वन्दे मातरम् विरोधाला पाठिंबा होता ! तथापि विधिमंडळात काँग्रेस पक्षीय हिंदु सभासदांनी वन्देमातरम्‌ला पाठिंबा दिला. हिंदुसभेनेही हे प्रकरण धसास लावण्याचे ठरविले.

दि. १ मार्च १९७३ ला हिंदुसभेच्या वतीने महाराष्ट्र विधानसभेवर मोर्चा नेण्याचे ठरविण्यात आले, व त्याप्रमाणे मोर्चा नेण्यात आला. त्याच दिवशी हिंदु-सभेच्या चार महिलांनी विधानसभेच्या प्रेक्षकांच्या गॅलरीत बसण्याचे पास मिळवून त्या तेथे जाऊन बसल्या व त्यांनी संधि साधून वन्दे मातरम्‌च्या घोषणा केल्या व विरोधकांना भारताबाहेर हाकलून द्या अशी मागणी करणारी पत्रके खाली विधान-सभेत टाकली. " अगर भारत में रहना होगा, तो वन्दे मातरम् कहना होगा " अशा घोषणा दिल्या. त्या चौघींना पोलिसांनी अटक केली. त्यांच्यापैकी कु. वर्षा पंडितराव बखले व कु. अलका लक्ष्मणराव साटेलकर यांचे लहान वय लक्षात घेऊन त्यांना सोडून देण्यात आले व श्रीमती देवीदास तेलंग व सौ. मानिनी हर्ष सावरकर यांना दोन दिवसांची तुरुंगाची शिक्षा दिली.

दि. २ एप्रिल १९७३ ला मुंबई महापालिकेच्या महापौर पदाची निवडणूक होती. महापालिकेच्या नव्याने झालेल्या निवडणुकीत वन्देमातरम् विरोधामुळे प्रसिद्धीस आलेले काँग्रेसपक्षीय सदस्य खांडवानी यांना काँग्रेसने महापालिकेच्या निवडणुकीस खास उभें केले होते व ते पुन्हा काँग्रेसच्या वतीने निवडून आले होते. एवढेच नव्हे तर मुस्लिम लीगवाले बारा सभासद या वेळी नव्याने निवडून आले होते. महापौरपदाच्या निवडणुकीच्या सभेच्या वेळी वन्देमातरम् म्हणण्याची सक्ती करण्याचे मुंबईच्या हिंदुसभेने ठरविले व विक्रम सावरकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढून महापालिकेच्या प्रवेशद्वारावर सभासद येताच त्यांस वन्देमातरम् म्हणण्यास लावूनच पुढे जाण्यास सांगण्यात आले. काही मुसलमानांनी त्यास विरोध केला तेव्हा थोडी धक्काबुक्की झाली. पोलिसही मध्ये पडले व त्यांनी मोर्चेवाल्यास दूर केले.

या आंदोलनाचे पडसाद सोलापूरला उमटले. श्री. वि. रा. पाटील यांनी वन्देमातरम्‌ला विरोध करणाऱ्यांच्या निषेधाची सभा घेतली. पोलिसांनी त्यास परवानगी दिली नाही. तथापि दुसरे दिवशी श्री. पाटील यांनी सभा घेऊन वन्दे-मातरम् विरोधकांचा निषेध केला. तेव्हा मात्र पोलिस त्यास आडवे आले नाहीत.

पाचगणी येथील मोर्चा

पाचगणी येथेही एम. आर. ए. विरुद्ध एक आंदोलन १९७५ च्या फेब्रुवारी महिन्यात छेडण्यात आले. त्या वेळी दि. १० फेब्रुवारी १९७५ ला पाचगणी येथे महाराष्ट्र हिंदुसभा समितीची एक सभा आयोजित करण्यात आलेली होती. तिचा फायदा घेऊन हे आंदोलन उभारण्यात आले. एम. आर. ए. ही संघटना ख्रिश्चन मिशनरी व राजकारणी लोकांची असून तिचा दर्शनी उद्देश लोकांची नैतिक सुधारणा (मॉरल रीआर्मामेन्ट) घडविण्याचा असला तरी तिचा वास्तविक उद्देश हेरगिरी करण्याचा आहे असे सांगितले जाते. या संस्थेच्या संबंधात इतकी गुप्तता ठेवण्यात आलेली आहे व तिला हिंदुस्थानाबाहेरून इतक्या मोठ्या प्रमाणावर पैसा येतो, व तेथे हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागातून परदेशी लोक वारंवार येत असतात त्यामुळे त्यांच्या संशयास्पद हालचालींबद्दल कोणासही संशयच वाटावा. भारत शासनाच्या अनुमतीनेच हे केन्द्र चालविले जात असून म. गांधींचे चिरंजीव राजमोहन गांधी हे या केन्द्राचे एक श्रेष्ठ अधिकारी आहेत. त्यांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेला असून त्यांच्याही हालचाली संशयास्पद आहेत असे स्थानिक लोकांना वाटते. या समितीच्या बैठकीच्या वेळी वाई व पाचगणी भागातील लोकांनी या मॉरल रीआर्मामेन्ट संस्थेविरुद्ध मोठे आंदोलन छेडले. त्यात हिंदुसभावादी मंडळींनीही भाग घेतला. या केन्द्राचे वास्तव स्वरूप उघडे पाडणे अवश्य असून सरकारनेच या कामी पुढाकार घेऊन हा बनावटी उद्योग मोडून काढण्याची गरज आहे. हिंदुसभेने या प्रकरणाकडे सरकारचे लक्ष या मोर्चात भाग घेऊन वेधण्याची कामगिरी केली आहे.

उपसंहार

स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुसभेपुढे जे विविध प्रश्न होते त्याहून काही वेगळे प्रश्न स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झाले आहेत. पूर्वी हिंदु समाजातील सनातन वर्गाचा शुद्धीला, सामाजिक परिवर्तनाला, अस्पृश्यता निवारणाला विरोध होता. शंकराचार्य कूर्तकोटि यांच्यासारख्यांनी या सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीला मोठी चालना दिली व परिस्थितिही पालटत गेली. राजकारणानेही सामाजिक सुधारणांची आवश्यकता स्वीकारणे समाजातील कर्मठ वर्गालाही भाग पाडले. त्यामुळे त्या विषयांना चांगली गति मिळाली. आता त्या बाबतीत तात्त्विक मतभेद किंवा धर्मशास्त्रीय विरोध राहिलेला नाही. कोणतीही सुधारणा किंवा बदल समाजाच्या पचनी पडण्यास काही काळ लागतो हे खरे; पण तो लागणार हे गृहीत धरूनच यापुढेही सतत व चिकाटीने प्रयत्न चालू ठेवले तर हे प्रश्न एका पिढीत सुटल्याशिवाय राहणार नाहीत. मात्र त्यासाठी सतत व जागरूकतेने प्रयत्न करीत राहणे अवश्य आहे.

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात जातीय मतदारसंघामुळे या देशातील हिंदु-मुसलमान समाजातील दरी एकसारखी रुंदावत जात होती. कॉंग्रेसने मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघांना पाठिंबा दिला, एवढेच नव्हे तर देशाच्या शासनाचेही उदक त्यांच्या हातावर सोडण्याची तयारी दाखविली. त्यामुळे राजकीय क्षेत्रात अनिवार प्रक्षोभ निर्माण झाला. देशाच्या फाळणीचा मुस्लिम लीगने आग्रह धरला, इंग्रजांनी तिचा पाठपुरावा केला, व मुसलमानांनी आपली मागणी कॉंग्रेसकडून मान्य करून घेण्यासाठी जागोजाग दंगे व कत्तली सुरू केल्या. त्यामुळे नाही नाही म्हणत असताही अखेर कॉंग्रेस व गांधीजी देशाच्या फाळणीस तयार झाले. आणि तरीही त्यांची मुस्लिमधार्जिणी वृत्ति काही केल्या कमी झाली नाही. यामुळे हिंदुसभा व कॉंग्रेस यांच्यात फूट पडली व त्यांच्यातील दरी रुंदावत गेली. १९३७ पर्यंत हिंदुसभेचे लोक देशाच्या राजकारणात कॉंग्रेसमधूनच भाग घेत होते. पण १९३७ च्या निवडणुकीनंतर कॉंग्रेसची पहिली फाळणी होऊन हिंदुसभावादी कॉंग्रेसमधून बाहेर पडले. पुढे १९४७ साली स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कॉंग्रेसने जातीय मतदारसंघ रद्द केले. पंजाबात हिंदु मुसलमान लोकसंख्येची केवळ अगतिक होऊन अदलाबदल केली, पण हिंदुस्थान हे हिंदुराष्ट्र आहे ही भूमिका गांधीवादी नेते काही केल्या मान्य करण्यास तयार झाले नाहीत. आमचे राज्य 'सेक्युलर' आहे असे ते म्हणत राहिले. पण सेक्युलर म्हणजे तरी काय याचे स्पष्टीकरण करण्याचे ते सतत टाळतात. हिंदुराष्ट्रवाद हा धार्मिक नाही व हिंदुधर्म हाही मुळात खऱ्या अर्थाने सेक्युलर म्हणजे परधर्मसहिष्णु आहे ही वस्तुस्थिति असतानाही हिंदुराष्ट्रवादाची हेटाळणी करणे व मुसलमान ख्रिश्चनांचा फाजील अनुनय करणे म्हणजे सेक्युलरवाद असे त्या शब्दाचे विकृत स्वरूप कॉंग्रेसवाल्यांनी आपल्या प्रत्यक्ष कृतीने व्यक्त केले आहे. अजूनही त्यांच्या हे लक्षात येत नाही की अभावात्मक स्वरूपाचा निधर्मी राष्ट्रवाद समाजाची धारणा करण्यास केवळ असमर्थ असून हिंदुराष्ट्रवादाची भावात्मक मूर्ति समाजमानसात प्रतिष्ठापित करण्यानेच या समाजाचे बळ संघटित होणार आहे. पण हा विचार अजूनही राज्यकर्ते मान्य करीत नाहीत. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात जातीय मतदारसंघ जरी गेले तरी राष्ट्रवादाच्या भावरूप मूर्तीसंबंधाने कॉंग्रेस व हिंदुसभा यांच्यात मूलभूत स्वरूपाचे वैचारिक मतभेद कायमच राहिले आहेत.

कॉंग्रेसचा हा अभावात्मक निधर्मी राष्ट्रवाद समाजात मूळ धरू शकत नसल्याने त्यांनी आपली सारी भिस्त अर्थकारणावर आधारली आहे. पं. जवाहरलाल नेहरू हे खऱ्या अर्थाने गांधीवादी नव्हते. गांधींची आत्यंतिक अहिंसा त्यांना मान्य नव्हती. खादी ग्रामोद्योग यांचा देशाच्या उत्पादन साधनांचे एक मर्यादित अंग इतकाच विचार त्यांना मान्य होता. पाश्चात्य संस्कृतीने व भौतिक संपन्नतेने ते भारलेले होते. हिंदुधर्माचे त्यांच्या मनात ठसलेले स्वरूप ओंगळ होते. सामाजिक सुधारणा

त्यांना आवश्यक वाटत. त्या बाबतीत प्रत्यक्ष व्यवहारात त्यांचे व हिंदुसभेचे अनेक प्रकरणी जमत असे. पण त्यामागील दोघांच्या धारणा मात्र वेगवेगळ्या होत्या. नेहरूंवर पाश्चात्य संस्कृतीचा पगडा विशेष होता; व त्या दृष्टिकोनातून सामाजिक सुधारणांचा ते विचार करीत. या उलट हिंदुसभावाद्यांचा सामाजिक सुधारणांचा विचार पूर्वपरंपरागत संस्कृतीतून विकसित झाला होता. समाजात परिवर्तनाची आवश्यकता दोघांनाही सारखीच वाटे. पण एकाच रेषेवर उभ्या असलेल्या पण भिन्न दिशांकडे पाहणाऱ्या माणसांप्रमाणे दोघांच्या दृष्टिकोनात फरक पडे. नेहरूंना पाश्चात्य संस्कृतीतून सुधारणांची स्फूर्ति मिळे तर हिंदुसभावाद्यांना भारताच्या प्राचीन परंपरेतून स्फूर्ति प्राप्त होत होती. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत हा दृष्टिकोनाचा फरक फार महत्त्वाचा होता. परदेशी संस्कृतीतील माल जांगड आणावा योग्य वाटल्यास आपल्या प्राचीन परंपरेच्या मुशीत तो ओतावा व त्यातून निर्माण होणारी मूर्ति 'भारतीय' स्वरूपाची असावी असें हिंदुसभावादी मानतात तर याच्या उलट भारतीय तत्त्वज्ञानाची उच्च परंपरा पाश्चात्य संस्कृतीच्या मुशीत ओतून त्याच्याशी ती जुळती करून दाखवावी असे नेहरूंना वाटे. तथापि या बाबतीत या दोन्ही पक्षात संघर्षाचा प्रसंग फारसा कधी आला नाही. कारण सामाजिक सुधारणा दोघांनाही अभिप्रेतच होत्या.

आर्थिक विषयांत काँग्रेसचे धोरण नेहरूंच्या काळापासून रशियाकडे झुकलेले आहे. नेहरूंना समाजवादाचे विलक्षण आकर्षण होते. त्यांच्या हाती सत्ता येण्यापूर्वी या देशातील अर्थव्यवस्था भांडवलशाही स्वरूपाची होती. एकदम क्रांति करून जुनी व्यवस्था मोडून नवीन कामगारशाही निर्माण करता येण्यासारखी त्या वेळची परिस्थितीही नव्हती व नेहरूंच्या जवळ तसे बळही नव्हते. शिवाय फाळणीमुळे नाना प्रश्न निर्माण झाले होते. त्यांना तोंड देता देताच पुरेवाट होत होती. तथापि नेहरूंनी परदेशांकडून हजारो कोटी रुपयांचे कर्जाऊ भांडवल मिळवून देशात सरकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कारखानदारी उभी केली. ती क्षमतेने चालविली गेली असती तर या वेळेपर्यंत परदेशी कर्जाची फेडही झाली असती. पण तसे झाले नाही. परदेशी लोक आपली राजकीय पकड निर्माण करण्याच्या दृष्टीने कर्ज देत गेले व हे घेत गेले. त्यामुळे परदेशीयांची राजकीय पकड एकसारखी वाढत गेली. त्यातच पाकिस्तान विरुद्ध १९४७ साली, १९६५ साली व १९७१ साली अशी तीन युद्धे झाली. व १९६१ साली चीन विरुद्ध युद्ध झाले. त्यामुळे खर्चात भर पडून कर्जे वाढली. फायदा मात्र काहीच झाला नाही. आज सरकारच्या अस्ताव्यस्त कारभारामुळे आर्थिक क्षेत्रात इतकी घसरगुंडी झाली आहे, शासन इतके भ्रष्टाचारी बनले आहे, निवडणुकांवर इतका पैसा खर्च केला जात आहे व एकंदर शासन इतके ढिले, बेशिस्त, स्वार्थी व कर्तव्यपराङ्मुख बनले आहे की आभाळच फाटले आहे असे वाटावे. या परिस्थितीला शासनकर्ते जसे जबाबदार आहेत त्याचप्रमाणे विरोधी पक्षनेतेही जबाबदार आहेत.

त्यामुळे कोणी कोणाला दोष देण्याची सोय उरली नाही. हिंदुराष्ट्रवादाच्या पाया-भूत विचारधारणेच्या अभावी केवळ अर्थकारणाच्या बळावर देशाची घडी सावर-ण्याचा प्रयत्न वाया गेला आहे. देशात जागोजागी स्वार्थी गट निर्माण झाले असून केवळ अर्थवाद या देशाला तारणार नाही.

हिंदुसभेने आर्थिक क्षेत्रात आपले धोरण बिलासपूर येथील अधिवेशनात (१९४३) स्पष्ट केले आहे, व त्यानंतरही अनेकवार हिंदुसभेच्या अनेक ठरावांतून या विषयी हिंदुसभेचे धोरण स्पष्ट झाले आहे. " राष्ट्रहिताच्या मर्यादेत वर्गहितांचा समन्वय " हे त्याचे सूत्र आहे. खाजगी भांडवलधारी वर्गात स्पर्धाशीलता राहिली पाहिजे, त्याच बरोबर सरकारनेही मक्तेदारी स्वीकारू नये असे हिंदुसभेला वाटते. मक्तेदारी आली की नियंत्रण रहात नाही. शासनसंस्थेचे मुख्य उद्दिष्ट नियंत्रण हे असून त्यासाठी आवश्यक म्हणून उत्पादन व वितरण कार्यात त्याने भाग घ्यावयास हवा असे हिंदुसभेस वाटते. उत्पादन, वितरण, वस्तूंचे मूल्य व नफा या चारी गोष्टीं-वर शासनाचे नियंत्रण पाहिजे. ते उत्पादनकार्यात गुरफटले व मक्तेदारीकडे वळले की घटते उत्पादन व वाढते. खर्च या आपत्तींमुळे बेजबाबदार कारभार, नफे-बाजी आणि वस्तूंच्या मूल्यात वाढ हे परिणाम घडून येतात. आज तसे झाले आहे. तात्पर्य याही क्षेत्रात हिंदुसभेचे व विद्यमान कॉंग्रेस, समाजवादी किंवा कामगार संघटनांचे नेते यांच्यातील वैचारिक मतभेद मूलभूत स्वरूपाचे आहेत.

असे असले तरी यातून लोकशाही पद्धतीनेच मार्ग काढावयाचा आहे. त्यासाठी समाजात विचारपरिवर्तन घडवून आणणे हाच एकमेव मार्ग आहे. जोपर्यंत देशात संयमी, विचारी, राष्ट्रनिष्ठ व अभ्यासू लोकांचा संघटित असा समर्थ पर्यायी विरोधी पक्ष निर्माण होत नाही तोपर्यंत या देशात लोकशाही नीट नांदणार नाही व हे प्रश्न सुटण्याची शक्यता नाही. अलीकडे लोकांच्या केवळ स्वार्थी भावनेला उत्तेजन देऊन व त्यांना आर्थिक लाभाची वाढती आकर्षणे ठेवून त्यांची मते मिळविण्यावर कमी अधिक सर्वच राजकीय पक्षनेते भर देत आहेत. पण सर्वांचाच स्वार्थ बोकाळल्यामुळे कोणत्याच पक्षाचे बळ वाढू शकत नाही. १९७१ च्या निवडणुकीतील आकडे चौदाव्या प्रकरणात दिले आहेत त्यावरून हे दिसून येईल. म्हणून प्राप्त परिस्थितीत हिंदुसभेपुढे सामाजिक क्षेत्रात चालू असलेले सामाजिक सुधारणेचे, समाजपरिवर्तनाचे कार्य सातत्याने चालू ठेवणे, हिंदुराष्ट्रावादाचा विचार समाजातील सर्व थरांतील लोकांना पटविणे आणि आर्थिक क्षेत्रातही राष्ट्रहिताच्या पायावर न्याय्य असा वर्गसमन्वय घडवून समाजातील दुर्बल घटकांचे आर्थिक व सांस्कृतिक बळ वाढविणे ही मुख्य कामे आहेत. ही कामे आवश्यक तेथे राज्य-यंत्राच्या द्वारे घडवून आणण्यासाठी देशातील विधिमंडळांतून राष्ट्रनिष्ठ, न्यायी, त्यागी, कर्तव्यपरायण असा तुल्यबल विचारी व संयमी पर्यायी पक्ष निर्माण करण्या-साठी प्रयत्न करणे हेही यापुढील काळातील हिंदुसभेपुढील एक उद्दिष्ट आहे. *

(१८)

हिंदुसभांच्या स्थानिक कार्याचा परिचय

हिंदुसभांचे कार्य

महाराष्ट्रात हिंदुसभेची स्थापना मुंबईस १९२३ मध्ये, रत्नागिरीस १९२३ ला व पुण्यास १९२४ ला झाली. हिंदुसभेचे कार्य पुण्यास १९२३ पासूनच सुरू झालेले होते. १९२४ च्या मार्च महिन्यात रीतसर स्थापना झाली. तेव्हापासून तिचे अध्यक्ष श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव व कार्यवाह शं. रा. दाते १९३१ पर्यंत होते. त्यानंतर पुणे हिंदुसभेचे महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेत रूपान्तर झाले व तेव्हापासून महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या घटनेनुसार कार्य चालू झाले. त्यानंतरच्या काळात पुढील सद्गृहस्थ महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे अध्यक्ष होते :

१९३२ – १९३३	सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
१९३४ – १९४२	लक्ष्मण बळवंत भोपटकर
१९४२ – १९४३	जनार्दन सखाराम करंदीकर
८।१।१९४४ – ६।४।४४	शिवराम लक्ष्मण करंदीकर
६।४।४४ – ३।१२।४४	बापूराव जोशी (कार्याध्यक्ष)
३।१२।४४ – १९४५	शेठ गुलाबचंद हिराचंद
१९४६ – १९५४	रामचंद्र नारायण मंडलीक
१९५५ – १९६२	गणपत महादेव नलावडे
१९६२ – १९६८	विष्णु रामराव पाटील
१९६८ – १९७१	माधव दत्तात्रेय पाठक
१९७१ – १९७२	शंकर रामचंद्र दाते
१९७२ – १९७३	हरि भास्कर भिडे
१९७३ – १९७५	विक्रम नारायण सावरकर

१९५६ पासून सामान्यतः महाराष्ट्र हिंदुसभेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १ ऑगस्टच्या सुमारास होतात व त्या वेळी नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक होते. त्यापूर्वी त्या ठराविक वेळी अशा भरत नसत. १९७५ वर्षी आणीबाणीमुळे निवडणुका लांबल्या.

पुणें हिंदुसभा

महाराष्ट्र हिंदुसभेचे कार्यालय बरीच वर्षे पुण्यासच सामान्यतः असे. त्यामुळे पुणे जिल्हा हिंदु सभा व प्रांतिक हिंदु सभा यांच्या वेगवेगळ्या कार्याचे स्वरूप दाखविणे कठीण आहे. पुणे येथे १९२४ वर्षी हिंदुसभा रीतसर स्थापन झाली. तथापि तिचे कार्य त्या आधीच सुरू झालेले होते व ते कमीअधिक प्रमाणात महाराष्ट्रभर चालू होते. या पुस्तकात नमूद केलेला महाराष्ट्र हिंदुसभेचा १९३५ सालापर्यंतचा इतिहास हा प्रामुख्याने पुणे हिंदुसभेचाच इतिहास आहे. १९३२ नंतर महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा संघटित झाली व पुणे हिंदुसभा ही तिची एक शाखा बनली. १९४० नंतर घटनात्मकरीत्या भोर, सासवड, बारामती, जुन्नर, खेड, लोणावळा, इंदापूर इत्यादि गावी शाखासभा स्थापन झाल्या. बारामती येथे शुद्धीकरण व टकारी समाजाचे प्रश्न, या संबंधात हिंदुसभेने बरेच काम केले. पण कार्याचा सर्व भर सामान्यतः पुणे येथूनच असे. १९४१ वर्षी पुणे नगर हिंदुसभेच्या सभासदांची संख्या दहा हजारहून अधिक होती. पुण्याच्या हिंदुसभेच्या कार्यात प्रारंभी शुद्धीकरण, अस्पृश्यता निवारण, जातिविषयक प्रश्न, सामाजिक परिवर्तन इत्यादि विषय असत. या काळात त्यांना विशेष महत्त्व होते. हिंदुसभेने ते धसास लावले व त्या बाबतीत जुन्या शास्त्री पंडितांची व समाज धुरीणांची त्यांस मान्यता मिळविली. १९३५ नंतर हे विषय वादविषय राहिले नाहीत.

१९३५ वर्षी पुण्यास अखिल भारत हिंदुमहासभेचे अधिवेशन पं. मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली भरले व नंतर १९५० वर्षी डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यांची सर्व व्यवस्था पुणे हिंदुसभेनेच केली. १९३७ चा सोन्यामारुती सत्याग्रहाचा लढा पुणे हिंदुसभेनेच लढविला. भागानगर निःशस्त्र प्रतिकार आन्दोलनाचे सर्व कार्य पुण्यातूनच झाले. पुण्यासच त्याचे केंद्र कार्यालय होते व नंतर १९४० साली दाते यांनी भागानगर निःशस्त्र आंदोलनाचा इंग्रजीत वृत्तान्त लिहून प्रसिद्ध केला तोही पुण्यातच. महाराष्ट्रभर हिंदुसभेच्या वतीने १९४१–४४ या काळात प्रचार दौरे काढण्यात आले त्या कामात पुण्याचाच विशेष पुढाकार होता. हिंदुसभेच्या प्रचारार्थ १९४० साली दाते यांनी काळ दैनिक सुरू केले तेही पुण्यासच. त्यासाठी त्यांनाही सरकारी जामिनक्यांच्या हिसक्यांना अनेकदा तोंड द्यावे लागले. जामिनक्यांचे वृत्त या ग्रंथात पृ. ८४-९१ वर आले आहे. हिंदुराष्ट्रीय निधीची स्थापना पुण्यास व तिचे कार्यही पुण्याहूनच चालत होते. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यात पुणे हिंदुसभेने पुढाकार घेतला. सारांश महाराष्ट्रातील हिंदुसभेच्या चळवळींचे केंद्रस्थान पुणे शहरातच होते.

नंतरच्या काळात राजकारणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. १९४० साली भोपटकरांचा षष्टयब्दी समारंभ, १९४३ साली सावरकरांचा षष्टयब्दी समारंभ,

१९५२ साली स्वा. सावरकरांच्या अभिनव भारताचा सांगता समारंभ, १९६४ साली रामभाऊ मंडलीक यांचा सत्कार, १९५९ साली सावरकरांचा मृत्युंजय दिन हे सर्व पुण्यासच झाले. येथे लो. टिळक पुण्यतिथि प्रतिवर्षी साजरी केली जाते व अलीकडच्या काळात प्रांतिक हिंदुसभेच्या वार्षिक बैठकाही त्याच वेळी घेण्यात येतात. या सर्वांत स्थानिक हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांचा विशेष भाग असतो. नगरपालिकेच्या व विधानसभेच्या निवडणुका लढविण्याच्या कामात पुणे हिंदुसभा भाग घेत आली आहे व अनेक निवडणुका तिने जिंकल्याही आहेत. सारांश महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे कार्यालय पुण्यासच असल्याने येथे घडणाऱ्या बहुतेक सर्व कार्याचा भार पुणे हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांवर स्वाभाविकपणेच पडतो.

पुणे हिंदुसभेच्या कार्यात आरंभीच्या काळात म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, शंकर रामचंद्र दाते, गो. रा. हिंगणेकर, राघवेंद्रशर्मा, गंगाधर विश्वनाथ गोखले, गणपत महादेव नलावडे, नारायणराव गुंजाळ, श्रीपाद महादेव माटे, वामन मोरेश्वर पोतदार, जनार्दन सखाराम करंदीकर, विष्णु लक्ष्मण गोडबोले, रामकृष्ण गोपाळ भिडे, राजाभाऊ गोडबोले, श्रीपाद शंकर नवरे, महादेवशास्त्री दिवेकर, वा. कृ. दाणी, हरि मोरेश्वर जोशी, भास्कर बळवंत भोपटकर, लक्ष्मण बळवंत भोपटकर, नरसिंह चिंतामण केळकर ही मंडळी प्रामुख्याने भाग घेत. प्रज्ञानेश्वर यति (घारपुरे), पाठकशास्त्री, नारायणशास्त्री मराठे (वाई) यांचाही हिंदुसभेला पाठिंबा व मार्गदर्शन असे. शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांचा हिंदुसभेच्या कार्याला मोठा आधार होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सामाजिक कामे होत.

१९३७ नंतरच्या काळात हरि भास्कर भिडे, लक्ष्मण गोपाळ सहस्रबुद्धे, गोपाळराव गुत्ती, नथुराम विनायक गोडसे, नारायण दत्तात्रेय आपटे, सुंदराताई भोपटकर, वासुदेव बळवंत गोगटे, सौ. शांताबाई गोखले, ताराबाई जोशी, श्री. जयंतराव टिळक, श्री. गोपाळराव गोडसे, सौ. सिंधुताई गोडसे, सौ. पुष्पलताबाई खरे, श्रीमती लक्ष्मीबाई महाजन, श्रीमती उषाताई खेर, असिलता गोडसे, वि. पं. भोपळे, नरुभाऊ गोखले, जयरामबोवा नारगोळकर, गिरिजाबाई गोरे, सौ. जानकीबाई जोशी, बबनराव मोडक, शिवराम विष्णु मोडक, चिंतामण नारायण साठे, विश्वासराव डावरे, पु. वि. डावरे वकील, रा. स. भट, दा. वा. गोडबोले, का. म. महाजन, सफई वकील, सोमनाथ बाळशेट होनराव, न. गो. उपाख्य भाऊराव अभ्यंकर, सौ. सुधाताई आफळे, बजरंग चौधरी, ठाकुरदेसाई इत्यादि मंडळी भाग घेत आली, व आजही त्यांपैकी कित्येक जण भाग घेत आहेत.

सातारा जिल्हा हिंदुसभा

सातारा जिल्ह्यात हिंदुसभेचे कार्य १९३७ पासून विशेष रूपाने व घटनात्मकरीत्या सुरू झाले. ते सातत्याने आजही चालू आहे. जातीजातींचे संघटन

घडवून आणणे, सावरकरांनी प्रतिपादन केलेल्या विचारसरणीचा प्रचार करणे, शुद्धिकार्य, व विविध प्रकारची प्रासंगिक व नित्य स्वरूपाची कामे या सभेने सतत केली व आजही चालू आहेत. श्री. शि. वि. मोडक, श्री. गो. र. पंचपोर, श्री. गो. ना. शहाणे, डॉ. वा. रा. जोशी, ज. गं. काळे इत्यादिकांनी सातारा जिल्हा हिंदुसभेच्या कार्यात सातत्याने लक्ष घातले. सातारा येथे श्री. हर्षे यांनी फलकावर रोज महत्त्वाच्या वार्ता लिहून त्याकडे लोकांचे व राज्यकर्त्यांचेही लक्ष वेधण्याचे काम बरेच दिवस सातत्याने चालविले. त्याची लोकांच्या अनेक तक्रारी दूर होण्यास चांगली मदत झाली. महाराष्ट्र हिंदुसभेने वेळोवेळी जी कामे आरंभिली त्या सर्वांची कार्यवाही सातारा जिल्ह्यात तेथील कार्यकर्त्यांनी उत्तम रीतीने पार पाडली व आजही पाडीत आहेत. प्रांतिक हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाच्या काही सभा सातारा, वाई व कऱ्हाड येथेही भरल्या होत्या. जिल्हा सभेच्या कार्यात श्री. शंकरराव जोशी, भाऊकाका गरुड, डॉ. वा. रा. जोशी, कृ. म. आठल्ये, शं. ल. सुभेदार, गो. ना. शहाणे, द. स. हर्षे, के. स. साठे, गो. र. पंचपोर, केशवराव जोशी, ज. गं. काळे, माधवराव दिवाण, मा. गं. नित्सुरे, अण्णासाहेब पटवर्धन, अप्पासाहेब फणसळकर, नाना भावे, पंत सबनीस, वा. के. वाघ, दत्तोपंत कुलकर्णी, गं. रा. इनामदार, शि. वि. मोडक, शि. दा. लिमये, रा. धों. गाडगीळ, ज. पां. चिटणीस, रा. धों. अष्टेकर, म. द. वाघ, ब. स. दाते, शिवराम, पंत लिमये, विष्णु अण्णा जोशी इत्यादींनी सातत्याने व दीर्घकाळ भाग घेतला आहे, व आजही विद्यमान असलेले कित्येक जण घेत आहेत.

या सभेच्या वतीने १९३७–४८ या काळात ५० शुद्धीकरणे झाली व पाच आपद्ग्रस्त स्त्रियांची गुंडांच्या तडाख्यातून सुटका करण्यात आली. येथे एक अनाथ महिलाश्रम काढण्याचाही प्रयत्न करण्यात आला; तथापि अनेक अडचणींमुळे तो सिद्धीस गेला नाही.

१९३९ वर्षी भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात या भागातून दीडशे प्रतिकारक निजाम राज्यात गेले होते. लढा यशस्वी झाल्यावर सर्वांबरोबर त्यांची तुरुंगातून सुटका झाली.

त्याचप्रमाणे १९४१ मध्ये भागलपूर येथे झालेल्या अखिल भारत हिंदुमहासभेच्या अधिवेशनास गो. र. पंचपोर, शं. बा. जोशी, के. वा. जोशी हे गेले होते. तेथे त्यांस अटक होऊन तुरुंगवास भोगावा लागला.

वेळोवेळी होणाऱ्या पालिकांच्या व विधिमंडळांच्या निवडणुकांत हिंदुसभेने भाग घेतला. सातारा नगर पालिकेत श्री. शि. वि. मोडक, गो. र. पंचपोर, व ईश्वरपूरच्या पालिकेत पंत सबनीस हे निवडून आले होते. कऱ्हाड अर्बन सहकारी बँकेत डॉ. वा. रा. जोशी हे गेली १६ वर्षे सतत नियामक म्हणून निवडून येत

आहेत. मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीत श्री. शि. वि. मोडक यांनी भाग घेतला होता. बॅ. जमनादास मेहता, ल. ब. भोपटकर हे निवडणुकीस उभे होते. त्या सर्वांना हिंदुसभेने आवश्यक ती मदत केली.

१९४६ मध्ये अखंड भारतासाठी सर्व जिल्हाभर प्रचार करण्यात आला. त्यानिमित्त कऱ्हाड, पाटण, शिराळा, ईश्वरपूर, विटे, तासगाव, कोरेगाव, खटाव, वडूज, दहिवडी, वाई, इत्यादि गावी श्री. शं. रा. दाते, ह. भा. भिडे, रा. म. आठवले, गो. र. पंचपोर यांचा दौरा काढण्यात आला व निधि गोळा करण्यात आला. १९४७ मध्ये निजाम राज्यात रझाकारांचा उपद्रव फार वाढला. त्या संबंधात हिंदु समाजात जागृति करण्यासाठी डॉ. बा. शि. मुंजे व वीर यशवंतराव जोशी यांचा दौरा काढण्यात आला. त्या भागातील हिंदु समाजाच्या साहाय्यार्थ निधि गोळा करण्यात आला. १९४७ वर्षी कऱ्हाड येथे प्रांतिक हिंदु महिला परिषद भरविण्यात आली.

१९४८ वर्षी गांधीवधाच्या निमित्ताने सरकारने सातारा जिल्ह्यातील हिंदुसभेच्या सुमारे दोनशे कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करून ठेवले होते. न्यायालयातून त्यांची नंतर सुटका झाली. चार स्त्रियांनाही अटक करण्यात आली होती. नंतर त्यांची सुटका करण्यात आली. या काळात हिंदुसभेच्या नेत्यांच्या व विशेषतः ब्राह्मणांच्या घरांची जाळपोळ करण्यात आली व चीजवस्त लुटण्यात आली.

या काळात सातारा येथे प्रतिवर्षी हिंदुसभेचे सुमारे एक हजार, कऱ्हाडमध्ये एक हजार व वाईत चारशे सभासद असत. कार्यकारी मंडळाच्या सभा नियमानुसार होतात, व निवडणुकाही केल्या जातात. सातारा जिल्ह्यातून हिंदुसभेच्या वतीने वीर सावरकर षष्टचब्दी निधि, त्रिकाळ जामिनकी निधि, १९४८ चा न्यायसाहाय्य निधि, स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारक निधि, जिल्हा हिंदुसभा कार्यार्थ निधि, महासभेच्या अधिवेशनार्थ निधि असे अनेक निधि वेळोवेळी गोळा करण्यात आले.

कऱ्हाड येथे मुसलमानांच्या ताबुताची मिरवणूक कृष्णा घाटावर नेण्याच्या आक्रमणातून कृष्णा घाटाचा वाद उत्पन्न झाला. तो कऱ्हाड हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. शंकरराव जोशी व त्यांचे सहकारी विष्णु अण्णा जोशी प्रभृति व वकील मंडळी यांनी शेवटपर्यंत चिकाटीने लढवून जिंकला. त्याचे वृत्त या ग्रंथात पृ. २०१ वर आहे. त्यानिमित्त कृष्णा घाटाच्या उत्खननाचे व त्यासंबंधीचे विशेष महत्त्वाचे कार्य श्री. शंकरराव जोशी, कऱ्हाड यांच्या नेतृत्वाखाली झाले. त्या संबंधात कोर्टात दावा दाखल करण्यात आला होता. तो कऱ्हाडच्या कोर्टात व त्यानंतर सातारा येथील जिल्हा कोर्टात व मुंबईच्या वरिष्ठ कोर्टातही चालला व हिंदुसभेने तो जिंकला. आता त्याचा सार्वजनिक विश्वस्त निधि निर्माण

करण्यात आला असून शंकरराव जोशी ते काम पहातात. हा दावा सात आठ वर्षे चालला होता.

परदेशी मिशनऱ्यांनो परत जा हे आंदोलन महाराष्ट्र प्रांतिक हिंदु सभेने श्री. ह भा भिडे, कृ. गं. गांगुर्डे व रा. स. भट यांच्या नेतृत्वाखाली सुरू केले. त्यात वाईच्या मिशन केंद्रावरील मोर्चात काळे प्रभृतींनीं भाग घेतला व मोर्चाची सर्व व्यवस्था केली.

१९५५ वर्षी गोवा विमोचन संग्रामात श्री. गो. र. पंचपोर व गणपतराव बापट यांनी भाग घेतला. १९५५ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आंदोलनातही सातारा जिल्हा हिंदुसभेने भाग घेतला. प्रतापगडचा मोर्चा, काशी विश्वेश्वर मुक्ति आंदोलन या संबंधात प्रचार कार्य केले व निधि जमविला. १९६० मध्ये कऱ्हाडात हिंदुसभेच्या नव्याजुन्या कार्यकर्त्यांचा एक संयुक्त मेळावा डॉ. वा. रा. जोशी व केशवराव जोशी यांनी घडवून आणला. १९५९ वर्षी सावरकरांना दोन जन्मठेपींची शिक्षा झाली असताही ते तिला पुरून उरले, म्हणून १९५९ वर्षी त्यांचा मृत्युंजय दिन साजरा करण्यात आला. त्या निमित्त सातारा जिल्ह्यातून दोन सहस्र रुपयांचा निधि सावरकरांना अर्पण करण्यात आला.

१९६४ वर्षी मुंबईच्या युकॅरिस्ट परिषदेच्या निषेधार्थ श्री. नृसिंह जोशी प्रभृतींचा सातारा जिल्ह्यात दौरा काढण्यात आला. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या षड्यंत्राची जनतेला कल्पना देण्यात आली. १९७५ च्या फेब्रुवारीत पाचगणी येथे महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या कार्यकारी समितीची सभा झाली. त्या वेळी एम. आर. ए. विरुद्ध तेथील जनतेने मोर्चा संघटित केला होता. त्यात हिंदुसभेने पुढाकार घेतला. सातारा जिल्हा हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. ज. गं. काळे यांनी या कामी विशेष मेहनत घेतली.

१९६५ जानेवारीत मांग बंधूंच्या वस्तीत संक्रांतीनिमित्त तिळगूळ व हळदकुंकू समारंभ करण्यात आला. महार, मांग, चांभार वस्तीत १९६५ च्या नोव्हेंबरात एक सामुदायिक भजनाचा कार्यक्रम करण्यात आला. त्यासाठी पुण्याच्या सौ. शांताबाई गोखले व त्यांच्या सहकारी भगिनी आल्या होत्या. असे कार्यक्रम मधून मधून केले जातात.

श्री. हर्षे यांनी स्वा. सावरकर, सेनापति बापट, के. वा. जोशी यांचा अल्प परिचय इ. परिचय पुस्तके लिहून प्रकाशित केली व हिंदुत्वनिष्ठ वाङमयाचा प्रचार केला.

याशिवाय वेळोवेळी महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेकडून सुचविण्यात येणारे कार्यक्रम करण्यात येतात. १९७५ वर्षी सातारा जिल्हयात हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. ज. गं. काळे, वाई हे असून उपाध्यक्ष डॉ. वा. रा. जोशी, व कार्याध्यक्ष कृ. म. आठल्ये हे आहेत.

सांगली जिल्हा हिंदुसभा

सांगली येथे सन १९३३ साली हिंदुसभेची स्थापना झाली. त्या वेळी श्री. एस. ए. कुलकर्णी हे तिचे अध्यक्ष व पंडितराव दांडेकर कार्यवाह होते. कार्यकारी मंडळात धनी वेलणकर, गणेश कोंडो गोडबोले, सदाशिव गणेश फडके, बाबूराव लिमये, देवल, इ. मंडळी सभासद होती. या सभेच्या वतीने हिंदुत्वाचा प्रचार मोठ्या प्रमाणावर झाला.

दि. १।८।१९३४ या दिवशी सांगलवाडीचे वारकरी लोक प्रतिवर्षाप्रमाणे पंढरीच्या यात्रेसाठी दिंडी घेऊन गणपति रस्त्याने पंढरपूरच्या वाटेस लागले असता शेजारी एक मशीद होती. तिच्या परिसरात असलेल्या उर्दू शाळेतील मुलांनी ही मिरवणूक अडविली व वारकऱ्यांचे टाळ व मृदंग काढून घेऊन दंगामस्ती सुरू केली. हिंदुसभेचे एक कार्यकर्ते शंभुराव इनामदार यांना ही वार्ता कळताच ते त्या ठिकाणी गेले, व त्यांनी वाद्ये पळविणारांना पकडून आणले. व वारकऱ्यांना बोलावून त्यांच्या सर्व वस्तु त्यांना परत केल्या व वाटेस लावले. शंभुरावांनी मुसलमान विद्यार्थ्यांना अशी जरबही दिली की हे वारकरी पंढरपुराहून परत येताना याच वाटेने समारंभाने वाजत गाजत परत जातील. त्या वेळी जर तुम्ही आडवे याल तर तुम्हांला शासन केल्याशिवाय आम्ही राहाणार नाही. पुढे पंढरीची वारी संपून ही वारकरी मंडळी परत आली तेव्हा वाजत गाजत याच रस्त्याने परत गेली. यामुळे मुसलमान समाजात थोडी चुळबूळ सुरू झाली व मशिदीवरून वाद्ये वाजविली जाण्यास हिंदूंना बंदी करावी यासाठी मुसलमानांनी सरकारकडे प्रयत्न केला. पण हायकोर्टाचे निकाल वाद्ये वाजविण्याच्या बाजूने यापूर्वी झाले होते. तथापि पुढे काही दिवसांनी मराठे यांच्या घरची लग्नाची एक मिरवणूक येथील खण भागातून राजरस्त्यावरून वाजत जात असता मुसलमानांनी ती अडविली व वाद्येही काढून घेतली. त्या सुमारास तेथे गोडबोले वकील, फडके वकील व धनी वेलणकर येऊन दाखल झाले. त्यांच्या प्रयत्नामुळे पोलिसांनी दंगे करणारांना अटक केली व त्यांच्या जवळ असलेली हत्यारे जप्त केली. पुढे त्या मुसलमान गुंडांवर खटले भरण्यात येऊन त्यांना शिक्षा झाल्या.

१९३३ पासून हिंदुसभेच्या मंडळींनी गणेशोत्सव संघटित करण्याचे काम केले. डॉ. सावरकर, बाबूराव गोखले, रामभाऊ राजवाडे, महादेवशास्त्री दिवेकर, केशवराव छापखाने यांच्यासारख्या विद्वान् मंडळींची व्याख्याने करण्यात येत. त्यामुळे हिंदुसभेच्या कार्याला चांगली चालना मिळाली.

१९३७ च्या ऑगस्टमध्ये स्वा. सावरकर हे स्थानबद्धतेतून मुक्त होऊन कोल्हापूर-पंढरपूर मिरज मार्गे प्रथमच सांगलीस आले. हिंदुसभेतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. हिंदुसभेचे अध्यक्ष धनी वेलणकर, गणपतराव गोडबोले, सदाशिव-

राव फडके, सराफ गाडगीळ, जोग, भिकूशेटजी, रामभाऊ भिडे, का. भा. लिमये, पंडितराव दांडेकर इ. मंडळींनी या कार्यात मोठा भाग घेतला. १९३७ पासून हिंदुसभेने शुद्धिकार्याला मोठ्या प्रमाणावर चालना दिली. सांगलीतील चांगल्या प्रतिष्ठित घराण्यांतील काही हिंदु मुली परकीय संस्कृतीच्या जाळ्यात अडकण्याच्या बेतात होत्या. अशा ५।६ मुलींना हिंदुसभेने सोडवून त्यांच्या पालकांच्या घरी पोचते केले. एका मराठा जातीच्या मुलीला नदीवरून पळविण्यात आले अशी वार्ता पंडितराव दांडेकरांना लागली. त्याबरोबर त्या मुलीच्या शोधासाठी खाडिलकर, धनुर्धारी गोडबोले, लिमये, रामराव वेलणकर, आबाराव ओक, वगैरे २०–२५ सायकलस्वार मिरज रस्त्याने १०–१२ मैलांपर्यंत शोध घेत दौडत गेले. जागरूकतेचा हा प्रकार पाहून मुलीला पळवून नेणाऱ्याने तिला गुपचूपपणे नदीवर आणून सोडले.

सांगलीपासून सुमारे ७ मैलांवर असलेल्या नांद्रे गावी व त्या सभोवतालच्या गावातील महार, मांग, रामोशी अशा सुमारे १५० लोकांना सामुदायिकपणे ख्रिश्चन करण्याचा जाहीर समारंभ होणार असल्याची वार्ता सांगली हिंदुसभेला लागली. तेव्हा पंडितराव दांडेकर यांनी १०-१२ हिंदुसभावादी मंडळी बरोबर घेऊन नांद्रे येथील काही प्रतिष्ठितांच्या मुलाखती घेतल्या. हे लोक धर्मांतरास कां तयार झाले याचा शोध घेता असे आढळून आले की अमेरिकन पैशाच्या बळावर हे धर्मांतर केले जात आहे. तेव्हा हिंदुसभेने ख्रिस्ती मिशनऱ्यांचा हा डाव उधळून लावण्याचे ठरविले. नांद्रे येथे संत पाचलेगावकर, विनायकमहाराज मसूरकर, दिवेकर शास्त्री, सांगलीची हिंदुसभेची इतर मंडळी यांच्या मदतीने प्रचाराची यंत्रणा उभी केली. ज्या दिवशी हे धर्मांतर व्हावयाचे होते त्या दिवशी सांगली-मिरजेहून अनेक मिशनरी लोक नांद्रे येथे आले होते. तेव्हा ज्या जागी हा धर्मांतराचा समारंभ आयोजित केला होता त्याच जागी हिंदुसभेने आपले व्यासपीठ उभे करून प्रचार चालविलेला त्यांच्या दृष्टीस पडला. तेव्हा आलेले मिशनरी मुकाट्याने परत गेले. या समयी मसूरकर महाराजांच्या अध्यक्षतेखाली तेथे सभा झाली व सभेत पाचलेगावकर, दिवेकर, कऱ्हाडचे बदामी, व सांगलीचे गणपतराव गोडबोले प्रभृतींची भाषणे होऊन त्यांनी धर्मांतरातील धोके त्या मंडळींच्या ध्यानात आणून दिले. त्यामुळे मिशनऱ्यांचा हा सर्व डाव फसला. यानंतर मिशनऱ्यांची गुप्त कारस्थाने सुरू झाली. तेव्हा सांगली हिंदुसभेनेही सांगलीवाडी, अंकले, डिग्रज, समडोळी वगैरे गावांतून प्रचार करून मिशनऱ्यांच्या पासून त्यांना सावध केले. सांगलवाडीचा नाना मांग हा दरोडे घालण्यात पटाईत होता. याला १-२ शिक्षाही झाल्या होत्या. तथापि तो देवधर्माला जपणारा होता. त्याच्या धर्मनिष्ठेचा फायदा घेऊन व त्याला वेळोवेळी मदत करून पंडितराव दांडेकरांनी त्याला सन्मार्गाला लावले. शुद्धिकार्यात त्याचा पुढे हिंदुसभेला फार उपयोग झाला. या शुद्धिकार्याच्या कामी सांगली हिंदुसभेला कोल्हापूरचे क्षात्र जगद्गुरु व आर्य समाजाचे चिटणीस मलिक

यांचे वेळोवेळी साहाय्य झाले आहे. त्यांच्या मदतीने हिंदुसभेने डिग्रज, समडोळी अष्टे, बावची, मनेराजुरी इ. गावातून सुमारे दीडशे लोकांना शुद्ध करून हिंदु धर्मात घेतले. वाई येथील एका मुसलमान मुलीचे हिंदूशी लग्न ठरले होते. त्या मुलीला हिंदु व्हावयाचे होते. पंडितराव दांडेकर यांनी तिची माहिती घेऊन ती सज्ञान व मनाची पक्की आहे असे पाहून तिचे अॅफिडेव्हिट कोर्टात करवून घेतले. कोर्टात एक शिपाई मुसलमान होता त्याने ही वार्ता वाईला तारेने कळविली. तेव्हा तिला पळवून नेण्याचा वाईच्या मुसलमानांनी रातोरात सांगलीस येऊन प्रयत्न केला, पण त्यांना परत जावे लागले.

१९३८ सालापासून हिंदुसभेचे सभासद वाढविण्यावर भर देण्यात आला. बाबूराव उदगावकर यांनी एका महिन्यात सांगलीतून हिंदुसभेचे १००१ सभासद नोंदविले. तेव्हा सावरकरांनी त्यांचे अभिनंदन केले. बॅ. जमनादास मेहता, अण्णासाहेब भोपटकर, गणपतराव गोडबोले हे जेव्हा जेव्हा निवडणुकांना उभे राहिले तेव्हा तेव्हा सांगली हिंदुसभेने त्यांना सर्व प्रकारे शक्य ती मदत केली आहे.

१९३९ वर्षी स्वा. सावरकर यांच्या नेतृत्वाखाली भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचे आंदोलन झाले. त्यात बाबूराव लिमये, शिवरामपंत आठवले, अण्णाराव टाकसाळे, शंकरराव हडदरे, आत्माराम पाटणे, बाळ नातू, नाना छत्रे, शंकरराव करमरकर, नाना जोशी, सीतारामपंत आवटी, नानाराव दांडेकर, रामराव करंदीकर, माधवराव जोशी, काशीनाथराव कुलकर्णी, बापूराव गोरे, एकनाथ भालेदार, आनंदमूर्ति कुलकर्णी, बापूराव वैद्य प्रभृतींनी भाग घेऊन कारावास पत्करला होता. त्याचप्रमाणे १९४१ च्या भागलपूर येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाला बंदी घालणारा हुकूम मोडण्यासाठी जे गेले त्यांत माधवराव दिवाण, पंडितराव दांडेकर, अप्पा कासार, किणीकर, दामुअण्णा भट आदि मंडळी प्रमुख होती. पुढे १९४२ च्या स्वातंत्र्य-आंदोलनात हिंदुसभेचे अध्यक्ष दडगे पाटील, महादेवराव चौगुले आदींनी भाग घेतला.

बाबाराव सावरकर हे शेवटच्या दिवसांत सांगलीस येऊन राहिले होते. तेथेच त्यांचे दि. १६।३।४५ ला निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ सांगलीच्या हिंदुसभेने पुढाकार घेऊन एक स्मारकनिधि उभा केला आहे.

१९५४ वर्षी महाराष्ट्र हिंदुसभेच्या वतीने परदेशी मिशनऱ्यांनी भारत सोडून जावे यासाठी परदेशी मिशनांवर मोर्चे काढण्यात आले. त्यात कोडोली येथील मिशनवरील मोर्चाचे नेतृत्व सांगलीच्या हिंदुसभेने केले होते. प्रथम या मोर्चास कोडोली येथे ख्रिश्चन लोकांनी मारहाण केली; तेव्हा महाराष्ट्रातील सर्व ठिकाणच्या हिंदुसभावादी मंडळींनी कोडोलीस जाऊन पुन्हा मोर्चा काढण्याचे ठरविले. त्याप्रमाणे मोर्चा गेला तेव्हा जिल्हा मॅजिस्ट्रेटने १४४ कलमा-

खाली त्यांस बंदी केली. ती कार्यकर्त्यांनी मोडली तेव्हा त्यांना अटक करण्यात आली. त्यासंबंधीचे वृत्त या ग्रंथात पृ. ३३७–३४२ वर आले आहे. १९५५ साली संयुक्त महाराष्ट्र समितीच्या व नंतर गोवा मुक्ति आंदोलनात सांगली हिंदुसभेने सर्व प्रकारे सहकार्य केले.

हिंदुसभेच्या कार्याचे नेतृत्व धनी वि. रा. वेलणकर, गणपतराव गोडबोले, पंडितराव दांडेकर यांनी दीर्घकाळ केले असून सध्या पंडितराव दांडेकरांच्या अध्यक्षतेखाली हे कार्य चालू आहे. हिंदुसभेच्या कार्यात श्री. केशव नारायण जोग, माधवराव भिडे, आवाराव ओक, का. भा. लिमये, सदाशिवराव फडके, बाबूराव लिमये, बाबूराव उदगावकर, आठवले बंधु, भास्करराव पोंक्षे, बापूराव बिनिवाले, शेषाप्पा वोळाज, अप्पाराव दडगे पाटील, अण्णाराव कुलकर्णी, गजाननराव गोखले, चिं. श्री. गोखले, विश्वनाथराव चौगुले, विष्णुपंत बांदिवडेकर, श्रीपादराव जोशी दत्तोपंत खाडिलकर, शंभुराव इनामदार, उद्धवराव वसगडेकर, जोग, माधवराव दिवाण, बापूराव साठे, बच्चू नाना वैद्य, वामन जोशी व मिरजेस श्री. दामोदर मोरेश्वर भट, व धुंडिराज पटवर्धन इत्यादींनी हिंदुसभेचे कार्य निष्ठेने केले व अजून ते चालू आहे. सांगली जिल्ह्यातील हिंदुसभा ही महाराष्ट्रातील एक कार्यक्षम संघटना आहे.

मुंबई हिंदुसभा

मुंबई येथे १९२३ वर्षीच हिंदुसभेची स्थापना झाली. बॅ. बाबासाहेब जयकर हे तिचे अध्यक्ष व श्री. शं. नवरे हे तिचे कार्यवाह कित्येक वर्षे होते. आरंभीच्या काळात हिंदुसभेचा विशेष भर शुद्धीकरण, अस्पृश्यता निवारण व सामाजिक संघटना करण्यावर व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यावर होता. १९२५ वर्षी दि. ३ व ४ डिसेंबरला लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईस प्रांतिक हिंदुसभेचे अधिवेशन झाले. स्वामी श्रद्धानंद हेही त्या अधिवेशनाला उपस्थित होते. या काळात हिंदूंच्या मुली पळविण्यावर मुसलमान गुंडांचा विशेष भर असे. म्हणून दुर्दैवी आपद्ग्रस्त स्त्रियांच्या संरक्षणासाठी एखादा आश्रम काढावा असे स्वामी श्रद्धानंदांनी सुचविले. पुढे डिसेंबर १९२६ मध्ये एका मुसलमानाने स्वामीजींची हत्या केली. तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ १९२७ वर्षी मुंबई हिंदुसभेच्या पुरस्काराने मुंबईस श्रद्धानंद अनाथ हिंदु महिलाश्रम ही संस्था स्थापन करण्यात आली. राजा नारायणलाल बन्सीलाल यांनी या कामी विशेष लक्ष घातले. डॉ. उदगावकर व श्री. शं. नवरे यांनी या संस्थेचे कार्य दीर्घकाळपर्यंत केले. आजही ती संस्था अतिशय उपयुक्त कार्य करीत आहे. त्याची माहिती या ग्रंथात (पृ. ८२–८४) आलेली आहे.

मुंबईस १९२५ नंतर हिंदु-मुसलमान वाद मोठ्या प्रमाणावर वाढला होता. मुंबईस व इतर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर दंगली झाल्या. तेव्हा हिंदूंच्या

रक्षणार्थ मुंबई हिंदुसभेने विविध प्रकारची कामे केली. मुसलमानी वस्तीच्या भागात राहणाऱ्या हिंदूंना संरक्षण देणे, त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविणे, त्यासाठी निधि गोळा करणे ही कामे हिंदुसभेने सातत्याने केली. मुंबईस भायखळा स्टेशनजवळ मारुतीचे मंदिर असून शेजारी मशीद आहे. या मंदिरात वाद्ये वाजविण्यावरून हिंदु-मुसलमानांत वाद झाला. त्या वेळी बॅ. जमनादास मेहता हे मुंबई महापालिकेचे अध्यक्ष होते. त्यांनी हा लढा यशस्वी रीतीने लढविला. त्यांना हिंदुसभा कार्यकर्त्यांनी सर्व प्रकारे साहाय्य केले. मुंबई हे एक राजधानीचे शहर, वृत्तपत्रांचे केंद्र, विविध प्रकारच्या राजकीय चळवळींचे उगमस्थान व सर्व महाराष्ट्रभरच नव्हे तर भारतभर सर्वत्र प्रभाव पाडणारे महत्त्वाचे ठिकाण असल्यामुळे वेळोवेळी निर्माण होणाऱ्या राजकीय चळवळीतही मुंबई हिंदुसभेचे कार्यकर्ते सतत भाग घेत आले. १९२९ च्या गांधींच्या दांडीयात्रेनंतर झालेल्या आंदोलनात हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनीही भाग घेतला होता. त्या वेळी ते काँग्रेसमध्येच होते. १९२९ व ३२ सालच्या काँग्रेसच्या आंदोलनात भाग घेतल्याबद्दल अनेक हिंदुसभावादी मंडळींना कारावासही भोगावा लागला.

१९३० मध्ये विलायतेत पहिली गोलमेज परिषद झाली. तिला गांधी गेले नाहीत, पण डॉ. मुंजे हे त्या वेळी केंद्रीय (विधिमंडळाचे) एक सभासद व हिंदुमहासभेचे अध्यक्ष होते; म्हणून त्यांना गोलमेज परिषदेला येण्याबद्दल निमंत्रण होते. तेव्हा हिंदूंची बाजू तेथे नीट मांडली जावी यासाठी तिला डॉ. मुंजे यांनी अवश्य जावे असे त्यांना मुंबई व पुणे येथील हिंदुसभा कार्यकर्त्यांनी सुचविले व ते १९३० व नंतर १९३१ च्या गोलमेज परिषदेला गेलेही. पुढे गांधीजीही १९३१ च्या गोलमेज परिषदेला उपस्थित राहिले.

ब्रिटिश सरकारने मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ दिले. काँग्रेसने त्यांस पाठिंबा दिला. तेव्हा हिंदुसभा व काँग्रेस यांच्यातील मतभेद फार तीव्र झाले. हिंदुसभेने जातवार निर्णयाविरुद्ध मोठी चळवळ केली. गांधीजी व काँग्रेसचे इतर नेते हे १९३२ साली तुरुंगात अडकून पडले होते. एकंदर राजकारणाचा डाव कुजला होता. तेव्हा त्यातून मार्ग काढण्यासाठी टिळक पक्षीयांनी मुंबई येथे लोकशाही स्वराज्य पक्षाची स्थापना केली. हा पक्षही काँग्रेसच्या अंतर्गतच होता. त्याची वर्गणी तेव्हा पाच आणे (पैकी चार आणे काँग्रेसची वर्गणी व एक आणा लोकशाही पक्षाची वर्गणी) होती. पुढे काँग्रेस व हिंदुसभा यांच्यातील मतभेद वाढत गेले व हिंदुसभावादी काँग्रेसमधून बाहेर पडले. १९३७ पासून स्वा. सावरकरांच्या नेतृत्वाखाली हिंदुसभेच्या कार्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्यात मुंबईच्या हिंदुसभेने सर्व प्रकारे महत्त्वपूर्ण भाग घेतला.

१९३९ वर्षी भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचे आंदोलन स्वा सावरकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले. त्यात मुंबई हिंदुसभेने प्रमुख भाग घेतला. मुंबई

हिंदुसभेचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. अनंत हरि गद्रे यांच्या नेतृत्वाखाली दीडशे सत्याग्रहींचा जथा औरंगाबाद येथे गेला. तेथे त्यास अटक झाली, व त्यास औरंगाबाद तुरुंगात ठेवण्यात आले. १९४१ मध्ये भागलपूर येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनास सरकारने बंदी केली तेव्हा ती मोडून तेथे हिंदुसभेचे अधिवेशन भरविण्याच्या कामी मुंबई हिंदुसभेने भाग घेतला. मुंबईस वेळोवेळी झालेल्या दंग्यांच्या काळात हिंदुसमाजाच्या संरक्षणार्थ मुंबई हिंदुसभेच्या स्वयंसेवकांनी पराकाष्ठा केली. त्याचा वृत्तांत या ग्रंथात मागे (पृ. १८४–१८५) आलेला आहे.

हिंदु समाजावर जेव्हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने आक्रमण केले गेले तेव्हा हिंदुसभेने पुढाकार घेऊन त्या आक्रमणांचा यथाशक्ति प्रतिकार केला आहे व दंग्यांच्या काळात हिंदु समाजाला संरक्षण दिले आहे. मुंबईस फाळणीपूर्वीच्या काळात हिंदूविरुद्ध आक्रमक दंगे अनेक वेळा झाले. त्यांना १९४६ पासून एक-दोन वर्षे फारच ऊत आला होता. त्या काळात हिंदुसभेने अनेक ठिकाणी हिंदूंना आधार दिला व त्यांच्या संरक्षणाची तजवीज केली. मुंबईस १९४६ मध्ये दंग्यांच्या अफवा वारंवार उठत होत्या. तेथे काही भागांत मुसलमानांची मोठी वस्ती असून कोकण बोटींच्या बंदरावरून गावात येण्यासाठी त्यांच्या वस्तीतून यावे लागे. त्यामुळे दंग्यांच्या काळात हिंदूंवर मोठीच आपत्ति येई.

यापूर्वीच्या काँग्रेस राजवटीतही असाच एकदा दंगा झाला होता, पण तो त्या वेळचे गृहमंत्री मुनशी यांनी अल्पावधीत बंद पाडला होता. म्हणून हिंदु जनता १९४६ च्या दंग्याच्या वेळेसही गृहमंत्र्यांवर प्रथम विसंबून होती. पण या वेळी सर्वच परिस्थिति बदलली होती. १९४५–४६ च्या हिंदुसभेच्या वृत्तान्तात म्हटले आहे की "हिंदुसभेचा पक्ष मूठभर लोकांचा; पण सुदैवाने या वेळचा दंगा गृहमंत्र्यांच्या हातातला नाही हे त्यांच्या लवकर लक्षात आले व त्यांनी आपल्या हाती आलेली तोटकी साधने संघटित करून कोणत्याही क्षणी हिंदू जनतेच्या मदतीस धावून जाण्याची तयारी ठेविली. या तयारीचा चांगला उपयोग झाला. पहिल्या दिवशी दंगा एखाद्या वणव्याप्रमाणे पेटला. सरकारी कर्फ्यू ऑर्डरला धाब्यावर बसवून मुसलमानांचे सशस्त्र जमाव त्यांच्या मोहोल्ल्यात फिरत होते. त्यांना अटकविण्याची पोलिसलाही धास्ती वाटे. त्यामुळे त्या वस्तीत अडकलेल्या हिंदु वस्तीचे काय होणार, हा भयानक प्रश्न सर्वांपुढेच आ वासून उभा राहिला.

"हिंदुसभेने कोणाचीही वाट न पहाता आपल्या हिंदु बांधवांना सोडवून आणण्यासाठी दोन मोटार लॉऱ्या मिळवून त्या प्रत्यक्ष काळाच्या जबड्यात लोटल्या. परिस्थिति इतकी बिकट झाली होती की, अडकलेल्या हिंदु बांधवांचा आपल्या साहाय्यासाठी कोणी धावून आले असेल यावर विश्वासच बसेना. त्यांची समजूत घालून आवश्यक त्यांना बाहेर काढण्यात आले. या उपकाराचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणारी किती तरी पत्रे हिंदुसभेजवळ आहेत. मदनपुऱ्यात १५० दूधवाले भय्ये

अडकले होते. त्यांच्याजवळ ना टेलिफोन ना मोटारी. हिंदुसभेला कुठूनतरी ही बातमी समजली नि ताबडतोब त्यांना बाहेर काढण्यात आले. पहिल्या दोन चार दिवसांतच हिंदुसभेने जनतेचा फार मोठा विश्वास संपादन केला. इतका की काही हिंदूंनी आपणहून आपल्या गाड्या महासभेला देऊ केल्या. चाळी-चाळींनी आपणहून वर्गण्या जमवून निधि आणून दिला नि स्वयंसेवकांना उभे रहावयास महासभेचे कार्यालय पुरेनासे झाले.''

लोकांची मदत सुरू झाल्यामुळे शहरातल्या काही भागांत सहायक केंद्रे स्थापन करणे शक्य झाले. या केंद्रांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे हिंदु जनतेला बंदर, स्टेशने इत्यादि ठिकाणी पोहोचविणे हे होते. दंग्यामुळे शहरातील फार मोठ्या भागातील ट्रॅमगाड्या बंद पडल्या. बसेसची वाहतूक थांबली. या वेळी महासभेच्या गाड्या नसत्या तर लोकांचे अतोनात हाल व नुकसान झाले असते. अनेक लोक गुंडांच्या सुऱ्यांना बळी तरी पडले असते किंवा टॅक्सीवाल्यांनी गरीबगुरीब जनते-कडून कल्पनातीत भाडे घेऊन त्यांना नागविले असते. या काळात महासभेच्या गाड्या गिरगाव, लालबाग, परळ नि दादर या प्रमुख केंद्रांतून दररोज कमीत कमी दीड ते दोन हजार लोकांना बंदर किंवा प्रमुख स्टेशनांवर पोहोचविण्याचे किंवा आणण्याचे काम करीत.

भगवा ध्वज फडकवीत शहराच्या सर्व भागांतून फिरणाऱ्या गाड्या म्हणजे हिंदु जनतेला या काळात केवढा मोठा आधार वाटत होता याची कल्पना खालील उदाहरणांवरून येईल.

हजारसिंग नावाचे एक गृहस्थ पंजाबहून बोरीबंदरवर उतरले. बोरीबंदरवर टॅक्सी मिळेना म्हणून कोणाला तरी विचारून निघाले. ते क्रॉफर्ड मार्केटपाशी आले. तेथे त्यांना एकही हिंदु दिसेना नि वातावरणही वेगळे वाटू लागले. गृहस्थ घाबरला. पण तेवढ्यात महासभेची गाडी भाऊच्या धक्क्यावरून परत येत होती. पळत येऊन हा मनुष्य गाडीसमोरच उभा राहिला,

एक महिला सुरतहून मुंबई सेंट्रल स्टेशनवर उतरली. तिने नातेवाईकांना पत्र पाठविले होते. पण दंग्यामुळे ते न पोहोचल्याने स्टेशनवर कोणीही आलेले नव्हते. महासभेच्या स्वयंसेवकांनी तिला इष्ट स्थळी पोचते केले.

महासभा ताबडतोब धावून येते हे समजल्यावर सर्वसामान्य लोकही डोळे उघडून आजूबाजूला पाहू लागले. आर्थर रोड हॉस्पिटलमधील एका अधिकाऱ्याने कळविले की, बंगलोरहून आलेल्या दोन मुली वाट चुकून घाबरलेल्या स्थितीत हिंडत होत्या, त्यांना भेटून तूर्त मी ठेवून घेतले आहे. मुंबई प्रां. हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. गद्रे यांनी त्यांची लगेच व्यवस्था केली.

संगमेश्वरच्या एका इसमाने पत्र लिहून कळविले की आमच्या नातेवाईकांचा पत्ता नाही. चौकशी करावी नि काय ते कळवावे.

माझे नळबाजारातील दुकान लुटले जात असल्याचे समजले आहे. काही करता येईल काय ? कळवा, असा दूरध्वनि आला. स्वयंसेवक घेऊन गाडी गेली नि दुकानातील किती तरी माल त्यांच्या हाती लागला.

शिवडी येथील पठाण वस्तीतील मारुती मंदिरातील मूर्ति फोडण्यात आलेली आहे. पोलिस व सरकार दाद घेत नाही. काय करावे ? महासभेने नाना लटपटी करून मूर्तीची प्रतिष्ठापना केली. नित्यशः महासभेचे स्वयंसेवक तेथे जाऊन येतात.

कुंभारवाड्यातील वस्ती दंग्याच्या सुरवातीस फार मोठ्या प्रमाणात खाली होऊ लागली. चांगले जवान मुंबईतून निघून जाऊ लागले. मुसलमानांच्या भीतीने नव्हे तर पोलीस वाटेल तशी धरपकड करतात म्हणून. महासभेचे कार्यकर्ते मोरारजीपर्यंत भिडले. पोलीस अधिकाऱ्यांना भेटले. वस्ती परत आली नि कुंभारवाडा हा हिंदूंचा बाले किल्ला बनून राहिला.

या धरपकडीने अनेक अज्ञानी व निरपराध लोकांचे हाल झाले. या लोकांना कायद्याचे साहाय्य देणे हे नितांत आवश्यक काम होते. महासभेच्या वकिलांनी तीन महिने ही कामे विनामूल्य चालविली.

एक तक्रार. समोरून दगड येत आहेत. पोलिसांना आम्ही ते दाखविले पण कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. अशा प्रसंगी हिंदुसभेने पोलिस अधिकाऱ्यांना भेटून, प्रत्यक्ष पुरावे देऊन पोलिसांच्या पक्षपाताला शक्य तितका आळा घालण्याचे प्रयत्न केले. गेल्या काही दिवसांपासून महासभेने एक नवीन कार्य हाती घेतले आहे. ते म्हणजे निरनिराळ्या वाड्यावाड्यांतून स्थापन झालेल्या संरक्षक समित्यांची मध्यवर्ती व एकसूत्री संघटना करण्याचे. या कामातही बरेच यश येत असून काही दिवसांत मुंबईतील हिंदुसमाजाची महासभेच्या नेतृत्वाखाली एक प्रबल संरक्षक फळी निर्माण होईल असा आत्मविश्वास, हल्ली चाललेल्या प्रचंड व बहुविध कार्यावरून निर्माण झालेला आहे.

गेल्या ३ महिन्यांतील बहुविध कार्यांचे आकडे असे :

दंगा सुरू झाल्यापासून नोव्हेंबर अखेरपर्यंत हिंदुसभेने आपल्या मोटारींतून एकूण १ लक्ष १७ हजार माणसांची विनामूल्य ने-आण केली.

२३५ बेपत्ता झालेल्या हिंदु इसमांपैकी ४० इसमांचा पत्ता महासभेच्या स्वयंसेवकांनी लावून दिला.

१०३५ इसमांना विनामूल्य वकिली साहाय्य दिले.

२३५ इसमांना महासभेच्या कार्यकर्त्यांनी स्वतः जामीन राहून सोडविले.

कर्नाटक तर्फेचे दिल्ली विधिमंडळातील काँग्रेस खासदार श्री. द. प. करमरकर पुण्याहून आपल्या मुलाबाळांसह रात्रीच्या वेळी बोरीबंदरवर उतरले. टॅक्सी-व्हिक्टोरिया मिळेना. पण महासभेची मोटार मात्र हजर होती. स्वयंसेवकांनी त्यांना आणवून मोटारीत बसविले व घरी पोहोचते केले. त्यानंतर त्यांनी महासभेच्या कचेरीकडे देणगी पाठवून या कार्याची फार प्रशंसा केली.

सरदार वल्लभभाई पटेल यांनीही महासभेच्या कार्यकर्त्यांना आपल्या येथील मुक्कामात मुद्दाम बोलावणे पाठवून त्यांचेशी दीर्घकाल चर्चा केली.

१९४७ साली रामदास नौका बुडाली. तेव्हा तिच्यावरील उतारूंना वाचविण्यापासून आधार नि आश्रय देण्यापर्यंत व त्या त्या लोकांना त्यांच्या नियोजित स्थळी नेऊन पोचविण्यापर्यंतची कामे हिंदुसभेने केली. त्याबद्दल मुंबईच्या शेरीफपासून राज्यपालांपर्यंत सर्वांनी हिंदुसभेला धन्यवाद दिले.

१९४७ साली कॉंग्रेसने देशाची फाळणी मान्य केल्यामुळे त्याच्या निषेधार्थ मुंबईत हिंदुसभेने हरताळाचा आदेश दिला व त्यास अनुसरून दि. ३ जुलै १९४७ ला मुंबईत फार मोठ्या प्रमाणावर आणि शिस्तबद्ध असा हरताळ पाडण्यात आला व शासनाचा बंदी हुकूम मोडून श्री. अ. स. भिडे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या सभागृहावर मोर्चा नेण्यात आला. तेव्हा सरकारने सर्वांना अटक केली.

पाकिस्तान झाल्याबरोबर त्या भागातून हिंदु निर्वासितांची आवक मुंबईत मोठ्या प्रमाणावर वाढू लागली. तेव्हा त्यांच्या साहाय्यार्थ मुंबई हिंदुसभेने साहाय्य केन्द्रे सुरू केली. त्या वेळी कित्येक दिवस रोज हजार हजार माणसांच्या जेवण्याची व्यवस्था करावी लागली. माधवाश्रमाचे श्री. परशुरामभाऊ महाजन यांनी हे कार्य मोठ्या जिद्दीने व हिंमतीने पार पाडले.या कामासाठी राजा नारायणलाल बन्सीलाल, कृ. ह. ढमढेरे, ल. गो. विंझे, का. वि. खानविलकर, म. रा. कुळकर्णी, वामनराव गुळवणी, दत्तोपंत पातकर, डॉ. वि. ज. भिडे आदि मंडळींनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत संघटित केली म्हणूनच मुंबई हिंदुसभेला हे सर्व कार्य करता आले. ख्रिश्चन व पार्शी इसमांनीही हिंदुसभा केंद्रास भेट देऊन या साहाय्यकार्याचे अभिनंदन केले व एका ख्रिश्चन गृहस्थाने तर या कार्यासाठी पाच हजार रुपयांची देणगी दिली.

दि. १५ ऑगस्ट १९४७ ला भगवा ध्वज उभारण्यास सरकारने बंदी केली तेव्हा बंदी आज्ञा मोडून मुंबईभर भगव्या ध्वजाच्या मिरवणुका सर्वत्र काढण्यात आल्या. त्या सर्व चौपाटीवर विसर्जित झाल्या. १९४८ वर्षी गांधीवधाच्या निमित्ताने मुंबईतील हिंदुसभा कार्यालये भडकलेल्या लोकांनी जाळली व हिंदुसभेचे कार्यकर्ते कारावासात डांबले गेले. काही दिवसांनी त्यांची सुटका झाल्याबरोबर त्यांनी पुन्हा हिंदुसभेचे कार्य संघटित करण्यास सुरवात केली.

१९४८ मध्ये काही मंडळींकडून हिंदुसभेकडे अशी सूचना करण्यात आली होती की, हिंदुसभेचे स्वरूप निधर्मवादी दाखविण्याकरिता हिंदुसभेत अहिंदूंनाही प्रवेश देण्यात यावा. त्यावर प्रांतिक हिंदुसभेची बैठक भरून तीत हिंदुसभेत अहिंदूंना प्रवेश देण्याच्या प्रश्नास तीव्र विरोध करण्यात आला. हिंदुसभेच्या घटनेत कोणताही मूलभूत स्वरूपाचा बदल करू नये असे असंदिग्ध रीतीने एकमताने ठरविण्यात आले. आवश्यकच वाटले तर काही काळ राजकीय कार्य स्थगित ठेवण्यात यावे,

पण हिंदुसभेत अहिंदूंना प्रवेश देण्याचा विचार करू नये असे स्पष्ट मत व्यक्त करण्यात आले.

१९४९ वर्षी हिंदुमहासभेचे माजी अध्यक्ष स्वा. सावरकर यांची गांधीवधाच्या खटल्यातून संपूर्णपणे निर्दोषी म्हणून सुटका झाली. त्यांच्यावरील खटला चालविण्याचे काम भोपटकरांनी केले होते. या खटल्याच्या कामासाठी पुण्यास रामभाऊ मंडलीक व ग. वि. केतकर यांनी न्यायसाहाय्यनिधि उभा केला होता. त्यास मुंबई हिंदुसभेने मोठ्या प्रमाणावर निधि गोळा करून साहाय्य केले. या कामी डॉ. सुधाताई पटवर्धन, वसंतराव धुरू, एकनाथराव खानोलकर, कृष्णाबाई दिवेकर, अनंतराव कोल्हापुरे, कै. भास्कर शिंदे प्रभृतींनी विशेष कामगिरी बजावली.

१९४९ वर्षी प्रा. वि. घ. देशपांडे यांची मुंबईत व्याख्याने करविण्यात आली. या वेळी सिंधमधून आलेल्या सिंधी हिंदुसभेचे श्री. ठाकुरदास अग्न्यानी, मेघराज छावडिया, पंजुराम वर्मा, सेवाराम गुप्त, हुंदराजदास आदि मंडळींनी देशपांडे यांची सिंधी वसाहतींतून व्याख्याने करविली.

दि. १९ ऑक्टोबर १९४९ ला हिंदुसभेचे एक ज्येष्ठ नेते डॉ. नारायण दामोदर सावरकर यांचे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे मुंबई हिंदुसभेचा एक आधारस्तंभ निखळून पडला. १९४९ मध्येच कलकत्ता येथे डिसेंबरात हिंदुमहासभेचे अधिवेशन झाले. स्वा. सावरकरांची प्रकृति बरी नसताही ते या अधिवेशनास उद्घाटक म्हणून उपस्थित राहिले होते. मुंबईहून दीडशे मंडळी या अधिवेशनास गेली होती.

१९५० वर्षी नेहरू लियाकत कराराच्या निषेधार्थ प्रचार करण्यात आला. तेव्हा ते निमित्त करून सरकारने स्वा. सावरकर, पं. बखले, गोकुळचंद गोयल, भा. नी. भागवत, शि. वि. देवधर, अगरवाल, बाळाराव सावरकर आदि मुंबईच्या कार्यकर्त्यांना अटक केली. त्याचप्रमाणे पुण्यास ल. ब. भोपटकर, ग. त्रि. केतकर, शं. रा. दाते, ग. म. नलावडे, प्रा. श्री. म. माटे, गोविंदस्वामी आफळे, जगदीश भोपटकर, आदींना अटक करून स्थानबद्ध करून ठेवले. चार महिन्यांनंतर न्यायालयातून त्यांची सुटका झाली.

१९५० वर्षी पुण्यास डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुमहासभेचे अधिवेशन झाले. ते अधिवेशन यशस्वी करण्याच्या कामी मुंबई हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी सक्रिय भाग घेतला.

१९५२ साली नवीन घटनेनुसार निवडणुका झाल्या. त्यात मुंबई हिंदुसभेने भाग घेतला. गिरगाव हिंदुसभेच्या वतीने श्री. भा. द. वाघ यांना उभे करण्यात आले होते. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले व फाळणी झाली तर ती नष्ट करून देश पुन्हा अखंड करण्याचे काम आता नव्या पिढीचे आहे, आम्ही आमचे काम केले, आमची प्रतिज्ञा पुरी झाली, हे लक्षात घेऊन सावरकरांनी अभिनव भारत सांगता समारंभ पुण्यास दि. १० मे १९५२ ला मोठ्या प्रमाणावर घडवून आणला. त्यानिमित्त तीन दिवस स्वा. सावरकरांची पुण्यास विशेष महत्त्वाची व्याख्याने झाली.

त्यानिमित्त महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतून हिंदुसभा कार्यकर्ते गोळा झाले होते. मुंबई हिंदुसभेने या कार्यक्रमात विशेष भाग घेतला. १९४३ वर्षी स्वा. सावरकरांचा पुण्यास मोठ्या प्रमाणावर षष्टयब्दीपूर्ति समारंभ करण्यात आला. त्यासाठी मुंबई हिंदुसभेने निधि गोळा केला. त्याचप्रमाणे १९६० वर्षी स्वा. सावरकरांचा मृत्युंजय दिन साजरा करण्याच्या कामी निधि गोळा करण्यातही मुंबई हिंदुसभेने पुढाकार घेतला. यानंतर संयुक्त महाराष्ट्र समिति, गोवा विमोचन समिति यात मुंबई हिंदुसभेने भाग घेऊन त्या चळवळींना सर्व प्रकारे साहाय्य केले. १९६४ वर्षी मुंबईस कॅथॉलिक ख्रिश्चन मिशनऱ्यांनी युकॅरिस्ट काँग्रेस भरविली त्यास विरोध करण्याकरिता मुंबई हिंदुसभेने मोठी चळवळ संघटित केली. तिचा वृत्तान्त या ग्रंथात अन्यत्र (पृ. ३५३–३६८) स्वतंत्रपणे दिला आहे. महाराष्ट्र हिंदुसभेने वेळोवेळी आखलेले कार्यक्रम मुंबई हिंदुसभेने कार्यवाहीत आणले आहेत. मुंबई हिंदुसभेच्या परळ शाखेने शुद्धीकरणाचे व हिंदुसमाजातील सर्व जातीमधील लोकांचे विवाहादि संस्कार अल्प खर्चात करून देण्याचे कार्य गेली कित्येक वर्षे सातत्याने चालविले आहे. शेकडो ख्रिश्चन व मुसलमानांचे येथे हिंदूकरण झाले असून येथे होणारे सर्व विवाह वैदिक पद्धतीने होतात. हे कार्य आजही उत्तम रीतीने चालू आहे. महानगरपालिका व विधिमंडळे यांच्या निवडणुकीतही हिंदुसभेने वेळोवेळी भाग घेतला असून अनेकदा त्या यशस्वी रीतीने जिंकल्याही आहेत.

हिंदुसभेच्या प्रचारार्थ मुंबई हिंदुसभेचे प्रमुख कार्यकर्ते अ. स. भिडे, पंडितराव बखले व बाळाराव सावरकर प्रभृतींनी ‘फ्री हिंदुस्थान’ हे इंग्रजी व ‘हिंदु’ हे मराठी साप्ताहिक बरीच वर्षे चालविले. स्वा. सावरकर यांच्या निधनानंतर मुंबई हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या स्मरणार्थ स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारक समिति निर्माण केली असून ती संस्था स्वतंत्रपणे नोंदविण्यात आली आहे. तिला मुंबई महापालिकेने दादरलाच नुकतीच मोठी जागा दिली असून तेथे स्वा. सावरकरांचे राष्ट्रीय स्वरूपाचे भव्य स्मारक करण्याचा प्रयत्न सध्या चालू आहे.

मुंबई हिंदु सभेचे पहिले अध्यक्ष बॅ. बाबासाहेब जयकर होते. त्यानंतरच्या काळात राजा नारायणलाल बन्सीलाल, लक्ष्मीदास तेरसी, अ. स. भिडे, रावबहादूर सी. के. बोले, डॉ. नारायणराव सावरकर, अनंत हरि गद्रे, डॉ. ना. अ. देशमुख, श्री. न. दा. डांगे, पंडित बखले प्रभृति अध्यक्षपदी होते. मुंबईच्या हिंदुसभा कार्यकर्त्यांत श्री. बाळाराव सावरकर, गो. र. प्रधान, रा. तु. मसुरकर, माधवराव पाठक, वि. गं. देसाई, पद्माकर ढमढेरे, ल. र. साटेलकर, एकनाथ खानोलकर, बापूराव घारपुरे, प. म. पेंडसे, रा. के. नगरकर, गं. बा. परमेकर, गोकुळचंद गोयल, भा. नि. भागवत, शि. वि. देवधर, वामनराव चव्हाण, श्री. आगरवाल, कृ. का. आठल्ये गुरुजी, रा. म. पुराणिक, वि. वा. परांजपे, श. म. मराठे, भा. वि. जोशी, राजाभाऊ कुलकर्णी, माधवराव चुरी, रा. म. आठवले, डॉ. वि. ज. भिडे, अशोक

सावरकर, अप्पा कासार, बाळाराव जेरे, श्री. आर. सी. सिंग, ना. पां. साने, डॉ. ए. पी. नाईक, ज. ल. परळकर, डॉ. य. वि. पुरंदरे, बा. शि. गोलतकर, सौ. लीलाबाई आगाशे, सौ. सुशीलाबाई गोखले, सौ. इंदिराबाई आठवले, श्रीमती कृष्णाबाई दिवेकर, का. वि. खानविलकर, न. वि. भावे, म. रा. कुलकर्णी, काळबादेवी हिंदुसभेचे अध्यक्ष (कै.) माणिकराव नानाभाई तळपदे विधिज्ञ, दादरचे पाटील, मारुती मंदिराचे विश्वस्त श्री. पाटील, श्री. वि. म. पेंडसे, श्री. स. मु. केसरकर, श्री. कृ. ह. आठवले, श्री. के. व्ही. बोडस विधिज्ञ, श्री. वि. रा. भिडे, सौ. इंदिराबाई साटेलकर, श्री. कुमार भरत साटेलकर व साटेलकर कुटुंबीय, (कै.) स्वयंसेवक गाडगीळ, श्री. वि. स. जोशी, डॉ. ए. डी. भेंडे, श्री. ल. ग. थत्ते, श्री. मो. शि. गोखले, श्री. ना. गो. दातार, श्री. गंगाधर जोशी, श्री. रामभाऊ गोडबोले, श्री. म. कृ. काशीकर, श्री. वा. गो. वझे, श्री. श्री. ग. ताटके, श्री. हरिभाऊ धर्माधिकारी, सौ. कमलाबाई अभ्यंकर, श्री. ग. शं देवकर गुरुजी, श्री. श्रीराम वि. साठे व सौ. साठे, श्री. गं. पा. फडके, श्री. रा. ग. तांबट, श्री. भाऊराव बांगर, श्री. मा. वा. दांडेकर, श्री. भाऊराव थत्ते, श्री. मुळे, श्री. खंडकर, श्री. श्री. सप्रे, श्री. मदनलाल पहावा, श्री. सौ. मंजिरी पहावा, (कै.) वि. रा. नवलकर विधिज्ञ, (कै.) स. ना. पणशीकर, (कै.) पां. वि. गोठस्कर, श्री. यशवंत अनंत तेंडुलकर, लक्ष्मणराव परुळेकर, श्री. गजाननराव दामले, श्री. नारायणराव दामले, (कै.) श्री. भगवंतराव परळकर, श्री. मगनलाल हिरजी व्यास विधिज्ञ, (कै.) पंडित मुरकुटे, (कै.) पं. पद्मनाभशास्त्री पालये, (कै.) डॉ. मुनशी हिरजी महेश्री, श्री. भा. ए, सोमणी गुरुजी, श्री. निशिकांत आठवले, श्री. वि. श्री. साठे, श्री. गोखले भटजी, श्री. आबाराव गर्दे, (कै.) श्री. मा. ग. केळकर, श्री. काळे, टंकलेखन प्रसिद्ध श्री. आमडेकर, सौ. विमल जोगळेकर, श्री. दादा पेंडसे, (कै.) लक्ष्मणशास्त्री ओघळे, श्री. भाटकी, (कै.) श्री. प्र. ल. काळे गुरुजी, श्री. वसंत शेषो घमंडे, सौ. मंदाकिनी घमंडे, (कै.) हरिभाऊ भागवत, श्री. य. प. बापट, श्री. वि. म. भाटकर, श्री. य. दा. बोले, श्री. ग. प. पाटणकर, श्री. कृ. पां. सामक, श्री. बाबूराव देसाई, श्री. ह. भ. प. गोविंदबुवा देव, (कै.) डॉ. बहल, इत्यादि मंडळी होती. मुंबई हिंदुसभेला सतत आर्थिक साहाय्य देणारे महत्त्वाचे दाते म्हणजे सर्वश्री राजा नारायणलाल बन्सीलाल, राजा मुकुंदलाल बन्सीलाल, शेठ गुलाबचंद दोशी, वैद्य रा. न. पुराणिक, श्री. भाऊराव अभ्यंकर, डॉ. वि. ज. भिडे, श्री. स. ना. पणशीकर, श्री. कृ. ह. ढमढेरे, श्री. का. वि. खानविलकर, श्री. मगनलाल व्यास, श्री. ल. गो. विंझे, श्री. म. रा. कुलकर्णी. त्याचप्रमाणे सतत नैर्बंधिक साहाय्य करणारे अधिवक्ते श्री. का. ना. धारप, श्री. न. दा. डांगे, सॉ. हरि अनंत थत्ते, बॅ. ओक, बॅ. मणियार, श्री. म. वि. बापट, श्री. भा. द. वाघ, श्री. बेडेकर, श्री. भा. नि. भागवत, श्री. ज. ल. परळकर, श्री. आर. सी. सिंग, श्री. शि. वि. देवधर, श्री. माधवराव पाठक, इत्यादि मंडळींनी

सातत्याने व दीर्घकाळपर्यंत हिंदुसभेचे कार्य केले आहे व कित्येक जण आजही करीत आहेत.

सोलापूर जिल्हा हिंदुसभा

सोलापूर येथे हिंदुसभेचे कार्य स्वतंत्रपणे १९३५ पासून सुरू झाले. त्यापूर्वी येथील हिंदुसभेचे पुढारी श्री. रामभाऊ राजवाडे, शेठ गुलाबचंद दोशी, शेठ माणिकचंद वीरचंद, रावसाहेब निंबर्गीकर, शिवलाल गांधी, भाऊसाहेब खडकीकर प्रभृति मंडळी काँग्रेसमध्ये असली तरी हिंदुसभेच्या कामात त्यांचे विशेष सहकार्य असे. याच काळात मुसलमानांनी रथमिरवणुकीवर व गणपतीच्या मिरवणुकीवर हल्ले केले असताना हिंदूंनी त्यांचा जोरदार प्रतिकार केला. रामभाऊ राजवाडे यांच्या संपादकत्वाखाली कर्मयोगी वर्तमानपत्र चालविण्यात आले, १९३० साली लष्करी कायद्याच्या अमलाखाली आपत्तीत सापडलेल्या लोकांना सर्व प्रकारे मदत करण्यात आली. ही मंडळी प्रथम काँग्रेसमध्ये व नंतर लोकशाही स्वराज्य पक्षात होती. स्वा. सावरकरांनी हिंदुसभेचे अध्यक्षपद हाती घेतल्यापासून सोलापुरात हिंदुसभेच्या कार्यास विशेष सुरवात झाली. त्यानंतर रामभाऊ राजवाडे पुण्यास राहावयास गेल्यानंतर सोलापूरच्या हिंदुसभेच्या कार्याचे नेतृत्व श्री. वि. रा. पाटील यांच्याकडे आले. तेव्हापासून ते अव्याहतपणे श्री. पाटील चालवीत आहेत. पाटील हे महाराष्ट्र हिंदुसभेचेही अनेक वर्षे अध्यक्ष होते. ते सोलापूर नगर पालिकेतही १९४६ ते ५७ या काळात सभासद होते.

सोलापूर जिल्ह्यातील हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांत समाजातील सर्व थरांतील लोक असून ती सभा कार्यक्षम आहे. श्री. वि. रा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली हिंदु सभेचे काम चालते. तेथील कार्यकर्त्यांत सोलापूर येथे श्री. रंगनाथ बळवंत उपाध्ये उपाख्य रंगा पैलवान, डॉ. म. वि. फडके, शंकरराव हंचाटे, भाऊराव पैठणकर, बाबुराव सिलगारी, सदाशिव पिसे, सोमा, येमूल, आराध्ये, जतकर, म्हैसकर, वळसंगकर, परिचारक ही वकील मंडळी, रामभाऊ देशमुख, सौ. कमलाबाई म्हसकर, श्रीमती काशीताई कुळकर्णी, सौ. स्नेहलता बेळगीकर, भय्यासाहेब नगरकर, वडगावकर, भास्कर मोडक, अंकुश चव्हाण, सुदाम मारुळकर इत्यादि मंडळी प्रमुख आहेत. पंढरपूर येथे वसंत बाबाजी बडवे, शंकरराव कटप, शंकरराव मंगळवेढेकर, रामकृष्ण उत्पात, वा. ना. उत्पात, रामभाऊ ताठे, दामोदर सफई, र. गो. जोशी, वकील हे प्रमुख आहेत. बार्शी येथे गोविंद रघुनाथ उपाख्य बाबाराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली बार्शी हिंदु सभेचे कार्य १९४७ पर्यंत चालू होते. रामभाऊ परांडेकर, पेंडसे, पाठक, रामभाऊ पवार, मार्तंड दत्तात्रय पोतदार, गो. र. काळे. म. गो. बडवे, तात्या पाटील, भागवत देठे, जनार्दन व्यवहारे, गुलाबसिंग फुलारी, शंकरराव काकडे, तानाजी कांबळे व ना. म. गणपुले वकील प्रभृतींचे सक्रिय साहाय्य सतत लाभत आले आहे. त्याचप्रमाणे कुर्डुवाडी येथे श्री. आत्मारामपंत दीक्षित हे सतत हिंदुसभेचे काम करीत आले आहेत.

१९३८ मध्ये भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचे आंदोलन सुरू झाले त्या वेळी या लढ्याच्या कामी सोलापूरचे व तेथील हिंदुसभा कार्यकर्त्यांचे फार मोठे साहाय्य झाले. सोलापूर येथे स्वयंसेवकांची नोंद करणे, त्यांच्यासाठी शिबिर चालविणे ही कामे श्री. वि. रा. पाटील प्रभृतींनी केली. सोलापूर जिल्ह्यातून दोनशांवर निःशस्त्र प्रतिकारकांनी त्या लढ्यात भाग घेतला. सोलापूर येथे मशिदीवरून वाद्ये वाजविण्याच्या संबंधात अनेक प्रसंगी वाद झाले. ते सर्व पाटील यांच्या नेतृत्वाखाली धसास लावण्यात आले (पृ. २७१–७२ पहा.) व ते हिंदुसभेने जिंकलेही. सोलापूरच्या हिंदु समाजाची त्यांस साथही चांगली मिळाली. सोलापूरच्या नगरपालिकेत सोलापूर हिंदुसभेचे प्रतिनिधि सतत निवडून आले आहेत. सध्याही श्री. पैठणकर व श्री. आराध्ये वकील हे हिंदुसभेचे प्रतिनिधि सोलापूरच्या महानगरपालिकेचे सदस्य आहेत. बार्शी व पंढरपूर येथेही हिंदुसभाकार्यकर्ते नगरपालिकेत निवडून आले आहेत. सोलापूर, जिल्ह्यात हिंदुसभा आजही राजकारणात अग्रेसर आहे याचे कारण वेळोवेळी उपस्थित होणाऱ्या प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नावर मत व्यक्त करण्याचे व प्रसंगी आंदोलन करण्याचे धोरण श्री. वि. रा. पाटील यांनी सतत बाळगले हे होय. त्याशिवाय सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर, बार्शी, अक्कलकोट कुर्डूवाडी, इत्यादि ठिकाणच्या हिंदुसभाही त्यांच्यामुळेच सचेतन व जागरूक राहिल्या आहेत. हिंदुसभेची नित्यनैमित्तिक कामे येथे सतत चालू असतात. हिंदुसभेच्या सभासदांची संख्या सामान्यतः हजारावर असतें. १९४१ वर्षी भागलपूरच्या सत्याग्रहाच्या चळवळीत भाग घेण्याकरिता येथून सुमारे पंचवीस कार्यकर्ते गेले होते. १९४४ वर्षी हिंदु युवक संघ स्थापन करण्यात आला. त्याचप्रमाणे हिंदु महिला संघाची स्थापना करण्यात आली. येथे एक सावरकर मंडळ व सावरकर वाचनालय काढण्यात आले. १९३७ च्या सोन्या मारुती सत्याग्रहात, १९५४ मध्ये परदेशी मिशनऱ्यांना चले जाव आंदोलनात व १९५९ च्या काशी विश्वेश्वर मंदिर सत्याग्रहातही सोलापूरच्या कार्यकर्त्यांनी भाग घेतला. सोलापूर येथे महाराष्ट्र हिंदुसभेचे एक अधिवेशनही भरविण्यात आले. १९५५ पासून हिंदुसभा संयुक्त महाराष्ट्र समितीत दाखल झाली व तेव्हापासून समितीच्या कारभारातही सोलापूर हिंदुसभा पुढारीपणाने भाग घेऊ लागली.

१९६४ च्या मे महिन्यात सोलापूर येथे अखिल भारत हिंदुमहासभेचे अधिवेशन श्री. नित्यनारायण बानर्जी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्याची सर्व व्यवस्था व जबाबदारी श्री. वि. रा. पाटील व त्यांचे सहकारी यांनी पार पाडली. या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी श्री. कृष्णराव गांगुर्डे यांची विशेष योजना करण्यात आली होती. हे अधिवेशन त्या काळात चांगले गाजले. १९६२, ६७ व ७२ च्या लोकसभेच्या व विधानसभेच्या निवडणुकांतही हिंदुसभेने भाग घेतला. १९६७ च्या निवडणुकीत हिंदुसभेच्या वतीने श्री. वि. रा. पाटील हे विधानसभेवर निवडून आले. सोलापूर येथे हिंदुसभा कार्यालयासमोर तिच्या कार्यासंबंधी माहितीचा फलकही

नेहमी लावण्यात येतो. चैत्र शु. प्रतिपदेला घरोघर भगवे ध्वज लावावेत यासाठी पाचशे ध्वज तयार करून घेण्यात आले, व ते घरोघर लावले जाण्याची व्यवस्था करण्यात आली.

सोलापूर शहराजवळील मार्डी येथे एक शिवमंदिर असून ते मशीद असल्याचा मुसलमानांचा दावा आहे. या वादात सोलापूरचे ५ व मार्डी येथील ३७ हिंदूंवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे दावे सेशन्स कोर्टात व उच्च न्यायालयात गेलेले आहेत. पाटील यांजवर व इतर अनेक कार्यकर्त्यांवर अनेक निमित्तांनी सरकारने खटले भरले, पण त्यांतून ते मुक्त झाले.

पाटील प्रभृतींच्या प्रयत्नामुळे सोलापूर नगरपालिकेकडून छत्रपति शिवाजी स्मारकास मोठे पटांगण मिळाले असून रावसाहेब निंबर्गीकर व पाटील हे त्याचे विश्वस्त होते. निंबर्गीकरांच्या निधनानंतर श्री. पाटील हे त्याचे विश्वस्त आहेत. मराठवाड्यातील नांदेड, बीड, धाराशीव इ. ठिकाणी हिंदुसभेचे कार्य वाढविण्याच सोलापूराहून प्रयत्न चालू असतो.

सोलापूरप्रमाणेच बार्शी, पंढरपूर, अक्कलकोट, कुर्डूवाडी, येथेही हिंदुसभेच्या शाखा असून त्यांचे कार्य चांगल्या रीतीने चालू आहे. पंढरपूर येथे स्वा. सावरकर प्रेमी मंडळ स्थापन झाले असून त्याने मुक्तद्वार वाचनालय सुरू केले आहे. शंकरराव मंगळवेढेकर हे त्या संस्थेचे अध्यक्ष व वा. ना. उत्पात हे कार्यवाह आहेत. या संस्थेला बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचे संचालक श्री. आगाशे बंधू यांनी स्वतःच्या मालकीची आठ हजार चौ. फूट जागा देणगी म्हणून दिली असून त्या जागेवर संस्थेसाठी इमारत बांधण्याकरिता नारायणराव पटवर्धन यांनीही मोठी देणगी दिली आहे.

दि. १० मे चा स्वातंत्र्य दिन, २८ मे स्वा. सावरकर जयंती दिन, दि. १ ऑगस्टला लो. टिळक पुण्यतिथि दिन हे दिवस साजरे करण्यात येतात. गणेशोत्सवात हिंदुसभा मोठ्या प्रमाणावर भाग घेते. विजया दशमीस सामुदायिक सीमोल्लंघन, संक्रांतीला महिलांसाठी हळदकुंकू व तिळगूळ समारंभ साजरे करण्यात येतात. शुद्धीकरणाचे कार्य सतत चालू असते. महाराष्ट्रात तरी हिंदुसभेच्या कार्यात सोलापूर जिल्हा व शहर सतत आघाडीवर आहे.

*

अहमदनगर जिल्हा हिंदुसभा

अहमदनगर जिल्ह्यात हिंदुसभेचे काम १९२५ च्या सुमारास सुरू झाले. त्या काळी श्री. आबासाहेब सहस्रबुद्धे, रा. ग. भोपे व अनगळ वकील हिंदुसभेच्या कामात भाग घेत. शुद्धिकार्य व अस्पृश्यतानिवारण यांवर त्यांचा विशेष भर असे. नंतर नगरचे पुढारी चिंतामण मोहनीराज उपाख्य नानासाहेब सप्तर्षि व गोपाळराव गायकैवारी त्यात लक्ष घालू लागले. भोपे यांनी स्वामी श्रद्धानंद यांच्या मृत्यूनंतर त्यांचे एक चरित्रही प्रसिद्ध केले आहे. नगरचे रे. मोडक यांच्याशी श्री. गोपाळराव गायकैवारी यांच्या द्वारा अण्णासाहेब भोपटकर, माटे, व दाते यांची चर्चा झाली

होती. मोडक प्रभृतींनी शुद्ध हिंदुराष्ट्रवादावरच विशेष भर दिला होता. त्याचा
उल्लेख या पुस्तकात पूर्वी (पृ, १९६–१९९) आलेला आहे.

स्वा. सावरकरांनी १९३७ वर्षी हिंदुसभेची सूत्रे हाती घेतल्यानंतर हिंदु-
मुसलमान वादाला व राजकारणाला देशभर विशेष महत्त्व प्राप्त झाले. भागानगर
निःशस्त्र प्रतिकाराच्या आंदोलनात भाग घेणारांसाठी सोलापूर व मनमाड प्रमाणेच
नगर हेही एक वाटेतील केंद्र होते. भागानगरचा लढा यशस्वी झाल्यानंतर लवकरच
दुसरे महायुद्ध सुरू झाले व देशाच्या स्वातंत्र्यलढचाला विशेष जोर प्राप्त झाला
नगर येथे त्या वेळी हिंदुसभेच्या संघटन व इतर कार्यात श्री. गोपाळराव गाय-
कैवारी यांच्या नेतृत्वाखाली श्री. ना. द. आपटे, विष्णुपंत करकरे, भाऊराव तांबोळी
प्रभृति मंडळी काम करीत. नौखालीतील हिंदूंवरील अत्याचारांच्या वार्ता ऐकून
तेथील हिंदूंच्या साहाय्यार्थ निधि व कपडे गोळा करून करकरे व त्यांचे काही
सहकारी तिकडे गेले त्याचे वृत्त पृ. १७७–१८४ वर आले आहे. अलीकडच्या काळात
भाऊराव तांबोळी, लक्ष्मण पवार, मेहेंदळे, प्रभृति हिंदुसभेच्या कार्यात विशेष भाग
घेतात. १९६७ वर्षी नगर येथे जी दंगल झाली त्यात पोलिसांनी हिंदुसभेच्या
तांबोळी, पवार, प्रभृति कार्यकर्त्यांना अटक केली. त्यांचे खटले गायकैवारी यांनी
चालविले. त्यांची निर्दोष सुटका झाली. हिंदुसभा कार्यकर्त्यांवर जेव्हा जेव्हा न्याया-
लयीन प्रकरणे निर्माण झाली तेव्हा तेव्हा गोपाळराव गायकैवारी हे त्यांच्या पाठीशी
सतत उभे राहिले आहेत. शुद्धिकार्यात येथील मंडळींना विशेष रस आहे. त्यांनी
दीड हजारावर शुद्धिकार्य केले व करीत आहेत. श्री. भाऊराव तांबोळी हे सध्या
अहमदनगर नगरपालिकेत हिंदुसभेच्या वतीने निवडून आलेले सभासद आहेत.
महाराष्ट्रातील ही एक कार्यक्षम हिंदुसभा आहे.

*

नागपूर विदर्भातील हिंदुसभांचे कार्य

नागपूर-विदर्भ व मराठवाडा हे भाग पूर्वी मुंबई महाराष्ट्र राज्यात समाविष्ट
नव्हते. नागपूर-विदर्भ हा भाग मध्यप्रांतात व मराठवाडा निजाम राज्यात समाविष्ट
होता. १९५५ च्या राज्यपुनर्घटनेनंतरच्या काळात हे भाग महाराष्ट्रात दाखल झाले.
त्यापूर्वी नागपूर-विदर्भ भागांतील हिंदुसभांचे कार्य मध्यप्रांतातील इतर हिंदी
विभागाशी संलग्न होते. तरी पण मराठी विभागाचे कार्य सामान्यतः स्वतंत्र-
पणानेच चालले. मराठवाड्यातही १९४७ पूर्वी हिंदुसभांचे जे काही कार्य चाले ते
स्वतंत्रपणेच चाले. महाराष्ट्रातील हिंदुसभेच्या कार्यात त्याचा समावेश नव्हता.
असे असले तरी दोन्ही ठिकाणचे मराठी समाज मुंबई पुण्याकडील मराठी हिंदु
समाजाचेच अंशभागी असल्याने त्या सर्वांच्याच कार्यात सदैव समरसता नांदत
आली आहे.

नागपूर भागात हिंदुसभेच्या कार्यास डॉ. बा. शि. मुंजे यांनी सुरवात केली.
त्या काळात दिल्ली येथील केंद्रीय लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत काँग्रेसमधील स्वराज्य-

पक्षाच्या वतीने ते निवडून गेलेले सभासद होते. त्यांनी नागपूर विदर्भ भागात हिंदुसभेच्या शाखा सर्वत्र स्थापन केल्या. १९२५ च्या सुमारास नागपूर येथे मुसलमानानी हिंदूंच्या सवाद्य मिरवणुकीवर हल्ला केला तेव्हा डॉ. मुंजे यांच्या नेतृत्वाखाली त्याचा हिंदूंनी तीव्र प्रतिकार केला. त्यांच्याच प्रेरणेने डॉ. केशवराव हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यास स्वतःस वाहून घेतले. कृतज्ञतेचा एक भाग म्हणून अलीकडे डॉ. मुंजे यांचा भव्य पुतळा संघीय मंडळींनी पुढाकार घेऊन नागपुरास उभा केला आहे. १९२७ साली ते पाटणा येथे भरलेल्या अखिल भारत हिंदुमहासभेच्या दहाव्या अधिवेशनाचे अध्यक्षही झाले. हिंदुमहासभेच्या वतीने ते १९३० साली पहिल्या व १९३१ साली दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित होते. नागपूर भागात त्यांनी हिंदूंची मोठ्या प्रमाणावर संघटना निर्माण केली.

विदर्भ हिंदुसभा

विदर्भात अकोला येथे श्री. वासुदेवराव चिपळूणकर यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुसभेची स्थापना १९२५ वर्षी चैत्री पाडव्यास झाली. श्री. रत्नाकर हे तिचे कार्यवाह होते. त्या पाठोपाठ डॉ. बा. शि. मुंजे यांनी अकोल्यास जाऊन वऱ्हाड प्रांतिक हिंदुसभेची जुलै १९२५ मध्ये स्थापना केली. तिचे अध्यक्ष लोकनायक बापूजी अणे व कार्यवाह मामा जोगळेकर हे होते. त्यापाठोपाठ श्री. सदाशिवराव केळकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सभा स्थापन झाली. तिचे कार्यवाह श्री. बापट वकील होते. बरीच वर्षेपर्यंत हीच मंडळी हिंदुसभेचे कार्य करीत असत. नागपूर येथे महाराष्ट्र, व अकोला येथे प्रजापक्ष या नावाची साप्ताहिक वर्तमानपत्रे निघत असत. ती हिंदुसभेच्या कार्याचा सातत्याने प्रचार करीत. अमरावतीस हनुमान व्यायाम शाळेत व अकोला येथील राजेश्वर मंदिरातील व्यायाम शाळेत हिंदु तरुणांचे बलोपासनेचे कार्यही चालू असे.

अकोला येथे १९२४ साली प्रथम हिंदुमुसलमान तंटा सुरू झाला. जुम्मा मशिदीपुढून गणपतीची सवाद्य मिरवणूक नेण्यास मुसलमान हरकत करू लागले. पुढे वाद वाढत गेला. १९२७ वर्षी तो विकोपास जाऊन त्यातून दंगा निर्माण झाला. त्या वेळी सर्व हिंदूंनी एकजूट करून मुसलमानांचे आक्रमण परतवून लावले. त्याचप्रमाणे खामगाव, वाशीम या ठिकाणीही मशिदीवरून मिरवणकीतील वाद्ये वाजविण्याच्या प्रश्नावरून दंगे झाले. मामासाहेब जोगळेकर प्रभृतींनी हा वाद्यांचा वाद वरिष्ठ न्यायालयापर्यंत व पुढे थेट प्रिव्ही कौंसिलपर्यंत लढवून सार्वजनिक रस्त्यावरून सवाद्य मिरवणुकी नेण्याचा हिंदूंचा हक्क प्रस्थापित करून घेतला. तरी पण मुसलमानी आक्रमणाची प्रवृत्ति वाढतच होती.

१९२९ वर्षी एप्रिल महिन्यात पं. मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली वऱ्हाड व मराठी मध्यप्रदेश यांची संयुक्त हिंदु परिषद झाली. त्या निमित्ताने श्री. वा. कृ. दाणी यांनी वऱ्हाडात सर्वत्र दौरा करून हिंदु समाजात जागृति निर्माण केली.

याच वेळी डॉ. नारायण दामोदर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली हिंदु तरुणांच्या स्वतंत्र सभेचेही अधिवेशन झाले. त्यास तरुण हिंदु वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. मामासाहेब जोगळेकर यांच्या विशेष परिश्रमाने १९३१ वर्षी अकोला येथे हिंदुमहासभेचे तेरावे अधिवेशन श्री. सी. विजयराघवाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली झाले. रा. ब. महाजनि हे त्याचे स्वागताध्यक्ष होते.

अकोला येथील हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांत श्री. गोपाळराव चितळे हे जोगळेकरांचे स्नेही व सहकारी म्हणून काम करीत. बाबाराव सावरकर अकोल्यास आले म्हणजे त्यांचा मुक्काम गोपाळरावांच्याकडेच असे. प्रजापक्ष वर्तमानपत्राचे ते व्यवस्थापक होते. १९३४ पासून काही काळ श्री. वा. कृ. दाणी हेही प्रजापक्ष वर्तमानपत्राचे काम पाहात. जोगळेकरांनी स्वा. सावरकरांचा वऱ्हाडातील पहिला दौरा १९३७ मध्ये घडवून आणला. त्यांनी हिंदु अनाथ महिलांसाठी काही काळ एक अनाथालयही चालविले होते. चितळे यांनीही काही काळ आपल्या जागेत एक मोफत दवाखानाही चालू ठेविला होता.

नागपूर वऱ्हाड भागातून काँग्रेसच्या वतीने (स्वराज्य पक्ष, प्रतिसहकारपक्ष व पुढे लोकशाही पक्ष यांच्या वतीने–कारण हे तीनही पक्ष त्या वेळी काँग्रेसच्या अंतर्गतच होते.) १९१९ च्या सुधारणा कायद्याखाली झालेल्या निवडणुकांत केंद्रीय व प्रांतीय विधिमंडळात डॉ. बा. शि. मुंजे, बॅ. गोविंदराव देशमुख, लोकनायक बापूजी अणे, बॅ. रामराव देशमुख, बाबासाहेब खापर्डे, श्री. तांबे, यादवराव काळे, रामभाऊ कानिटकर, बॅ. पाटील, नानाराव गवई, पांडुरंग दीनानाथ हे निवडून गेलेले सभासद होते. हीच मंडळी हिंदुसभेच्या कार्याचेही नेतृत्व करीत होती. त्या शिवाय राजे लक्ष्मणराव भोसले, यादवराव अणे, तपस्वी बाबासाहेब परांजपे, अकोल्याचे मामा जोगळेकर, खामगावचे पं. पन्नालाल व्यास, अमरावतीचे डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. भोजराज, वाशिमचे श्री. डबीर, यवतमाळचे डॉ. काणे व दादासाहेब काणे, पुसदचे श्री. शंकरराव सरनाईक, वर्धा येथील मनोहरपन्त देशपांडे, चंद्रपूरचे बाबासाहेब देशमुख, भंडारा येथील गजाननराव देव, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. केशवराव हेडगेवार, डॉ. परांजपे, विश्वनाथराव, केळकर, इत्यादि मंडळी हिंदुसभेच्या कार्यात प्रमुख असत. या सर्व मंडळींचे स्फूर्तिस्थान लो. टिळक हे होते. नंतरच्या काळात काँग्रेस व हिंदुसभा यांच्यात जातीय मतदार संघाना मान्यता देण्याच्या प्रश्नावरून वाद सुरू झाले व काँग्रेसने हिंदुसभावाद्यांना काँग्रेसचा दरवाजा अखेर बंद केला. त्यामुळे हिंदुसभेची शक्ति थोडी खच्ची झाली तरी १९३८ वर्षी नागपूर येथे स्वा. सावरकरांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारत हिंदुमहासभेचे २० वे अधिवेशन झाले; त्यात भागानगर निःशस्त्र प्रतिकाराच्या आंदोलनाची योजना आखण्यात आली.

या आंदोलनात नागपूर वऱ्हाड भागातून सुमारे दीड हजार प्रतिकारकांनी भाग घेतला. नागपूरहून हिंदुसभा नेते डॉ. ल. वा. परांजपे यांच्या नेतृत्वाखाली

दोनशे प्रतिकारकांचा जथा नागपूर, अकोला, खामगाव, बुलढाणा येथे प्रचार करीत निजाम राज्यात शिरला. तेथे त्यांस अटक होऊन शिक्षा झाल्या. दुसरा जथा उमरखेडहून निजाम राज्यात गेला. त्यास निरोप देण्याकरिता स्वा. सावरकर स्वतः उमरखेडला उपस्थित होते. या लढ्यात अमरावतीचे श्री. भट, नागपूरचे प्रा. वि. घ. देशपांडे, साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास, श्री. वर्मा, डॉ. शिंगणापूरकर, लक्ष्मीकांत देशपांडे, प्रभृति प्रतिकारकांनी भाग घेतला. या लढ्याचे वृत्त या ग्रंथात अन्यत्र (पृ. ११६-१३९) आले आहे. या लढ्यामुळे व त्यात हिंदुमहासभेला नेत्रदीपक यश लाभल्यामुळे हिंदुमहासभेच्या कार्याला तेज व महत्त्व प्राप्त झाले.

या काळात मुस्लिम लीगचे आक्रमक राजकारण सुरू झाले होते व हिंदु समाजावर आक्रमण करण्याची व दंगा करण्याची प्रवृत्ति सर्वत्र वाढत होती. १९३९ साली खामगाव येथे जैनांची एक मिरवणूक मशिदीवरून सवाद्य जात असता मुसलमानांनी ती अडविली तेव्हा श्री. ज. आ. अणेकर वकील यांनी स्वतः गळ्यात ढोलके घालून वाद्य वाजवीत मिरवणूक नेण्याचा हिंदूंचा हक्क बजाविला व अखेर मिरवणूक सवाद्य गेली. न्यायालयाचे या बाबतीत स्पष्ट निवाडे असताही केवळ सरकारच्या चिथावणीमुळे मुसलमान वाद्यबंदीचा आग्रह धरीत, तेव्हा हिंदु त्यास विरोध करीत व त्यातून वाद व दंगे निर्माण होत.

असाच आक्रमणाचा एक प्रकार वाशीम येथे झाला. तेथे बालाजीचे एक मंदिर असून त्या समोर पद्मतीर्थ आहे. त्यावर केवळ हिंदूंचा हक्क असताही मुसलमान हक्क सांगू लागले व त्यातून दंगा निर्माण झाला. तेंव्हा हिंदूंनी प्रिव्ही कौन्सिलपर्यंत हे प्रकरण नेऊन आपला हक्क शाबीत करून घेतला. या कामी वाशिमचे नेते भाऊसाहेब साने, शंकरराव डबीर, म. गं. दातार, अकोल्याचे मामा जोगळेकर, बुलढाण्याचे यादवराव काळे, मेहेकरचे दादासाहेब सोमण, पुसदचे शंकरराव सरनाईक खामगावचे पं. पन्नालाल व्यास आदि नेत्यांनी चिकाटीने प्रयत्न केले.

गरीब, अनाथ व पतित हिंदु स्त्रिया व त्यांची मुले यांच्यासाठी अनाथालयाची आवश्यकता भासू लागली. तेव्हा मुंबई पुण्याप्रमाणेच नागपूर येथेही श्रद्धानंद अनाथालय ही संस्था स्थापन करण्यात आली. डॉ. मुंजे, डॉ. परांजपे, भवानीशंकर नियोगी प्रभृतींनी या कामी विशेष लक्ष घातले. आज ती संस्था श्री. कृपाशंकर नियोगी व बॅ. गोविंदराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली उत्तम रीतीने चालू आहे. पावलेगावकर यांनीही खामगावी असे एक अनाथालय लहान प्रमाणात चालविले आहे.

याच काळात विदर्भातील हिंदुसभांनी गोहत्याबंदीची चळवळ मोठ्या प्रमाणात केली. तिचा योग्य तो परिणाम होऊन आता विदर्भात गोहत्येला सर्वत्र कायद्याने बंदी करण्यात आलेली आहे. तसेच पूर्वी पिंजारी, कासार, फळविक्री इत्यादि व्यवसायांत हिंदु नसत किंवा नाममात्र असत. हिंदु समाजाच्या पुनरुत्थानाच्या या काळात याही व्यवसायांत हिंदूंनी मोठ्या प्रमाणावर शिरकाव केला. त्यासाठी काही हिंदुसभांनी हिंदूंना व्यवसायाचें शिक्षण देऊन त्या उद्योगांत भाग घेण्यास प्रवृत्त केले.

हिंदुमहासभेच्या विधायक कार्यात शुद्धीकरणाला विशेष महत्त्व आहे. स्थानिक स्तरावर ठिकठिकाणच्या हिंदुसभा हे काम सातत्याने करीत असतात. अशा शुद्धीकरणांची संख्या काही हजारांनी भरेल. तथापि त्यांची व्यवस्थित नोंद अशी मात्र नाही. समाजातील विविध थरांतून ही कामे आता नित्य स्वरूपात चालू आहेत; व शुद्धीकरण हे आता समाजात रुजलेही आहे. हिंदु स्त्रियांना पळवून नेऊन बाटविण्याची कारस्थाने मध्यतंरी फार वाढली होती. त्या काळात नागपूर येथील झुंझार हिंदु सभा नेते श्री. जगन्नाथ प्रसाद वर्मा यांनी मोठ्या पराक्रमाने व धाडसाने अनेक हिंदु स्त्रियांची सुटका केली. त्यांनी या कामात एक आदर्शच उभा केला.

१९४१ मध्ये भागलपूर येथे स्वा. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली भरणाऱ्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनास बिहार सरकारने बंदी घातली तेव्हा ती मोडून तेथे हिंदुमहासभेचे अधिवेशन भरविण्याचा निर्धार करण्यात आला. त्या लढ्यात नागपूर विदर्भातील हिंदुसभेच्या सर्व ज्येष्ठ नेत्यांनी भाग घेतला. त्या अधिवेशनास नागपूर विदर्भातून सुमारे सहाशे प्रतिनिधि गेले होते. त्या आंदोलनाचे वृत्त या ग्रंथात (पृ. २०२–२१०) आलेच आहे.

त्याचप्रमाणे निजामाने वऱ्हाडवर पुन्हा स्वामित्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालविला असता निजामपुत्राच्या वऱ्हाड दौऱ्याला हिंदुसभेने केलेल्या विरोधाचेही वृत्त अन्यत्र (पृ. २२३–२२४) आले आहे.

१९४८ मध्ये गांधीवधोत्तर हिंदुसभेच्या कार्यास काहीशी उतरती कळा लागली. डॉ. मुंजे यांचेही १९४८ मध्येच निधन झाले. हिंदुसभेच्या अनेक कार्यकर्त्यांना सरकारने स्थानबद्ध करून अटकेत ठेवले. वऱ्हाडातील हिंदुसभेचे अध्यक्ष डॉ. काणे यांनी हिंदुसभेचे कार्य काही काळ स्थगित ठेवले. तथापि डॉ. ना. भा. खरे यांनी १९४९ वर्षी कलकत्ता येथे भरलेल्या अखिल भारत हिंदुमहासभेचे अध्यक्षपद स्वीकारून हिंदुसभेच्या कार्यास स्थैर्य आणले. पुढे १९५० वर्षी पुण्यास व १९५१ वर्षी जयपूर येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनांचे अध्यक्षपदही डॉ. खरे यांनीच संपन्न केले. त्यामुळे हिंदुसभेच्या कार्यास पुन्हा चांगली चालना मिळाली. १९५३ वर्षी श्री. हरि भास्कर भिडे यांनी नागपूर वऱ्हाड प्रांतात दौरा करून हिंदुसभेच्या संघटनात्मक कार्यास पुन्हा चालना दिली. नागपूर भागात श्री. विक्रम सावरकर यांच्या नेतृत्वाखाली हिंदुसभेचे कार्य वाढू लागले. श्री. मैंराळ, देशपांडे, डिडोळकर प्रभृतींनी त्यात प्रामुख्याने भाग घेतला. अकोला हिंदुसभेच्या अध्यक्षपदी श्री. के. ना. मुजुमदार यांस नेमण्यात आले. अकोला येथे भास्करराव फडके, रामधन खैतान, लक्ष्मीकांत देशपांडे, वसंतराव हरिहरराव देशपांडे, य. गो. जोशी, दूधभांडे वकील, पुसद येथे श्री. आडे व पोळकट, अमरावती येथे श्री. वा. कृ. दाणी, बबनराव कुळकर्णी, पी. टी. जोशी, खामगाव येथे अणेकर वकील व शेकदार बंधु, कोडामल खेमाणी, इत्यादिकांनी हिंदु सभेचे कार्य सातत्याने चालू ठेवले आहे.

अलीकडच्या काळातील संयुक्त महाराष्ट्र समिति, गोवा आंदोलन समिति, परदेशी मिशनरी विरोधी आंदोलन, युकॅरिस्ट कॉंग्रेसला विरोध इत्यादि चळवळींत व हिंदुसभेच्या नित्यनैमित्तिक कार्यात हिंदुसभेचे कार्यकर्ते सातत्याने भाग घेत आले आहेत. परदेशी मिशनऱ्यांविरुद्धच्या आंदोलनात खामगाव येथे श्री. पु. शि. शेकदार यांच्या नेतृत्वाखाली सुमारे एक सहस्र हिंदुसभावाद्यांचा मोर्चा गेला होता. तेथील मिशनऱ्यांनी त्यास विरोध न करता उलट त्यांचे स्वागत केले व त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. मिशनच्या बंगल्यासमोर मोठी जाहीर सभाही झाली.

गोवा मुक्ति आंदोलनातही विदर्भातील हिंदुसभा कार्यकर्त्यांनी भाग घेतला. प्रा. वि. घ. देशपांडे, पुसदचे पोळकट, उमरखेडचे चौधरी, खामगावचे हरिभाऊ गोखले, राधाकिसन आर्य प्रभृति मंडळी त्यात प्रमुख होती. उमरखेडचे चौधरी यांना दुर्दैवाने या लढ्यात प्राण गमवावे लागले.

१९५९ वर्षी काशी विश्वेश्वरमंदिर मुक्तीचे आंदोलन झाले, त्यातही नागपूर-विदर्भ भागातून ५० कार्यकर्त्यांनी भाग घेतला. शिवाय प्रचारसभा, आर्थिक साहाय्य इत्यादि कामेही करण्यात आली.

मुंबई येथे युकॅरिस्ट ख्रिश्चन परिषद भरली त्या वेळी हिंदुसभेने मोठ्या प्रमाणावर विरोधी आंदोलन केले होते. त्या वेळी या आंदोलनात भाग घेण्यास जाणाऱ्या सुमारे शंभर कार्यकर्त्यांना सरकारने स्थानबद्ध करून ठेवले.

नागपूर येथे १९६९ वर्षी अखिल भारत हिंदुमहासभेचे अधिवेशन पं. व्रजनारायण व्रजेश यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या प्रमाणावर झाले. त्यात नागपूर वऱ्हाड मधील सर्व हिंदुसभा कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर भाग घेतला. पं. व्रजेश, वि. रा. पाटील, माधवराव पाठक, विक्रम सावरकर, वा. कृ. दाणी, बाबूराव डोंगरे गोपाळराव गोडसे प्रभृतींनीही या भागात दौरे काढून हिंदुसभेच्या कार्यास गति दिली. नागपूर विदर्भ भागात नागपूर, अमरावती, खामगाव, अकोला, पुसद इत्यादि ठिकाणी हिंदुसभांचे संघटनात्मक कार्य सातत्याने चालू असते.

*

हिंदुसभेच्या काही ठळक नव्या जुन्या नेत्यांचा व कार्यकर्त्यांचा परिचय या ग्रंथात देण्याचे योजिले होते. तशी सर्व जिल्हा हिंदुसभांकडे विनंती केली होती. तथापि बऱ्याच जणांनी संकोचाने किंवा त्यांचे महत्त्व न वाटल्याने माहिती कळविली नाही. तथापि ज्यांची माहिती उपलब्ध होऊ शकली ती हिंदुसभेच्या कार्याच्या दृष्टीने येथे सारांशाने दिली आहे. त्यांच्या कार्यांच्या उल्लेख त्या त्या प्रकरणात आलाच आहे.

शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी

जन्म १८७९. संस्कृतचे विशेष अध्ययन. अमेरिकन विद्यापीठाने डॉक्टरेट पदवी दिली. लो. टिळकांच्या सूचनेवरून संन्यास घेऊन १९१७ वर्षी संकेश्वर पीठाचे शंकराचार्य झाले. कोल्हापूरच्या शाहू महाराजांशी विरोध आल्यामुळे कोल्हापूर सोडून बाहेर पडले. पुढे नाशिक पंचवटी येथे वास्तव्य. यांनी शुद्धीकरण,

सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या कामी पुढाकार घेतला. अनेक हिंदुधर्म परिषदा भरविल्या. अखिल भारत हिंदुमहासभेचे दोनदा अध्यक्ष. प्रयाग अधिवेशनाचे १९२४ वर्षी व लाहोर अधिवेशनाचे १९३६ वर्षी. निधन दि. २९।१०।१९६७.

*

केळकर नरसिंह चिंतामण उपाख्य तात्यासाहेब

जन्म दि. २४ ऑगस्ट १८७२. बी.ए.एलएल.बी. सातारा येथे वकिलीस सुरवात. १८९६ साली लो. टिळकांनी बोलाविले. केसरीमराठा पत्रांचे ४१ वर्षे संपादक. केसरीचे विश्वस्त. १९१६ वर्षी लो. टिळकांचा षष्टयब्दी समारंभ एक लक्ष रुपये देऊन साजरा करण्यात पुढाकार. १९२० वर्षी लो. टिळकांच्या निधनानंतर टिळक पक्षाचे मुख्य नेते. १९२४–२९ मध्ये दिल्लीच्या केंद्रीय विधिमंडळाचे सदस्य. १९२८ वर्षी अखिल भारतीय हिंदुमहासभेचे जबलपूर अधिवेशनाचे व १९३२ च्या दिल्ली अधिवेशनाचे अध्यक्ष. साहित्यसम्राट् म्हणून प्रख्यात. निधन १४।१०।१९४७.

*

सावरकर विनायक दामोदर उपाख्य तात्याराव

जन्म २८ मे १८८३. शिक्षण भगूर, नाशिक, पुणे व लंडन येथे. नाशिक येथे अभिनव भारत संस्था स्थापन केली. मॅझिनीचे चरित्र व त्याला प्रस्तावना लिहिली. त्यात क्रांतिवादाचे तत्त्वज्ञान सांगितले. १८५७ चे भारतीय स्वातंत्र्य समर हा क्रांतिवादाचा ग्रंथ लिहिला. भारतीय क्रांतिकारकांची ती गीता ठरली. नाशिक जॅक्सन खून खटल्याच्या कटात सरकारने सावरकरांना गोवले व त्यात त्यांस दोन जन्मठेपी शिक्षा झाली. १९१०–२४ अंदमान, येरवडा व रत्नागिरी तुरुंगात होते. १९२४–३७ रत्नागिरी जिल्ह्यात स्थानबद्धतेत राहावे लागले. तुरुंगात असताना शुद्धिकार्य केले. हिंदु राष्ट्राचा ध्वज निर्माण केला. हिंदुत्व व हिंदुपद पादशाही हे ग्रंथ लिहिले. अनेक काव्ये लिहिली, श्रेष्ठ कवि, नाटककार, निबंधकार, पट्टीचे वक्ते म्हणून प्रसिद्ध. हिंदुराष्ट्रवादाचे दर्शनकार. १९३७–४२ हिंदुमहासभेचे सहा वर्षे अध्यक्ष. भागानगर व भागलपूर लढा लढविला. १९४८ साली गांधीवध खटल्यात सरकारने गोवले. निर्दोष म्हणून मुक्तता. २६।२।१९६६ ला आत्मार्पण केले. यांच्या प्रयत्नामुळे पंजाब, बंगाल व आसाम यांची फाळणी होऊन हिंदु बहुसंख्य वस्तीचा प्रदेश भारतात राहिला.

*

सावरकर गणेश दामोदर उपाख्य बाबाराव

जन्म दि. १३।६।१८७९. भगूर व नाशिक येथे शिक्षण. स्वातंत्र्य चळवळीत भाग घतला. १९०९ वर्षी राजद्रोहाबद्दल जन्मठेपेची शिक्षा. अंदमानातून १९२१ वर्षी हिंदुस्थानात आणण्यात आले. काही काळ रत्नागिरी तुरुंगात होते. १९२२ वर्षी आजारी पडल्यामुळे सुटका. काही काळ अज्ञातवासात काढला. हिंदुत्वाची प्रेरणा सतत देत राहिले. १९२४ मध्ये यांच्या प्रयत्नाने रत्नागिरीस हिंदुसभा स्थापन

झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वाढीसाठी पुष्कळ परिश्रम केले. स्वा. सावरकरांच्या विविध कार्यांत सतत साहाय्य करीत राहिले. ख्रिस्त परिचय ग्रंथ लिहिला. त्यात ख्रिस्त हा मूळच्या तामिळवंशाचे जे लोक पॅलेस्टाईनमध्ये वसाहत करून होते त्यांच्या वंशातील मूळचा हिंदूच होता. पुढे तो काश्मिरात आला, तेथे तो येथील धर्माने प्रभावित झाला व तेथेच मरण पावला असे त्यांनी संशोधन करून प्रसिद्ध केले. सन १९४५ वर्षी सांगली येथे निधन. सांगलीस हिंदुसभेच्या पुढाकाराने बाबा सावरकरांचे स्मारक झाले आहे. *

चित्राव सिद्धेश्वरशास्त्री

महामहोपाध्याय, विद्यानिधि. संस्कृतचा विशेष व्यासंग. धार्मिक विषयांवर लिहीत. डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या ज्ञानकोशात काही वर्षे संपादकीय कार्य केले. यांनी नित्यकर्ममाला काढली, व तिच्याद्वारे मराठी भाषान्तरासह संध्या, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, पूजा, श्राद्धप्रयोग, उपनयन संस्कार, विवाह संस्कार इ. पुस्तके तयार केली. १९२६–२७ वर्षी यांनी ऋग्वेदसंहितेचे संपूर्ण मराठी भाषान्तर तयार केले. ऋग्वेदसंहितेचे संपूर्ण मराठी भाषान्तर असे ते पहिलेच होय. यांनी शुद्धिकार्यासाठी शुद्धिसंस्कार तयार केला व त्यास मराठी भाषान्तरासह विवेचक प्रस्तावनाही जोडली. १९२४ पासून १९३३ पर्यंत पुणे नगर हिंदुसभेचे अध्यक्ष होते. त्यानंतर त्यांनी प्राचीन व अर्वाचीन चरित्रकोश तयार केले. त्यासाठी स्वतंत्र भारतीय चरित्रकोश मंडळ स्थापन केले. अजूनही त्यांचे लेखनकार्य चालू असते. महाराष्ट्रात शुद्धिकार्याला चित्रावशास्त्री यांच्यामुळे विशेष गति प्राप्त झाली. यांना सरकारने महामहोपाध्याय ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला आहे. पानशेत पुराच्या वेळी त्यांचे अमृतेश्वर देवालयाजवळील घर पाण्याखाली बुडाले, तेव्हा शास्त्रीबोवांना काही वेळ मंदिराच्या कळसाचा आधार घेऊन बसावे लागले होते. महाराष्ट्रातील विद्वान् शास्त्री म्हणून प्रसिद्ध. *

माटे श्रीपाद महादेव

एम.ए. नामंकित शिक्षक. पुण्यास प्रथम न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व नंतर नूतन मराठी प्रशालेत. इंग्रजीचा खाजगी वर्ग चालवीत. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून अस्पृष्ट वर्गातील लोकांच्या शिक्षणासाठी पुण्यास अनेक शाळा कित्येक वर्षे चालविल्या. विद्यार्थ्यांचा त्यांच्यावर विशेष लोभ असे. डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या ज्ञानकोशातून प्रसिद्ध झालेली माहिती प्रकट व्याख्याने देऊन लोकांपर्यंत पोचवीत. मांगांच्या दोन परिषदा पुण्यास भरविल्या व त्यांचे प्रश्न समाजापुढे मांडले. १९३३ वर्षी अस्पृष्टांचा प्रश्न हा अस्पृश्यता निवारणावरील सर्वांगीण विचारांचा व माहितीपूर्ण ग्रंथ लिहिला. केसरीप्रबोध, हिंदुसमाजदर्शन इत्यादि अनेक ग्रंथ लिहिले. ब्राह्मण समाजाची पाहणी केली. विज्ञाननिष्ठ होते. समाजशास्त्राचे विशेष अभ्यासक. पुणे हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाचे १९२४–३० या काळात सभासद होते. *

दाते शंकर रामचंद्र

जन्म २८।९।१८९८. पुण्यास शिक्षण. बी.ए. १९२०. १९२०-२३ लोकसंग्रह दैनिक वृत्तपत्रात संपादकीय खात्यात लेखनाचे काम. १९२३ नंतर मुद्रणाचा व्यवसाय देवनागरी टाईप पाडण्याच्या पद्धतीत नवे संशोधन. १९३१–३२ मध्ये मोनो टाईप यंत्रावर देवनागरी लिपी बसविली. १९२४–३० पुणे हिंदुसभेचे कार्यवाह. शुद्धीकरणे करीत. १९२८ महाड दंग्याची पाहणी. १९३४ नाशिक रामरथ प्रकरणाचा वृत्तान्त, १९३८ मराठवाड्यातील निजामशाहीतील हिंदूंच्या दुरवस्थेची पाहणी व वृत्तान्त. १९३९ भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात कारावास. १९४०-४५ महाराष्ट्र हिंदुसभेचे कार्यवाह. १९४८ व १९५० वर्षी स्थानबद्धता. १९५० अ.भा. हिंदुसभेचे कार्यवाह. १९५० मध्ये पुण्यास अखिल भारत हिंदुमहासभेचे अधिवेशन भरविले. सध्या अ. भा. हिंदुमहासभेचे उपाध्यक्ष. चित्रावांचे ऋग्वेदाचे संपूर्ण मराठी भाषान्तर, माटे यांचा अस्पृष्टांचा प्रश्न, बाळशास्त्री हरदास यांच्या पुण्यास व्याख्यानमाला करवून त्यांचें ग्रंथ, स्वा. सावरकरांचे समग्र वाङ्मय यांचे प्रकाशन केले. १९४०–५५ दैनिक काळचे संपादन. १९६७ पासून साप्ताहिक काळ चालवितात.

*

गोखले गंगाधर विश्वनाथ

नानासाहेब नावाने प्रसिद्ध. मॅट्रिक झाल्यावर एंजिनिअरिंग कॉलेजात असतानाच स्वातंत्र्यवादी क्रांतिकारक चळवळीत भाग. बाँब तयार करण्याच्या उद्योगाबद्दल १९१० वर्षी साडेचार वर्षांची शिक्षा. धुळे जेलमध्ये होते. सुटून आल्यावर पुन्हा सार्वजनिक कामात भाग. १९१९ पासून स्वधर्म हे शंकराचार्य कूर्तकोटीयांचे साप्ताहिक वृत्तपत्र चालवीत. पुण्यास ब्राह्मणेतर चळवळ विशेष फैलावली तेव्हा तिला विरोध करण्यासाठी यांनी गणपतराव नलावडे यांच्या सहकार्याने संग्राम हे साप्ताहिक वृत्तपत्र चालविले. शिवछत्रपति मेळा काढला. मेळ्यासाठी पदे तयार करून देत. नाटके लिहिली, नाटक कंपन्या चालविल्या टिळक पक्षाचे कट्टे अनुयायी. १९२४ पासून हिंदुसभेचे एक महत्त्वाचे कार्यकर्ते. १९४१–४५ काळात हिंदुसभेच्या वाढीसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी दौरे काढले. १९४८ साली महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाळपोळ झाली तेव्हा त्या त्या ठिकाणी स्वतः जाऊन दंग्यांच्या परिस्थितीची पाहणी केली व लोकांना धीर दिला. नांमांकित वक्ते, हजर जबाबी वादपटु होते.

*

नलावडे गणपत महादेव

जन्म पुणे येथे १० फेब्रुवारी १८९८. मॅट्रिकपर्यंत शिक्षण. प्रथम वडिलांच्या पानतंबाखूच्या व्यवसायात काम. नंतर खंडाने बागायती शेती. १९२२ वर्षी छापखान्याचा व्यवसाय. १९२५–३२ संग्राम वर्तमानपत्र चालविले. १९२८–'५४ पुणे नगरपालिका सदस्य. १९४२ वर्षी अध्यक्ष व नंतर महानगर पालिकेचे सभासद व

महापौरपदी निवड. १९६४ मुंबई विधान परिषदेवर निवड. मर्चंटस् को बँकेचे ४४ वर्षे संचालक व सहा वेळा अध्यक्ष. १९५४–६२ महाराष्ट्र प्रांतिक हिंदु सभेचे अध्यक्ष. १९४८ साली गांधीवधोत्तर जाळपोळीत यांचा छापखाना जाळण्यात आला. १९४८ व १९५० वर्षी चार चार महिने स्थानबद्ध कारावास. हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. पुण्यास भरणाऱ्या १९७५ च्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष.

भिडे रामकृष्ण (बाबूराव) गोपाळ

जन्म १८८५. वाईचे राहणारे. शिक्षण सर्व वाईसच झाले. लेखनाची व वाचनाची आवड. १९१६ वर्षी पुण्यास आले. तेथे लो. टिळकांच्या स्वराज्य संघाचे कार्य करू लागले. केसरीत मधून मधून लिहीत. नंतर केसरीच्या संपादक वर्गात समाविष्ट. १९३१ मध्ये पुणे हिंदुसभेच्या कार्यवाहपदी नियुक्त. १९३१ पासून हिंदुसभेच्या कार्याचा प्रचार केला. पुणे नगर हिंदुसभेचे महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेत रूपान्तर केले व महाराष्ट्रात ठिकठिकाणी शाखा काढल्या. १९३४ वर्षी अकोला येथे हिंदुमहासभेचे अधिवेशन झाले त्या वेळी बाबूरावांची अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या कार्यवाहपदी नियुक्ति झाली. १९३५ वर्षी पुण्यास हिंदुमहासभेचे अधिवेशन पं. मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली झाले त्यांचे कार्यवाह होते. १९३५ वर्षीच पुण्यास अनाथ हिंदु महिलाश्रम काढण्यात पुढाकार. या आश्रमाचे विविध प्रकारचे कार्य दीर्घकाळ केले. यांनी निरनिराळ्या विषयांवर अशी एकूण तीस पुस्तके लिहिली आहेत. त्यात १९३५ वर्षी अखिल भारतीय हिंदुमहासभेचा इतिहास हाही एक महत्त्वाचा ग्रंथ आहे.

भिडे हरि भास्कर

जन्म संगमेश्वरजवळ मांभळे गावी दि. २५ ऑक्टोबर १९०८. शिक्षणासाठी केळशी व नंतर सांगली येथे. सांगलीच्या अनाथ विद्यार्थी गृहात होते. १९२९ च्या गांधींच्या मिठाच्या सत्याग्रहाच्या चळवळीत भाग. सहा महिने कारावास. तेथून सुटल्यावर ताराचंद रामनाथ हॉस्पिटलमध्ये कांपाउंडरची नोकरी. काका मोघे यांच्या बादशाही बोर्डिंगात काम करून विद्याभ्यास केला. १९३२ च्या कॉंग्रेसच्या आंदोलनात पुन्हा भाग. पुन्हा कारावास. पुढे काम करीत करीतच मॅट्रिकच्या परीक्षेस बसून उत्तीर्ण झाले व आयुर्वेदाचा अभ्यास सुरू केला. १९३७ वर्षी सोन्या मारुती सत्याग्रहात भाग. २१ दिवस कारावास. १९३८ वर्षी आयुर्विद्याविशारद झाले. १९३९ वर्षी भागानगर नि:शस्त्र प्रतिकाराच्या आंदोलनात आघाडीवर होते. औरंगाबाद तुरुंगात कारावास. १९३९ च्या ऑगस्टमध्ये आंदोलन यशस्वी होऊन सुटका. पंढरपूरच्या यात्रेच्या पालखीबरोबर एक औषधोपचार पथक नेण्याचे कार्य चार पाच वर्षे सातत्याने केले. १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनात खटला, शिक्षा व तुरुंगवास. १९४३ मध्ये बंगालमध्ये अन्नाचा तुटवडा

पडून लाखो लोक मेले व रोगराई भयंकर वाढली. त्या वेळी पुण्याच्या हिंदसेवक समाजाने एक आरोग्यपथक तिकडे पाठविण्याचे ठरविले. त्यात हरिभाऊ भिडे यांची योजना केली. ते काम त्यांनी सहा महिने पूर्व बंगालमध्ये केले.

१९४६–६४ या काळात केसरीचे फिरते वार्ताहर म्हणून काम केले. १९४८ वर्षी गांधीवधोत्तर चार महिने स्थानबद्ध कारावास. १९५४ वर्षी परदेशी मिशनरी चले जाव आंदोलनाचे नेतृत्व केले. १९५५ वर्षी गोवा मुक्ति आंदोलनात भाग. १९५६ साली संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यवाह, १९५७–६६ मुंबई विधान परिषदेचे सदस्य. १९५९ वर्षी काशी विश्वेश्वर आंदोलनात भाग व सहा महिने कारावास. सार्वजनिक कामासाठी निधि गोळा करण्यात अग्रेसर. १९६० पासून १९७३ पर्यंत अखिल भारत हिंदुमहासभेच्या दिल्ली कार्यालयात कार्यवाह व इतर पदाधिकारी म्हणून विविध प्रकारची कामगिरी केली. निधन २१ मे १९७४.

गोगटे वासुदेव बळवंत

एलएल. बी. शिक्षण मिरज व पुणे येथे. पुण्यास स्थायिक झाले. फर्ग्युसन कॉलेजात १९३१ साली शिकत असताना सोलापूर येथील चौघा निरपराध लोकांना लष्करी कायद्याच्या अमलाच्या काळात गुन्हा केल्याच्या आरोपावरून फाशी देण्यात आले. त्याचा सूड म्हणून यांनी त्या वेळचे गव्हर्नर हॉटसन यांजवर पिस्तूल झाडून खुनाचा प्रयत्न केला. याबद्दल सात वर्षांची शिक्षा झाली. १९३७ साली सुटका. नंतर एलएल. बी. होऊन वकिली करू लागले. १९४८ साली गांधीवधोत्तर कारावास, महापालिकेत सभासद. महापौर झाले. मुंबई विधान परिषदेवर पदवीधरांच्या मतदार संघातून निवड. विधान परिषदेत विरोधी पक्षाचे नेते होते. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे स्मारक करण्यात पुढाकार घेतला. हिंदुसभेचे अभिमानी. सावरकरांचे अनुयायी. निधन २४ नोव्हेंबर १९७४.

केतकर गजानन विश्वनाथ

बी. ए., एलएल. बी. टिळकांचे नातू. केसरी व मराठा पत्रांचे संपादक. हिंदुसभेचे ज्येष्ठ कार्यकर्ते. १९३८ साली भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनाच्या कचेरीचे काम सांभाळले. १९४१ च्या भागलपूर सत्याग्रहात भाग घेतला व अधिवेशनाची सभा भरवून समाप्ति केली. महाराष्ट्र हिंदुसभेच्या कारभारात अनेक वर्षे कोषाध्यक्ष होते. १९४८ साली स्वा. सावरकरांना गांधीवधाच्या खटल्यात अडकविण्यात आले तेव्हा यांनी न्यायसाहाय्य निधि निर्माण केला. १९५० वर्षी चार महिने व पुन्हा १९६४ वर्षी स्थानबद्ध होते.

भट रामचंद्र सदाशिव

अहमदनगर येथे १९०६ साली जन्म. १९२३ साली मॅट्रिक. पुणे नगरपालिकेत काही काळ नोकरी. १९४६ साली हिंदुसभेत काम करू लागले. १९४८ मध्ये

गांधीवधोत्तर तीन महिने कारावास. १९५२ साली दिल्ली येथे काश्मीर प्रकरणी झालेल्या आंदोलनात भाग व शिक्षा. १९५४ साली परदेशी मिशनऱ्यांविरुद्ध मोर्चांचे आंदोलन केले. गोवा मुक्ति संग्रामात भाग. संयुक्त महाराष्ट्र समिति, काशी विश्वनाथ मंदिर मुक्ति आंदोलन यात भाग व सहा महिने तुरुंगवास. उत्तम वक्ते व लेखक. यांनी लो. टिळक जीवन दर्शन, सावरकर जीवन दर्शन, हुतात्म्यांना मानवंदना इ. अनेक ग्रंथ व सौ. वहिनी: धर्मासाठी मरावे ही नाटके लिहिली. पुणे जिल्हा हिंदुसभेचे एक निष्ठावंत कार्यकर्ते.

गांगुर्डे कृष्णराव गंगाराम

नाशिक जिल्ह्यात वरखेडी येथे दि. १ जानेवारी १९१४ ला जन्म. मराठी सातवी पास. काही दिवस तलाठ्याची नोकरी. १९३८ साली भागानगर नि:शस्त्र प्रतिकारात एक वर्ष कारावासाची शिक्षा. १९५५ मध्ये परदेशी मिशनऱ्यांविरुद्ध आंदोलनात भाग घेतला. अनेक वर्ष पुणे जिल्हा हिंदुसभेचे कार्यवाह होते उत्तम वक्ते. निष्ठावंत कार्यकर्ते. १९६८ पासून पक्षघाताने आजारी.

साठे धोंडो कृष्ण

धोंडुमामा म्हणून प्रसिद्ध. जन्म १ सप्टेंबर १८९१. शिक्षण पुण्यास. १९१२ वर्षी बी. एससी. १९१९ वर्षी बी. ए. १९१३ साली आय. सी. एस. परीक्षेसाठी विलायतेस गेले होते, पण बंधु आकस्मिक वारल्यामुळे घरच्या अडचणींमुळे परत यावे लागले. वडिलोपार्जित लोखंडी सामानाच्या दुकानाचा व्यवसाय. १९३३ पासून सार्वजनिक कार्यात भाग घेऊ लागले, पुणे नगर पालिकेचे अनेक वर्षे सभासद. इमारत बांधणीची अनेक कामे केली. हिंदुसभा पक्षाचे अभिमानी. कॉंग्रेसच्या १९३२ च्या चळवळीत भाग घेतला. सत्याग्रह व कारावास. १९३९ साली भागानगर नि:शस्त्र प्रतिकार आन्दोलनात भाग व कारावास. औद्योगिक उन्नतीच्या कार्यात पुढाकार. १९३६ वर्षी महाराष्ट्र बँक काढली. तीस वर्षे संचालक मंडळावर होते. १९४५ साली महाराष्ट्र टेक्निकल एज्यु. सोसायटी स्थापन करून सांगलीस एंजिनिअरिंग कॉलेज काढले. १९७० मध्ये पुण्यास होमिओपथीचे कॉलेज काढले. निधन १७ सप्टेंबर १९७५.

डावरे विश्वासराव

यांचा जन्म अंदमानात झाला. पुण्याचे राहणारे. लो. टिळकांचे भक्त. कट्टर सनातनी पक्षाचे. पण हिंदुसभेच्या राजकीय कार्यात सहभागी. क्रांतिकारक विचाराचे होते. सोन्यामारुती सत्याग्रहाच्या आंदोलनात पुढाकार. १९३९ च्या भागानगर नि:शस्त्र प्रतिकार आंदोलनात भाग व तुरुंगवास. अनेक चळवळीत तुरुंगवास भोगावा लागला. १९४८ वर्षी गांधीवधोत्तराच्या जाळपोळीच्या काळात आक्रमकांचा प्रतिकार करून घराचे संरक्षण केले. नंतर स्थानबद्धता. हिंदुत्वाचे कट्टे अभिमानी. स्वातंत्र्य संग्रामात आघाडीचे नेते.

गोडसे नथुराम विनायक

जन्म १९१०. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. रत्नागिरीस वडील असतांना सावरकरांच्या संपर्कात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रचारक. उत्तम वक्ते. १९४२ संघ सोडला. हिंदुराष्ट्रदल काढण्यात पुढाकार. हिंदुराष्ट्र या दैनिकाचे संपादक. १९४२–४५ महाराष्ट्रभर हिंदुप्रभेच्या वाढीसाठी दाते व गोखले यांच्या बरोबर प्रचारात भाग. १९४७ साली गांधीवधाच्या खटल्यात फाशी १५।११।१९४९.

गोडसे गोपाळ विनायक

जन्म १९२०. पं. नथुराम गोडसे यांचे कनिष्ठ बंधु. मॅट्रिक झाल्यावर सावरकरांच्या प्रेरणेनुसार सैन्यात दाखल झाले. गांधीवधाच्या कटात सामील झाल्याच्या आरोपावरून जन्मठेपेची कैद. १९६४ मध्ये सुटका. सुटकेनंतर सत्य-नारायण केला. त्या प्रकरणी झालेल्या स्थानबद्धतेतून न्यायालयातून मुक्त. 'गांधी हत्या आणि मी' हे पुस्तक प्रसिद्ध केले. सरकारने ते जप्त केले पण पुढे न्याया-लयातून जप्ती रद्द झाली. हिंदुसभेचे एक प्रमुख कार्यकर्ते. अनेक ग्रंथ लिहिले आहेत. यांची विशिष्ट लेखनशैली आहे.

गोडसे सौ. सिंधु गोपाळ

जन्म १६ डिसेंबर १९२१. बी.ए. गोपाळराव गोडसे यांची पत्नी. नथुराम गोडसे याची भावजय. राष्ट्रसेविका समितीत काम केले. १९४३ वर्षी सौ. माई सावरकर यांचा सत्कार घडवून आणला. गोपाळराव गोडसे यांना गांधीवधाच्या खटल्यात जन्मठेपीची शिक्षा झाल्यानंतर यांनी प्रताप एंजिनिअरिंग वर्क्स ह्या नावाने उद्योगालय सुरू केले. तेथे वेल्डिंग पासून सर्व कामे स्वतः करीत. १९६९ मध्ये नागपूर व १९७० मध्ये ग्वालेर येथे हिंदु महिला सभा अधिवेशनाच्या अध्यक्ष.

गोडक पुरुषोत्तम गणेश

बबनराव म्हणून प्रसिद्ध. हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. पुणे नगर हिंदुसभेचे बरीच वर्षे कार्यवाह. हिंदुसभेच्या विविध चळवळीत भाग घेतात. यांनी 'विनायक' या नावाचे साप्ताहिक वृत्तपत्र हिंदुसभेच्या प्रचारार्थ काही काळ चालविले होते.

गोखले सौ. शांताबाई

पुणे हिंदुसभेच्या एक ज्येष्ठ कार्यकर्त्या. पुणे हिंदुसभेच्या काही काळ अध्यक्ष. उत्तम कीर्तनकार. यांनी थोरले माधवराव यांच्या स्मरणार्थ थेऊर येथे एक जागा घेऊन तेथे स्मारकाची योजना केली. राणी लक्ष्मी मंडळ पुण्यास काढले. त्या संस्थेच्या वतीने प्राथमिक शाळा सध्या चालू आहे.

गोरे श्रीमती गिरिजाबाई

पुणे नगर हिंदुसभेच्या कार्यकर्त्या. सभासद करण, निधि गोळा करणे, कार्यालयीन कामे करणे यांत विशेष भाग.

साठे (डॉ.) चिंतामण नारायण

जन्म ८ ऑगस्ट १९४७. लहानपणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जात. वडील नामांकित वैद्य व हिंदुत्वनिष्ठ. तीच परंपरा यांनी पुढे चालविली. १९६४ पासून पुणे हिंदुसभेचे कार्यकर्ते. १९६७ पासून पदाधिकारी. उत्तम वक्ते, तबला वादनात प्रवीण. १९७२ साली पुणे आयुर्वेद महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. आता वैद्य म्हणून शीव (मुंबई) येथे अध्यापनाचे कार्य.

भोपटकर भास्कर बळवंत

भालाकार भाऊसाहेब म्हणून प्रसिद्ध. यांनी पुण्यास पहिले शुद्धीकरण घडवून आणले. पुणे हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळात १९२५–२९ या काळात होते. यांचा लॉ क्लास प्रसिद्ध होता. नामांकित वकील व वक्ते होते. भाला वर्तमान पत्राचे संपादक. निधन १९४८.

भोपटकर सुंदराताई

भाऊसाहेब भोपटकर यांच्या कन्या. हिंदुसभेच्या कार्यकर्त्या. हिंदुसभेच्या वतीने पुणे नगरपालिकेत निवडून आल्या. हिंदुमहिला सभा स्थापन करण्यात पुढाकार. बरीच वर्षे तिच्या अध्यक्ष होत्या. उत्तम वक्त्या होत्या.

आफळे सौ. सुधा

पुणे हिंदुसभेच्या कार्यवाह. उत्तम कीर्तनकार औषधोपचार करतात.

जोशी शंकर बापूजी

जन्म १८ मार्च १८९९. शिक्षण कऱ्हाड व मुंबई येथे. मॅट्रिक झाल्यावर मुंबईस हायकोर्ट प्लीडरच्या परीक्षा दिल्या. १९३७ पासून हिंदुसभेच्या कार्यात भाग. कॅश केमिस्ट नावाने औषधी मालाचे दुकान चालविले. १९३९ पासून दहा वर्षे कऱ्हाड हिंदुसभेचे अध्यक्ष. कृष्णा घाटावरील मातीचे व वाळूचे थर उपसून घाट मोकळा करण्याच्या कामात पुढाकार. हिंदुसभेची नित्य नैमित्तिक कामे जबाबदारीने व निष्ठेने पार पाडीत. घाटाचा दावा कऱ्हाडच्या न्यायालयात, साताऱ्च्या जिल्हा न्यायालयात व मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयात तीनही ठिकाणी लढवून तिन्ही ठिकाणी जिकला व मुसलमानी आक्रमण हाणून पाडले. त्या कामी खूप परिश्रम चिकाटीने केले. तेथील मिळकतीचे विश्वस्त कै. विष्णु गणेश जोशी यांच्या निधनानंतर शंकरराव जोशी हे सध्या विश्वस्त म्हणून काम पाहतात. कृष्णा घाटावरील इमारतींचा हिंदुसमाजाला कायमचा उपयोग होत रहावा यासाठी त्यांनी तेथे अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.

जोशी (डॉ.) वासुदेव रामचंद्र

जन्म २३|११।१९०६ गारवडे (ता. कऱ्हाड) येथील राहणारे. एल. सी.पी. एस. झाल्यावर गारवडे येथे वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. १९३९ नंतर कऱ्हाड येथे कायम वास्तव्य. तेथे दवाखाना प्रसूतिगृह सुरू केले. १९२९–३० मध्ये रत्नागिरीस बंधूकडे असताना स्वा. सावरकरांची भाषणे ऐकण्याची संधि मिळाली.

त्यांनी प्रभावित. १९३६ पासून हिंदुसभेच्या कार्यात भाग. १९३९ मध्ये कऱ्हाड येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शिबिर भरले असता तेथे डॉक्टरी साहाय्य. कऱ्हाड व सातारा जिल्हा हिंदुसभेच्या कार्यात पुढाकार. १९४८ मध्ये गांधीवधोत्तर जाळ पोळीत गारवडे येथील वाडा जाळण्यात आला. १९५९ मध्ये यति नारायणानंद सरस्वती (तोफखाने) यांच्या नेतृत्वाखाली गीता पठण व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घडविले. १९६६ मध्ये स्वा. सावरकर स्मारक निधीस स्वत:चे रु. एक हजार व तीन हजार गोळा करून दिले. १९६७ मध्ये डॉक्टरांचा षष्टचर्दी समारंभ त्यांच्या मित्रमंडळींनी कऱ्हाड येथे मोठ्या प्रमाणावर साजरा केला. कऱ्हाड येथील अर्बन सहकारी को बँकेच्या नियामक मंडळाचे गेली सोळा वर्षे सभासद. सातारा जिल्ह्यात हिंदुसभेचे काही काळ अध्यक्ष. महाराष्ट्र प्रांतिक हिंदु-सभेचे एक पुढारी. १९७२ मध्ये सौ. येसु वहिनी सावरकर यांच्यावरील नाट्य वाचनाचा कार्मक्रम घडविला.

गोडबोले गणेश कोंडो

जन्म १८८९. सांगली येथे व पुढे पुण्यास शिक्षण. एक वर्ष हायस्कूलमध्ये शिक्षक. बी.ए. एलएल. बी. होऊन सांगलीस वकिलीचा व्यवसाय. जनतेचे पुढारी. राजकीय चळवळीतील प्रजेच्या बाजूने दावे मोफत लढवून जिंकले. हिंदुसभेचे एक खंबीर आधारस्तंभ. नगरपालिकेचे दीर्घकाळ सभासद होते. १९४७ साली राष्ट्रीय ध्वजाबरोबरच भगवा ध्वज उभारण्यात पुढाकार. सांगलीप्रमाणेच कोल्हापुरास जाऊनही राजकीय दावे यशस्वी रीतीने लढले. सांगली विधिमंडळावर निवडणूक. विरोधी पक्षाचे तीन वेळा नेते. त्यांच्या न्यायी वागणुकीमुळे सरकारात व जनतेतही लोकप्रिय ठरले. जनतेने मानपत्र देऊन गौरव केला. १९४८ वर्षी त्यांचा वाडा व मालमत्ता जाळण्यात आली. त्याचे वृत्त पृ. २६४ वर आले आहे. पण त्यांनी धीर न सोडता समदुःखितांना धीर दिला व आर्थिक साहाय्याची सोय करून त्यांना व्यवसाय पुन्हा उभे करण्यास प्रोत्साहन दिले. सांगली अर्बन को बँकेचे मुख्य संचालक होते. विजय साप्ताहिकाची जबाबदारी संभाळली. मार्केट ॲक्टमध्ये सुधारणा, विलिंग्डन कॉलेज व सांगलीचे एंजिनिअरिंग कॉलेज उभे करण्यात यांचा प्रमुख भाग होता. टिळकांचे भक्त, केळकरांचे अनुयायी व सावरकरांबद्दल आदर बाळगणारे होते. सांगली जळिताची माहिती गोळा करण्यात दाते यांना त्यांची फार मोलाची मदत झाली.

दांडेकर विष्णु श्रीपाद उपाख्य पंडितराव

जन्म १८९६. शिक्षण सांगलीस मॅट्रिकपर्यंत व नंतर मुंबईस व्ही. जे. टी. इन्स्टिटयूट मध्ये. १९२१ नंतर गांधीजींच्या शाळांवरील बहिष्कार आंदोलनात शिक्षण सोडले. १९२०-२१ कऱ्हाडचे आळतेकर वकील यांच्या नेतृत्वाखाली खेडो-पाडी हिंडून स्वातंत्र्याचा प्रचार. १९२२ वर्षी पुन्हा शिक्षण चालू. बी.एससी.

झाले. १९२२–२६ सोप पावडरचे उत्पादन. १९२४ फिनाईलचे उत्पादन. १९२६–२७ खामगाव येथील राष्ट्रीय शाळेत सायन्स विषयाचे शिक्षक. १९२९ किर्लोस्करांच्या उत्पादनांची एजन्सी व बोअरिंग विहिरी व पंप बसविण्याचा व्यवसाय. १९४८ साली गांधीवधोत्तर आंदोलनात घरदार सर्वस्व जळाले. जुलै १९४८ पर्यंत कारावास. दुसऱ्या युद्धकाळात सावरकरांनी सैनिकीकरणाची चळवळ सुरू केली तेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक माधवराव गोळवलकर हे सावरकरांच्या संबंधाने टीका करू लागले. तेव्हा साताऱ्चे संघचालक श्री. भाऊराव मोडक व प्रांत संघचालक श्री. का. भा. लिमये यांनी गुरुजींच्या निषेधार्थ आपल्या जागांची त्यागपत्रे दिली. ते पाहून संघ व हिंदुसभा यांच्यातील ऐक्यभाव तुटू नये म्हणून पंडितराव दांडेकर व माधवराव भिडे यानी २०।२५ संघशाखा प्रमुखांना पत्रे लिहून गुरुजींनी आपल्या धोरणात सुधारणा करावी यासाठी खटपट केली. पण ती वाया गेली. त्यामुळे संघ व हिंदुसभा यांच्यात मनोमन दरी निर्माण झाली. असाच प्रयत्न पुणे येथे दाते यांनी प्रत्यक्ष गोळवलकर गुरुजींना भेटून केला. तोही वाया गेला.पंडितराव दांडेकर हे अनेक संस्थांचे विश्वस्त आहेत. अस्पृष्टांचे बोर्डिंग, अनाथ अर्भकालय, ब्राह्मणसभा, हिंदु संस्कृति केंद्र, गणेश मंगल कार्यालय, विठ्ठल मंदिर (मारुती रस्ता), बाबाराव स्मारक मंडळ, देवल स्मारक मंदिर, स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारक इ.

जोग केशव नारायण

यांचे वडील नारायणराव जोग हे हिंदुसभेच्या दौऱ्यात असताना १९४१ वर्षी जैतापूर येथे अकल्पितपणे हृदयक्रिया बंद पडून निधन पावले. आयुष्यभर त्यांनी सार्वजनिक सेवा केली. तेच व्रत त्यांचे चिरंजीव केशवराव यांनी चालविले आहे. रत्नागिरीस १९३३ पासून सावरकरांच्या प्रेरणेनुसार काम केले. अस्पृश्यता निवारणाचे काम केल्यामुळे त्यांजवर काही काळ बहिष्कार पडला होता. १९३५ पासून हिंदुसभेच्या कार्यात विशेष भाग. भागानगर नि:शस्त्र प्रतिकार आंदोलनात भाग व सात महिने प्रत्यक्ष कारावास. रत्नागिरी जिल्ह्यात हिंदुसभेचे प्रचारक म्हणून काही काळ काम केले. पुढे आजारी पडल्याने औषधोपचारासाठी सांगलीस आले. नंतर तेथेच वास्तव्य. कोडोली व वेंगुर्ला येथे परदेशी मिशनऱ्यांविरुद्धच्या मोर्चात भाग. गणेश मंगल कार्यालय संस्थेचे एक विश्वस्त. महाराष्ट्र हिंदुसभेचे एक कार्यवाह.

रानडे भालचंद्र लक्ष्मण

जन्म १९१५ ठाणे जिल्ह्यात खालिंग येथे. सांगली येथे शिक्षण. बी.ए. शिक्षकाचा व्यवसाय. साहित्य क्षेत्रात अनेक पुस्तके लिहिली. भाषणे व लेखद्वारा हिंदुत्वाचा प्रचार. सांगली हिंदुसभेशी सहकार्य. धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात प्रसंगोपात्त भाग घेतात.

भट दामोदर मोरेश्वर

भट मास्तर म्हणून प्रसिद्ध. शिक्षक होते. लो. टिळकांचे निःसीम भक्त. आयुष्यभर सार्वजनिक कार्य केले. इतिहास संशोधक व ग्रंथलेखक. मिरज येथे यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुसभेची कामे नित्य व नियमाने होतात. सभासद नोंदणी, वर्गणी गोळा करणे, नित्य व प्रासंगिक स्वरूपाची कार्ये सतत चालत. दामुअण्णा भट यांनी गेल्या पन्नास वर्षांत सुमारे दोन लक्ष रुपये निरनिराळ्या सार्वजनिक निधींसाठी गोळा केले, हे त्यांचे फार मोठे कार्य होते. काशी विश्वेश्वर सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला व कारावास भोगला. मिरज येथे लो. टिळक पुण्यतिथि व शिवाजी जन्मोत्सव हे नियमाने साजरे करतात. हिंदुसभेचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते. सध्या पंगू अवस्थेत मुंबईस आपल्या मुलीकडे आहेत.

सावरकर (डॉ.) नारायण दामोदर

जन्म दि. २५।५।१८८८. स्वा. सावरकरांचे धाकटे बंधु. दंतवैद्यकीचा मुम्बईस व्यवसाय. टिळकपक्षीय राजकारणात भाग घेत. नामांकित वक्ते. स्वामी श्रद्धानंद यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ श्रद्धानंद नावाचे साप्ताहिक सुमारे तीन वर्षे चालविले. मुंबई हिंदुसभेचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते व काही काळ मुंबई हिंदुसभेचे अध्यक्ष. निधन दि. १९।१०।१९४९.

सावरकर विक्रम नारायण

जन्म १९३१. शिक्षण एम.कॉम. स्वा. विनायक दामोदर सावरकर यांचे पुतणे व डॉ. नारायण दामोदर सावरकर यांचे पुत्र. वास्तव्य नागपूर. प्रभावी वक्ते बेकारी व महागाई यांविरुद्ध नागपुरात आंदोलन केले. सिमला कराराच्या वेळी (१९७२) निषेध व्यक्त करण्यासाठी सिमल्यास जात असता अटक. १९६४ वर्षी युकॅरिस्ट काँग्रेसच्या विरुद्ध हिंदुसभेने सुरू केलेल्या आन्दोलनात भाग घेतला. चार महिने कारावास. १९७३ मार्च एप्रिलमध्ये मुंबईस वन्देमातरम् प्रकरणी आंदोलनाचे नेतृत्व केले. १९७३ पासून महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष. अ. भा. हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद. प्रज्वलंत साप्ताहिकाचे संपादक.

भिडे अनंत सदाशिव उपाख्य भिडे गुरुजी

जन्म १४ जानेवारी १९१२. बाबाराव सावरकर सांगलीस असताना त्यांच्या परिचयातून हिंदु तरुणांची हिंदुसभा स्थापन झाली त्यात हे होते. १९३५ मध्ये बी. टी. झाल्यावर रत्नागिरीस पटवर्धन विद्यालयात शिक्षक. तेथे स्वा. सावरकरांच्या परिचयात आले. हिंदुसभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या वाढीसाठी काम केले. १८५७ च्या स्वातंत्र्यसमरावर व्याख्यान दिल्यामुळे रत्नागिरीचे विद्यालय सोडावे लागले. नंतर काही दिवस सातारा येथे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक, तेथे असताना संघाचे व हिंदुसभेचे कार्य केले. १९३९ भागानगर निःशस्त्र प्रतिकार आन्दोलनात भाग व कारावास. सुटल्यावर १७ जुलै १९३९ ला

हैदराबाद येथे ब्रिटिश रेसिडेन्सीत भगवा ध्वज उभारला. हिंदुसभेचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते. १९४५ मध्ये फ्री हिंदुस्थान हे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. ते तीन वर्षे चालविले. १९४८ मध्ये गांधीवधोत्तर कारावास. १९५२ पर्यंत अ. भा. हिंदुमहासभेच्या कार्यकारिणीचे सदस्य. सावरकरांचा अमृतमहोत्सव व मृत्युंजय समारंभाचे प्रवर्तक. भाषाशुद्धि कोश, Quit India to Split India पुस्तके प्रसिद्ध केली.

सावरकर शांताराम शिवराम उपाख्य बाळाराव

जन्म १७ मार्च १९२३, पाभरे ता. गुहागर येथे. १९४१ मध्ये मॅट्रिक. रा. स्व. संघात स्वयंसेवक. १९३९ पासून मुम्बईत वास्तव्य. १९४१–४२ गिरणीत नोकरी. १९४२-४५ केंद्रीय शासनाच्या निरीक्षण विभागात लेखनिक. भिडे गुरुजींच्या परिचयाने हिंदुराष्ट्रदलात व हिंदुसभेत प्रवेश. १९४५ फ्री हिंदुस्थान साप्ताहिकात काम केले. १९४७ पासून पूर्ण वेळ हिंदुसभेचे काम. गांधीवधोत्तर एक वर्ष कारावास. १९४९–६६ स्वा. सावरकरांचे वैयक्तिक कार्यवाह. १९५०–६८ साप्ताहिक हिंदुपत्राचे संपादक. १९६२–६९ दै. मराठा पत्रात संपादकीय वर्गात नोकरी. मुंबई, महाराष्ट्र व अ. भारत हिंदुमहासभेचे कार्यवाह. अनेक प्रांतांतून दौरे. उत्तम मराठी व हिंदी वक्ते. वीर सावरकर प्रकाशनाचे संचालक. सावरकरांच्या विस्तृत चरित्राचे लेखनकार्य चालू आहे.

गोखले अनंत विष्णु

जन्म १९१३. पुण्याचे रहिवासी. १९३५ पासून हिंदुसभेचे एक कार्यकर्ते. १९५७ वर्षी पुणे नगर हिंदुसभेचे कार्यवाह. हिंदुसभेच्या ग्रंथालयाचेही काम पाहात. पुण्यात होणाऱ्या हिंदुसभेच्या निरनिराळ्या चळवळीत भाग. त्यात प्रसंगी अटकही होत असे. आता चिरंजीवांकडे डोंबिवली येथे असतात.

पाठक माधव दत्तात्रेय

जन्म १९२३. बी. ए, एलएल. बी. हैदराबाद येथे शिकत असताना भागानगरच्या वन्देमातरम् आंदोलनात भाग घेऊन राजकीय जीवनास प्रारंभ. औरंगाबाद तुरुंगात १९३९ वर्षी कारावास. भागानगर (हैदराबाद) येथील हिंदुस्वयंसेवक संघ, हिंदुराष्ट्रदल यांच्या कार्यात प्रमुख भाग. १९४७ साली यशवंतराव जोशी यांच्या नेतृत्वाखाली जनतेची गाऱ्हाणी मांडण्यासाठी प्रचंड सशस्त्र मोर्चा राजवाड्यासमोर नेण्यात आला. तेव्हा रझाकारांनी त्याजवर हल्ला केला. त्यांच्या नंग्या तरवारीच्या वारांनी जखमी. १९५६ पासून मुंबईस स्थायिक. मुंबई उच्च न्यायालयात विधिज्ञ व्यवसाय. हिंदुसभेचे निष्ठावंत नेते. हिंदुत्वनिष्ठांचे मुंबईतील न्यायालयातील कामांचे प्रमुख आधार. युकॅरिस्ट काँग्रेसविरुद्ध रिट अर्ज, सत्यनारायण प्रकरणी स्थानबद्धतेविरुद्ध अर्ज, 'गांधी हत्या आणि मी' या पुस्तकावरील बंदीचा दावा, महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या मदन आयोगापुढे हिंदूंची बाजू व्यवस्थित रीतीने मांडली जावी म्हणून सतत जागरूक लक्ष व उपस्थिति. युकॅरिस्ट

काँग्रेसविरोधाच्या निमित्ताने स्थानबद्धता व कारावास. महाराष्ट्र हिंदुसभेचे तीन वर्षे अध्यक्ष व एक वर्ष कार्यवाह. हिंदुसभेचे एक प्रमुख नेते.

प्रधान गोपीनाथ रघुनाथ

जन्म ठाणे येथे १८९३ मध्ये. मॅट्रिकपर्यंत शिक्षण. नंतर तीन वर्षे कार्डिग व स्पिनिंग शिक्षण. ई. डी. ससून गिरणीत तीस वर्षे नोकरी. स्पिनिंग मास्तर व पुढे व्यवस्थापक म्हणून काम केले. १९२७ पासून हिंदुसभेचे सभासद. डॉ. उदगावकर, डॉ. नाईक, श्री. भागवत, सी. के. बोले, भगवंतराव परळकर यांचे सहकारी. १९२५ वर्षी नागपूर येथे असताना मशिदीवरून वाद्ये वाजवीत मिरवणूक नेण्याच्या चळवळीत भाग घेतला. युकॅरिस्ट ख्रिश्चन परिषदेच्या वेळी १९६४ मध्ये मुम्बईस दहा दिवस स्थानबद्ध. परळ हिंदुसभेचे दहा वर्षे अध्यक्ष.

पेंडसे विष्णु महादेव

जन्म बार्शी तालुक्यात कासारवाडी येथे दि. १९ नोव्हेंबर १९०४. बार्शी येथे हिंदुसभेचे कार्यवाह म्हणून काम केले. १९३४ पासून मुंबईस मोगलाईतून हिंदूंच्या पळवून नेलेल्या मुलींची आर्यसमाजाने सोडवणूक केली अशा मुलींना कोल्हापूर आर्यसमाजाकडे पोचत्या करून तेथे त्यांचे विवाह लावून दिले. भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात सोलापूर जिल्ह्यातून पहिल्या तुकडीतून गेले. औरंगाबाद येथे कारावास. कल्याण हिंदुसभेच्या कार्यकारिणीचे सभासद होते. १९६४ पासून परळ हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद. गेली सहा सात वर्षे शुद्धीकरण, उपनयन, विवाह इ. सांस्कृतिक कार्यात पौरोहित्य. हिंदुसभेचे कार्यकर्ते.

साठे श्रीराम विनायक

१९२१ साली इंटर झाल्यावर असहकारितेच्या चळवळीत विल्सन कॉलेज सोडले. एक वर्ष खादी चळवळीत भाग. कापड गिरणीत नोकरी केली. बडोद्यास कलाभुवन संस्थेत दोन वर्षे तांत्रिक शिक्षण घेतले. नंतर निरनिराळ्या गिरण्यांतून काम केले. लोकर धंद्यात विशेष प्रावीण्य. तथापि गिरणीत काम करीत असताना खादी वापरली व अजूनही वापरतात. काँग्रेसच्या मुस्लिमधार्जिण्या वृत्तीमुळे हिंदुसभेकडे वळले. बडोदे व ठाणे येथे काही मुसलमान गुंडांनी हिंदु मुली पळविल्या असता त्यांची सुटका केली. पुढें त्या गुंडांना शिक्षाही झाल्या. १९४७ पासून हिंदुसभेचे सभासद. युकॅरिस्ट काँग्रेसविरोधी चळवळीबद्दल कारावास.

आठल्ये के. के.

जन्म १९११. एम.ए. बी. टी. एलएल. बी. १९२४ सालापासून सावरकरांच्या विचारांनी प्रभावित. त्या वेळी रत्नागिरीस असल्याने सहभोजनात भाग. १९३३ मध्ये मुंबईस विल्सन कॉलेजात दाखल. १९४५ मुंबई हिंदु विद्यार्थी संघाचे अध्यक्ष. गिरगाव हिंदुसभेचे उपाध्यक्ष. १९४६ साली हिंदुमुस्लिम दंग्यात हिंदूंची मुक्तता करण्याच्या कामात भाग. हिंदुसभेच्या वतीने कल्याण ते गोरेगाव व्याख्यानरूपाने प्रचार. गांधीवधानंतर तीन महिने कारावास. हिंदुराष्ट्रदलात सहभागी.

देसाई विश्वनाथ गंगाधर

जन्म १९१०. मॅट्रिक. १९३४ पर्यंत काँग्रेसमध्ये एक स्वयंसेवक म्हणून काम. १९३७–३८ पासून हिंदुसभेशी संबंध. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशीही संबंध. १९३८ नंतर हिंदुसभेत स्वयंसेवक म्हणून कार्य. गेली कित्येक वर्षे परळ हिंदुसभेचे कार्यवाह. या शाखेतर्फे शुद्धिकार्य व हिंदु समाजातील सर्व जातींचे वैदिक पद्धतीने विवाह संस्कार केले जातात. मुंबई हिंदुसभेच्या कार्यकारिणीचे सभासद. महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे सभासद. १९६४ वर्षी युकॅरिस्ट काँग्रेसला विरोध करण्यासाठी प्रचार-सभा, भाषणे व संघटन. त्यानिमित्त आठ दिवस कारावास. हिंदुसभेचे मुंबईतील एक निष्ठावंत व जबाबदार कार्यकर्ते.

सप्रे श्रीकृष्ण श्रीनिवास

जन्म १६ नोव्हेंबर १९१६. इंटर आर्टस् पर्यंत शिक्षण. लष्करी शिक्षणाची आवड. १९३५–६५ प्रादेशिक सेनेत अर्धवेळ नोकरी. १९३७ पासून सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादी विचारसरणीचे अनुयायी. १९४७–४८ साली निर्वासितांना साहाय्य व समाजसेवा. गांधीवधोत्तर दोन महिने कारावास. सावरकर स्मृति मंडळाचे कार्यवाह. हिंदुसभेच्या विविध कार्यात भाग घेतात.

चव्हाण वामन बाबूराव

वडी चव्हाण म्हणून प्रसिद्ध. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे अनुयायी. १९२४ पासून काही काळ रत्नागिरीस होते. क्रांतिकारकाचा पिंड. शिवणकामाचा व्यवसाय. धोबीतलाव गोळीबार प्रकरणात यांचा भाग होता. भगतसिंग व राजगुरु यांच्या विश्वासातील होते. त्यांना फाशीची शिक्षा झाल्यावर त्याचा सूड घेण्याकरिता त्यांनी मेजर स्वीटलंड याजवर गोळ्या झाडल्या. पण त्यातून स्वीटलंड बचावले. चव्हाण यांना अटक होऊन बारा वर्षांची तुरुंगाची शिक्षा झाली. सुटून आल्यावर त्यांनी शिवणकामाचा व्यवसाय सुरू केला. हिंदुसभेची कामे निष्ठेने करीत. १९३९ वर्षी भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात भाग घेतला. औरंगाबाद तुरुंगात होते. अलीकडे स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांना पेन्शन मिळू लागले आहे.

नगरकर रामचंद्र केशव

जन्म पुणे येथे दि. २ एप्रिल १९०६. बडोद्यास मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाले. १९२३ मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश. खादीचा प्रचार केला. काँग्रेसच्या मुस्लिमधार्जिण्या धोरणामुळे हिंदुसभेकडे वळले. १९३७ साली अहमदाबाद येथील हिंदुसभेच्या अधिवेशनास उपस्थित. सावरकरांच्या हिंदुत्ववादी विचाराने प्रभावित. समुद्रात रामदास बोट बुडाली तेव्हा संकटग्रस्तांना मदत करण्यासाठी हिंदुसभेचे स्वयंसेवक पथक तयार केले. १९४६ च्या हिंदुमुसलमान दंग्याच्या काळातही हिंदूंच्या संरक्षणा-साठी संघटित योजना कार्यवाहीत आणली. १९४८ मध्ये मुंबईस आलेल्या निर्वासि-तांच्या मदतीसाठी काम केले. सावरकरांचे भक्त. गांधीवधोत्तर पोलिसांनी भयंकर मारहाण केली. दोन वर्षे कारावास. १९५० मध्ये सुटका.

देशमुख (डॉ.) नारायण अनंत

जन्म १९०२ वर्षी. एम. बी. बी. एस. हे १९४० पासून हिंदुसभेत सभासद असून १९४२ वर्षी गिरगाव हिंदुसभेचे अध्यक्ष झाले व सध्याही अध्यक्ष आहेत. १९४८ वर्षी गांधीवधोत्तर यांचा दवाखाना जाळण्यात आला व त्यांचे हजारो रुप-यांचे नुकसान झाले. हिंदुसभेतील एक विचारवंत नेते. गोस्वामी दीक्षितजी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या विश्व हिंदु मिशनचे ते कार्याध्यक्ष आहेत. तसेच दादरच्या अक्कलकोट स्वामींच्या मठाचे व केशवजी नाईक चाळीतील सार्वजनिक गणेशोत्सवाचे ते विश्वस्त आहेत.

घारपुरे केशव विनायक उपाख्य बापूराव

जन्म २३ सप्टेंबर १९१५. बी. ए. एम. एड. अध्यापनाचा व्यवसाय. साप्ताहिक हिंदूमध्ये मराठीतून व साप्ताहिक हिंदुविजयमध्ये हिंदीतून विविध विषयांवर अडीचशांवर लेख लिहिले. हिंदुसभेच्या कार्याच्या निमित्ताने दोन वेळा स्थानबद्धता व कारावास. रचनात्मक कार्याची आवड. हिंदु राष्ट्रदलाचे संघटक. हिंदूंचा इतिहास, सावरकर साहित्य, सैनिक शास्त्र, राजनीति नि धर्मशास्त्र हे अभ्यासाचे व लेखनाचे विषय. स्वयंसेवक कार्य कुशलपणे केले म्हणून शंकराचार्य (मठ संकेश्वर) यांनी 'धर्मधुरीण' ही पदवी देऊन गौरव केला. मुंबई व महा-राष्ट्र हिंदुसभेचे सदस्य. विचारवंत कार्यकर्ते. हिंदी, इंग्रजी व मराठीतही उत्तम वक्ते. गोव्यात नामांतर नोंदणी कार्यात दाते यांचे सहकारी होते. १३ प्रांतांत हिंदु संघटनार्थ प्रचार. मोहन रानडे विमोचन समितीचे एक कार्यकर्ते. जनता सहायक केंद्र चालवितात. १९५२ पासून आजपर्यंत प्रौढ शिक्षण, शुद्धि, व्यवसाय मार्गदर्शन शिक्षकांचे प्रशिक्षण, वनवासी वारली समाजात औषधोपचार, पत्रद्वारे मार्गदर्शन, हिंदुराष्ट्रसेनेची शिबिरे संघटित करणे, विविध सामाजिक संस्थांबरोबर सहकार्य, हिंदुधर्म प्रसारक मंडळ, मसुराश्रम, विश्व हिंदुधर्म संमेलन, आर्यसमाज या संस्थांना स्वयंसेवकाच्या गटासह सहकार्य. एक आदर्श सामाजिक कार्यकर्ते.

मसूरकर रामचंद्र तुकाराम

मुंबईस १९१६ साली लो. टिळकांच्या भाषणाने प्रभावित. १९१७ पासून चिंच-पोकळी भागात स्वयंसेवक संस्थेत काम. सावरकर बंधूंच्या सुटकेसाठी सह्या गोळा करण्याचे काम केले. १९२३ साली लो. टिळकांच्या स्मरणार्थ लोकमान्य सेवामंडळ स्थापन करण्यात आले त्यात ल. ना. केसरकर, म. ना. बसनाक, बा. भि. घाडी यांच्या सहकार्याने कामगारांच्या अडचणी दूर करण्याचे कार्य केले. गेली ५२ वर्षे सेवाभावी वृत्तीने काम करीत आहेत. १९३७ पासून सावरकरांच्या हिंदुत्वविषयक कार्यात भाग. हिंदुसभेच्या विचारसरणीनेच राष्ट्रोद्धार होईल ही निष्ठा बाळगतात.

जोशी विष्णु सखाराम

जन्म सावंतवाडी संस्थानात चेंदवण येथे १९१० साली. १९३१ पासून व्यवसायानिमित्त मुंबईस. वेस्ट कॉर्पोरेशनमध्ये नोकरी. स्वा. सावरकरांच्या प्रेरणेने

परळ हिंदुसभेत १९३७ मध्ये दाखल. भागवत व पेंडसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य. परळ हिंदुसभेचे ४ वर्षे प्रमुख कार्यवाह. १९६६ पासून सांस्कृतिक कार्य करतात.

जोगळेकर सौ. विमल विश्वनाथ

जन्म १९२०. जळगाव जिल्ह्यात रावेर येथे होत्या. सध्या मुंबईस वास्तव्य. १९४२ सालापासून हिंदुसभेचे सभासद करण्याचे काम करीत. हिंदुराष्ट्रसेनेच्या स्त्री शाखेचेही काम करीत. निवडणुकीच्या वेळी हिंदुसभेच्या इच्छुकांच्या प्रचाराचे काम केले. प्रसंगी यथाशक्ति काम आजही करतात.

दिवेकर श्रीमती कृष्णाताई

जन्म ५ ऑगस्ट १९००. पतिनिधनानंतर मुले घेऊन मुंबईस आल्या व उदरनिर्वाहाकरिता काही मंडळींना जेवावयास घालू लागल्या. त्यात हिंदुसभेची मंडळी होती. त्यांच्या सूचनेवरून त्या हिंदुमहासभेच्या कार्यातही १९४० पासून लक्ष घालू लागल्या. हिंदुसभेचे सभासद नोंदविणे व वर्गणी गोळा करणे ही कामे कसलाही मोबदला किंवा कमिशन न घेता त्या करीत. हिंदुमहासभेचे कार्य, स्त्री संरक्षणाचे कार्य, नंदादीप समिति, वीर सावरकर व माई सावरकर सत्कार समिति, हिंदु महिला समिति, राणी लक्ष्मी मंडळ, अभिनव भारत या संस्थांसाठी त्याचप्रमाणे पुण्यास पानशेत पूरग्रस्तांचे पुनर्वसन यासाठी निधि गोळा करण्याचे व इतर कार्य यांनी केले आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या मोर्चात भाग घेतला. बखले व विक्रम सावरकर यांच्या निवडणूक प्रचाराचे काम केले. आजही हिंदुसभेच्या कार्यात भाग घेतात.

गद्रे आबा

जन्म १९१३ किरडुवे (ता. संगमेश्वर). शिक्षण बेताचे. राष्ट्रीय चळवळीत स्वयंसेवक म्हणून विविध कामे केली. स्वा. सावरकरांचे निष्ठावंत अनुयायी. काही धंद्यात केवळ मुसलमान असत, हिंदू सामान्यतः नसत. हिन्दूंनी ताशा वाजविण्याचे काम करावे म्हणून प्रचार केला. हिन्दूंच्या मंदिरात ताशे वाजविण्याचे काम हिन्दूंनीच केले पाहिजे असा आग्रह होता. त्यासाठी स्वतः ताशा वाजवीत. अनेक शिष्य शिकवून तयार केले व या व्यवसायातील मुसलमानांची मक्तेदारी मोडली. मोफत वाचनालय, भगवे ध्वज पुरविणे, टिळक, सावरकर, सुभाष यांचे फोटो मोफत वाटणे, ही कामे करतात. वृत्तपत्र विक्रेत्याचा व्यवसाय. शिवाय छत्र्या दुरुस्त करणे इ. हिन्दुसभेचे निष्ठावंत पाईक.

थत्ते भाऊराव

जन्म दि. २९ नोव्हेंबर १९३२. बार्शी येथे हिंदुराष्ट्रदलाचे शाखाप्रमुख होते. भागानगर आंदोलनात काम केले. सध्या मुलुंड येथे वास्तव्य. महाराष्ट्र सेवासंघाचे कार्य करतात. वेल्फेअर कमिटी, झोपडपट्टीसंघ, आदिवासी सेवासंघ, वडार समाज संस्था यांचे सल्लागार. संयुक्त महाराष्ट्र समितीचे एक कार्यवाह

होते. आंदोलनाच्या निमित्ताने दोन वेळा कारावास. काशी विश्वेश्वर मंदिर सत्याग्रहात भाग घेतला. त्यात कारावास भोगला. युकॅरिस्ट विरोधी आंदोलनातही भाग व कारावास. रोटरी क्लब, मुलुण्ड या संस्थेने भाऊरावांच्या सामाजिक सेवेबद्दल गव्हर्नरांच्या हस्ते सत्कार केला. महाराष्ट्र हिंदुसभेचे सभासद.

गिरकर संतुराम तुकाराम

जन्म १२ ऑक्टोबर १९१०. मॅट्रिकपर्यंत शिक्षण. मुम्बईस गिरणीत नोकरी. १९२९–३८ या काळात काँग्रेसमध्ये काम केले. पुढे १९५६ पासून हिंदुसभेत काम करू लागले. परळ हिंदुसभेत चार वर्षे कार्यवाह.

दातार नारायण मोरेश्वर

जन्म दि. १० ऑक्टोबर १९१२ मॅट्रिक झाल्यावर पिंजाऱ्याचा व्यवसाय सुरू केला. १९३४ सांगलीस राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रवेश. १९३९ मध्ये भागानगर निःशस्त्र आंदोलनात भाग व सहा महिने कारावास. १९५४ मध्ये परदेशी ख्रिश्चन मिशनरी विरोधी आन्दोलन. १९५५ मध्ये गोवा विमोचन आंदोलन व संयुक्त महाराष्ट्र समिति यांत भाग. १९५७ पासून परळ हिंदुसभा पुरस्कृत सांस्कृतिक कार्याची धुरा संभाळली. १९६४ मध्ये पोपविरोधी आंदोलनात अटक. १९६६ पासून हिंदुसंस्कारकार्य स्वतंत्रपणे करतात. सावरकरांचे काही काळ लेखनिक.

देवकर गणेश शंकर

जन्म ७ मे १९०५. हिंदुसभेच्या कार्यात १९३७ पासून भाग घेतात. १९४० पासून प्रभादेवी हिंदुसभेचे कार्यवाह होते. सध्या मुंबई दादर शाखेच्या व महाराष्ट्र प्रांतिक सभेच्या कार्यांत भाग घेतात.

पेंडसे रघुनाथ मोरेश्वर उपाख्य दादा पेंडसे

जन्म २० सप्टेंबर १८९६. बडोदा येथे नारायण गुरु व्यायामशाळेत व्यायामाचे सर्व प्रकारचे शिक्षण. १९२० पासून मुंबईस गिरगावात हिंदु सार्वजनिक व्यायाम शाळा काढली. १९२३ पासून हिंदुसभेचे कार्यकर्ते. १९४३ दक्षिण विभाग हिंदुसभेचे उपाध्यक्ष. हिंदुधर्मप्रचाराचे कार्य करतात.

तेंडुलकर यशवंत अनंत

जन्म रत्नागिरी जिल्हयात भडे येथे दि. ७ एप्रिल १९१७. १९३८ पासून हिंदुसभेचे कार्य करतात. १९४०–४३ कुंभारवाडा येथे हिंदुसभेत दंग्यांच्या काळात काम केले. १९४३ मध्ये लालबाग हिंदुसभा स्थापन केली. १९४४–४८ मुंबई हिंदुसभेचे सहकार्यवाह. १९५१ पासून मुंबई उपनगरात हिंदुसभेचे कार्य करतात.

थत्ते ल. ग.

कर्तारसिंग थत्ते म्हणून प्रसिद्ध. जन्म बिवली (ता. चिपळूण) येथे १९०६ साली. एलएल.बी. आहेत. सार्वजनिक हिंदुत्वनिष्ठ कार्यास जीवन वाहिले आहे. हिन्दुसभेचे काम १९३५–५२ या काळात केले. आता हिन्दुराज्यपक्ष काढला

आहे. अ. भा. हिंदुमहासभेचेही सभासद आहेत. हिन्दुसमाजावर अन्याय होतो असे वाटले म्हणजे त्याविरुद्ध थत्ते यथाशक्ति प्रतिकार करतात. अटक करून घेण्यात यांचा विक्रम आहे. यांना १२९ वेळा अटक झाली (व नंतर सुटकाही).

पाटील विष्णु रामराव

सोलापुरात व महाराष्ट्रात अन्यत्रही वि. रा. पाटील म्हणून प्रसिद्ध. जन्म १८ एप्रिल १९०६. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. सोलापूर येथे काही काळ गिरणीत नोकरी. १९२० पासून विविध सार्वजनिक चळवळीत भाग. १९२१ च्या म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीतही भाग घेतला. राष्ट्रीय शाळेत दाखल झाले. त्यानंतर मुळशी सत्याग्रह, १९२९ चा मिठाचा सत्याग्रह, इत्यादीत भाग. कॉंग्रेस सेक्रेटरी या नात्याने १९३२ साली त्यांना अडीच वर्षाची शिक्षा झाली. १९३७ चा पुण्याचा सोन्या मारुती सत्याग्रह, भागानगर लढ्याच्या काळात १९३९ मध्ये सोलापुरात स्वयंसेवकांसाठी शिबिर चालविणे, १९५९ चे काशी विश्वेश्वर सत्याग्रह आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र समितीचे महाराष्ट्रातील कार्य व समितीचा दिल्लीचा मोर्चा, प्रतापगडावरील मोर्चा, युकॅरिस्ट कॉंग्रेस विरोधी चळवळ, इत्यादि चळवळीत भाग घेतला. त्यात शिक्षा भोगाव्या लागल्या. मजूरविषयक प्रश्नात त्यांचे न्याय्य हक्क प्रस्थापित करण्याच्या कामात साहाय्य केले. सोलापूर नगरपालिकेत पंचवीस वर्षे सभासद होते. त्या काळात लोकांची अनेक कामे केली. रस्त्यावरील अतिक्रमणे दूर केली व सोलापूरचा 'मास्टर प्लॅन' तयार करण्याच्या कामात पुढाकार घेतला. सोलापूर हिंदुसभेचे व महाराष्ट्र हिंदुसभेचे अनेक वर्षे पदाधिकारी आहेत. १९६२–६८ मध्ये अध्यक्ष होते. १९६७–७२ या काळात ते सोलापूराहून मुंबई विधिमंडळात हिंदुसभेच्या वतीने निवडून आले. हिंदुसभेच्या प्रचारार्थ त्यांनी मराठवाड्यात, गुलबर्गा वगैरे ठिकाणी व महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दौरे केले. १९६४ मध्ये सोलापूर येथे हिंदुमहासभेचे वार्षिक अधिवेशन भरविले. अस्पृश्यता निवारणासारख्या विधायक कार्यात विशेषत: पाण्याच्या बाबतीत त्यांनी १९७२ मध्ये विशेष कामगिरी केली. मार्डी येथील मंदिर मशीद वादात हिंदूंची बाजू न्यायालयात लढविली. सोलापूर हिंदुसभेच्या वतीने वेळोवेळी निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर लोकमत व्यक्त करणे, चळवळ घडवून आणणे, मालेगाव, देगलूर सारख्या ठिकाणी झालेल्या दंग्याच्या गावी जातीने जाऊन पाहणी करून माहिती गोळा करणे व त्याचे प्रतिवृत्त सभेस सादर करणे इत्यादि विविध प्रकारची कामे त्यांनी केली व आजही करीत आहेत.

काळे गोविंद रघुनाथ उपाख्य बाबाराव काळे

बार्शी येथे मुद्रणव्यवसाय व शेती. काही काळ सहकारी बँकेत नियामक मंडळाचे सदस्य. बार्शी येथील हिंदुसभेचे पुढारी. १९३७ पासून हिंदुसभेच्या कार्यात पुढाकार. १९३८ वर्षी मराठवाड्यातील हिंदूंच्या परिस्थितीच्या पाहणीच्या कार्यात

सहकार्य. महाराष्ट्र हिंदुसभेचे सभासद, काही काळ कार्यवाह. १९४८ वर्षी गांधी-वधोत्तर स्थानबद्ध होते. हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते.

पवार रामभाऊ

बार्शी हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. काही काळ अध्यक्ष. सोलापूर जिल्हा हिंदुसभेचेही अध्यक्ष. महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे कार्यवाह. बार्शी येथे हिंदु-सभेच्या वतीने नित्य नैमित्तिक कार्ये करण्यात पुढाकार.

गायकैवारी गोपाळ रामचंद्र

जन्म १८९९ नगर जिल्ह्यात चिचोंडी येथे. १९१८ वर्षी मॅट्रिक झाले. नोकरी करून पुढचे शिक्षण केले. रानडे वक्तृत्वस्पर्धेत २५० रु. चे पारितोषिक मिळविले व पुण्याच्या डेक्कन जिमखान्याच्या आखाड्यात पैजेची कुस्ती जिंकून बक्षीस मिळविले. १९२८ पासून नगर येथे वकिलीचा व्यवसाय. नगरपालिकेचे आठ वर्षे सभासद होते. नेवासे येथील ज्ञानेश्वर मंदिरातील एका ओहोरीवर मुसलमान आपला हक्क सांगू लागले व त्यातून वाद निर्माण झाला. नेवासे येथील लोकांनी त्याविरुद्ध न्यायालयात दावा दाखल केला. तो रा. ब. देशमुख, दादा-साहेब करंदीकर व गायकैवारी यांनी लढवून जिंकला. पुढे त्यावर उच्च न्याया-लयापर्यंत अपील झाले व तेथेही देशमुख व गायकैवारी यांनी तो दावा जिंकला. १९२८ पासूनच हिंदुसभेच्या कामात रस घेतात. १९३५ पासून हिंदुसभेचे पुढारी म्हणून सातत्याने काम करीत आहेत. १९३९ वर्षी भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनासाठी एक शिबिर चालविले. १९४१ च्या भागलपूर सत्याग्रहात भाग. मशिदीवरून हिंदूंच्या सवाद्य मिरवणुकींना मुसलमान विरोध करीत. त्यासंबंधातील दावे लढवून जिंकले. १९४८ च्या गांधीवधोत्तर दंगलीत यांची पंचवीस हजारांची लूट झाली. गायकैवारी यांना काही काळ निर्वासित व्हावे लागले. १९६१ वर्षी से. बापट यांच्या अध्यक्षतेखाली षष्टचब्दी समारंभ सार्वजनिक स्वरूपात साजरा झाला. गोवा मुक्ति संग्रामात भाग घेण्यासाठी नगरहून गेलेल्या मंडळींच्या कुटुंबाचा योगक्षेम चालविला. १९५९–७३ काळात सुमारे सोळाशे ख्रिश्चन मुसलमानांना हिंदुधर्मात घेतले. राळेगावी १२८ ख्रिश्चन, शेराळ गावी १५३ व कोल्हारा देवी येथे १२५ व शिंगवे येथे ३८ ख्रिश्चनांची सामुदायिक हिंदूकरणे केली. हिंदुसभा कार्यकर्त्यांवरील अनेक सार्वजनिक स्वरूपाचे खटले विनामूल्य व प्रसंगी पदरमोड करून चालविले व जिंकले. नगर येथील हिंदुसभेचे व महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे एक ज्येष्ठ पुढारी.

आपटे नारायण दत्तात्रेय

बी. एससी. बी. टी. इतिहास संशोधक दत्तोपंत आपटे यांचे चिरंजीव. नगर येथे मिशन हायस्कूलमध्ये शिक्षक. नगर येथे हिंदुसभेच्या विविध कार्यात भाग. सैनिकीकरणासाठी प्रचार. फाळणीविरुद्ध निदर्शने करण्यात पुढाकार. अग्रणी दैनिकाचे संचालक. गांधीवधाच्या खटल्यात फाशी १५-११-१९४९.

सदावर्ते खंडेराव मल्हार उपाख्य दादासाहेब

जन्म १८९१. हिंदुसभचे एकनिष्ठ कार्यकर्ते. सावरकरांच्या अभिनव भारत संस्थेचे सभासद. त्यांच्या भाषणाने प्रभावित. भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात भाग घेतला. स्पृश्यांच्या झुणकाभाकर आंदोलनात भाग घेत. त्यामुळे काही काळ सनातनी मंडळींनी यांना वाळीत टाकले होते. गायकैवारी यांचे हिंदुसभेच्या विविध कार्यातील सहकारी. निधन १९५५.

तांबोळी रघुनाथ केशव उपाख्य भाऊराव

जन्म नगर येथे १५ नोव्हेंबर १९१७. हायस्कूलमध्ये शिकत असताना सावरकरांचे जप्त वाङमय वाचण्यास मिळाले. त्याने प्रभावित. संघात जात. १९४८ च्या संघसत्याग्रह आंदोलनात विसापूर तुरुंगात सहा महिने कारावास. शुद्धि. कार्यात प्रमुख भाग. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात हिंदुसभेच्या वतीने काम केले. त्यावेळी अटक. १९६७ च्या जातीय दंगलीनिमित्त सरकारने चार खटले भरले. त्या सर्वांत संपूर्ण निर्दोष म्हणून सुटका. सध्या नगर येथील नगर पालिकेत लोकनियुक्त सभासद. १९३५ पासून मुद्रण व्यवसाय. १९६२ पासून स्वतःच्या मालकीचे श्रीपाद मुद्रणालय. नगरमधील हिंदुसभेचे एक पुढारी व सार्वजनिक कार्यकर्ते.

मेहेंदळे पुरुषोत्तम काशीनाथ उपाख्य राजाभाऊ

जन्म दापोली तालुक्यात गिम्हवणे येथे दि. १३।६।१९२७. शिक्षण इंग्रजी सहा इयत्ता. लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जात. १९४३ साली नोकरी निमित्त मुंबईस असताना हिंदुमुसलमान दंग्यात स्वयंसेवक म्हणून काम केले. पुढे नोकरीनिमित्त नगरला आले. १९६७ पासून हिंदुसभेच्या कार्यात विविध प्रकारे काम करतात. नगर हिंदुसभेचे कोषाध्यक्ष आहेत. हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते.

पवार लक्ष्मण सोनबा

जन्म १ नोव्हेंबर १९३७. शिक्षण एस. एस. सी. पर्यंत गाडीया रजपूत लोहार (घिसाडी) समाजात जन्म. लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जात. १९६० पासून हिंदुसभेचे कार्य. युकॅरिस्ट काँग्रेसच्या वेळी (१९६४) बंदिवास. १९६७ च्या जातीय दंग्यात (१८-९-६७) आरोपी म्हणून अटक. न्यायालयातून निर्दोष सुटका. औरंगाबाद येथील 'जामीरे मिल्लत' ला विरोध केल्याबद्दल स्थानबद्धता. दोन महिने कारावास. हिंदुसभेच्या महाराष्ट्र शाखेत संघटक म्हणून कार्य शुद्धिसंघटनांचे कार्य करतात.

श्री. यंगल बा. स. उपाख्य बाबूराव

नगर जिल्हयातील एक हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते. वडील व्यवसायासाठी विजापूरला गेल्याने शालेय शिक्षण तिकडेच झाले. आरंभी हॉटेलातून कामे करीत. नगर येथे करकरे यांचे हॉटेल होते तेथे कामास राहिले. भागानगर निःशस्त्र प्रतिकाराच्या आंदोलनाच्या निमित्ताने सेनापति बापटांचे नगर येथे व्याख्यान झाले त्याने

बाबूराव फार प्रभावित झाले, व हिंदुसभेचे कार्य करू लागले. काशी विश्वेश्वर आंदोलनात भाग घेतल्याबद्दल सहा महिने कारावास. शिंगणापूर येथील शनैश्वराचे भक्त आहेत. नगर येथील श्रीनवग्रह मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात पुढाकार. उदबत्त्या बनवण्याचा व्यवसाय. हिंदुसभेच्या कार्यात सातत्याने भाग घेतात.

ब्रम्हे रंगनाथ धोंडो

अकोला तालुक्यात बरगी बेलापूर येथे जन्म १९१२. पुण्यास शिक्षण. लो. टिळकांच्या भाषणांनी प्रभावित. नगर येथे स्वतःचे ब्रम्हे टेलरिंग फर्म नावाचे दुकान काढले. हिंदूंमधून लोक परधर्मात जात त्यांना परत हिंदु केले पाहिजे या विचाराने शुद्धीच्या चळवळीत भाग. १९४२ च्या चळवळीतही भाग घेतला. १९४६ मध्ये करकरे यांच्या नेतृत्वाखाली नौखालीस गेले. हिंदु-मुस्लिम दंग्यांच्या निमित्ताने कारावास. हिंदुसभेचे एक निष्ठावंत कार्यकर्ते.

शिरसाठे मधुकर नारायण

जन्म १९२८. शिक्षण सात यत्ता. लहानपणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जात. नगरला घरी शिवणकामाचा व्यवसाय. काकासाहेब गायकैवारीं व त्यांचे सहकारी यांच्याबरोबर हिंदुसभेच्या कार्यात भाग. जातीय दंगलीच्या काळात कारावास. हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते.

करकरे विष्णु रामकृष्ण

जन्म राजापूर तालुक्यात जुवाठी येथे १९०९ वर्षी. शिक्षण राजापूर व मुंबई येथे. गुजराथीही उत्तम येत असे. १९२५ वर्षी पुण्यास उपहार गृह चालविले. पुण्यास प्लेग झाल्यामुळे नगरला गेले. तेथे बेस्ट टी हाऊस नावाचे उपहारगृह माळीवाड्यात चालू केले. १९४० मध्ये कापड बाजारात सेंट्रल गेस्ट हाऊस नावाने उपहारगृह व लॉजिंग बोर्डिंग व्यवसाय. सावरकरांच्या भाषणाने प्रभावित. गायकैवारी यांच्या नेतृत्वाखाली हिंदुसभेत भाग घेत. १९४६ साली नौखालीतील भयंकर अत्याचारांनी प्रतिकाराची भावना वाढली व हिंदूंच्या मदतीकरिता निधी व कपडे गोळा करून दोघा सहकाऱ्यांबरोबर नौखालीस गेले. तेथे हिंदूंना शक्य ती सर्व मदत केली. गांधी खुनाचा कट केल्याच्या आरोपावरून जन्मठेप. १९६४ मध्ये सुटका. पुन्हा सत्यनारायण प्रकरणी अटक व न्यायालयातून सुटका.

हिंदुसभेची सर्व प्रकारची कामे करीत. शुद्धीकरणावर भर असे, अन्यायाचा प्रतिकार करण्यास सदैव सिद्ध असत. निधन दि. ६ एप्रिल १९७४.

मंडलिक रामचंद्र नारायण

जन्म १ जुलै १८८१. बी. ए. स्वा. सावरकरांच्या अभिनव भारत या क्रांतिकारी संस्थेचे सदस्य. १९०८ मध्ये विहारी वर्तमानपत्राचे संपादक या नात्याने एका

लेखाबद्दल खटला होऊन दोन वर्षे कारावास. सुटल्यावर जपानला गेले. पेण येथे १९१९ वर्षी कुलाबा समाचार पत्र काढले. ते आता त्यांचे पुतणे श्री. विश्वनाथ विष्णु मंडलीक चालवितात. १९३७ पासून मुंबई विधान सभेचे व नंतर १९५२ साली विधान परिषदेचे सदस्य या नात्याने १९५४ पर्यंत काम केले. अन्यायाविरुद्ध झगडा हे त्यांचे जीवित कार्य होते. १९३७ पासून हिंदुसभेच्या कार्यात भाग, १९४७–५४ पर्यंत महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष होते. निधन दि. ३० ऑगस्ट १९५८.

जोशी पुरुषोत्तम प्रभाकर उपाख्य बापूराव

महाड येथे राहणारे. लो. टिळकांचे निःसीम भक्त. व्यायामाचे शोकी. हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात कायदेभंग करून औरंगाबाद तुरुंगात कारावास. लो. टिळकांच्या नावाने महाड येथे तालीम काढली आहे.

काळदाते माधवराव सावळाराम

अहमदनगर जिल्ह्यातून ठाण्यास व्यवसायासाठी आले. ठाण्यासच वास्तव्य. विविध सार्वजनिक कार्यात पुढाकार. ठाणे नगरपालिकेचे अध्यक्ष होते. ठाणे हिंदुसभेचे दीर्घकाळ अध्यक्ष. शुद्धिकार्यावर विशेष भर होता.

फडके गणेश कृष्ण

कल्याण येथील विविध सार्वजनिक कार्यातील पुढारी. लो. टिळकांचे भक्त. केळकरांचे अनुयायी. विविध सहकारी संस्थांतून जबाबदारीची कामे केली. कल्याण नगरपालिकेचे अनेक वर्षे सभासद. लोकशाही स्वराज्य पक्षाचे पुढारी. १९३७ साली कल्याणमधून मुंबई विधानसभेवर निवडून गेले. हिंदुसभेतील एक ज्येष्ठ नेते. महाराष्ट्र हिंदुसभेचे उपाध्यक्ष. सावरकर वाङमय प्रकाशन समितीचे सदस्य.

परुळेकर काशीनाथ लक्ष्मण

रत्नागिरीस स्वा. सावरकरांच्या सान्निध्यात हिंदुसभेचे कार्य केले. १९४८ पासून हिंदुसभेचे अध्यक्ष. पतितपावन मंदिराच्या कामात भाग. १९४८–६४ या काळात मंदिराची मिळकत हायकोर्टाच्या रिसीव्हरच्या ताब्यात होती. १९६४ साली जिल्हा कोर्टाने पतितपावन मंदिर संस्थेचे रिसीव्हर म्हणून विश्वस्त मंडळ नेमले. जिल्हा हिंदुसभेचे अध्यक्ष या नात्याने परुळेकरांची विश्वस्त मंडळावर नेमणूक. त्यांनी स्वतःची रु. २६०० व त्यांच्या पत्नीने १००१ रु. मंदिरास देणगी दिली. रत्नागिरी हिंदुसभेचे ज्येष्ठ कार्यकर्ते. सध्या वय ८५ आहे.

परुळेकर चंद्रकांत काशीनाथ

रत्नागिरी येथील नामांकित वकील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात लहानपणी जात. नंतर हिंदुसभेचे कार्यकर्ते. रत्नागिरी नगर पालिकेचे सदस्य व अध्यक्षही होते. पतितपावन मंदिराची कायद्याची कामे यांनी उत्तम रीतीने व विनामूल्य संभाळली. यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्त्वाचा भाग घेतला होता.

दामले मोरेश्वर विष्णु

सावरकरांचे स्नेही व सहकारी शिरगावचे विष्णुपंत दामले यांचे पुत्र. विष्णुपंतांच्या घरी सावरकरांचे काही काळ वास्तव्य होते. मोरोपंत रत्नागिरी येथील फाटक हायस्कुलात शिक्षक होते. आता सेवानिवृत्त. सध्या पतितपावन मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आहेत, नवकोकण वृत्तपत्राचे व्यवस्थापक म्हणून काम करतात. हिंदुसभेचे एकनिष्ठ अनुयायी.

जोशी अच्युत शंकर

हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. पतितपावन मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सव्वीस हजार रुपयांचा निधि जमविला. पतितपावन मंदिराचे व्यवस्थापक व विश्वस्त मंडळाचे कार्यवाह.

भिडे पुरुषोत्तम गणेश

शामराव नावाने प्रसिद्ध. दुकानदारीचा व्यवसाय. रत्नागिरीत हिंदुसभेचे एक प्रमुख कार्यकर्ते. पतितपावन मंदिराचे एक विश्वस्त. स्वा. सावरकरांचा पुतळा रत्नागिरी येथे उभारण्याच्या कामी महत्त्वाची कामगिरी केली.

मलुष्टे सुधाकर अच्युत

रत्नागिरीमध्ये यांचे वडील अच्युतराव यांच्या बाजारपेठेतील दुकानात स्वा. सावरकरांची बैठक असे. सावरकरांचे अभिमानी. हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. पतित पावन मंदिरात प्रतिवर्षी माघ महिन्यात हिंदु गणेशोत्सव साजरा केला जातो, त्यात प्रमुख भाग. पतितपावन मंदिराचे एक विश्वस्त आहेत.

शिंदे (डॉ.) महादेव गणपतराव

रत्नागिरी येथे वैद्यकीय व्यवसाय. सावरकर रत्नागिरीस असताना त्याचे रत्नागिरी येथील सर्व प्रकारच्या सार्वजनिक कार्यात सहकारी. हिंदुसभेचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते. पतितपावन मंदिराचे व्यवस्थापक होते.

शिंदे (डॉ.) विनायक महादेव

हेही रत्नागिरी येथे नामांकित वैद्य आहेत. हिंदुसभेचे एक कार्यकर्ते व पतितपावन मंदिराचे विश्वस्त आहेत.

आठल्ये जगन्नाथ विष्णु

रत्नागिरी येथील हिंदुसभेचे एक कार्यकर्ते. पतितपावन मंदिराचे एक विश्वस्त.

जोशी भगवान भार्गव

रत्नागिरी येथील हिंदुसभेचे एक कार्यकत. अनेक वर्षे कोषाध्यक्ष होते.

कानिटकर रामचंद्र अनंत

जन्म पुण्यास १७ जानेवारी १८८१. १९०६ बी.ए.एल.एल.बी. १९०८ बुलढाणा येथे वकिली. मध्यप्रांतातील विविध सार्वजनिक कामात भाग घेत.

बुलढाणा नगरपालिकेचे अध्यक्ष. १९१५–३० बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी. १९२६–३७ मध्यप्रदेश विधिमंडळाचे सभासद. पुण्यास १९३४ साली जातीय निर्णय विरोधी परिषदेचे अध्यक्ष. १९३७–४३. वऱ्हाड निजामाला परत देऊ नये यासाठी प्रचारार्थ स्वखर्चाने विलायतेस गेले होते. बुलढाणा हिंदुसभेचे अध्यक्ष. १९४६–४८. विदर्भ प्रांतिक हिंदुसभेचे अध्यक्ष. १९५०–५३. दिल्ली येथे अखिल भारत हिंदुमहासभेचे सरकार्यवाह. १९४०–४१ सैनिकीकरणाचा प्रचार. दि. १ जून १९६२ ला निधन.

सहस्रबुद्धे लक्ष्मण गोपाळ

जन्म २५।११।१९०६. सुशिक्षित दुकानदार. हिंदुसभेचे एक निष्ठावंत कार्यकर्ते. पुणे नगर हिंदुसभेचे दीर्घकाळ अध्यक्ष. हिंदुसभेच्या वतीने पुणे महानगर-पालिकेत १९५२–६५ सभासद होते. पुण्यातील प्रसिद्ध किराणा भुसार व्यापारी संघटनेचे अध्यक्ष व पदाधिकारी. अनेक व्यापारी परिषदांचे अध्यक्ष. पुण्यास भरणाऱ्या (१९७५) हिंदुमहासभा अधिवेशनाच्या स्वागत मंडळाचे कार्याध्यक्ष.

होनराव सोमनाथ बाळशेट

पुणे हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात भाग व तुरुंगवास. हिंदुसभेच्या विविध स्वरूपाच्या कार्यात तळमळीने भाग घेतात. युकॅरिस्ट काँग्रेसच्या वेळी तुरुंगात स्थानबद्ध. स्वातंत्र्य सैनिक म्हणून यांना पेन्शन मिळू लागले आहे.

दामले गजानन विष्णु

रत्नागिरी (शिरगाव) येथील विष्णुपंत दामले यांचे चिरंजीव. यांच्या घरी स्वा. सावरकर प्लेगच्या दिवसांत राहात असत. सावरकर मुंबईस राहण्यास आल्यावर (१९३७) सावरकरांचे वैयक्तिक कार्यवाह. त्यांच्याबरोबर दौऱ्यात सर्वत्र असत. भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनात भाग व कारावास. मुंबई दंग्याच्या वेळी यांना अटक झाली. (१९४६) १९४८ मध्ये गांधीवधोत्तर पोलिसांच्या कैदेत दीर्घकाळ होते. हिंदुसभेचे निष्ठावंत अनुयायी.

कासार अप्पा

याच नावाने प्रसिद्ध. मिरजेचे राहणारे. भागानगर निःशस्त्र आंदोलनात भाग व कारावास. सावरकरांबरोबर दौऱ्यात शरीररक्षक म्हणून जात. हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. गांधीवधोत्तर पोलिसांच्या कैदेत दीर्घकाळ होते, युकॅरिस्ट काँग्रेसच्या विरुद्ध मुंबईत तुफानी प्रचार केला. त्यानिमित्त स्थानबद्ध. कट्टर हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते.

*

सूचि

या पुस्तकात काय वाचाल

महाराष्ट्र हिंदुसभेच्या गेल्या पन्नास वर्षांतील (१९२४–१९७४) कार्यांचा इतिहास या ग्रंथात दिला आहे. त्यात जुन्या धर्मपरंपरेतून सामाजिक परिवर्तन घडवून आणणे, शुद्धीकरणाला जुन्या शास्त्री पंडितांची मान्यता मिळविणे, अस्पृश्यता निवारणाचे कार्य, भिन्नजातीय विवाहांच्या विविध प्रश्नांचा विचार, अनाथ हिंदु महिलांसाठी आश्रमांची स्थापना, इत्यादि विविध स्वरूपाच्या सामाजिक कार्यांचे तपशीलवार विवरण आहे.

त्याचप्रमाणे राजकीय क्षेत्रात इस्लामी आक्रमणाचे प्रकार, मोपला बंडातून शुद्धीकरणाच्या चळवळीला मिळालेली गति, मुसलमानांचे जातीय राजकारण, हिंदु मुसलमान दंग्यांसंबंधी सरकारी धोरण, वृत्तपत्रांना जामिनक्यांचे तडाखे, जातीय मतदारसंघांना हिंदुसभेचा विरोध व त्यांना कॉंग्रेसने दिलेला पाठिंबा, त्यामुळे कॉंग्रेसमधून हिंदुसभावाद्यांचे झालेले उच्चाटन, निजाम राज्यातील हिंदूंवर झालेले अन्याय व त्यांची पाहणी, भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचे आंदोलन, स्वा. सावरकरांचे हिंदुराष्ट्रवादाविषयी दार्शनिक मार्गदर्शन, दुसऱ्या महायुद्धकाळातील हिंदुसभेचे धोरण व सैनिकीकरणावरील भर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदुसभा व हिंदुराष्ट्रदल यांचे परस्पर संबंध, विविध प्रकारची संघटनात्मक कार्ये, स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेसाठी नमुना घटना तयार करणे, हिंदुराष्ट्रवादाचा प्रचार, फाळणी-पूर्वकाळात हिंदुसमाजावर होणाऱ्या आक्रमणापासून हिंदुसमाजाच्या संरक्षणाचे प्रयत्न, म. गांधींचे नौखालीतील अनुभव, गांधीवधोत्तर महाराष्ट्रात झालेल्या जळिताचे स्वरूप, इत्यादि विषयांचा यात अंतर्भाव आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात अहिंदु समाजासंबंधाने हिंदुसभेचा दृष्टिकोन, विधिमंडळांतून घटनात्मक कार्यासाठी त्यांच्याशी सहकार्याची भूमिका, एकसंध विरोधी आघाडी निर्माण करण्यासाठी प्रयत्न, संयुक्त व संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या आंदोलनातील व गोवा मुक्ति आंदोलनातील हिंदुसभेचे कार्य, परदेशी मिशनऱ्यांविरुद्ध आंदोलन, काशी विश्वेश्वर मंदिर सत्याग्रह, मुंबईच्या युकॅरिस्ट कॉंग्रेसविरुद्ध चळवळ, गोव्यातील नव हिंदूंची नामान्तर नोंदणी, समग्र सावरकर वाङ्मयाचे प्रकाशन, वन्देमातरम्‌साठी आन्दोलन, हिंदुसभांच्या स्थानिक कार्यांचा व कार्यकर्त्यांचा परिचय. इत्यादि विविध स्वरूपाच्या विधायक, संरक्षक, व मार्गदर्शक कार्यांचा इतिहास यात अंतर्भूत आहे.